# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

### बी. ए. भाग–३ राज्यशास्त्र

सत्र ५ : पेपर–११ (DSE- E80)

# पाश्चात्त्य राजकीय विचार–१

**(Western Political Thought-I)**

सत्र ६ : पेपर–१६ (DSE- E205)

# पाश्चात्त्य राजकीय विचार–२

**(Western Political Thought-II)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-३ पेपर ११ व १६ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ४००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-70-3

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र**

अध्यक्ष **– प्रा. डॉ. श्रीमती भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
  राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अ‍ॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक ११ सत्र पाच साठी 'पाश्चात्त्य राजकीय विचार-१' आणि पेपर क्रमांक १६ सत्र सहा साठी 'पाश्चात्त्य राजकीय विचार-२' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ११ पाश्चात्त्य राजकीय विचार-१ यामध्ये प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली, जीन जॅक रूसो यांच्या विचारांचा तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १६ पाश्चात्त्य राजकीय विचार-२ यामध्ये जॉन स्टुअर्ट मिल, कार्ल मार्क्स, ॲन्तिनिओ ग्रामसी, हाना आरेण्ट यांच्या विचारांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र अभ्यासमंडळ अध्यक्ष डॉ. भारती पाटील, नेहरू अभ्यास केंद्र समन्वयक, डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.


■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) अशोक चौसाळकर**
४१६, आर.के.नगर हौसिंग सोसायटी नं. ६
सोसायटी ऑफीससमोर, कोल्हापूर

**डॉ. सूर्यकांत गायकवाड**
दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–५ : पेपर–११ : पाश्चात्त्य राजकीय विचार–१**
**सत्र–६ : पेपर–१६ : पाश्चात्त्य राजकीय विचार–२**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. विजय पानस्कर**<br>बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. पाटण, जि. सातारा | १ | – |
| **प्रा. राहूल मांडणीकर**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. आनंदा कांबळे**<br>भोगावती महाविद्यालय, कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. सूर्यकांत लक्कप्पा गायकवाड**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ | ४ |
| **डॉ. खंडेराव खळदकर**<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | – | १ |
| **प्रा. मोहन हजारे**<br>श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली | – | २ |
| **डॉ. अजितानंद जाधव**<br>ईस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा, जि. सातारा | – | ३ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) अशोक चौसाळकर**
४१६, आर.के.नगर हौसिंग सोसायटी नं. ६
सोसायटी ऑफीससमोर, कोल्हापूर

**डॉ. सूर्यकांत गायकवाड**
दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–११** | |
| | **पाश्चात्त्य राजकीय विचार–१** | |
| १. | प्लेटो | १ |
| २. | ॲरिस्टॉटल | ३७ |
| ३. | मॅकियाव्हेली | ६४ |
| ४. | जीन जॅक रूसो | ८० |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१६** | |
| | **पाश्चात्त्य राजकीय विचार–२** | |
| १. | जॉन स्टुअर्ट मिल | ९५ |
| २. | कार्ल मार्क्स | १६१ |
| ३. | ॲन्तिनिओ ग्रामसी | १९७ |
| ४. | हाना आरेण्ट | २१६ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक १

# प्लेटो

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ जीवन परिचय
- १.२.२ प्लेटोची अभ्यासपद्धती
- १.२.३ प्लेटोचा न्यायसिद्धांत
- १.२.४ प्लेटोची शिक्षणपद्धती
- १.२.५ प्लेटोचा साम्यवाद
- १.२.६ प्लेटोचे आदर्श राज्य
- १.२.७ प्लेटोचे उपआदर्शराज्य

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वंय–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासात आपल्याला

- प्लेटो या ग्रीक विचारवंताच्या विचारांचा अभ्यास करता येईल.
- यामध्ये त्याचे पूर्व चरित्र व त्याच्यावर पडलेला प्रभाव यांचा अभ्यास करता येईल.
- प्लेटोच्या अभ्यासपध्दतीचा आढावा घेता येईल.
- प्लेटोचा न्यायाचा सिध्दान्त अभ्यासता येईल, त्याचबरोबर प्लेटोपूर्वी प्रचलित असलेले न्यायसिद्धान्त व प्लेटोने त्यांचे केलेले खंडण अभ्यासता येईल.
- प्लेटोच्या शिक्षणपद्धतीचे महत्व अभ्यासता येईल.
- प्लेटोच्या साम्यवादाचा उद्देश अभ्यासता येईल. त्यामध्ये संपत्ती व स्त्रियांचा (कुटुंबाचा) साम्यवाद अभ्यासता येईल.
- त्याच्या शिक्षणपद्धती व साम्यवादातून निर्माण होणारे आदर्श राज्य याची माहिती होईल.
- आदर्शराज्यातील त्रूटी दूर करून त्याने मांडलेले उपआदर्श राज्याविषयीचे विचार अभ्यासता येतील.

## १.१ प्रास्ताविक :

राजकीय विचारांचा आरंभ जरी प्लेटोपूर्वी झाला असला तरी राजकीय विचारांचा वैज्ञानिक दृष्टीकोणातून विचार प्रथम प्लेटोनेच केला हे मान्य करावे लागेल. सॉक्रेटीस आणि सोफीस्ट् विचारवंतांनी जनतेमध्ये राजकीय विचाराबद्दल जरी उत्सुकता निर्माण केली असली तरी अशा राजकीय विचारांना क्रमबद्ध आकार देण्याचे श्रेय प्लेटोलाच द्यावे लागेल. सोफिस्ट आणि सॉक्रेटीस यांनी ग्रीक राजकीय विचारात कोणतीही भर घातलेली असो. त्यांनी सूत्रबद्ध राजकीय विचार मांडलेले नाहीत राजकीय प्रश्नावर शास्त्रीय पध्दतीने लिहिणारा विचारवंत म्हणून प्लेटोचा उल्लेख करावा लागेल. त्याचा शिष्य ॲरिस्टॉटल व प्लेटो यांचे लिखाण म्हणजे युरोपच्या बौद्धिक विश्वातील फार मोठी भरारी आहे. प्लेटोनी आपल्या लिखाणात महत्त्वाचे विचार मांडले आहेत.

## १.२ विषय-विवेचन :

### १.२.१ जीवन परिचय :

प्लेटोचा जन्म इ. स. पूर्व ४२७ मध्ये ॲथेन्स येथे झाला. त्याचे घराणे कुलीन होते. प्लेटोच्या वडिलांचे नाव पेरीकरियन आणि आईचे नाव एरिस्टीज होते तो लहान असतानाच ॲथेन्स व स्पार्टा यांच्या युद्धात ॲथेन्सचा पराभव झाला. ॲथेन्सच्या सत्ताधारी वर्गात प्लेटोचे अनेक नातेवाईक होते. स्पार्टाच्या वर्चस्वाखाली तीस सर्वसत्ताधिकाऱ्यांचे ॲथेन्ससाठी जे मंडळ होते, त्यात प्लेटोचे काही नातेवाईक होते.

त्या काळातील वरिष्ठ वर्गीय मुलाप्रमाणे प्लेटोचे लहानपणी शिक्षण झाले. तरूणपणी तो सॉक्रेटिसच्या सहवासात आला आणि सॉक्रेटिसच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव पडला. ॲथेन्समधील लोकशाही प्रेमी लोकांनी सॉक्रेटिसचा विष देऊन खून केला. सॉक्रेटिसच्या मृत्यूने प्लेटोच्या जीवनाला वेगळे वळण मिळाले.

ग्रीक नगरराज्याच्या राजकारणात भाग घेण्याऐवजी तो तत्वज्ञ बनला. राजकारण आणि तत्वज्ञान यांचा परस्परांशी त्याने इतका मेळ घातला की राजा तत्वज्ञानी असणे आवश्यक झाले. सॉक्रेटिसच्या मृत्यूनंतर प्लेटोने लवकरच ॲथेन्स सोडले. मेगॅरा, सिरीन, इजिप्त, लोअर इटली, सिसिली, इराण, बॅबिलोनिया, हर्बिया इत्यादी देशाना त्याने भेटी दिल्या व आदर्शराज्य निर्मितीच्या दृष्टीने विचार केला. जवळ जवळ बारा वर्षे प्रवास करून प्लेटोने विविध देशांच्या राजकीय परिस्थितीचा व तेथील विचारप्रणालींचा अभ्यास व निरीक्षण केले.

इ. स. पूर्व ३८८-३८७ मध्ये प्लेटोने ॲथेन्स येथे ॲकॅडमीची स्थापना केली. ॲकॅडमी स्थापन्याच्या पाठिमागे त्याचे दोन हेतू होते. पहिला म्हणजे केवळ ज्ञान मिळविण्याच्या लालसेने व शास्त्रशुध्द पद्धतीने विद्येचा अभ्यास व्हावा; व दुसरा हेतू असा की मिळविलेले ज्ञान माणसाचे हित साधण्यासाठी वापरावे. ॲकॅडमीत शिक्षण देत असताना झालेल्या विविध सवांदांचा एक संग्रह म्हणजे त्याचा 'रिपब्लिक'(ठशर्िीलश्रळल) हा ग्रंथ होय. मुळची तल्लख बुध्दी, त्यात प्रवास व संकटामुळे परिपक्व झालेल्या अनुभवाची भर, तरूण पिढीस जनहितार्थ शिक्षण देऊन तयार करण्याची आंतरिक तळमळ यामुळे ॲकॅडमीस चांगले यश मिळाले. ॲकॅडमीत सर्व ग्रीसमधून निरनिराळ्या प्रांतातील तरूण येवून शिकून गेले. या संस्थेतून अनेक तत्वेवेत्ते, राजकारणी पुरुष व सेनापती निर्माण झाले. ॲकॅडमीचे काम पहात असताना प्लेटोने तत्वज्ञान, निती, राजकारण, अध्यात्म इत्यादी विषयक विविध ग्रंथ लिहिले होते. हे अध्ययन अध्यापनाचे कार्य इ. स. पूर्व ३४७ पर्यंत (मृत्यूपर्यंत) म्हणजे वयाच्या ८० वर्षापर्यंत चालू ठेवले.

**प्लेटोवर पडलेला प्रभाव :**

**१) तत्कालीन परिस्थिती :**

कोणत्याही विचारवंतावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. विचारवंत, तत्वज्ञ हे त्यांच्या काळाचे अपत्य असतात, त्यामुळे त्या काळातील आवश्यकतांनी प्रभावित होऊन ते सिद्धान्त प्रस्थापित करत असतात. प्राचिन ॲथेन्समधील अस्ताव्यस्त राजकीय परिस्थितीचा प्लेटोच्या मनावर फारच सखोल परिणाम झाला. ॲथेन्स व स्पार्टा ही नगरराजे युध्दात गुंतली होती. त्यांच्यातील संघर्षाचे विपरीत परिणाम दिसू लागले होते. अनेक प्रकारच्या शासनपध्दतीचा प्रयोग होऊन गेला होता. कुलीन तंत्र आणि प्रजातंत्र यांना भगदाडे पडली होती. लोकशाहीच्या बुरख्याआड सर्रास अत्याचार सुरू होता. सॉक्रेटिसारख्या महान विचारवंताचा बळी गेला होता. अशा वेळी आदर्शप्रणालीची समाजाला आवश्यकता होती, या गोष्टीचा प्रभाव पडल्याने प्लेटोने त्याच्या 'रिपब्लीक' या ग्रंथात आदर्श राज्याची कल्पना मांडली.

**२) सॉक्रेटिसचा प्रभाव :**

प्लेटोच्या विचारावर सर्वात अधिक प्रभाव सॉक्रेटिसचा पडला. सॉक्रेटिसच्या सान्निध्यात तो सॉक्रेटिसच्या मृत्यूपर्यंत राहीला. सॉक्रेटिसच्या विद्वत्तेचा व ज्ञानाचा सखोल परिणाम त्याच्यावर झाला. सद्‌गुण हेच ज्ञान आहे व ज्ञान हाच सद्‌गुण आहे. या सॉक्रेटिसच्या तत्वज्ञानाचा प्लेटोवर सखोल परिणाम झाला व त्यातूनच त्याची तत्वज्ञ राजाची कल्पना उदयास आली. प्लेटोच्या शिक्षणाचा सिद्धान्त व न्यायाचा सिद्धान्त म्हणजे सॉक्रेटिसचा प्लेटोवर झालेला प्रत्यक्ष परिणामच होय.

**३) ग्रीकमधील नगरराज्यांचा प्रभाव :**

प्लेटोने निरनिराळ्या देशात भ्रमंती करून तेथील राज्यपद्धतीचा अभ्यास केला, इतर राज्यातील विचारप्रणालीचाही त्याच्यावर प्रभाव पडला आहे. प्लेटोच्या साम्यवादाच्या कल्पनेवर स्पार्टाच्या व्यवस्थेचा प्रभाव दिसून येतो.

**४) ग्रीक तत्त्वज्ञानाचा प्रभाव :**

सेलन, थेलीस, डेमॉक्रीटस, लायकर्गस, ऑर्किटॅस, पायथॉगोरस इत्यादी ग्रीक तत्वज्ञांच्या तत्वज्ञानाचा प्लेटोने अभ्यास केलेला होता. त्यामुळेच प्लेटोने मांडलेल्या राजकीय विचारांची बैठक तात्विक स्वरूपाची होती. तत्वज्ञानाच्या अभ्यासामुळे तो आदर्श राज्याच्या कल्पनेकडे झुकलेला दिसतो.

**५) डायोनिसियचा परिणाम :**

सिसिलीच्या डायोनिसियला (राजाला) आदर्श शासक बनविण्याचा प्लेटोने प्रयत्न केला, परंतु त्यात त्याला अपयश आले. आदर्श शासक बनविण्यात अनंत अडचणी आहेत, याची प्लेटोला कल्पना आली त्यानूसार हळूहळू वास्तवादाच्या दृष्टीकोणातून प्लेटो विचार करू लागला. त्यातूनच त्याने 'दि स्टेटस्मन' आणि 'दि लॉज' हे ग्रंथ लिहिले. या ग्रंथात प्लेटोचा आदर्शवाद कमी होऊन व्यवहाराच्या पातळीवर प्लेटो उतरला आहे असे दिसून येते.

## प्लेटोची ग्रंथसंपदा :

प्लेटोने जवळ जवळ ३६ ग्रंथ लिहले 'ॲपॉलॉजी' आणि 'क्रिटो' या ग्रंथात त्याने राज्य व व्यक्तीचे संबंध व्यक्त केले आहेत. 'मिनो' मध्ये ज्ञान व प्रशिक्षणाचा विचार केला आहे. 'चार्मिडिज' आणि 'लॉकेज' मध्ये आत्मसंयमाच्या गुणांचा उल्लेख आहे. 'प्रोटोगोरस' व 'गोर्जिया' हे त्याचेच ग्रंथ आहेत. प्लेटोच्या ३६ ग्रंथापैकी राजकीय अभ्यासाच्या दृष्टीने त्याचे तीन ग्रंथ महत्वाचे आहेत.

१) दि रिपब्लिक (The Republic)

२) दि पॉलिटिक्स किंवा स्टेटस्मन (The Politics or The Statesman)

३) दि लॉज (The Laws)

## १.२.२ प्लेटोची अभ्यासपद्धती :

विचार किंवा भाव व्यक्त करण्याची (शैली) म्हणजेच पद्धती होय. प्लेटोने अवलंबलेल्या पद्धतीवर सॉक्रेटिसचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. सॉक्रेटिसप्रमाणे प्लेटोने संवादात्मक पध्दती वापरली. वादविवादाच्या रूपात जेव्हा लोक आपले विचार व्यक्त करतात त्यावेळी त्यांच्या कल्पना व्यवस्थित समजू शकतात. वादविवादामुळे सत्याची पारख होते. संवादात्मक पद्धतीमुळे सत्य आणि वास्तविक ज्ञानाचा विजयच होतो. संवादात्मक पद्धतीने असत्य आणि अवास्तविकता दूर होते. प्लेटोच्या ग्रंथात लहान लहान उपमा कथा आणि अलंकार यांची रेलचेल आहे. पण त्यात प्लेटोने आपला वास्तवतेवरील जोर ढळू दिलेला नाही.

प्लेटोने सदृश्यतेचा प्रयोग (Use of Analogy) आपल्या पद्धतीत केला आहे. मानवी जीवनातील आणि पशूंच्या जीवनातील साम्यांचा उपयोग करून त्याने आपले लिखाण हृदयस्पर्शी बनविले आहे. राज्याच्या संरक्षकाची तुलना त्याने कुत्र्याशी केली आहे. त्याच्यामते संरक्षकाचा स्वभाव हा कुत्र्यासारखा असावा, शत्रुवर त्याने तुटून पडावे व परिचित व्यक्तीचे स्वागत करावे. अशाच प्रकारे मनुष्याच्या वंशासंबंधी विचार करताना त्याने जनावरातील सादृश्याचा उपयोग केला. जनावरे जशी विशिष्ठ काळातच (मोसमात) गर्भदानात रत राहतात त्याचप्रमाणे माणसाचे असावे, स्त्री व पुरूषांनी याच पद्धतीने अस्थायी रूपात एकत्र यावे. याचबरोबर प्लेटोने आगमनात्मक व निगमनात्मक पद्धतींचाही उपयोग केला आहे.

### १.२.३ प्लेटोचा न्यायसिद्धान्त (Plato's Theory of Justice) :

प्लेटोच्या 'रिपब्लिक' या ग्रंथाने दुसरे नाव 'Concerning Justice' असे आहे. ग्रंथाच्या नावावरूनच त्याने न्यायाला किती महत्व दिले आहे याची प्रचिती येते. न्याय हा प्लेटोच्या 'रिपब्लिक'चा मुख्य सिध्दान्त आहे. प्लेटोचे आदर्श राज्य हेच मूळी न्यायावर आधारलेले आहे किंवा त्याच्या आदर्श राज्याचा आधार न्याय हाच आहे. न्यायाशिवाय आदर्श राज्याची कल्पनाच करता येणार नाही. प्लेटोने या ग्रंथात पूर्वी प्रचलित असलेल्या विविध न्यायविषयक सिद्धान्तांचे खंडण केले आहे. प्लेटोची न्यायविषयक कल्पना नैतिकतेवर आधारलेली होती. समाजात शांतता, सुव्यवस्था, संघटन आणि न्याय प्रस्थापित होत असेल तरच आदर्श राज्य निर्माण होऊ शकते, असे प्लेटोचे मत होते. प्लेटोने आपल्या न्यायसिद्धान्ताद्वारे 'व्यक्तीला आपल्या कर्तव्याची जाणीव करून समाजातील इतर व्यक्तींच्या कर्तव्याला हानी न पोहचविता प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे व विकास साधला पाहिजे असे सांगितले' मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून विचार करून त्याने असा सिद्धान्त मांडला की भिन्न व्यक्ती भिन्न प्रकारची कार्ये करतील पण ती करत असतानाही ते त्या एकतेच्या सुत्रात बांधलेल्या राहतील आदर्श समाजाला घातक ठरणाऱ्या गोष्टी दूर करून व मनुष्याला आपल्या कर्तव्यशिलतेची जाणीव करून देवून त्यांना संघटीत ठेवण्याचे कार्य प्लेटोचा न्यायसिद्धान्त करतो.

**सिद्धान्ताचे कारण :**

प्लेटोच्या काळी ॲथेन्सची अवस्था अतिशय वाईट झाली होती. सर्वत्र स्वार्थ व सत्तापिपासा यांचे साम्राज्य पसरले होते. ॲथेन्सच्या अधिकाऱ्यांनी सत्तेचा भयानक गैरवापर सुरू केला होता. अपरिपक्व राज्यकारभार, परस्परांत हस्तक्षेप, गटबाजी व राजकीय स्वार्थ हे त्याकाळचे चित्र होते. त्यामुळे राज्यकारभाराकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले होते. यातुनच निस्वार्थी सेवा व स्वतःचे कार्य लक्ष केंद्रीत करून इतरांच्या हस्तक्षेपा विना करणे अशी पद्धत निर्माण करणे जरूरीचे होते. त्यासाठीच प्लेटोने न्यायाचा नवा सिद्धान्त मांडला. त्यानुसार समाजाचे तीन भागात विभाजन व प्रत्येक भागाने स्वतःचे कार्यक्षेत्र केंद्रीत करून ते पार पाडणे. यातुन राजकीय स्पर्धा नाहीशी होवून राज्याचे ऐक्य व सुसंवाद प्रस्थापित होईल असे प्लेटोला वाटत होते. यामधूनच त्याचा न्यायसिद्धान्त आस्तित्वात आला.

प्लेटोने न्यायाची व्याख्या करताना असे म्हटले की ''प्रत्येक व्यक्तीला ती गोष्ट प्राप्त व्हावी जी तीला प्राप्य आहे'' म्हणजेच प्लेटोने योग्यता आणि शिक्षणाच्या अनुरूप व्यवहारांसाठी व्यक्तीला पात्र ठरविले.

प्लेटोने आपली न्यायाची कल्पना स्पष्ट करताना पूर्वी प्रचलित असलेल्या न्यायसंबधीच्या सिद्धान्तांचे खंडण केले. प्लेटोने ज्या न्यायसिद्धान्ताचे खंडण केले ते पुढीलप्रमाणे–

**१) न्यायाचा परंपरागत सिद्धान्त (सिफॉलसचा सिद्धान्त)** (The Theory of Cephalus) **:**

प्लेटोच्या 'रिपब्लिक' ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात न्यायविषयक सिद्धान्त सिफॉलस व पॉलिमारकस यांनी मांडला. सिफॉलसच्या मते, भाषणात सत्यता असणे, कार्यात श्रेष्ठत्व असणे, आणि ईश्वराचे व मनुष्याचे ऋ ण फेडणे हाच खरा न्याय होय. सिफॉलसचा मुलगा पॉलिमारकस् यांने वडिलांच्या पश्चात न्यायाच्या परंपरावादी सिद्धान्ताचे प्रतिनिधीत्व केले. त्यांच्या मते, मित्रांचे चांगले करणे व शत्रुचे वाईट करणे, मित्राशी मित्रत्वाची आणि शत्रुशी शत्रुत्वाची वर्तणूक करणे म्हणजे न्याय होय. सत्य बोलणे आणि घेतलेली वस्तू ज्याची त्याला परत देणे म्हणजे न्याय होय. म्हणजेच एकंदरीत न्यायाचा परंपरागत सिद्धान्त असा होता की, न्याय की एक कला असून ती मित्रांना सुख देण्यात व शत्रूंना दुःख देण्यात सामावलेली असते.

प्लेटोने न्यायाच्या परंपरागत सिद्धान्ताचे खंडण केले आहे. त्याच्यामते, एखादा मनुष्य वेडा झाल्यावर त्याचे शस्त्र त्याला करणे हा काही न्याय ठरू शकणार नाही. त्याचबरोबर या परंपरागत न्यायसिद्धान्ताप्रमाणे न्याय समान तत्वावर मिळणार नाही. हा सिद्धान्त मित्र व शत्रू यांना वेगवेगळा न्याय देतो. कारण मित्र कोण व शत्रू कोण याची पारख करणे कठीण असते. एखादी व्यक्ती वाईट म्हणून त्या व्यक्तीशी वाईटच व्यवहार केला तर ती व्यक्ती पहिल्यापेक्षाही अधिक वाईट होईल. पण हा न्यायाचा उद्‌देश राहू शकत नाही. परंपरावादी सिद्धान्तानुसार न्याय हा देश, काळ, परिस्थितीनुरूप बदलतो परंतु न्याय हा सर्व ठिकाणी, सर्व परिस्थितीत, सर्व काळात सारखाच असतो. देश काल परिस्थितीनुसार अपराधाच्या मान्यत्या बदलू शकतात पण न्यायमार्ग सर्व ठिकाणी एकच पाहिजे परंपरागत दृष्टीकोणातील दोष दाखवून प्लेटोने तो सिद्धान्त चुकीचा असल्याचे स्पष्ट केले. परंपरावादी न्यायाची कल्पना एका मर्यादेपर्यन्त आंशिक रूपात उपयुक्त वाटत असली तरी त्या कल्पनेच्या खोलात शिरल्यास अनेक अडचणी आणि परस्पर विरोधी तत्वे समोर उभी राहतात. तसेच न्याय ही एक कला आहे हे तत्व अयोग्य वाटते उदा. एखाद्या वैद्याला शल्यचिकित्सेची कला अवगत असेल, म्हणून तो जर मनात आणील तर एखाद्या रोग्यास जीवदान देवू शकेल किंवा एखाद्या रोग्याला मारून टाकू शकेल. तेव्हा न्याय ही कला आहे असे म्हणणे चूकीचे ठरेल. म्हणून प्लेटोने न्यायाच्या परंपरागत सिद्धान्ताचे खंडण केले आहे.

**२) न्यायाचा क्रांतिकारी सिद्धान्त (The Theory of Thracysmachus) :**

थ्रेसीमाकस् हा क्रांतिकारी सोफिस्टांचे प्रतिनिधित्व करतो. त्याच्यामते, ''शक्तीशाली व्यक्तीची इच्छा म्हणजे न्याय'' न्याय म्हणजे शक्तीशाली व्यक्तीचा लाभ आहे (Justice is the interest of Stronger) शक्तीशाली व्यक्ती लाभासाठी जो कायदा बनविल तोच न्याय असतो. व्यवहारात बळी तो कानपिळी हाच सिद्धान्त सर्वत्र चालत आलेला दिसतो. शक्तीशाली शासकाची आज्ञा म्हणजे न्याय होय. सबल, सशक्त लोकांनी केलेले कायदे दुर्बल, अशक्त लोकांनी पाळावेत आज्ञापालन करणे म्हणजे न्याय होय. आज्ञाभंग किंवा कायदाभंग म्हणजे अन्याय होय. जो आज्ञाभंग करेल तो दंडास पात्र ठरेल. कायदा व न्याय शासकाच्या हितासाठी असतो. 'थ्रेसिमाकस्च्या मते, ''अन्यायी व्यक्ती न्यायशील व्यक्तीपेक्षा अधिक सुखी असते. म्हणून

शासक वर्गाने अन्यायी वृत्तीने वागावे; म्हणजे त्यांचे जीवन सुखी होईल'' अन्यायी व्यक्ती स्वतःच्या हितासाठी कार्य करते तर न्यायी व्यक्ती राज्याच्या हितासाठी कार्य करते. अन्याय करणे हे स्वभावतःच चांगले असते आणि अन्याय सहन करणे वाईट असते. समाजात अन्यायी माणसाला अधिक प्रतिष्ठा व मान असतो. अन्यायीपणाने वागणे हीच सुखाची गुरूकिल्ली आहे. असे त्याचे मत होते.

प्लेटोने या क्रांतिकारी सिद्धान्ताचे खंडण केले आहे. त्याच्यामते, शासकाची प्रत्येक कृती न्यायी असू शकत नाही. ज्यावेळेला शासक त्याच्या सत्तेचा वापर अन्यायी पध्दतीने करतो तेव्हा त्याचे कार्य समाजहितास अपायकारक असते. प्लेटोच्या मते न्याय हा मुळातच दुर्बलांच्या हितासाठी असतो. न्यायाची उभारणी ही तर त्याचसाठी झालेली असते. प्लेटोच्या मते ''शासकवर्ग स्वतःच्या सुखासाठी राज्य करीत नसून तो प्रजेच्या सुखासाठी राज्य करतो, त्यामुळे खरा न्यायी शासनकर्ता हा शक्तीशाली व शहाणा असून तो अन्यायी माणसापेक्षा अधिक सुखी असतो.'' अशा रितीने प्लेटोने क्रांतिकारी सिद्धान्ताचे खंडण केले आहे.''

**३) न्यायाच्या व्यवहारवादी सिद्धान्त** (The Theory of Glaucon) **:**

क्रांतिकारी सिद्धान्ताच्या विरोधी असा हा न्यायसिद्धान्त आहे. या सिद्धान्ताचे प्रतिनिधित्व ग्लाकन करतो. त्याच्यामते, न्याय हे एक कृत्रिम तत्व आहे. निसर्गावस्थेचा आधार घेवून त्याने हा सिद्धान्त मांडला त्याच्या मते, निसर्गावस्थेत बलवान लोक मनमानी करत होते, तर दुर्बल अन्याय अत्याचार सहन करीत होते. या अत्याचाराला विरोध म्हणून त्यांनी आपापसात करार केला. त्यानुसार कायद्याचे स्वरूप निश्चित करण्यात आले. शक्तीशाली व्यक्तींच्या भितीमुळे संघटीत होऊन दुर्बल लोकांनी आपल्या रक्षणासाठी कायद्याची व न्यायाची निर्मिती केली. म्हणून न्याय कृत्रिम आहे. या करारावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे, न्याय हा भितीमुळे निर्माण झाला आहे. भिती हा न्यायाचा आधार आहे. बलवान लोकांच्या अन्यायापासून वाचण्यासाठी दुर्बलांनी काही नियम प्रस्थापित केले, त्या नियमांचे पालन म्हणजे न्याय व त्या नियमांची अवहेलना म्हणजे अन्याय, ग्लाकन थ्रेसिमाकस प्रमाणे न्याय म्हणजे बलवानांची इच्छा मानीत नाही तर दुर्बलांची आवश्यकता मानतो. प्लेटोच्या मते, न्याय ही कृत्रीम व्यवस्था नाही. न्याय हा आत्म्याचा गुण आहे. ती एक आंतरिक स्थिती आहे. कायदे पाळले जातात ते शक्तीच्या आधारावर नव्हेत तर ते त्यांनी स्वतःच्या इच्छेने बनविलेले असतात, म्हणून समाजाच्या इच्छेचे साकार रूप म्हणजे कायदा आहे. व्यवहारवादी सिद्धान्त मनुष्याला स्वार्थी ठरवून कायद्याला कृत्रिम मानतो. प्लेटोने या तिन्ही सिद्धान्ताचे खंडण करून आपला स्वतःचा सिद्धान्त मांडला.

**प्लेटोचा न्याय सिद्धान्त :**

इतरांच्या न्यायसिद्धान्ताचे खंडण केल्यानतंर प्लेटो आपला न्यायविषयक सिद्धान्त स्पष्ट करतो. त्यावेळच्या राजकीय व सामाजिक आजारांवर न्याय हाच एकमेव उपाय आहे, असे प्लेटो म्हणतो. प्लेटोची न्यायाची कल्पना नैतिकतेवर आधारलेली आहे. त्याच्यामते आदर्शराज्यातच न्याय प्रस्थापित होवू शकते. राज्यात न्याय निर्माण होण्यासाठी चारित्र्याची आणि सद्‌गुणांची वाढ होणे आवश्यक असते. आपला न्यायसिद्धांत प्रथम मानवी स्वभावाच्या विश्लेषणाने प्लेटो त्याचा आरंभ करतो. त्याच्यामते प्रत्येक व्यक्ती समाजात राहून आपली

योग्यता व आवड लक्षात घेवून कार्य करील तर समाजाचे अधिकतम कल्याण होईल. प्रत्येक व्यक्तीने कर्तव्यपालन चोख करावे, इतरांच्या कार्यात हस्तक्षेप करू नये. न्याय म्हणजे आंतरिक इच्छेची अभिव्यक्ती आहे.

त्याच्या मते प्रत्येक व्यक्तीत तीन प्रकारच्या भावना असतात.

(१) वासना (Appetite) (२) साहस (Spirit) (३) बुद्धी (Wisdom) या तिन्ही भावनांचा योग्य असा समन्वय एखाद्या व्यक्तीमध्ये होत असेल तर ती व्यक्ती न्यायी असेल. परंतु या तिन्ही भावना व्यक्तीत सारख्या प्रमाणात नसतात. एखाद्या व्यक्तीत बुद्धीची भावना प्रखर असते तर एखाद्या व्यक्तीत वासना तीव्र असते. काही लोकांमध्ये साहसी वृत्ती अधिक आढळते. त्यामुळे समाजात काही व्यक्ती वासनाप्रधान, काही साहसप्रधान तर काही बुद्धीप्रधान असतात. प्लेटोच्या मते वासनाप्रधान लोक उत्पादक कार्य चांगल्या प्रकारे करू शकतात. बुद्धीप्रधान लोक शासनकार्य कुशलतापूर्वक करू शकतात. तर साहसप्रधान लोक आंतरिक व बाह्य रक्षणाचे म्हणजेच सैनिकांचे कार्य अधिक चांगल्या रितीने करतात. वरील विश्लेषणातून हे स्पष्ट होते की आपला न्यायसिद्धांत मांडताना मानवी स्वभावाच्या विश्लेषणाने प्लेटो त्याचा आरंभ करतो. वरील प्रमाणे प्रत्येक व्यक्ती समाजात राहून आपली पात्रता व कल लक्षात घेऊन कार्य करील तर समाज आदर्श अवस्थेत पोहचेल प्रत्येक व्यक्तीने आपले कार्य त्यावर लक्ष केंद्रीत करून पार पाडावे आणि इतरांच्या क्षेत्रात ढवळाढवळ करू नये. न्याय म्हणजे आंतरिक इच्छेचे प्रगट स्वरूप आहे. ज्याला आपण नितिमत्ता म्हणतो तोच न्याय आहे. असे फॉस्टर प्लेटोच्या न्यायाच्या संदर्भात म्हणतो. वरील विचाराचे विवरण पुढील कोष्टकात व्यवस्थितपणे दाखविता येते.

| | **व्यक्तीचा आंतरिक गुण** | **समाजगटातील वर्ग** | **समाजगटातील कार्य** |
|---|---|---|---|
| १. | बुद्धी (विवेक) | शासक (राजकर्ते) | राज्यकारभार चालविणे, शासन प्रशासनाची कार्ये सांगा. |
| २. | साहस (शौर्य) | सैनिक | राज्यात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करणे, परक्रापासून राज्याचे रक्षण करणे. |
| ३. | वासना | उत्पादकांचा वर्ग | उत्पादन, श्रम, शेती, व्यापार करणे, राज्याच्या विकासात भर घालणे. |

**१) तत्वज्ञ राज्यकर्त्यांचा वर्ग –** समाजातील बुद्धीवादी, ज्ञानी लोकांचा हा सर्वश्रेष्ठ वर्ग होय. या वर्गाचा ज्ञान, विवेक, शहाणपण हा विशेष गुण असतो. या वर्गाने आपल्या ज्ञानाच्या, आधारे राज्यकारभार, प्रशासन चालवायचे असते.

**२) सैनिकाचा वर्ग –** साहस, शौर्य, धैर्य अशा गुणांनी युक्त असणारा हा वर्ग होय. राज्याच्या संरक्षणासाठी सैनिकांची आवश्यकता असते. त्याचबरोबर अंतर्गत शांतता, सुव्यवस्था, राखण्याची जबाबदारी त्यांची असते. सैनिकवर्गाने शौर्याबरोबर सभ्यता, स्वामिनिष्ठा, कर्तव्य तत्परता इ. गुणांची जोपासना केली पाहिजे.

**३) श्रमिकांचा वर्ग –** समाजाच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी वस्तूंचे उत्पादन करणारा हा वर्ग होय. शेतकरी, कामगार, व्यापारी व इतर व्यवसाय करणाऱ्या लोकांचा यामध्ये समावेश होतो. प्लेटोच्या मते हा वर्ग वासनाप्रधान प्रवृत्तीचा असून तो फक्त श्रम करण्याच्या पात्रतेचा असतो.

वरील तीन वर्गाशिवाय त्या काळात ॲथेन्समध्ये जनतेचा आणखी एक वर्ग होता. तो गुलामांचा होता. या वर्गाचा उल्लेख प्लेटोने कुठेही केला नाही. त्या काळात गुलामाला पशुसारखीच वागणूक मिळत होती. जनावराप्रमाणे गुलामांची बाजारात विक्री होत असे. त्यांना एकही नागरी हक्क दिलेला नव्हता. त्यांना नागरिकत्वाचा दर्जा नव्हता. त्याकाळी गुलामगिरीची प्रथा होती. त्यामुळेच कदाचित प्लेटोने या वर्गाकडे दुर्लक्ष केलेले असावे.

**प्लेटोच्या न्यायसिद्धांताची वैशिष्ट्ये :**

**१) हस्तक्षेपाचा अभाव –** प्लेटोची न्यायव्यवस्था प्रत्येकाने स्वतःचे कार्य स्वतःवर लक्ष केंद्रीत करून पार पाडावी आणि इतरांच्या क्षेत्रात हस्तक्षेप करू नये अशी होती. प्लेटो म्हणतो एका व्यक्तीने एकच कार्य पार पाडावे परस्परांच्या क्षेत्रात हस्तक्षेप होऊ लागला तर संघर्ष आणि सर्वनाश अटळ आहे.

**२) कार्यविशेषज्ञता –** प्लेटोच्या न्यायसिद्धांताची उभारणी ही कार्य विशेषज्ञतेच्या तत्वावर झाली आहे आणि त्याचे आदर्श राज्य ही कार्यविशेषज्ञतेच्या आधारावर अवलंबून आहे. एका माणसाने एकच कार्य करावे व त्यावर आपले लक्ष केंद्रीत करावे ही कल्पना त्यामागे आहे.

**३) व्यक्तीवादाच्या विरोधी –** प्लेटोचा न्यायसिद्धांत व्यक्तीवादाच्या विरोधी जाणारा आहे. प्लेटोच्या मते व्यक्तीने आपण स्वतः कोणीतरी वेगळे आहोत असे न मानता आपण राज्याचे अंग आहोत असे मानले पाहिजे. व्यक्तीने आपल्या हक्कांचा विचार न करता कर्तव्याचा विचार केला पाहीजे असे प्लेटोचा न्याय सिद्धांत सांगतो.

**४) सुसंवाद –** प्लेटोची न्यायाची कल्पना सामाजिक सुसंवादावर आधारलेली आहे. न्यायाच्या आधारे राज्यात एकतेची स्थापना केली जाईल व राज्याच्या विविध अंगात समतोल स्थापन केला जाईल असा समतोल वासना, साहस, बुद्धी या गुणात सुसंवाद स्थापन करून निर्माण केला जाईल.

**५) न्यायाचे आंतरिक स्वरूप –** प्लेटो न्यायाला बाह्य बाब मानत नाही, त्याच्या मते न्याय आत्म्याचा गुण आहे आणि माणसाच्या अंतर्मनाचा तो एक भाग आहे. संपूर्ण समाजाला त्यापासून निश्चित असा फायदा होतो.

**६) राज्य म्हणजे व्यक्तीचे विस्तारीत रूप –** व्यक्ती आणि राज्य यांच्यात संपूर्ण असे साम्य आहे त्याच्या मते राज्य म्हणजे व्यक्तीचे विस्तारीत स्वरूप आहे व्यक्ती व राज्य यांच्यातील एकरूपता हे प्लेटोच्या न्याय व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे.

**न्यायसिद्धांताचे परीक्षण :**

प्लेटोच्या न्याय सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

**१) प्लेटोची विचारसरणी कायद्यापासून अलिप्त :**

प्लेटोची न्यायाची कल्पना ही नैतिक भावनेतून निर्माण झाली असून मानवी आत्मा, मानवी भावना आणि प्रवृत्ती या आधारावर प्लेटोने न्यायाची कल्पना स्पष्ट केली आहे. त्यामुळे या विचारसरणीचे कायद्यापासून फारकत घेतली आहे. म्हणूनच प्लेटोच्या न्यायविषयक विचारांना 'सिद्धांत' म्हणता येणार नाही.

**२) आधुनिक युगात अशक्य :**

आधुनिक काळात प्लेटोचा न्यायसिद्धांत लागू होवू शकत नाही. कारण आज नगरराज्ये आस्तित्वात नाहीत. आजचा राज्याच्या आकार व लोकसंख्या प्रचंड मोठी आहे. एवढ्या मोठ्या राज्याचे तीन भागात विभाजन करणे शक्य नाही, त्यामुळे त्यांची कामे ही निश्चित करणे शक्य नाही त्यामुळे हा सिद्धांत आजच्या युगात शक्य नाही.

**३) व्यक्तीविकास व व्यक्तिस्वातंत्र्यास मारक :**

प्लेटोने सामाजिक न्यायावर अधिक भर दिला आहे. तो व्यक्तीच्या अधिकारापेक्षा केवळ व्यक्तीच्या कर्तव्यावर भर देतो. वास्तविक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अधिकाराची, स्वातंत्र्यांची आवश्यकता असते. त्यामुळे हा सिद्धांत व्यक्तीविकास व व्यक्तीस्वातंत्र्यांच्या दृष्टीने मारक ठरतो.

**४) सर्वंकष सत्तावादी राज्याची निर्मिती :**

राज्यकर्त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणालाही हस्तक्षेप करता येत नसल्याने राज्यकर्त्यांची हुकूमशाही निर्माण होवू शकते प्लेटोच्या न्यायपद्धतीने व्यक्तीचे राज्यात दुय्यम स्थान निर्माण झाले आहे. मुठभर राज्यकर्त्यांच्या मर्जीनुसारच असंख्य लोकांना राज्यात रहावे लागणार आहे.

**५) हस्तक्षेपाची आवश्यकता :**

प्लेटोने त्याच्या न्यायसिद्धांतामध्ये एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीच्या कार्यात हस्तक्षेप करू नये असे म्हटले आहे परंतु अनेकवेळा असा हस्तक्षेप आवश्यक असतो. समाजातील वर्गात संघर्ष होत असेल तर शांतता प्रस्थापित करण्यासाठी राज्यकर्त्यांचा हस्तक्षेप आवश्यक असतो. त्याचबरोबर सैनिक वर्गानेच जर स्वतःच्या मर्जीने इतरांवर आक्रमण सुरू केले तर राज्यकर्त्यांना स्वस्थ कसे बसता येईल?

**६) साम्यवादाची अयोग्य कल्पना :**

प्लेटोच्या न्यायव्यवस्थेत राज्यकर्त्यासाठी साम्यवादाची योजना आखण्यात आली आहे. शासक व

सैनिक यांच्यासाठी त्याने संपत्तीचा व स्त्रियांचा साम्यवाद सांगितला आहे. साम्यवादामुळे त्यांना संपत्ती व स्त्रीचा मोह राहणार नाही व ते आपल्या कार्याकडे लक्ष केंद्रीत करतील असे प्लेटोला वाटते. वासनांपूर्तीसाठी त्यांनी स्त्रीयांशी अल्पकाळ सहवास करावा असे तो म्हणतो म्हणजेच त्यांने केवळ माणसाच्या वासना या भावनेकडे लक्ष दिले परंतु आंतरिक भावनेकडे दिले नाही.

**७) समतेच्या तत्वाविरोधी :**

प्लेटोच्या न्यायसिद्धांताने समाजाचे तीन वर्ग पाडले असून बुद्धीवादी वर्गास फार महत्व दिले आहे. तर उत्पादक वर्ग हा राज्याचा पाठीचा कणा असून त्याला कनिष्ठ स्थान दिले आहे. प्लेटोच्या या सिद्धांतामुळे एक विशेषाधिकार असलेला वर्ग निर्माण होतो, त्यामुळे सामाजिक विषमता वाढते व समतेचे वातावरण नष्ट होते.

**८) एकाच वेळी माणसात अनेक प्रवृत्ती असू शकतात :**

प्लेटोच्या मते माणसात वासना, साहस, बुद्धी या पैकी एक प्रवृत्ती प्रधान असते पण म्हणून माणसात कायम एकच प्रवृत्ती प्रधान असते असे म्हणता येणार नाही. कारण निरनिराळ्या परिस्थितीत मनुष्यातील निरनिराळ्या प्रवृत्ती प्रबल असू शकतात.

## १.२.४ प्लेटोची शिक्षणपद्धती (Plato's Theory of Education) :

प्राचिन ग्रीक नगरराज्यामध्ये शिक्षणाला फार महत्व होते. प्लेटोने सुद्धा आपल्या विचारामध्ये शिक्षणावर फार मोठा भर दिला आहे. प्लेटोच्या मते शिक्षण ही एक कला आहे. प्राचीन ग्रीक समाजात कलेची संकल्पना अशी होती की अपूर्ण अवस्थेमधील साहित्य हाताशी घेवून आपल्या कौशल्याच्या व अनुभवाच्या आधारावर त्याला पूर्णावस्था प्राप्त करून देण्याचा तो एक मार्ग आहे. उदा. खाणीतून काढलेला दगड ओबडधोबड असतो तो अपूर्णावस्थेत असतो. त्यावर छिन्नी-हातोड्याचे हळूवार आघात करून त्यातून आपल्या कल्पनेतील मूर्ती साकार केली जाते. म्हणून मूर्तीकाराची हातोटी अगर प्रक्रिया ही एक कला आहे, त्याचप्रमाणे अज्ञानी अवस्थेतील अपरिपक्व मनांची जबाबदारी घेवून त्यांना संस्कारुक्त करून सुसंस्कृत व प्रगल्भ बनविणे हे शिक्षणकलेचे कार्य आहे. राज्यातील मुलांना उत्तम नागरिक बनविणे हे तत्वज्ञ पालकांचे कर्तव्य आहे. नवजात अर्भकातून शासक व सैनिक वर्गाचे गुण बनविणे हे तत्वज्ञ पालकांचे कर्तव्य आहे. प्लेटोची भाषा काव्यात्मक व रूपकांनी नटलेली आहे. तो म्हणतो तांबे, रूपे, सोने हे भूगर्भात दडलेले असते. त्यापैकी कोठे काय उपलब्ध होईल हे जाणण्याची दृष्टी असणाऱ्याला त्याचा लाभ होईल. तसेच उत्पादक, सैनिक व शासक या वर्गासाठी कोणकोणती नवजात अर्भके अनुरूप आहेत हे ठरविण्याचे काम तत्वज्ञ पालकांच्या सूक्ष्म दृष्टीलाच करता येईल. परंतु प्रत्यक्षात शिक्षणाची योजना आखताना मात्र प्लेटोने आपली दृष्टी फक्त सैनिक व शासक वर्गापुरतीच मर्यादित ठेवली आहे.

प्लेटोने आपल्या रिपब्लीक या ग्रंथामध्ये शिक्षणावर इतका जोर दिला आहे की रूसोने तर या ग्रंथाला शिक्षणावरील सर्वोत्कृष्ठ ग्रंथ म्हटले आहे. प्लेटोच्या मते आदर्श राज्य तेव्हाच निर्माण करता येईल की जेव्हा शिक्षणाद्वारे व्यक्तीमध्ये सुधारणा करून त्यांना राज्याच्या कार्यास योग्य बनविले जाईल. मानवाला आदर्श

राज्याची दिशा दाखविणारे शिक्षण हेच योग्य साधन आहे शिक्षणामुळेच मनुष्य आपल्यासमोरील समस्या समजू शकतो. आणि संकटाशी सामना करू शकतो. शिक्षणामुळे माणसाच्या मूळ प्रवृत्तीत फरक पडू शकतो. त्याच्यातील स्वार्थाची भावना दूर करून त्याला परोपकारी बनविता येते.

न्यायतत्व क्रियाशिल करण्यासाठी त्याने शिक्षणाला आधार बनविले प्लेटोच्या शिक्षणावर विचार करताना बार्करने असे म्हटले आहे की, ''शिक्षण म्हणजे अशी सामाजिक प्रक्रिया आहे की जी समाजाचा एक घटक या नात्याने व्यक्तीमध्ये चेतना निर्माण करते व समाजाच्या प्रती आपले कर्तव्य निभावण्यास शिकवीते. शिक्षणामुळे व्यक्तीला समाजात उचित स्थान मिळते. अज्ञानरूपी अंधकार नष्ट करून ज्ञानाची ज्योत लावण्याचे कार्य शिक्षण करते.''

**प्लेटोच्या शिक्षणाचा उद्‌देश :**

१) निरनिराळ्या वर्गात कर्तव्याची भावना निर्माण करणे.

२) व्यक्तीव्यक्तीमध्ये समाजहिताची भावना निर्माण करणे.

३) सत्य शोधून काढणे.

शिक्षण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. समाजाचा एक मौल्यवान घटक या नात्याने ते व्यक्तीस प्रेरणा देते व समाजाशी आपले कोणते कर्तव्य आहे याची व्यक्तीला जाणीव देते.

**प्लेटोच्या शिक्षणाची वैशिष्ट्ये :**

**१) राज्य नियंत्रित शिक्षण :**

शिक्षणाने व्यक्तीचे चारित्र्य घडविले जाते व कर्तव्यासंबंधी निस्वार्थी भावना शिकविली जाते. शिक्षण हे इतके महत्वाचे आहे की ते खाजगी क्षेत्राकडे सोपविणे प्लेटोला अतिशय धोकादायक वाटते. राज्याच्या हितासाठी व सुसंवादासाठी नागरिकांना शिक्षण मिळणे व तेही राज्याकडून मिळणे त्याला आवश्यक वाटते.

**२) मानसिक व शारीरिक विकास साधण्याचा प्रयत्न :**

प्लेटोने त्याच्या शिक्षणपद्धतीच्या माध्यमातून व्यक्तीचा मानसिक व शारीरिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठीच त्याने आपल्या शिक्षण योजनेत संगित व व्यायाम यांना अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. प्लेटोच्या शिक्षण योजनेत मन व शरीर यांना समान महत्व आहे उत्तम शरीरात उत्तम मन वास करते यावर प्लेटोचा दृढ विश्वास होता.

**३) स्त्री-पुरूषांसाठी समान शिक्षण :**

त्याची शिक्षणपद्धती फक्त पुरूषांकरिता मर्यादित नसून ती स्त्रियांसाठी देखील आहे. जुन्या अ‍ॅथेन्समध्ये फक्त पुरूषांनाच शिक्षण घेण्याचा अधिकार असे. स्त्रियांना शिक्षणापासून वंचीत ठेवले जात असे. प्लेटोने स्त्री व पुरूष यांच्यासाठी समान शिक्षणाचा पुरस्कार प्लेटोने केला आहे. या संदर्भातील प्लेटोचे शिक्षण विषयक विचार क्रांतिकारी वाटतात.

**४) प्लटोची शिक्षण पद्धती केवळ शासक व सैनिक यांच्यासाठी :**

त्याची शिक्षण पद्धती ही केवळ वरिष्ठ वर्गासाठी असून त्याने उत्पादक वर्गाचा विचार केला नाही. प्लेटोने जरी अनिवार्य शब्द वापरला असला तरी त्याचा अर्थ सर्व व्यक्ती असा होत नाही, ज्या व्यक्ती शिक्षण घेण्यास लायक आहेत त्या व्यक्ती असाच त्याचा अर्थ होतो.

**५) ॲथेन्स व स्पार्टा येथील शिक्षण पद्धतीचा संगम :**

दोन्ही नगरराज्यातील शिक्षणपद्धतीमधील दोष दूर करून स्वीकारल्या आहेत. ॲथेन्सच्या बौद्धिक शिक्षणाला त्याने स्पार्टाच्या शारीरिक शिक्षणाची जोड दिली. ॲथेन्सच्या शिक्षणाच्या वैयक्तीक रूपाला त्याने स्पार्टाच्या सामाजिक रूपाची जोड देवून सुरेख संगम साधला आहे.

**प्लेटोची शिक्षणाची योजना :**

प्लेटोने आपल्या शिक्षण योजनेचे दोन टप्पे केले होते.

१) प्राथमिक शिक्षण (Primary Education)

२) उच्च शिक्षण (Higher Education)

शिक्षण योजनेच्या पहिल्या भागात रिपब्लीक पुस्तकाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागात पालकवर्ग, राज्यकर्ते व सैनिक यांच्या शिक्षणाचा आराखडा दिला असून त्यामध्ये शरीर संवर्धन व बल यांचा समावेश आहे. दुसऱ्या भागात उच्च शिक्षणाची योजना असून ती तत्वज्ञ राज्यकर्तेतयार करण्यासाठी आहे. बालशिक्षणाच्या संदर्भात सविस्तर चर्चा प्लेटोने त्याच्या 'दि लॉज' या ग्रंथात केली आहे.

वरील वर्गीकरणाचा आधार व्यक्तीचे वय हा आहे. त्याचबरोबर व्यक्तीचा वर्ग हा देखील एक आधार आहे. प्राथमिक शिक्षण किशोरावस्थेपर्यंत दोन्ही वर्गाना दिले जाते. परंतु उच्चशिक्षण प्रौढावस्थेमधील शासक वर्गासाठी आहे प्राथमिक शिक्षणाचा उद्देश भावनेचे परिमार्जन करून चारित्र्य निर्मिती करणे हा आहे.

**अ) प्राथमिक शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणाचे विभाजन प्लेटो तीन भागात करतो.

**१) वयाच्या ६ व्या वर्षापर्यंतचे शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणासाठी पहिल्या टप्यात म्हणजे वयाच्या ६ व्या वर्षापर्यंत बालकांना नीतीचे व धर्माचे पाठ शिकविले जातात. या काळात मुलांना गोष्टी, गाणी यातून शिक्षण द्यावे. धार्मिक गोष्टीतून त्यांच्यावर योग्य ते संस्कार करावेत. या वयात मुलांचे फाजील लाड करू नयेत व त्यांच्याशी फार कठोरतेने वागू नये असे तो म्हणतो.

**२) वयाच्या ६ ते १८ वर्षापर्यतचे शिक्षण :**

या टप्प्यातील मुलांना बैद्धिक आणि शारीरिक अशा दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जाते. याच

वयोगटात संगितावरही विशेष भर दिला जातो. शारीरिक शिक्षणात घोड्यावर बसणे गोफण फिरविणे, बाणांनी अचूक नेम धरणे इत्यांदी प्रकारचा शिक्षणाचा समावेश असावा. संगीतामुळे मानवी मनाचा विकास होतो. कवायत, नृत्य, संघगीते याद्वारे मुलांना शिक्षण द्यावे असे त्याचे मत होते.

**३) वयाच्या १८ ते २० वर्षापर्यंतचे शिक्षण :**

तिसऱ्या वयोगटात सैनिकी शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिस्त, संयम, आज्ञापालन या सर्व गुणांसाठी सैनिकी शिक्षण आवश्यक मानले जाते. याच काळात अंकगणित, भूमिती, ज्योतिषशास्त्र या विषयांचे शिक्षण द्यावे. व्यायाम हा शरीरासाठी प्रशिक्षण असतो तर संगीत हे मनाच्या विकासासाठी आवश्यक असते. दोन्हीमधून चारित्रसंवर्धन होते असे प्लेटोचे मत होते.

**ब) उच्च शिक्षण :**

प्लेटोने रिपब्लीक ग्रंथात उच्चशिक्षणाचा विचार केला आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक चाचणी परीक्षा घेवून निवडक व हूशार विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी पात्र ठरविले जाते. उच्च शिक्षणाची कालमर्यांदा २० ते ३५ वर्ष असते. प्लेटोने उच्च शिक्षणाचे दोन टप्पे सांगितले आहेत.

**१) २० ते ३० वर्षापर्यंत :**

या वयोगटातील विद्यार्थ्यांना उच्च प्रकारचे शारीरिक व बौद्धिक शिक्षण दिले जाते. हे शिक्षण मूलगामी व तार्किक स्वरूपाचे असावे. विसाव्या वर्षापासून तिसाव्या वर्षापर्यंत गणित, विज्ञान ही शास्त्रे शिकविण्यात येतात. गाणित, विज्ञान, ज्योतिष, भूमिती, खगोल, तत्वज्ञान इत्यादी विषयांचा सखोल अभ्यास शिकविला जावा. तसेच त्यांना सैनिकी स्वरूपाचे शिक्षण दिले जावे. वयाच्या तिसाव्या वर्षी एक परीक्षा घेवून जे विद्यार्थी उत्तीर्ण होतील त्यांना पुढील शिक्षणासाठी निवडले जावे आणि जे या परीक्षेत नापास होतील त्यांना सैन्य व प्रशासन या क्षेत्रात अधिकाऱ्यांचा जागा दिल्या जाव्यात.

**२) ३० वर्षानंतरचा टप्पा :**

वयाच्या तिसाव्या वर्षानंतर अत्यंत निवडक अशा नागरिकांना उच्चशिक्षण देण्याचा क्रम सुरू होतो. हा कालखंड पाच वर्षासाठी असतो. या कालावधीत चिंतन मनन करण्यास शिकविले जाते. सत्य शोधून काढण्यासाठी त्यांची क्षमता वाढविली जाते. तत्वज्ञ राज्यकर्तेनिर्माण करण्यासाठी या टप्प्यात विद्यार्थ्यांला सर्वोच्च ज्ञान प्राप्त करून घ्यावे लागते. तर्कशुद्ध आचार-विचार आणि सद्गुण या दृष्टीने व्यक्ती परिपूर्ण असली पाहिजे राजकारणी पुरूष व राजे यांना राजकारणात तत्वज्ञानाची गरज असते म्हणून त्यांना तत्वज्ञानाचे ज्ञान करून दिले पाहिजे असे प्लेटोचे मत होते. अशा प्रकारे ३५ व्या वर्षी शिक्षण पूर्ण झाल्यावर, विद्यार्थ्यांनी सार्वजनिक जीवनात भाग घ्यावा व नगरराज्याची नोकरी करावी अशी त्यांच्यावर सक्ती असावी.

३५ ते ५० वर्षापर्यंत त्यांच्या व्यावहारिक शिक्षणावर अधिक जोर देण्यात येतो. प्लेटोच्या मते ५० व्या वर्षापर्यंतच्या परीक्षांच्या कसोटीला उतरणारे तत्वज्ञानीच खरे शासनाचे अधिकारी आहेत. अशा उच्चशिक्षण

घेतलेल्या राज्यकर्त्यांनी जरूर पडेल त्यावेळी राज्यकारभार अंगावर घेण्यास तयार असावे. इतर वेळी 'श्रेयस' (गूढ) विचारात गढून राहावे.

**प्लेटोच्या शिक्षण योजनेचे मूल्यमापन :**

**गुण :**

**१) ॲथेन्स व स्पार्टातील शिक्षण पद्धतीचा सुरेख संगम :**

प्लेटोने त्याच्या शिक्षणविषयक विचारात ॲथेन्समधील व्यक्तीगत आणि खाजगी शिक्षण पद्धती आणि स्पार्टाची सामाजिक हिताची शिक्षण पद्धती यांचा मेळ घालून समाजाला पूरक व पोषक अशी शिक्षणपद्धती देण्याचे कार्य केले आहे.

**२) ज्ञान म्हणजे सद्‌गुण :**

ज्ञान म्हणजे सद्‌गुण हे तत्व प्लेटोने स्वीकारून ज्ञान प्राप्तीसाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे असे सांगण्याचे कार्य प्लेटोने केले. माणसाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी त्याचबरोबर आदर्श राज्यासाठी शिक्षण हे सर्वोत्कृष्ट साधन आहे असे प्लेटोने सांगितले.

**३) योग्य वयात योग्य शिक्षण :**

कोणत्या वयात कोणत्या प्रकारचे शिक्षण दिल्यानंतर बौद्धिक, शारीरिक, व मानसिक विकास होवू शकतो हे प्लेटोने सांगितले. तो फक्त शिक्षण विषयक माहिती देऊनच थांबला नाही तर त्याने प्रत्यक्षात ॲथेन्स येथे 'ॲकडमी' सुरूही केली होती.

**४) पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण :**

प्लेटोने त्याच्या शिक्षण पद्धतीत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली आहे. इसवीसनापूर्वीच्या कालखंडात पुरूषांबरोबर स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार देणारा विचारवंत म्हणून प्लेटोने क्रांतिकारी पाऊल टाकले आहे.

**५) शिक्षणाचा सर्वांगिण दृष्टीकोणातून विचार :**

प्लेटोने शिक्षणविषयक योजना मांडताना सर्वांगिण विचार केला आहे. नैतिक, धार्मिक, भौतिक, शारीरिक, सांस्कृतिक, मानसिक अशा विविध दृष्टीकोणातून व्यक्तीचा सर्वांगिण विकास कसा होईल इकडे प्लेटोने अधिक लक्ष दिले आहे.

**दोष / टीका :**

**१) फक्त राज्यकर्त्या वर्गासाठीच :**

प्लेटोची शिक्षणपद्धती ही फक्त वरच्या वर्गासाठीच तयार केली आहे. त्याच्या शिक्षणयोजनेत कनिष्ठ वर्गाला अजिबात थारा नाही. त्याच्या या शिक्षण योजनेत श्रमिक व कष्टकरी यांचा कुठेही विचार केला नाही.

इतकेच नव्हे तर प्राथमिक शिक्षणाची किमान योजना त्यांच्यासाठी कशी असेल याचाही तो विचार करत नाही एका वर्गाला उपेक्षीत ठेवून आदर्श राज्य कसे काय निर्माण होऊ शकेल,

**२) अव्यवहार्य योजना :**

प्लेटोची शिक्षणपद्धती केवळ पुस्तकी स्वरूपाची आहे. ती व्यवहारात उतरविणे फार अवघड आहे. अशा योजनेतून व्यवहारी व चतूर राजकारणी निर्माण होतीलच असे नाही. वास्तविक पाहता चांगले व आदर्श राज्यकर्तेनिर्माण करणे हे तर प्लेटोच्या शिक्षण पद्धतीचे ध्येय आहे.

**३) राज्याच्या एकतेसाठी व्यक्तीमधील विविधतेचा बळी :**

प्लेटोने सर्वासाठी एकसारख्या शिक्षणाची व्यवस्था करून राज्याच्या एकतेसाठी व्यक्तीतील विविधतेचा बळी दिला आहे. प्लेटोच्या शिक्षणयोजनेत विविधतेकडे लक्ष दिले असले तरी रूचीच्या विविधतेकडे या योजनेत लक्ष दिले गेले नाही.

**४) स्त्री पुरूषांसाठी समान शिक्षण :**

प्लेटोने स्त्री आणि पुरूषांसाठी एकाच प्रकारच्या शिक्षणपद्धतीची व्यवस्था सांगितली आहे. स्त्री आणि पुरूष बौद्धिक दृष्टीकोणातून सारखे असले तरी भावनात्मक आणि शारीरिक दृष्टीकोणातून स्त्री आणि पुरूष यात भेद असतो या गोष्टीकडे प्लेटोने लक्ष दिले नाही.

**५) नैतिकतेच्या नावाखाली कला, साहित्य, संगीत राज्याच्या नियंत्रणाखाली :**

नैतिकतेच्या नावाखाली प्लेटोने कला, साहित्य व संगीत राज्याच्या नियंत्रणाखाली ठेवले. वास्तविक नियंत्रीत असलेली कला, साहित्य, संगीत मनाला आनंद देवू शकत नाही. केवळ नैतिक उद्‌देश हाच कलेचा उद्‌देश राहतो तेव्हा ती कला इतरांच्या ह्रदयाच्या तारा छेडू शकत नाही. लोकांच्या अंतर्मनाला ती स्पर्श करू शकत नाही. त्यांच्या विचारात ती परिवर्तन करू शकत नाही कलेचा आंनद उपभोगायला कला अनियंत्रीत असावी लागते ही गोष्ट प्लेटोने विचारात घेतली नाही.

**६) प्रदीर्घ व कंटाळवाणी योजना :**

प्लेटोच्या शिक्षणाची योजना अत्यंत प्रदीर्घ स्वरूपाची किचकट व कंटाळवाण्या स्वरूपाची आहे. जगाच्या कोणत्याही भागात, कोणत्याही काळात अशी पद्धत अस्तित्वात आली नसेल वयाच्या ३५ व्या वर्षापर्यंत शिक्षण घेणारी व्यक्ती आयुष्यात कोणतेही कार्य धडाडीने करू शकेल असे वाटत नाही कोणत्याही शिक्षणतज्ञाने किंवा मानसशास्त्रज्ञाने या पद्धतीला पाठींबा दिला नाही. ही शिक्षणपद्धती प्लेटोच्या स्वप्नाळू आदर्शवादाचे एक प्रतीक आहे असे म्हणता येईल.

**७) ज्ञानी माणसे सद्‌गुणी असतातच असे नाही :**

'ज्ञानी माणसे सद्‌गुणी असतात' हे प्लेटोचे तत्व चूकीचे वाटते. कारण प्रत्यक्ष व्यवहारात न शिकलेली अज्ञानी, अडाणी माणसेही सद्‌गुणी असलेली दिसतात. म्हणून केवळ ज्ञानाने माणूस नितीवान व सद्‌गुणी होईल असे म्हणता येणार नाही.

**८) विविधता नष्ट होते :**

प्लेटोने सर्वांसाठी एकसुरी व समान शिक्षणपद्धती स्पष्ट केली आहे. त्यामुळे राज्याचे ऐक्य साधण्यासाठी त्याने विविधता मात्र नष्ट करून टाकली आहे. शिक्षणयोजनेत विविधता असणे गरजेचे आहे. प्लेटोने न्यायाच्या आधारावर राज्य निर्माण करण्याचे ठरविले हे त्याच्या शिक्षणपद्धतीचे ध्येय आहे परंतु राज्याच्या विकासाकडे लक्ष देताना तो व्यक्तीला मात्र फार दुय्यम स्थान देतो.

**९) गणितावर अतिरिक्त भर :**

प्लेटोने सांगितलेल्या अभ्यासक्रमात गणित व तर्कशास्त्र या विषयावर वाजवीपेक्षा जास्त भर दिलेला आहे. साहित्य, प्रशासन, कला इत्यादी अभ्यासविषयांकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

अशा पद्धतीने प्लेटोच्या शिक्षणविषयक विचारावर टीका होत असली तरी त्याने मांडलेल्या शिक्षण-विचारांचे महत्व कमी होत नाही, कारण प्लेटोचा त्यामागील उदात्त हेतू लक्षात घेता त्याचे महत्व नाकारता येणार नाही.

### १.२.५ प्लेटोचा साम्यवादाचा सिद्धांत (Plato's Theory of Communism) :

आदर्श राज्याची स्थापना करणे हे प्लेटोचे ध्येय होते. व्यक्तीला राज्याच्या अनुरूप बनविण्यासाठी त्याने शिक्षणाची आखणी केली होती. परंतु माणसाचा स्वभाव ध्यानात घेता फक्त शिक्षणाने आदर्श राज्य निर्माण होईल असे वाटत नव्हते, म्हणून प्लेटोने त्याच्या रिपब्लीक या ग्रंथात 'साम्यवादाविषयीचे' विचार मांडले आहेत. आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी अधिक तात्वीक स्वरूपात साम्यवादाची कल्पना स्पष्ट केलेली दिसते. त्यासाठी राज्यकर्त्यांच्या मनोवृत्तीतच बदल होणे आवश्यक आहे. राज्यकर्त्यांना भ्रष्ट करणाऱ्या मूळ कारणांचा त्यासाठी शोध घेणे आवश्यक होते. प्लेटोने साम्यवादाची योजना फक्त राज्यकर्त्या वर्गासाठी मांडली. राज्यकर्त्या वर्गाला भ्रष्ट करणाऱ्या दोन गोष्टी आहेत (१) स्त्री (२) संपत्ती म्हणून स्त्रियांचा व संपत्तीचा साम्यवाद ही धाडसी व क्रांतिकारी योजना प्लेटोने मांडली. संपत्ती व स्त्रियांच्या मोहानेच राज्यकर्तेभ्रष्ट होतात असे प्लेटोला वाटत होते. आपल्या कर्तव्यापासून विचलीत न होता निस्वार्थी भावनेने राजकारभार करायचा असेल तर खाजगी संपत्ती व कुटूंब यापासून राज्यकर्त्यांना अलग ठेवण्याची कल्पना प्लेटोने मांडली आहे. यातूनच प्लेटोचा साम्यवाद अस्तित्वात आला आहे. प्लेटोच्या या साम्यवादात राज्यकर्तावर्ग व संरक्षक वर्ग यांचे स्वतःचे कुटूंब असणार नाही किंवा त्यांची स्वतःची संपत्ती असणार नाही. त्यामुळे वैयक्तीक मोहाची कोणतीही शक्यता नसल्याने आपले कार्य ते अधिक लक्ष केंद्रित करून पार पाडू शकतील. राज्यकारभारावर संपत्तीचा अत्यंत विपरीत परिणाम होतो असे प्लेटोला वाटते त्यासाठी त्याने संपत्ती व स्त्रियांचा साम्यवाद स्पष्ट केला. येथे एवढे मात्र ध्यानात घेणे जरून आहे की स्त्रिया व संपत्तीचा साम्यवाद सैनिक व शासनकर्त्यासाठीच सांगितला आहे. उत्पादक वर्गासाठी हा साम्यवाद नाही.

प्लेटोच्या साम्यवादी सिद्धांताचे स्वरूप समजावून घेण्यापूर्वी, त्याचा साम्यवाद मांडण्या पाठीमागे हेतू

काय होता, हे पाहणे अधिक उपयुक्त ठरते. प्लेटोने साम्यवादी विचारसरणी मांडताना पुढील उद्‌देश गृहीत धरले होते.

★ आदर्श राज्यासाठी आदर्श राज्यकर्त्यांची जरूरी असते. त्याच्यासाठी शासनकर्ते, सैनिक हे शुध्द चारित्र्याचे निःस्वार्थी व तत्वज्ञ असले पाहिजेत, यासाठी प्लेटोने साम्यवादाची कल्पना मांडून राज्यकर्त्यांची कर्तव्ये व भूमिका स्पष्ट केलेली दिसते.

★ कांचन व कांता (संपत्ती व स्त्री) माणसाला भ्रष्ट करतात म्हणून राज्यकर्त्यांचे वर्तन शुद्ध राहण्यासाठी प्लेटोने संपत्ती व स्त्रियांचा साम्यवाद मांडला.

★ राजसत्ता व आर्थिकसत्ता एकत्र आल्या की राज्याचा नाश अटळ असतो. म्हणून या दोन्ही सत्ता परस्परापासून दूर ठेवण्यासाठी प्लेटोने संपत्तीचा साम्यवाद मांडला.

★ सुदृढ, निरोगी, आणि हुशार संतती निर्माण करण्याच्या दृष्टीने प्लेटोने साम्यवादी सिद्धांत मांडला. आदर्शराज्यासाठी सुदृढ व निरोगी असे राज्यकर्ते व अधिकारी सैनिक यांची गरज असते. या उद्‌देशाने प्लेटोने त्याच्या साम्यवादी सिद्धांताची मांडणी केलेली दिसते.

- **संपत्तीचा साम्यवाद (Communism of Property) :**

प्लेटो शासक व सैनिक यांना संपत्तीपासून दूर ठेवतो. शासक व सैनिक यांच्यासाठी त्याने 'संरक्षक वर्ग' हा शब्द वापरला आहे. राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता यांना एकमेकापासून दूर ठेवण्यासाठी प्लेटोने संपत्तीचा साम्यवाद मांडला. शासनाची सत्ता आणि पैसा एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रीत झाल्यास शासक निरंकूश होऊन मनमानी करतील असे प्लेटोला वाटत होते म्हणून त्याने आर्थिक सत्तेला शासन सत्तेपासून अलग केले. प्लेटोच्या मते राज्यकर्तेव सैनिक हे श्रीमंत ही असणार नाहीत व गरीब ही असणार नाहीत. जीवन जगण्यासाठी जेवढी संपत्ती आवश्यक आहे तेवढीच संपत्ती त्यांना दिली जावी. त्यांना स्वतःचे घर, जमीन, जूमला अशी खाजगी संपत्ती असणार नाही, त्यांची राहण्याची व जेवण्याची सोय राज्यसंस्थेमार्फत करण्यात येईल. प्लेटोने शासकांची जीवनर्याच दिली आहे शासक संपत्तीपासून दूर राहूनच राज्याची खरी सेवा करू शकतात. ते जेव्हा वैयक्तीक भूमी व संपत्ती धारण करू लागतील तेव्हा ते जनतेचे सेवक न राहता ते शोषणकर्ते ठरतील. आपल्या राष्ट्राच्या सर्वनाशाचा मार्ग ते मोकळा करतील.

प्लेटोला राज्याच्या संरक्षणाचे आणि शासनाचे कार्य अशाच व्यक्तींच्या हाती द्यायचे होते की ज्या साहसी व बुद्धीवादी असतील, प्रत्येकाला संपत्ती धारण करण्याची सवलत दिली गेली तर शासनकार्यात भाग घेण्यासाठी बुद्धी ही योग्यता न राहता संपत्ती हीच योग्यता राहील असे प्लेटोला वाटत होते सबाईन च्या मते ''शासनावर संपत्तीचा पडणारा भयानक प्रभाव पाहून तो दूर करण्यासाठी प्लेटोने संपत्तीचा नाश केला.''

- **स्त्रियांचा साम्यवाद :**

प्लेटोच्या साम्यवादात सैनिकांना व राज्यकर्त्यांना मालमत्ता बाळगण्याचा अधिकार तर नाहीच पण त्याचबरोबर त्यांना कुटूंब बाळगण्याचा अधिकार देखिल नाही. कुटूंबाच्या भरभराटीसाठी मालमत्ता ही वाढवावीच

लागते. म्हणून त्यांना कुटूंबसंस्था करण्याचा अधिकारच दिला गेला नाही तर त्यांनी मालमत्ता जमा करण्याचा प्रश्नच येत नाही. यासाठी प्लेटोने कुटूंबसंस्थाही नष्ट केली आहे. असे म्हटले सबाईन म्हणतो की, 'संपत्तीप्रमाणेच प्लेटोने विवाहसंस्थेचेही उच्चाटन केले आहे' वैवाहिक जिव्हाळ्यामुळे राज्यकर्ते राज्यकारभाराकडे पुरेसे लक्ष देवू शकत नाहीत थोडक्यात राज्यकारभारावर चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रीत करता यावे म्हणून त्याने स्त्रियांचाही साम्यवाद मांडला.

स्त्रियांचा साम्यवाद मांडण्यापाठीमागे प्लेटोचा आणखी एक उद्‌देश होता तो म्हणजे त्या काळी प्रचलित असलेल्या विवाहपद्धती मध्ये अनुरुप आणि चांगल्या व्यक्ती जवळ येत नव्हत्या. रोगट व अयोग्य स्त्री पुरुष एकत्र आल्याने निर्माण झालेली संतती ही सुद्धा दुबळी, शक्तीहीन व सत्वहीन अशी जन्माला येत असे. आदर्श राज्य निर्माण होण्यासाठी चांगला शासक वर्ग व साहसी सैनिक वर्ग आवश्यक असतो. त्यासाठी सुदृढ स्त्रिया व सुदृढ पुरुष यांच्या मिलनातून बलवान निरोगी प्रजा निर्माण होणे जरूरी होते. तरच उत्तम राज्यकर्ता वर्ग व सैनिक वर्ग त्यातून निर्माण होवू शकला असता. प्लेटोने निवडक स्त्री पुरूषांनाच एकत्र येण्याची परवानगी दिली आहे. अशा स्त्री पुरूषांना मुले होईपर्यंत एकत्र राहण्याची परवानगी असेल, मूल झाल्यानंतर स्त्री-पुरुष पुन्हा विभक्त राहतील अशा मुलांच्या संगोपनाची जबाबदारी राज्यसंस्थेवर सोपविली जाईल. प्लेटोच्या मते अशा पद्धतीने निर्माण होणारी मुले उत्तम प्रकृतीची आणि बुद्धीमान असतात. त्यांना योग्य शिक्षण दिले तर त्यातून आदर्श राज्यकर्तेनिर्माण होऊ शकतात.

प्लेटोच्या या वरील विचारावर अशी टीका केली जाते की अशा मूलांचे संगोपन व संवर्धन शासनाने केल्याने त्यांना आपले आई-वडील ओळखू येणार नाहीत. त्यामुळे प्रेमाची व जिव्हाळ्याची भावना लोप पावेल परंतु याला प्लेटोचे उत्तर असे आहे की अशी मुले समाजातील सर्वच स्त्री-पुरूषांना आपल्या आई-वडीलांच्या ठिकाणी मानतील व समाजातील सर्वच स्त्री पुरूष या मुलांना आपलीच मुले समजतील साहजीकच समाजात प्रेमाची ऐक्याची भावना वाढीस लागेल.

- **संपत्तीच्या साम्यवादावर करण्यात येणारी टीका :**

**१) या साम्यवादात उत्पादक वर्गाला स्थान नाही :**

हा साम्यवाद फक्त वरच्या दोन वर्गापुरता मांडलेला असून तो समाजातील सर्व वर्गांची (घटकांची) काळजी घेत नाही म्हणून हा साम्यवाद नकारात्मक स्वरूपाचा आहे. वरच्या दोन वर्गापेक्षा संख्येने अनेक पट जास्त असलेल्या उत्पादक वर्गाकडे त्याने पूर्ण दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे समाजाचे दोन भागात कृत्रीम विभाजन झाले आहे.

**२) माणसाच्या स्वभावाकडे दुर्लक्ष :**

प्रत्येक माणसात संग्रह करण्याची प्रवृत्ती असते. आपली स्वतःची मालमत्ता असावी अशी आंतरिक इच्छा असते. परंतु या वरच्या दोन वर्गासाठी त्याने कोणतीच सवलत दिली नाही. त्यांना मालमत्ता धारण करण्याचा अधिकार नसल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्व विकासात अडथळा निर्माण होतो.

**३) नैसिर्गिक इच्छा नष्ट केली आहे :**

मालमत्ता बाळगणे ही प्रत्येक व्यक्तीची नैसिर्गिक इच्छा असते. मालमत्तेचा अधिकार नष्ट करणे म्हणजे माणसाची नैसर्गिक इच्छा मारण्यासारखे आहे. म्हणूनच प्रगत जगात मालमत्तेचा हक्क कोणत्याही राष्ट्राने हिरावून घेतला नाही. साम्यवादी व्यवस्थेचा स्वीकार केलेल्या राष्ट्रांनी सुद्धा व्यक्तीचा मालमत्तेचा हक्क डावललेला नाही.

**४) गुलामाबद्दल स्पष्टीकरण नाही :**

प्लेटोने उत्पादक वर्गास मालमत्ता बाळगण्याचा अधिकार दिला आहे. परंतु त्या काळी समाजाचा अविभाज्य भाग असणाऱ्या गुलामांना हा अधिकार आहे किंवा नाही याबद्दल प्लेटो काही सांगत नाही. बहूतेक गुलामांशिवाय राज्य आस्तित्वात राहू शकते हेच यातून प्लेटोला सूचवायचे असावे.

**५) समाजाचे आर्थिक चित्र बदलत नाही :**

प्लेटोच्या मालमत्तेच्या साम्यवादामुळे समाजाचे आर्थिक चित्र बदलत नाही. खरे पाहता संपत्तीच्या साम्यवादामुळे समाजात होणारे बदल हे तळापासून व्हायला हवेत परंतु या साम्यवादात तसे होताना दिसत नाही. उत्पादकांवर त्याचा कोणताही परिणाम होताना दिसत नाही.

**६) राज्य साध्य व्यक्ती साधन :**

राज्य हा अंतीम उद्देश मानून प्लेटोने व्यक्तीला साधन बनविले आहे. व्यक्तीने राज्यासाठी यंत्राप्रमाणे कार्य करणे चुकीचे आहे. राज्याप्रमाणे व्यक्तीलाही स्वतःचे व्यक्तीत्व आहे. या गोष्टीकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

- **स्त्रियांच्या साम्यवादावरील टीका :**

**१) व्यक्तीच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा विचार केला नाही :**

प्लेटोचा साम्यवाद हा समाजहिताच्या जाणिवेतून निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याने मनुष्याच्या नैसर्गिक प्रवृत्तींचा विचार केला नाही. मनुष्य हा भावनाशील प्राणी आहे. कुटुंब करून राहणे त्याची सहज प्रवृत्ती आहे. परंतु प्लेटोने स्त्री-पुरूषांना एकमेकापासून अलग ठेवून त्यांच्या भावनांचा कोंडमारा केला आहे.

**२) प्रजोत्पादनाची पद्धती कृत्रीम, अयोग्य, अनैतिक वाटते :**

सुदृढ व बुद्धीमान स्त्री पुरूषांना एकत्र आणुन त्यांचा संयोग घडवून सर्वोत्तम नागरिक निर्माण करणे ही प्लेटोची कल्पना वास्तवात येणे कठीण आहे. अशा पद्धतीने जन्माला येणाऱ्या मुलांना आई-वडीलांचे प्रेम, वात्सल्य, ममता या गोष्टी मिळणार नाहीत आणि त्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होणार नाही.

**३) प्लेटोने स्त्री-पुरूषांना पशूच्या पातळीवर आणून सोडले आहे :**

कृत्रीमरित्या स्त्री-पुरूषांनी मिलनासाठी एकत्र येणे हा सार्वजनिक व्यभिचार आहे. विकृती आहे. फक्त सुदृढ स्त्री-पुरूषांना वासना असते व दुर्बल स्त्री-पुरूषांना नसते; असे नाही त्यांच्या वासनेचे काय? हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. फक्त पशूच मिलनापूरते एकत्र येतात मनुष्याचे तसे नसते.

**४) राज्यकर्ते व सैनिक यांनी सामुदायिक जीवन जगण्याची कल्पना निरर्थक :**

संपत्ती व विवाह यापासून अलिप्त राहून निवडक बुद्धीवादी राज्यकर्त्यांनी राज्यकारभार करणे किती कठीण गोष्ट आहे, याची जाणिव असूनही प्लेटोने या विचारावर भर दिलेला आहे.

**५) विवाह एक संस्कार :**

विवाह हा एक संस्कार असतो स्त्री व पुरूष फक्त संभोगासाठी एकत्र येतात ही प्लेटोची कल्पना चुकीची आहे. विवाह ही एक माणसाची नैसर्गिक गरज आहे याकडे प्लेटोने दुर्लक्ष केले आहे.

**६) बालकांची मानसिक वाढ नीट होणार नाही :**

प्लेटोच्या साम्यवादामुळे बालकांची मानसिक वाढ नीट होणार नाही व मानसिक दृष्ट्या एक दूर्बल पीढी यातून निर्माण होईल, वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा या गोष्टी लहान मुलांच्या निकोप वाढीसाठी अत्यंत आवश्यक असतात हे प्लेटो विचारात घेत नाही.

- **ॲरिस्टॉटलने केलेली टीका :**

प्लेटोचा शिष्य आणि महान विचारवंत ॲरिस्टॉटल याने ही प्लेटोच्या साम्यवादावर टीका केली आहे.

१) प्लेटोच्या साम्यवादामुळे राज्यात एकता निर्माण होण्याऐवजी संघर्ष व फुटीर वृत्ती वाढीस लागेल असे तो म्हणतो.

२) उत्साहाने काम करण्यासाठी आणि व्यक्तीविकासासाठी संपत्ती आवश्यक असते. प्लेटोचा साम्यवाद व्यक्तीविकासास घातक आहे. असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

३) संपत्ती माणसाला भ्रष्ट बनविते या एकाच गोष्टीकडे प्लेटो लक्ष केंद्रीत करतो. परंतु संपत्तीही प्रेरणाशक्तीदेखील आहे ही गोष्ट प्लेटो विसरतो. याकडे ॲरिस्टॉटल लक्ष वेधतो.

४) प्लेटोचा संपत्तीचा साम्यवाद हा ऐतिहासिकदृष्ट्या देखील दोषपूर्ण ठरतो. कारण ही साम्यवादी व्यवस्था जर खरोखरच चांगली असती तर ती समाजाने कधीतरी उपयोगात आणली असती.

५) स्त्री संबंधीचा साम्यवाद समाजाात अनैतिकता पसरवितो. सुंदर स्त्रीसाठी पुरुषांमध्ये भांडणे होतील. पुरुष हा सौंदर्यवान स्त्रीकडे आकर्षित होतो. स्त्रीच्या सामुहिक स्वामित्त्वाच्या योजनेने अराजकता निर्माण होईल.

६) आई, वडील, मुलगा, मुलगी, भाऊ, बहीण यांना एकमेकांचे नाते माहित असणार नाहीत. त्यामुळे संभोगाच्या बाबतीत पशुमध्ये आढळणारी अनैतिकता निर्माण होईल.

७) कुटूंब ही नागरीजीवनाची प्राथमिक पाठशाळा आहे असे म्हटले जाते पण प्लेटोच्या साम्यवादाने कुटूंबसंस्थाच राहणार नाही. त्यामुळे आदर्श नागरिकही निर्माण होणार नाहीत.

८) राज्यातील सार्वजनिक मुलांची अवस्था अनाथालयातील मुलांसारखी होईल. त्यांची योग्य वाढ होणार नाही.

९) प्लेटोच्या साम्यवादाने उत्पादक वर्गाची उपेक्षा केली आहे. वास्तविक साम्यवाद प्रथम उत्पादक वर्गावरच लागू करायला हवा होता.

१०) प्लेटोचा स्त्रीसंबंधीचा साम्यवाद मानवी नैतिकतेच्या आणि पावित्रतेच्या कल्पनेवर जोरदार प्रहार करणारा आहे. व्यक्ती व कुटूंबाचा बळी देऊन एकतेचा प्रयत्न करणे कधीच उचित मानले जाऊ शकत नाही. असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

प्लेटोच्या साम्यवादावर कितीही टीका झाली असली तरी प्लेटोचा साम्यवाद मांडण्यापाठीमागील उदात्त हेतू आपणास विसरता येणार नाही. राज्यकर्तेमोहामुळे भ्रष्ट होतात हे सार्वकालिक सत्य नाकारता येणार नाही. त्यासाठी प्लेटोचा उपाय अतिशयोक्तीपूर्ण वाटत असला तरी त्यापाठीमागचा त्याचा सद्‌हेतू आपणास विसरता येणार नाही.

**प्लेटोचा साम्यवाद व आधुनिक साम्यवाद साम्य भेद :**

**साम्य :**

१) प्लेटो त्याच्या आदर्श राज्यासमोर व्यक्तीला काही महत्त्व देत नाही. मनुष्य राज्यात राहूनच आपल्या उद्देशांची पूर्ती करू शकतो.

आधुनिक साम्यवादातही व्यक्तीला काहीच स्थान नाही, मनुष्य म्हणजे राज्यरूपी यंत्राचा केवळ एक भाग आहे.

२) प्लेटो हा तत्त्वज्ञ राज्यकर्तेव सैनिक या वर्गाकडे राजकारभाराची सूत्रे देतो तर आधुनिक साम्यवादात मार्क्स कामगारवर्गाच्या हाती सत्ता देतो.

३) प्लेटो आपल्या साम्यवादी राज्यात अधिकारापेक्षा कर्तव्यावर भर देतो. आधुनिक साम्यवाद देखील कर्तव्यावर अधिक भर देतो.

४) मनुष्यातील स्वार्थी वृत्तीकडे प्लेटोने लक्ष केंद्रीत केले आहे. मार्क्सनेसुद्धा माणसाच्या स्वार्थी वृत्तीकडेच अधिक लक्ष दिले आहे.

५) प्लेटोचा साम्यवाद हा शासक व सैनिकवर्ग यांना खासगी संपत्ती ठेवण्यास प्रतिबंध करतो. आधुनिक साम्यवाद देखील खासगी संपत्तीचा विरोध करतो.

६) दोन्ही साम्यवादांनी माणसाच्या नैसर्गिक सहजप्रवृत्तीकडे दुर्लक्ष केले आहे. संपत्ती साठविणे, स्वातंत्र्यसुख उपभोगणे या मानवी मूलभूत प्रवृत्ती आहेत परंतु प्लेटो आणि मार्क्स या दोघांनीही मूलभूत प्रवृत्तीना महत्त्व दिले नाही.

७) प्लेटोचा साम्यवाद राज्यात एकता स्थापन करण्याचा प्रयत्न करतो. आधुनिक साम्यवाद आर्थिक समानता स्थापित करून राज्यात एकता निर्माण करण्याचा प्रयत्न करतो.

**भेद –**

१) प्लेटोचा साम्यवाद संपूर्ण समाजाला लागू पडत नाही. तो फक्त शासक व सैनिक यांच्यासाठीच आहे. तो उत्पादक वर्गाला लागू होत नाही.

तर आधुनिक साम्यवाद हा विशिष्ट वर्गासाठी नसून तो सर्व समाजाला लागू होतो.

२) प्लेटोच्या साम्यवादात वर्ग कायम राहतात, राज्य कायम राहते.

तर आधुनिक साम्यवादात मात्र वर्गविहिन समाजाची कल्पना आहे. श्रमिकांच्या हुकूमशाहीनंतर ज्य नष्ट होते.

३) प्लेटोचा साम्यवाद आर्थिक आणि कौटूंबिक असा दोन्ही प्रकारचा आहे. मात्र आधुनिक साम्यवाद हा फक्त आर्थिक आहे.

४) प्लेटोच्या साम्यवादाची कल्पना नगरराज्यातील अराजकतेमधून निर्माण झाली तर आधुनिक साम्यवादाची कल्पना आर्थिक विषमतेमधून निर्माण झाली आहे.

५) प्लेटोचा साम्यवाद एका राज्यापुरताच मर्यादित आहे. सर्व नगरराज्यांना एकत्र आणण्याचे स्वप्न प्लेटोने कधीच पाहिले नाही. आधुनिक साम्यवाद मात्र सार्वत्रिक स्वरूपाचा आहे. तो एक नवी व्यवस्था निर्माण करू इच्छितो, त्यामध्ये जगातील सर्व कामगारांची एकजूट आवश्यक आहे.

६) प्लेटोच्या साम्यवादात उत्पादनाच्या साधनावर राज्याचा अधिकार नव्हता परंतु आधूनिक साम्यवादात उत्पादनाची साधने ही राज्याच्या मालकीची असलेली दिसतात.

७) प्लेटोचा साम्यवाद ही नैतिकता व अध्यात्म यावर आधारलेला होता. परंतु आधुनिक साम्यवाद हा पूर्णपणे आर्थिक घटकांवर आधारलेला आहे.

८) प्लेटोच्या साम्यवाद कधीही प्रत्यक्षात येवू शकला नाही तो फक्त आदर्शच राहीला कोणत्याही देशाने त्याचा स्वीकार केला नाही. परंतु आधुनिक साम्यवाद मात्र व्यावहारीक स्वरूपाचा आहे. आज जगातील अनेक राज्ये आधूनिक साम्यवादाच्या प्रभावाखाली आहेत.

९) प्लेटोचा साम्यवाद हा उत्पादन वर्गाशी संबंधीत नाही त्यावर त्याचा काहीही परिणाम होत नाही. उत्पादनाची व्यक्तीवादी पध्दती तो बदलत नाही आधुनिक साम्यवाद मात्र आर्थिक व्यक्तीवादाच्या विरोधी आहे. उत्पादनाच्या सर्व साधनावर तो राज्याची मालकी सांगतो.

१०) प्लेटोच्या साम्यवादापाठीमागील कारण म्हणजे अ‍ॅथेन्स नगर राज्याचे होत असलेले अधःपतन होय. परंतु आधूनिक साम्यवाद उदयास येण्याचे कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीचे निर्माण केलेले

भयानक प्रश्न. विशेषतः आर्थिक विषमतेचा प्रश्न. या दोन्ही साम्यवादांचा उदय वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर झाला.

अशा रीतीने प्लेटोचा साम्यवाद व आधुनिक साम्यवाद यामध्ये असलेला फरक दिसून येतो. प्लेटोने मांडलेला साम्यवाद तार्किक व काल्पनिक स्वरूपाचा होता. त्यामुळे तो कधीही आस्तित्वात आला नाही उलट आधुनिक साम्यवाद हा व्यवहारवादावर आधारलेला असल्याने विविध देशात साम्यवादी विचाराची राज्ये निर्माण झालेली दिसतात.

**प्लेटोचा तत्वज्ञ राजा** (Plato's Philosopher King) **:**

रिपब्लीक ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या भागात तत्वज्ञ राजाचे सविस्तर वर्णन प्लेटोने केले आहे. तो म्हणतो की, जो पर्यंत राजे तत्वज्ञ बनणार नाहीत आणि राजे हे तत्वज्ञ असणार नाहीत तो पर्यत नगरराज्यांचा नाश होत राहणे हे अटळ आहे. प्लेटोला आदर्शराज्य निर्मितीसाठी आदर्श असे तत्वज्ञ राज्यकर्ते निर्माण करायचे होते. त्याच्यामते राज्यात फारच थोडे लोक असे असतात की, जे बुद्धिवान व कार्यक्षम असतात. राज्यकारभार पाहण्यासाठी कुशल, बुद्धिमान आणि निस्वार्थी व्यक्तींची आवश्यकता असते. तत्वज्ञानी शासक स्वार्थापासून दूर राहून विवेकाने शासन करतील आणि अशा वेळी ॲथेन्सची विस्कटलेली घडी पूर्ववत होईल असे प्लेटोला वाटत होते व या परिस्थितीतून प्लेटोला तत्वज्ञ राज्यकर्त्यांची कल्पना सुचलेली होती. रिपब्लीक या ग्रंथाच्या आठव्या व नवव्या भागात प्लेटोने आपल्या शेजारच्या देशातील अनेक राज्यांचा परामर्श घेवून तत्वज्ञ राजाची निकड स्पष्ट केली आहे. ॲथेन्सची लोकशाही, स्पार्टाची अल्पजनशाही, आणि सिरॅक्यूजची हुकूमशाही हे प्रकार व्यर्थ व वाईट आहेत. कारण त्यात तीव्र व्यक्तिवाद आणि स्वार्थ फार बोकाळला होता. ॲथेन्सवर तर अज्ञानाचा प्रचंड पगडा होता. अशावेळी राज्याची सूत्रे तत्वज्ञ, बुद्धिमान व्यक्तीच्या हातात दिली तर ॲथेन्सची विस्कटलेली घडी पूर्ववत होईल असे प्लेटोला वाटत होते. या परिस्थितीतूनच प्लेटोला तत्वज्ञ राज्यकर्त्याची कल्पना सूचली होती.

**प्लेटोच्या मते, तत्वज्ञ राज्यकर्त्याच्या अंगी पुढील गुण असावेत :**

● तत्वज्ञ राज्यकर्ता (शासक) बुद्धिमान व सुदृढ असावा, शासनकर्त्याला नैतिक, अध्यामिक व तात्विक दृष्टीकोणातून शिक्षण दिले पाहिजे. राज्यकर्ता हा सद्‌गुणी असला पाहिजे. त्याचबरोबर तो संपत्ती व स्त्रिया कुटूंब यापासून दूर असला पाहिजे. तो निस्वार्थी, कर्तव्यदक्ष व प्रजाहितदक्ष असावा, त्याने सामुदायिक जीवन जगावे व समाजहित साधावे, समाजाला नियंत्रीत करण्याची शक्ती त्याच्या ठिकाणी असावी. शासनकर्ता हा नितीमान, व्यवहारी मुत्सद्दी व संयमी असला पाहिजे.

अशा पद्धतीने तत्वज्ञ शासनकर्त्याच्या अंगी कोणत्या पात्रता आवश्यक आहेत हे सांगून, तत्वज्ञ राज्यकर्ते सत्ताधारी झाले तर नगर राज्यातील दोष नाहिसे होवून प्रजा सुखी होईल, असे प्लेटोला वाटते. प्लेटोच्या मते ''जो पर्यंत तत्वज्ञ राजे बनत नाहीत किंवा या जगातील राजे व राजपूत्र तत्ववेत्यांची तर्कबुद्धी व बौद्धिक पात्रता संपादन करीत नाहीत, तोपर्यंत नगरराज्ये दोषमुक्त होऊ शकणार नाहीत. राजकीय तत्वज्ञान व राजकीय सत्ता

एकत्र आल्याशिवाय नगरराज्ये आदर्श बनणार नाहीत अशी प्लेटोची धारणा होती. तत्ववेत्ते सत्ताधारी झाल्याशिवाय किंवा सत्ताधारी तत्ववेत्ते झाल्याशिवाय समाज सुव्यवस्थित होणार नाही.''

राज्यकर्ते बुद्धिमान व तत्वज्ञ होण्याकरिता प्लेटोने शिक्षण योजना मांडली होती. राज्यकर्त्या वर्गाने वयाच्या पस्तीस वर्षापर्यंत शिक्षण घेऊन ज्ञान संपादन करावे आणि नंतर व्यवहारज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी पाच-दहा वर्ष सेवा करावी असे सूचविले आहे. प्लेटोने तत्वज्ञ राज्यकर्त्यांच्या संदर्भात आचारसंहिता सांगितली आहे.

- तत्वज्ञ राज्यकर्त्याने न्याय प्रस्थापित होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला तीच्या कुवतीनुसार काम द्यावे.
- राज्याच्या शिक्षणपद्धतीवर नियंत्रण ठेवून तिचे संचलन करावे.
- राज्याची लोकसंख्या माफक असावी या दृष्टीने लक्ष ठेवावे.
- खाजगी संपत्तीवर योग्य नियंत्रण ठेवून व्यक्तीला अधिक श्रीमंत किंवा अधिक गरीब बनू देवू नये.

**तत्वज्ञ राजा सिद्धांताचे परीक्षण :**

**१) राजाची हुकूमशाही निर्माण होते :**

प्लेटोचा तत्वज्ञ राजा हा कोणत्याही नियमांती, कायद्याने बांधलेला नव्हता. राजा कितीही बुद्धिवान, तत्वज्ञ असला तरी त्याला सत्तेचा मोह भ्रष्ट करतोच करतो. सत्ता जितकी जास्त वापरली जाते तसा सत्तेचा जास्त दुरूपयोग होतो हे इतिहासाने वारंवार सिद्ध केले आहे. प्लेटोचा तत्वज्ञ राजा त्याला कसा काय अपवाद ठरू शकेल त्याचा राजासुद्धा अनियंत्रीत, अमर्याद, निरंकूश राज्यकर्ता बनू शकतो.

**२) तत्त्वज्ञ राज्यकर्ता कल्पा एकांगी व अपूर्ण वाटते :**

तत्वज्ञ राज्यकर्ता ही कल्पना केवळ दोन वर्गापूरती मर्यादित होती. उपजिवीकेची साधने निर्माण करणाऱ्या वर्गातील लोकांना तत्वज्ञ राजा होता येणार नाही. त्यामुळे प्लेटोची तत्वज्ञ राजकर्ता ही कल्पना एकांगी व अपूर्ण वाटते.

**३) तत्वज्ञ राजकर्ता गूढ कल्पनेत रमण्याची शक्यता :**

प्लेटोचा तत्वज्ञ राज्यकर्ता हा आपल्या तार्किक बुद्धिच्या व अनुभवाच्या आधारे भविष्यकालीन किंवा भूतकाळात गढून राहण्याची शक्यता असल्याने त्याचे वर्तमानकाळातील घडामोडीकडे दुर्लक्ष होण्याचा दाट संभव असतो.

**४) अकार्यक्षम राज्यकारभार :**

त्वरित निर्णय आणि निर्णयाची शीघ्र अंमलबजावणी हे कोणत्याही कार्यक्षम राज्यकारभाराचे गमक असते परंतु तत्वज्ञानी राजा मनन चिंतन यात एवढा व्यस्त झालेला असेल की, त्याला कोणतेही निर्णय त्वरित घेता येणार नाहीत. ज्यावेळी परकीय राज्य आक्रमण करते अशावेळी जलद निर्णयाची आवश्यकता असते.

**५) आवश्यक शिक्षणाची तरतूद नाही :**

राज्यकारभार करायचा असेल तर केवळ तत्वज्ञान उपयोगाचे नाही. राज्यकारभार सुव्यवस्थितपणे चालविण्यासाठी इतर आवश्यक बाबींचे शिक्षणही घ्यावयास हवे, त्याची दखल प्लेटोने घेतलेली नाही. उदा. अर्थशास्त्राचे, राज्यशास्त्राचे, मुत्सद्देगिरीचे ज्ञान, सैनिक प्रशिक्षण या बाबतीत राजा पारंगत असावयास हवा. परंतु प्लेटोने ते आवश्यक मानले नाही. यातून आदर्श प्रशासक कसा निर्माण होईल? चांगले शासन तरी कसे निर्माण होईल. केवळ गणित व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास केलेला राजा कार्यक्षम प्रशासक बनू शकणार नाही.

**६) तत्त्वज्ञ राजांची उदाहरणे नाहीत :**

तत्त्वज्ञ राजे जगाच्या इतिहासात अपवादात्मक होऊन गेले. उदा. ऑस्ट्रियाचा दुसरा जोसेफ असे राजे राज्यकारभारात यशस्वी होत नाहीत. लोकांमध्येही ते लोकप्रिय होऊ शकत नाहीत. असे राजे प्रजेला विश्वासात न घेता एकाएकी क्रांतिकारी निर्णय घेतील. लोकांच्या भावनेची ते कदर करतील याची खात्री देता येत नाही. फार दूरवरच्या भविष्याचा विचार करताना किंवा भूतकाळाचा विचार करताना वर्तमानकाळाशी त्याचा संपर्क संपूर्णपणे तुटतो. तत्त्वज्ञानात अधिक रमलेला प्रशासक तऱ्हेवाईक प्रवृत्तीचा बनतो व तऱ्हेवाईक व्यक्तीने चालविलेला राज्यकारभार अन्यायी असमतोल व अप्रिय बनू शकतो.

## १.२.६ प्लेटोचे आदर्श राज्य (Ideal State) :

प्लेटोने आदर्शराज्यविषयक कल्पना त्याच्या 'रिपब्लीक' या ग्रंथात मांडली आहे. त्यावेळी ग्रीक राज्यात पसरलेली अराजकता पाहूनच प्लेटोने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. व्यक्तीला चांगले जीवन जगता यावे यासाठी आदर्श राज्य आवश्यक आहे असे प्लेटोला वाटते. आदर्श राज्याचे चित्र रंगविताना प्लेटो व्यवहारवादाकडे दुर्लक्ष करतो. त्याचे आदर्श राज्य म्हणजे ग्रीकमधील वाईट गोष्टींचे निराकरण करण्याचा प्रयत्न होतो. अशा राज्याचा राजा तत्त्वज्ञानी असावा असा त्याचा अट्टाहास होता. ''जोपर्यंत तत्त्वज्ञानी राजा राज्य करणार नाही तोपर्यंत राज्याचे कल्याण होणार नाही.'' प्लेटोच्याच शब्दात "Until philosophers and kings or the kings and Princes of this world have the spirit & power of philosophy, cities will never have rest from their evils." प्लेटोच्या मते, राज्य म्हणजे व्यक्तीचे विशाल रूप होय. जशा पद्धतीने व्यक्ती निर्माण होतात आणि त्यांचे कार्य चालते, तशा पद्धतीने समाज बनत असतो. समाजाच्या गरजा भागविण्यासाठी तीन वर्ग असतात. राज्यकर्त्यांचा वर्ग, संरक्षकांचा वर्ग, उत्पादकांचा वर्ग, या तीन वर्गाच्या माध्यमातून राज्याचे संवर्धन होत असते. माणसाच्या शरीरात पोट, छाती व मेंदू हे तीन भाग वासनापूर्ती, संरक्षण, व नियंत्रण ही कामे करीत असतात, त्याचप्रमाणे समाजातील हे वर्ग राज्याची कार्येकरीत असतात. आदर्श नागरिक निर्माण करणे हे राज्याचे मुख्य कार्य होय. आदर्श राज्यातच मनुष्याला चांगले जीवन जगता येते. माणसाच्या सर्व गरजा आदर्श राज्यातच पुऱ्या होतात. आदर्श राज्याची उभारणी न्यायावर झालेली असते.

प्लेटो आपल्या आदर्श राज्याची रचना तीन प्रकारे मांडतो (१) पुरुष व स्त्रिया समान आहेत, त्यामध्ये फरक असेल तर तो फक्त अंशाचा आहे, प्रकाराचा नाही, त्यांना सारखेच शिक्षण मिळावे व सारखीच सार्वजनिक कार्ये पार पाडता यावीत. (२) प्लेटोने कुटूंबव्यवस्था नाहीशी करून साम्यवादाची निर्मिती करावी

असे सूचविले आहे. हा साम्यवाद स्त्रियांचा व संपत्तीचा, मालमत्तेचा असेल (३) तत्त्वज्ञानी राजाची सत्ता स्थापन व्हावी असे तो सूचवितो.

**आदर्श राज्याची वैशिष्ट्ये :**

**१) तत्त्वज्ञ राज्यकर्ते :** आदर्श राज्यात राज्याची संपूर्ण सत्ता ही तत्त्वज्ञ राजाच्या हाती आहे. राज्याच्या अग्रभागी हा तत्त्वज्ञानी राजा आहे. तो संपूर्णपणे ज्ञानी असल्याने भावना व विकार यांचे त्याच्यावर नियंत्रण राहणार नाही. त्याला कोणाबद्दलही द्वेष व आकस असणार नाही. तो सत्याचा व आदर्शाचा मुर्तीमंत प्रतिक आहे. ज्ञानाचा अविष्कार आहे. त्यामुळे त्यास राज्याच्या हिताची दूरदृष्टी लाभलेली असते. तोच राज्याचे खरे कल्याण साधू शकतो. त्याच्या प्रत्येक कृतीमध्ये सद्गुणांचे प्रतिबिंब ठळकपणे दिसते. तो लिखीत कायदे आणि चंचल लोकमत यांच्या पेक्षा श्रेष्ठ असतो. म्हणजेच यांचे त्याच्यावर बंधन नसते.

**२) आदर्श नागरिक :** प्लेटोच्या मते, नगरराज्यात नागरिकांची संख्या ५०४० एवढी असावी. सुजाण, सुसंस्कृत नागरिक निर्माण करणे म्हणजे अदर्श राज्य निर्माण करणे होय. कारण 'जसे नागरिक तसे राज्य' या नियमांनुसार आदर्श नागरिकच आदर्श राज्य निर्माण करू शकतील असे प्लेटोला वाटत होते. यामुळे प्लेटोने नगरराज्यातील लोकांच्या शिक्षणाकडे, आरोग्याकडे आस्थेने लक्ष देवून विविध योजना सुचविल्या होत्या.

**३) न्यायव्यवस्था :** प्लेटोच्या आदर्श राज्यात न्यायाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अर्थात न्याय शब्द आपण रोज व्यवहारात वापरतो त्या अर्थाने प्लेटो हा शब्द वापरत नाही. त्याच्या मते ''न्याय म्हणजे स्वतःच्या वाट्याला आलेले कार्य प्रामाणिकपणे करणे आणि दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे होय''. न्यायाचा हा धागा सर्व समाजास एकतेच्या सूत्रात बांधतो. विविध कार्यासाठी सुयोग्य असलेल्या विविध व्यक्ती एकत्र येतात व आदर्श राज्याच्या विकासास हातभार लावतात. प्रत्येक व्यक्ती तीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडते, ती इतरांच्या क्षेत्रात ढवळाढवळ करीत नाही. प्लेटोच्या मते न्याय म्हणजे ज्या व्यक्तीस जे योग्य आहे गरजेनुसार व क्षमतेनुसार देणे होय.

**४) राज्य नियंत्रीत शिक्षणपद्धती :** तत्त्वज्ञ राज्यकर्तेव संरक्षक अधिकारी यांच्यासाठी प्लेटोने आदर्श शिक्षणपद्धती सूचविली आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला तिच्या कर्तव्याची जाणिव होते. म्हणून नागरिकांना विशिष्ट पद्धतीचे शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्याच्या नियंत्रणाखाली शिक्षणाचे कार्य चालले पाहिजे.

**५) राजाची हुकूमशाही नसते :** आदर्श राज्यामध्ये राजाकडे सर्वाधिकार असले, तो कायदा, चालिरीती, लोकमत या सर्वापलीकडे तो असला तरी तो हुकूमशहा नसतो. कारण तो न्यायी राजा असतो. राज्याचे हित पाहणारा तो प्रजाहितवादी राज्यकर्ता आहे. तो राज्याच्या मूलभूत तत्त्वांचा भंग करत नाही. रूढ अर्थाने तो हुकूमशहा असला तरी उपकारकर्ता हुकूमशहा आहे.

**६) कर्मसिद्धान्ताचा अवलंब :** आदर्श राज्यात कर्म सिद्धान्ताचा अवलंब केला पाहिजे. प्लेटोच्या मते, कर्मसिद्धान्त म्हणजे प्रत्येक व्यक्तीने आयुष्यभर तिच्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकपणे करत रहावे

आणि इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नये. राज्यातील नागरिकांना जी कामे वाटून दिली जातात, ती कामे त्यांनी आपल्या योग्यतेनुसार, पात्रतेनुसार पार पाडली पाहिजेत. जेव्हा समाजघटकातील तीन वर्ग आपआपली कार्येजाणिवपूर्वक, जबाबदारीने पार पाडतील त्यावेळी राज्य आणि समाज आदर्श होईल. आदर्श राज्यातच समाजाच्या गरजा भागविल्या जातील.

**७) राज्याचे तीन वर्गात विभाजन :** आदर्श राज्यात निर्माण होणाऱ्या न्यायव्यवस्थेनुसार प्लेटोने समाजघटकांचे तीन वर्गात विभाजन केले आहे. पहिला वर्ग हा राज्यकर्त्यांचा असून तत्वज्ञ राजकर्तेहे त्याच्या अग्रभागी आहेत. राज्याची सर्व सत्ता ही तत्त्वज्ञ राज्याच्या हाती असते. दुसरा वर्ग हा सैनिकांचा आहे. राज्याचे परचक्रापासून संरक्षण करणे हे त्यांचे काम आहे. आणि समाजघटकांचा तिसरा वर्ग आहे तो उत्पादकांचा, श्रमीकांचा, कष्टकऱ्यांचा या वर्गाला उत्पादकाचे काम करावे लागते. राज्यातील विविध वस्तुंचे उत्पादन हा वर्ग करतो. प्रत्येक वर्ग अशा पद्धतीने त्यांच्या वाट्याचे कार्य पार पाडतो. यातील पहिले दोन वर्ग उच्च समजले जातात. उत्पादकांच्या वर्गाला समाजातील कनिष्ठ प्रतिचा वर्ग मानन्यात आले आहे. अशा रितीने समाजाचे तीन वर्गात विभाजन करून कार्यविशेषज्ञतेचा सिद्धान्त सांगितला आहे.

**८) साम्यवाद :** प्लेटोच्या आदर्श राज्यात साम्यवादाचा स्वीकार करण्यात आला आहे. त्याचा साम्यवाद हा दुहेरी प्रकारचा आहे. स्त्रियांचा साम्यवाद व संपत्तीचा साम्यवाद मांडून आदर्श राज्याची उभारणी करण्याचे ठरविले होते. प्लेटोचा साम्यवाद हा फक्त वरच्या दोन वर्गांनाच लागू आहे. वरच्या दोन वर्गांना संपत्ती बाळगता येणार नाही. त्यांना कुटुंबसंस्थाही नसेल, संपत्ती व स्त्री हे दोन मोह राज्यकर्त्यांना कर्तव्यापासून दूर सारतात. म्हणून त्यांनी या मोहापासून अलिप्त राहून राज्यकारभार करावा असे तो सूचवितो.

**९) कला व साहित्य यावरती बंधने :** प्लेटोच्या आदर्श राज्यात कला, साहित्य यावर बंधने आहेत. कला व साहित्याच्या क्षेत्रात जी निर्मिती होईल, त्यावर राज्याचे संपूर्ण नियंत्रण असेल. राज्याच्या देखरेखीखाली ते वाढू शकते. कला व साहित्याच्या क्षेत्रात संपूर्ण स्वातंत्र्य दिले गेले तर आदर्श राज्याची उभारणी उत्कृष्ट पद्धतीने होणार नाही. राज्यातील तरूण पिढीवर विकृत साहित्याचा वाईट परिणाम होईल. त्यासाठी कला व साहित्यावर राज्याचे संपूर्ण नियंत्रण असणे आवश्यक आहे, असे तो मानतो.

**१०) स्त्री–पुरूषांना समान दर्जा :** प्लेटोने आदर्श राज्यात स्त्रियांना पुरुषांबरोबर समान दर्जा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना समान शिक्षण द्यावे. त्याच्या शक्तीचा, सामर्थ्याचा राज्यासाठी उपयोग करून घ्यावा. स्त्रियांना राज्यकारभारात समाविष्ट करून न घेणे म्हणजे अर्धी शक्ती वाया घालविण्यातील प्रकार आहे. पुरुषांतील सर्वच गुण स्त्रियांमध्येही असतात असे प्लेटो म्हणतो.

**११) सर्वंकष सत्तावादी राज्य :** प्लेटोचे आदर्शवादी राज्य हे निरंकुश, अमर्यादित व सर्वंकष सत्तावादी राज्य आहे. सर्व कला, साहित्य यावर राज्याचे नियंत्रण असल्याने हे राज्य सर्वंकष सत्तावादी बनले आहे. हे राज्य व्यक्तीजीवनाच्या सर्व भागास स्पर्श करते. राज्याच्या नियंत्रणापासून कोणीही मुक्त नाही. इथे हेही ध्यानात घेतले पाहिजे की, हा सर्वंकष सत्तावादसुद्धा आदर्श स्वरूपाचा आहे.

**१२) राज्य घटनेशिवायचे आदर्श राज्य :** प्लेटोच्या आदर्श राज्याला राज्यघटनेची आवश्यकता नाही. कारण या राज्यातील व्यक्ती इतक्या पूर्णत्वास पोहचल्या आहेत की, त्यांना राज्यघटनेची आवश्यकताच वाटत नाही. कायदा व राज्यघटना माणसाच्या अपूर्णतेचे लक्षण आहे. प्लेटो तर म्हणतो की, कायद्याचा उपयोग केव्हाच नसतो. गुंड व्यक्तीसाठी कायद्याचा असूनही उपयोग नाही, तर सज्जन व्यक्तींना कायद्याची आवश्यकता नसते. एकंदरीत आदर्श राज्यासाठी कायदा व राज्यघटना यांची आवश्यकता नाही असे प्लेटो म्हणतो.

**प्लेटोच्या आदर्श राज्याचे परीक्षण :**

प्लेटोने मांडलेली आदर्श राज्याची कल्पना कितीही चांगली असली तरी ती कल्पनारम्य, स्वप्नरंजनात्मक, अव्यवहार्य व अवास्तव अशी आहे. प्लेटोच्या आदर्श राज्यावर पुढीलप्रमाणे टीका करण्यात येते.

**१) आदर्श राज्याचे विचार काल्पनिक वाटतात :** प्लेटोच्या आदर्श राज्याची कल्पना तात्त्विक स्वरूपाची वाटते. प्रत्यक्ष व्यवहारात आदर्श राज्य निर्माण होणे कठीण आहे, हे स्वतः प्लेटोने त्याच्या 'दि लॉज' या ग्रंथात मान्य केले आहे. कारण त्याने वर्णन केलेला 'तत्त्वज्ञ राजा' निर्माण होऊ शकणार नाही. विवाह, कुटूंब यापासून अलिप्त राहून राज्यकारभार करणारे राज्यकर्तेमिळणे दुर्मिळ आहे.

**२) उत्पादक वर्गाकडे दुर्लक्ष :** आदर्श राज्याची उभारणी करताना प्लेटोने उत्पादक वर्गाकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आहे. त्यांना राज्यात तो कोणत्याही प्रकारचे स्थान देत नाही. फक्त उत्पादक म्हणून त्यांनी यंत्रवत जीवन जगायचे आहे. प्लेटोने बुद्धिवादी वर्गास फारच महत्त्व दिले. तसे उत्पादकांना फारच कमी लेखले आहे. उत्पादकांच्या विकासाची कोणतीही योजना प्लेटोने मांडलेली नाही.

**३) सदोष शिक्षण पद्धती :** प्लेटोच्या आदर्श राज्यातील शिक्षणपद्धतीसुद्धा सदोष आहे. ती प्रदीर्घ चालणारी कंटाळवाणी अशी आहे. वयाच्या चाळीसाव्या वर्षापर्यंत चालणारे शिक्षण कोणत्याही शिक्षण किंवा मानसशास्त्रीय पद्धतीत बसत नाही. त्याचबरोबर तळागाळातील लोकांसाठी, उत्पादकांसाठी त्याने कोणतीही शिक्षणपद्धती सांगितली नाही. त्याचा परिणाम असाही होऊ शकतो की बहुसंख्येने असणाऱ्या या वर्गात असंतोषाचा भडका उडू शकतो. कनिष्ठ वर्गातील लोकांनी तसेच राहावे अशी ही प्लेटोची आदर्श राज्याची कल्पना आहे.

**४) आदर्श राज्याची कल्पना व्यक्तीस्वातंत्र्यास मारक :** प्लेटोच्या आदर्श राज्यात व्यक्तीला गौण स्थान दिले असून राज्याला आदर्श मानण्यात फार मोठी चूक केली आहे. आधुनिक काळात राज्य हे व्यक्तीविकासाचे साधन मानले जाते. या राज्यात प्लेटोने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली आहेत. ती व्यक्तीविकासाच्या दृष्टीनेही मारक ठरतात.

**५) तत्त्वज्ञ राजाची कल्पना अव्यवहार्य :** प्लेटोची तत्त्वज्ञ राजाची कल्पना अव्यवहार्य आहे. आदर्श राज्याच्या सर्वोच्च पदी तत्त्वज्ञ राजा आहे. तत्त्वज्ञ राजा हा उत्कृष्ठ व्यक्ती बनू शकेल. परंतु तो उत्कृष्ट प्रशासक बनू शकणार नाही. प्लेटोचा तत्त्वज्ञ राजा हा जरी ज्ञानी असला तरी तो ज्ञानी मनुष्य राज्यकारभारापेक्षा

मनन चिंतनाकडेच अधिक वेळ देईल. तो आदर्श प्रशासक बनू शकणार नाही. त्याचबरोबर एकदा त्याच्या हाती सत्ता आल्यावर असा राजा अनियंत्रीत, निरंकूश बनणार नाही हे कशावरून?

**६) गुलामगिरीकडे दुर्लक्ष :** प्राचीन ग्रीसमध्ये प्लेटोच्या काळात माणसाला जनावराप्रमाणे वागणूक देणारी गुलामगिरीची प्रथा अस्तित्वात होती. प्लोटोने त्याच्या आदर्श राज्यात गुलामगिरीचे समर्थन केले नसले तरी त्याच्या आदर्श राज्यात गुलामांचे स्थान काय, याविषयी प्लेटोने मौन बाळगले आहे किंवा त्यांच्या मुक्तीची कोणतीही योजना सांगितली नाही. त्या काळातील समाजातील एवढा मोठा वर्ग दुर्लक्षित, उपेक्षीत राहणे चांगले नाही. याचा अर्थ असा की गुलामगीरी वाईट आहे हे मानावयास प्लेटो तयार नाही.

**७) कायद्यापेक्षा व्यवहाराला जास्त महत्त्व :** प्लेटोने त्याच्या आदर्श राज्यात कायद्यापेक्षा व्यवहाराला जास्त महत्त्व दिले आहे. किंबहूना त्याच्या आदर्श राज्यात कायद्याचे अस्तित्वच नाही. त्याच्या आदर्श राज्यातील तत्त्वज्ञ राजा हा कायद्यापेक्षा श्रेष्ठ मानला गेला असल्याने कायद्याचे राज्य निर्माण होऊ शकत नाही. तसेच प्लेटो राज्यातील सर्व लोकांना समान वागणूक देत नाही. विशिष्ट वर्गानाच त्यामुळे महत्त्व मिळते. साहजिकच अशा राज्यात सर्वांना समान न्याय मिळणे कठीण असते.

**८) न्यायाची उभारणी नैतिकतेच्या आधारावर :** प्लेटोच्या आदर्श राज्यातील न्यायदानाची पद्धत ही आधुनिक न्यायदान पद्धतीपेक्षा वेगळी आहे. प्लेटोच्या मते प्रत्येक व्यक्तीने त्याच्या वाट्याला आलेले काम पार पाडणे. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप न करणे किंवा समाजघटकाच्या सर्व वर्गांनी त्यांची कामे व्यवस्थितपणे पार पाडणे म्हणजे न्याय होय. प्लेटोने त्याच्या न्यायाच्या कल्पनेत कायद्यापेक्षा कर्तव्यावर अधिक भर दिला आणि न्यायाची उभारणी नैतिकतेच्या आधारावर केली.

**९) कार्यविशेषज्ञतेचा अयोग्य विचार :** प्लेटोच्या आदर्श राज्यात न्यायाची पूर्तता होण्याच्या दृष्टीने त्याने कार्यविशेषज्ञतेचा सिद्धान्त मांडला. परंतु त्याची न्यायाची कल्पना आणि कार्यविशेषज्ञतेचा सिद्धान्त यामुळे व्यक्तीचा विकास खुंटण्याची शक्यता आहे. व्यक्तीची योग्यता असली तरी या सिद्धान्तामुळे ती इतर कामे पार पाडू शकत नाही. या सिद्धान्तामुळे व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाची हमी मिळू शकत नाही. कारण व्यक्तीमधील इतर गुणांना वाव मिळू शकत नाही.

**१०) ॲरिस्टॉटलने केलेली टीका :** ॲरिस्टॉटलनेसुद्धा प्लेटोच्या आदर्श राज्यावर टीका केली आहे. ॲरिस्टॉटलच्या मते प्लेटोने मांडलेली साम्यवादाची कल्पना ही मानवी स्वभावाच्या विरोधी आहे. प्लेटोने राज्याच्या एकतेवर अनावश्यक इतका भर दिला. त्यामुळे राज्याचा खरा विकास होणार नाही. त्याचबरोबर प्लेटोने कनिष्ठ वर्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

अशाप्रकारे प्लेटोच्या आदर्श राज्यावर टीका होत असली तरी त्याच्या आदर्श राज्याचे महत्त्व नाकारता येणार नाही. आजचा साम्यवादाचा उगम प्लेटोच्या विचारातच आहे. त्याने मांडलेले विचार तात्त्विक, काल्पनिक असले तरीसुद्धा आदर्श राज्याचे वर्णन करताना प्लेटोने शिक्षण, न्याय, निती, स्त्रियांचा समान दर्जा व समान हक्क इत्यादीबाबत वास्तववादी व उपयुक्त विचार मांडले आहेत. प्लेटोच्या कार्यविशेषज्ञतेच्या

सिद्धान्ताचा परिणाम म्हणून आधुनिक काळात सत्ताविभाजनाच्या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला आहे. मालमत्तेचा साम्यवाद आज जगातील बऱ्याच राज्यांनी स्वीकारला आहे. प्लेटोच्या 'बुद्धीचे राज्य' या सिद्धान्ताचासुद्धा आधुनिक राज्यपद्धतीवर परिणाम झाला आहे. लष्करी, प्रशासकीय प्रशिक्षीत अधिकाऱ्यांचे प्रशासनातील महत्त्व आपणास नाकारून चालणार नाही.

**मिश्र राज्य (उपआदर्श राज्य) :**

प्लेटोने उपआदर्श राज्याची कल्पना त्याच्या 'दि लॉज' या ग्रंथात मांडली. दि लॉज हा प्लेटोचा शेवटचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ संवादात्मक शैलीत लिहिला आहे. 'रिपब्लीक' या ग्रंथामध्ये त्याच्या कल्पनेचा मुक्त विहार आहे. तर 'दि लॉज'मध्ये वास्तवतेशी टक्कर देण्याचा त्याने प्रयत्न केला आहे. आदर्श राज्यासाठी तत्त्वज्ञ राजा निर्माण करणे अशक्य आहे. हे ओळखूनच प्लेटोला उपआदर्श राज्याची व्यवस्था सुचली. त्याचा रिपब्लीक हा ग्रंथ भावनेवर आधारित आहे तर 'दि लॉज' हा ग्रंथ अनुभवावर आधारित आहे. अनुभवावरून प्लेटोला विधिद्वारा आधारीत असलेली शासनप्रणाली स्वीकारावी लागली. राजेशाहीत काही प्रमाणात लोकशाहीची तत्त्वे स्वीकारणे गरजेचे आहे आणि लोकांना काही प्रमाणात स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे असे त्याला वाटते.

'दि लॉज'मधील उपआदर्श राज्य म्हणजे वास्तवाशी केलेला समझोता होता. मानवी दुर्बलतेशी घातलेली सांगड होती. आदर्श राज्यासाठी तत्त्वज्ञानी शासक मिळणे कठीण आहे. हे पाहिल्यावर प्लेटो उपआदर्श राज्याकडे वळला. बेजलिनच्या मते ''प्लेटोच्या निराशेचे कारण म्हणजे त्याला आज्ञापालन करणारे प्रजानन मिळाले नाहीत हे नव्हे तर त्याला आदर्श शासक मिळाले नाहीत.''

**प्लेटोच्या उप-आदर्श राज्यासाठी आवश्यक गोष्टी/वैशिष्ट्ये :**

१) कायद्याला महत्त्वाचे स्थान : रिपब्लीक या ग्रंथामध्ये कायद्याला प्लेटोने नगण्य असे स्थान दिले आहे. परंतु 'दि लॉज' ग्रंथामध्ये मात्र त्याने कायद्याला उचित स्थान दिले आहे. फक्त जनतेलाच नव्हे तर राज्यकर्त्यावरही त्याने कायद्याचा अंकुश ठेवला आहे. 'रिपब्लीकमधील आदर्श राज्य वास्तवात येवू शकणार नाही असे तो जाणून होता. प्रत्येक व्यक्तीला काही मर्यादा असतात. प्रत्येकाला हे माहित नसते की त्याला नेमके काय हवे आहे. माणसाच्या अपूर्णत्वामुळेच समाजात शांतता सुव्यवस्था नांदावी म्हणूनच नियंत्रणाची आवश्यक असते. असे नियंत्रण हे कायद्याद्वारेच प्रस्थापित होवू शकते. सामाजिक हित व सामाजिक स्वास्थ्यासाठी कायद्याची आवश्यकता असते.

प्लेटोच्या मते कायद्याची आवश्यकता दोन कारणासाठी असते. एक म्हणजे व्यक्तीमध्ये समाजहीत कशामध्ये आहे हे समजण्याची पात्रता नसते आणि दुसरे कारण म्हणजे व्यक्तीही स्वार्थाने प्रेरित असल्याने ती समाजहितास अनुकूल कार्य करील याची खात्री देता येत नाही. व्यक्ती जेव्हा समाजहित विरोधी कार्य करते तेव्हा तिला रोखण्यासाठी कायदा आवश्यक असतो. कायद्याला सुस्थिर स्वरूप देण्याचे कार्य प्लेटोने केले. प्लेटो म्हणतो की, 'राज्याचा कारभार हा कायद्यानुसार चालविला जावा. कायदा हा राज्यानुसार नसावा.'

**२) उप-आदर्श राज्याची भौगोलिक स्थिती व लोकसंख्या :** प्लेटोच्या मते उपआदर्श राज्य हे

समुद्रकिनाऱ्यापासून दूर असावे. समुद्रकिनाऱ्याजवळ असणाऱ्या राज्याला परदेशी व्यापार, परदेशी लोक, परकीय संस्कृती यापासून धोका संभवतो. समुद्रकिनाऱ्याजवळील राज्याला परकीय आक्रमणाची भिती असते. त्याचबरोबर जहाजे, नाविकदल यांची व्यवस्था ठेवावी लागते. त्यामुळे किनाऱ्यावर रक्षणासाठी पुष्कळ पैसा खर्च करावा लागतो. त्यासाठी राज्य हे नैसर्गिकदृष्ट्या चारही बाजूनी सुरक्षीत असेल तर परकीय आक्रमणाची कमी भिती असते. प्लेटोला स्वावलंबी कृषीप्रधान राष्ट्र मान्य होते. त्याच्या मते अशा राज्याची लोकसंख्या ५०४० इतकी असावी. ही संख्या शांतीकाळात, युद्धकाळात आणि कर वसूल करण्यासाठी उपयुक्त आहे. प्लेटोने राज्याची लोकसंख्या वाढू नये किंवा कमी होवू नये यासाठी कायदे करण्याचा अधिकार राज्याला दिला. राज्याची जमिन सुपिक असावी, जमिनीचे तुकडे पाडून ते नागरिकांना वाटून द्यावेत. जमिनीतून येणारे उत्पन्न एकत्र करून त्याची समान वाटणी करावी. शेतीची कामे गुलामांनी करावी, जमिनीची मालकी वंशपरंपरेने यावी.

**३) मिश्र शासनपद्धती :** उपआदर्श राज्यासाठी प्लेटोने मिश्र शासनपद्धतीचा पुरस्कार केला. त्याच्या मते राजेशाही व लोकशाहीमधील चांगल्या गुणांचा समन्वय साधून नवीन शासन पद्धती निर्माण करावी. प्लेटोचे मिश्रीत राज्य म्हणजे राजतंत्रात्मक पद्धतीमधील बुद्धी आणि प्रजातंत्रात्मक (लोकशाही) शासनातील स्वतंत्रता ह्यांचा समन्वय आहे. राजेशाहीतील शहाणपणा व लोकशाहीतील स्वातंत्र्य यांचा संगम करून मिश्र राज्य स्थापन करावे. अतिराजतांत्रिक आणि अतिलोकशाही राज्ये विनाशाला कारणीभूत ठरतात. राज्याचा अधःपात होऊ नये म्हणून बुद्धी, शक्ती व स्वातंत्र्य यांचा समन्वय साधला पाहिजे.

**४) आर्थिक व्यवस्था :** प्लेटोने उपआदर्श राज्यात खासगी संपत्ती ठेवता येईल असे सांगतो. संपत्तीमध्ये तो भूमी, घर यांचा समावेश करतो. संपत्तीच्या संचयावरून समाजात चार वर्ग मानावेत. यामध्ये जीवनावश्यक गरजा भागविण्याएवढी मर्यादित संपत्ती असणारे, त्यांच्यापेक्षा दुप्पट संपत्ती बाळगणारे, पहिल्या वर्गाच्या तिनपट संपत्ती बाळगणारे आणि चौपट संपत्ती असणारे असे चार वर्ग समजून राज्याने या चारी वर्गावर नियंत्रण ठेवून आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा. सर्व नागरिकांना भूमी सारख्या प्रमाणात असावी असे प्लेटो म्हणतो.

**५) सामाजिक व्यवस्था :** सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात प्लेटोने नव्या आदर्श राज्यातही 'रिपब्लीक' या ग्रंथामधील सामाजिक व्यवस्थेचा पुनरुच्चार केला आहे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात उत्साहाने भाग घ्यावा असे प्लेटो म्हणतो. स्त्री व पुरुषांना समान शिक्षण असले पाहिजे असे तो म्हणतो. शारीरिक विकासाच्या कार्यक्रमात समान रीतीने भाग घेतला पाहिजे. उपआदर्श राज्यात मात्र प्लेटोने स्त्रियांच्या साम्यवादाची कल्पना सोडून दिलेली दिसते. युद्धकालीन परिस्थितीमध्ये स्त्रियांनी पुरुषांच्याप्रमाणेच योगदान दिले पाहिजे. उपआदर्श राज्यामध्ये प्लेटोने कार्यविशेषज्ञतेच्या सिद्धान्ताचा त्याग केलेला दिसतो. उलट समाजातील हे तीन वर्ग एकमेकांपासून अलग ठेवण्याऐवजी या तिन्ही वर्गात समन्वय व सुसंवाद कसा स्थापन करता येईल याचाच त्याने विचार केला आहे. 'दि लॉज' या ग्रंथामध्येही त्याने बुद्धी व ज्ञानाला महत्त्व दिले असले तरी आदर्श राज्यामध्ये सामान्यजनांच्या वाट्याला जी उपेक्षा आली होती ती उप आदर्शराज्यामध्ये त्यांच्या वाट्याला येत नाही.

**६) आत्मसंयम :** उपआदर्श राज्याच्या स्थापनेसाठी आत्मसंयम आवश्यक असतो. आत्मसंयम म्हणजे वासनेने बुद्धिला शरण जाणे. आत्मसंयम हा राज्याचा पाया आहे. आत्मसंयमाच्या अभावी राज्यात अनेक प्रकारचे दोष निर्माण होतात. कायदा निर्माण करताना विविध दृष्टीकोण समजावून घेवून कायदा निर्माण केला पाहिजे. त्यामध्ये सद्‌गुणांचाही विचार झाला पाहिजे. रिपब्लीक ग्रंथामध्ये त्याने आत्मसंयमाला न्यायापेक्षा कमी महत्त्व दिले होते. तर 'दि लॉज'मध्ये आत्मसंयमाला श्रेष्ठ स्थान दिले. आत्मसंयम म्हणजे वासना आणि तर्क यांच्यातील सामंजस्य होय. त्याच्या मते कायदे निर्माण करणाऱ्यांना आत्मसंयमाच्या पूर्ण गुणांची माहिती असली पाहिजे.

**७) न्याय व्यवस्था :** प्लेटोच्या उप आदर्श राज्यात चार प्रकारची न्यायालये असावीत.

**अ) स्थानिक स्वरूपाची न्यायालये –** ही न्यायालये स्थानिक प्रश्नांचा विचार करून न्याय देतील.

**ब) निवडक न्यायाधिशांचे न्यायालय –** यांची निवड राज्यसरकारचे अधिकारी करतील. पूर्ण राज्यातील खटल्यांचा, भांडणांचा निवाडा हे न्यायाधिश करतील.

**क) प्रादेशिक न्यायालय –** राज्यातील बारा प्रदेशांसाठी त्या विशिष्ट प्रदेशातील लोकांनी निर्वाचित केलेली न्यायालये ही वैयक्तिक भांडणांचा निवाडा करतील.

**ड) अंतिम न्यायालय (जनतेचे न्यायालय) –** सर्व खटल्यांचा न्यायनिवाडा येथे होईल.

**८) शैक्षणिक व धार्मिक संस्था :** 'दि लॉज' या ग्रंथात प्लेटोने शिक्षणाकडे नागरिकत्वाच्या दृष्टीकोणातून अधिक भर दिला आहे. व्यक्तीमध्ये नागरी गुण निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. या शिक्षणातून राज्य कसे चालवावे व नागरिक कसे बनावे याचे ज्ञान नागरिकास होते. साहजिकच लोकांच्यात कायद्याविषयी आस्था निर्माण होते. उपआदर्श राज्यातही तो राज्य नियंत्रीत शिक्षणाचा ध्यास सोडत नाही.

उपआदर्श राज्यामध्ये धर्म ही राज्याच्या देखरेखीखाली आणला आहे. प्लेटो व्यक्तीगत धार्मिक उत्सवाच्या विरोधी होता. सार्वजनिक आणि धार्मिक ठिकाणीच धार्मिक कार्ये व्हावीत या मताचा तो होता.

**९) राजकीय व्यवस्था** : प्लेटोने राज्यकारभारासाठी सर्वसाधारण समिती, सल्लागार समिती, व प्रशासकीय समित्यांची कार्येविशद केली आहेत.

**अ) सर्वसाधारण समिती** : राज्यातील सर्व ५०४० नागरिकांचा समावेश या समितीत असेल प्रत्येक नागरिक या समितीचा सदस्य असेल. किमान वर्षातून एकदा तरी या समितीची बैठक बोलविण्यात येईल त्यामध्ये नागरिकांची मते जाणून घेतली जातील.

**ब) सल्लागार समिती** : सर्वसाधारण समिती ही समितीमधील लोकांची निवड करील. या समितीमध्ये सर्वसाधारणपणे ३०० सदस्य असतील. हे ३०० सदस्य नंतर आपल्यातून १०० सदस्य निवडतील व हे १०० सदस्य ३७ सदस्य निवडतील. हे ३७ सदस्य सल्लागार समिती म्हणून कार्य करतील. या सदस्यांचे वय ५० ते ७० च्या दरम्यान असावे आणि ही समिती राज्यकारभाराबाबत सल्ला देत राहील असे तो म्हणतो.

**क) प्रशासकीय समिती** : ही समिती ३६० लोकांची राहील. समाजात संपत्तीच्या आधारे चार वर्ग पाडण्यात येतील. प्रत्येक वर्गातून ९० सभासद या प्रमाणे त्यांची निवड केली जाईल. सल्लागार समितीने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम या समितीला करावे लागेल.

**१०) अतिश्रेष्ठ कार्यकारी मंडल** : प्लेटोच्या उपआदर्शराज्यात वर उल्लेख केल्याप्रमाणे ३७ लोकांची सल्लागार समिती असावी असे सांगितले आहे व या ३७ लोकामधून वयोवृध्द धर्मगुरू, शिक्षणतज्ञ अशा दहा लोकांचे अतिश्रेष्ठ कार्यकारी मंडळ असावे. या मंडळावर कायद्याचे बंधन असणार नाही. उपआदर्श राज्यातील सर्व घटकांवर, संस्थांवर या मंडळाची देखरेख व नियंत्रण असेल असे प्लेटो म्हणतो.

अशा पद्धतीने प्लेटोने उपआदर्श राज्यात महाजनशाहीला महत्त्व दिलेले दिसते. राजेशाही व लोकशाही यांच्या मिश्रणातून चांगली पद्धती शोधता-शोधता प्लेटो काही थोड्या लोकांची महाजनशाही पसंत करतो.

प्लेटोच्या 'दि लॉज'मधील कल्पनांचा प्रभाव पुढील पिढीतील अनेक विचारवंतावर व राज्यघटनावर पडला असला तरी उप आदर्श-राज्याची लोकसंख्या ५०४० एवढी असावी हा विचार पटणारा नाही आणि ही लोकसंख्या कशाप्रकारे नियंत्रीत करायची हे समजत नाही. राज्यकर्त्यांनी लोकसंख्येवर नियंत्रण ठेवावे म्हणजे नेमके काय करावे हा गमतीशीर प्रश्न आहे. प्लेटोचे राज्य समुद्र किनाऱ्यापासून दूर आहे म्हणजे ते व्यापाराच्या दृष्टीने अयोग्य आहे.

## १.३ सारांश :

प्लेटोनी शिक्षण, न्याय, आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा, साम्यवाद इत्यादी महत्त्वाच्या विषयावर आपले विचार मांडले आहेत. त्याच्या विचारातील काही मूल्ये आज ही उपयुक्त आहेत. राज्यकर्तेसुशिक्षीत, प्रशिक्षीत पाहिजेत त्याचबरोबर समाजाची इतरप्रकारे सेवा करणाऱ्या डॉक्टर, इंजिनियर, तंत्रज्ञ लोकांप्रमाणेच राज्यकर्त्यांना देखील योग्य प्रशिक्षण मिळाले पाहिजे हे आजही मान्य आहे. राज्यकर्त्यांनी जनतेच्या हितासाठी कार्य केले पाहिजे. त्यांच्या कारभारात स्वार्थ, लाचलुचपत, वशिलेबाजी, भ्रष्टाचार नको हेही आज मान्य आहे. राज्यकर्त्यांना युद्धाचे, राज्यकारभाराचे ज्ञान हवेच त्याचबरोबर त्यांची दृष्टीही समाजहिताशी एकरूप होणारी हवी. स्त्री-पुरुषांना समान संधी हवी हे तत्त्व आज मान्यता पावले आहे. प्लेटोला अभिजनसत्ता हवी असली तरी अशी सत्ता बुद्धीवर, चारित्र्यावर आधारलेली असावी याबद्दल कुणाचेही दुमत होणार नाही.

प्लेटोचा अभिजनवाद हा सद्गुणावर, ज्ञानावर, चारित्र्यावर आधारित आहे. प्लेटोच्या शिक्षणपद्धतीमध्ये काही अंशी सक्ती असली तरी निर्बुद्धपणा व यांत्रिकता नाही. अल्पसंख्यांकांच्या वंशश्रेष्ठतेचे स्तोम नाही. दुसऱ्याच्या भूमिची हाव नाही. प्लेटोच्या राज्यातील शारीरिक शिक्षण शिस्तीसाठी तर सैनिकी शिक्षण आत्मसंरक्षणासाठी आहे. विचारांची गरूडझेप, बुद्धीचा प्रचंड आवाका, महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवहिताची सतत चिंता या गुणांमुळे राजकीय विचारवंतामध्ये प्लेटोला जागतिक स्वरूपाचे स्थान प्राप्त झाले आहे. हे मान्य करावेच लागेल.

## १.४ पारिभाषिक शब्द :

- **दि रिपब्लीक :** प्लेटोच्या प्रसिद्ध ग्रंथाचे नाव.
- **Concerning Justice :** 'दि रिपब्लीक' या ग्रंथाचे दुसरे नाव
- **'दि पॉलीटीक्स' :** प्लेटोचे राजकीय विचार या ग्रंथात आहेत. या संवादाला स्टेटस्‌मन या नावानेही ओळखले जाते.
- **दि लॉज :** हा प्लेटोचा एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. उप आदर्श राज्याची कल्पना या ग्रंथामध्ये मांडली आहे.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

१. प्लेटोच्या मते, न्यायाचा अर्थ ............. हा आहे.

अ) प्रबलांचे हित जपणे
ब) स्वतःच्या हिताचे रक्षण करणे
क) प्रत्येकास त्याचा वाटा देणे
ड) दुऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे.

२. प्लेटोच्या ................ या ग्रंथास शिक्षणावरील सर्वोत्तम ग्रंथ म्हटले आहे.

अ) क्रिटो ब) दि रिपब्लीक क) दि लॉज ड) दि पॉलीटीक्स

३. प्लेटो ............. चा शिष्य होता.

अ) डायोनिसियसचा ब) ॲरिस्टॉटलचा क) सॉक्रेटीसचा ड) रूसोचा

४. प्लेटोने त्याच्या उपआदर्श राज्यात लोकसंख्या ........... एवढी असावी असे सांगितले आहे.

अ) ३०७० ब) ५०४१ क) ५०४० ड) ५०५०

५. प्लेटोच्या मते व्यक्तीमध्ये ............., ................, ............., या तीन भावना असतात.

अ) युक्ती, प्रेम, द्वेष
ब) दया, सहानुभूती, प्रेम
क) वासना, साहस, बुद्धी
ड) प्रेम, दया, वासना

६. प्लेटोच्या मते राज्याचा आधार .............. हा आहे.

अ) सत्ता ब) न्याय क) शक्ती ड) अधिकार

७. प्लेटोच्या ग्रंथाना ................ म्हणतात.

अ) प्लेटोचे लेखन ब) प्लोटोचे लेख क) प्लेटोचे विचार ड) प्लेटोचे संवाद

८. प्लेटोने ................ वर्षेॲकॅडमीमध्ये शिक्षणाचे कार्य केले.

अ) ३० ब) ४० क) ५० ड) ३५

९. प्लेटोने शासक व सैनिक वर्गाला ............. गोष्टीपासून दूर ठेवले.

अ) स्त्री व संपत्ती ब) संपत्ती व निवारा क) फक्त संपत्ती ड) यापैकी नाही

१०. प्लेटोने .............. या विचाराद्वारे कुटूंब संस्थेवर आघात केला.

अ) स्त्रियांचा साम्यवाद ब) शिक्षणविषयक विचार

क) संपत्तीचा साम्यवाद ड) न्याय विषयक विचार

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

१) ड – दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप न करणे.

२) ब – दि रिपब्लीक

३) क – सॉक्रेटीस

४) क – ५०४०

५) क – वासना, साहस, बुद्धी

६) ब – न्याय

७) ड – प्लेटोचे संवाद

८) ब – ४०

९) अ – स्त्री व संपत्ती

१०) अ – स्त्रियांचा साम्यवाद

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) प्लेटोच्या न्यायविषयक सिद्धान्ताचे मूल्यमापन करा.

२) प्लेटोचे शिक्षणविषयक विचार स्पष्ट करा.

३) संपत्तीचा साम्यवाद व स्त्रियांचा साम्यवाद यासंबंधी प्लेटोचे विचार स्पष्ट करा.

४) प्लेटोच्या तत्वज्ञ राजा ही संकल्पना स्पष्ट करा.

५) प्लेटोच्या आदर्श राज्याची कल्पना सटीक स्पष्ट करा.

६) प्लेटोच्या उपआदर्श राज्याची संकल्पना विशद करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) श्रुंगारपुरे अरविंद, समग्र भारतीय व पाश्चात्त्य राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) गर्दे दि. का., पाश्चात्य राजकीय विचार प्रवाह, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

३) डोळे ना. य., राजकीय विचारांचा इतिहास, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

○○○

घटक २

# ऑरिस्टॉटल

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ जीवन परिचय
- २.२.२ ऑरिस्टॉटलवरील प्रभाव
- २.२.३ ऑरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार
- २.२.४ ऑरिस्टॉटलचे क्रांतिसंबंधी विचार
- २.२.५ ऑरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार
- २.२.६ ऑरिस्टॉटल राज्यशास्त्राचा जनक
- २.२.७ ऑरिस्टॉटलचे गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार
- २.२.८ ऑरिस्टॉटलचे आदर्श राज्याविषयी विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासात आपल्याला

- ऑरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार स्पष्ट करता येतील.
- क्रांतिसंबंधी विचार स्पष्ट करता येतील.
- ऑरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचाराचा आढावा घेता येईल.
- ऑरिस्टॉटलचे राज्यशास्त्राचा जनक म्हणून केलेले विवेचन गुलामगिरी (दासप्रथा) विषयी विचार समजून घेता येतील.
- आदर्श राज्याविषयी ऑरिस्टॉटलचे मत जाणून घेता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

ग्रीक नगरराज्यात होऊन न गेलेला आणि राज्यशास्त्र या विषयाला शास्त्रीय रूप देणारा पहिला विचारवंत ऑरिस्टॉटल होय. ऑरिस्टॉटल यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणार आहोत. ऑरिस्टॉटल हा पाश्चिमात्त्य संस्कृतीचा व तत्त्वज्ञानाचा उदगाता मानला जातो. त्याने प्राचीन ग्रीकचे तत्त्वज्ञान शास्त्रशुद्ध पायावर उभारण्याची महत्त्वाची कामगीरी केली आहे. ऑरिस्टॉटल हा तत्त्वज्ञ राजा होऊ गेला. ऑरिस्टॉटल यानी राज्यासंबंधी विचार, राज्याचे वर्गीकरण, नागरिकत्व, क्रांतीसंबंधी विचार मांडून राज्यशास्त्राला एक वेगळीच कलाटणी देण्यात त्याचे महत्त्वाचे योगदान आहे.

## २.२ विषय-विवेचन :

### २.२.१ जीवन परिचय :

ऑरिस्टॉटलचा जन्म इ.स. पूर्व ३८४ मध्ये ग्रीसमधील स्टॅगिरा नावाच्या शहरी झाला. त्याचे वडील निकोमेक्स मॅसिडोनीयाच्या राजदरबारात राजवैद्य होते. राजघराण्याशी वडिलांचा संबंध असल्याने ऑरिस्टॉटलचे जीवन सुखी व संपन्न होते. इ. स. पूर्व ३६७ मध्ये ऑरिस्टॉटलने प्लेटोच्या ॲकॅडमीत प्रवेश केला. या ॲकॅडमीत ऑरिस्टॉटलने जवळपास २० वर्षेघालविली. त्या काळात प्लेटोची ॲकॅडमी एक नामांकीत विद्यापीठ म्हणून गाजले होते. या ॲकॅडमीत अध्ययनाबरोबरच अध्यापनाचे आणि व्यवस्थापक म्हणून ऑरिस्टॉटला प्लेटोच्या गैरहजेरीत काम करावे लागत असे. प्लेटो म्हणायचा की ऑरिस्टॉटल हा माझा आवडता शिष्य आहे. आपल्या शिष्याविषयी योग्यता प्लेटोला माहिती होती. प्लेटो म्हणतो ऑरिस्टॉटल म्हणजे विद्यापीठाचे मन असे तो नेहमी म्हणे तर ऑरिस्टॉटल ही आपल्या गुरूविषयी आदर, प्रेम, निष्ठा राखत होता. गुरू-शिष्याचे संबंध अधिक निकटचे व दृढ होते. प्लेटोच्या विचारांची त्यांच्या जीवनावरील छाप ही शेवटपर्यंत कायम होती. प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याला ॲकॅडमी सोडावी लागली. बारा वर्षेतो भ्रंमती करीत राहिला. जगजेत्या सिंकदराचा गुरू होण्याची त्याला सुसंधी मिळाळी परंतु त्यांची सिकंदरावर कोणत्याच प्रकारची छाप पडली नाही. इ. स. पूर्व ३४७ मध्ये प्लेटोच्या मृत्यूनंतर त्याने अथेन्स सोडले.

इ. स. पूर्व ३३४ मध्ये ॲरिस्टॉटलने अथेन्स येथे एक पाठशाळा सुरू केली. ती पुढे 'लायसिअस' या नावाने प्रसिद्ध झाली. प्लेटोच्या ॲकॅडमीचा अभ्यास करून या धर्तीवरच ॲरिस्टॉटलने ही शिक्षण संस्था स्थापन केली होती. सिंकदरच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. म्हणून त्यानी अथेन्स सोडले. ॲरिस्टॉटलचे ज्ञान एखाद्या ज्ञानकोषासारखे होते. त्याने अध्यात्म, नितीशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, शरीर विज्ञान, भौतिकशास्त्र, हवामानशास्त्र, खगोल शास्त्र, इत्यादी विषयावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. अशा या महान थोर ग्रीकवेत्याचा मृत्यू इ. स. पूर्व ३२२ मध्ये झाला.

**ग्रंथ संपदा :**

ॲरिस्टॉटलची प्रतिमा फार मोठी होती. त्याने जवळ –जवळ सर्वच विषयावर लिखाण केलेले दिसून येते. असा एकही विषय नाही त्याविषयी ॲरिस्टॉटलने लिखाण केलेले नाही. सर्वच विषयावर त्यांचे लिखाण उच्च दर्जाचे होते. ॲरिस्टॉटलने जवळ–जवळ चारशे ग्रंथ लिहिले आहेत. राज्यशास्त्राच्या दृष्टीने त्यांचे महत्वाचे ग्रंथ म्हणजे The Politics आणि The Constitution हे आहेत. ॲरिस्टॉटलचा ढहश झेश्रळींळली हा ग्रंथ जगप्रसिद्ध मानला जातो. हा ग्रंथ एकूण आठ विभागात विभागला आहे. या ग्रंथामध्ये राज्यव्यवस्थेचे स्वरूप विस्तृतपणाने वर्णन करण्यात आलेले आहे. या ग्रंथात वास्तविकता आढळते. त्याने १५८ राज्याच्या राज्यघटनांचा अभ्यास करून आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे या ग्रंथात तर्कशुद्धता दिसून येते. राज्यशास्त्र नितीशास्त्रापासून कशा प्रकारे भिन्न आहे या विषयी त्यामध्ये लिखाण करण्यात आले आहे. परंतु या ग्रंथामध्ये क्रमबद्धततेचा अभाव आढळून येतो. अनेक गोष्टी, घटनेवर पुन्हा–पुन्हा लिहिण्यात आल्या आहेत. या ग्रंथातील सुव्यवस्थीतपणा यांचा पण अभाव आढळून येतो. तर काही ठिकाणी विषय परिवर्तन झाले आहे. हा ग्रंथ अपूर्ण आणि अस्पष्ट असूनही जगभर प्रसिद्ध ठरला आहे.

ॲरिस्टॉटलचा राज्यशास्त्राच्या दृष्टीने दुसरा महत्वाचा ग्रंथ म्हणजे ढहश उेपीींळीीींळेप ेष अींहशपी (अथेन्सची राज्यघटना) होय. हा ग्रंथ लिहिण्याअगोदर ॲरिस्टॉटलने १५८ देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला आहे. या १५८ देशांच्या राज्यघटनेचा तुलनात्मक अभ्यास करून हा ग्रंथ लिहिला आहे. परंतु काळाच्या ओघात हा ग्रंथ नष्ठ झाला आहे. या ग्रंथाचा काही भाग उपलब्ध आहे. या ग्रंथातून ॲरिस्टॉटलचे वास्तवादी रूप आपणाला दिसून येते. ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथ लिखाणाच्या माध्यमातून जगात आपला प्रभाव निर्माण केलेला दिसून येतो.

## २.२.२ ॲरिस्टॉटलवरील प्रभाव :

कोणताही विचारंवत जेव्हा आपल्या मेहनतीने मोठा होतो तेव्हा त्यांच्यावर कोणत्या ना कोणत्या घटकाचा विचारांचा, परिस्थितीचा प्रभाव पडतो. अशाच प्रकारे ॲरिस्टॉटलवर ही प्रभाव पडलेला दिसून येतो. ॲरिस्टॉटलवर पहिल्यांदा त्यांच्या गुरूचा प्रभाव पडलेला दिसून येतो. ॲरिस्टॉटल प्लेटोच्या सहवासात कमीत कमी २० वर्षे होता. प्लेटोच्या विचारांचा प्रभाव मोठया प्रमाणात दिसून येतो. प्लेटोचा त्याच्या विचारावरील अशा स्वरूपाचा प्रभाव आहे. आदर्श नागरिक घडण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. मनुष्य सामाजिक जीवनाकडे वळला पाहिजे कमी लोकसंख्या असलेले राज्य हे आदर्श राज्य निर्माण होते. या प्रकारे प्लेटोचा

प्रभाव ॲरिस्टॉटलवर आढळून येतो. ॲरिस्टॉटलवर प्लेटोव्यतिरिक्त त्यांच्या वडीलांचा प्रभाव दिसून येतो. ॲथेन्सच्या राजकीय परिस्थितीचा प्रभाव आढळून येतो. ग्रीसमधील नगरराज्यांचाही प्रभाव आढळून येतो. ग्रीक संस्थानाचा प्रभाव आहे. अलेक्झांडरच्या सहवासाचा प्रभाव ॲरिस्टॉटलवर दिसून येतो.

### २.२.३ ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधी विचार :

ॲरिस्टॉटलने दि. पॉलिटिक्स ग्रंथातील पहिल्याच भागात राज्यासंबंधी विचार मांडले आहेत. राज्याची उत्पती, विकास, उद्देश, आणि स्वरूपासंबंधी विस्तृतपणाने विवेचन केले आहे.

**१) राज्याची निर्मिती :**

राज्याची निर्मिती ही मनुष्याच्या स्वभाविक गरजेतून निर्माण झाली आहे. मनुष्याच्या गरजा ह्या अनंत असतात. त्या सर्व गरजा एकटा माणूस पूर्ण करू शकत नाही. त्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर माणसांची मदत घ्यावी लागते. जसजशा माणसांच्या गरजा वाढत गेल्या तसतसे मानंवाचे परस्पर सहाकार्य वाढत गेले. स्त्री-पुरूष एकत्रीकरणातून कुटूंब निर्माण झाले. अशा प्रकारचे कुटूंब जेव्हा परस्परांच्या सहकार्याने वागू लागले तेव्हां गाव निर्माण झाले. गावाचा हळूहळू विस्तार होऊन शहर निर्माण झाले त्यातून नगरराज्य निर्माण झाले. मानवीविकास वाढत गेला आणि मानव आपल्या अंतिम ध्येयापर्यंत येऊन पोहचला. मानवाच्या भौतिक गरजांच्या पूर्ततेसाठी गाव असमर्थ ठरले. समाजांच्या नियमांची, नियंत्रणाची, संरक्षणाची गरज भासू लागली. यातूनच राज्यसंस्थेची निर्मिती झाली.

**२) राज्य ही नैसर्गिक संस्था :**

मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्याच्या उपक्रमातून निर्माण झालेले राज्य मनुष्याला सुखी, आनंदी, सन्मानीत, चांगले जीवन जगण्यासाठी सदैव अस्तित्वात राहणारी संस्था आहे तात्पर्य असे आहे की चांगले जीवन जगण्यासाठी राज्याची आवश्यकता असते. राज्याशिवाय मनुष्य पशूसारखे जीवन जगू शकतो असे ॲरिस्टॉटलचे मत आहे. मनुष्य हा बुद्धिवादी प्राणी आहे त्याच्या अंगी विचार करण्याची शक्ती आहे. ही शक्ती त्याला सामजिक आणि राजकीय जीवनातच प्राप्त होते.

**३) राज्य सेंद्रिय आहे :**

ॲरिस्टॉटलने राज्याला सेंद्रिय म्हटले आहे. मनुष्यात ज्या प्रकारचे गुण असतात त्या प्रकारचे गुण देखील राज्यात असतात. मनुष्याच्या शरीरात जसे निरनिराळे अवयव असतात तसेच राज्यातही निरनिराळे अवयव असतात. त्या सर्व अवयवाचे एकजीव रूप म्हणजे राज्य होय. राज्याचे सैन्य, कायदेविभाग, कार्यकारी विभाग, न्यायविभाग, शेतकरी, नागरीक, व्यक्ती समुदाय, गाव, शासक वर्ग हे राज्याचे वेगवेगळे अवयव आहेत. या सर्व अवयवांचा राज्याशी अविभाज्य संबंध असतो. ॲरिस्टॉटलने राज्य आणि मानवी शरीरात साम्य दर्शवून म्हटले आहे. राज्य मानवी शरीराप्रमाणे आहे.

**४) राज्य हे सर्वश्रेष्ठ समुदाय :**

राज्याच्या सत्तेला ॲरिस्टॉटलने सार्वभौम शब्द वापरला नाही. राज्याची सत्ता सर्वश्रेष्ठ असते एवढेच

त्यांनी म्हटले आहे. मनुष्याने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ठ प्रकारचे समुदाय निर्माण केले आहेत. समुदायांचे पहिले उद्‌दिष्ठ आहे की, जणतेचे कल्याण करणे ॲरिस्टॉटल राज्याला समुदाय मानतो. कारण इतर समुदांयाचे अस्तित्व राजयातच असते. राज्याशिवाय इतर समुदाय आपला उद्‌देश पूर्ण करू शकत नाही.

**५) राज्य विभीन्नतेत एकतेचे प्रतीक आहे :**

जशा प्रकारे भिन्न स्तरातून एका चांगल्या संगीताची निर्मिती होते. तसेच राज्याच्या विभीन्न अंगाच्या माध्यमातून एकात्मतेची निर्मिती होते. राज्यात विभीन्नता असणे आवश्यक आहे. भिन्नता नष्ठ करणे म्हणजे अत्यंत निकृष्ठ प्रतीचे राज्य निर्माण करणे हे होय. ॲरिस्टॉटलने राज्याला एकतेवर जास्त भर दिलेला आहे. काही बाबतीत नियत्रंण आणि इतर गोष्टीचे नागरीकांना स्वांतत्र्य दिले तर राज्यात एकता निर्माण होण्यास मदत होते.

**६) स्वावलंबन :**

ॲरिस्टॉटलच्या काळात नगरराज्य स्वावलंबी होते. राज्य अशी संस्था आहे की, ज्यात नागरिकांच्या इतर भौतिक सोई सुविधा पुरवल्याच पाहिजेत मनुष्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर काही संख्या कमी पडू लागल्यामुळेच राज्याची निर्मिती झाली. राज्याचे कर्तव्य आहे की मनुष्याचा सर्वच गरजाची पूर्तता करणे कारण राज्य ही सर्वश्रेष्ठ संस्था आहे.

**७) राज्याचा विकास :**

राज्याच्या विकासांच्या बाबतीत ॲरिस्टॉटलने तीन अवस्थाचे वर्णन केले आहे. एक रानटी अवस्था, दुसरी पशुपालन आणि शेवटची बौद्धिक अवस्था होय. या पहिल्या अवस्थेत मानव केवळ प्रजोत्पादन करून वंशावळ कायम ठेवणे हा रानटी अवस्थेचा गुणधर्म आहे. राज्याच्या विकासातील पहिली पायरी म्हणजे कुटूंबसंस्था होय. या अवस्थेत मानसाची कुटूंबे निर्माण केली. अनेक कुंटूंबातून ग्राम निर्माण झाले. राज्याच्या विकासाची दुसरी अवस्था म्हणजे पशूपालन अवस्था होय. गावचे जीवन सुखी समाधानी राहावे यासाठी नियमाची निर्मिती करण्यात आली. वेगवेगळ्या नियमांची निर्मिती या दुसऱ्या अवस्थेत करण्यात आली. राज्याच्या विकासाची तिसरी अवस्था म्हणजे बौद्धिक आवस्था होय. राज्य हे मनुष्याच्या बौद्धीक विकासांचे प्रतीक आहे.

**८) राज्याची उद्‌दिष्ट्ये (कार्ये) :**

ॲरिस्टॉटलच्या मते केवळ जगणे हा मनुष्याचा उद्‌देश नसून ते जीवन श्रेष्ठ प्रतीचे जीवन जगणे हा त्यांचा उद्‌देश आहे. हा मानवाचा उद्‌देश प्राप्त करून देणे हे राज्याचा उद्‌देश आहे. राज्य हे मानवी जीवनासाठी निर्माण झाले आणि चांगल्या जीवनाच्या पूर्ततेसाठी टिकून राहिले. मानवाला सद्‌गुणी बनविण्यासाठी राज्यांनी त्यांच्या नैतिक गुणांचा विकास करावा. राज्यांच्या कार्यातून मनुष्याला उच्च मूल्यांची प्राप्ती झाली पाहिजे. राज्याचे कार्य हे सकारात्मक आणि रचनात्मक दोन्ही स्वरूपाचे आहेत. मनुष्याला नैतिक बनवण्याची जबाबदारी राज्यांची आहे. राज्यांने मनुष्याला धर्मसुसंगत बनवावे. एखाद्याने दुसऱ्याच्या अधिकारात हस्तक्षेप रोखण्यापुरते राज्याने

कार्ये करू नये तर त्या मनुष्याच्या अंगी अपराधीपणाची वृत्ती बळावणार नाही, नष्ट होईल असे राज्यानी कार्ये करावे. ॲरिस्टॉटल म्हणतो मनुष्य म्हणजे गुण आणि दोषांचा समन्वय आहे. राज्याने मनुष्याच्या दोंषावर अंकूश ठेवावा. समाजात न्यायव्यवस्था प्रस्थापित करून मानवाला उच्च प्रतिचे जीवन कसे जगता येईल यासाठी राज्यांनी कार्ये करावे. राज्याला ॲरिस्टॉटलने समुदाय बनविले आहे. समुदायाप्रमाणेच राज्यानी कार्ये करणे ही मनुष्याची भावना आहे असे ॲरिस्टॉटल म्हणतो. राज्यामुळे मानवी जीवन सुसंस्कृत बनते. मानवी जीवन संकुचीत न होता ते विकसीत होते राज्याने नकारात्मक कार्यामध्ये केवळ नागरिकांच्या अधिकारात आक्रमण होऊ नये, आर्थिक गरजांची पूर्तता व्हावी याविषयी समाजात शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी न्यायाच्या उद्‌देशाने राज्याने कार्ये करावीत. ॲरिस्टॉटल राज्याच्या कार्याबाबत सकारात्मक कार्यावर जास्त भर देतो.

**ॲरिस्टॉटलचे राज्याचे वर्गीकरण :**

सामान्यपणे आजच्या काळात राज्याचे वर्गीकरण करणे शक्य नाही असा विचार प्रवाह आहे. राज्यांचे वर्गीकरण या विषयी ॲरिस्टॉटलवर प्लेटोच्या स्टेटसमन ग्रंथाचा प्रभाव आढळून येतो. राज्याच्या आवश्यक घटकाचा विचार केल्यास राज्य केवळ लहान आणि मोठे या दोन्हीतच वर्गीकरण करता येतो. ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाला समजावून घ्यायचे असल्यास तत्कालीन परिस्थितीला समजणे आवश्यक आहे. त्या काळात राज्य आणि शासन यात फरक केला जात नसे. त्यामुळे जी शासनाची कार्ये ती राज्याची कार्ये समजली जात असल्यामुळे दोन्ही शब्दाला समानार्थी मानण्यात येत असे. शासनाची सत्ता कोणाच्या हाती आहे. या आधारावर त्यानी राज्याचे वर्गीकरण केले आहे. ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण करण्यापूर्वी संविधानाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

**संविधानाचा अर्थ :**

ॲरिस्टॉटलने 'पॉलिटिक्स' या ग्रंथात विभिन्न संविधानाचे वर्णन केले आहे. त्यांच्या मते, ''संविधान म्हणजे अशा प्रकारची व्यवस्था ज्या द्वारे राज्यातील सार्वभौम सत्तेचे स्थान निश्चित होऊन ते नेमले कुठे आहे याचे ज्ञान होते. शासनाचे स्वरूप कसे आहे. शासनाचा उद्‌देश काय आहे शासनाचे कार्य हे ज्याद्वारे समजते ते संविधान होय''. संविधानाने राज्याची निर्मिती होते. त्यामुळे जेव्हा संविधानात बदल झाल्यास राज्यातही बदल होतो. तात्पर्य असे की, संविधानाला मात्र राज्याचे अंग मानत नाही तर संविधानात राष्ट्रीय एकात्मतेची अभिव्यक्ती असते. संविधानातील बदलाबाबत त्याचा अर्थ स्पष्ट करताना ॲरिस्टॉटल म्हणतो की, ''शासनाची सार्वभौम सत्ता ज्यांच्या हाती आहे अशा पदव्यवस्थेत परिवर्तन म्हणजे संविधानात बदल नाही तर त्यांचा परिवर्तनाचा अर्थ फार व्यापक आहे. त्याच्या मते समाजातील नैतीक, आर्थिक, सामाजिक मूल्यांमध्ये जेव्हा बदल होतो तेंव्हा संविधानात परिवर्तन झाले असे मानतो.'' याचाच आधार घेवून संविधानांचे वर्गीकरण करून राज्यांच्या वर्गीकरणाचे तो प्रतिपादन करतो. राज्याच्या वर्गीकरणाचे निकष ॲरिस्टॉटलने पुढील दोन घटकाच्या अधारे केले आहे.

**वर्गीकरणाचे निकष :**


**१) संख्यात्मक :**

संख्या तत्वाचा आधार घेताना ॲरिस्टॉटल म्हणतो की राज्यांतील सार्वभौम सत्तेचा वापर करण्याची संख्या किती आहे. या आधारावर राज्याचे प्रकार पाडले आहेत.

**२) गुणात्मक / उद्देशात्मक :**

गुणात्मक तत्व म्हणजे राज्याची सार्वभौम सत्ता वापरण्यामागील हेतू काय आहे. तसेच सत्ता वापरणाऱ्याचा हेतू कोणता आहे. सार्वभौम सत्ता वापरणाऱ्याचा हेतू स्वार्थी आहे की निस्वार्थी आहेत, यावरून राज्याचा उद्देश सार्वजनिक आहे की वैयक्तीक हित आहे हे यावरून लक्षात येते. तसेच यावरून राज्याचे शुद्ध आणि अशुद्ध प्रकार पाडले आहेत.

**राज्याचे वर्गीकरण :**




| | शुद्ध प्रकार | अशुद्ध किंवा भ्रष्ट प्रकार |
|---|---|---|
| १) एक व्यक्ती | राजेशाही / राजतंत्र | हुकूमशाही |
| २) काही व्यक्ती | हाजनसत्ता / कूलीन तंत्र | अल्पजनशाही / सरंजामशाही / धनिकतंत्र |
| ३) अनेक व्यक्ती | लोकशाही (समतोल) | लोकशाही (झुंडशाही) |

ॲरिस्टॉटलने संख्यात्मक व गुणात्मक तत्वाच्या आधारावर राज्याचे शुद्ध व अशुद्ध असे दोन प्रकार सांगितले आहेत अशा एकूण सहा प्रकारात राज्याचे वर्गीकरण केले आहे.

**अ) शुद्ध प्रकार :**

**१) राजेशाही :**

ॲरिस्टॉटलने राज्याच्या शुद्ध प्रकारात चांगले राज्य म्हणून राजेशाही यांचा समावेश केला आहे. राज्याचा हा सर्वात चांगला प्रकार आहे. शासनाची सत्ता एका व्यक्तीच्या हातात असताना राजा विवेक बुद्धिने निर्णय घेत असतो. त्यांचा उद्देश हा जणकल्याणाचा असतो सार्वजनिक हितासाठी चांगले निर्णय एका व्यक्तीला घेता येतात म्हणून राजेशाही हा शासनाचा प्रकार श्रेष्ठ दर्जाचा आहे.

**२) महाजनशाही :**

महाजनशाही हा राज्याचा शुद्ध प्रकार आहे. या प्रकारात राज्याची सार्वभौमसत्ता काही मोजक्या लोकांच्या हातात असते. त्या लोकांचा उद्‌देश हा चांगला असतो या शासन प्रकारातील काही लोकांच्या हातात सत्ता असलेले लोक निस्वार्थी व गुणी वृत्तीचे असतात. अशा व्यक्तींना राज्यव्यस्थेचा अधिकार वंशपरंपरेनुसार प्राप्त होऊ शकतो. महाजनशाहीत सार्वभौम सत्तेचा वापर जनतेच्या कल्याणासाठी केला जातो.

**३) लोकशाही :**

हा शासनाचा चांगला प्रकार आहे. सर्वसामान्य लोकांना सार्वभौम सत्तेमध्ये सहभागी करून घेतले जाते. या प्रकारात शासनाची सत्ता लोकांच्या हाती असते ते सर्व सुखी जीवनासाठी शासनाचे संचालन करतात जनकल्याण हा शासनाचा उद्‌देश असतो. जनतेचे जनतेसाठी आणि जनतेद्वारे चालविण्यात आलेल्या राज्याची ही अभिव्यक्ती आहे. त्यामुळे आपणच कायदे करणारे, आपणच कायद्याची अंमलबजावणी करणारे ती योग्य की अयोग्य आपणच तपासणारे त्याच्या यशापयशाची जबाबदारी आपल्यावरच असणारी ही जबाबदार शासनपद्धती आहे.

अशा प्रकारे शुद्ध किंवा चांगल्या राज्याचे तीन प्रकारात वर्गीकरण करण्यात आले आहे. यात महत्वाचे म्हणजे सत्तेचा उपयोग हा जनहित कल्याणासाठीच केला जातो. ज्या शासन पद्धतीत अशा प्रकारचा उद्‌देश असतो ती शासनपद्धती चांगली असते.

**ब) अशुद्ध प्रकार :**

**१) हुकूमशाही :**

हा राज्याचा अशुद्ध प्रकार आहे. शासनाची सार्वभौम सत्ता जेव्हा एका व्यक्तीच्या हातामध्ये असते तेव्हा ती व्यक्ती स्वार्थी वृत्तीची असते. स्वार्थाने तो शासन करतो. तेव्हा त्याला आपण हुकूमशाही असे म्हणतो. समाजहितापेक्षा वैयक्तीक हिताला प्राधान्य शासनकर्त्यामार्फत केले जाते. अशा शासनाच्या प्रकारात जनता सुखी-समाधानी जीवन जगू शकत नाही. जनतेचे सुख हा राज्याचा मुख्य उद्‌देश गमावल्यामुळे हा राज्याचा अशुद्ध प्रकार आहे.

**२) संरजामशाही किंवा अल्पजनशाही :**

महाजनशाहीला विकृत रूप प्राप्त होते तेव्हा सरंजामशाही किंवा अल्पजनशाही निर्माण होते. यामध्ये देखील शासनकर्त्याचा उद्‌देश स्वार्थ असतो. ज्या ज्या ठिकाणी स्वार्थी लोकांच्या हातात राज्य जाते मग ते संख्येने कितीही असो ते राज्य अशुद्ध प्रकारात मोडते. जनतेचे हित करणे त्याचे दुय्यम उद्‌देश असतो. जणकल्याणाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे यात सत्तेचा दुरूपयोग होतो. म्हणून सरंजामशाही हा राज्याचा प्रकार अशुद्ध आहे.

**३) लोकशाही (झुंडशाही) :**

हा अशुद्ध राज्याचा शेवटचा प्रकार आहे. ज्यावेळी शासनाची सत्ता सर्वच लोकांच्या हाती असते आणि या सर्वांचा उद्देश स्वार्थ सिद्ध करण्याचा असतो. तेव्हा सत्तेचा दुरूपयोग होऊन गोंधळ आणि अशांतता निर्माण होते. यामुळे समाजामध्ये आराजकता निर्माण होते. ज्याला जसे वाटेल तसे वागल्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था मोडकळीस येतो म्हणूनच या प्रकाराला झुंडशाही म्हटले आहे.

**राज्याचे परिवर्तनचक्र / राजकीय परिवर्तनाचे (क्रांतिचे) फिरते चक्र :**

ऑरिस्टॉटलने राज्याचे परिवर्तनाचे चक्र स्पष्ट केले आहे. राज्याच्या वर्गीकरणाचे स्पष्टीकरण केल्यानंतर राज्याच्या परिवर्तन कशा प्रकारे होते या विषयी विवेचन करण्यात आले आहे. शुद्ध आणि अशुद्ध यामध्ये राज्याचे प्रकार तेच आहेत नामसदृष्यामुळे दोन्हीमध्ये नेमके काय पाहिजे यामध्ये विचाराबाबत गोंधळ होऊ नये यासाठी ऑरिस्टॉटलने राज्याचे परिवर्तनचक्र स्पष्ट केले आहे. परिवर्तनाचा विचार करताना त्यांनी सत्तांतर तत्वाचा विचार केलेला आहे.

**परिवर्तनाचा अर्थ :**

राज्यातील परिवर्तन म्हणजे राज्यांचे चांगल्या प्रकारातून वाईट प्रकारात जाण्याची क्रिया होय. ही प्रक्रिया नेहमी चालू असते. म्हणून त्यानी त्याला परिवर्तन चक्र असे म्हटले आहे. राजेशाही हा राज्याचा शुद्ध प्रकार आहे. यामध्ये सत्तेचा वापर करणारा राजा हुशार, बुद्धीवान, गुणी असतो परंतु यातील सर्व राज्याचे राजे हे वरील प्रकारचे असतीलच असे नाही. तर राजा जुलमी, अन्यायी, स्वार्थी असेल तर राजेशाही या शुद्ध प्रकाराचे रूपांतर अशुद्ध हुकूमशाही प्रकारात होतो. राजेशाहीला विकृत स्वरूप प्राप्त होते या शासनाच्या पद्धतीला लोक कंटाळतात. अशा कंटाळलेल्या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी राज्यातील काही लोंक बुद्धिवान, हुशार, कुशाग्र लोक सार्वभौम सत्ता आपल्या हाती घेतात तेव्हा महाजनशाही हा शुद्ध प्रकार तयार होतो. या महाजनशाहीमध्ये सत्तेचा वापर करणारे लोक हे जनकल्याणासाठी वापर करतात तरच शुद्ध प्रकार टिकून राहातो. अन्यथा कालांतराने हे सत्ता वापरणारे लोक म्हणजे महाजनशाहीतील सत्ताधिश अन्यायी व स्वार्थी वागतात. यातून महाजनशाहीचे रूपांतर संरजामशाहीमध्ये होते. संरजामशाहीमध्ये सत्ताधीश वर्ग हा समाजाच्या हिताकडे दुर्लक्ष करून स्वहिताकडे कटाक्षाने लक्ष देत असतो. संरजामशाही हा अशुद्ध प्रकार आहे. यामुळे कालांतराने काही लोक या शासनाल्या प्रकाराला कंटाळून जातात. काही कालांतराने मग लोकशाही निर्माण होते. राज्याची सार्वभौम सत्ता अनेक व्यक्तीच्या हातामध्ये असते. या अनेक सत्ताधिश व्यक्ती ह्या समाजांच्या कल्याणसाठी, विकासासाठी कार्य करतात. समाजातील मनुष्याना उच्च दर्जाचे जीवन जगण्यासाठी कार्य करतात. हे कार्य करता-करता यामध्ये काही स्वार्थी निर्माण होते. मग स्वार्थ निर्माण झाला की काही कालांतराने लोकशाहीचे रूपांतर झुंडशाही चा अशुद्ध प्रकारात परिवर्तन होते. कालांतराने राज्यातील जनता लोकशाहीस (झुंडशाहीस) कंटाळते. अशा वेळी राज्यातील एखादी हुशार, तज्ञ, कर्तबगार व्यक्ती पुढे येऊन सत्ता प्राप्त करते तेव्हा राजेशाही निर्माण होते. अशा प्रकारे राज्याचे फिरतेचक्र हे सतत चालू असते.

**ॲरिस्टॉटलच्या राज्याच्या वर्गीकरणाचे परिक्षण / मूल्यमापन :**

ॲरिस्टॉटलने संख्यात्मक आणि गुणात्मक या दोन तत्वाच्या आधारे राज्याचे वर्गीकरण जे केले आहे परंतु त्यांच्या वर्गीकरणावर काही दोष आहेत ते पुढील मुद्यावरून करण्यात येते.

**१) शासनाचे किंवा राज्याचे वर्गीकरण :**

ॲरिस्टॉटलने केलेले वर्गीकरण राज्याचे नसून राज्यातील सरकारचे आहे. सरकार परिवर्तनीय असते. पण राज्य परिवर्तनीय नसते. ॲरिस्टॉटलने मात्र राज्य आणि शासन यात फरकच केला नाही वास्तविकता हा सरकार हा राज्याचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. सार्वभौमत्व नष्ट झाले तर राज्य नष्ट होते. त्यामुळे ॲरिस्टॉटलने शासनाचे वर्गीकरण करून राज्याचे वर्गीकरण असे म्हटले आहे.

**२) अपूर्ण वर्गीकरण :**

ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण हे पूर्ण नाही अशी टीका केली जाते. ॲरिस्टॉटलने या आधुनिक कालखंडातील शासनाचे जे प्रकार आहेत त्यांचा उल्लेख शुद्ध किंवा अशुद्ध या प्रकारात समावेश केला नाही. म्हणून ते वर्गीकरण अपूर्ण वाटते.

**३) संख्या तत्वावर भर :**

ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण करताना संख्येला आधार माणून राज्याचे प्रकार केले. गुणांना त्यानी ज्या प्रमाणात महत्व द्यायला पाहिजे होते त्या प्रमाणात महत्व दिलेले नाही. असा त्यांचा वर्गीकरणावर आक्षेप घेण्यात आलेला आहे.

**४) आधुनिक काळासाठी अनुपयुक्त / निरूपयोगी :**

ॲरिस्टॉटलने राज्याच्या वर्गीकरणात ज्या प्रकाराचा उल्लेख केला त्यापैकी अनेक प्रकार हे इतिहास जमा झाले आहेत. त्यामुळे आधुनिक काळात त्याचे वर्गीकरण उपयोगी नाही. आधुनिक काळातील शासनाचे प्रकार यामध्ये संसदीय, अध्यक्षीय, संघराज्यात्मक, एकात्म अशा वेगवेगळया शासनाचे प्रकार आहेत यांचा पण उपयोग ॲरिस्टॉटलने वर्गीकरणात करायला पाहिजे होता पण केलेला नाही अशाी एक टीका केली जाते.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या राज्याचे वर्गीकरण निर्दोष नाही. परंतु त्यामुळे त्यांच्या विचारांचे महत्व काय कमी होत नाही. ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण हे नगरराज्याच्या पार्श्वभूमीवर तपासणे अगत्याचे ठरेल. ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणाचा आधार घेतल्याशिवाय राज्याचे वर्गीकरण पूर्ण होत नाही. ॲरिस्टॉटलने संख्यात्मक व गुणात्मक तत्वाच्या आधारे राज्याची सार्वभौम सत्ता वापरणारी लोक कोणते व त्याना असलेले सरकार कोणते याविषयी उपयुक्त माहिती सार्वभौम सरकारांना व राज्यातील नागरीकांना मिळण्यासाठी उपयुक्त आहे. ॲरिस्टॉटलने दिलेले शाश्वत तथ्य हे आधुनिक शासनाची पारख होण्यास मदत होते. ॲरिस्टॉटलने राज्याचे केलेले वर्गीकरण हे शास्त्रशुद्ध व उपयुक्त अशा स्वरूपाचे आहे.

## २.२.४ ॲरिस्टॉटलचे क्रांतिसंबधी विचार :

ॲरिस्टॉटलने क्रांतिसंबधी विचांर 'पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या भागात विवेचन केले आहे. क्रांती म्हणजे काय? क्रांतीचे स्वरूप, कारणे, उपाय याविषयी वास्तववादी व मानसशास्त्रीय पद्धतीने विवेचन करण्यात आले आहे. शासनात वारंवार होणारे राजकीय परिवर्तन ही ॲरिस्टॉटलच्या काळातील ही नगरराज्याची फार मोठी समस्या होती. त्याचे कारणे शोधून त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी काही उपाय सूचविण्याच्या अनुषंगाने ॲरिस्टॉटलने क्रांतीसंबधी विचार मांडले आहेत. क्रांती हा राज्यसंस्थेला लागलेला रोग आहे. असे ॲरिस्टॉटल म्हणतो. तो रोग नाहीसा करण्यासाठी ॲरिस्टॉटलने उच्च दर्जाचा डोस देण्याचा प्रयत्न क्रांतीविषयक विचारातून केलेला आहे.

**क्रांतीचा अर्थ :**

ॲरिस्टॉटलच्या मते, क्रांती म्हणजे बदल होय. मग ते राज्यघटनेत असो किंवा सत्ताधारी व्यक्तीत असो. राज्यघटनेत किंवा सत्ताधारी व्यक्तीत बदल होणे म्हणजे क्रांती होय. राज्यघटनेच्या बदलामुळे राज्याच्या सामजिक, आर्थिक, प्रशासकीय, स्वरूपात बदल होतो. राज्यघटना तीच राहून सत्ताधारी व्यक्तीत बदल होतो त्यास क्रांती म्हणतात. सामान्यतः क्रांती ही बलपूर्वक होण्याच्या बदलाला म्हणतात. ॲरिस्टॉटलला या पेक्षा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. हे यावरून स्पष्ट होते. तो म्हणतो क्रांतीचे स्वरूप नेहमी सारखे नसते. म्हणून त्यांनी क्रांतीचे प्रकार सांगितले.

**क्रांतीचे प्रकार** :

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती होण्यासाठी पाच प्रकार स्पष्ट करण्यात आले आहेत. क्रांतीसाठी राज्यघटनेत पूर्णतः बदल किंवा अंशतः बदल होतो. यावरून क्रांतीचे प्रकार पाहता येतील.

**१) संपूर्ण क्रांती**

जुन्या राजकीय व्यवस्थेचे समुळ उच्चाटन करून नविन राजकीय व्यवस्था निर्माण होते किंवा जुनी राज्यघटना बदलून पुन्हा नवीन राज्यघटना तयार होते त्या बदलाला संपूर्ण क्रांती म्हणतात.

**२) आंशिक क्रांती**

संविधान जसेच्या तसे रहाणे संविधानातील एखाद्या भागात अल्पशा प्रमाणात बदल होणे म्हणजे अंशतः क्रांती होय.

**३) रक्तमय किंवा रक्तहिन क्रांती**

राजकीय व्यवस्थेत बदल करताना जेव्हा रक्तपात होतो किंवा हिसांत्मक मार्गाने सत्तेत बदल करावा लागतो त्या क्रांतीस रक्तरंजीत क्रांती म्हटले जाते. या उलट अंहिसेंच्या मार्गाने राजकीय व्यवस्थेत बदल केला जातो त्याला रक्तहिन क्रांती म्हणता येतो.

**४) व्यक्तीगत क्रांती**

एखाद्या जुलमी राज्यकर्त्यामुळे राज्यात अन्याय, अत्याचार वाढत असेल त्या विरोधात जनमत संघटीत होऊन संबंधीत राजाला पदावरून पाय उतार करणे म्हणजे व्यक्तीगत क्रांती होय.

**५) वैचारिक क्रांती :**

समाजास घातक असलेली प्रचलित विचारप्रणाली टाकून देऊन नवीन विचारप्रणाली स्वीकारणे यास वैचारिक क्रांती असे म्हणतात.

**क्रांतीची कारणे :**

ॲरिस्टॉटलने क्रांतीची विविध कारणे विशद केलेली आहेत. परिवर्तनाची कारणे शोधली यालाच क्रांतीचे कारणे म्हणता येईल तो म्हणतो क्रांती तीन कारणांनी होते. ॲरिस्टॉटलच्या क्रांतीच्या मीमांसाने त्यांचे ज्ञान किती सखोल आहे हे आपणाला स्पष्ट होते. क्रांतीचा मुख्य उद्देश हा अन्यायाविरूद्ध उठाव करणे हा असतो. क्रांतीचे प्रमुख तीन कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**अ) क्रांतीची सामान्य कारणे :**

प्रथम क्रांतीचा विचार मनुष्याच्या मनात निर्माण होतो. नागरीकांवर जर अन्याय निर्माण होत असेल तर त्या अन्यायाविरूद्ध उठाव करण्याचे निर्धार मनुष्याच्या मनामध्ये निर्माण होतो मग माणूस परिवर्तन घडवून आणतो. क्रांतीची सामान्य कारणे सांगताना मानसशास्त्रीय, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्टीकोणातून स्पष्ट करण्यात आलेली आहेत. राज्यात क्रांती घडून येण्यासाठी सामान्यतः पुढील घटक कारणीभूत आहेत.

**१) समानतेची आंकांक्षा**

हे क्रांतीचे मानसशास्त्रीय कारण आहे. समतेची आकांक्षा जागृत होणे हे क्रांतीचे प्रमुख अस्त्र आहे. राज्यात जेव्हा सामाजिक न्याय आणि असमानता नाकारली जाते तेव्हा क्रांती होते. समानतेची वागणूक न मिळाल्यास असमानता निर्माण होऊन जनतेत अंसतोषाची भावना निर्माण होते यातूनच क्रांती होते.

**२) आर्थिक विषमता**

आर्थिक विषमतेमुळे गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढत जाऊन श्रीमंत व्यक्ती गरीब व्यक्तीकडे तुच्छ नजरेने तर गरीब व्यक्ती श्रीमंत व्यक्तीकडे ईर्षा व सूडाच्या भावनेने पाहतात आपल्यालाही त्यांच्याप्रमाणे जीवन जगता यावे या भावनेतून क्रांती होते समाजामध्ये आर्थिक विषमतेची खोल दरी निर्माण झाल्यास क्रांती होण्याची भीती असते.

**३) दारिद्र्य**

दारिद्र्य हे क्रांतीच्या पाठीमागील सर्वात प्रमुख कारण आहे. लोकसंख्या वाढत जाते आणि उत्पादनाच्या साधनाना मर्यादा पडतात. राज्यात जनतेला उपासमारीची वेळ निर्माण होते. या उपासमारीच्या वेळेतून जनतेत अंसतोष निर्माण होतो. या जनतेच्या अंसतोषातून काही व्यक्ती बंडाचा मार्ग उपसतात यातूनही क्रांती होते.

**४) भिती**

राज्यातील निरनिराळ्या वर्गात परस्पराविषयी अविश्वासाची भावना वाढीस लागून संशयही बळावतो. यातून एका वर्गाला दुसऱ्या वर्गाविषयी भिती निर्माण होते. गुन्हेगारांना आपल्याला शिक्षा होईल अशी भिती वाटते म्हणून तो शासनव्यवस्थाच उलटून टाकण्याचा प्रयत्न करतो. किंवा भविष्यात आपल्यावर अन्याय होईल या भीतीने तो क्रांती करतो.

**५) पक्षपाती वर्तणूक**

प्रत्येक नागरीकाला राज्यकारभारात भाग घेण्याची समान संधी असावी असे वाटते. एकच गट सत्तेत असेल तर बाकीचे गट नाराज होतात. अशा प्रकारे सत्तेसाठी स्पर्धा सुरू होऊन त्यातून क्रांती होण्याची शक्यता असते.

**६) निष्काळजीपणा**

शासनाच्या निष्काळजीपणामुळे कधीकधी अयोग्य व्यक्तीची नियुक्ती महत्वाच्या पदावर होते. अशी व्यक्ती संधी मिळताच विद्रोह करून सत्ता आपल्या हाती घेते.

**७) अयोग्य मोबदला**

मनुष्याला योग्यतेप्रमाणे त्यांच्या कार्याच्या प्रमाणात जर मोबदला मिळाला नाही तर तो क्रांतीसाठी प्रवृत होतो.

**ब) क्रांतीची विशिष्ठ कारणे :**

ॲरिस्टॉटलने विविध शासनपद्धतीत क्रांतीची विशिष्ठ कारणे स्पष्ट केलेली आहेत.

**१) राजेशाहीतील क्रांती**

राजघराण्यातील कौटूंबीक भांडणे, परस्परात सत्तेसाठी स्पर्धा, परस्पर द्वेष तसेच जेव्हा राजा आपल्या प्रजेशी जुलमी वर्तन करतो, एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीचा अपमान करतो तेव्हा राजाविरूद्ध कटकारस्थान, बंडखोरी, विद्रोह होण्याची शक्यता असते.

**२) महाजनशाहीतील क्रांती**

महाजनशाहीत राज्याची सार्वभौम सत्ता काही लोकांच्या हातात असते. ते सत्ता आणि मानसन्मानाला पात्र होतात जेव्हा हे राज्यातील सामान्य जनतेला सहन होणार नाही तेव्हा ते क्रांतीसाठी प्रवृत्त होतात.

**३) अल्पजनशाहीतील क्रांती**

यामध्ये श्रीमंत पण स्वार्थी राज्यकर्ता जनतेवर जुलूम आणि अत्याचार करतो. राज्यकर्त्यांची लोभी महत्वकांक्षा आणि आपापसातील शत्रुत्व तसेच श्रीमंत लोक सत्तेसाठी सतत धडपडत असतात त्यामुळे जनहितांकडे दुर्लक्ष होऊन जनता क्रांती करण्यास प्रवृत्त होते.

**४) लोकशाहीतील क्रांती**

अनेक वेळा वक्तृत्वाची कला अवगत असलेले लोक सत्य असल्याचा आश्रय घेऊन लोकमत आपल्या बाजूने करून घेऊन जनतेच्या भावनेला आव्हान देऊन ते असंतोष पसरवितात आणि त्यातून क्रांती होते. प्रजा व जनता यामध्ये दुरावा निर्माण होऊन क्रांती निर्माण होते.

**५) हुकूमशाहीतील क्रांती :**

एकाच व्यक्तीच्या हाती सत्ता असल्याने स्वतःच्या स्वार्थासाठी सत्तेचा दुरूपयोग करून जनहिताकडे दुर्लक्ष केले जाते. जनतेस अन्यायी वागणूक देऊन बेजबाबदारपणे वागतात. अशा जुलमी राजवटीविरूद्ध जनता एकत्र येऊन क्रांती करते.

**क्रांती टाळण्याचे उपाय :**

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती ही राज्यातील जनतेसाठी धोकादायक आहे म्हणून ती टाळली पाहिजे. याचा अर्थ क्रांती होऊच नये असा नाही क्रांतीची कारणे दाखविण्यात ॲरिस्टॉटलची राजकीय परिपक्वता जेवढ्या मोठ्या प्रमाणात दिसून येते तेवढीच ती क्रांती टाळण्याचे उपाय सांगतानाही दिसून येते. वारंवार होणाऱ्या क्रांतीमुळे राज्यातील स्थैर्य नाहिसे होऊन राज्याच्या विकासात अडथळे निर्माण होतात. म्हणून क्रांतीची परिस्थितीच निर्माण होऊ नये यासाठी काही उपाय ॲरिस्टॉटलने सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे–

**१) कायदा व न्यायाबद्दल आदर :**

जनतेच्या मनामध्ये कायद्याबद्दल सार्वजनिक आदर व निष्ठा निर्माण करण्याचे प्रयत्न करावेत. जनतेत कायदा पालनाची सवय वाढीस लावावी. कायदे पालन केले तरच आपले हित साध्य आहे. कायद्याचा आदर केला तरच न्याय प्रस्थापित करता येतो म्हणून कायद्याचा भंग करणाऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षा करावी.

**२) शिक्षण :**

ॲरिस्टॉटलच्या मते क्रांती टाळण्याचा उत्तम उपाय म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामुळे राज्यातील नागरिकाला क्रांतीच्या गुण–दोषाची पारख करता येते. यामुळे लोकांत कर्तव्याची जाणीव निर्माण होते.

**३) सत्तेचे विकेंद्रीकरण :**

राज्याची सत्ता ही एकाच वर्गाच्या हाती केंद्रित होऊ नये सत्तेच्या केंद्रीकरणामुळे सत्ताधारी वर्ग भ्रष्ट बनतो. सत्ता ही मानसाला भ्रष्ट करते आणि निरकुंश सत्तेमुळे माणूस पूर्ण भ्रष्ट होतो. म्हणून मानव भ्रष्टाचारापासून मुक्त करायचा असेल तर सत्तेचे विकेद्रिंकरण करावे त्यामुळे क्रांती टाळता येईल.

**४) परिदृढ राज्यघटना :**

लवचीक राज्यघटना ही राज्याला अस्थिरतेकडे नेत असते. म्हणून राज्याच्या स्थैर्यासाठी व क्रांती टाळण्यासाठी राज्यघटना परिदृढ असली पाहिजे. राज्यघटना परिदृढ असल्यास राज्यघटनेत सहजा–सहजी बदल करावा अशी भावना जनतेच्या मनामध्ये निर्माण होणार नाही म्हणजे ती क्रांती टाळण्यासाठी उत्तम उपाय आहे.

**५) जागरूक शासन :**

राज्याचा शासक वर्ग आपल्या कर्तव्याविषयी नेहमी जागरूक असला पाहिजे. आपल्या राज्यातील हालचालीवर शासकाचे बारीक लक्ष असावे लागते. कोणकोणते गट शासकाच्या विरोधात कार्य करतात. गटबाजी कोण करतो, कोणते गट क्रांतीची तयारी करतात शासकाच्या विरूद्ध काही डावपेच आखले जातात का इत्यादी माहिती मिळवून त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजेत त्यासाठी शासक सतत जागरूक असले पाहिजे.

**६) पदाची समान वाटणी :**

राज्यातील विविध पदावर व्यक्तीची नेमणूक करताना समान तत्वाच्या आधारे व्यक्तीची पात्रता व योग्यता पहावी. जे अनेक वर्षापासून नोकरीसाठी वंचीत आहेत त्यांचापण विचार केला पाहिजेत. त्यामुळे राज्यातील नागरीक समाधानी राहतील.

**७) राज्यकर्त्याचे आदर्शवर्तन :**

राज्याची सत्ता भोगणाऱ्या राज्यकर्त्यानी आपले वर्तन साफ ठेवले पाहिजे. तो चारित्र्यसंपन्न असला पाहिजे त्यांच्या गुणामुळे जनतेत आदर्श निर्माण झाला पाहिजे. त्यानी निस्वार्थभावनेने आणि निःपक्षपातीपणे कारभार करून जनतेच्या मनात विश्वास संपादन करावा जेणे करून जनता क्रांतीचा मार्ग अंवलंबणार नाही.

**८) भ्रष्टाचाराला आळा :**

राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी व राज्यकर्तेयाना भ्रष्टाचार लाचलुचपत व वशिलेबाजी यापासून दूर राखले पाहिजे.

**९) परकीय आक्रमणाची भिती :**

जनतेचे लक्ष अंतर्गत प्रश्नापासून विचलीत करण्यासाठी व त्यांच्यात राष्ट्रभक्तीची भावना वाढीस लावून राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी अधून-मधून नागरिंकाना परकी य आक्रमणाच्या धोक्याची जाणीव निर्माण करून द्यावी म्हणजे जनता क्रांतीस प्रवृत्त होणार नाही.

**१०) संभाव्य संकटाची माहिती :**

राज्यातील लोकांना राज्यात येणाऱ्या संभाव्य संकटाची माहिती देऊन त्यांची मानसिक तयारी व येणाऱ्या संकटाला मात करण्याची तयारी करावी या विषयी त्यांना मार्गदर्शन राज्यकर्त्याकडून नागरीकांना मिळाले तर ते नागरिक क्रांती करण्यास प्रवृत्त होणार नाहीत.

थोडक्यात, ॲरिस्टॉटलने क्रांती का निर्माण होते तिचे कारणे आणि क्रांती टाळण्याचे उपाय सांगितले आहेत. ॲरिस्टॉटलच्या या क्रांतीविषयी विचारावरून त्यांच्या बुद्धिमतेचा आवाका आपणाला लक्षात येतो. ॲरिस्टॉटलने या विषय विचार मांडताना त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणी केली आहे. यांचा अभ्यास मानसशास्त्रीय, आर्थिक, सामाजिक, राजकीय अनुषंगाने उपयुक्त ठरतो. ॲरिस्टॉटलने क्रांतीविषयी कारणे व

उपाय सुचवून राज्यव्यवस्था कशा पद्धतीने पुढील वाटचाल करते यासाठी एक मार्गदर्शक विचार त्यानी दिलेली आहेत. जगातील आजपर्यंत ज्या क्रांत्या झाल्या आहेत त्या क्रांतीचे कारणे ही ॲरिस्टॉटलने सांगितली त्या क्रांतीची कारणे यात आपणाला सापडतात. म्हणून क्रांतीविषयी विचार सांगणारे एकमेव पाश्चात्य विचारवंत ॲरिस्टॉटल यांचे नाव घ्यावे लागते.

## २.२.५ ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार :

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासंबधी विचार 'द पॉलिटिक्स' या ग्रंथाच्या तिसऱ्या भागात विवेचन केले आहे. त्याच्या मते नागरिक म्हणजे राज्यातील सर्व जनता नसून राज्यकारभारात सहभागी असणारे लोक म्हणजेच नागरिक होय. नागरिकांचे मुख्य लक्षण शासन कारभारात भाग घेणे आहे. राज्य नागरीकांचे मिळून बनले असते. ज्याला राज्याच्या राज्यकारभारात भाग घेता येतो तो नागरिक नागरिक होण्यासाठी विशिष्ठ योग्यता असली पाहिजे ती योग्यता नैसर्गिक आहे. राज्याचे शासन चालविणे किंवा दुसऱ्याकडून चालवून घेणे अशी योग्यता असणाऱ्यालाच ॲरिस्टॉटल नागरिक मानतो.

**नागरिकत्वाचा अर्थ :**

नागरिक म्हणजे अशी व्यक्ती की जी न्यायशासनात आणि विधीनियमांच्या निर्मितीच्या कार्यात किंवा एका कार्यात भाग घेणारी व्यक्ती नागरिक ठरते.

ॲरिस्टॉटलच्या मते राज्यघटना ही नागरिकत्वाचा पाया आहे. राज्यघटना ही राज्यातील राज्यकारभाराच्या योजना, स्वरूप व पद्धती आणि कार्य स्पष्ट करते. तेंव्हा राज्यातील लोक हे राज्यघटनेच्या नियमाप्रमाणे राज्यकारभारात भाग घेतात तेच खऱ्या अर्थाने नागरिक ठरतात. ॲरिस्टॉटलच्या मते जे राज्याच्या विविध प्रकारानुसार नागरिकत्वाच्या विविध अटी निर्माण कराव्यात नागरिकत्वाच्या विविध अटी पूर्ण करून राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग घेतो त्यालाच नागरिक म्हणावे.

**नागरिकत्वाच्या अटी / पात्रता :**

ॲरिस्टॉटलने राज्यांतील व्यक्तीला नागरिकत्व प्राप्त होण्यासाठी काही अटी घालून दिलेल्या आहेत.

१) नागरिक होऊ इच्छीणारी व्यक्ती बुद्धमान, हुशार, शिक्षित असली पाहिजे.

२) संपत्तीनुसार नागरिकत्व द्यावे.

३) सामाजिक संस्थेच्या सभासदांना नागरिकत्व द्यावे.

४) राज्यकारभारात भाग घेण्याची क्षमता असणाऱ्यांना द्यावे.

५) ज्यांच्या अंगी संयम, शौर्य, न्याय, उदारता असणाऱ्यांना द्यावे.

६) भौतिक विवेचनेपासून मुक्त असलेल्यांना नागरिकत्व द्यावे.

**नागरिकत्वाची अपात्रता :**

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासाठी जे अटी घालून या अटीच्या निकषेनुसार जशी पात्रता सांगितली आहे.

त्याचप्रमाणे काही अटीच्या धर्तीवर राज्यातील व्यक्तींना नागरिकत्व देता येणार नाही या आधारावर त्यानी अपात्रता सांगितली आहे. ती नागरिकत्वाची अपात्रता पुढील प्रमाणे

१) जन्मावरून नागरिकत्व देऊ नये.

२) भूमितत्व या तत्वामुळे नागरिकत्व देऊ नये.

३) परकीयांना नागरिकत्व देऊ नये.

४) गरीब, कामगार यांना नागरिकत्व देऊ नये.

५) स्त्रियांना नागरिकत्व देऊ नये.

६) घरगुती कामे करणाऱ्या मुलांना नागरिकत्व देऊ नये.

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाच्या पात्रता आणि अपात्रता सांगून जो राज्यकारभारात भाग घेतो त्याला नागरिक म्हणावे असे सांगितले. कायदेनिर्मिती, कायद्याची अंमलबजावणी, न्यायदान, प्रशासन इत्यादी क्षेत्रात व्यक्तीला जेव्हा राज्यकारभारात संधी मिळते आणि ती व्यक्ती मिळालेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडते तिचा समावेश नागरिकत्वात केला जावा. ॲरिस्टॉटलचे गुण हे नगरराज्यांचे होते. त्यामुळे त्यांनी नागरिकत्वाची केलेली व्याख्या संकुचीत आहे त्यांच्यामते नागरिकत्व हा विषेश गुण आहे कारण त्यासाठी विशेष योग्यता लागते. शासनकार्यात सक्रिय भाग घेण्यासाठी बुद्धी आणि नैतिकतेच्या विशिष्ठ पातळीची आवश्यकता लागते. राज्यात राहाणाऱ्या प्रत्येक नागरिकांची पातळी ही वेगळी असते. त्यांच्याजवळ एवढी क्षमता नसते. त्यामुळे बहुसंख्य वर्ग नागरिकत्वाच्या अधिकारापासून वंचित राहातो. ॲरिस्टॉटलच्या मते नागरिकत्व म्हणजे हक्काची मिळणारी हमी नाही तर राज्याची सेवा करण्याचा तो एक प्रकार आहे. राजकीय हक्क उपभोगणाऱ्या समुहाला त्याने नागरिकत्वाच्या कक्षेत घेतले आहे.

थोडक्यात ॲरिस्टॉटलच्या मते ग्रामसभेचा सदस्य म्हणून कायदा निर्मिती प्रक्रियेत सहभाग होणारा आणि राज्याच्या घडामोडीत सक्रिय सहभाग नोंदवणारा व्यक्ती म्हणजे नागरिक होय.

**नागरिकत्वाच्या विचाराचे परिक्षण :**

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वाचा विचार हा आदर्शाच्या दृष्टीकोणातून केला असला तरी त्याच्या विचारावर पुढील प्रमाणे टीका करण्यात येते.

**१) संकुचित विचार**

ॲरिस्टॉटलची नागरिकत्वाविषयी जो अर्थ सांगितला तो संकुचित स्वरूपाचा वाटतो. ग्रीक नगर राज्यात योग्य असली तरी ती आधुनिक काळात अयोग्य वाटते. यामुळे नागरिक व प्रजा यामध्ये फरक करणे कठीण जाते.

**२) समतेविरोधी**

नागरिकत्वाचा दर्जा ठराविक लोकांना दिला आहे. त्यामुळे राज्यातील नागरिकांना विषमता पहायला

मिळाली. स्त्रियांना, कामगाराना, गुलांमाना नागरिकत्व यापासून वंचीत ठेवले आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष, गरीब, श्रीमंत, कामगार, भांडवलदार अशी विषमता निर्माण झाली आहे.

**३) चूकीचे निकष**

राज्यकारभार करणाऱ्यास पात्र नागरिक ठरविले आहे. परंतु ही पात्रता कशी निश्चित करावी याबाबत अस्पष्टता दिसून येते. तसेच स्त्रिया, गुलाम, गरीब, कामगार हे गुणवान, बुद्धिवान नसतात हा विचारच चूकीचा वाटतो.

**४) कर्तव्यावर भर**

ॲरिस्टॉटलने नागरिकत्व बहाल करताना राज्यातील व्यक्तीच्या हक्कावर भर न देता त्यांच्या कर्तव्यावर भर दिलेला दिसतो. व्यक्तीने राज्यकारभारात भाग घेण्यासाठी त्यांच्या अंगी विशिष्ठ गुण असणे आवश्यक आहे.

**५) श्रीमंताना नागरिकत्व**

ॲरिस्टॉटलने श्रीमंत लोकांना नागरिकत्व देताना तो हुशार, बुद्धीमान, कुशाग्र आहे किंवा नाही याचा विचार केलेला नाही.

थोडक्यात, ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वाच्या विचारावर टीका होत असली तरी आदर्श नागरिक म्हणजे आदर्श राज्य हा त्याचा विचार महत्वाचा व प्रभावी वाटतो. ॲरिस्टॉटलने त्या काळातील नगरराज्याच्या परिस्थितीनुसार विचार मांडलेला आहे.

### २.२.६ ॲरिस्टॉटल राज्यशास्त्राचा जनक :

पाश्चात्य देशात राजकीय तत्वज्ञानाची सुरूवात झाली. त्यामध्ये प्लेटो, ॲरिस्टॉटल सारख्या महान विचारवंताची भर पडली. ग्रीक राजकीय विचारवंतानी राज्यशास्त्रासाठी फार मोठे योगदान दिले आहे. ॲरिस्टॉटलची प्रज्ञा प्लेटोप्रमाणे विशुद्ध, तार्कीक विचाराची इमारत बांधणारी प्रज्ञा नाही. ती वास्तववादी व शास्त्रीय स्वरूपाची प्रज्ञा आहे व त्यातच ॲरिस्टॉटलचे वेगळेपण दिसून येते. प्लेटोनी राज्यशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून कधीच संबोधले नाही किंवा तसा प्रयत्नही केला नाही. नितीशास्त्राचा भाग म्हणून राज्यशास्त्राचा विचार केला त्याने प्लेटोच्या बाबतीत शास्त्रज्ञांची कसोटी लावता येत नाही. कारण प्लेटोचे विचार कल्पनेवर आणि आदर्शावर आधारित आहेत. ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राला वेगळे शास्त्र स्वतंत्र शास्त्र म्हणून संबोधले आहे. शास्त्र म्हणजे एखाद्या ज्ञानाच्या शाखेची सुंत्रबद्ध मांडणी होय. शास्त्रज्ञ नेहमी वास्तववादी दृष्टीकोणातून विचार करतो. शास्त्रज्ञाला आदर्शवादात रस नसतो. त्याला आदर्शवाद महत्वाचा वाटत नाही. ॲरिस्टॉटलच्या तत्वज्ञानात वास्तवतेवर भर, शास्त्रियतेवर भर दिलेला दिसतो. ॲरिस्टॉटल हा शास्त्रज्ञाच्या कसोटीला उतरणारा विचारवंत आहे म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक म्हणून संबोधले जाते. ॲरिस्टॉटलच्या वास्तववादी राजकीय दृष्टीने आणि त्यांच्या सुत्रबद्ध विचाराने राज्यशास्त्राची पायाभरणी झाली. राज्यशास्त्राला नितीशास्त्रापासून

वेगळे करून स्वंतत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळवून दिली. त्याला राज्यशास्त्राचा जनक मानण्याची महत्वाची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) शास्त्रीय दृष्टीकोण**

ॲरिस्टॉटलचा राज्यशास्त्राचा अभ्यास करण्याचा दृष्टीकोण हा शास्त्रीय स्वरूपाचा होता. ॲरिस्टॉटलची अभ्यास पद्धती निरिक्षण करून माहिती गोळा करण्याची आणि मिळालेल्या माहित्यांच्या आधारे नविन सिद्धांत प्राप्त करण्याची होती. कोणताही सिद्धांत मांडण्यापूर्वी त्यांनी तत्कालीन राजकीय संस्थाचा सखोल अभ्यास केला. अभ्यासासाठी त्यांनी शास्त्रीय पद्धतीने माहिती गोळा केली. त्याने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून शास्त्रीय निष्कर्ष काढले. त्यांनी काढलेले निष्कर्ष प्राप्त माहितीवर आधारित असल्यामुळे तो पहिला शास्त्रीय विचारवंत मानला जातो. शास्त्राचे दोन प्रकारात वर्गीकरण करतो एक सैद्धांतिक शास्त्र तर दुसरे व्यावहारिक शास्त्र यामध्ये राज्यशास्त्राचा समावेश व्यावहारिक शास्त्रात करतो.

**२) वास्तववादी, व्यवहारवादी विचारवंत**

राज्यशास्त्राच्या अभ्यासाला ॲरिस्टॉटलने नविन दिशा दिली त्याचा महत्वाचा गुण म्हणजे समतोल किंवा सुवर्णमध्य साध्य करण्याचा प्रयत्न आणि संतुलित विचार होय. त्यांचा विश्वास होता की मनुष्य केवळ कल्पनेवर किंवा आदर्शावर जीवन जगू शकत नाही त्यांच्या गरजापूर्ण होणे आवश्यक आहे. ॲरिस्टॉटलने प्लेटोच्या साम्यवादावर टीका करून कुटूंब संस्थेचे आणि मालमत्तेचे जोरदार समर्थन केले. गुलामगिरीचे समर्थन व्यवहार वादातून केले आहे. वास्तववादी आणि व्यवहारवादी स्वीकारणारा तो पहिला विचारवंत असल्यामुळे तो राज्यशास्त्राचा जनक आहे.

**३) तुलनात्मक पद्धतीचा स्वीकार**

राजकीय घटनांचा विचार करताना त्याने तुलनात्मक पद्धतीचा अवलंब केला. त्याने अनेक देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करून तुलनात्मकरित्या कोणती पद्धती आदर्श ठरू शकते याचे स्पष्टीकरण केले. तुलनात्मक पद्धतीचा वापर आजही शास्त्रीय पद्धत म्हणून केला जातो. ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण हे विचार तुलनात्मक अभ्यास पद्धतीनेच मांडले आहेत. तुलनात्मक पद्धतीसाठी त्याने प्रचलित पद्धतीचा आणि आदर्श ठरू पाहणाऱ्या पद्धतीचा अभ्यास करून सिद्धांत प्रतिपादन केला. त्याची अभ्यासपद्धती पूर्णपणे शास्त्रीय होती. त्याने १५८ देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून ॲथेन्सची राज्यघटना हा ग्रंथ लिहिला आहे.

**४) राज्यशास्त्राला स्वतंत्र दर्जा**

ॲरिस्टॉटल पूर्व राज्यशास्त्राचा अभ्यास हा नितीशास्त्रातून केला जात असे. प्लेटोनी पण राज्यशास्त्र हा नितीशास्त्राचा एक भाग मानला होता. ॲरिस्टॉटलने मात्र नितीशास्त्रापासून अलग करून राज्यशास्त्राला पहिल्यांदा शास्त्र म्हणून दर्जा मिळवून दिला. राज्यशास्त्र हे स्वंतत्र शास्त्र आहे म्हणून त्यांचा अभ्यास करण्यात येऊ लागला राज्यशास्त्राचा अभ्यास हा स्वंतत्र शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारा पहिला शास्त्रज्ञ आहे म्हणून त्याला राज्यशास्त्राचा जनक मानतात.

**५) अनुभवजन्य पद्धती**

ॲरिस्टॉटलने १५८ राष्ट्राच्या राज्यघटनांचा अनुभव पद्धतीने अभ्यास केला. अनुभवजन्य पद्धती म्हणजे एखादी गोष्ट कशी असावी हे पाहण्याऐवजी एखादी गोष्ट कशी आहे या पद्धतीने विचार करणे होय. प्लेटोने कसे असावे या पद्धतीने राजकीय विचार प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलने कसे आहे या पद्धतीने विचाराचे प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्य शक्य आहे या अनुषंगाने विचार अनुभवजन्य पद्धतीने केले आहे.

**६) तत्वज्ञांची सुत्रबद्ध मांडणी**

ॲरिस्टॉटलने नवीन तत्वज्ञान सांगितले नाही तर प्रचलित तत्वज्ञाला सूत्रबद्ध पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला. काळाच्या अनुभवावर त्याला विश्वास होता इतिहासाला त्यानी अभ्यासाचा विषय बनविला. काळाच्या अनुभवाला दुर्लक्षीत करू नये असे त्याचे मत होते. त्याला संस्कृती, प्रथा, परंपरेबद्दल आदर होता. अशा प्रकारे नवीन आदर्शवादी तत्वज्ञान निर्माण करण्याऐवजी त्याने प्रचलित ज्ञान सुसंघटीत स्वरूपाचा मांडण्याचा प्रयत्न केला. म्हणून तो राज्यशास्त्राचा जनक आहे.

**७) कायद्याचे सार्वभौमत्व**

ॲरिस्टॉटलने कायद्याच्या अधिराज्यांची आणि सार्वभौमत्वाची कल्पना स्पष्ट केली आहे. तो म्हणतो की मनुष्य कितीही बुद्धिमान असला तरी त्यांचे ज्ञान कायद्यापेक्षा श्रेष्ठ असूच शकत नाही. यामध्ये प्लेटो कायद्यापेक्षा मनुष्याच्या बुद्धिवर विश्वास ठेवतो. मनुष्याची बुद्धी भ्रष्ट होईल तिला नियंत्रीत आणण्यासाठी कायद्याची आवश्यकता आहे असे प्लेटोला वाटत नाही. कायद्याची अधिसत्ता असल्यास व्यक्तीची हुकूमशाही प्रस्थापित होऊ शकत नाही. यासाठी ॲरिस्टॉटलने कायद्याचे सार्वभौमत्वाची कल्पना मांडली.

**८) राजकीय संस्थांना आर्थिक आधार**

ॲरिस्टॉटल म्हणतो की, संपत्तीच्या वाटपावर शासनाचा दर्जा आणि प्रकार अवलंबून असतो. याचे स्पष्टीकरण ॲरिस्टॉटल यांनी दिले आहे. राज्यातील लोकांच्या व्यवसायांवर आणि उदयोगधंद्यावर त्यांचा राजकीय कल आणि क्षमता अवलंबून असते. आर्थिक विषमतेतून राज्यात क्रांती होते आजही त्या विचाराची प्रचिती दिसून येते हा विचार ॲरिस्टॉटलचा वास्तववादी स्वरूपाचा वाटतो.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्राची मोठी सेवा केली आहे. राजकीय विचारांच्या इतिहासात अग्रस्थानाने ॲरिस्टॉटलचे नाव घेता येते. प्लेटोच्या तत्वज्ञानाला सामान्य माणसाच्या आवाक्यात आणण्याचे महत्वाचे योगदान दिले आहे. वास्तविक राज्यशास्त्राची सुरूवात खऱ्या अर्थाने ॲरिस्टॉटलपासून होते. त्यांचा झेश्रळीींळली हा ग्रंथ शासनाच्या शास्त्रावर आधारित आहे. त्यांचे विचार शास्त्रीय, वास्तववादी, अनुभवजन्य, व्यवहारवादी स्वरूपाचे आहेत त्याला विश्लेषणात्मक आधार आहे. वर्तमान काळात देखील त्यांचे राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी मार्गदर्शनाच्या आधारभूत तत्वासारखे आहे. प्लेटोच्या आदर्शवादाला नाजूक वळण देण्याचे कार्य ॲरिस्टॉटल करतो. थोडक्यात ॲरिस्टॉटलचे तत्वज्ञान त्याला राज्यशास्त्राचा जनक ठरवतात.

## २.२.७ ॲरिस्टॉटलचे गुलामगिरी (दासप्रथा) संबंधी विचार :

ॲरिस्टॉटलने गुलामगिरीविषयी विवेचन "Politics' ग्रंथाच्या पाचव्या भागात केले आहे. ॲरिस्टॉटल वास्तववादी विचारवंत असून देखील तो तत्कालीन प्रथेद्वारे प्रभावित झाला होता हे त्यांच्या गुलामगिरीच्या विचारातून स्पष्ट होते. गुलामगिरी ही नगरराज्यांचे महत्वाचे वैशिष्ट्ये होय. प्रत्यक्ष व्यवहारात तर गुलामगिरी होतीच पण वैचारिक क्षेत्रात देखील ग्रीक विचरकांनी गुलामगिरीचे समर्थन केले आहे. अशाच पद्धतीने ॲरिस्टॉटलने देखील कोणत्याच प्रकारचे संकोच न करता गुलामगिरीचे समर्थन करून त्यामध्ये काही सुधारणा करण्याच्या प्रयत्नाने गुलामगिरी विषयी विचार मांडतो.

गुलामगिरी ही नैसर्गिक असून गुलामाने गुलाम म्हणून जीवन जगणे त्यातच त्यांचे हित आहे. जमिनीची मालकी वरिष्ठ वर्गाकडे असली तरी जमिन करण्याचे काम मात्र गुलामच करत होते. गुलाम ही राष्ट्राची संपत्ती मानली जात असे त्यांच्या श्रमावर सर्व देशांचा चरितार्थ चालत असे गुलाम हा कुटूंबसंस्थेचा अविभाज्य अंग असून गुलाम हे कुटूंबाची संपत्ती आहे हे सांगून ॲरिस्टॉटलने गुलामगिरी सिद्धांताचे दोन तत्व सांगितले आहे.

**१) नैसर्गिक असमानता** : ॲरिस्टॉटलच्या मते प्रत्येक मनुष्यात निसर्गतः वेगवेगळे गुण कमी अधिक असतात. त्यामुळे प्रत्येकाची बुद्धी निसर्गतः वेगवेगळया प्रकारची असते.

**२) जन्मत** : अंतर असते : ॲरिस्टॉटल म्हणतो की, काही लोक जन्मतःच शासन करण्यास योग्य असतात आणि काही लोक शासित होण्यासाठीच जन्मलेले असतात.

**गुलामगिरीच्या समर्थनांचे आधार**

**१) नैसर्गिक आधार**

मनुष्यामध्ये नैसर्गिक दृष्ट्या असमानता असते काही लोक जन्मतःच बुद्धिमान असतात आणि काही मूर्ख असतात. मनुष्यातील नैसर्गिक असमानताच गुलामगिरीचे मूळ आहे. त्यांच्या मते विषमता हा निसर्गता नियम आहे. श्रेष्ठांचे कनिष्ठावर शासन हा नैसर्गिक नियम आहे. या दोन वर्गातील लोकांत निसर्गाने शारीरिक व मानसिक शक्तीमध्ये भेद केला आहे. बुद्धिमान व्यक्तीने मालक होऊन आज्ञा द्याव्यात तर बुद्धीहिन व्यक्तीनी मालकांने दिलेल्या आज्ञा पाळाव्यात त्यांचा जन्म आज्ञा पालनासाठीच झाला आहे.

**२) गुलामगिरी गुलामांच्या हितांची**

गुलाम हे जन्मतःच बुद्धिहिन असल्याने त्यांनी मालकांच्या मार्गदर्शनाखाली राहाणे योग्य असते. कारण त्याना स्वतंत्र बुद्धी नसल्याने ते आपल्या योग्य दिशेने विकास करत नाहीत आणि त्यांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना रोजगार मिळणार नाही. मालकांचे त्याना संरक्षण हवे असते म्हणून गुलामगिरी ही गुलामांच्या हितांची आहे. याविषयी ॲरिस्टॉटल म्हणतो की, गुलामांने गुलामगिरीतच आपली धन्यता मानावी तरच त्यांचे कल्याण होईल अन्यथा त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. हे टाळण्यासाठी गुलामाने गुलामासारखे राहाणे हे त्यांच्या हितांच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

**३) गुलामगिरी मालकाच्या / समाजाच्या हितासाठी**

गुलामगिरीचा फायदा मालकांना व समाजाना होतो. जो शासक वर्ग संपूर्ण वेळ बौद्धिक कार्यात खर्च करतो त्याचा लाभ समाजाला निश्चित होतो. आपल्या निर्जिव संपत्तीवर श्रम खर्च करून उत्पादन वाढवण्यासाठी मालकांकडे गुलाम असल्याने गुलामांच्या कष्टातून त्याना पैसाही मिळतो व काम नसल्याने त्याना शासन करण्यासाठी वेळही मिळतो मिळालेल्या वेळेत मालकवर्ग चांगल्याप्रकारे समाजाची सेवा करू शकतील समाजांच्या कल्याणांसाठी त्याची आर्थिक आवश्यकता असते.

**४) स्थैर्य आणि आर्थिक सुधारणेसाठी**

ॲरिस्टॉटल व्यवहारवादी विचारक होता त्याने दासप्रथेच्या समर्थनासाठी व्यवहारवादी दृष्टीकोणातून विचार केला आहे. त्यांच्या मते राज्यातील गुलामगिरी नष्ट झाली तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे देशात अस्थिरता निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून ॲरिस्टॉटलने गुलामगिरी ही राज्याला स्थैर्य व आर्थिक उन्नती करून देते.

**५) कुटूंब संस्थेचा मूलभूत घटक**

कुटूंब संस्थेच्या अस्थित्वासाठी गुलाम आवश्यक असतात. गुलाम ही कुटूंबाची संपत्ती असते. गुलाम नसेल तर निर्जिव संपत्तीवर श्रम कोणी करावयाचे त्यामुळे उत्पादन होणार नाही. गुलाम आपल्या श्रमातून उत्पादन करतो व त्यावरच कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत असतो.

**गुलामाचे प्रकार :**

**१) नैसर्गिक गुलाम** : जन्मतःच बुद्धिहिन असलेले व्यक्ती

**२) कायदेशीर गुलाम** : युद्धात जिंकले गेल्यामुळे गुलाम व्हावे लागलेल्या व्यक्ती.

**गुलामगिरीबद्दल ॲरिस्टॉटलने केलेल्या सूचना :**

१) गुलामगिरी प्रथा वंशपरंपरेने चालणार नाही.

२) गुलामांच्या बुद्धिमान मुलांना गुलामगिरीची वागणूक दिली जाणार नाही.

३) मालक वर्गाने गुलामाची पिळवणूक करू नये.

४) मालक वर्गाने गुलांमाचा फायदा करून द्यावा.

५) गुलामांची संस्था मर्यादित असावी.

६) गुलामगिरीकडे एक सामाजिक गरज म्हणून बघितले जावे.

७) गुलामगिरी ही कुटूंबसंस्थेचा आधार आहे.

८) गुलामगिरी ही राष्ट्राची संपत्ती आहे.

९) गुलामगिरी ही नैसर्गिक आहे.

१०) गुलामगिरी ही मालकाच्या व समाजाच्या हिताची आहे.

**गुलामगिरीवरील टीका**

१) गुलामगिरी नैसर्गिक असते हे असत्य.

२) बुद्धिवान व बुद्धिहिन ओळखण्याची कसोटी नाही.

३) प्राकृतिक समानतेकडे दुर्लक्ष.

४) गुलामाशी मैत्रीपूर्ण व्यवहार या विषयी अस्पष्ट मत

५) अधिकार आणि स्वातंत्र्य नाकारणे म्हणजे मानवतेचा अपमान आहे.

६) समाजाचे मालक आणि गुलाम असे विभाजन अयोग्य.

७) गुलामगिरीचे विचार हे निरंकुशतेकडे वाटचाल करणारे आहेत.

८) एकीकडे गुलामगिरीचे समर्थन तर दुसरीकडे पात्रता सिद्ध केल्यास त्यातून त्याची मुक्तता हा विचार परस्पर विरोधी वाटतो.

ॲरिस्टॉटलने गुलामगिरीच्या समर्थनासाठी तर्काचा आधार घेऊन स्पष्टीकरणाचा प्रयत्न केला आहे. पण ॲरिस्टॉटलसारख्या तत्वज्ञाने गुलामगिरीसारख्या अनैसर्गिक, अस्वाभाविक अमानुष पद्धतीचे समर्थन करावे ही खरोखर खेदाची गोष्ट आहे.

**२.२.८ ॲरिस्टॉटलचे आदर्श राज्यासंबधीचे विचार :**

प्लेटोप्रमाणे ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यासंबधी विचार त्यांच्या झेश्रळींळली या ग्रंथाच्या पाचव्या भागात मांडले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते सनदशीर मार्गाने कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करणे म्हणजे आदर्श राज्य होय. आदर्श राज्यात सार्वभौमत्व कायद्याच्या ठिकाणी असावे, कोणत्याही व्यक्तीच्या ठिकाणी नसावे. प्लेटोनी उप आदर्श राज्याची जी वास्तववादी व व्यवहारवादी कल्पना मांडली त्याप्रमाणेच ॲरिस्टॉटलनेही आदर्श राज्याची कल्पना प्रत्यक्षात व्यवहारात आणण्यासाठी व्यवहारवादी विचार मांडलेले आहेत. ॲरिस्टॉटलच्या मते राज्याचे मुख्य ध्येय म्हणजे प्रजेचे हित करणे होय. ज्या राज्यात नागरिकांना सर्वश्रेष्ठ सुख मिळते आणि त्यांचे राज्यातील जीवन समाधानी असते. त्या राज्याला आदर्श राज्य समजले जाते. राज्यघटना तत्कालीन परिस्थितीला अनुरूप असावी. ती स्थिर स्वरूपाची आणि सर्व मताचे प्रतिनिधित्व करणारी असावी एकांगी असू नये. अशा घटनेतून निर्माण झालेले राज्य हे आदर्श राज्य असेल.

ॲरिस्टॉटलने आदर्श राज्यात आदर्शवाद आणि व्यवहारवादाला समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. आदर्श राज्याची रचना स्पष्ट करण्याऐवजी त्याने आदर्श राज्य स्थापनेसाठी बाह्य आवश्यक गोष्टीचे स्पष्टीकरण केले आहे. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितले आहेत.

**१) लोकसंख्या**

ॲरिस्टॉटलच्या मते राज्याची लोकसंख्या मर्यादित असावी. ज्यामुळे लोकांना व्यवसाय व इतर उद्योगधंद्यात काम मिळू शकते. राज्याची लोकसंख्या जास्त असेल तर राज्यातील जनतेला उपासमारीची वेळ येऊ शकते. तसेच राज्यात शांतता व सुव्यवस्था राहणार नाही आणि जर लोकसंख्या फारच कमी असेल तर राज्यांचे सार्वभौमत्व धोक्यात येते. राज्याची लोकसंख्या इतकी असावी की, ज्यामुळे राज्यामध्ये सुव्यवस्था राहून लोकांना चांगले जीवन जगता यावे. ॲरिस्टॉटलने राज्यातील लोकसंख्येविषयी वर्णन करताना म्हणतो की, प्रत्येक नागरिकाला राज्यकारभारात भाग घेता येईल येवढी लोकसंख्या असावी.

**२) भूप्रदेश**

भूप्रदेश हा सुरक्षित असावा. राज्याची सीमा ही समुद्रकिनाऱ्याला लागून असल्यास फारच चांगले, असे ॲरिस्टॉटल म्हणतो. यामुळे परदेशी व्यापार वाढून राज्य आर्थिकदृष्ट्या संपन्न होईल. अर्थात प्लेटो प्रमाणे ॲरिस्टॉटल हे मान्य करतो की, समुद्रकिनाऱ्याला लागून भूप्रदेश असला तर परकीय आक्रमणाची भीती असते. राज्याचा भूप्रदेश एवढा विस्तृत असू नये ज्यामुळे राज्य करणे व संरक्षण करणे अवघड होईल आणि एवढा कमीही असू नये ज्यामुळे आर्थिक सपन्नता व स्वालंबनात बाधा येईल. राज्यात असलेल्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करता येईल एवढा मर्यादित भूप्रदेश असावा. राज्याभोवती संरक्षणाच्या दृष्टीने तट बांधावा. भूमी ही उत्तम प्रकारची असावी की ज्यामुळे व्यापार आणि शेती दोन्हीचाही विकास होईल.

**३) संविधान**

आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधान ही सर्वश्रेष्ठ असते असे तो म्हणतो. राजेशाही व महाजनशाही यामध्ये गुणांचे एकत्रीकरण झालेली राज्यघटना त्यास हवी आहे. त्या संमिश्र राज्यघटनेस तो झेश्रळीं असे म्हणतो. मर्यादित लोकशाही हा ॲरिस्टॉटलने आदर्श शासन प्रकार असल्याचे सांगितले. या शासन पद्धतीत राज्याची सार्वभौम सत्ता मध्यम वर्गाच्या हाती असल्याने तेथे हुकूमशाही किंवा अराजकता निर्माण होणार नाही. म्हणून आदर्श राज्यासाठी संमिश्र संविधान आवश्यक आहे.

**४) सामाजिक व्यवस्था :**

आदर्श नगरराज्यात शेतकरी, व्यापारी, सैनिक, तंत्रज्ञ, शिल्पकार, धर्मगुरू आणि प्रशासन असे हा प्रकारचे वर्ग असावेत अन्नधान्य निर्मिती, व्यापार, संरक्षण, कलाकौशल्य, धार्मिक विधी इत्यादी कार्येया विविध वर्गामार्फत केली जावीत नगरराज्यातील शेतकरी, शिल्पकार इत्यादिना नागरिकत्वाचा दर्जा देऊ नये असे मत ॲरिस्टॉटल मांडतो. ॲरिस्टॉटलचे हे वर्गीकरण जातीवर किंवा वंशावर आधारित नाही. अत्यंत खालच्या वर्गातील मनुष्य सुद्धा उच्च वर्गात जाऊ शकतो.

**५) शिक्षण**

आदर्श राज्यात शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. लोकांचे चारित्र्य घडविण्याचे ते एक प्रभावी माध्यम आहे. यासाठी राज्याने शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे शिक्षणाचा मूळ उद्देश व्यक्तींच्या नैतिक

शैक्षणिक गुणांची वाढ करण्याचा आहे. शिक्षणामुळे नागरिकांत जाणिवा निर्माण होतात. आपली कार्ये पार पाडण्यासाठी क्षमता त्यामुळे निर्माण होते. संपूर्ण राज्यात समान आणि सक्तीच्या शिक्षणपद्धतीची आवश्यकता आहे. शिक्षणाची सार्वत्रिकता राज्याच्या नियंत्रणाशिवाय शक्य नाही. राज्य हा एक समुदाय एकसंध बनविण्यासाठी शिक्षणाची गरज असते. तेव्हा राज्यातील नागरिक व राज्यकर्ते यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये राजकीय जागृती जाणीव निर्माण करून दिली पाहिजे.

**६) जनतेचे चारित्र्य :**

चारित्र्य आणि योग्यतेच्या दृष्टीने राज्यातील सर्व ग्रीक नागरिक गुणांनी युक्त असावेत तो बुद्धिमत्ता आणि चैतन्य किंवा शौर्य या गुणावर अधिक भर देतो. राज्यातील नागरिक चारित्र्यसंपन्न असल्याशिवाय राज्य आदर्श होणार नाही. वरील गुणांमुळेच राजकीय विकास पूर्ण करणे शक्य होईल.

**७) संपती :**

ॲरिस्टॉटलने व्यक्तीगत संपत्तीला मान्यता दिली आहे. फक्त संपत्तीच्या अधिकाधीक संचयाला त्यांचा विरोध होता. संपत्तीच्या न्यायोचित वितरणाला त्यांची संमती होती. तो म्हणतो संपत्तीमुळे व्यक्तीच्या आवश्यक गरजा पूर्ण होतात. संपत्तीशिवाय व्यक्तीला सुखाने जीवन जगता येत नाही. त्यामुळे व्यक्तीगत संपत्तीचे त्याने समर्थन केले आहे.

**८) विवाह, कुटूंब :**

ॲरिस्टॉटलने विवाहपद्धती व कुटूंबसंस्था यांची गरज व महत्व विशद केली आहे. प्रजनन आणि संगोपन यातून भावी काळातील आदर्श नागरिक निर्माण होतील. विवाह, कुटूंबसंस्था या विषयी नागरिकांना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. कुटूंबाला राज्याची छोटी प्रतिकृती ॲरिस्टॉटल समजतो. अनेक कुटूंबातूनच राज्य निर्माण होतो. तेव्हा विवाहसंस्था व कुटूंबसंस्था समाजाला आवश्यक व पोषक आहे असे वर्णन करतो.

प्लेटोने रिपब्लिक ग्रंथात आदर्श राज्याची रचना सांगितली आहे. ॲरिस्टॉटलने आदर्श राज्य प्रत्यक्षात कसे येऊ शकेल यांचा व्यावहारिक विचार मांडला. यासाठी त्याला प्लेटोच्या 'लॉज' ग्रंथाचा फायदा झाला. त्यांच्या प्रभाव ॲरिस्टॉटलच्या आदर्श राज्याच्या विचारातून दिसून येतो.

**२.३ सारांश :**

ॲरिस्टॉटल हे राज्यशास्त्राचे जनक आहेत. त्यांनी राज्याच्या प्रकाराचे विकृत व शुद्ध प्रकाराची चर्चा केली आहे. तसेच त्यांनी क्रांतीसंबंधी नागरिकत्वसंबंधी, गुलामगिरी आणि आदर्श राज्य इत्यादी विषयी विचार मांडले आहेत. ॲरिस्टॉटलचे लोकशाही (समतोल) या प्रकाराला शुद्ध प्रकार सांगून महत्त्व दिले आहे. क्रांतीचे प्रकार स्पष्ट केले आहेत. तसेच क्रांती टाळण्याचे उपायही सांगितले आहेत. ॲरिस्टॉटल यांनी समाजातील गुलामगिरी विषयी चर्चा केली असून त्यास समर्थन दिले आहे. त्याचबरोबर ॲरिस्टॉटलने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. त्यामध्ये त्यांनी आदर्शवाद आणि व्यवहारवाद यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. आदर्श राज्याची मांडणी करताना त्यामध्ये प्रामुख्याने लोकसंख्या, भूप्रदेश, शिक्षण, जनतेचे चारित्र्य,

संपत्ती, विवाह, कुटुंब संविधान, सामाजिक व्यवस्था इत्यादी गोष्टींचा विचार केला आहे. हे मांडण्यासाठी प्लेटोनी जी आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे याचा फायदा झाला आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द :

- **अथेन्स :** ग्रीक नगरराज्याचे नाव
- **ग्राम :** गाव, खेडे
- **परिवर्तन :** मौलिक स्वरूपातील बदल
- **जनक :** पिता, निर्माता, प्रणेता
- **अशुद्ध प्रकार :** विकृत प्रकार
- **महाजसत्ता :** समाजातील थोडक्यात पण गुणी व धनवान लोकांची सत्ता
- **क्रांती :** परिवर्तन, बदल
- **अंशतः :** काही प्रमाणात

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

**स्वयंः अध्ययन प्रश्न-१**

खालील प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा.

१) ॲरिस्टॉटलच्या जगप्रसिद्ध ग्रंथाचे नाव काय?

२) The Politics हा ग्रंथ किती विभागात विभागला आहे?

३) ॲरिस्टॉटलच्या गुरूचे नाव काय?

४) ॲरिस्टॉटलने किती देशांच्या राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास केला?

५) ॲरिस्टॉटलने राज्याच्या विकासाच्या किती अवस्था सांगितल्या?

**स्वयंः अध्ययन प्रश्न-२**

मोकळ्या जागी योग्य शब्द लिहा.

१) ॲरिस्टॉटलने राज्याचे वर्गीकरण ...... तत्वावर केले.

२) महाजनशाही हा राज्याचा ........ प्रकार आहे.

३) ॲरिस्टॉटलने ....... हा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला.

४) राजकीय परिवर्तनाचे क्रांतिचे चक्र ...... यानी मांडले.

५) सार्वभौम सत्ता काही लोकांच्या हातात असते तेंव्हा ....... राज्याचा शुद्ध प्रकार असतो.

**उत्तरे :**

**स्वयं: अध्ययन प्रश्न-१**

१) दि पॉलिटिक्स २) आठ ३) प्लेटो ४) १५८ ५) तीन

**स्वयं: अध्ययन प्रश्न-२**

१) गुण, संख्या २) शुद्ध ३) दि पॉलिटिक्स

४) ॲरिस्टॉटल ५) महाजनशाही

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) ॲरिस्टॉटलचे राज्यविषयक विचार स्पष्ट करा.

२) ॲरिस्टॉटलचे क्रांतीसंबंधी कारणे व उपाय योजना स्पष्ट करा.

३) ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार.

४) ॲरिस्टॉटल हा राज्यशास्त्राचा पिता आहे स्पष्ट करा

५) ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थन करण्यामागी कारणे स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१) ॲरिस्टॉटलचे आदर्शराज्याची वैशिष्ट्ये

२) ॲरिस्टॉटलचा परिवर्तनाचे फिरते चक्र

३) नागरिकत्वाची पात्रता

४) गुलामगिरी विषयी सूचना

५) क्रांतीची सामान्य कारणे.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


१) डोळे ना. य., 'राजकीय विचारांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल, प्रकाशन, पुणे.

२) शृंगारपुरे अरविंद, 'पाश्चिमात्य राजकीय विचारक', मंगेश प्रकाशन, नागपूर.


❍❍❍

**घटक ३**

# मॅकियाव्हेली

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ जीवन परिचय

  ३.२.२ मॅकियाव्हेलीचे मनुष्य स्वभावासंबंधी विचार

  ३.२.३ राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत

  ३.२.४ मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण

  ३.२.५ मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश

  ३.२.६ मॅकियाव्हेली : आधुनिक राजकीय विचारांचा जनक

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास–

- मॅकियाव्हेलीच्या मनुष्य स्वभावासंबंधीच्या विचारांचे आकलन होईल.
- राजकारणाची – धर्म व नैतिकतेपासून फारकत करणे गरजेचे का होते? हे समजेल.
- राजाने राज्यसंस्था टिकविण्यासाठी कसे वर्तन करावे? हे स्पष्ट होईल.
- मॅकियाव्हेलीला आधुनिक राजकीय विचारांचा जनक का म्हणतात, हे स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

ग्रीक व रोमन काळात धर्मसत्ता व राज्यसत्ता ह्या वेगवेगळ्या होत्या. त्यामुळे राज्याचे स्वरूप धर्मनिरपेक्ष राहिले. पण रोमन सम्राटाने ख्रिश्चन धर्माचा स्विकार केल्यानंतर तो राजधर्म बनला व धर्मसत्तेचे वर्चस्व वाढू लागले. राजकारणात हस्तक्षेप करीत चर्चने सत्ता आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे चर्च आणि राज्य यांच्यात सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला.

या सुमारास काही विचारवंतानी जनतेत बौद्धिक जागृती करण्याचा प्रयत्न केला. पोपच्या अनियंत्रीत सत्तेला विरोध करण्यासाठी लोकांच्या बौद्धिकतेला आव्हान देण्यात येऊ लागले. मध्ययुगाचा शेवट हा धर्मसुधारणा व पुनरुज्जीवनाच्या आंदोलनाने झाला. याच काळाचा मॅकियाव्हेली प्रतिनिधी असून त्याचा इहलोकाचा विचार, बुद्धिप्रामाण्य व तर्काचा वापर यामुळे इतर मध्ययुगीन विचारवंतापेक्षा मॅकियाव्हेली वेगळा मानला जातो. त्याचे राजकीय विचारात एक वेगळे स्थान निश्चित होते.

## ३.२ विषय–विवेचन :

### ◆ जीवन परिचय :

निकोलो मॅकियाव्हेलीचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स या ठिकाणी सामान्य कुटूंबात १४६९ मध्ये झाला. त्याचे वडील व्यवसायाने वकील होते तरी परिस्थिती सामान्य असल्याने त्याला उच्च शिक्षण घेता आले नाही. खूप प्रयत्नांनी १४९० मध्ये त्याला सामान्य प्रशासकीय पदावर नोकरी मिळाली. पुढे वयाच्या २९ व्या वर्षी फ्लॉरेन्स शहरराज्याच्या प्रशासन विभागात त्याला सचिवाची नोकरी मिळाली. येथे अंतर्गत व्यवहार व युद्धकार्ये यासाठी असलेल्या युद्धमंडळाचा तो चौदा वर्षे चिटणीस होता. या चिटणीस पदावर असताना राजदूत या नात्याने रोम, पॅरिस, बर्लिन इ. राज्यांना भेटी दिल्या. परदेश प्रवासात फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी इ. राज्यव्यवस्थाचा अभ्यास केला. स्वित्झर्लंडची संघराज्य व्यवस्था इटलीत निर्माण व्हावी. तसेच फ्रान्स, स्पेन प्रमाणे संघटित होऊन इटलीने सामर्थ्यशाली बनावे असे मॅकियाव्हेलीला वाटत होते.

पण पोप दुसरा ज्युलियस याने स्पेन व व्हेनिस यांच्याशी मैत्री करून १५१२ प्लॉरेन्स नगरराज्यावर आक्रमण करून तेथील राज्यसत्ता नष्ट केली. पुढे मेडिसी घराण्याची सत्ता आली. या घराण्याची सत्ता घराण्याविरूद्धच्या कटात सामील असल्याचा आरोप मॅकियाव्हेलीवर ठेवून एक वर्षाची कारावासाची शिक्षा दिली. पण तो निर्दोष आढळल्याने त्याला सोडून देण्यात आले. पुढील आयुष्याची १५ वर्षे फ्लॉरेन्सजवळील एका खेड्यात मॅकियाव्हेलीने घालवली. याच काळात मॅकियाव्हेलीने ग्रंथलेखन केले पुढे २० जून १५२७ रोजी मॅकियाव्हेलीचे निधन झाले.

### ◆ ग्रंथरचना :

इटलीची चालेली अधोगती, दारिद्र्य, अशांतता हे दोष नाहीसे करणे. यासाठी इटलीचे ऐक्य घडवून एक स्वतंत्र राज्य निर्माण करण्याच्या हेतूने मॅकियाव्हेलीने आपली ग्रंथरचना केली. त्याच्यासमोर १) इटलीच्या

राज्याची निर्मिती २) इटलीच्या नगरराज्यांना समृद्ध करण्यासाठीची उपाययोजना ३) ज्ञानाच्या पुनरूज्जीवनाच्या चळवळीला सहकार्य आणि ४) अंधविश्वासातून इटालीयन समाजाची मुक्तता या समस्या होत्या.

या समस्यांचा विचार करून मॅकियाव्हेलीने

१) The Prince (दि प्रिन्स)

२) Discourses on the first decade of Titas Livious या ग्रंथालाच Discourses of Livy (डिस्कोर्सेस ऑफ लिव्ही)

३) Art of War (आर्ट ऑफ वॉर)

४) History of Florence (हिस्ट्री ऑफ फ्लॉरेन्स)

या महत्वाच्या ग्रंथाची निर्मिती करून व्यावहारिक दृष्टीकोनातून मॅकियाव्हेलीने आपले विचार मांडले.

◆ **मॅकियाव्हेलीची अध्ययनपद्धती :**

मॅकियाव्हेलीने वापरलेल्या अध्ययनपद्धतीचे विश्लेषण केल्यास, त्याने ऐतिहासिक, तुलनात्मक निरीक्षणात्मक, वास्तववादी व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून आपले विचार मांडले. मॅकियाव्हेली पारंपरिक विवेचनातून मुक्त होऊन, स्वतंत्र बुद्धीने विवेचन करणारा वास्तववादी विचारवंत होता. जे प्रत्यक्ष अनुभवता येते, जे दिसते अशाच आधारांवर निष्कर्ष काढण्याची पद्धत त्याने वापरली. मॅकियाव्हेलीने स्वतःच्या अनुभवाच्या आधारावर आपली विशिष्ट मते बनविली व त्यांच्या समर्थनासाठी इतिहासातील दाखले दिले. त्याबरोबरच निरिक्षणाचा वापर करून तत्कालीन राज्यव्यवस्थेतील दोष स्पष्ट केले. त्यातून मनुष्य स्वभावतःच स्वार्थी असतो अशा निष्कर्षापर्यंत तो पोहचला. अशा शास्त्रीय दृष्टीकोनातूनच त्याने वाढलेल्या अवास्तव चर्चच्या सत्तेला विरोध केला. धर्म ही व्यक्तीगत बाब असून, धर्माने राज्याच्या कार्क्षेत्रात हस्तक्षेप करू नये असे त्याने स्पष्ट केले.

### ३.२.१ मॅकियाव्हेलीचे मनुष्यस्वभावासंबंधीचे विचार :

आपल्या 'दि प्रिन्स' या ग्रंथात मॅकियाव्हेलीने मनुष्यस्वभावाचे विवेचन केले आहे. मनुष्य हा निसर्गतःच स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचा असतो. स्वार्थच त्याला कार्य करण्यासाठी प्रेरित करीत असतो. याबरोबरच मनुष्य कृतघ्न, भित्रा, चंचल व विश्वासघातकी असतो. त्यामुळे मानवास त्याच्या इच्छेप्रमाणे कार्य करण्याची मुभा दिली तर, त्याच्याकडून वाईट कृत्येच अधिक होतील. त्यामुळे मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक बनते. प्रत्येक मनुष्यात स्वार्थ लपलेला असतो असे मॅकियाव्हेली म्हणतो. प्रजेच्या ठिकाणी संपत्ती व स्त्रीचा स्वार्थ असतो. व या गोष्टी मिळविण्यासाठी मनुष्याचे लोभी मन कोणतेही वाईट कृत्य करण्यास तयार असते. यातून स्पर्धा व संघर्ष निर्माण होतात आणि बुद्धिचा विसर पडतो व मानवी वर्तन पशूप्रमाणे बनते असे मॅकियाव्हेलीचे म्हणणे आहे. मानवाच्या ठिकाणी प्रेम, सहकार्य हे गुण आढळत असले तरी, ते सर्व स्वतःच्या स्वार्थाकरीता असतात, ज्या गोष्टीतून आपल्याला फायदा होईल अशा गोष्टींबाबत मानव अधिक प्रेम दाखवतो किंवा त्याबाबत चांगले वर्तन करतो. मॅकियाव्हेलीच्या मते, मनुष्य आपल्या जन्मदात्या पित्याची हत्या विसरेल, पण

आपल्या संपत्तीतील आपला वाटा विसरणार नाही. अशा ढोंगी वृत्तीच्या मनुष्याकडून सहज चांगल्या वर्तनाची अपेक्षा न करणे हेच चांगले होय.

मॅकियाव्हेलीच्या मते, मनुष्य ज्याप्रमाणे स्वार्थी, दुष्ट आहे, त्याप्रमाणेच तो भित्रा व दुबळा ही आहे. त्यामुळे मनुष्यास आपल्या जीविताची व संपत्तीची खात्री वाटत नाही. साहजिकच जीविताचे व संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी त्याला राज्यसंस्थेची गरज भासते. या गरजेतूनच राज्यसंस्थेची निर्मिती होते व तिचा प्रमुख या नात्याने राजा निर्माण होतो. या राज्यसंस्थेने मनुष्याची संपत्ती व जीवन यांचे संरक्षण चांगल्याप्रकारे केल्यास तिला स्थैर्य प्राप्त होते. पण स्वार्थी व दुष्ट मनुष्यावर कायद्याने नियंत्रण निर्माण करण्याबरोबरच, त्याला अराजकतेची भीतीही दाखवावी अशा अराजकतेच्या भीतीतून शासनास आपोआपच स्थैर्य प्राप्त होत असते. स्वार्थ, लोभ, प्रेम यातून निर्माण होणारे स्नेहसंबंध हे कालसापेक्ष व पोकळ असतात. असे स्नेहसंबंध स्वार्थाच्यावेळी नष्ट करण्यास मनुष्यास काहीही वाटत नाही. पण ज्याविषयी दरारा व भीती असते. अशा राज्यसंस्थेस दगा देण्यास मनुष्य घाबरतो. कारण राज्यसंस्थेच्या दंडशक्तीचा धाक किंवा भीती त्याच्यासमोर असते. म्हणून राजाने स्वार्थी, दुष्ट व लोभी प्रजेवर दंडशक्तीच्या भीतीनेच राज्य करावे असे मॅकियाव्हेलीला वाटत होते. राजाच्या आज्ञा मोडणाऱ्यांना कडक शासन करावे, तसेच राजाने शक्तीशाली बनून प्रजेला संरक्षण ही द्यावे. समाजात अनेक स्वभावाची माणसे असल्याने त्यांच्याशी राज्याने धूर्तपणे कायदा व दंडशक्ती यांचा वापर करावा. काही वेळेस मनुष्यास भीती दाखवून, त्याला फसवून त्याच्याकडून चांगले काम करून घ्यावे. त्याची स्वार्थी वृत्ती दाबण्यासाठी राजाने दंडशक्तीचा उपयोग करावा.

**मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभाव विषयक विचारांची वैशिष्ट्ये :**

१) मनुष्यस्वभाव स्वार्थी, दुष्ट, कपटी, भित्रा व दुबळा आहे.

२) मनुष्य स्वतः जीविताच्या आणि संपत्तीच्या सुरक्षिततेसाठीच धडपडतो व त्यातूनच राज्यसंस्थेचे नियंत्रण स्वीकारतो.

३) राजाने आपले धोरण ठरविताना मनुष्यस्वभाव लक्षात घेऊन प्रेमापेक्षा भीतीनेच आपले कार्य साध्य करावे.

४) दंडशक्तीचा वापर करून राजाने प्रजेच्या मनात भीतीचे वातावरण निर्माण करावे व राज्यकारभार चालवावा.

५) मनुष्यातील दुर्गुणांना दंडशक्तीच नियंत्रणात आणू शकते.

**मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभाव विषयक विचारांवरील आक्षेप :**

१) मॅकियाव्हेलीने केलेले मनुष्यस्वभावाचे विवेचन एकांगी असून, ते केवळ त्या वेळच्या इटलीतील मनुष्याच्या वर्तनावर आधारित आहे.

२) मनुष्यस्वभावातील दुर्गुणांकडे लक्ष देणारा मॅकियाव्हेली, मनुष्यातील देशहित व परस्पर सहकार्याच्या गुणांकडे दुर्लक्ष करतो.

३) मनुष्यात चांगले व वाईट असे दोन्ही गुण असतात, याबाबत मॅकियाव्हेली भाष्य करत नाही.

४) परिस्थितीनुसार मनुष्यातील चांगले किंवा वाईट गुण प्रदर्शित होत असतात, याकडे तो दुर्लक्ष करतो.

५) मॅकियाव्हेलीने केलेल्या मनुष्यस्वाभावाच्या विश्लेषणाला कोणताही शास्त्रीय आधार नाही.

अशा रितीने मॅकियाव्हेलीने मनुष्यस्वभावाचे केलेले विवेचन निराशावादी वाटते. पण वेगवेगळया विचारवंतांनी या विषयासंबंधीची मांडणी आप-आपल्या विषयाला अनुसरून केलेली दिसून येते. मॅकियाव्हेलीने सुद्धा निरंकुश व अमर्याद राज्यसत्तेच्या निर्मितीसाठी, मनुष्याला स्वार्थी, दुष्ट ठरवून विचारांची मांडणी केलेली पहावयास मिळते.

### ३.२.२ राजकारणाची धर्म आणि नैतिकतेपासून फारकत :

मॅकियाव्हेलीला त्यांने मांडलेल्या नैतिकते संबंधीच्या विचारांनीच त्याला मध्ययुगातील विचारवंतांपासून वेगळे करून वर्तमान विचारवंतांच्या पंक्तीत आणून बसवले आहे. तो आपले विचार तर्कशुद्ध व शास्त्रीय आधारावर मांडत असताना धर्माला व नीति-अनीतीच्या कल्पनांना महत्व देत नाही.

मॅकियाव्हेलीने धर्म व नीती यांचा राजकारणावर पडलेला वाईट प्रभाव अनुभवला होता. त्यामुळे त्याने फार काळजीपूर्वक राजकारणापासून धर्म आणि नैतिकता अलग केली. नैतिकतेला तो राज्याच्या आधार मानायला तयार नाही. शासकाने आपले उद्‌दिष्ट किंवा साध्य प्राप्त करण्यासाठी कोणत्याही नैतिक, अनैतिक साधनांचा उपयोग करावा असे मॅकियाव्हेली म्हणतो. त्याच्यामते राज्य हे साधन नसून साध्य आहे. राज्याचे हितसंबंध साकारण्यासाठी राज्याने केलेली कोणतेही कृती किंवा कार्य न्याय व नैतिक असते.

**मॅकियाव्हेलीने नैतिकतेचे दोन प्रकार मांडले आहेत**

१) व्यक्तिगत नैतिकता (Private Morality)

२) जन / लोक नैतिकता (Public Morality)

व्यक्तीगत नैतिकतेत तो राज्याच्या नैतिकतेचे मापदंड ठरवितो तर जन किंवा सामाजिक नैतिकतेत जनतेच्या नैतिकतेचे नियम ठरवितो. मॅकियाव्हेलीच्या मते, सामान्य जनतेने नैतिकतेचे पूर्ण पालन करावे कारण त्यातच जनतेचे कल्याण असते. राज्याच्या आदेशांचे, कायद्याचे पालन करणे, राष्ट्रासाठी बलिदान देणे व राज्याला सहकार्य करणे म्हणजेच नैतिकता होय अशा प्रकारची नैतिकता जनतेसाठी आवश्यक आहे पण राज्यकर्त्यांसाठी तो अशी नैतिकता आवश्यक मानत नाही. राजा हा पूर्ण स्वतंत्र असून, तो नीतीनियमांच्या बंधनात अडकलेला नसतो, कारण त्याच्यासाठी नैतिक नियम नसतात. नैतिक नियम फक्त प्रजेसाठी असतात. राजाने आपली शक्ती / सामर्थ्य वाढविण्यासाठी व टिकविण्यासाठी कोणत्याही साधनांचा वापर करावा. कारण सर्वच साधने राजासाठी न्याय असतात. साध्य प्राप्त करणे हेच प्रमुख उद्‌दिष्ट असले पाहिजे. अत्याचार, हिंसा, धोकेबाजपणा राज्याच्या संरक्षणासाठी व दृढतेसाठी आवश्यक असतो. साध्य प्राप्त होत असेल तर कोणतेही साधन उचित ठरते. त्यामुळे राजाने साध्याचा विचार करावा साधनांचा नाही. मॅकियाव्हेलीच्या मते, राजाने फक्त

राज्य सुरक्षित व दृढ कसे राहिल याची चिंता करावी. कारण नीती- अनीतीच्या कल्पना राजासाठी नाहीत. राज्याच्या संरक्षणासाठी वाटेल तो अन्याय अत्याचार करावा लागला, धोका द्यावा लागला तरी राजाने मात्र पुढे पाहू नये. कारणे नैतिक-अनैतिक अशा कोणत्याही साधनाचा वापर करून राजाने आपला उद्‌देश साध्य करावा. मॅकियाव्हेलीच्या मते, चांगले-वाईट, धर्म-अधर्म, नैतिक-अनैतिक, इहलोक-परलोक हे विचार भित्र्या मनुष्यासाठी आहेत. राजासाठी नाहीत गरज भासल्यास राजाने कपट, धोका, बेईमानी, हत्या संधीसाधुपणा असे कोणतेही साधन वापरावे. कारण साध्यावरून साधनाची किंमत ठरते. मॅकियाव्हेलीच्या मते कायद्याची व नीतीची निर्मिती राजा करीत असेल, तर त्याचे बंधन राजावर असणार नाही. राजाला सार्वजनिक हित साधावयाचे असल्याने त्याच्यावर राज्याची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे राजाची प्रत्येक कृती किंवा कार्य समर्थनीयच असते. राज्य हे मूळातच नैतिक किंवा अनैतिक नाही, तर ते नीतीकक्षेच्या बाहेर असते. नीती-अनीतीच्या कल्पना ह्या धर्माशी संबंधीत असतात. राजा सिंहाप्रमाणे शूर व कोल्हयाप्रमाणे धूर्त असावा वेळप्रसंगी राजा इतका कपटी व धूर्त असावा की, लोकांच्या डोळ्यात धूळ फेकून आपण कसे दया-प्रेम-श्रद्धा धार्मिकतेचे प्रतीक आहोत, असा त्याने भास निर्माण करावा.

मॅकियाव्हेलीने नैतिकतेबरोबरच धर्मालाही उच्च स्थान दिले नाही. राज्याच्या हितासाठी राजाने अनैतिक व अधार्मिक कार्याचा अंगीकार केला तरी चालेल. इतकेच नाही तर वेळ प्रसंगी धर्माचाही त्याग राज्यकर्ता करू शकतो. मॅकियाव्हेलीच्या या विचारांवरून तो अधार्मिक व अनैतिक आहे असा आक्षेप घेतला जातो. पण तो तसा नाही तर राजकारणात शिरलेल्या धर्म व नीतीच्या विरोधात तो आहे. त्याच्यामते राजा राज्याचा निर्माता असल्याने तो कायद्याच्या सीमेबाहेर असतो आणि नैतिकतेसंबंधी कायदे बनविले तर तो नैतिकतेच्या सीमेबाहेर असेल. मॅकियाव्हेली नास्तिक नव्हता पण राजकारणातील धर्म प्रभावाच्या विरोधी होता. मॅकियाव्हेलीच्या मते, जर एखादा राजा किंवा गणराज्य भ्रष्टाचारमुक्त राहू इच्छित असेल तर त्याने प्रथम धर्म संस्कारांना शुद्ध ठेवले पाहिजे. धर्माबद्‌दल उचित श्रद्धा असली पाहिजे. कारण धर्माची हानी म्हणजेच देशाच्या विनाशाचे लक्षण होय. मॅकियाव्हेली चर्च नष्ट करू इच्छित नव्हता, तर त्याद्‌वारे राज्याच्या नियमाबाबत जनतेला कर्तव्यशील बनवू इच्छित होता.

मॅकियाव्हेलीचे धर्म आणि नैतिकतेसंबंधीचे विचार लक्षात घेताना त्याने ते का मांडले? हे समजून घेणे आवश्यक ठरते.

१) मॅकियाव्हेली राज्याला मनुष्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक मानत होता. व्यक्तीचे कल्याण राज्यच करू शकते यावर त्याचा विश्वास होता. त्यामुळे राज्य सुरक्षित ठेवणे गरजेचे असल्याने तो राज्याच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही साधनाचा पुरस्कार करतो.

२) पोपद्वारे होत असलेल्या भ्रष्टाचाराने तो हैराण झाला होता. तर ज्या अंधविश्वासाने मनुष्य संकटांशी सामना करू शकत नाही. अशा मनुष्याला दुर्बल बनविणारी पोपची सत्ता कमी करण्याचा मॅकियाव्हेलीचा उद्‌देश होता.

३) मॅकियाव्हेलीला राज्याला महत्वाचे स्थान द्यावयाचे होते. यासाठी त्याचे सामर्थ्य वाढवणे आवश्यक होते म्हणून त्याने स्वर्गलोकातील लाभापेक्षा इहलोकातील लाभ महत्वाचा मानला व धर्म भक्तीपेक्षा देशभक्ती महत्वाची आहे, या विचाराने राजकारणापासून धर्म व नैतिकतेची फारकत केली.

४) प्रचलित दैवी सिद्धांत खोडून, राज्यही मानवनिर्मित संस्था आहे हे मॅकियाव्हेलीने स्पष्ट केले. मनुष्याच्या स्वार्थी व दुष्ट वृत्तीतून जी अराजकता निर्माण झाली, ती नष्ट करण्यासाठी राज्याची निर्मिती झाली असे त्याचे मत होते.

## ३.२.३ मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण :

मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी शासन संस्थेचे वर्गीकरण मांडले आहे. मॅकियाव्हेलीवर ग्रीक संस्कृतीतील राज्यविचारांचा प्रभाव असल्याने, आदर्श राज्याची सत्ता अमर्यादित असते असे तो मानतो. मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण संख्यातत्वावर आधारित असून ॲरिस्टॉटलप्रमाणे त्याने शासनाचे शुद्ध व भ्रष्ट अशा दोन प्रकारात वर्णन केले आहे.

| **शुद्ध स्वरूप** | **भ्रष्टस्वरूप** |
|---|---|
| १) राजतंत्र | १) एकतंत्र |
| २) कुलीनतंत्र | २) धनिकतंत्र |
| ३) प्रजातंत्र | ३) लोकशाही |

वरील सहा प्रकारांशिवाय संमिश्र शासनाचा सातवा प्रकार त्याने सांगितला. संमिश्र शासनात वरील सर्व शासन प्रकारातील गुणांचा समावेश केला जातो त्यामुळे त्यात सत्ता संतुलन व नियंत्रण हे दोन्हीही गुण दिसून येतात. तरी देखील मॅकियाव्हेलीने दोन प्रकारच्या शासनाचेच विचारपूर्वक वर्णन केले आहे ते म्हणजे १) राजतंत्र २) प्रजातंत्र होय.

**१) राजतंत्र**

कोणत्या देशात राजतंत्र सर्वश्रेष्ठ ठरेल याचे विवेचन करताना मॅकियाव्हेलीने म्हणतो की, ज्या देशात स्वार्थ शिगेला पोहचला असेल, ज्या ठिकाणी व्यक्तीहिताकडे अधिक लक्ष असेल, चारित्र्य नसलेली प्रजा व जिकडेतिकडे भ्रष्टाचार असेल अशा देशात निरंकुश राजतंत्र पाहिजे. तत्कालीन इटलीचे भ्रष्टरूप नजरेसमोर असल्याने मॅकियाव्हेलीने निरंकुश राजतंत्राचे समर्थन केले. अशा राजतंत्राचे त्याने दोन प्रकार पाडले. अ) अनुवंशिक राजतंत्र ब) कृत्रिम राजतंत्र होय. यातील अनुवंशिक राजतंत्रातील राजाला कमीत-कमी समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण पिढ्यान-पिढ्या तेच राजघराणे प्रजेवर राज्य करीत असते व प्रजा राजाशी एकनिष्ठ असल्याचे संकेत प्रस्थापित झालेले असतात. त्यामुळे परस्परांचा घनिष्ठ संबंध, विश्वास व आत्मीयता या गोष्टी गृहित धरता येतात. त्यामुळे अशा राजाला अधिमान्यता मिळविण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागत नाहीत.

याउलट कृत्रिम राजतंत्रातील राजाला अधिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा राजाकडे प्रजा परकीय

आक्रमण किंवा शत्रू अशाच नजरेने पाहत असते. कारण तो आक्रमण करून सत्तेवर आलेला असतो. अशा परिस्थितीत प्रजेची अधिमान्यता मिळविण्यासाठी प्रजा हिताची कार्य करून विश्वास संपादन करावा लागतो राजतंत्राचे समर्थन करताना राज्याच्या सुरक्षिततेसाठी न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य वा नैतिक-अनैतिक याकडे लक्ष देऊ नये असे त्याने म्हटले आहे.

**२) प्रजातंत्र**

मॅकियाव्हेलीने आपल्या 'डिस्कोर्सेस' या ग्रंथात प्रजातंत्राचे समर्थन केले असून, व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्याची संधी व त्यासाठी अनुकूल परिस्थिती प्रजा किंवा गणतंत्रात मिळते म्हणून ते श्रेष्ठ आहे असे तो म्हणतो. ज्या समाजात पुरेशी समानता व प्रगल्भता असते तेथे प्रजातंत्र शासन यशस्वी होऊ शकते. याबरोबर संपत्तीच्या वितरणात समानता व जनतेत सार्वजनिक भावना जास्ती-जास्त असणे गरजेचे असते. प्रजातंत्रात राजकीयदृष्ट्या जनता सुशिक्षित व सहकार्याची भावना जोपासलेली असल्याने जनतेच्या मताप्रमाणे राज्यकारभार चालतो व शासनाला स्थैर्य मिळते. एका व्यक्तीचे निर्णय अधिक अचूक असण्याची शक्यता जास्त असते. प्रजातंत्रात मागील चूका दुरूस्त करून भविष्यात अधिक योग्य निर्णय घेतले जाण्याची शक्यता वाढते. राजकीय प्रक्रियेत लोकांचा सहभाग असल्याने शासनाचे स्थैर्य वाढतेच पण अन्य राज्याच्या मनात त्यांच्या विषयी विश्वासाची भावना अधिक बळकट होते. प्रजातंत्रात एखादे राजकीय परिवर्तन घडवताना संघर्ष, हिंसाचार करावा लागत नाही. कोणताही कडवटपणा येऊ न देता असा बदल घडवून आणता येतो. हे सर्व सत्य असले तरी तत्कालीन इटलीच्या परिस्थितीने प्रजातंत्राविषयीच्या मॅकियाव्हेलीच्या भावना पूर्णपणे दबल्या गेल्या व राजतंत्राविषयीच्या प्रभावी झाल्या असे म्हणता येईल.

याचा परिपाक म्हणून मॅकियाव्हेलीचा कुलीन तंत्राला कट्टर विरोध होता. कारण या कुलीनतंत्रानेच इटलीचे झालेले अधःपतन त्याने आपल्या डोळ्यांनी पाहिले होते. इटलीतील भ्रष्टाचाराला व विभाजनाला तो ह्या शासनालाच जबाबदार मानत होता. त्यामुळे इटलीची परिस्थिती पाहून व काळाची गरज ओळखून मॅकियाव्हेलीने राजतंत्राचे समर्थन केले आहे.

### ३.२.४ मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश :

राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राजाने कशापद्धतीने वर्तन करावे, कोणत्या उपाय योजना कराव्यात. या गोष्टीचे विश्लेषण मॅकियाव्हेलीने आपल्या 'प्रिन्स' या ग्रंथात केले आहे. राजाला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी उपदेश केलेला दिसून येतो. राज्याची उत्पत्ती कशी झाली हे सांगून ते टिकवावे, कसे ह्याचे विवेचन करताना राजाने पुढील तीन कर्तव्ये पार पाडवीत असे म्हणतो.

१) राज्याच्या संरक्षणाबरोबरच राज्यविस्तार वाढवावा.

२) दंडशक्ती व कायदा याद्वारे राजाने राज्यात शांतताः सुव्यवस्था निर्माण करावी.

३) राज्याचे हित लक्षात घेऊन प्रजेच्या कल्याणाची कार्येकरावीत.

वरील कर्तव्ये पार पाडण्यासाठी राजा जवळ सिंहाचे क्रौर्य आणि कोल्हयाचा धूर्तपणा असावा.

कोणत्याही प्रकारची साधने वापरून राजाने आपला उद्देश साध्य करावा. राजेशाहीतील राजा हा कायद्याचा निर्माता असल्याने त्याचे स्थान कायद्यापेक्षा श्रेष्ठ असते. तसेच राजाने स्थान व्यक्तीगत नैतिकतेपेक्षा वरचे असते. राजा व राज्य हे कायदा आणि नैतिकता या संकल्पनेच्या कक्षेबाहेर असतात. अशाप्रकारे राजेशाहीतील राज्यकर्ता निरंकूश असला तरी त्यानी काही पथ्ये आवर्जून पाळली पाहिजेत त्याबाबत मॅकियाव्हेली राजाला उपदेश करतो. मॅकियाव्हेलीचा राजा निरंकुश असला तरी त्याची निरंकुशता जनतेच्या कल्याणासाठी आहे, स्वतःच्या स्वार्थासाठी नाही. यासाठी राजाला केलेला उपदेश पुढीलप्रमाणे

१) राजाकडे सिंहाचे क्रौर्य व कोल्हयाचा धूर्तपणा असावा कारण राजाने कोणत्याही प्रकारची साधने वापरून उद्देश साध्य करावा, धूर्तपणा अभावी तो कटकारस्थाने हेरू शकणार नाही व क्रौर्याच्या अभावी शत्रूचे दमन करू शकणार नाही. या दोन्ही गुणांचा समन्वय राजा यशस्वी बनण्यासाठी अत्यावश्यक आहे.

२) राजाने प्रजेच्या संपत्तीला व स्त्रीच्या चारित्र्याला धक्का पोहचवू नये. कारण दोन गोष्टीत प्रजा संवेदनशील असते. अन्यथा जनक्षोभ होतो मनुष्य आपल्या मालकीच्या गोष्टीबाबत इतका दक्ष असतो की, तो आपल्या पित्याच्या हत्याऱ्याला माफ करेल, पण वडीलार्जीत संपत्ती हिसकावून घेणाऱ्याला तो कधीही माफ करणार नाही.

३) समाजातील प्रचलित रुढी व परंपरांमध्ये राजाने हस्तक्षेप करू नये. काही अप्रिय कार्ये हाताखालील लोकांकडून करून घ्यावीत व दोष त्यांच्यावर ढकलावा, खापर त्यांच्या माथ्यावर फोडावे.

४) राजाने राज्याच्या हितासाठी नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय ह्याचा विचार करू नये. राजाने दयाळूपणाचा बुरखा पांघरून आपले क्रौर्य झाकावे. उत्तमप्रकारे बहुरूप्याचे सोंग वठवावे.

५) मॅकियाव्हेलीच्या मते मनुष्य दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो १) भीती व २) प्रेम पण राजाने प्रेमावर विश्वास ठेवू नये. कारण मनुष्य मुळातच स्वार्थी व धोकेबाज असल्याने राजाने जनतेला भीती दाखवूनच आज्ञांचे पालन करून घ्यावे. पण देखावा मात्र उदार अंतःकरणाचा, धार्मिकतेचा करावा.

६) राजाने लोकांच्या भावना भडकवून त्याचा उपयोग राज्यकारभारात करून घ्यावा. पण स्वतः मात्र भावनेच्या आहारी जाऊ नये.

७) राजाने राज्याच्या हितासाठी शेजारील राष्ट्राशी आवश्यक असे कोणतेही करार करावेत व कालांतराने गरज नसल्यास ते करार मोडावेत, त्यांचा प्रदेश हडप करण्यासही मागेपुढे पाहू नये.

८) राजाने सतत आक्रमण योजना तयार करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सत्ता संतुलन ठेवण्याचा प्रयत्न करावा. शेजारील दोन राज्यात करार होऊन ती आपल्यापेक्षा बलवान होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

९) राजाने जवळील राज्यात सतत हस्तक्षेप करीत रहावे. संधी मिळताच त्यांचा प्रदेश गिळंकृत करून आपली सीमा वाढवावी व नवीन भूमीवर अधिकार प्रस्थापित करावा.

१०) राजाने दृढनिश्चयी, संयमी व निर्णयक्षम अशी आपली प्रतिमा तयार केली पाहिजे राजाने आत्मस्तुतीला कधीही भाळू नये.

११) राजाने राज्याचे संरक्षण व विकास हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून नैतिक-अनैतिक, उचित-अनुचित अशा कोणत्याही साधनाचा वापर करावा.

१२) युद्ध हे अनेकदा गरजेचे वा उपयुक्तही असते. युद्धात आपल्याला विजयाची खात्री असल्यास राजाने युद्ध टाळू नये. पण तेही स्वबळावर लढावे. एखाद्या बलाढ्य सत्तेचा पाठिंबा घेऊन दुसऱ्यावर हल्ला करू नये. कारण आपल्यापेक्षा सामर्थ्यवान राज्य आपल्याला केव्हाही गिळंकृत करण्याचा धोका असतो.

१३) राजाला आपल्या सद्गुणांचे व दुर्गुणांचेही चांगले भांडवल करता आले पाहिजे. आपले दुर्गुणही राज्याच्या हितासाठी कसे आवश्यक आहेत हे प्रजेला पटवून देता आले पाहिजे.

१४) राजाने कृषी, वाणिज्य, संगीत, कला, साहित्य याक्षेत्रातील व्यक्तींना राजाश्रय द्यावा. कारण जनमाणसात त्यांचे आदराचे स्थान असते. त्यांच्याकडून राजाला मिळालेली पसंती राजाचे स्थान आणखी बळकट करते.

१५) राजाने केलेली अलौकिक कामगिरी कोणत्या-ना-कोणत्या मार्गांनी सतत लोकांच्या नजरेत राहील असे पहावे.

१६) राजाने साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारावे. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद या नीतीचा अवलंब करून आपले शक्तीप्रदर्शन करावे.

अशाप्रकारे मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश हा राजाला अधिक संपन्न, सामर्थ्यवान व शक्तीशाली बनविण्यासाठी केला असून त्यातून मॅकियाव्हेली निरंकूश राजा तयार करू इच्छितो. पण ही निरंकुशता जनकल्याणासाठी व राज्याच्या सुरक्षिततेसाठी असल्याने दिसून येते. त्यात स्वतःचा स्वार्थनाही. त्यामुळे या विचारांचे महत्व कायम आहे.

### ३.२.५ मॅकियाव्हेली आधुनिक राजकीय विचारांचा जनक :

आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे मॅकियाव्हेलीला म्हटले जाते कारण मॅकियाव्हेलीने मध्ययुगातील रुढी, परंपरांचे खंडन करून आधुनिक व्यवहारवादी युगाचा पाया घातला. याबरोबरच त्याने मध्ययुगातील प्रचलित विचारांचा शेवट केला. आधुनिक राजकीय विचारांची मांडणी करताना त्यांनी महत्वाच्याबाबींचा पुरस्कार केला. शास्त्रीय अभ्यास पद्धतींचा वापर केला व राजकारणापासून विकृत धर्माला दूर केले.

**१) मनुष्यनिर्मित कायद्याला मान्यता**

मॅकियाव्हेलीने मनुष्यनिर्मित कायद्याचे अस्तित्व मान्य करून, दैवी कायदा नाकारला. मध्य युगात दैवी कायद्याना महत्वाचे स्थान होते व पाप-पुण्य, इहलोक-परलोक या कल्पनांवर ते आधारित होते. धर्म राजापेक्षा श्रेष्ठ होता. मॅकियाव्हेलीने राज्यनिर्मित कायद्याचे श्रेष्ठत्व मान्य करताना कायद्याची निर्मिती देवाने नाहीतर

राजाने केली आहे. स्वर्गप्राप्ती हा त्याचा हेतू नसून, राज्यात राजाने केली आहे. स्वर्गप्राप्ती हा त्याचा हेतू नसून, राज्यात शांतता व सुव्यवस्था टिकवणे हा आहे असे स्पष्टीकरण केले.

**२) सर्वश्रेष्ठ राज्यसंस्था**

मध्ययुगात ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून पोचला श्रेष्ठ समजण्यात येत होते. पण इटलीतील चर्चचे धर्मगुरू भ्रष्ट, चारित्र्यहिन व निरंकुश बनले चर्चमुळे अनैतिकता मोठ्या प्रमाणात वाढली अशी मॅकियाव्हेलीची पक्की धारणा होती.

यातून बाहेर पडण्यासाठी त्याने राज्यसंस्थेला सर्वश्रेष्ठ स्थान दिले समाजातील इतर सर्वसंस्थांना गौण स्थान देऊन, त्या सर्व आपल्या कार्याबाबत राजाला जबाबदार राहतील असे स्पष्ट केले. पोपचे महत्व नष्ट करून धर्मसंस्था ही राज्यसंस्थेच्या आधीन करण्याचे काम मॅकियाव्हेलीने केले.

**३) राष्ट्र–राज्याच्या कल्पनेचा पुरस्कर्ता**

राष्ट्र–राज्य हे सर्वोच्च किंवा अंतिम राज्य आहे, असे मॅकियाव्हेलीने मत होते राष्ट्र–राज्याचा पुरस्कार करणारा तो पहिला विचारवंत होता. राज्यात एकात्मता निर्माण करण्यासाठी समान रुढी, परंपरा, भाषा, धर्म व कायदे असावेत असे त्याचे मत होते. राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणाऱ्या घटकांची त्याला जाणीव होती. त्यानेच राष्ट्र–राज्याच्या कल्पनेचा प्रथम पुरस्कार केला.

**४) राज्याच्या शक्ती सामर्थ्यावर विश्वास**

जनतेने राजाच्या आज्ञेचे पालन करावे. यासाठी व राज्य टिकविण्यासाठी शक्तीचा वापर करावा असे मॅकियाव्हेलीचे मत होते. शक्तीच्या वापराशिवाय राज्यात सुव्यवस्था राहू शकत नाही असे त्याचे मत होते. आधुनिक काळात जगातील सर्वच राष्ट्रे शक्तिसामर्थ्य वाढविण्यात गुंतलेली दिसतात.

**५) व्यक्तिवादाचे बीजारोपण**

राज्याला सर्वोच्च स्थान दिले असेल तरी शासकाने व्यक्तीच्या संपत्तीचे व जीवितोचे सरंक्षण करावे असे त्याने म्हटले आहे. व्यक्तीगत बाबीचे अपहरण हा मोठा अपराध मानून, व्यक्तीची संपत्ती हडप करण्याचा अधिकार तो राजाला देत नाही. अशाप्रकारे व्यक्तीवादाचे समर्थन मॅकियाव्हेलीने केले.

**६) ऐतिहासिक पद्धतीने विश्लेषण :**

धार्मिक दृष्टांतावरून सिद्धांताचे स्पष्टीकरण करणे अयोग्य व अव्यावहारिक आहे असे स्पष्ट करून मॅकियाव्हेलीने आपल्या सिद्धांताच्या स्पष्टीकरणासाठी ऐतिहासिक दाखले दिले आहेत. ही बाब पूर्णपणे दोषरहित नसली तरी पुढील विचारवंतांना एक नवी दिशा देते.

**७) राजकारणापासून धर्म आणि नीतीची फारकत**

राजाने धर्म व नीतीचा विचार न करता राज्य कायम स्वरूपी टिकविण्यासाठी कोणत्याही नैतिक–

अनैतिक, योग्य-अयोग्य, साधनांचा वापर केला तरी तो न्यायच ठरेल असे मत मांडले. साधनांची नैतिकता त्याच्या साध्यावरून ठरवून मॅकियाव्हेलीने राज्याला धर्म आणि नैतिकतेच्या बंधनातून इतिहासात प्रथमच मुक्त केले.

**८) मनुष्यनिर्मित राज्य**

इतिहासातील प्रचलित सर्व सिद्धांत खोडून काढत राज्य ही दैवी संस्था नसून मनुष्यनिर्मित आहे असा विचार मॅकियाव्हेलीने मांडला. समाजात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्याची निर्मिती झाली आहे स्वर्गप्राप्तीसाठी नाही असे मत त्याने मांडले.

**९) व्यावहारिक दृष्टीकोन**

मॅकियाव्हेली आपले विश्लेषण करताना व्यावहारिकतेवर भर देतो. धर्म, नीतीच्या काल्पनिक व आध्यात्मिक साधनांवर विश्वास न ठेवता तो साध्य गाठण्याला महत्व देतो.

मॅकियाव्हेलीचे वरील सर्व विचार लक्षात घेऊन त्याला आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे संबोधले जाते.

## ३.३ सारांश :

मॅकियाव्हेलीने निरीक्षणात्मक, शास्त्रीय व वास्तववादी अध्ययन पद्धतीने आपले राजकीय विचार स्थिर करताना, पारंपरिक अध्ययनातील अतिधार्मिकता नाकारली. धार्मिकतेतून राजकीय तत्वज्ञानास मुक्त करताना जे प्रत्यक्ष अनुभवता येते, अशाच आधारांवर निष्कर्ष काढण्याची पद्धती वापरली. इटलीची तत्कालीन परिस्थिती पाहूनच मनुष्य स्वभावतःच स्वार्थी व दुष्ट असतो अशा निष्कर्षापर्यंत तो पोहचला पण अशा मनुष्यास स्वतःच्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणासाठी राज्यसंस्थेची आवश्यकता निर्माण झाली. या गरजेतून राज्यसंस्थेची निर्मिती झाली, हे प्रतिपादन करताना त्यासंबंधीचा दैवी सिद्धांत मॅकियाव्हेली खोडून काढतो.

राजकारणाची धर्म आणि नैतिकतेपासून फारकत करून मॅकियाव्हेली आधुनिक विचारवंताच्या पंक्तीत येतो. नैतिकतेला व धार्मिकतेला तो राज्याचा आधार मानायला तयार नाही. राज्याच्या हितासाठी राजाला अनैतिक व अधार्मिक कार्य करण्याची तो मुभा देतो. राजा कायद्याचा निर्माता असल्याने तो कायद्याच्या सीमेबाहेर असतो आणि नैतिकतेसंबंधी कायेदबनवले तर तो नैतिकतेच्या सीमेबाहेर असतो. असे स्पष्ट करून, मॅकियाव्हेली निरंकुश राजाचे समर्थन राज्यसंस्थेच्या सुरक्षिततेसाठी करताना दिसतो. राज्यसंस्था स्थिर होण्यासाठी राजाने कशाप्रकारे वर्तन करावे याविषयी मॅकियाव्हेली राजाला उपदेश करतो. त्याच्यामते राजाने नैतिक-अनैतिक, न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य अशा कोणत्याही साधनांचा वापर करून राज्याचे संरक्षण व सामर्थ्य यामध्ये वाढ करावी.

राज्यसंस्था मानव निर्मित आहे त्याने हे स्पष्ट केले. मनुष्य निर्मित कायद्यांना मान्यता व दैवी कायद्यांना नाकारणारा मॅकियाव्हेली आधुनिक युगातील पहिला विचारवंत आहे. राज्यसंस्थेला सर्वश्रेष्ठ स्थान देतानाच

व्यक्तीवादाचे समर्थन मॅकियाव्हेली करतो. राज्याच्या शक्ती सामर्थ्यावर विश्वास ठेवून अंतिम राज्य म्हणजे राष्ट्र-राज्य होय अशी संकल्पना मांडणारा तो पहिला विचारवंत आहे. अशा प्रकारे आधुनिक राज्यशास्त्राला पोषक ठरणाऱ्या अनेक संकल्पनांची मांडणी सर्वप्रथम मॅकियाव्हेलीने केली म्हणून त्याला आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे संबोधले जाते.

## ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१) **धर्मसुधारणा चळवळ** – पोप व चर्च यांच्या भ्रष्ट व अनियंत्रीत सत्ते विरूद्धची चळवळ

२) **पुनरूज्जीवन** – ग्रीक विचारांची पुनर्मांडणी

३) **इहलोक** – जगाच्या संदर्भात व जगासंबंधी मानवाचा केलेला विचार

४) **जीविताची** – जीवनाची / आयुष्याची

५) **दंडशक्ती** – नियमभंगाबाबत शिक्षा देणारी सत्ता

६) **फारकत** – वेगवेगळे करणे

७) **नास्तिक** – ईश्वर न मानणारा

८) **राजतंत्र** – राजेशाही

९) **प्रजातंत्र** – लोकांचे राज्य

१०) **उपदेश** – सल्ला देणे

११) **धूर्तपणा** – चाणाक्षपणा

१२) **गिळंकृत करणे** – नाश करणे, आपल्यात सामावून घेणे

१३) **निरकूंश** – ज्याच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असा

१४) **राष्ट्र** – एकतेची भावना जपणारा समूह

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. मॅकियाव्हेलीचा जन्म कोणत्या ठिकाणी व किती साली झाला?

२. मॅकियाव्हेलीच्या दोन ग्रंथांची नावे लिहा.

३. मॅकियाव्हेलीने अध्ययनासाठी कोणत्या पद्धतींचा वापर केला?

४. मॅकियाव्हेलीचे निधन कधी झाले?

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

१) मॅकियाव्हेलीच्यामते मनुष्य निसर्गतः कशा प्रवृत्तीचा असतो?

२) मनुष्याला सर्वात जास्त भीती कशाची वाटते?

३) राजाने प्रजेवर कसे राज्य करावे?

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

१) मॅकियाव्हेलीने राजकारणाची कशापासून फारकत केली?

२) नैतिकतेचे प्रकार सांगा.

३) मॅकियाव्हेलीच्या मते राज्य कोणी निर्माण केले?

४) व्यक्तीचे कल्याण कोण करू शकते असे मॅकियाव्हेलीली वाटते?

५) मॅकियाव्हेलीने राज्याच्या निर्मिती संबंधीचा कोणता सिद्धांत खोडून काढला?

**स्वयं अध्ययन प्रश्न–४**

१) मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी कशाचे वर्गीकरण केले आहे?

२) प्रजातंत्र श्रेष्ठ का असते?

३) राज्याच्या सुरक्षिततेसाठी राजाने कशाकडे लक्ष देऊ नये?

४) कोणत्या देशात निरंकूश राजतंत्र पाहिजे?

५) मॅकियाव्हेली सर्वात कट्टर विरोधक कोणत्या शासन पद्धतीचा होता?

**स्वयं अध्ययन प्रश्न–५**

१) राजाकडे कोणते गुण असावेत?

२) राजाने कोणत्या गोष्टींना धक्का पोहचवू नये?

३) मनुष्य कोणत्या दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो?

४) मॅकियाव्हेलीने राजाला उपदेश कशासाठी केला?

**स्वयं अध्ययन प्रश्न–६**

१) मॅकियाव्हेलीने कोणत्या कायद्याला मान्यता दिली?

२) कोणत्या संस्थेला मॅकियाव्हेलीने सर्वोच्च स्थान दिले?

३) आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे कोणास म्हणतात?

४) मॅकियाव्हेलीने कशाचे बीजारोपण केले?

**उत्तरे :**

**स्वयं अध्ययन प्रश्न–१**

१) मॅकियाव्हेलीचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स या ठिकाणी १४६९ साली झाला.

२) १) दि प्रिन्स २) डिस्कोर्सेस ऑफ लिव्ही

३) मॅकियाव्हेलीने अध्ययनासाठी ऐतिहासिक, निरिक्षणात्मक, वास्तववादी शास्त्रीय व तौलनिक पद्धतीचा वापर केला.

४) मॅकियाव्हेलीचे निधन २० जून १५२७ मध्ये झाले.

**स्वयं अध्ययन प्रश्न–२**

१) मॅकियाव्हेलीच्यामते मनुष्य निसर्गतः स्वार्थी व दुष्ट प्रवृत्तीचा असतो.

२) मनुष्याला आपल्या जीविताच्या व संपत्तीच्या संरक्षणाची सर्वात जास्त भीती वाटते.

३) राजाने प्रजेवर दंडशक्तीच्या भीतीने राज्य करावे.

**स्वयं अध्ययन प्रश्न–३**

१) मॅकियाव्हेलीने राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत केली.

२) नैतिकतेचे दोन प्रकार १) व्यक्तिगत नैतिकता आणि २) जन किंवा लोकनैतिकता होय.

३) मॅकियाव्हेलीच्या मते राज्य मानवाने निर्माण केले.

४) व्यक्तीचे कल्याण राज्यच करू शकते असे मॅकियाव्हेलीला वाटते.

५) मॅकियाव्हेलीने राज्याच्या निर्मिती संबंधीचा दैवी सिद्धांत खोडून काढला.

**स्वयं अध्ययन प्रश्न–४**

१) मॅकियाव्हेलीने आदर्श राज्याच्या स्पष्टीकरणासाठी शासनसंस्थेचे वर्गीकरण केले आहे.

२) प्रजातंत्रात व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्वाचा सर्वागीण विकास करण्याची संधी व त्यासाठी अनुकूल परिस्थिती मिळते म्हणून ते श्रेष्ठ असते.

३) राज्याच्या सुरक्षिततेसाठी राजाने न्याय अन्याय, योग्य–अयोग्य वा नैतिक–अनैतिक अशा कोणत्याच गोष्टीकडे लक्ष देऊ नये.

४) ज्या देशात स्वार्थ शिगेला पोहचला असेल, व्यक्ती हिताकडे जास्त लक्ष असेल, चारित्र्यहीन प्रजा व भ्रष्टाचार असेल अशा देशात निरंकुश राजतंत्र पाहिजे.

५) मॅकियाव्हेली सर्वात कट्टर विरोधक कुलीन तंत्र या शासन पद्धतीचा होता.

**स्वयं अध्ययन प्रश्न–५**

१) राजाकडे सिंहाचे क्रौर्य व कोल्ह्याचा धूर्तपणा हे गुण असावेत.

२) राजाने प्रजेच्या संपत्तीला व स्त्रीच्या स्त्रीत्वाला/ चारित्र्याला धक्का पोहचवू नये.

३) मनुष्य   १) भिती २) भिती या दोन कारणांनी दुसऱ्याच्या आज्ञा पाळतो.

४) मॅकियाव्हेलीने राजाला अधिक संपन्न, सामर्थ्यवान व शक्तीशाली बनविण्यासाठी उपदेश केला.

**स्वयं अध्ययन प्रश्न–६**

१) मॅकियाव्हेलीने दैवी कायदा नाकारून मनुष्यनिर्मित कायद्याला मान्यता दिली.

२) मॅकियाव्हेलीने सर्वात श्रेष्ठ स्थान राज्यसंस्थेला दिले.

३) आधुनिक राजकीय विचारांचा जनक असे मॅकियाव्हेलीस म्हणतात.

४) मॅकियाव्हेलीने व्यक्तिवादाचे बीजारोपण केले.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.**

१) मॅकियाव्हेलीच्या मनुष्यस्वभावासंबंधी विचारांचे विश्लेषण करा.

२) आधुनिक राजकीय विचारांचा जनक म्हणून मॅकियाव्हेलीचे योगदान विषद करा.

३) मॅकियाव्हेलीचे शासनाचे वर्गीकरण स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) राजकारणाची धर्म व नैतिकतेपासून फारकत व मॅकियाव्हेली.

२) मॅकियाव्हेलीने राजाला केलेला उपदेश.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ :


१) काणे प. सि., काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ

२) गर्देदि. का, पाश्चात्य राजकीय विचारप्रवाह, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.

३) शृंगारपुरे अरविंद, पाश्चिमात्य राजकीय विचारक, मंगेश प्रकाशन, नागपूर.

४) नांदडेकर व. गो., राजकीय विचार आणि विचारवंत

५) देवरे पी. डी., निकुंभ डी. एस., पाश्चिमात्य राजकीय विचारवंत


❍❍❍

घटक ४

# जीन जॅक रूसो


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ जीवन परिचय
- ४.२.२ निसर्गावस्थेवरील विचार
- ४.२.३ सामाजिक करारासंबंधी विचार
- ४.२.४ सामूहिक इहेचा सिद्धांत
- ४.२.५ सार्वभौमत्त्वाचे विचार
- ४.२.६ राज्य आणि शासनसंस्थाविषयक विचार

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

- जीन जॅक रूसोच्या निसर्गावस्थेवरील विचाराचे आकलन होईल.
- रूसो सामाजिक करारासंबंधी विचार स्पष्ट होईल.
- रूसोच्या सामूहिक इंहेचा सिद्धान्त समजून घेईल.
- रूसोचे सार्वभौमत्त्वाविषयी विचार स्पष्ट होईल.

● रूसोचे राज्य आणि शासन संस्थाविषयक विचार समजून येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

राज्यशास्त्र विषयामध्ये पाश्चात्य राजकीय विचार ही एक महत्त्वाची शाखा आहे. त्यात प्रामुख्याने ग्रीक विचारवंतापासून आजपर्यंतच्या सर्व विचारवंतांचा अभ्यास केला जातो. ग्रीक विचारवंतामध्ये सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल या विचारवंतांचा अभ्यास केला जातो. आधुनिक राजकीय विचारांमध्ये मॅकिआव्हेली हा विचारवंत महत्त्वाचा आहे. राज्याची निर्मिती संबंधी अनेक विचारवंतांनी वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत. परंतु पाश्चात्य राजकीय विचारवंतामध्ये हॉब्ज, लॉक, रूसो या विचारवंतांनी सामाजिक कराराची मांडणी करून राज्यनिर्मितीसंदर्भातील नवा सिद्धांत मांडला आहे. त्यामुळे याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये रूसो यांच्या विचाराचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय–विवेचन :

जीन जॅक रूसो हा फ्रेंच विचारवंत आहे. त्याने अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. त्या ग्रंथामध्ये मानवी स्वभावासंबंधी, निसर्गावस्था, सामाजिक करार, सामूहिक ईहा, राज्य व शासनसंस्था, सार्वभौमत्व इत्यादी विचारांची मांडणी केली आहे. या विचारांची प्रस्तुतता आजही आहे. आज जगातील अनेक गोष्टी पाहिल्यानंतर विचारवंतांनी मांडलेल्या विचारातून स्पष्टपणे दिसून येतात किंवा येणाऱ्या अडचणीवर त्यातून मात करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे विचारवंताचे विचार किंवा कल्पनांचा अभ्यास आवश्यक आहे, त्यांनी मानवी स्वभावासंबंधी केलेले वर्णन हे हॉब्जपेक्षा वेगळे आहे. कारण हॉब्जने माणूस हा जन्मत:च वाईट असतो, असे म्हटले. परंतु रूसो किंवा लॉक यांनी मात्र माणूस स्वभावत: चांगला असतो, अशी भूमिका मांडली आहे. तसेच सामाजिक करार यामध्ये भिन्नता असली तरी सामूहिक ईहेची कल्पना महत्त्वाची आहे, या रूसोच्या सर्व विचारांची चर्चा या प्रकरणामध्ये करणार आहोत.

### ४.२.१ जीवन परिचय

जीन रुसोचा जन्म स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे २८ जून १७१२ रोजी झाला. त्याचे वडील आयझॅक हे घड्याळ दुरुस्त करणारे एक साधारण फ्रेंच कलाकार होते. रुसोच्या जन्मानंतर अवघ्या दहा महिन्यातच त्याच्या आईचे निधन झाले. त्याच्या वडिलांवर दुसऱ्याची हत्या करण्याचा आरोप होता. त्यामुळे त्यांनी पलायन केले व रुसोला त्याच्या चुलत्याकडे रहावे लागले. जीवनात रुसोला अनंत अशा अडचणींना सामोरे जावे लागले. आपल्या आत्मचरित्रात मध्ये त्याने अनेक बाबींची कबुली दिली आहे, त्यावरून त्याच्या नितिभ्रष्ट वागण्याची एक कल्पना येते.

रुसो आपल्या आत्मचरित्रात म्हणतो की, आपल्यामध्ये अल्पावधीतच वाचनाची आवड निर्माण झाली व इतर मुलांपेक्षा प्रचंड आकलनशक्ती उत्पन्न झाली. अनेक वेळा वाचनातील बराच भाग त्याला कळत नसे. परंतु त्याच्या मनावर विशेष संवेदना उमटत असत. अशा प्रकारच्या गुढ व अव्यक्त भावना ज्या त्याच्यात विकसित झाल्या त्यांचा रुसोच्या पुढील जीवनावर एवढा खोलवर प्रभाव झाला की, त्यामधून तो शेवटपर्यंत

बाहेर पडू शकला नाही. रुसो सोळा वर्षांचा असताना फ्रान्समला पळून गेला. तो उनाड अवस्थेत भटकत राहिला. त्याच्या गर्विष्ठ व अहंकारी स्वभावामुळे मित्र टिकवता आले नाहीत. फ्रान्समध्ये तो एका कॅथॉलिक पाद्रीला शरण गेला  व कॅथॉलीक पंथाची दिक्षा घेतली. त्याचा अनेक स्त्रियांशी संबंध आला, पण तो कुठेच एकनिष्ठ राहिला नाही. थेरशी नावाच्या महिलेपासून त्याला पाच अपत्ये झाली. परंतु त्यांची जबाबदारी न स्विकारता त्याने सर्वांना अनाथालयात पाठविले. सव्वीस वर्षे तिच्या सोबत संसार केल्यावर त्याने तिच्याशी लग्न केले. अशा प्रकारचे त्याचे वैयक्तिक जीवन हे बेशिस्त पद्धतीचे होते. त्याच्या मित्राच्या सहाय्याने फ्रेंच दुतावासात नोकरी मिळाली परंतु ती त्याला टिकवता आली नाही. १७४९ मध्ये त्याच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. 'डी. जॉन अकादमी'ने एक निबंधस्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये त्याने 'शास्त्र व कला यांच्या प्रगतीने नैतिक जीवन उन्नत केले की अवनत केले' हा निबंध लिहिला व त्याच्या या निबंधाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. यामध्ये त्याने मांडलेला विचार थोडक्यात असा होता की, जेवढ्या मोठ्या प्रमाणात शास्त्र व कलेत वृद्धी झाली त्याच प्रमाणात मानवी मन व त्यातून मानवाचे वर्तन भ्रष्ट झाले.

१७५८ साली 'Discources on Political Economy' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. १७६२ साली त्याचे दोन गाजलेला ग्रंथ प्रसिद्ध झाले. ते म्हणजे Social Contract आणि 'Emile' ह्या ग्रंथातील विचारसरणांमुळे त्यांना फार त्रास दिला गेला. ह्या ग्रंथामुळे त्याला फ्रान्समधून स्वित्झर्लंडमध्ये व तेथून इंग्लंडमध्ये जावे लागले. तेथे त्याने आपल्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टीचे व भावभावनांचे स्पष्ट व यथार्थ असे लिखाण केले. परिणामी, त्याला इंग्लंड देखील सोडावे लागले व शेवटी २ जुलै १७७८ रोजी मानसिक वृत्तीने पछाडलेल्या अवस्थेतच त्याचा मृत्यू झाला. त्याने आत्महत्या केली, असे काहींचे मत आहे. त्याच्या विचारसरणीची फ्रान्सच्या क्रांतिकारकांना प्रेरणा मिळाली. त्या प्रेरणा व स्फुर्तीचा परिणाम म्हणून फ्रेच राज्यक्रांती यशस्वी झाली, असाही विचार पुढे आला. त्याच्या विचारांच्या क्रांती यशस्वी करणाऱ्या क्रांतीकारकांनी त्याचा मृतदेह सन्मानाने पॅरिस येथे आणून त्याला दफन केले.

रुसाने आपल्या आयुष्यामध्ये अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यातील महत्त्वाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.

१) The Discources on Art's and Science, 1744.

२) The Discources on the origin of Inequality, 1774.

३) An Introduction to Political Economy, 1752.

४) Social Contrat - 1761

५) The Emile - 1762

रुसो यावरती ग्रीक विचारवंताबरोबरच हॉब्ज व लॉक या विचारवंताचा प्रभाव पडलेला आहे. तसेच तत्कालीन परिस्थितीचाही त्याच्यावर प्रभाव होता.

**१) ग्रीक विचारवंतांचा प्रभाव :** प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या विचारांप्रमाणे रुसो मनुष्य हा सामाजिक

प्राणी आहे, असे मानतो. त्याने कल्पीलेली निसर्गावस्था कितीही चांगली असली तरी परत त्या अवस्थेत जाणे अयोग्य मानून राज्यातच व्यक्तिला विकास करवून घेणे शक्य असल्याचे प्रतिपादन करतो. राज्याचे श्रेष्ठत्व मानल्याचे कारण कायदा नसून नैतिकता आहे, असे प्लेटोचे शब्द त्याच्या आवाजातूनच पुन्हा ऐकावयास येतात, असे म्हटले आहे.

**२) हॉब्ज व लॉकच्या सामाजिक कराराचा प्रभाव :** हॉब्जच्या प्रभावामुळे त्याचे विचार निरंकुश व व्यक्तिवादी स्वरूपाचे व निरंकुश सार्वभौमत्त्वाचे समर्थन केल्याचे निदर्शनास येतो.

**३) तत्कालीन परिस्थिती :** त्याच्या स्वत:च्या घरातील वातावरणाचा व संस्कृतीचा, गरीबीचा त्याच्या लिखाणावर मोठा प्रभाव दिसून येतो. बालपणापासूनच त्याची झालेली अबाळ, विविध प्रवृत्तीची संपर्कात आलेली माणसे त्या सर्वांच्या विचारांचा रूसोवर प्रभाव पडला आहे.

**४) फ्रान्समधील राजकारण :** फ्रान्समधील दुतावासात त्याने केलेले काम त्यादरम्यान त्याचा अनेक व्यक्तिंशी आलेला संपर्क याही गोष्टींचा प्रभाव त्याच्या विचारांवर पडला. 'Emile' या ग्रंथामुळे त्याला जीवन अस्थिर जगावे लागले.

या सर्व घटकाचा त्याच्या जिवनावर प्रभाव होता. यामध्ये भेटलेल्या वेगवेगळ्या लोकांच्यामुळे मनुष्य स्वभावासंबंधीचे विचार स्पष्ट केले आहेत.

**मानवी स्वभावाविषयीचे विचार :**

'Discources on the origin of Inequality' या ग्रंथामध्ये रुसोने मानवी स्वभावासंदर्भात आपले विचार मांडले आहेत. प्लेटोच्या मते, मानव हा स्वभावत:च चांगला आहे, या विधानाला रुसो मान्यता देतो. मानवी स्वभावाचे सामाजिक कराराच्या दोन पुरस्कर्त्यांनी (हॉब्ज व लॉक) परस्पर विरोधी विचार मांडले आहेत. रुसो हॉब्जप्रमाणे मानवाला स्वार्थी व दृष्ट मानत नाही, तर तो लॉकप्रमाणे माणूस स्वभावत:च चांगला आहे, असे मानतो. समाजाच्या संपर्कामुळे माणूस दुर्गुणी बनला, असे रुसोचे मत आहे.

रुसोच्या मते, मनुष्य स्वभावनिर्मिती मागे दोन प्रेरणा असतात. त्यामध्ये एक आत्मप्रेम किंवा स्वसंरक्षण भावना व दुसरा सहानुभूती किंवा परस्पर सहकार्य होय. रुसो म्हणतो, माणसाचा पहिला कायदा स्वसंरक्षण करणे असून त्याला आपली स्वत:ची काळजी असते. माणसात जर स्वभावत:च ही भावना नसती तर तो प्राचीन काळातच नष्ट झाला असता. आत्मप्रेमामुळेच व्यक्ती आपले संरक्षण करत असते. सहानुभूती व परस्पर सहकार्यामुळे मानवी जीवन सुखी झाले आहे. ही प्रवृत्ती व्यक्तिमध्ये नसती तर संघर्षातून मानवी जीवन जगणे कठीण झाले असते. सहानुभूती व परस्पर सहकार्य हीच भावना कुटुंबाचा आधार असते. माणसाच्या स्वभावाच्या आत्मप्रेम व सहानुभूती या दोन मूळ प्रवृत्ती असून इतर भावनांची निर्मिती या प्रवृत्तींवर आधारित असते. रूसोच्या मते, या दोन्ही भावनामध्ये कधी कधी संघर्ष होतो. दोन्ही भावना एकाच वेळी संतुष्ट होत नाहीत. अशावेळी मनुष्य करार करायला तयार होतो. या दोन्हींच्या संघर्षातून जी भावना निर्माण होत, त्याला रूसो जाणीव किंवा अंत:करण (Conscience) म्हणतो.

ही भावना शिक्षण किंवा बुद्धीमुळे निर्माण होत नाही. कारण अंत:करण या दोन्हीच्याही अगोदर आहे. ती नैसर्गिक भावना आहे, देणगी आहे. अंत:करण सत्यावर प्रेम करावयास तर असत्याची घृणा करावयास सांगते. सत्कार्याची प्रेरणा देते. ती केवळ एक नैसर्गिक शक्ती आहे. अंत:करणाला सत् असत् यात फरक करता येत नाही. अधिक तपशील सांगताना रुसो म्हणतो, माणूस विवेकाद्वारे समाजात राहूनच आपला संपूर्ण विकास करू शकतो. जोवर माणूस आपल्या विवेक व अंत:करण प्रवृत्तीवर समन्वय साधू शकतो तोपर्यंत तो स्वाभाविक असतो. चांगला असतो. परंतु जेंव्हा विपरीत घडते तेव्हा विकृती निर्माण होते. म्हणजेच असे म्हणता येईल की, मनुष्य स्वभावत:च चांगला आहे. त्याचे अध:पतन होण्यास कारण त्याचे आत्मप्रेम होय. हे आत्मप्रेम दंभामध्ये परिवर्तीत होते. माणसाने विवेकाला दंभापासून दूर ठेवेल. तर तो अत्यंत चांगला व आदर्श राहू शकेल.

### ४.२.२ निसर्गावस्थावरील विचार :

'Discourses on the Art's and Science' मध्ये रुसोने नैसर्गिक अवस्थेचे वर्णन केले आहे. नैसर्गिक अवस्था व तत्कालीन अवस्था त्याचे तुलनात्मक विचार त्याने मांडले आहेत. नागरी समाजापेक्षा नैसर्गिक अवस्थेतील व्यक्तिला व त्याचा जीवनालाच रुसो श्रेष्ठ मानतो.

निसर्गावस्थेतील माणूस सुखी व आनंदी जीवन जगत होता. सहजीवनाचा आल्हाद त्याला स्वच्छंद फुलपाखरासारखा अनुभवत येई. निसर्गावस्थेतील मानवाचे कुणाशीही भांडण किंवा द्वेष करीत नव्हता. नसत. अशा मानवाला तो उदात्त वनचर (Noble Savage) असे म्हणतो.

नैसर्गिक अवस्था म्हणजे अत्यंत सुखमय अशी स्थिती होय, ते युग म्हणजे सुवर्णयुग होते. रुसो निसर्गावस्थेतील माणूस एकांत, आनंदी व निश्चित जीवन जगत होता, असे गृहीत धरून चालतो. माणसाला भाषा व पोषाख अवगत नव्हती. त्याच्यावर कोणतेही बाह्य बंधन नव्हते. त्याचे जीवन निर्दोष असल्याने आनंदी होते. बुद्धी, विचार आणि संस्कृती ह्यांचा प्रभाव पडल्यामुळे मानवाचे खरे आणि सुखी जीवन नष्ट झाले. बुद्धी आणि विचार यामुळे मानवामानवात अलगपणा निर्माण झाला. संस्कृतीमुळे मानवात संशय, दिखाऊपणा, मत्सर ढोंगीपणा इत्यादिकाची निर्मिती झाली. ज्ञानात वाढ झाल्यामुळे आदराची भावना नष्ट झाली. शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीबरोबर श्रद्धा घटत गेली. बुद्धीनिष्ट दृष्टिकोन स्विकारला गेल्यामुळे नैतिकेतेचे महत्त्व कमी होत गेले. ह्यासाठी मानवाने आपल्या मूळ निसर्ग अवस्थेमध्ये गेले पाहिजे. म्हणजे मानवाला पुन्हा एकदा मुक्त आणि सुखी जीवन जगता येईल. त्यामुळे रूसो असे सुचवतो की, चुकीच्या ज्ञानाऐवजी योग्य ज्ञान आणि सामर्थ्य कमी न करणारी संस्कृती ह्यांचा अंगीकार यापुढे केला पाहिजे.

नैसर्गिक अवस्थेसारखी उदात्त अशी अवस्था नष्ट का झाली असावी, याबद्दल रुसो म्हणतो, ‘निसर्गावस्थेतील परिवर्तनाचे कारण स्वातंत्र्य व समतेचा ऱ्हास हा होय. विवेकाच्या उदयामुळे आदिम मानवाला स्थिर कौटुंबिक जीवन व्यतित करण्यासाठी खासगी संपत्तीची कल्पना सुचली असावी. रुसो म्हणतो, ज्या माणसाने एखादा भूखंडाभोवती कुंपण घालून हा भूखंड माझा आहे, अशी घोषणा प्रथम केली इतर व्यक्तींनी भाबडेपणाने त्यावर विश्वास ठेवला, तो राजकिय समाजाचा संस्थापक ठरतो, अशा प्रकारे खाजगी संपत्तीच्या उदयामुळे ‘तुझे व माझे’ शब्द अस्तित्वात येऊन माणसाचे आदिम जीवन बदलून गेले.

समाजातील बुद्धीवंतांनी अल्पश्रमात जास्तं संपत्ती प्राप्त करण्याचे उपाय शोधून काढले. परिणामत: समाजात धनिक व निर्धन असे दोन वर्ग उदय झाले. स्थिर कौटुंबिक व्यवस्थेमुळे मित्रत्वाऐवजी शत्रूत्व, सहानुभूती ऐवजी स्वार्थ बळावल्याने जीवन अस्थिर बनले. अशा परिस्थितीत परत निसर्गावस्थेकडे प्रवास करणे शक्य नव्हते. माणसाला नैसर्गिक अवस्थेसारखे चांगले जीवन हवे होते. या कारणामुळे मानवाला सामाजिक कराराच्या माध्यमातून राजकिय समाजाची स्थापना करावी लागली. या करारातून मानवाला निसर्गावस्थेचे जीवन प्राप्त होईल अशी रुसोला आशा होती.

### ४.२.३ सामाजिक करार (Social Contract) :

'Social Contract' या ग्रंथामध्य रूसोनी सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला आहे. रुसो म्हणतो की, जन्मत:च मनुष्य स्वतंत्र आहे, मात्र तो बंधनांनी वेढला गेला आहे. 'Man is born free but every where he is bounded in chains'. रूसोच्या मते, निसर्गत: मनुष्य सुखी, समाधानी, शांततेत जीवन जगत होता. ज्यावेळी समाजामध्ये संपत्ती संग्रह करण्याची प्रवृत्ती निर्माण होऊन तुझे-माझे ही भावना निर्माण झाली तेंव्हा समाजातील सुख, शांती लोप पावली. हिंसा, संघर्ष, लूटमार या प्रवृत्तीमुळे अराजकता निर्माण होऊन समाजातील सुख व शांतता संपुष्टात आली. सुखाची जागा कलहाने घेतली. शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी एका व्यवस्थेची गरज वाटायला लागली. या गरजेतून समाजामध्ये जो करार झाला तो म्हणजेच सामाजिक करार होय. रूसो जो सामाजिक करार सांगतो त्यानुसार स्वातंत्र्यही राहते आणि अधिकारही निर्माण होतो. निसर्गाव्यवस्थेतील स्वातंत्र्य कराराने नष्ट होत नाही. असंख्य व्यक्ती व्यक्ती समूहाबरोबर करार करतात. या करारातून समाज निर्माण होतो. रूसोच्या मते, समाजातील प्रत्येकजण सामूहिक इच्छेच्या सर्वोच्च नियंत्रणाखाली आपले सर्व अधिकार समर्पित करतो आणि सामुदायिक एकत्वाचा अविभाज्य घटक या नात्याने त्याचा परत स्विकार करतो. अशाप्रकारे निसर्गावस्थेतील प्रत्येक माणूस समाज घटकाचा एक भाग बनतो आणि सदस्य म्हणून नैतिक समाजाची निर्मिती करतो. रूसोंनी सांगितलेल्या करारामध्ये दोन बाजू आहेत. व्यक्ती करार करताना एक व्यक्ती असतो व दुसऱ्या बाजूला समाज असतो. सर्वजण व्यक्तिगत सर्वासाठी आपले अधिकार समर्पित केल्यामुळे कुणीही कुणाच्या अधिन नसतो. वास्तविक प्रत्येकजण पूर्वीइतकाच स्वतंत्र असतो. करारामुळे व्यक्तीला वास्तवरित्या काहीच गमवावे लागत नाही. उलट नैसर्गिक अधिकाराची हमी संरक्षण व सहकार्य या गोष्टी प्राप्त होतात. रूसोच्या सामाजिक करारामुळे सर्व व्यक्तीच्या आपले सत्व समाजार्पण करण्याच्या निर्णयामुळे, एक नैतिक आणि सामाजिक समाज निर्माण होत असतो. या समाजाला स्वत:चे व्यक्तीत्व आणि इच्छा असते. ही इच्छा म्हणजेच सामूहिक ईहा होय. रूसो म्हणतो की, व्यक्ती आपले स्वतंत्र एका एका व्यक्तीला अर्पण न करता सर्व समजाला अर्पण करीत असतात. त्यामुळे जे दिले जाते त्यापेक्षा जास्तच मिळत असतो. कारण जे स्वत: जवळ असते, त्याचे ती व्यक्ती उत्तम पद्धतीने रक्षण करू शकते. There is gained the equivalent of what is lost, with greater power to preserve what is left. एकूणच रूसोच्या सामाजिक करारामध्ये व्यक्तीला दोन भूमिका कराव्या लागतात. अशा प्रकारे सामाजिक करार महत्त्वाचा आहे. त्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) सर्वांना समानतेची निश्चिती :** करारातील सर्व सभासद आपले व्यक्तीत्व व सर्व अधिकार पूर्ण समाजाला समर्पित करतात. त्यामुळे सर्वजण एकाच पातळीवर कार्य करतात. समाजातील कोणालाही विशेषाधिकार असत नाहीत. सामाजिक संस्थेकडे सर्वश्रेष्ठत्व असते आणि प्रत्येक व्यक्ती त्या संस्थेची समान भागिदार असते.

**२) स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी :** जन्मत: माणूस स्वतंत्र असून तो सर्वत्र बंधनात आडकलेला आहे, असे रुसो सांगतो. नैसर्गिक अवस्थेत माणूस स्वतंत्र होता. पुढे विवेकाच्या उदयाने परिस्थिती अराजक बनली. सक्तीच्या आधारावर दुर्बलांवर जुलूम व्हावयास लागला. त्यामुळे स्वसंरक्षण व स्वातंत्र्य उपभोगल्यास सुविधा म्हणून कराराचे अस्तित्व आहे. सर्वजण नियम पालन केल्यानेच स्वतंत्र राहणार आहेत.

**३) सावयवी राज्य निर्मिती** (Organic State) **:** सामाजिक कराराद्वारे निर्मित राज्य हे एक जिवंत प्राण्यासारखे असते. संपूर्ण शरीरामुळे निरनिराळ्या अवयवांना महत्त्व असते व अस्तित्व असते. तसे राज्यामुळे व्यक्तींना अस्तित्व असते. व्यक्ती आपल्या सुखी जीवनाची, प्राप्ती केवळ राज्यातच करू शकते. या संदर्भात सेबाईन रुसोचे आधारभूत तत्त्व माणूस नसून नागरिक आहे आणि राजकीय नियंत्रण मूलत: नैतिक असून विधी किंवा व्यवस्था त्याचा दुय्यम पैलू आहे, असे म्हणतो.

**४) अधिक अधिकारांची प्राप्ती :** सामाजिक कराराची शब्दरचना अशा प्रकारची आहे ज्यात व्यक्तीला काही ही गमवावे लागत नाही. नैसर्गिक अधिकार व स्वातंत्र्य समाजाचा एक घटक म्हणून परत मिळते. सोबतच शांतता व सुरक्षीतता या दोन गोष्टींची प्राप्ती होते.

**५) समूहाला अधिकार बहाल :** रुसो नैसर्गिक अधिकार एका व्यक्तीकडे देत नाही तर ते संपूर्ण समाजाला बहाल करतो. व्यक्ती एकाच वेळी राज्याची सदस्य व सार्वभौम अधिकार धारण करणारी व्यक्ती असे दुहेरी व्यक्तीत्व रुसो देताना दिसतो.

**६) कराराचे सातत्य :** करार हा एकदाच घडलेली प्रक्रिया आहे असे रुसो मानत नाही तर ती सतत चालणारे आहे, असे म्हणतो. राज्याचा नागरिक म्हणून व्यक्ती सामूहिक इहेत भाग घेऊन कार्यास सहमती दर्शविते.

**७) सामुहिक इहेची निर्मिती :** सामुहिक इहा हा रुसोच्या सामाजिक कराराचा महत्त्वपूर्ण भाग अर्थात गाभा आहे, असे मानतो.

रुसोचा ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी डेव्हिड ह्युम याने राजा आणि प्रजा ह्यांचे संबंध कराराने ठरतात, हे इतिहासाशी विसंगत असल्याचे स्पष्ट केले होते. सर हेन्री मेन याने रुसोचा सिद्धांत अर्थशून्य असल्याचे सुचविले तर वुल्सी याने तो सर्वस्वी खोटा आहे असे सांगितले. सर फ्रेड्रीक पोलॉक यांच्या मते, सामाजिक कराराबाबतचा सिद्धांत म्हणजे, 'राजकिय क्षेत्रातील अनेक फसवणूकीपैकी अत्यंत यशस्वी आणि घातक ठरलेली अशी फसवणूक आहे.' जर्मन राज्यशास्त्रज्ञ ब्लंटश्ली याने, 'राज्य आणि राज्यातील संख्या व्यक्तीच्या लहरींवर आधारलेल्या असतात,' असे या सिद्धांताचे प्रतिपादन केलेले असल्यामुळे तो अत्यंत घातक आहे, असे मत व्यक्त केलेले आढळून येते.

सामाजिक करारामधील मुख्य दोष खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) इतिहासामध्ये असे एकही उदाहरण दाखविता येत नाही की, ज्या ठिकाणी राज्य करार करत स्थापन करण्यात आले.

२) पूर्वीच्या काळी कुटुंबाला महत्त्वाचे स्थान दिले जात असे, व्यक्तींना नाही.

३) प्राचीन काळी करार ही कल्पना अस्तित्वात नव्हती. ती अलीकडील काळातील संकल्पना आहे.

४) प्रत्येक करार हा करार करणाऱ्या व्यक्तीवर बंधनकारक असतो. त्याच्या वंशजावर नाही.

५) व्यक्ती जन्मत:च राज्याची नागरिक असते. राज्य आणि राज्यव्यवस्थेतील व्यक्ती याचे संबंध ऐच्छिक स्वरूपाचे नसतात.

६) निसर्गावस्थेत हक्क असू शकत नाहीत. ते निर्माण होण्यासाठी समाज आणि कायदा ह्यांची आवश्यकता असते.

७) एकाच व्यक्तीने दोन भूमिका स्विकारून करार केला, हे मान्य न होण्यासारखे आहे.

रुसोच्या विचारसरणीत अनेक संदिग्ध विचार असली तरी देखील ऐतिहासिक काळात या सामाजिक करार सिद्धांताने उपयुक्त कार्य केले आहे, हे मान्य करावे लागेल. राज्य मानवनिर्मित असून ते कराराने निर्माण झालेले आहे. हे क्रांतिकारक तत्त्व मांडून या सिद्धांताने राज्य ईश्वरनिर्मित आहे, या सिद्धांताला नाकारले. राजकीय तत्त्वज्ञानावर धार्मिक संकल्पनांचा वाढता प्रभाव देखील रुसोच्या सामाजिक करार सिद्धांताने रोखला असेच म्हणावे लागेल. रुसोने एकच करार झाला आणि त्यामुळे समाज आणि राज्य स्थापन झाले, असे स्पष्ट करून शासन संस्थेशी अगर सरकारशी दुसरा करार झाला नाही. सार्वभौम राजा हा करारातील एक पक्ष नसतो तेंव्हा साधनसंस्थेची सत्ता सामाजिक इहाही केव्हाही काढून घेऊ शकते, असे मांडून जनतेचे सार्वभौमत्त्व आहे ती लोकशाहीचा पुरस्कार केला यामुळे रुसोच्या विचारसरणीला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

जुलमी राजसत्तेविरुद्ध लढा देणाऱ्यांच्या हातात एक वैचारिक साधन मिळवून देण्याचे आणि जुलमी राजसत्तेविरुद्ध क्रांती करण्याचा जनतेला हक्क असतो, असे स्पष्टपणे भांडण्याचे कार्य रुसोने केले. या दृष्टीने त्याच्या एकूण विचाराचे महत्त्व मान्य करावे लागेल.

### ४.२.४ रुसोचा सामुहिक ईहेचा सिद्धांत (Theory of General Will) :

रुसोची सामुहिक ईहा आधुनिक राज्यशास्त्राला लाभलेली एक महत्त्वाची देणगी आहे. रुसोच्या राजकीय तत्त्वज्ञानाची उभारणी सामुहिक ईहा या कल्पनेवर आधारलेली आहे. त्याच्या सामाजिक ईहेच्या सिद्धांताने राजकीय विचाराच्या क्षेत्रामध्ये एक परस्परविरोधी वळण घेतले. लोकशाही समर्थकांनी या सिद्धांताला लोकशाहीचा पाया मानले तर निरंकुश शासकांनी याच सिद्धांताच्या आधारावर मनमानी केली. सामाजिक करार करत असताना व्यक्ती आपले सर्वस्व संघटीत अशा समुदायाच्या सार्वत्रिक हितबुद्धी किंवा सामाजिक ईहेला अर्पण करीत

असते. प्रत्येक व्यक्तीच्या मनात दोन प्रकारच्या इच्छा असू शकतात. ज्यावेळी व्यक्ती स्वहितावर नजर ठेवून समाजहिताकडे दुर्लक्ष करते अगर अतिशय संकुचीत असा दृष्टिकोन स्विकारून स्वार्थी बनते त्यावेळी ती ईच्छा व्यक्तीनिष्ठ असते. याउलट व्यापक आणि विशाल अशा दृष्टिकोनातून समाजहिताचा विचार करीत असते आणि स्वार्थत्याग करण्याची तयारी दर्शविते. त्यावेळी ती इच्छा समाजनिष्ट अशी होते. ही इच्छा खरी किंवा योग्य असते. कारण ती विवेकावर आधारलेली असते, केवळ भावनाधारित नसते.

सर्व व्यक्तींच्या समाजनिष्ठ इच्छांचे संपूर्ण एकीकरण झाले असता जी सार्वजनिक हितबुद्धी निर्माण होते तिला सामाजिक ईहा असे म्हणतात. अशी सामाजिक ईहा ही सार्वभौम असते. सामाजिक अगर सामूहिक ईहा म्हणजे समाजातील सर्व व्यक्तीच्या इच्छांची गोळा बेरीज अगर त्यापैकी बहुतेकांनी मान्य केलेली तडजोड ही नव्हे, कारण असे बहुमत स्वार्थीपणामुळे अज्ञानामुळे अगर अविचारामुळे प्रस्थापित झालेले असेल, अशा इच्छेला सर्वांची इच्छा (well & all) अगर ईहा म्हणता येईल. परंतु त्यास सामाजिक ईहा म्हणता येणार नाही. सामाजिक ईहा होण्याकरिता व्यापक समाजहित साधण्याची दृष्टीने तसा निर्णय घेतला गेला पाहिजे. अशी सामाजिक ईहा नेहमीच बरोबर असते आणि तिच्यामुळे नेहमी सार्वजनिक हित साधले जाते, असे मत रुसोने मांडले आहे...

व्यक्ती व्यक्तीमध्ये हिताबाबत संघर्ष निर्माण होत असल्याकारणाने आणि भावनाप्रधान इच्छेच्या आहारी जाऊन व्यक्ती विवेक सोडून देते आणि त्यामुळे व्यक्तींच्या इच्छेला सामूहिक इहेचे स्वरूप प्राप्त होऊ शकत नाही. परंतु ज्या बाबतीत असा संघर्ष होत नसतो आणि ज्या इच्छांमुळे सर्वांचे हित साध्य होत असते ती सामूहिक अगर सामाजिक ईहा असते, अशी सामुहिक ईहा सर्वांचे हित साध्य करीत असल्यामुळे ती सार्वभौम असते.

सामुहिक ईहा सर्वांचे हित व्यक्त करीत असते. परंतु ती संख्येवर अवलंबून नसते. गुणवत्तेवर असते सर्वांच्या हिताच्या दृष्टीने विचार केला असता एका व्यक्तीची इच्छा अगर काही थोड्या व्यक्तीची इच्छा ही सामूहिक ईहा होऊ शकते. याउलट बहुसंख्य लोकांनी, एवढेच नव्हे तर सर्व लोकांनी, समाजहित विरोधी इच्छा एकमताने प्रदर्शित केली तरी ती सामुहिक ईहा होणार नाही. सामुहिक ईहा ही सर्वांचे कल्याण अगर हीत साध्य करत असल्यामुळे अशा ईहेच्या आज्ञेचे पालन करणे हे सर्वांचे नैतिक कर्तव्य ठरते आणि अशा आज्ञांचे पालन आवश्यक झाल्यास सक्तीने करून घ्यावे लागते. नैतिक कर्तव्य केल्यानेच स्वातंत्र्य टिकू शकते.

सामुहिक ईहाच खऱ्या अर्थाने कायदे करू शकते. कायद्याची भूमिका सर्वांना समान मानण्याची असते, असे कायदे सर्वांनी पाळण्यामुळेच खरे स्वातंत्र्य सर्वांना उपभोगता येते. कायदेमंडळाचे निर्णय सर्वानुमते अगर एकमताने व्हावे, असे वाटत असले तरी ते होतीलच असे नाही. परंतु बहुसंख्य सभासदांची अगर लोकांची वृत्ती समाजहित करण्याची असल्यामुळे त्यांनी घेतलेले निर्णय हे सामुहिक हित साधणारे आहेत, असे मानून ते निर्णय मान्य नसणाऱ्या इतरांनी त्यांचे पालन करावयाला पाहिजे आणि तसे पालन झाले नाही तर तसे पालन सक्तीचे करवून घेतले पाहिजे.

रुसोने सामुहिक ईहेला सार्वभौम मानले आहे. ती राज्याचा आधार आहे व जनमत निहीत असते. सामुहिक ईहेचे पालन करणे सर्वांचे कर्तव्य असते. कारण त्याशिवाय स्वातंत्र्याचे रक्षण करणे अवघड जाईल.

**सामुहिक ईहाच्या संकल्पनेचे टिकात्मक परिक्षण :**

१. सामुहिक ईहेची कल्पना अस्पष्ट आहे. ती कल्पना तात्त्विक आणि काल्पनिक स्वरूपाची असल्या कारणाने ती निश्चितपणे कोठे आहे, हे ठरविता येत नाही. सामुहिक ईहा ही नेहमी बरोबर असते. तसेच सर्वांचे कल्याण हेच तिचे उद्दिष्ट असते, हे मान्य केले तरी एखादी इच्छा ही सामुहिक आहे की नाही? हे ठरवायचे कसे? आणि कोणी ठरवायचे?

२. सामुहिक ईहा सर्वांचे कल्याण साध्य करू इच्छित असती तरी सार्वजनिक हित आणि सर्वांचे कल्याण ह्या बाबतीत व्याख्या करता येत नाही आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या मताप्रमाणे त्याबाबतचा अर्थ लावू शकेल. शासनकर्ते तर ते, जे धोरण स्वीकारतात ते कल्याणकारीच असते असे म्हणत असत.

३. रुसोने व्यक्तीस संपूर्ण स्वातंत्र्य असावे, असे प्रतिपादन केले असले तरी सामाजिक ईहेचे आदेश तक्रार न करता पाळले पाहिजेत अगर सक्तीने त्यांचे पालन करवून घेतले पाहिजे, असेही म्हटले आहे. एवढेच नव्हे तर त्यामुळेच व्यक्तीचे स्वातंत्र्य टिकू शकेल, असेही सुचविले आहे.

४. सामुहिक देश सर्वसमावेशक आणि सर्वश्रेष्ठ असल्यामुळे धर्मसंस्था, राजकीय पक्ष, सांस्कृतिक मंडळ यासारख्या संस्थांचे स्वातंत्र्य मर्यादित होऊन सर्वंकष राज्याची निर्मिती होऊ शकेल.

५. सामुहिक ईहा ही प्रत्यक्षात सामुहिकही नसते आणि ईहाही नसते कारण ती सामुहिक असल्यास ईहा होणार नाही आणि ईहा असल्यास सामूहिक अगर सामाजिक होणार नाही. रुसोच्या सामुहिक ईहा या संकल्पनेमध्ये जरी काही प्रमाणात दोष दिसत असले तरी त्यामुळे त्याचे महत्त्व कमी होत नाही. राजकिय विचारामध्ये त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सिद्धांताने राज्याचा हेतू संपूर्ण जनतेचे कल्याण आहे. व्यक्ती हितापेक्षा सामाजिक हिताला अधिक महत्त्व असते. राज्य एक नैतिक संघटन आहे आणि सार्वभौम जनतेमध्ये विहीत असते असे अनेक पैलू दाखविले आहेत. लोकसत्ताक पद्धतीचा पाया घालणारा व फ्रान्स राज्यक्रांती प्रवाहित करणारा हा सिद्धांत ठरला आहे. राष्ट्रवादी प्रवृत्ती फोफावल्यास मदत झाली. ग्रीन व हेशेल यांच्या लिखाणावर रुसोचय विचारांचा ठसा उमटलेला दिसतो.

### ४.२.५ रुसोचे सार्वभौमत्त्वाचे विचार :

सामाजिक कराराच्या माध्यमातून स्थापन झालेला समाज हा सार्वभौम असतो. अशा सार्वभौम राज्याची ईहा म्हणजे ही सामाजिक ईहा सार्वभौम असते. सामाजिक करारात सार्वभौम या संकल्पनेचे विश्लेषण आले आहे. सार्वभौमत्त्व हे अविभाज्य असल्यामुळे त्याची विभागणी करता येत नाही. सार्वभौमत्त्वाची विभागणी केल्यास विशिष्ट ईहा निर्माण होऊन सार्वभोमत्व नष्ट होईल. तेव्हा एकतर सामुहिक ईहा असेल किंवा ती असणार नाही, परंतु या दोन स्थितीमधील परिस्थिती अगर पर्याय राहू शकत नाही. सामुहिक ईहा म्हणजे

सार्वभोमत्त्व हे दुसऱ्याला देता येत नाही. सार्वभौमत्त्वाचे प्रतिनिधित्व इतरांमार्फत करता येत नाही. सर्व लोक एकत्र येऊन कायदे करतात तेंव्हा जनता सार्वभौम असते. रुसोची सार्वभौमत्त्वाची संकल्पना ग्रीसमधील नगरराज्याच्या आधारावर म्हणजे प्रत्यक्ष लोकशाहीच्या संदर्भात लिहिलेली आहे. सध्याच्या आकाराने मोठ्या राज्यांना रुसोची सार्वभौमत्त्वाची संकल्पना लागू होणे अवघड आहे. तरी देखील ती पूर्णत: अस्विकारार्ह नाही.

बहुसंख्य लोकांच्या प्रतिनिधींना जी भूमिका अगर दृष्टिकोण बरोबर वाटेल तो स्विकारतील आणि त्यानुसार कायदे करतील. सार्वभौम सत्तज्ञ काहीच चुकत नाही. ती सर्व लोकांच्या हिताच्या दृष्टीने जे योग्य असते तेच करीत असते. सामाजिक ईहा एखादेवेळी फसू शकेल पण ती चूक असणार नाही. अर्थात, सार्वभौम सत्ता सर्वांचे हित साध्य करीत असल्यामुळे सामाजिक ईहा चूक करण्याची शक्यताच नसते. रुसो असेही म्हणतो. सार्वभौमत्त्वावर पुरणाऱ्या मर्यादांचा उल्लेख रुसाने केला आहे. त्यामध्ये १) सर्वांच्या हिताचे असेल असे काहीही सार्वभौम सत्ता करू शकत नाही. ("Sovereign cannot do what is not for the general welfare."-- Rosseau).

२) व्यक्तिच्या हितासाठी सार्वभौम सत्ता काहीही करू शकणार नाही. ह्याबाबत असा प्रश्न उपस्थित केला गेला की, व्यक्तीच्या हक्कामुळे सार्वभौमसत्तेवर आक्रमण होणार नाही काय? ह्या संदर्भात रुसोने परस्पर असे विधान केले आहे. तो म्हणतो, सार्वभौम सत्तेला व्यक्तीच्या बाबतीत अनियंत्रित सत्ता करारानुसार मिळते. त्याच संदर्भात पुढे तो असेही म्हणतो की, व्यक्तीने सामाजिक करार करताना समाजाच्या दृष्टीने जेवढी सत्ता मालमत्ता आणि स्वातंत्र्य उपयोगी ठरते अगर फायदेशीर ठरते तेवऐच समाजाला दिलेले आहे. परंतु यानंतर रुसोने असा खुलासा केला आहे की, त्या फायद्याबाबतचा निर्णय सार्वभौमाने घ्यावयाचा आहे, असेही ठरलेले आहे.

याचा अर्थ असा की, सार्वभौमत्त्व प्रस्थापित झाल्यावर व्यक्तीहित शिल्लक राहत नसल्यामुळे तो प्रश्नच उद्‌भवत नाही.

३) आणखी एक महत्त्वाचवी सार्वभौमत्त्वावरील मर्यादा अशी की, सार्वभौम सत्तेने सर्वांना समान वगणूक दिली पाहिजे, कायद्याच्या पुढे सव समान मानले पाहिजे. सर्वांना एकच नियम लागू केला पाहिजे आणि सर्वांवर समान प्रमाणात करारांचा भार पडेल, अशी व्यवस्था केली पाहिजे.

वरीलप्रमाणे रुसोच्या सार्वभौमत्त्वाच्या विचारांची मर्यादा आहे.

### ४.२.६ राज्य आणि शासनसंस्था विषयक रुसोचे विचार :

''सामाजिक करारानुसार ज्या संपूर्ण समाजामध्ये सार्वभौम सत्ता अगर सर्वोच्च सामाजिक ईहा निर्माण केली जाते तो समाज म्हणजे राज्य होय.'' अशी मांडणी रुसोने केली आहे. ("Community as a whole, created by social pact and manifesting itself in the supreme general well.")

सरकार अगर शासनसंस्था म्हणजे समाजाने सार्वभौसत्तेची इच्छा आमलांत आणण्यासाठी ज्या व्यक्तीला

अगर व्यक्ती समुहाला अधिकार दिलेला असेल, अशी व्यक्ती अगर व्यक्तीसमूह होय. सरकार अगर शासनसंस्था करारानुसार निर्माण होत नाही तर सार्वभौम सत्तेच्या आदेशानुसार, होत असतो. याचा अर्थ रुसो सरकार म्हणजे कार्यकारी विभाग असे समजतो. कार्यकारी मंडळाला राजा, शासनअधिकारी अगर इतर कोणतेही नाव दिले तरी त्याने सार्वभौम सत्तेने जी कामे दिली असतील ती करावयाची असतात आणि जेवढे अधिकार दिलेले असतील. तेवढेच वापरायचे असतात. ते कमी करणे, रद्द करणे इत्यादी बाबतची सत्ता सार्वभौमालाच असते.

रुसोने शासनसंस्थेचे जे चार प्रकार सांगितले आहे ते असे – राजेशाही, महाजनशाही, लोकशाही आणि मिश्र प्रकार. लोकशाही म्हणजे असा प्रकार की, ज्या प्रकारात सर्व लोकांची सभा अगर सार्वभौम सभा शासनविषयक कार्ये प्रत्यक्षरित्या करीत असते. लहान राज्यात शासनसंस्थेची सर्व कामे अशा प्रकारे लोकांकडून प्रत्यक्षरित्या केली जाऊ शकतात. त्याने कोणता प्रकार चांगला व योग्य याविषयी स्पष्टपणे काही सांगितले नाही. विशेष परिस्थितीमध्ये विशिष्ट प्रकार योग्य ठरतो, असे त्याने म्हटले आहे आणि कोणते सरकार चांगले, याची कसोटी त्याने सांगितली आहे. ती खालीलप्रमाणे –

''कोणतेही बाह्य प्रयत्न न करता अगर बाहेरून लोक न आणता, आणि वसाहती नसताना जर नागरिकांची संख्या वाढत असेल तर ते सरकार चांगले आणि घटत असेल तर वाईटच. ("That under which people is decreasing and dging out is the worst." -- Raouseau.)

कायदे करतो हे काम सार्वभौम समाजाचे असते म्हणून ते सर्व लोकांच्या सर्मन केले पाहिजे. सरकाराला ते करता येणार नाही. सामुहिक इेटा दुसऱ्याला देता येणार नाही. ह्याचे कारण असे की, ''सैनिक राष्ट्राला गुलाम बनवितात आणि प्रतिनिधीक लोकशाही म्हणजे राजकीय ऱ्हासाचा पुरावाच आहे, असे रुसो म्हणतो. ह्याचे कारण सांगताना रुसो म्हणतो की, ''सैनिक राष्ट्राला गुलाम बनवितात आणि प्रतिनिधी राष्ट्राची विक्री करतात.' एखादे काम करण्यासाठी प्रतिनिधी नेमावा परंतु प्रतिनिधींच्या हाती सर्वोच्च सत्ता दिली जाऊ नये. ह्या संदर्भात रुसोने ब्रिटनमधील प्रतिनिधीक लोकशाही बाबात आपले मत व्यक्त केलेले आहे. त्याच्या मते, ''इंग्लिश लोक असे समजतात की, आपण स्वतंत्र आहोत. परंतु ते चुकीचे आहे. पार्लमेंट सभासदांच्या निवडणुकीच्या काळात ते स्वतंत्र असतात. सभासाद निवडले गेले की ते गुलाम होतात आणि शून्यवत बनतात.''

("It's free only during the election for members of Parliament; as soon as they are elected the people are ensalved and becomens a zero." ---- Rausseau.)

मोठ्या राज्यात कितीही अडचणी आल्या तरी सर्व लोकांकडून फायदे केले जाते, हेच योग्य असते.

रुसोच्या मते, फक्त सामाजिक करार करण्याच्या वेळी सर्वांची मान्यता अगर एकमत आवश्यक होत असते. परंतु यानंतरचे निर्भय एकमताने झाले नाहीत तरी चालू कशते. असे निर्णय बहुमताने घेतले गेले असले तरी ते सर्वांच्या हितासाठी घेतले गेलेले असल्याने अल्पमतवाल्यांनी ते मान्य केले पाहिजेत. अल्पमतवाले

त्यामुळे गुलाम ठरत नाहीत, फक्त समान हित कशात आहे, हे त्यांच्या लक्षात आले नाही एवढेच म्हणता येईल. "The Citizen who is in minority is not a slave but only a poor Guener." --- Rausseau.

**रुसोच्या विचारांचे मूल्यमापन :**

रुसोच्या विचारांवर बरीच टिका झालेली आहे. परंतु त्याचा मांडणीतील विविध संकल्पना आजही प्रस्तुत आहे. परंतु एकूणच राजकीय व्यवस्थाविषयक दृष्टिकोन हा महत्त्वपूर्ण आहे हे लक्षात घ्यावे लागेल. 'सामाजिक करार' 'Social Contrat' हा रुसोचा राजकीय तत्त्वज्ञातील महत्त्वपूर्ण ग्रंथ होय. सामाजिक करारामधून राज्य निर्माण झाले, यासंदर्भात हॉब्ज व लॉक यांनी वेगवेगळी मते मांडली होती. रुसोने दोघांचा समन्वयात्मक विचार म्हणजे सामुहिक 'ईहेचा सिद्धांत' मांडला. हा सिद्धांत म्हणजे त्याने राज्यशास्त्राला दिलेली एक नवी देणगीच आहे, असे मानले जाते. त्याचा या विचारांची प्रेरणा पुढील अनेक विचारवंतांनी घेतली ज्यात हेगेले, ग्रीन यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

सरकार आणि राज्य यामध्ये सुस्पष्ट फरक रुसोने केला व जनतेला शासनाला विरोध करण्याचा अधिकार दिला. राज्याला विरोध करता येत नाही. नवराज्य व्यवस्था आणि प्रत्यक्ष लोकशाही महत्त्वाची मानली. प्रतिनिधीक लोकशाहीस विरोध केला. परंतु सामान्य इच्छेने लोकशाहीचा पाया घालून कल्याणकारी निर्माण केली.

रुसोच्या विचाराने राष्ट्रवादी प्रेरणा निर्माण केली. त्याचे धर्म व शिक्षण विषयक विचार क्रांतिकारी होते. रुसो सामुहिक ईहेच्या सिद्धांताने राष्ट्र राज्यासंबंधीच्या विचारांचे समर्थन करतो, असे डमींग यांना वाटते. याच सिद्धांताने आदर्शवादाचा विचार विकसीत केला. व्यक्तीला केंद्रस्थानी मानून शासनसंस्थेला साधन मानले. व्यक्तिहिताला कनिष्ट मानून समाजहिताला श्रेष्ठत्व दिले. समता, स्वातंत्र्य व कायदा यांची सांगड घातली.

रुसोच्या विचारांत विविध छटा सापडतात. त्याच्या सामान्य इच्छेला अनियंत्रीत शासन, लोकशाही शासन, व समाजवादी व्यवस्थेसाठी वेगवेगळ्या विचारांच्या पुरस्कर्त्यांना उचलले आहे. जनतेच्या सार्वभौमत्वाचा पाया त्याने घातला. त्याचे तत्त्वज्ञान असंदिग्ध नाही परंतु सूचक आहे. अनियंत्रीत स्वातंत्र्याचा तो पुरस्कार करीत नाही, पण स्वातंत्र्य अबाधीत ठेवता. रुसोचा सार्वभौमत्त्वाचाा कायदा हा आधुनिक मूलभूत घटनात्मक कराराचा उद्गाता मानता येईल.

## ४.३ सारांश :

रुसो हा प्लेटो, ॲरिस्टॉटल प्रमाणे मानवी स्वभावासंबंधी मनुष्याचा स्वभाव चांगला असतो, असे स्पष्ट केले तसेच सामाजिक करार करताना हे केवळ एक करार असून व्यक्तीने आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवले आहे. निसर्गावस्थेमध्ये सुखी, समाधानी जीवन जगत होता. सामाजिक करारातून स्थापन झालेले राज्य हे सार्वभौम असते. सामूहिक ईहा ही सर्वांची इच्छा या अर्थाने वापरली जाते. सरकार हे सामाजिक करारावर निर्माण होत नाही तर सार्वभौम सत्तेवर आधाडित आहे.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**१) सामाजिक करार :** राज्य स्थापन करण्यासाठी लोक / जनता व राजा यांच्यामध्ये झालेला करा.

**२) सामुहिक ईहा :** सर्व जनतेची / लोकांची इच्छा

**३) सार्वभौमत्त्व :** कोणत्याही बाह्य अथवा अंतर्गत घटकांच्या नियंत्रणापासून मुक्त

**४) निसर्गावस्था :** आधुनिक राज्य स्थापन होण्यापूर्वीची मानवाची अवस्था.

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) रुसोचा जन्म कोठे झाला?

२) रुसोने कोणता सिद्धांत मांडला?

३) रुसोचे मानवी स्वभाव विषयक विचार कोणत्या ग्रंथामध्ये आहेत?

४) रुसोच्या मते, मनुष्य स्वभावनिर्मिती मागे कोणत्या दोन प्रेरणा असतात?

५) निसर्गअवस्थेतील मानवाला रुसो काय म्हणतो?

६) रुसोने मांडलेला राज्यविषयक सिद्धांत कोणता?

७) सामुहिक इहा ही वस्तूला कोणत्या स्वरूपाची असते, असे रुसो म्हणतो?

८) रुसोच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रमुख ग्रंथ कोणता?

९) रुसोप्रणीत सामाजिक करार कोणाच्या संमतीवर आधारित आहे?

१०) कोणत्या ग्रंथात रुसोने निसर्गावस्थेचे वर्णन केले आहे?

**उत्तरे :**

१) जिनेव्हा (स्वित्झर्लंड)

२) सामाजिक करार सिद्धांत

३) Discourses On The Origin of Inequality

४) आत्मप्रेम किंवा स्वसंरक्षण भावना व सहानुभूती किंवा परस्पर सहकार्य

५) उदात्त वनचर (Noble Savage)

६) सामुहिक इहा (General well)

७) सार्वभौम

८) सामाजिक करार (Social Contract)

९) नागरी समाज

१०) Discourses On Arts and Science.

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) रुसोचे मानवी स्वभावाविषयीचे विचार स्पष्ट करा.

२) रुसोच्या सामाजिक कराराची चर्चा करा.

३) रुसोच्या सामूहिक ईहेची संकल्पना स्पष्ट करा.

४) रुसोचे सार्वभौमत्त्वाविषयीचे विचार स्पष्ट करा.

५) रुसोचे राज्यशासनसंस्था विषय विचाराची चर्चा करा.

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) Suda, J. P. (2012) : 'History of Political Though Ancient & Medival', Vol-2, K. Nath & Co. Mercent.

२) गोखले, रा. म. (१९७८) : पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३) शृंगारपुरे अरविंद (२०००) : 'पाश्चिमात्य राजकीय विचार', मंगेश प्रकाशन, नागपूर.


❍❍❍

घटक १

# जॉन स्टुअर्ट मिल (इ. स. १८०६ ते इ. स. १८७३)

## उदारमतवादी विचारवंत

## (John Stuart Mill)

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ जॉन स्टुअर्ट मिलचा जीवन परिचय व ग्रंथसंपदा
- १.२.२ जॉन स्टुअर्ट मिलचे राजकीय तत्त्वज्ञान आणि नैतिकता
- १.२.३ जॉन स्टुअर्ट मिलचे धर्मविषयक विचार
- १.२.४ जॉन स्टुअर्ट मिलचा उपयुक्ततावादी सिद्धांत.
- १.२.५ जॉन स्टुअर्ट मिलचे राज्यासंबंधीचे विचार
- १.२.६ जॉन स्टुअर्ट मिलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार
- १.२.७ जॉन स्टुअर्ट मिलचे प्रातिनिधक शासनासंबंधीचे विचार
- १.२.८ जॉन स्टुअर्ट मिलचे लोकशाही विषयीचे विचार
- १.२.९ जॉन स्टुअर्ट मिलचे उदारमतवादाविषयीचे विचार
- १.२.१० जॉन स्टुअर्ट मिलचे समाजवादाविषयीचे विचार
- १.२.११ जॉन स्टुअर्ट मिलचे स्त्रीविषयक विचार
- १.२.१२ जॉन स्टुअर्ट मिलच्या राजकीय विचारांचे मूल्यमापन

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- जॉन स्टुअर्ट मिलचा जीवन परिचय व ग्रंथसंपदा याविषयी माहिती घेऊन त्याच्या विचारांवर प्रभाव पाडणाऱ्या घटकांची माहिती मिळेल.
- जॉन स्टुअर्ट मिलचे राजकीय तत्त्वज्ञान माहित होईल.
- जॉन स्टुअर्ट मिलच्या तत्त्वज्ञानाचा नैतिकता हा आधार आहे, हे स्पष्ट होईल.
- जॉन स्टुअर्ट मिलचे धर्म याविषीचे विचार माहिती होतील.
- जॉन स्टुअर्ट मिलचा उपयुक्ततावादाचा सिद्धांत कशाशी संबंधित आहे याची माहिती मिळेल.
- जॉन स्टुअर्ट मिलचे राज्यासंबंधीचे विचार माहिती होती.
- जॉन स्टुअर्ट मिलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार जाणून घेता येतील.
- जॉन स्टुअर्ट मिलचे प्रतिनिधिक शासनासंबंधीचे विचार माहिती होतील.
- जॉन स्टुअर्ट मिलचे लोकशाही विषयीचे विचार समजतील.
- जॉन स्टुअर्ट मिलचे उदारमतवादाविषयीचे विचार माहिती होतील.
- जॉन स्टुअर्ट मिलचे समाजवादाविषयीचे विचार जाणून घेता येतील.
- जॉन स्टुअर्ट मिलचे स्त्री-स्वातंत्र्याविषयी व स्त्री-पुरुष समानते विषयीचे विचार समजतील.

## १.१ प्रास्ताविक :

एकोणिसाव्या शतकात युरोप आणि विशेषत: ब्रिटनमध्ये अनेक थोर बुद्धिवादी विचारवंतांनी जन्म घेतला. या शतकाला विचारसरणीचे शतक (Age of Ideology) असे संबोधण्यात येते. व्यक्तिस्वातंत्र्यवाद, उपयुक्ततावाद, उदारमतवाद, धर्मनिरपेक्षवाद, भांडवलशाहीवाद, समाजवाद, स्त्रीवाद, मानवतावाद इत्यादी आधुनिक राजकीय विचारप्रणाली या शतकात विकसित झाल्या. म्हणून १९ वे शतक मानवजातीच्या दृष्टिकोणातून महत्त्वाचे होते. याच शतकातील बुद्धिवादी श्रेष्ठ दर्जाचा ब्रिटिश विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल हा एक प्रतिनिधी होय. मिलचे राजकीय तत्त्वज्ञान अनेक आधुनिक राजकीय विचारांचे प्रतिनिधित्व करणारे होते. मिलला व्यक्तिस्वातंत्र्यवादी, उपयुक्ततावादी, उदारमतवादी, लोकशाहीवादी, स्त्रीवादी व मानवतावादी विचारवंत म्हणून ओळखते जाते. मुख्यत: मिलला उदारमतवादाचा प्रणेता म्हणून ओळखले जाते.

ग्रंथामधून त्याने मांडलेल्या राजकीय विचारांनी आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानात मोलाची भर घातली आहे. या ग्रंथाच्या माध्यमातून त्याने उपयुक्ततावाद, स्वातंत्र्याविषयी, राज्यासंबंधी, प्रातिनिधिक शासनपद्धती, लोकशाही, उदारमवाद, समाजवाद, स्त्री-स्वातंत्र्य समानतेचे तत्त्व याविषयीचे आपले विचार विस्ताराने मांडले आहेत. मिलने मांडलेले हे सर्व राजकीय विचार आपणास प्रस्तुत घटकात सविस्तारपणे अभ्यासता येतील.

## १.२ विषय–विवेचन :

### १.२.१ जॉन स्टुअर्ट मिलचा जीवन परिचय व ग्रंथसंपदा :

**जीवन परिचय :**

एकोणिसाव्या शतकातील ब्रिटनमधील उपयुक्ततावादी व व्यक्तीवादी श्रेष्ठ विचारवंत म्हणून जेरेमी बेंथॅम आणि जेम्स मिल यांना ओळखले जाते. जॉन स्टुअर्ट मिल हा जेम्स मिल या उपयुक्ततावादी विचारवंताचा मुलगा आहे. त्याचा जन्म २० मे १८०६ रोजी लंडनमध्ये झाला. जेरेमी बेंथॅम याचा शिष्य जेम्स मिल तर जेम्स मिलचा शिष्य मुलगा जॉन स्टुअर्ट मिल होय. मिलला त्याच्या वडिलांकडून बेंथॅमच्या उपयोगितावादाचे आदर्श शिकविले गेले. तो उपयुक्ततावादाचा समर्थक बनला. मिल लहानपणापासूनच तल्लख बुद्धीचा असल्यामुळे वयाच्या तिसऱ्या वर्षी ग्रीक भाषा व आठव्या वर्षी लॅटिन भाषा शिकण्यास प्रारंभ केला. त्याची बौद्धिक झेप खूपच मोठी होती. वयाच्या बाराव्या वर्षापासून तो ग्रीक राजकीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास करू लागला. त्याने प्लेटे, हेरोडोटस, ॲरिस्टॉअल, होमर या महान ग्रीक तत्त्ववेत्याच्या साहित्याच अभ्यास केला. त्याला वयाच्या १४ व्या वर्षी १८२० मध्ये फ्रान्सला पाठविण्यात आले. साधारणत: एक वर्षे तेथे राहून शिक्षण आणि अनुभव घेऊन तो इंग्लंडला परत आला. त्यानंतर त्याने बेंथॅमच्या (आणि वडिल जेम्स मिलच्याही) उपयुक्ततावादी सिंद्धातांचा अभ्यास केला. त्याने वयाच्या १६ व्या वर्षी बेंथॅमचे सर्व ग्रंथ वाचून काढले. बेंथॅमच्या उपयुक्ततावादाचा मिलवर खोल असा प्रभाव पडला होता. त्यामुळे बेंथॅमच्या उपयुक्ततावादाचा दुसरा प्रमुख समर्थक म्हणून जे. एस. मिलला ओळखले जाते. उपयुक्ततावादाच्या प्रचारासाठी मिलने. १८२२ मध्ये 'Utilitarian Society' (उपयुक्ततावादी मंडळ) ही संस्था स्थापन केली. या उपयुक्ततावादी मंडळात बेंथॅमप्रणीत उपयुक्ततावादावर चर्चा होत असे. उपयुक्ततावादी मंडळाप्रमाणे जे. एस. मिल ‘ग्रोथ सोसायटी’ तसेच ‘स्पेक्युलेटिव्ह सोसायटी’ यांचाही सभासद बनला. या मंडळातील राजकीय विषयावरील चर्चेत आणि कार्यक्रमात मिलचा सहभाग घेत असे. वयाच्या १७ व्या वर्षी १८२३ तो ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीत नोकरीत लागला. ३६ वर्षाच्या नोकरीच्या काळात त्याने विविध ग्रंथांचे वाचन व लेखन केले. याशिवाय कला, संगीत, काव्यवाचन याविषयी ज्ञान करून घेतले. तसेच वृत्तपत्रीय लिखाण केले. ‘एक्झामिनर’ या वृत्तपत्रातील त्याचे लेखन कार्य महत्त्वाचे ठरले.

वयाच्या २५ व्या वर्षी १८३० मध्ये मिलचे श्रीमती हॅरियट टेलरशी जी त्याच्या मित्राची पत्नी होती, तिच्याशी मैत्रीचे संबंध आले. पुढे मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. तिचे सौंदर्य, कोमलता, भावूकता व प्रखर बुद्धिमत्ता याचा मिलच्या जीवनावर मोठा प्रभाव पडला. मिलवर मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रभाव श्रीमती टेलरच्या दीर्घ सहवासामुळेच झाला. श्री. टेलरच्या मृत्यूनंतर १८५१ मध्ये श्रीमती हॅरियट टेलरशी तो विवाहबद्ध झाला. परंतु विवाहानंतर अवघ्या सातच वर्षात १८५८ मध्ये तिचे दक्षिण फ्रान्समध्ये एव्हिनन (ॲविग्नान) येथे निधन झाले व तो एकाकी बनला. मिलच्या ग्रंथ लेखनाच्या कार्यात श्रीमती टेलर यांनी मोलाचे सहकार्य केले. त्याने 'On Liberty' (स्वातंत्र्याच्याविषयी) हा ग्रंथ आपल्या पत्नीस समर्पित केले. पत्नीच्या निधनानंतर त्याने आपला वेळ अनेक ग्रंथ लिहिण्यात घालविला. 'Morning Chronicles', 'West Minister, Review' या

वृत्तपत्रामधील त्याचे अनेक लेख गाजले. 'London Review' या मासिकाचा तो संपादक ही (१८३४-४०) होता. उदारमतवादाचा प्रणेता, प्रमुख पुरस्कर्ता मिल आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात समाजवादाकडे झुकला होता. १८६५ मध्ये जे. एस. मिलची तीन वर्षासाठी ब्रिटिश संसदेचा सभासद म्हणून निवड झाली. संसदेमधील मिलचे कार्य प्रभावी व उल्लेखनीय होते. संसदेतील सुधारणा, प्रमाणशीर प्रतिनिधित्व, स्त्रियांना मतदानाचा अधिकार अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व, खुले मतदान, कामगारांचे प्रश्न यासारख्या पुरोगामी विचारांचा पुरस्कार केला. त्याचा संसदेत सर्व पक्ष आदर करीत. ''मिल सभागृहात बोलतो तेव्हा मला असा भास होता की कोणी संत पुरुष बोलत आहे.'' असे ग्लॅडस्टोन याने त्याच्या मृत्यूनंतर मत व्यक्त केले. त्याची संतवाणी, त्याचे अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व, स्त्री-स्वातंत्र्य व स्त्रीयांना मताधिकार द्यावा. यासारख्या पुरोगामी विचारांमुळे त्याला १८६८ मध्ये झालेल्या संसदेच्या निवडणुकीत पुन्हा निवडून येण्याची संधी मिळाली नाही. पत्नीच्या मृत्यूनंतर उर्वरित आयुष्य त्याने दक्षिण फ्रान्समध्ये एव्हिनन (ॲविग्नॉन) येथे राहून व्यतित केले. अशा या अलौकिक प्रतिभावंत उदारमतवादी विचारवंताचे ८ मे १८७३ रोजी क्षयरोगाने एव्हिनन येथे निधन झाले. त्याच्या इच्छेनुसार एव्हिनन येथील पत्नी हॅरिएट टेलरच्या समाधीतच त्याचा देह समाधीस्थ करण्यात आला. व्यक्तिवादी व उदारमतवादी मिलच्या मृत्यूमुळे एकोणिसाव्या शतकातील महान आधुनिक राजकीय विचारवंताच्या श्रेणीतील एकच उच्च प्रतीचा, श्रेष्ठ दर्जाचा तारा निखळून पडला.

**जे. एस. मिलची ग्रंथसंपदा :**

जे. एस. मिलने अनेक विषयांशी संबंधित विविध ग्रंथ लिहिले. याविषयात तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र हे प्रमुख ग्रंथ होय.

1) System of Logic 1843.

2) Principles of Political Economy 1848.

3) On Liberty 1859.

4) Thoughts on Parliamentary Reforms 1859.

5) Consideration on Representative Government 1861.

6) Utilitarianism 1861.

7) Liberalism 1863.

8) An Examination of Sir William Hamilton's Philosophy 1865.

9) Augest compte and Positivism 1865.

10) The subjection of women 1869.

11) Essay on religion 1874 (मृत्यूनंतर प्रकाशित)

12) Autobiography 1874 (मृत्यूनंतर प्रकाशित)

**जॉन स्टुअर्ट मिलच्या विचारांवरील प्रभाव :**

**१) विविध विचारवंताचा प्रभाव :**

**(अ) जेरेमी बेंथॅम व जेम्स मिल :** उपयुक्ततावादी विचारवंत जेरेमी बेंथॅम व वडील जेम्स मिल यांच्या व्यक्तीवादी आणि उपयुक्ततावादी विचारांचा मोठा प्रभाव मिलवर पडला. मिलच्या 'उपयुक्ततावाद' या ग्रंथावरून त्याच्यावरील प्रभाव जाणवतो.

**(ब) लॉर्ड मेकॉले :** जे. एस. मिलचे वडील जेम्स मिलने 'Essay on Government' हे निबंध वजा पुस्तक अभिप्रायासाठी लॉर्ड मेकॉले या शिक्षण आणि विधितज्ज्ञांकडे पाठविले होते. तेंव्हा मेकॉलेने पुस्तकावरील प्रतिक्रिया देताना बेंथॅम आणि जेम्स मिलच्या उपयुक्ततावादावर कठोर टिका केली. ती टीका पाहून जे. एस. मिलने उपयुक्ततावादी सिद्धांताची, संकल्पनेची फेररचना करण्याचे ठरविले. बेंथॅमच्या उपयुक्ततावादातील कमतरता, दोष, संकुचितपणा काढून मिलने त्याला अधिक व्यापक सामाजिक अशय व नैतिक स्वरूप दिले.

**(क) जॉन ऑस्टिन :** कायदेपंडित जॉन ऑस्टिन या विचारवंताच्या तत्त्वज्ञानाचाही प्रभाव मिलवर पडला होता. मिलने जॉन ऑस्टिनच्या सहवासात रोमन कायद्याचा अभ्यास केला होता.

**(ड) अर्थशास्त्रीय विचारवंतांचा प्रभाव :** अर्थशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्स, सेंट सायमन, ॲडम स्मिथ, रिकार्डो, माल्थस इत्यादींच्या विचारांचा प्रभाव मिलच्या अर्थशास्त्रीय व उदारमतवादी विचारांवर व लिखानावर पडला. मिलच्या तत्त्वज्ञानावर सेंट सायमन या तत्त्ववेत्त्याच्या विचारांचा विशेष प्रभाव होता. सेंट सायमनच्या वैचारिक प्रभावामुळेच नैतिक विचार, धार्मिक श्रद्धा आणि आर्थिक गृहीतके ही कालमान परिस्थितीनुरूप तपासून घेतली पाहिजेत, असे मिलला वाटू लागले. कारण गृहितके ही कधीही त्रिकालाबाधित नसतात तर सतत बदलती असतात, असा सेंट सायमनचा विचार मिलला मान्य झाल्याचे दिसते. सामाजिक शास्त्रांमधील गृहितके काळ आणि परिस्थितीच्या कसोटीवर उतरत असतील तरच ग्राह्य मानावित हा संशोधनाचा धडा जॉन स्टुअर्ट मिलने चांगल्याच तऱ्हेने गिरवला होता.

**(इ) टी. टॉकविल** (De Tocqueville) **:** टी टॉकविल या अमेरिकन लेखकाच्या 'Democracy of American' या ग्रंथातील एका वचनाचा मिलवर खोल परिणाम झाला. ते वचन म्हणजे, 'लोकशाही ही बहुसंख्याकांची हुकूमशाहीच असते.' (Democracy is a Tyrrany of Majority) मिलने यावर उपाय म्हणून 'Consideration on Represenetative Government' हा ग्रंथ लिहिला आणि यशस्वी लोकशाहीसाठी अनेक उपाय सुचविले.

**२) श्रीमती हॅरिएट टेलरचा प्रभाव :**

वयाच्या २५ व्या वर्षी १८३० मध्ये मिल हेरिएट टेलरच्या सहवासात आला. तिच्याशी त्याची मैत्री झाली. १८५१ मध्ये श्री. टेलरच्या मृत्युनंतर त्याने श्रीमती हेरिअट टेलरशी विवाह केला. पत्नी हॅरिएट टेलरचा मिलवर मोठा प्रभाव होता. तिचे सौंदर्य, कोमलता, भावूकता व प्रखर बुद्धिमत्ता याचा मिलच्या जीवनावर खोल प्रभाव पडला. ती त्याला उत्कृष्ट कवियत्री व त्याच्या सुंदर व श्रेष्ठ लिखाणाची प्रेरणा वाटे. मिलवर मानवतावादी

दृष्टिकोनाचा प्रभाव हेरिएट टेलरच्या दीर्घ (१८३०-१८५८) सहवासामुळेच झाला. ती विचारवंत आणि साहित्यिक होती. मिलने तिच्या प्रेरणेने विपुल लेखन केले. त्या दोघांनी मिळून चिंतन, मनन आणि लेखन यात आपले सहजीवन चांगल्या तऱ्हेने व्यतीत केले. त्या दोघांत उच्च दर्जाची बौद्धिक चर्चा, वाद-विवाह होत असे. हॅरिएट टेलरने मिलचे हस्तलिखित तपासल्यावर तो ग्रंथ प्रसिद्धिस दिला जात असे. १८५८ मध्ये श्रीमती टेलरच्या मृत्यूनंतर मिलने आपला 'On liberty' हा ग्रंथ तिला समर्पित केला.

**३) तत्कालीन राजकीय परिस्थितीचा प्रभाव :**

जे. एल. मिल ईस्ट इंडिया कंपनीत उच्चपदावर दीर्घकाळ नोकरीस असल्यामुळे विविध राज्यकर्त्यांशी संबंध आल्याने त्याला राजकारणाची व्यापक माहिती मिळाली. 'लंडन रिव्ह्यू' या मासिकाचा संपादक राहिल्याने राजकीय परिस्थितीचे योग्य आकलन झाले. ब्रिटिश पार्लमेंटच्या कार्याचाही प्रभाव पडला. १८६५ ते १८६८ पर्यंत ब्रिटनच्या पार्लमेंटचा (हाऊस ऑफ कॉमन्स) प्रतिनिधी म्हणून त्याला अनुभव. पार्लमेंटमध्ये असताना त्याने संसदेतील सुधारणा, स्त्रीयांचा मताधिकार, अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व देण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पद्धती, आयर्लंडचा प्रश्न, कामगारांचा प्रश्न आणि निग्रोवरील अत्याचार अशा विविध प्रश्नांवरील आपली मते त्याने संसदेमध्ये परखडपणे मांडली. त्यामुळे त्याला त्याच्या पक्षाचा रोषही सहन करावा लागला. परिणामत: तो दुसऱ्यांदा संसदेत निवडून येऊ शकला नाही. त्याची हाऊस ऑफ कॉमन्समधील कामगिरी अतिशय मोलाची होती. त्याला शासनकार्याचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त झाला. त्याचा उपयोग त्याला विचार प्रतिपादित करताना झाला. एकंदरीत मिल संसदेचा प्रतिनिधी राहिल्याने काही राजकीय मतांचा त्याला पाठपुरावा करता आला. त्यामुळे त्याला तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांची त्याला जाणीव झाली होती.

अशा प्रकारे विविध माध्यमांतून जे. एस. मिलच्या विचारांवर व लेखन कार्यावर प्रभाव पडला गेला व त्याच्या राजकीय विचारप्रणालींची जडणघडण होत गेली.

## १.२.३ जॉन स्टुअर्ट मिलचे राजकीय तत्त्वज्ञान आणि नैतिकता :

एकोणिसावे शतक मानवजातीच्या दृष्टिने महत्त्वाचे होते. या शतकात युरोपात विशेषत: ब्रिटनमध्ये अनेक महान विचारवंताचा जन्म झाला. यापैकी जे. एल. मिल हा एक होय. मिल हा व्यक्तिस्वातंत्र्यवादी, उपयुक्ततावादी, उदारमतवादी आणि पुरोगामी विचारवंत होता. मिलचे राजकीय तत्त्वज्ञान अनेक विचारांचे प्रतिनिधित्व करणारे होते. त्याने बेंथॅमच्या उपयुक्ततावादावर होणाऱ्या टीकेला समर्पक उत्तर देण्यासाठी व्यापक दृष्टिकोन ठेवून सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि त्याला व्यावहारिक स्वरूप व सामाजिक आशय मिळवून दिला. व्यक्तिस्वातंत्र्यात राज्याचा कमीत कमी प्रमाणात हस्तक्षेप व्हावा, अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व मिळावे, स्त्रीयांना राजकीय अधिकार द्यावेत, या गोष्टी प्रभावीपणे मांडल्या. प्रातिनिधिक शासन, संसदेची कार्ये, लोकप्रतिनिधींची जबाबदारी, लोकशाही, उदारमतवाद, समाजवाद, मानवतावाद, धर्म इत्यादी विषयांची तात्त्विक मांडणी केली. राज्याची निर्मती समाजाच्या कल्याणासाठी झालेली असते. शासन संस्थेचे अस्तित्व जनतेचे सहकार्य आणि संमतीतून व्यक्त होत असते, असे मिल तात्त्विक प्रतिपादन करतो.

जे. एन. मिलने आपल्या सर्व तत्त्वज्ञानाचा आधार नैतिकता हा मानला. मिल समाजाच्या कल्याणासाठी जे जे उपकारक ते ते सर्व नीतिमान असल्याचा निष्कर्ष काढतो. मिलने नीतिशास्त्राचा आधार घेऊनच उपयुक्ततावादाची मीमांसाआणि फेरमांडणी केली. समाजहितासाठी व्यक्तिस्वातंत्र्यात राज्याने मर्यादित हस्तक्षेप करावा. अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व, स्त्रियांना पुरुषांच्या समान सर्वप्रकारचे अधिकार द्यावेत. संसद सदस्यांनी मानधन घेऊ नये. निवडणुकीसाठी शासनाने पैसा खर्च करावा. राज्यातील सर्व नागरिकांना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे. यासंबंधीचे तात्त्विक विचार नीतिशास्त्राच्या संदर्भातून मांडले आहेत. समाजाने उपयुक्त नीतिनियमांचा स्वीकार करावा, अशी त्याची सूचना होती. मिलच्या मते, हे नैतिक नियम जनकल्याणाच्या उदात्त भावनेतून निर्माण होत असतात. ते नैसर्गिक नसतात, धार्मिक तत्त्वज्ञानातून निर्माण होत नसतात किंवा ते ईश्वरनिर्मितही नसतात.

## १.२.५ मिलचे धर्मविषयक विचार :

जे. एस. मिल वडील जेम्स मिलप्रमाणे धर्म-ईश्वर यावर विश्वास ठेवत नाही. जे. एस. मिल जसा धर्मनिरपेक्षवादी होता, तसाच तो धर्म न मानणारा निधर्मीही होता. धर्म आणि धार्मिक संस्था या बाबतीत मिलचा विचार उदारमतवादाकडे जाणारा आहे. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांची झालेली फारकत ही धार्मिक उदारमतवादाला पोषक ठरली, असे मिलचे मत आहे. मिल राज्याने कोणताही धर्म पुरस्कृत करू नये किंवा त्याचा प्रसार करू नये असे स्पष्टपणे बजावतो. व्यक्तीने आस्तिक असावे की नास्तिक याचे योग्य उत्तर म्हणजे हा ज्याचा त्याचा व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न आहे, असे मिल म्हणतो.

मिलच्या मते, ईश्वर दयाळू, प्रेमळ आणि परोपकारी असता तर जगात प्रचंड सामाजिक-आर्थिक विषमता, दारिद्र्य, धार्मिक हिंसाचार निर्माण झाला नसता. मिल आपल्या 'Autobiography' या आत्मचरित्रात धर्माविषयी म्हणतो की, ''धर्म हा जातीचा मोठा शत्रू. मनुष्यजातीच्या कल्याणाशी ज्यांचा काही संबंध नाही, अशा संप्रदायाचे, भक्तीभावनेचे आणि समारंभाचे धर्म स्तोम माजवतो... खऱ्या सद्‌गुणांऐवजी भ्रामक समजुतींचा माणसापुढे आदर्श ठेवतो. धर्मामुळे नीतीचा दर्जा खालावतो. धर्मदेवाची नाना तऱ्हेने स्तुती करतो; परंतु प्रत्यक्षात त्याचे जे वर्णन केले जाते त्यावरून देव म्हणजे द्वेषार्ह अशी व्यक्ती असे दृष्टीस पडते.'' एकंदरित जे. एस. मिलला चमत्कारावर आधारित धर्म मान्य नव्हता. त्याने प्रचलित धर्माऐवजी मानव धर्माची कल्पना (Religion of Humanity) मांडली. मिलच्या मानवधर्मात परलोक (स्वर्गलोक), मुक्ती, परमेश्वर या गोष्टी नाहीत. त्याचा मानव धर्म ईहलोकवाद, वास्तववाद यावर भर देणारा आहे.

## १.२.६ मिलचे उपयुक्ततावादी विचार :

जॉन स्टुअर्ट मिलच्या पूर्वी ब्रिटनमध्ये उपयुक्ततावादाचा पुरस्कार जेरेमी बेंथॅम आणि जेम्स मिल यांनी केला. बेथँमपूर्व अगदी सुरवातीला डेव्हिड ह्यूम या ब्रिटिश विचारवंताने उपयुक्ततावादाची कल्पना मांडली होती. परंतु ब्रिटीश विचारवंत जेरेमी बेथॅम हाच उपयुक्ततावादाचा मूळ निर्माता होय. बेंथॅमनी मांडलेल्या उपयुक्तता वादावरील विचारावर जेव्हा जोरदार टीक होत होती त्यावेळी त्यातील दोष दूर करणे आणि त्याच्या

उपयुक्ततावादाच्या कल्पनेला परिपक्व स्वरूप देण्याचा अथवा योग्य आकार देण्याचे काम जॉन स्टुअर्ट मिल यांनी केले आहे.

**उपयुक्ततावादाचा अर्थ :**

''अधिकतम लोकांचे अधिकतम सुख म्हणजेच जास्तीत जास्त लोकांचा जास्तीत जास्त आनंद'' या अर्थानुसार ज्या कामामुळे व्यक्तीला आनंद प्राप्त होतो ते काम योग्य आणि ज्या कामामुळे दु:ख होते ते काम अयोग्य असते. तात्पर्य, आनंदाचा अर्थ सुख आणि दु:खाचा अर्थ कष्ट आहे. दु:खापासून मुक्ती आणि आनंदाची प्राप्ती हे मनुष्यजातीचे ध्येय आहे. ज्यावर नीतिमत्ता आधारलेली असते. असा जीवनाचा सिद्धांत कधीही बदलत नाही. उपयुक्ततावादी सिद्धांत म्हणजे एखादे कार्य सुखदायक आहे की दु:खदायक आहे यावरून त्या कार्याची योग्य अयोग्यता अजमावण्याचा सिद्धांत होय.

**जेरेमी बेथँमची उपयुक्ततावादाची कल्पना :**

बेथँमचे उपयुक्ततावादाचे तत्त्वज्ञान चार मूलभूत कल्पनांवर आधारित आहे.

अ) बेथँमच्या मते, मानवी जीवनात आनंद हाच योग्य व दु:ख हे वाईट असते, त्याच्या मते, सुखप्राप्तीसाठी व्यक्ती सतत, प्रयत्न करत असते आणि ज्या गोष्टीपासून त्रास, दु:ख होत असते त्या गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करत असते. ज्या कार्यापासून सुख मिळते कार्य योग्य आणि ज्या कार्यापासून दु:ख मिळते ते कार्य अयोग्य होय.

ब) बेथँमच्या मते, आनंद आणि दु:ख यांचे मोजमाप करता येऊ शकते. उपयुक्तता (Utility) हे त्याचे मोजमाप असते. माणूस हा स्वत:च सुख-दु:ख मोजण्याची मोजपट्टी असतो.

क) बेथँमच्या मते, प्रत्येक माणूस अधिकाधिक आनंद सुख उपभोगण्याचा व दु:ख, कष्ट टाळण्याचा प्रयत्न करत असतो. त्यामुळे सर्व माणसे सर्वांसाठी आनंद व सुखवृद्धी होईल अशी काये करतील. बेथँमच्या मते, उपयुक्ततावादाचे मुख्य सूत्र अधिकतम लोकांचे अधिकतम सुख (Greatest happiness of greatest number) हे आहे. याचा अर्थ प्रत्येकाने स्वत:चे सुख पाहावे आणि जास्तीत जास्त आनंद, सुख मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. प्रत्येक व्यक्तीने स्वत:साठी सुख मिळविले म्हणजे आपोआपच समाजाचे हित साधले जाईल. कारण सामाजिक हित व कल्याण व्यक्तिगत सुखाची व हिताची बेरीज असते, असे बेथँमचे मत आहे.

ड) बेथँमच्या मते, गुणात्मक दृष्ट्या सर्व सुखे समान असतात. व्यक्तीच्या सुखात गुणात्मक फरक नसतो. केवळ मात्रात्मक (संख्यात्मक) फरक असतो. त्यामुळे सामाजिक समुदायातील विविध व्यक्तींना मिळणारा आनंद (सुख) एक समाज असतो.

जॉन स्टुअर्ट मिलने बेथँमच्या या उपयुक्ततावादातील गृहीत कल्पनांना विरोध दर्शवून त्यात सुधारणा, बदल घडवून फेरमांडणी केल्यामुळे उपयुक्ततावादाला नवे स्वरूप प्राप्त झाले.

**बेथँमच्या उपयुक्ततावादी सिद्धांतात मिलने केलेले बदल अथवा सुधारणा :**

जॉन स्टुटर्ट मिलला बेथँमच्या उपयुक्ततावादाची वैचारिक बैठक मान्य होती. मानवाच्या वर्तनामागील

प्रमुख प्रेरणा आणि त्या पोटी होणारी कृती याचे मिलला आकर्षण, कुतूहल होते. परंतु सर्वच मूल्यांचा आधार म्हणून उपयुक्ततावादाकडे पाहणे त्याला मान्य नव्हते. याशिवाय बेथँमचा उपयुक्ततावाद विषयक आग्रही दृष्टिकोन मिलला मान्य नव्हता. उपयुक्ततावादानुसार व्यक्तीला तिचे सुख हेच अंतिम ध्येय वाटावे आणि सुखासाठी व्यक्तीने कोणतीही साधने वापरून काहीही कृती करावी, हे जे. एस. मिलला मुळीच मान्य नव्हते. मिलने उपयुक्ततावाद विचारांची प्रेरणा बेथँमपासून घेतली हे निर्विवाद आहे, परंतु बेथँमचा सिद्धांत त्याने जसाच्या तसा पूर्णपणे स्वीकारला नाही. त्यातील दोष दूर करून सुधारणा, बदल करण्याचा प्रयत्न केला. त्याने बेथँमच्या उपयुक्ततावादात पुढीलप्रमाणे सुधारणा, बदल केलेला आहे. मिलने १८६१ मध्ये 'Utilitarianism' ग्रंथामध्ये आपले संशोधित विचार मांडले आहेत. ते बदल, सुधारणा खालील मुद्द्यांच्या आधारावर स्पष्ट करता येतील.

**१) सुख-दु:खात जसा मात्रात्मक फरक असतो तसाच गुणात्मक फरक असतो :**

बेथँमच्या मते, सुख किंवा दु:खात केवळ मात्रात्मक (संख्यात्मक) आंतर असते. व्यक्ती मात्रात्मक सुखामागे धावत असतात. मिलला बेथँमचा हा विचार मान्य नाही. त्याच्या मते, सुख किंवा दु:खात गुणात्मक अंतर देखील असते. जसे बेथँम म्हणतो की, स्वादिष्ट भोजनाचा आनंद आणि तुकारामाच्या गाथा वाचून मिळणारा आनंद सारखाच असतो. म्हणजे सुखाचा, आनंदाचा एक प्रकार दुसऱ्या सुखाएवढाच चांगला असतो. केवळ त्यात सुखाची मात्रा बदलते एवढेच. अशारितीने बेथँम सुख व आनंदाच्या मात्रेवर भर देतो. मिलला बेंथॅमचा हा विचार मान्य नाही. कारण बेथँमने केवळ संख्येचा विचार केला, गुणात्मक विचार केला नाही. मिलने गुणात्मक दृष्ट्या सुख-दु:खाचा विचार केला. त्याच्या मते, सर्वच सुख वा आनंद सारखे नसतात. एकाच गोष्टीपासून मिळणारा आनंद किंवा दु:ख सर्वांना समप्रमाणात मिळत नसते. त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठता असते. मिल शारीरिक आनंदाच्या तुलनेत बौद्धिक आनंदाला श्रेष्ठ समजतो, जसे क्रिकेट खेळून मिळणाऱ्या आनंदापेक्षा कालिदासाचे काव्य वाचून मिळणारा आनंद केव्हाही श्रेष्ठच मानावा लागेल. (पण बेथँम दोन्ही आनंदाला सारखेच मानतो.) कारण मानसिक सुख, आनंद अधिक स्थायी असते. सारांश, बेथँमने सुख-दु:खात केवळ मात्रात्मक फरक मानला. मिलने त्यात गुणात्मक फरक मानून भर टाकली. बेथँमने सुखाच्या, आनंदाच्या भौतिक मात्रेवर अधिक भर दिला, तर मिलने गुणात्मक सुखाला, आनंदाला अधिक महत्त्व दिले.

**२) असंतुष्ट मानव संतुष्ट पशूपेक्षा श्रेष्ठ :**

जे. एस. मिलने सुखाच्या विविध प्रकारातील फरक स्पष्ट केला आहे. काही सुख उच्च प्रतीची आणि काही कमी प्रतीची असतात. म्हणूनच तो म्हणतो की, पशू होऊन समाधानी राहण्यापेक्षा माणूस होऊन असमाधानी राहणे चांगले, बौद्धिक विकास झालेल्या व्यक्तीला सुखाची अनुभूती जास्त होते. म्हणून तो विद्वानांची असंतुष्टता मूर्खाच्या समाधानापेक्षा श्रेष्ठ मानतो. जसे मुर्खाच्या संतुष्टतेपेक्षा असंतुष्ट सॉक्रेटीस चांगला, मूर्ख किंवा पशू यांना फक्त मात्रात्मक सुखाची एक बाजू समजते तर ज्ञानी माणसाला तुलणात्मक बाजू अधिक समजते. मिलच्या मते, श्रेष्ठ पुरुषांचे दु:ख देखील सुखी माणसापेक्षा श्रेष्ठ असते. थोडक्यात, मिलने सुख आणि दु:खात गुणात्मक फरक मान्य करून उपयुक्ततावादाला अधिक तर्कसंगत बनविले आहे.

**३) सुख–दु:खाचे मोजमाप करणे अशक्य :**

बेथँमच्या मते, संख्यात्मक (मात्रात्मक) पद्धतीने सुख–दु:खाचे मोजमाप करता येते. पण ही पद्धती मिलला मान्य नाही. कारण बेथँमचे सुख–दुखाचा विचार गुणात्मक पद्धतीने केलाच नाही. सुख–दु:खात मिलने गुणात्मक अंतर मान्य केल्यामुळे संख्यात्मक पद्धतीने त्याचे मोजमाप करणे अशक्य होते. कारण एका गोष्टीपासून एखाद्याला सुख मिळते त्याच गोष्टीपासून दुसऱ्याला सुख मिळेलच याची हमी देता येत नाही. स्वादिष्ट भोजन आणि रामायण, महाभारत सारखी काव्य यांची बरोबरी होत नसते. मिलच्या मते, प्रत्येक व्यक्तीला मिळणारे सुखे भिन्न स्वरूपाचे असू शकते. भारतीय धर्मशास्त्रात आध्यात्मिक आनंद हा भौतिक आनंदापेक्षा अधिक श्रेष्ठ मानला जातो. बेथँमच्या मापक पद्धतीने त्याचे मूल्यमापन होऊ शकत नाही. प्रत्येकाला एकाच गोष्टींमुळे सारखाच आनंद होत नाही. शास्त्रीय संगीत ऐकण्याचा काहींना आनंद वाटेल तर काहींना कंटाळवाणे. सुख–दुख एक सारखेच नसल्याने तते मोजताही येत नाही. सुखाला अंतिम मानता येत नाही. सुख हे आत्म्याला मिळालेला आनंद असतो, त्याचे मोजमाप करता येत नाही.

**४) अधिकतम लोकांचे अधिकमत सुखे हे तत्त्व अमान्य :**

बेथँमच्या मते, मानवी जीवनाचा उद्देश सुखप्राप्ती हा आहे आणि राज्याचा उद्देश यासाठी सहकार्य करणे हा आहे. बेथँम अधिकतम लोकांचे अधिकतम सुखाला महत्त्व देतो व नैतिक विचारांचे महत्त्व नाकारतो. याउलट मिल नैतिक विचाराला जास्त महत्त्व देतो. मिल राज्याला एक नैतिक संख्या मानतो. त्यामुळे राज्याचा उद्देश ही नैतिक असतो. राज्याचा उद्देश केवळ व्यक्तिगत सुख किंवा उपयोगिता वाढविणे हा नसून व्यक्तींच्या गुणांचा सर्वांगीण विकास करणे, हा असतो. मिलच्या मते, प्रत्येक व्यक्ती जर व्यक्तिगत सुख वाढविण्यावर भर देत असेल तर अधिकतम लोकांचे अधिकतम सुख कसे वाढणार? कारण त्यामधून स्वार्थ व संघर्ष वाढण्याचीच शक्यता अधिक असते. म्हणून मिल म्हणतो, केवळ सुख–दु:खाच्या बाजूचे संख्यात्मक बहुमत विचारात घेऊन 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' हे बेथँमच्या उपयुक्ततावादाचे सूत्र (तत्त्वज्ञान) प्रत्यक्षात आणता येणार नाही. मिल बेथँमचे हे तत्त्व अमान्य करतो. मिल येशूच्या उपदेशाने नैतिकता स्पष्ट करू इच्छितो. येशू ख्रिस्ताचा असा उपदेश आहे की, ''तुम्ही तुमच्या सोबत इतरांनी कसे वागावे याची जशी इच्छा बाळगता, त्याप्रमाणे तुम्ही प्रथम इतरांसोबत वागण्याचा प्रयत्न करा. तुम्ही स्वत:वर जेवढे प्रेम करता तेवढेच प्रेम आपल्या सहकारी व्यक्तीवर, शेजाऱ्यांवर करा. आपले हित व सुख, आनंद इतरांच्या हित व सुख, आनंदात पाहा.'. यामुळे जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त लोकांना सुख मिळेल. म्हणून नैतिकता हाच व्यक्तिगत सुख किंवा उपयोगितेचा प्रमुख आधार आहे, असे मिल म्हणतो.

**५) उपायोगितावाद म्हणजे बहुमताच्या आधारावर अल्पमतावर अत्याचार नाही :**

मिलच्या मते, उपयुक्ततावाद म्हणजे बहुमताच्या आधारावर अल्पमतावर अत्याचार करणे नव्हे. अधिकतम अत्याचार करणे नव्हे. अधिकतम व्यक्तींचे अधिकतम सुखाचा अर्थ असा की, जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण होय. परंतु याठिकाणी बेथँमचे एका गोष्टीकडे दुर्लक्ष होते की, जे कमीत कमी लोक आहेत त्यांच्या सुखाचे काय? प्रत्येकालाच सुखप्राप्ती झाली पाहिजे. केवळ अधिकतम लोकांसाठी सुखप्राप्तीचा

प्रयत्न करणे म्हणजे बहुमताच्या बळावर अल्पमतावर अन्याय-अत्याचार करणे होय. समाज व्यक्तीच्या हितासाठी संघटित झाला. त्यात सर्वांचे सुख अभिप्रेत आहे. अल्पमतावर अत्याचार करण्यासाठी नाही. आपण दुसऱ्याकडून जशा व्यवहाराची अपेक्षा करतो तसाच व्यवहार आपण दुसऱ्याच्या बाबतीत ठेवायला पाहिजे. अशा प्रकारे बेथँमच्या अधिकतम लोकांच्या अधिकतम सुखाच्या सिद्धांताला मिलने व्यक्तिगत नैतिकतेचा सिद्धांत बनविले. दुसऱ्याला सहाय्य करण्यात किंवा दुसऱ्याची सेवा करण्यात सुख मिळू शकते, याकडे मिलने लक्ष दिले. त्याने आपल्या उपयुक्ततावादात अधिकतम व्यक्तीच्या सुखाऐवजी सामूहिक सुखाला आधार बनविले.

**६) बेथँम बाह्य सुखावर तर मिल आंतरिक सुखावर भर देतो :**

मिल व्यक्तीच्या बाह्य सुखाबरोबरच आंतरिक (आत्मिक) सुखालाही महत्त्व देतो. बेथँम केवळ बाह्य सुखावर भर देतो. बेथँम माणूस सुखप्राप्तीचा प्रयत्न का करतो? यामागची चार कारणे सांगतो. १) सामाजिक- समाजात मान, सन्मान व प्रतिष्ठा मिळावी यासाठी माणसांचा सतत प्रयत्न चालेला असतो. २) राजकीय- स्वहितासाठी राजकीयदृष्ट्या आवश्यक असणाऱ्या कायदयांचे पालन करणे, ३) धार्मिक- माणूस मोक्षप्राप्ती अथवा स्वर्गप्राप्तीकरिता प्रयत्न करतो, ४) शारीरिक- शरीरसुखासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. बेथँमच्या मते, माणूस या सर्व बाह्य गोष्टींनी सुखप्रापप्तीकडे आकर्षित होत असतो. मिलच्या मते, सुखप्राप्तीसाठी एवढेच बाह्य कारण पुरेसे नसते. मिलने यात नैतिक, आत्मिक, मानसिक व आध्यात्मिक सुखाच्या भावनेची भर टाकली. उदात्त ध्ये गाठण्यासाठी त्याग करण्यातून मिळणारे सुखे हे आंतरिक असते, असे मिल म्हणतो.

बेथँमच्या मते, प्रत्येक व्यक्तीची धडपड स्वत:च्या सुख प्राप्तीसाठी असते. मिलला हे मान्य नाही की, प्रत्येक व्यक्ती स्वार्थी असतो आणि केवळ स्वत:च्याच सुखासाठी धडपडतो. बेथँमने केवळ बाह्य गोष्टींवर भर दिल्यामुळे तो प्रत्येक व्यक्तीला स्वार्थी समजतो. अंत:करणाच्या तत्त्वावर भर दिल्यामुळे तो म्हणतो की, सुखाची प्राप्ती आंतरिक कारणाने होते. सुख-दु:खाची अनुभूती अंत:करणात होते. ती बाहेरून दिसू शकत नाही. त्याला व्यक्त करू शकत नाही किंवा तिचे मोजमाप होऊ शकत नाही. जसे एखाद्या नैतिक आणि योग्य कामामुळे मिळणारी मन:शांती श्रेष्ठ दर्जाची असते, जसे नि:स्वार्थ भावनेने गरजू व्यक्तींना केलेली मदत. चूकीचे, वाईट काम हातून झाल्यास पश्चात्ताप होऊन मानसिक क्लेश होतात. अशा रितीने सुख हे नैतिक, आत्मिक, मानसिक आणि आध्यात्मिक असते. जसे राष्ट्रभक्तीचे सुख आत्मिक आहे. तेव्हा बाह्यसुखासाठीच व्यक्तीची धडपड असते, हे बेथँमचे म्हणणे चुक आहे. देशासाठी, स्वातंत्र्यासाठी, समाजाच्या हितासाठी नि:स्वार्थ भावनेने जीवन अर्पण करणाऱ्यांचे सुख आंतरिक असते. जसे भगतसिंग, राजगुरू, येशूख्रिस्त, सॉक्रेटिस, म. गांधी इ. स्वत: अर्धपोटी राहून मुलांना पोटभर खाऊ घालणाऱ्या गरीब आई-वडीलांचे सुख आंतरिक आहे. तात्पर्य असे की, सुखाची कल्पना केवळ बाह्य नसून आंतरक असते, असे मिलचे मत आहे. मिलच्या मते, व्यक्तीला व्यक्तिगत सुखापेक्षा समाजहिताच्या आंतरिक तळमळीतून मिळणारे सुख श्रेष्ठ दर्जाचे असते.

**७) बेथँम व्यक्तिगत सुखाला तर मिल सार्वजनिक सुखाला महत्त्व देतो :**

बेथँमच्या मते, मानवी कार्यामागच्या प्रेरणोत स्वहित व स्वसुखाला महत्त्व असते. तो असे म्हणतो की,

स्वप्नातसुद्धा असे समजणे गैर होईल की, माणूस प्रत्यक्ष आपले हित वा सुख असल्याशिवाय इतरांची सेवा करेल. मिल बेथँमचे हे विचार नाकारतो. तो म्हणतो, व्यक्ती जर स्वहिताचा विचार करते, परंतु विकसित विचारांमुळे कार्य हेच ध्येय मानतो. ती सार्वजनिक सुखातच सुख शोधते. उदारप्रवृत्ती, परोपकार, सहानुभूती, त्याग यात त्यांना सुख दिसते. स्वत: मृत्यूचा धोका पत्करून एखाद्याला मृत्यूच्या पाशातून सोडविण्यातील आनंद अविस्मरणीय व उदात्त असतो. उदा. नदीच्या प्रवाहात बुडणाऱ्या व्यक्तीला स्वत:चा जीव धोक्यात घालून वाचविणे हे कार्य उदात्त व अविस्मरणीय असते. माणसाने स्वत:पुरता सुखाचा विचार करावा, ही बेथँमचे भूमिका मिलला मान्य नाही. तो म्हणतो, सुख-दु:खाचा विचार करताना दुसऱ्यांचाही विचार करावा. समाजाच्या सुखात आपले सुख बघावे. दुसऱ्यासाठी, समाजासाठी त्याग करणे, परोपकाराची भावना असणे, सहानुभूती दाखवणे यातच आनंद, सुख असते. ते सुख उच्च दर्जाचे असते, असे मिल म्हणतो. थोडक्यात, बेथँम व्यक्तिगत सुखाला महत्त्व देतो. तर मिल सार्वजनिक सुखाला महत्त्व देतो.

**८) कायद्यापेक्षा नैतिक-सामाजिक बंधने श्रेष्ठ :**

बेथँमच्या मते, राज्याने अधिकतम लोकांचे अधिकतम हित या आधारावर कायदे करावेत. परंतु उपयुक्ततेची निश्चित अशी मोजमाप करणारी पदधती, मापदंड नसल्याने उपयुक्तता हा कायद्याचा आधार होऊ शकत नाही, असे मिल म्हणतो. मिल सुव्यवस्था व नैतिक उन्नती हा कायद्याचा आधार मानतो. कायद्यापेक्षा नैतिक, सामाजिक बंधने, श्रद्धा श्रेष्ठ असतात. विधिनियमापेक्षा देखील श्रद्धा व नैतिकतेमुळे निरूपयोगी वाटणारी कार्ये समाजात व्यक्ती आनंदाने करीत असते. उपयोगिता हा एकच निकष सर्वत्र लावणे चूक ठरते. उदा. वृद्ध आई-वडीलांची सेवा करणे, गुरूजंनाचा आद करणे या गोष्टी कोठे कायद्यात नमूद केलेल्या नसतात. म्हणून मिल कायद्याचा आधार जनतेची इच्छा हा आहे, असे मानतो. उपयुक्तता हा कायद्याचा आधार नसावा. एखाद्या वस्तूची उपयोगिता पाहून कायदे करू नयेत असे मिल सुचवितो. कारण त्यासाठी निश्चित मापदंड नसतो. तसेच वस्तूच्या उपयुक्ततेचे मोजमापही करता येत नसते. सारांश, मिल विधिनियमापेक्षा नैतिक-सामाजिक बंधणे अधिक श्रेष्ठ असल्याचे मानतो.

**९) व्यक्तिगत जीवनात राज्याचा हस्तक्षेप मर्यादित असावा :**

उपयुक्ततावाद हा सुखवादाकडे जाणारा मार्ग आहे. उपयोगितावादी बेथँमचे अशी धारणा होती की, व्यक्तिगत सुखप्राप्तीमुळे सामाजिक सुख प्राप्त होऊ शकेल. यासाठी राज्याने योग्य ते सहकार्य करावे. मिलने आपल्या 'Political Economy' ग्रंथामध्ये त्याचे खंडित केले. मिलच्या मते, राज्याने व्यक्तिगत जीवनात आवश्यक प्रमाणात हस्तक्षेप करून नियंत्रण टाकावे. सार्वजनिक कल्याणासाठी मिलला हे आवश्यक वाटते. वास्तविक मिल हा व्यक्तिस्वातंत्र्यवादी अधिक आहे. त्यामुळे तो राज्याचे कार्यक्षेत्र मर्यादित करण्यावर भर देतो. परंतु वक्तीविकास व सामाजिक कल्याण यान साधक ठरणाऱ्या कार्यावर प्रतिबंधात्मक उपययोजना करण्याचा अधिकार मिल राज्याला देतो. त्याच्या या विचारांमुळे तो जमीनदारीस विरोध करतो व शिक्षणाचे समर्थन करतो. मिल संपत्तीत पवित्र अधिकार समजाते. मात्र समाजहितासाठी तो आर्थिक क्षेत्रात राज्याचा हस्तक्षेप मान्य करतो. सार्वजनिक कल्याणाचा विचार करताना राज्याने आपल्या कार्यक्षेत्रात योग्य तो बदल

करावा, असे सुचवितो. योग्य वेळी, योग्य ठिकाणी राज्याचे व्यक्तिगत जीवनात हस्तक्षेप केला तरच सर्वांना स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल.

**१०) स्वातंत्र्य हे साध्य :**

बेथँमने स्वातंत्र्याला उपयुक्ततावादी सिद्धांताचे साधन मानले तर मिळणे स्वातंत्र्यातच स्वयंसाध्य मानले.

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, बेथँमच्या उपयुक्तावादी सिद्धांतात जे एस. मिलने अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा, बदल संशोधने करून त्याची पुनर्मांडणी केली आहे.

**उपयुक्ततावादी विचाराचे मूल्यमापन :**

जॉन स्टुअर्ट मिलने बेथँमच्या उपयुक्ततावादी सिद्धांतावर होणारी टीका, आक्षेप लक्षात घेऊन त्यातील दोष दूर करण्यासाठी अनेक सुधारणा, बदल करून त्यात मोलाची भर टाकून त्याची फेरमांडणी केली. बेथँमच्या संकुचित व्यक्तिकेंद्रीत सिद्धांताला सामाजिक आशय देण्याचा प्रयत्न केला. बेथँमच्या उपयुक्ततावादी सिद्धांताच्या राजकीय स्वरूपात मिलने नैतिकतेची जोड दिली. बेथॅमने आपल्या सिदधांतात व्यक्तिगत सुखाला अधिक महत्त्व दिले. त्यामुळे त्याचा सिद्धांत एकांगी पडला होता. परंतु मिलने व्यक्तिहितावर सुखा बरोबरच सामाजिक हिता व कल्याणाला महत्त्व देऊन उपयुक्ततावादी सिद्धांताचा त्यावर होणारा प्रखर टीकेपासून केला. बेथँमच्या एकांगी सिद्धांताला त्याने पूर्णत्वास नेले.

जे. एस. मिलने बेथँमच्या उपयुक्ततावाद अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा बदल केले. त्याने केलेले संशोधन, बदल एवढे अमूलाग्र होते की, त्याच्या संशोधनापुढे मूळ उपयुक्ततावाद शिल्लकच राहिला नाही. म्हणूनच याविषयी टीका करताना वेपर म्हणतो, ''उपयुक्ततावादावर होणाऱ्या टीकेला समर्पक उत्तरे देऊन त्याचे संरक्षण करण्याच्या हेतूने मिलने एवढी संशोधने केली की, मूळ उपयुक्ततावादाचाच परित्याग केला. व्यक्तिवादावर अधिक भर देऊन त्याने व्यावहारिक बाजूकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले, अशी मिलवर टीका होत असली तरी त्याने बेथँमच्या उपयुक्ततावादी सिद्धांताला मानवतावादी स्वरूप देण्याचे कार्य केले, हे नाकारता येत नाही. **ब्राऊनच्या** मते, जे. एस. मिलने बेथँमच्या विचारांतील नैतिकतेचा अपुरेपणा (अपरिपक्वता) कमी करून एकाच वेही उपयुक्ततावाद अधिक मानवतावादी आणि अल्प सुसंगत (Less Consistent) बनविला. **सेबाईन**च्या मते, मिलचे नीतिशास्त्र अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण सुखोबरोबर स्वातंत्र्य, समाजहित, स्वप्रतिष्ठा या गोष्टींवर त्याने भर दिला आहे. थोडक्यात, उपयुक्ततावादासंबंधीच्या वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, जे. एस. मिलची उपयुक्ततावादाची कल्पना जेरेमी बेथँमपेक्षा अधिक नैतिक, सुसंस्कृत आणि व्यापक स्वरूपाची आहे.

## १.२.७ मिलचे राज्यासंबंधी विचार :

जॉन स्टुअर्ट मिल राज्याला मानवी इच्छेचा परिणाम मानतो. राज्याची उत्पत्ती सार्वजनिक हितासाठी झाली. राज्याचा विकास सजीव वस्तूप्रमाणे टप्प्याटप्याने झाला. राज्यांतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व राजकीय संघटनांची निर्मिती मनुष्याच्या कल्याणासाइी झाली आहे. राज्य अमूर्त असल्यामुळे ते स्वत: कार्य करीत नाही. राज्याचा दर्जा तेथील जनता आणि शासनाची सत्तासूत्रे ज्यांच्या हाती आहेत, त्यांच्या गुण आणि क्षमतेवर

अवलंबून असते. राज्याचे कार्य निष्क्रिय लोकांच्या भरवशावर चालू शकत नाही. त्यामुळे राजकारणात सक्रीय सहभाग घेण्यावर मिल अधिक भर देतो. मिलच्या राज्यासंबंधी विचारांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) राज्याची निर्मिती :**

मिलने राज्याला मानवी इच्छेचा परिणाम मानून राज्याची उत्पत्ती सार्वजनिक हितासाठी झाली असे म्हणतो. उपयुक्ततावादी सिद्धांतांच्या पार्श्वभूमीवर मिलच्या राज्याच्या निर्मिती संबंधीच्या सिद्धांताला महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्याची निर्मिती भौतिक किंवा जडत्वातून झाली नसून चैतन्य शक्तीतून झालेली आहे, राज्याचा उद्देश सार्वजनिक हितसंबंध सुरक्षित ठेवणे, हा आहे हे केवळ लोकशाहीत शक्य असते. म्हणून मिलने लोकशाहीचे समर्थन केले.

**२) राज्याचे कार्यक्षेत्र :**

जेरेमी बेथॅम आणि जेम्स मिल यांच्या उपयुक्ततावादी विचारांचा प्रभाव वाढल्यामुळे ब्रिटनमध्ये राज्याचे कार्यक्षेत्र वाढले होते. आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी भांडवलदारांनी राज्याच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप केला आणि अनेक कायदे करून घेतले.

**(अ) व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित होते :** मिल म्हणतो, राज्याचे कार्यक्षेत्र वाढले की, व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित होते किंवा त्याचा लोप होतो. व्यक्तीस्वातंत्र्याचे रक्षण होईल, असा हस्तक्षेप राज्याने करावा. याचाच अर्थ राज्याचा हस्तक्षेप संरक्षणात्मक असावा.

**(ब) व्यक्तीच्या व्यक्तिगत व सामाजिक कार्यासंबंधी :** मिलने व्यक्तीची दोन कार्यक्षेत्र मानली आहेत. एक व्यक्तिगत, दुसरे सामाजिक. यालाच मिल अनुक्रमे स्वसंबंधीचे कार्यक्षेत्र आणि परसंबंधीचे कार्यक्षेत्र असे म्हणतो. त्याच्या मते, राज्याने व्यक्तिगत अधिकारावर व्यक्तीशी संबंधित असलेल्या कार्यावर मर्यादा घालू नये किंवा हस्तक्षेप करू नये; परंतु परसंबंधी (सामाजिक) असलेल्या कार्यावर किंवा अधिकारावर राज्याने हस्तक्षेप करावा, मर्यादा घालाव्यात.

**(क) व्यक्तीस्वातंत्र्यावर गरजेपेक्षा अधिक मर्यादा घालू नयेत :** मिलने राज्याच्या हस्तक्षेपासंबंधी विचार करताना व्यक्तिस्वातंत्र्य ही महत्त्वाची बाब मानली. कारण व्यक्तीच्या नैतिक विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते, असे तो म्हणतो. स्वातंत्र्यावर निर्बंध घातले तर व्यक्तीचा नैतिक विकास होणार नाही. म्हणून मिल व्यक्तिस्वातंत्र्यावर गरजेपेक्षा अधिक मर्यादा राज्याने घालू नयेत, असे म्हणतो.

थोडक्यात, राज्य संस्थेने व्यक्तिस्वातंत्र्यात किमान हस्तक्षेप करावा. गरजेपेक्षा अधिक हस्तक्षेपामुळे स्वातंत्र्याची गळचेपी होते. व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी कधी कधी राज्याचा हस्तक्षेप आवश्यक व अपरिहार्य असतो. सर्वांना समान संधी आणि स्वातंत्र्य मिळेल, याची राज्यसंस्थेने काळजी घ्यावयाची असते. राज्यसंस्थेला वेळोवेळी उद्योगधंदे, व्यवसाय, शेती, बँकिंग, सेवाक्षेत्र, शिक्षण, व्यापार आदि क्षेत्रात मूठभर लोकांची मक्तेदारी निर्माण होऊ नये यासाठी सुद्धा अनेकदा हस्तक्षेप करावा लागतो, तो व्यक्ती आणि समाजाच्या हितासाठी आवश्यक असतो.

**३) राज्याने व्यक्तिस्वातंत्र्यात केव्हा हस्तक्षेप करू नये? :**

जे. एस. मिलने व्यक्तिस्वातंत्र्यात पुढील तीन कारणांसाठी राज्यसंस्थेने हस्तक्षेप करू नये याचे समर्थन केले आहे.

१) राज्य व समाज, यांच्यापेक्षा व्यक्तीला स्वत:चे हित कशात आहे, हे अधिक चांगले कळते. बरे-वाईट, फायदा-तोटा कशात आहे, याची चांगली जाणीव असते. म्हणून व्यक्तीच्या या व्यवहारात राज्याने हस्तक्षेप करू नये.

२) प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या नैतिक व भौतिक प्रगतीसाठी कार्य करण्याचे स्वातंत्र्य असते, म्हणून राज्यसंस्थेने या क्षेत्रात हस्तक्षेप करण्याचे टाळावे.

३) व्यक्तिस्वातंत्र्यात राज्यसंस्थेचा गरजेपेक्षा हास्त हस्तक्षेप वाढला तर सर्वंकष शासनपद्धती निर्माण होते. म्हणून राज्यसंस्थेने गरजेपेक्षा अधिक हस्तक्षेप करू नये.

**४) राज्याने व्यक्तिस्वातंत्र्यात केव्हा व कोणत्या क्षेत्रात हस्तक्षेप करावा? :**

जे. एस. मिलने एका बाजूने व्यक्तिस्वातंत्र्यात राज्याने केव्हा हस्तक्षेप करू नये या बाबतीत विचार केला तर दुसऱ्या बाजूने राज्याने व्यक्तिस्वातंत्र्यात केव्हा हस्तक्षेप करावा, यासंबंधी विचार केला आहे. व्यक्तिस्वातंत्र्यात काही परिस्थितीत हस्तक्षेप अपरिहर्य असतो. मिल पुढील कारणांसाठी व्यक्तिस्वातंत्र्यात राज्याचा हस्तक्षेप समर्थनीय मानतो.

१) सार्वजनिक हितसंबंधाचा विचार करून उद्योगधंदे, सार्वजनिक व्यापार, आयात-निर्यात, करप्रणाली आदिंवर राज्याने कायद्याद्वारे योग्य नियंत्रण ठेवावे, २) राज्यातील सर्व मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी पालकांचय मतांकडे दुर्लक्ष करून राज्यसंस्थेने कायद्याद्वारे हस्तक्षेप करावा, ३) स्थावर-मालमत्ता, विवाह, घटस्फोट, पोटगी, तह, करार यासारख्या कामासाठी योग्य कायदे व्हावेत, म्हणून राज्याचा हस्तक्षेप अपरिहार्य असतो, ४) राज्यसंस्थेने कष्टकरी, कामगारांचे शोषण, पिळवणूक होऊ नये, यासाठी कायद्याद्वारे कामाचे तास निश्चित करणे, त्यांना विश्रांतीचा अधिकार देणे इत्यादीसाठी राज्याने हस्तक्षेप करावा, ५) विविध स्वरूपाच्या मूलभूत संशोधनात्मक कार्याला गती मिळावी, म्हणून राज्याचा हस्तक्षेप अपरिहार्य ठरतो, ६) व्यक्तीच्या दैनंदिन जगण्याशी निगडीत विविध सेवाक्षोत समाजहितासाठी राज्यंस्थेने योग्यवेळी हस्तक्षेप करणे आवश्यक असते.

**मिलच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या हस्तक्षेप सिद्धांतावरील टिका :**

**१) राज्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप वाढण्याची शक्यता :**

राज्यसंस्थेला विशिष्ट परिस्थितीत व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप करण्याची परवानगी मिळाल्यावर ती संस्था विविध मार्गाने केव्हाही हस्तक्षेप करील. परिणामी, व्यक्तिस्वातंत्र्य संकुचित होईल. याशिवाय स्वसंबंधी आणि परसंबंधी याचे निमित्त पुढे करून राज्य वारंवार हस्तक्षेप करण्याची शक्यता अधिक असते.

**२) सर्वांना स्वातंत्र्य समाजहितास बाधक :**

मिलने राज्यातील सर्व व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा विचार केला. याचा अर्थ विकृत, मूर्ख, वेडसर अशा माणसांनाही स्वातंत्र्य द्यावे लागेल. मिलच्या विचारानुसार त्यांच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप करायचा नाही, असे मानले तर अतिशय वाईट सामाजिक परिणाम घडतील. याकडे मिल दुर्लक्ष करतो.

**३) तर्काला अनावश्यक महत्त्व :**

मिलने त्याच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करताना तर्कज्ञानाला अधिक महत्त्व दिले. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात राज्याच्या हस्तक्षेपासारखे प्रश्न तर्काने विचार करून सुटत नसतात.

**४) नकारात्मक भूमिका :**

मिलचे एकूण तत्त्वज्ञान निषेधात्मक नाही. वास्तविकत: मिलने अयोग्य गोष्टींचा निषेध करावयास पाहिजे होता. मात्र त्याऐवजी त्याने नकारात्मक भूमिका घेतली. जसे की राज्याने हे करू नये, ते करू नये या नकारात्मक भूमिकेतून व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना मजबूत पायावर उभी राहू शकत नाही.

**५) राज्यांच्या कार्याचे स्वरूप :**

जे. एस. मिलने राज्याच्या कार्याचे दोन भागात वर्गीकरण केले आहे - (अ) सकारात्मक कार्य, (ब) नकारात्मक कार्य.

**(अ) सकारात्मक कार्य :**

सकारात्मक कार्यात राज्याने करावयाच्या नैतिक कार्याचा समावेश होतो.

**१. व्यक्तीविकासाला पोषक वातावरणाची निर्मिती करणे :** मिलने राज्याच्या कोणत्याही प्रकारच्या कार्यात व्यक्तिविकासाला सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. व्यक्तीला स्वतंत्रपणे विचार करता यावा आणि सत्य शोधून काढता यावे, यासाठी राज्याने समाजात योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. राज्याचे हे सकारात्मक कार्य आहे. समाजातील मोकळे, स्वतंत्र व पोषक वातावरणातच व्यक्तीचा विकास होऊ शकतो. चारित्र्यसंपन्न नागरिकांची निर्मिती करणे हा त्यामागील मिलचा उद्देश होता. व्यक्तीविकासाला पोषक वातावरण निर्माण केल्याने व्यक्तीला निर्भेळ स्वातंत्र्य उपभोगता येईल, ही त्यामागची मिलची भूमिका आहे.

**२. व्यक्तिगत कार्यात स्वातंत्र्य :** मिलने व्यक्तीच्या कार्याचे व्यक्तिगत आणि समाजहिताशी संबंधित कार्य, असे दोन भागात विभाजन केले आहे. राज्याने व्यक्तीला व्यक्तिगत कार्यात संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे. मिलला व्यक्तिगत कार्यात राज्याचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप मान्य नाही. त्याच्या मते, व्यक्तीला व्यक्तिगत कार्यात पूर्ण मोकळीक किंवा स्वातंत्र्याची हमी प्राप्त झाली, तर तो आपले कार्य अधिक चांगले करू शकतो.

**३. कल्याणकारी कामे करणे :** समाज आणि व्यक्तीच्या कल्याणासाठी प्रमुख उद्योगधंद्यावर नियंत्रणे आणावीत. कारखान्यांसाठी कामाचे नियम तयार करणे. व्यक्तीच्या बुद्धिचा विकास होईल, अशी परिस्थिती

राज्याने निर्माण करावी लागते, याचाच अर्थ राज्याने शिक्षणाची योग्य ती व्यवस्था (प्रबंध) करावी. समाज आणि व्यक्तीच्या अयोग्य संवर्धनाचे महत्त्वाचे कार्य राज्याने करावे, इत्यादी राज्याने करावयाच्या समाजोपयोगी कार्याला मिलने कल्याणकारी कामात समाविष्ट केले आहे.

थोडक्यात, वरील सर्व कार्याला मिल सकारात्मक किंवा रचनात्मक कार्य म्हणतो. व्यक्तीचा नैतिक विकास करण्यासाठी राज्यंस्थेला विधायक कार्य किंवा भूमिका पार पाडावी लागते. कारण या कार्यात समाज व व्यक्ती विकासासाठीच्या पोषक वातावरण निर्मितीचा अंतर्भाव होतो. या कार्यालाच विधायक कार्य किंवा रचनात्मक कार्य, असे म्हणतात.

पण रचनात्मक किंवा विधायक कार्य अधिक अर्थपूर्ण होण्यासाठी राज्याला काही नकारात्मक कार्य करणे आवश्यक असते.

**(ब) नकारात्मक कार्य :**

मिलने राज्याच्या नकारात्मक कार्याला निषेधात्मक कार्य, असे म्हटले आहे. नकारात्मक कार्यात राज्याला व्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालावे लागतात. जेणेकरून ती कार्य व्यक्तींनी करू नयेत, अशी राज्याची अपेक्षा असते. समाजात अशांती, अराजकता, अव्यवस्था, गडबड, गोंधळ निर्माण होऊ नये, म्हणून मिल व्यक्तिस्वातंत्र्यात राज्याचा हस्तक्षेप करण्याचा अधिकार नकारात्मक कार्याद्वारे देतो.

**१. समाजहित विरोधी कार्यात हस्तक्षेप करावा :** व्यक्तीच्या किंवा व्यक्तिसमूहाच्या एखाद्या कार्यामुळे समाजहिताला बाधा पोहोचत असेल तर राज्यंस्थेने त्यात हस्तक्षेप कराव. समाज व व्यक्तीहितासाठी दारूसारख्या व्यसनापासून व्यक्तीला परावृत्त करावे. त्यासाठी दारुबंदी कायदा करावा. व्यक्ती व समाजाच्या हातून समाजविघातक गोष्टी होणार नाहीत, असे कायदे राज्याने करावेत. व्यक्तीच्या समाजहितविरोधी कार्यावर प्रतिबंध घालावेत. मिल निश्चित मर्यादेपर्यंत काही अटींसह व्यक्तीगत कार्यात राज्याला हस्तक्षेप करण्याची सहमती देतो.

**२. संकटकाळाचा सामना करण्यासाठी :** मिल संकटकाळाचा सामना करण्यासाठी राज्याला व्यक्तिगत आणि सामाजिक कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार देतो. आकस्मिकपणे संकटकालीन स्थिती निर्माण होत असल्यामुळे त्याच्या निवारणासाठी काटेकोर उपाययोजना करणे राज्यासाठी आवश्यक असते. त्यासाठी आवश्यक ते नियम, कायदे करावेत. संकटकाळातील नकारात्मक कार्य अस्थायी स्वरूपाची असतात. कारण संकट निवारण झाल्यानंतर पुन्हा पूर्ववत परिस्थिती निर्माण झाल्यावर त्या नकारात्मक कामाची आवश्यकता नसते.

अशा प्रकारे काही कार्ये स्थायी स्वरूपात नकारात्मक असतात आणि काही कार्ये अस्थायी स्वरूपात नकारात्मक असतात. या नकारात्मक कार्याचा उद्देश समाजाचे कल्याण व्हावे आणि अयोग्य गोष्टींपासून त्यांना परावृत्त करणे, हा असतो. म्हणून अशा प्रकारचे नकारात्मक कार्य आवश्यक आणि अपरिहार्य ठरते, असे मिल म्हणतो.

**६) राज्याने करावयाची आवश्यक कार्ये :**

राज्याची निर्मिती ज्या सार्वजनिक समाजहितासाठी झाली ते ज्याद्वारे प्राप्त केल्या जाऊ शकते, ती राज्याची आशश्यक कार्ये आहेत. मिलच्या मते, राज्याने खालील आवश्यक काये पार पाडावी, करावी.

**१. संरक्षण करणे :** परकीय आक्रमण व राज्यांतर्गत विद्रोह, बंड यापासून व्यक्तीचे व राज्याचे रक्षण करणे हे राज्यसंस्थेचे प्रथम आणि आवश्यक कार्य आहे. यासाठी राज्याने सैनिकी खाते निर्माण करावे.

**२. सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था :** राज्यांतर्गत कायदा–सुव्यवस्था ठेवणे आणि शांतता प्रस्थापित करणे राज्याचे आवश्यक कार्य आहे. राज्यांतर्गत सार्वजनिक सुरक्षिततेसाठी राज्याने कार्यक्षम पोलीस खाते निर्माण करावे.

**३. समाजहितउपयोगी कायदे करणे :** विधिमंडळात समाजाच्या हिताला अनुसरून कायदेनिर्मिती करणे राज्याचे आवश्यक कार्य आहे. उत्तम रितीने कायदेनिर्मिती करण्यासाठी लोकप्रतिनिधी असलेले विधिमंडळ (संसद) राज्यात असावे.

**४. शिक्षा आणि दंडाची व्यवस्था :** राज्याच्या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या गुन्हेगारांना, अपराध्यांना कठोर शिक्षा आणि दंड देण्याची व्यवस्थज्ञ करणे राज्यसंस्थेचे आवश्यक कार्य आहे. कायद्याचे पालन करण्यासाठी जे टाळाटाळ करतात, त्यांना कठोर शासन करावे.

**५. न्यायदानाची व्यवस्था :** राज्यात अपराध्यांना योग्य दंड किंवा शिक्षा देण्यासाठी न्यायव्यवस्था असावाी. राज्याने न्यायदानाची व्यवस्था चोख, अलिप्त आणि तटस्थ पद्धतीने राबवावी.

**६. व्यक्तीची प्रतिष्ठा राखणे :** मिलच्या मते, व्यक्तीची प्रतिष्ठा राखण्याचे आणि त्याचे संवर्धन करण्याचे आवश्यक कार्य राज्याने करावे. राज्यात व्यक्तीचे महत्त्व आणि तिचे स्थान काय आहे, यासांबंधी माहिती देण्याचे कार्य राज्याचे आहे. यासाठी प्रचार माध्यमांचा वापर करून व्यक्तींचे मनोबल वाढवावे. व्यक्तीला वाईट गोष्टींच्या दुष्परिणामांबद्दल सतत जागृत ठेवणे हे राज्याचे आवश्यक कार्य आहे.

**७. सक्तीचे व मोफत शिक्षण :** राज्यातील सर्व व्यक्तींना सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळावे त्यासाठी योग्य तो प्रबंध (व्यवस्था) करण्याची जबाबदारी राज्याची आहे.

८. राज्याने सहकारी तत्त्वाने चालणाऱ्या उद्योगांना, उपक्रमांना प्राधान्य द्यावे. त्यासाठी राज्याने आश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

९. राज्याने कष्टकरी, कामगार वर्गांच्या हितांचे रक्षण होईल, असे कायदे करावेत.

सारांश, जे. एस. मिलने आपल्या संपूर्ण राजकीय तत्त्वज्ञानात व्यक्तीविकासाला सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे. त्यामुळे त्याने राज्याची आवश्यक कार्य म्हणून वरील कार्यांचा उल्लेख केला आहे.

### १.२.८ मिलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार :

जॉन स्टुअर्ट मिल व्यक्तिस्वातंत्र्याचा महान समर्थक होता. मिलचे स्वातंत्र्याबद्दलचे विचार ही राज्यशास्त्राला मिळालेली सर्वांत महत्त्वाची देणगी होय. त्याने निर्भेळ स्वातंत्र्याचा विचार मांडला. त्याचा १९५९ मध्ये लिहिलेला 'स्वातंत्र्याविषयी' (Eassy on Liberty - 1959) हा ग्रंथ स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारा अद्वितीय ग्रंथ म्हणून ओळखला जातो. मिलने या ग्रंथात व्यक्तिस्वातंत्र्यविषयक विचारांची सांगोपांग चर्चा व मांडणी केली आहे. यामध्ये व्यक्तीचे समाजातील स्थान, व्यक्तिस्वातंत्र्याची आवश्यकता, व्यक्तीचे हक्क, विचार व अभिव्यक्तीचे (चर्चा, भाषण) स्वातंत्र्ये, आचार (कार्यासंबंधी) स्वातंत्र्ये, व्यक्तिस्वातंत्र्यावरील राज्य व शासनसत्तेच्या मर्यादा इत्यादींविषयी मिलने समर्पक विचार मांडले आहेत. म्हणूनच वेपरने या ग्रंथासंबंधी 'एवढा विचार व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा चांगला ग्रंथ यापूर्वी लिहिला गेला नव्हता, असा अभिप्राय व्यक्त केला आहे.

**स्वातंत्र्यविषयक विचारांवर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव :**

कमीअधिक प्रमाणात प्रत्येक विचारवंतावर तत्कालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. त्याला मिलही अपवाद नव्हता. स्वातंत्र्यासंबंधीचे त्याचे विचार तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भातच तयार झाले आहेत. त्यामुळे त्याच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारांचे विवेचन करण्यापूर्वी इंग्लंड आणि युरोपमधील तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

एकोणिसाव्या शतकात मिलच्या काळात बेथँमच्या उपयुक्ततावादाचा समाजावर मोठा प्रभाव होता. 'आधिकतम लोकांचे अधिकतम सुख साधणे, हेच राज्याचे ध्येय असले पाहिजे, हा विचार सर्वसामान्य लोकांना भावला होता. बेथँमच्या उपयोगितावादामुळे लोकांचा सुखवादाकडे कल वाढू लागला होता. स्वहित कशात आहे, हे आपल्याला कळते याची जाणीव लोकांच्या स्वैराचारी सर्वनामध्ये दिसू लागली हाहेती. राज्य आणि शासनाने तेच कार्य करावे, जे लोकांना हवे आहे, असा लोकमनाचा आग्रह होता. एका अर्थाने ही परिस्थिती विचित्र होती. व्यक्तीला हवे ते राज्याने करावयाचे आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर कोणतीही बंधने असू नयेत, अशी अपेक्षा लोकांनी ठेवावयाची, असे विचित्र समीकरण १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत इंग्लंडमध्ये निर्माण झाले होते. राज्याने केवळ लोकांचे जीवित, स्वातंत्र्य आणि मालमत्ता यांचे रक्षणाचे काम करावे. एवढेच राज्याचे कार्यक्षेत्र लोकांना अपेक्षित होते. यापलीकडे लोकांना मुक्त, स्वैर जीवन जगण्याचा परवाना हवा होता. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, असे लोकांना बजावून सांगण्याची वेळ उदारमतवादी मिलवर आली होती. याकाळात व्यक्तीची स्वातंत्र्ये आणि राज्याचे कार्यक्षेत्र यामध्ये कमालीची विसंगती निर्माण झाली होती. एका अर्थाने हा सर्वच औद्योगिक क्रांतीचा परिणाम होता. परंतु त्याला बेथँमच्या व्यक्तीवादी आणि उपयुक्ततावादी विचारांची जोड मिळाल्यामुळे त्यांचा गुणात्मक अर्थ नाहिसा होऊ लागला होता. ब्रिटिश संसदेने अनेक सामाजिक सुधारणा कायदे करून व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करण्याचा प्रयत्न चालवला होता. संसदेने याकाळात केलेले कायदे उदा. कारखान्यासांबंधीचा कायदा, दारिद्र्य निवारण कायदा इत्यादी कायदे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. लोकांच्या इच्दा-आकांक्षांना वाचा फोडण्याची जागा म्हणून सामान्य लोक संसदेकडे पाहू

लागले. सामाजिक कल्याणासाठी शासनाला समाजावरील निर्बंध वाढवावे लागतील, असे चित्र दिसू लागले. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणेचा विस्तार करणे आवश्यक ठरू लागले. साहजिकच व्यक्तिस्वातंत्र्यावर अधिकाधिक बंधने घालण्याची आवश्यकता दिसू लागली. व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने आली की व्यक्तीचा विकास खुंटेल याची भीती असते. जे. एस. मिलने त्याच्या काळातील बदलती सामाजिक आणि राजकीय परिस्थिती सूक्ष्मपणे अभ्यासली आणि मगच आपली व्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना मांडली.

१९ व्या शतकात मिलच्या काळात इंग्लंडमध्ये सुधारणा आंदोलनाचा जोर वाढला होता. बेथँमच्या उपयुक्ततावादी विचारांचा प्रभाव शासनावर पडला होता. उपयुक्ततावादी सुधारणांमुळे प्रशासकीय कार्याचे क्षेत्र खूप विस्तारले होते. समाजहिताच्या नावाखाली संसद निरनिराळे कायदे बनवीत होती. सामाजिक सुधारणेच्या नावाखाली व्यक्तिगत स्वातंत्र्यात हस्तक्षेप होऊन व्यक्तीस्वातंत्र्याचा ऱ्हास होऊ लागला होता. लोकशाहीच्या बुरख्याखाली चाललेली व्यक्तिस्वातंत्र्याची ही गळचेपी मिलला मान्य नव्हती. व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर समाजाच्या मर्यादा पडत होत्या. समाजहिताच्या नावाखाली व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने लादली जात होती. त्यामुळे व्यक्तिविकास खुंटला जात होता. संसद व सरकारचा स्वातंत्र्यात असाच हस्तक्षेप सुरू राहिला तर प्रजातंत्राला धोका निर्माण होऊ शासन स्वेच्छाधारी बनण्याची भीती मिलला वाटत होती. जनतेवर लादलेले अनावश्यक कायदे त्याला मान्य नव्हते. उपयोगितावादी विचारांचय प्रभावामुळे प्रशासकीय कार्याच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली होती. जनतेला हळूहळू सरकारवर नियंत्रणाच्या आवश्यकतेची जाणीव व्हायला लागली होती. शासनावर नियंत्रण न ठेवल्यास जनतेच्या स्वातंत्र्याची वाताहत होणार, अशी चिन्हे दिसत होती. अशा प्रकारे शासनाचा वाढता हस्तक्षेप आणि सामाजिक कायद्याची निर्मिती या दोनमध्ये स्वातंत्र्याची गळचेपी होत होती. या पार्श्वभूमीवर जे. एस. मिलने व्यक्तिस्वातंत्र्यावर होणाऱ्या वाढत्या नियंत्रणाचे स्पष्ट चित्र मांडून ते नियंत्रण कमी कसे करता येईल व व्यक्तीला व्यक्तिस्वातंत्र्याचा उपभोग कसा घेता येईल, याविषयी विचार मांडले आहेत. जे. एस. मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारांचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) व्यक्तिस्वातंत्र्यावर प्रतिबंध घालणाऱ्या कायद्यास विरोध :**

मिलच्या काळात ब्रिटिश संसद उपयुक्ततावादाच्या नावाखाली अनेक कायदेशीर बंधने व्यक्तिस्वातंत्र्यावर लादण्याचा प्रयत्न करीत होती. शासनाचा व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप वाढू लागला होता. राज्य व शासन असेच आपले अधिकार वाढवीत गेले तर शासन संस्थेची हुकूमशाही निर्माण होईल. प्रजातंत्र धोक्यात येईल व व्यक्तिस्वातंत्र्याचा ऱ्हास होईल. याची मिलला भीती वाटत होती. या कारणासाठी मिलने व्यक्तिस्वातंत्र्यावर प्रतिबंध घालणाऱ्या राज्य व शासनाच्या संसद कायद्यास विरोध दर्शविला.

**२) व्यक्तिस्वातंत्र्ये अनिर्बंध असू नयेत** (व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर काही प्रमाणात बंधनाचे समर्थन) **:**

जे. एस. मिल व्यक्तिस्वातंत्र्याचा सखोल विचार करताना दिसतो. मिलला मनोमन असे वाटते की, व्यक्तिस्वातंत्र्ये कितीही महत्त्वाची असली तरी ती अनिर्बंध असून चालणार नाहीत. व्यक्तीला उपयुक्ततावादानुसार आपल्या स्वातंत्र्याचा स्वैराचारी उपभोग घेऊन माणूस म्हणून आपला विकास साधता येणार नाही. कारण स्वैराचारी व्यक्तिस्वातंत्र्य हे मानवाचा विकास घडवून आणण्याऐवजी विनाश घडवून आणण्याची शक्यताच

अधिक असते. त्यामुळे मिल व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधने असणे आवश्य मानतो. स्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित करीत असताना मिल कोणालाही अनिर्बंध स्वातंत्र्य मिळू शकणार नाही, या विचारांवर ठाम होता. मानवाची विवेकशक्ती आणि सद्सद्विवेकबुद्धधी यावर मिलचा विश्वास होता. यामुळे व्यक्तीला किती प्रमाणाात व कोणत्या मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य उपभोगू द्यावे, याची त्याला जाणीव होती. मिल व्यक्तिस्वातंत्र्याकडे अशा दृष्टिने पाहतो की, त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला चालना तर मिळेलच, शिवाय समाजातील स्वास्थ्यही  धोक्यात येणार नाही, याबाबतीतत मिल म्हणतो, ''जोपर्यंत व्यक्तीच्या वर्तनाने दुसऱ्या व्यक्तीस प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या हानी पोहोचत नाही किंवा इजा होत नाही तोपर्यंत व्यक्तीला पूर्णपणे स्वातंत्र्य असावे.'' पुढे तो म्हणतो, ''नागरी समाजाला केवळ एकाच उद्दिष्टासाठी स्वत:ची सत्ता समाजातील व्यक्तीवर प्रतिबंधात्मक स्वरूपात लादता येईल.'' परंतु ती समाजाची सत्ता केवळ व्यक्तीच्या इच्छेविरुद्ध वापरण्याचे समर्थन कधीही करता येणार नाही. अशावेळी नागरी समाजाचे एकाच उद्दिष्ट म्हणजे व्यक्तीवर प्रतिबंधात्मक स्वरूपात निर्बंध लादणे. थोडक्यात काही अपरिहार्य कारणांमुळे राज्याला व्यक्तिस्वातंत्र्यावर बंधणे घालता येतील, एरवी नााही, असेच मिलला म्हणावयाचे आहे. याचे तात्पर्य असे की, ज्या वर्तनामुळे इतरांचे स्वातंत्र्य धोक्यात येईल अशावेळी व्यक्तिस्वातंत्र्यात राज्य व समाजाने केलेल्या हस्तक्षेपाला मिलचा आक्षेप नाही. त्याचे एवढेच म्हणणे आहे की, व्यक्तिगगत जीवन जगताना त्यात राज्य आणि समाजाने हस्तक्षेप करू नये. या अर्थाने मिल अनिर्बंध स्वातंत्र्य नाकारून काही प्रमाणात व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर राज्याच्या बंधनाचे समर्थन करतो.

**३) व्यक्तीच्या विकासासाठी विचार व कार्य करण्याचे स्वातंत्र्य असावे :**

मिलच्या मते, व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास घडवून आणण्यामध्ये समाज व राज्य यांच्याकडून अडथळे निर्माण होऊ शकतात. या अडथळ्यांना दूर करणारी व व्यक्ती विकासाचा मार्ग खुला करणारा शक्ती स्वातंत्र्यात असते. अर्थात, स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. मिलच्या मते, व्यक्तीला स्वत:च्या इच्छेनुसार कार्य करण्याचा अधिकार म्हणजे स्वातंत्र्य असले तरी त्यावर निर्बंध आवश्यक आहेत. परंतु निर्बंध देखील मर्यादितच असायला हवेत. मिल म्हणतो, ''राज्य व समाज यांच्यापेक्षा व्यक्तीला स्वत:चे हित कशात आहे हे अधिक चांगले समजतो. म्हणून तिला आपल्या सर्वांगगीण प्रगतीसाठी विचार करण्याचे व कार्य करण्याचे स्वातंत्र्य असावे. राज्य किंवा समाजाने व्यक्तीवर तोपर्यंत नियंत्रणे लादू नयेत की जोपर्यंत त्याच्या वर्तनाचा दुसऱ्या कोणा व्यक्तीवर वाईट/अनिष्ट परिणाम होणार नाही. व्यक्ततीच्या जीवनात सरकार आणि समाजाचा, हस्तक्षेप ज्जितका कमी होईल तितकी व्यक्तिस्वातंत्र्याची हमी मिळेल असे मिलचे मत आहे. व्यक्तीने स्वत:च्या इच्छेनुसार आपला विकास करून घेतला पाहिजे. शेवटी उपयोगितावादाचे तत्त्व म्हणजे अधिकतम व्यक्तीचे अधिकतम सुखाचा उपयोग व्यक्तीच घेऊ शकतात, समाज नाही. यासाठी राज्य व समाजाने स्वातंत्र्यवर निर्बंध लादू नयेत.

**४) राज्य व समाज यांच्या हुकूमशाहीपासून व्यक्तीला स्वातंत्र्य मिळावे :**

जे. एम. मिलला राज्य व समाज यांची व्यक्तिस्वातंत्र्यावरील अनुचित बंधने मान्य नाहीत. त्याचे मत,

राज्यापप्रमाणेच समाजदेखील हुकूमशाही पद्धतीने वागतो. त्या दोघांच्या हुकूमशाही प्रवृतीपासून व्यक्तीला स्वातंत्र्य मिळाले पाहिले. मिलच्या मते, सामाजिक रुंढी, परंपरा श्रद्धा आणि रीतिरिवाज व्यक्तिस्वातंत्र्याच्या मार्गाततील एक महत्त्वाचा अडथहा आहे. तो म्हणतो, प्रत्येक व्यक्ती ही पूर्वापार चालत असलेल्या घराण्यात आणि कुटूंबात जन्म घेते. व्यक्तीचे सामाजिकरण होताना मिळणाऱ्या शिक्षण आणि अनुभव यामुळे व्यक्ती कुटुंबातील रुढी आणि परंपरांशी बांधली जाते. वास्तविक त्या रुढी, परंपरा आणि श्रद्धा मागासलेल्या किंवा चुकीच्या देखील असू शकतात. परंतु त्या सोडण्यास व्यक्ती तयार नसते. समाजाच्या जुन्या परंपरा व श्रद्धांना धक्का पोहोचेल, असे समाज सहन करीत. नसल्याने प्रगतीत खीळ बसते. येशूख्रिस्त, सॉक्रेटिस, गॅलिलिओ सारख्यांनी समाजापुढे नवी मूल्यये, विचार आदर्श ठेवले. त्यांनी जुन्या रूढी, परंपरा आणि श्रद्धांना नाकारून नवे विचार मांडले. परंतु समाजाने त्यांना देहदंडाची शिक्षा देऊन त्यांचे जीवनच संपविले. कालांतराने त्यांचे विचार समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असल्याचे पटल्यामुळे आज समाज त्यांच्या विचारांची पूजा करताना दिसतो. यावरून असे म्हणता येईल की, नवीन आदर्शाची निर्मिती मुक्त स्वातंत्र्यातूनच होत असते. यासाठी व्यक्तीगत जीवनातील राज्याचा हस्तक्षेप बंद व्हायला पाहिजे. तसेच समाजाच्या हुकूमशाहीपासून स्वातंत्र्य मिळायला पाहिजे. समाजाच्या हुकुमशाहीला स्पष्ट करताना मिल म्हणतो की, प्रस्थापित रुढी, परंपरा आणि चालीरितीचे व्यक्तीद्वारे उल्लंघन समाजाला मान्य होत नाही. नवीन विचार पचवण्याची क्षमता समाजात नसते. समाजाचे बंधन असल्यास नवीन विचार आणि नवीन आदर्श निर्माण होऊ शकात नाहीत. येशू ख्रिस्त, सॉक्रेटिस यांची हत्या केल्याने समाजाची अपरिमित हाती झाली आहे. त्यामुळे राज्य आणि समाजाने व्यक्तीस्वातंत्र्याच्या बाबतीत हस्तयेपाचे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे. थोडक्यात, नवीन आदर्शाच्या निर्मितीसाठी, मानवी प्रगतीसाठी राज्य व समाज यांच्या हुकूमशाही पासून स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे मिल म्हणतो.

**५) समाजहितासाठी व्यक्तीचा चार प्रकारची व्यक्तिस्वातंत्र्ये असावीत :**

व्यक्ती सार्वभौम असून ती आपल्या शरीराची व मनाची मालक असतते, हे व्यक्तिस्वातंत्र्यवादी मिलच्या विचारात गृहीत धरले असल्याचे दिसते. त्यादृष्टिने त्याने आपल्या 'On Liberty' ग्रंथात व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, कृतिस्वातंत्र्य व संघटन स्वातंत्र्य या चार प्रकारच्या स्वातंत्र्याना विशेष महत्त्व दिल्याचे दिसते. विचारस्वातंत्र्य - विचारस्वातंत्र्य हे सर्वांत महत्त्वाचे व्यक्तीस्वातंत्र्ये आहे. विचारस्वातंत्र्यावर बंधने आली की, व्यक्तीच्या हातून आपल्या विचारांप्रमाणे कृतीत करणे घडणार नाही तसेच आपल्या विचांराप्रमाणे वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग करून अभिव्यक्ती करण्याचे स्वातंत्र्य मिळणे हेही मिलला तितकेच महत्त्वाचे वाटते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे विचारस्वातंत्र्यावर अवलंबून असते. आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याची स्वाभाविक मुभा म्हणजे अभिव्यक्तिस्वातंत्र्य. सर्वांचे विचार सर्वांनी अभिव्यक्त केले तर विचारांचे आदान-प्रदान होऊन सर्वांनाच त्याचा लाभ होता, म्हणून अभिव्यक्ती स्वातंत्र्य विचार स्वातंत्र्या एवढेच महत्त्व असते. मिलच्या मते, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच व्यक्तीला संघटना स्थापन करण्याचा अधिकार हवा. समान विचार करणारी माणसे संघटित झाली तर विचारांच्या आदान-प्रदानाला विशेष महत्त्व प्राप्त होते.

मिलने सांगितलेल्या व्यक्तिस्वातंत्र्यात सर्वांत महत्त्वाचे व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे कृतिस्वातंत्र्य होय. विचार, अभिव्यक्ती आणि संघटना स्वातंत्र्याची परिणती कृतीत झाली तरच विचारांना अर्थपूर्णता येते. म्हणून मिलने अभिव्यक्ती आणि कृतिस्वातंत्र्याला आपल्या ग्रंथात महत्त्वाचे स्थान दिले आहे. मिल म्हणतो, ''अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. कारण आपले विचार व्यक्त केल्याशिवाय आपणास सत्याप्रत पोहोचता येत नाही. तो विचार अभिव्यक्त केल्यामुळे संघटित होऊन सत्यापर्यंत जाणे सुलभ होते. एकदा सत्य सापडले की, व्यक्ती त्यापर्यंत पोहोचण्यासाठी योग्य कृती करू शकते. मिलच्या मते, ''जर व्यक्तिला त्याचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य दिले नाहीतर व्यक्तीचे व समाजाचेही फार मोठे नुकसान होईल. व्यक्त केलेले मत हे कदाचित समाज किंवा राज्याच्या विरोधातही असेल. परंतु ते अव्यक्त राहिले तर त्याचा फार मोठा तोटा होण्याचा संभव आहे.'' थोडक्यात, जॉन लॉने जीविताची हक्क, स्वातंत्र्याची हक्क आणि संपत्तीचा हक्क ही तीन व्यक्तीस्वातंत्र्ये (हक्का) महत्त्वाची मानले. तर जे. एस. मिलने त्या तीन हक्क, स्वातंत्र्याबरोबरच आचार-विचार, भाषण, भविव्यक्ती, श्रद्धा, संघटना, कृती इत्यादी स्वातंत्र्यांना तितकेच महत्त्व दिले. मात्र मिलने या स्वातंत्र्य विकासाची जबाबदारी संपूर्णपणे राज्य आणि शासनावर टाकण्यास विरोध केला. राज्य किंवा शासनाच्या व्यक्तिस्वातंत्र्यावरील नियंत्रणा ऐवजी नागरिकांना त्यांच्या स्वातंत्र्य आणि हक्कांचे आकलन होणे मिलला महत्त्वाचे वाटते तसे न झाल्यास राज्य आणि शासनसंस्था या लोकशाहीतल्या असल्या, तरी त्या व्यक्तिस्वातंत्र्यायच्या मार्गातील अडथळा बनतील, असे मिलला वाटते.

**६) व्यक्तीला न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असावा :**

मिलने व्यक्तिस्वातंत्र्याचा फार सखोल विचार केला आहे. त्याच्या मते, व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर येणारे मानवी अधिकार तसेच मूलभूत अधिकार यांचे राज्याने रक्षण केले पाहिजे. तसेच राज्याकडून हक्क किंवा अधिकारांची पायमल्ली झाल्यास व्यक्तीला न्यायालयात दाद मागता आली पाहिजे. एकदा राज्य आणि शासनाने मान्य केली तरी ती व्यक्तिस्वातंत्र्ये अबाधित राहतातच असे नाही. व्यक्तिस्वातंत्र्याबाबत राज्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयापर्यंत दाद मागण्याचा अधिकारदेखील व्यक्तिस्वातंत्र्यात समाविष्ट असला पाहिजे.

**७) विविधतेतून व्यक्ती आणि समाजाची प्रगती, विकास :**

मिलच्या मते, विविधतेमुळे व्यक्ती आणि समाजाची प्रगती शक्य आहे. समाजात विविधता नसती तर वेगवेगळ्या क्षेत्रात व्यक्ती आणि समाजाला प्रगती करणे शक्य झाले नसते. विचार व कृतीमुळे जीवनात नाविण्य येते. प्रत्येक व्यक्ती स्वत:चे शरीर व मन व स्वत:च्या बाबतीत सार्वभौम असते. मिल म्हणतो, केवळ परसंबंधी कार्यावर नियंत्रण करण्याचा अधिकार राज्यास मिळते. विविधता टिकवून ठेवण्यासाठी समाजातील व्यक्तींनी साचेबद्ध पद्धतीने विशिष्ट चाकोरीतून वागले पाहिजे, असा राज्य आणि समाजाचा अट्टाहास मिलला मान्य नव्हता. कारण यामध्ये व्यक्तीला स्वतंत्ररित्या वागण्याची मोकळीकच नसते. अशाप्रकारे जीवन बुद्धिबळातल्या हात्ती, घोडे, उंटाच्याय व्यवहारासारखे होईल. जसे हत्तीने सरळ, उंटाने तिरपे आणि घोड्याने अडीच घरेच जाण्याचा नियम आहे. अशाप्रकारच्या प्रतिबंधानामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही.. यासाठी समाज आणि राज्याचा हस्तक्षेप जेवढा कमी होईल तेवढी व्यक्तीची प्रतिभा उज्ज्वल होण्यास मदत होते.

मिलच्या मते, जबरदस्तीचे निर्बंध लावल्यामुळे व्यक्तीविकासाला पोषक परिस्थिती निर्माण होत नाही. सारांश, विचार व कृती स्वातंत्र्यातील विविधतेतून व्यक्तीचा पर्यायाने समाजाचा विकास, प्रगती होते, असे मिल म्हणतो. व्यक्तीच्या बौद्धिक विकासासाठी त्यांना अशा साचेबद्ध जीवनातून मुक्त करण्यावर मिलचा भर असल्याचे दिसून येते.

**८) व्यक्तिस्वातंत्र्याच्या बाबतीत दोन अपवाद :**

जे. एस. मिल व्यक्तिवादी, उदारमतवादी आणि लोकशाहीवादी असला तसेच व्यक्तिस्वातंत्र्याकडे एक उच्च नैतिक मूल्य म्हणून पहात असला तरी, तो व्यक्तिस्वातंत्र्याच्या बाबतीत दोन अपवाद सुचवितो. पहिला अपवाद, तो अल्पवयीन मुलांच्या बाबतीत करतो. जोपर्यंत लहान मुले, किशोरवयीन मुले यांचे विचार परिपक्व होत नाहीत आणि त्यांना लहान वयामुळे मार्गदर्शनाची आवश्यकता असते. तोपर्यंत त्यांच्या व्यक्तीस्वातंत्र्यावर निर्बंध घालणे आवश्यक ठरते. ते अंतिमतः मुलांच्या व समाजाच्याही हिताचे असते. दुसरा अपवाद मिळते सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासलेला व असंस्कारित लोकांच्या बाबतीत केल्याचे दिसते. मिल म्हणतो, कोणत्याही कारणामुळे मागासलेल्या लोकांना स्वातंत्र्याची खरी किंमत कळणे शक्य नाही. म्हणून हुकूमशाही पद्धतीनेच त्यांना शिक्षित केले पाहिजे. जोपर्यंत मागे राहिलेल्या व्यक्ती आपले शुद्ध विचार अभिव्यक्त करू शकत नाहीत तोपर्यंत, व्यक्तिस्वातंत्र्याच्या उपभोगाऐवजी त्यांना व्यक्तिस्वातंत्र्यविषयक मार्गदर्शन केले तेच बरे. अशा व्यक्तींनी सम्राट अकबर किंवा शार्लमेन यासारख्या उपकारण हुकूमशाहांच्या (Benevolent dictator) आज्ञेत राहणे केव्हाही हिताचे असल्याचे मिल म्हणतो. एकंदरीत वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, कधीकधी मिलच्या व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना आणि व्याप्ती सकुंचित वाटते. तो व्यक्तिस्वातंत्र्याच्या कक्षेतून लहान मुलांना, अपंग माणसांना, मतिमंदांना, सामाजिकदृष्ट्या, मागासलेल्या घटकांना असंस्करित दारिद्र्यग्रस्त लोकांना का वगळतो हे समजत नाही.

स्वातंत्र्यासंबंधीच्या वरील दोन अपवादांच्या संदर्भात मिलवर कटोर टीका झाल्याचे दिसते. व्यक्तिस्वातंत्र्याचा वारेमाप उदो उदो करणारा मिल हुकूमशाहाच्या एक चालना नुवर्तित्वाला कसा पाठिंबा देऊ शकतो, असा सवाल प्रश्न त्याला विचारला गेला.

**जे. एस. मिल याने व्यक्तिस्वातंत्र्याचे दोन प्रमुख प्रकार सांगितले आहेत :**

जॉन स्टुअर्ट मिल प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील दोन दृष्टिकोन मान्य करतो. पहिला व्यक्तिगत दृष्टिकोन जो त्याच्या स्वतःच्या जीवनापुरता मर्यादित असतो. दुसरा, सामाजिक दृष्टिकोन असून प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक भाग असल्याने समाजाशी संबंधित असतो. त्यामुळे प्रतत्येक व्यक्तीला दोन प्रकाराची कार्ये करावी लागतात. त्या कायाला स्वसंबंधी कार्य व परसंबंधी कार्य, असे म्हटले जाते. मिलच्या मते, समाजविकास हा प्रत्येकाच्या विकासावर आधारित असल्याने प्रत्येकाला आपल्या विकासासाठी विचार करण्याचे व ते अभिव्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावे. याच आधारावर मिल स्वातंत्र्याचे दोन भागात वर्गीकरण करतो.

जे. एस. मिल. या दोन प्रकारात विचार स्वातंत्र्य हे पूर्णत: बंधनमुक्त असावे, असे म्हणतो. तर कार्य किंवा कृति स्वातंत्र्यावर काही उचित मर्यादा, बंधने तो मान्य करतो.

**(अ) विचार स्वातंत्र्य (Freedom of Thought and Expression) :**

मिलला व्यक्तीच्या विचार, चर्चा, अभिव्यक्ती, भाषण व लेखन या स्वातंत्र्यावरील समाज किंवा राज्य यांची कोणतीही बंधने मान्य नाहीत. कारण मानव समाजाच्या प्रगतीसाठी विचार, चर्चा व भाषण स्वातंत्र्य आवश्यक असतात. त्याने विचार आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यासंबंधी 'On Liberty' ग्रंथात एक स्वतंत्र प्रकरणच लिहिले आहे. मिलच्या मते, समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व्यक्तीला विचार करण्याचे आणि ते विचार प्रकट करण्याचे स्वातंत्र्य असायला पाहिजे. तो म्हणतो, विचार स्वातंत्र्याशिवाय सत्याचा शोध घेता येणार नाही. मानव समाज सत्यविचारांपासून वंचित राहिला तर त्याची प्रगती होणार नाही. समाज नीतियुक्त व योग्यमार्गी व्हावा, यासाठी व्यक्तीच्या वैचारिक स्वातंत्र्याला मुक्त ठेवणे आवश्यक आहे. ती व्यक्ती शहाणी असो अथवा मूर्ख आणि तिचे विचार सत्य असोत वा असत्य तिच्या विचारावर राज्य व समाज दोघांनीही बंधने घालण्याचा अधिकार नाही, असे मिलचे स्पष्ट मत होते. त्याच्या मते, ''जरी एका व्यक्तीला वगळून अखिल मानव जातीचे मत एकप्रकारचे असले, तरीही मानव जातीला हे न्यायसंगत होणार नाही की ते विरोधी मत बाळगणाऱ्या एका व्यक्तीची मुस्कटदाबी करतील किंवा शक्तिसंपन्न असल्यामुळे तो एक व्यक्ती मानव जातीच्या मतांची मुस्कटदाबी करेल.'' अशा प्रकारची मुस्कटदाबी करणे म्हणजे अखिल मानव जातीच्या वर्तमान व भावी पिढ्यांना सत्यापासून वंचित ठेवणे होय. म्हणून मिल मानव जातीच्या प्रगतीसाठी विचार आणि भाषण, चर्चा स्वातंत्र्याचे समर्थन करतो. जे. एस. मिलने विचार स्वातंत्र्याच्या गरजेची खालील कारणे (आधार) सांगितलेली आहेत.

**१. विचारस्वातंत्र्याची मुस्कटदाबी (दमन) टाळण्यासाठी :**

व्यक्ती आपल्या सद्सद्विवेकबुद्धीनुसार विचार करून आपली मते बनविते आणि ती समाजात प्रकट करत असते. काही वेळा तिचे विचार तत्कालीन प्रचलित समाजाच्या रुढी, परंपरा, रितीरिवाज व श्रद्धा याविरोधी असू शकतात. परंतु ते भावी पिढ्यांसाठी प्रेरक व स्फूर्तिदायी ठरू शकतील, म्हणून शासनाने व्यक्तीला तिचे विचार प्रकट करण्याची संधी दिली पाहिजे. राज्य व शासनाने या विचारस्वातंत्र्याची मुस्कटदाबी, दमन केले तर व्यक्तीच्या विचारांवर मर्यादा येऊन पडते. मानव जातीच्या प्रगतीत अडथळे येतात. म्हणून राज्याने व्यक्तीच्या विचारांवर बंधने, मर्यादा घालू नयेत. सत्य विचार दडपण्याने नष्ट होत नाहीत, ते चिरंतन असतात. सॉक्रेटिस, येशूख्रिस्त यांचे विचार तत्कालीन रूढी, परंपरा व श्रद्धांच्या विरोधी होते. त्यामुळे राज्य व शासनाने ते विचार दडपून टाकण्याचा विचार केला. जसे सॉक्रेटिसने ग्रीक प्रजातंत्रावर केलेली कठोर टीका व परंपरागत ग्रीक देवतांवर विश्वास न ठेवल्याने राज्यकर्त्यांनी त्याच्यावर तरुणांना बिघडवणारा व पाखंडी (अधार्मिक व अनैतिक) असे दोन आरोप ठेवून दोषी ठरविले व देहदंडाची शिक्षा दिली. येशूख्रिस्ताला ईश्वरनिंदेमुळे अधार्मिक ठरवून देहदंडाची शिक्षा दिली. त्यांनी तत्कालीन समाजातील जुन्या, रुढी, परंपरा व श्रद्धांना नाकारून नवे विचार, आदर्श, मूल्ये समाजापुढे मांडले. परंतु त्यासाठी त्यांना आपले आत्मबलिदान

करावे लागले. आज त्यांच्या विचारांची सत्यता सर्वांना पटली आहे. सॉक्रेटिसला श्रेष्ठ राजकिय, तत्त्वज्ञान, येशूख्रिस्ताला ईश्वराचा अवतार मानून त्यांच्या विचारांची आज पूजा केली जात आहे. या ऐतिहासिक घटनांच्या उदाहरणांवरून असे लक्षात येते की, समाज व राज्य ज्यांच्या विचार व मतांची अधार्मिक व अनैतिक म्हणून अवहेलना व मुस्कटदाबी, दमन करते तेच भविष्यात समाजाचे कल्याणकारक तत्त्ववेत्ते ठरले आहेत. त्यांच्या विचारांच्यया दडपणुकीने, मुस्कटदाबिने, मानवी समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. म्हणून मिल विचारांचे दमन व मुस्कटदाबी टाळण्यासाठी व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्याचे समर्थन करून त्याच्या आवश्यकतेवर भर देतो.

**२. बहुमताचा अन्याय दूर करण्यासाठी :**

मिलच्या मते, व्यक्तीला विचार स्वातंत्र्य न देण्याचा परिणाम सत्याचे दमन करणे हा होईल. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला विचारस्वातंत्र्याचा अधिकार असलाच पाहिजे. मिल म्हणतो, समाजातील बहुतांश लोक परंपरेनुसार एखादी गोष्ट मानतात म्हणून ती सत्य असते, असे मानणे चूक ठरेल. उदा. १७ व्या शतकात युरोपमध्ये सूर्य पृथ्वीभोवती फिरतो, असे बहुसंख्य लोक मानत होते. मात्र गॅलिलिओ याने पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे विचार मांडल्यामुळे त्याला कायमस्वरूपी विचार प्रकटन करण्याची शिक्षा भोगावी लागली. म्हणून बहुमताचा अन्याय दूर करण्यासाठी व्यक्तीला विचारस्वातंत्र्य असणे आवश्यक असते, याचे मिल समर्थन करतो.

**३. सत्याच्या शोधासाठी :**

सत्याचा शोध घेण्यासाठी व्यक्तीला विचारस्वातंत्र्य असले पाहिजे. व्यक्तीच्या विचार स्वातंत्र्यावर प्रतिबंध लावण्याचा अर्थ सत्यावर प्रतिबंधं लावणे हा होतो. मिलच्या मते, व्यक्तीचे मत सत्य, अर्धसत्य किंवा असत्य अशा कोणत्याही प्रकारचे असू शकते. ते दाबून टाकण्यात येऊ नये. सत्य कोणाही एका व्यक्तीची किंवा समूहाची जहागिरी नाही. सत्याचे स्वरूप विराट असल्यामुळे त्याचे अनेक पैलू असतात. त्यामधील एकच पैलू सत्य आहे, असे मानणे हे चार आंधळे व एक हत्ती यांच्या गोष्टीसारखे आहे. संपूर्ण सत्य जाणून घेण्यासाठी वेगवेगळ्या दृष्टिकोनाची गरज असते. हे भिन्न-भिन्न विचार, दृष्टिकोन परंपरांच्या विरोधी नसून पूरक असतात. तात्पर्य, सत्याला अनेक बाजू असतात. पण सत्य हे चिरंतन, सार्वजनिक स्वरूपाचे असते. यासाठी असत्य बोलणाऱ्या व्यक्तीवर देखील प्रतिबंध लावू नयेत. .विचारांची सत्य-असत्यता पारखण्यासाठी त्याची गरज असते.

**४) सत्याला उजाळा देण्यासाठी, सत्य अधिक दृढ कण्यासाठी :**

मिलच्या मते, सत्याला उजाळा देण्यासाठी तसेच सत्य अधिक सुदृढ करण्यासाठी व्यक्तीच्या विचार स्वातंत्र्याची आवश्यकता असते. चर्चा, वादविवादाच्या तर्कावर सत्याची पारख होत असते. सोने जसे अग्नीतून तावून सुलाखून निघाल्यावर शुद्ध होते, तसे सत्याचे असते. चर्चा, वादविवाद, संघर्ष यामुळे सत्याचे स्वरूप अधिक उजळून निघते. मिल यासंदर्भात डार्विनचा जीवशास्त्रीय नियम लागू करतो. त्यानुसार योग्य असणारांचाच

विजय होतो. मिलच्या मते तोच विचार सत्य ठरेल. जो तर्करूपी वादविवादात, संघर्षात विजयी ठरेल. त्यामुळे समाजाच्या प्रगतीकरिता राज्याने व्यक्तिला विचारस्वातंत्र्य दिले पाहिजे. ज्यामुळे सत्याला उजाळा मिळून ते अधिक परिपक्तव, सुदृढ होईल.

एकोणिसाव्या शतकात व्यक्तिहीन व उदारमतवादी विचारवंताचे विचार अत्याचारी शासनाच्या दुष्ट नियंत्रणापून जनतेला मुक्त अधिकार असावेत, अशा स्वरूपाचे होते. उदा. अन्यायी-अत्याचारी शासनाच्या विरोधी जनतेला विद्रोह करण्याचा अधिकार असावा. मिलला लोकशाही विकासात बहुमताची हुकूमशाही जाणवली होती. बहुमताच्या बळावर राज्य व शासन अन्यायी कायदे करून व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप करते. राज्याप्रमाणेच समाजदेखील बहुसंख्याकांच्या आधारावर व्यक्तीच्या विचार व मत स्वातंत्र्यावर अत्याचार करतो. मिलच्या मते, राज्याच्या तुलनेत समाज अधिक अत्याचार करतो. कारण समाजाचे क्षेत्र व्यापक असते व तो रूढी, परंपरा, श्रद्धा, लोकापवाद, निंदा यांच्या श्रृंखलानी व्यक्ती व समाजाला बंदिस्त करून मानवी प्रगतीत अडथळे आणत असतो. समाजाच्या वा अनिषशट श्रृंखलेपासून व्यक्ती मुक्त असावी याच कारणासाठी मिलने विचार व भाषण, चर्चा, स्वातंत्र्याचे समर्थन केले आहे, त्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे.

**(ब) कृतिस्वातंत्र्य किंवा कार्यासंबंधी (आभार) स्वातंत्र्ये (Freedom of Action) :**

जे. एस. मिलच्या मते, व्यक्तिस्वातंत्र्याची दुसरी बाजू म्हणजे आचार किंवा कार्यासंबंधीचे स्वातंत्र्य होय. व्यक्तीला केवळ विचारांचे स्वातंत्र्य असून चालत नाही, तर स्वत:च्या विचारांनुसार कृती करण्याचे स्वातंत्र्यही असावे लागते. विचारस्वातंत्र्य आणि कृतीस्वातंत्र्य ही दोन्ही स्वातंत्र्ये एक-दुसऱ्यांना पूरक व पोषक असतात. मिल म्हणतो, विचार जोपर्यंत कृतीतून प्रत्यक्षात उतरत नाहीत, तोपर्यंत त्याला काहीच अर्थ नसतो. विचारांबरोबरच त्याप्रमाणे कार्य करण्यातच समाजाची प्रगती शक्य असते. त्यामुळे विचार व कृती स्वातंत्र्य ही परस्परांना पूरक आहेत. केवळ दुसऱ्याच्या आज्ञांचे पालन केल्याने माणूस कायमचा गुलाम बनेल. या कारणामुळे मिलने कृतीसंबंधी स्वातंत्र्याचे समर्थन केले आहे.

जे. एस. मिलने विचारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या बाबतीत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे, असे ठाम विचार मांडतो. परंतु कृतिस्वातंत्र्याविषयी तो संपूर्ण स्वातंत्र्याचे समर्थन करीत नाही. मिल व्यक्तिस्वातंत्र्यवादी असूनही समाजहितासाठी व्यक्तीच्या कृतिस्वातंत्र्यावर राज्याला काही अटींसह प्रतिबंध घालण्यास, हस्तक्षेप करण्यास मान्यता देतो. मिलने व्यक्तींच्या कार्यासंबंधी स्वातंत्र्याचे दोन भागात विभाजन केले आहे.

१. व्यक्तिगत किंवा स्वसंबंधी कार्य (Self Regarding Action)

२. सामाजिक किंवा परसंबंधी कार्य (Other Regarding Action)

**१. व्यक्तिगत किंवा स्वसंबंधी कार्य (Self Regarding Action) :**

व्यक्तिगत कार्य म्हणजे व्यक्तीची अशी कार्य, कृती ज्याचा संबंध व परिणाम केवळ स्वत:पुरताच मर्यादित असतो. त्याचा दुसऱ्यांवर अनिष्ट प्रभाव पडत नाही, त्या कार्याला व्यक्तिगत किंवा स्वसंबंधी कार्य

म्हणतात. उदा. खाणे-पिणे, कपडे वापरणे, शिक्षण घेणे, आदींचा समावेश होतो. या प्रकारची कार्ये वैयक्तिक स्वरूपाची असतात. दारू पिण्यापासून जुगार खेळण्यापर्यंतची सर्व कार्ये या प्रकारात येऊ शकतात. त्यामुळे अशा कार्यासाठी व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. व्यक्तिगत कार्यामध्ये राज्य आणि समाजाने हस्तक्षेप करू नये, असे मिलचे मत आहे. व्यक्तिला स्वइच्छेनुसार राज्याच्या कोणत्याही बंधनाशिवाय कार्य करण्याचे स्वातंत्र्य असावे. मिलच्या मते, व्यक्तिगत कार्याचे स्वातंत्र्य मनुष्याच्या चारित्र्यनिर्मतीसाठी आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक आहे. या स्वातंत्र्यामुळे व्यक्तिगत विविधता टिकवून ठेवता येते. व्यक्ती स्वत:च्या विचाराबद्दल आणि व्यक्तिगत कार्याबद्दल सार्वभौम असते. त्यात राज्य व समाजाचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप व्यक्ती विकासाला बाधक ठरतो. व्यक्तिगत कार्याच्या बाबतीत व्यक्ती समाजाला किंवा राज्याला जबाबदार नसते. ज्या कृतीमुळे त्याच्या स्वत:च्या हितसंबंधांना बाधा पोहचते किंवा ज्या कृतीचे परिणाम व्यक्तिश: त्या कृती करणाऱ्या व्यक्तीलाच भोगावे लागतात. त्या व्यक्तीच्या कृतीमुळे तिचे नुसकान होते, असे इतरांना वाटले, तरी अशा कृतीपासून इतर व्यक्ती किंवा व्यक्तिगट त्या व्यक्तीला तिच्या कृतीपासून परावृत्त करण्याची जबाबदारी करू शकणार नाहीत. फार तर अशा व्यक्तीस त्याच्या कृतीमुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव करून देण्याचे किंवा त्याविषयी सल्ला देण्याचे काम नैतिक दृष्टिकोातून इतर व्यक्तींना करता येईल. अनिष्ट कृती करणाऱ्या व्यक्तिपासून इतर व्यक्तींना परावृत्त करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे काम कृती करणाऱ्या व्यक्तींच्या हितचिंतकांना करता येईल. परंतु व्यक्तिगत कार्यात राज्य व समाजाला कायदे, नियमांद्वारे हस्तक्षेप करता येणार नाही. व्यक्तिगत कृती स्वातंत्र्यसंबंधी व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य असावे, याचे मिल समर्थन करतो.

**२. सामाजिक किंवा परसंबंधी कार्य (Other Regarding Action) :**

सामाजिक कार्ये म्हणजे इतरांशी संबंधित कार्य होय. व्यक्तीच्या ज्या कार्याचा प्रभाव व परिणाम समाजातील इतर व्यक्तींवर पडतो त्या कार्याला परसंबंधी कार्य म्हणतात. व्यक्तीच्या या परसंबंधी कार्याबाबतीत राज्याला हस्तक्षेप करण्याचा, नियंत्रण ठेवण्याचा अधिकार आहे. अशा कार्याबद्दल व्यक्ती समाजाला जबाबदार असते. प्रत्येक व्यक्तीला आपण स्वतंत्र असावे असे वाटते. मात्र दुसऱ्याच्या स्वातंत्र्यात हस्तक्षेप न केल्यानेच आपण स्वतंत्र राहू शकतो. म्हणून समाजातील दुसऱ्या व्यक्तींचे स्वातंत्र्य नष्ट होईल किंवा त्यास नुकसान, बाधा पोहोचेल असे कार्य व्यक्तींकडून होऊ नये समाजात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचेल, अराजक किंवा अशांतता निर्माण होईल, असे कार्य व्यक्तींना करण्याचा अधिकार असू शकत नाही. व्यक्तींच्या अशा कार्यांवर राज्याला संपूर्ण नियंत्रण ठेवण्याचा अधिकार मिल मान्य करतो. कारण कोणत्याच व्यक्तीला दुसऱ्यांना दु:ख देऊन, दुसऱ्यांचे स्वातंत्र्य नष्ट करून स्वातंत्र्य उपभोगण्याचा, कार्य करण्याचा अधिकार नाही. असे कार्ये करणे मिलला अनुचित वाटतो.

**व्यक्तीच्या कार्यस्वातंत्र्यावर मर्यादा :**

मिलच्या मते, राज्य आणि समाजाला व्यक्तीच्या व्यक्तिगत कार्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आत्मरक्षणामुळे मिळू शकतो.

उदा. व्यक्तिगत कार्य स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून आत्महत्या करण्याचा व्यक्तीस अधिकार नाही. कारण व्यक्ती त्यातून स्वत:चे अहित करीत असते. अशावेळी व्यक्तिगत हितासाठी राज्य आणि समाजाचा हस्तक्षेप आवश्यक असतो. मिल म्हणतो व्यक्तीचे व्यक्तिगत अहित त्याच्या कार्यस्वातंत्र्यामुळे होत असेल तर राज्याने त्यात जरुर हस्तक्षेप करावा. मिल असे म्हणतो की, दारु पिणे व्यक्तिगत खासगी कार्य आहे. एखादी व्यक्ती आपल्या घरात बसून मद्यपान करीत दारू पिऊन रस्त्यावर गोंधळ घालणे, दुसऱ्याच्या जीवितास धोका पोहोचविणे हे समाजहिताविरुद्ध आहे. पहिल्या बाबतीत (घरात दारु पिणे) राज्याला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. कारण व्यक्तिगत कार्याच्या मर्यादेत येते. पण दुसऱ्या बाबतीत मात्र राज्य हस्तक्षे करू शकते.. कारण त्यामुळे सामाजिक अहित होते. अशा प्रकारे व्यक्तिगत कार्यात राज्याने विशिष्ट परिस्थितीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिल देतो.

सारांश, दारु पिणे व्यक्तीचे खाजगी स्वातंत्र्य असून त्यामुळे होणारे हित-अनहित याला दारू पिणारी व्यक्ती पूर्णपणे जबाबदार असते. म्हणून शासनाने हातून कायद्याद्वारे त्यात हस्तक्षेप करू नये. परंतु दारू पिण्यामुळे व्यक्तीच्या हातून कर्तव्यात कचुराई होत असेल तर (उदा. नोकरीच्या कालावधीत दारू पिण्याने) आणि त्याचा अन्य संबंधित व्यक्तींवर अनिष्ठ परिणाम होत असेल तर अशा स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणाऱ्या व्यक्तीला राज्याने दारू पिण्यास प्रतिबंध केला पाहिजे, असे मिल म्हणतो.

**मिल व्यक्तीला अनिष्ठ कार्यापासून प्रवृत्त करण्याचे दोन मार्ग सांगतो :**

जे. एस. मिल व्यक्तीला अनिष्ठ किंवा वाईट कार्यापासून प्रवृत्त करण्याचे दोन मार्ग (उपाय) सांगतो. एक, निवारणात्मक व दुसरा प्रतिबंधात्मक मार्ग. मिल असे मानतो की, राज्य कायदेशीर मार्गाने व्यक्तिगत कार्यात आंतरिक सुधार करू शकत नाही. ती वरवरची मलमपट्टी असते. केवळ राज्याच्या शियेच्या भीतीमुळे लोक वाईट कार्यापासून परावृत्त करण्यासाठी तिच्या अंतर्मनात बदल झाला पाहिजे व त्यासाठी शिक्षण व प्रबोधन हाच रास्त व योग्य मार्ग (उपाय) आहे. त्यासाठी राज्याने प्रतिबंधात्मक व निवारणात्मक उपाययोजना कराव्यात, असे मिल सुचवितो.

**सारांश :**

जे. एस. मिलच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा वरीलप्रमाणे व्यापक व सखोल अभ्यास केल्यावर असे म्हणता येईल की, मिलची स्वातंत्र्याची संकल्पना तीन महत्त्वपूर्ण तत्त्वांवर आधारित आहे. १) मिलने व्यक्तीच्या भावना व इच्छांना महत्त्व देऊन व्यक्तिगत कार्यात स्वातंत्र्याचे समर्थन केले. २) उत्स्फुर्तता व व्यक्तिगत या दोन गोष्टी व्यक्ती विकास व समाज कल्याणाचे आवश्यक घटक मानल्या. ३) सामाजिक, जुन्या रूढी, श्रद्धा व परंपरांच्या जुलमांना विरोध. मिलच्या मते, जुन्या सामाजिक रुढी, परंपरा, श्रद्धा व लोकमत हे मानवी प्रगतीत खीळ घालणारे माध्यम ठरते. ४) मिल स्वातंत्र्य केवळ सुसंस्कृत व सभ्य समाजाला देऊ इच्छितो लहान मुले, अपंग, मतिमंद माणसे, असंस्कृत व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या अविकसित, दरिद्री लोकांना त्याने ते नाकारले आहे. एकंदरित मिलच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेचा आशय व हेतू चांगला असला तरी ती प्रत्यक्ष

उपयोगात आणताना त्यात अनेक व्यावहारिक अडचणी, अडथळे निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यामुळे मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारावर टीका होताना दिसते.

**मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारावरील टीका :**

**१) स्वातंत्र्याची नकारात्मक संकल्पना :**

मिल व्यक्तिस्वातंत्र्याचा कट्टर पुरस्कर्ता होता. व्यक्तिस्वातंत्र्यात राज्य व समाजाची बंधने, हस्तक्षेप मान्य नव्हता. बंधनांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य असे मानून ते प्रत्येकाच्या मर्जीवर सोपवावे, असे मिलचे मत होते. आधुनिक काळातील गुंतागुतीच्या समाजात हा दृष्टिकोन नकारात्मक व अपूर्ण आहे. राज्याने केवळ व्यक्ती विकासाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात म्हणजे निवारणात्मक भूमिका द्यावी, प्रतिबंधात्मक नव्हे, असे त्याचे मत दिसते. स्वातंत्र्याच्या बाबतीत राज्याला सकारात्मक कार्य अधिकार दिल्याशिवाय व्यक्ती व समाजासाठी खरे स्वातंत्र्य उपलब्ध होणे कठिण वाटते.

**२) रिक्त** (empty) **व अमूर्त स्वातंत्र्याचा समर्थक :**

मिल व्यक्तिगत कार्य स्वातंत्र्याचे स्वसंबंधी जोरदार समर्थन करतो. व्यक्ती विकासासाठी संपूर्ण स्वातंत्र्य असावे, असे तो म्हणतो. त्यात राज्य व समाजाच्या हस्तक्षेपाला तीव्र विरोध करतो. परंतु सामाजिक कार्याचे (परसंबंधी कार्याचे) निमित्त पुढे करून समाजहिताच्या नावाखाली राज्याने व्यक्तिच्या स्वातंत्र्यावर बंधने टाकावीत याचा तो आग्रह धरतो. म्हणजे तो एका हाताने व्यक्तीला स्वातंत्र्य देतो आणि दुसऱ्या हाताने परसंबंधी कार्याच्या नावाखाली व्यक्तिगत कार्यस्वातंत्र्यात राज्यने निर्बंध लादण्याच्याय अधिकारास मान्यता, सहमती दर्शवून काढून घेताना दिसतो. म्हणून मिलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार रिक्त (empty) पोकळ किंवा अमूर्त (काल्पनिक) वाटतात.

**३) स्वातंत्र्याला महत्त्व, अधिकाराकडे दुर्लक्ष :**

स्वातंत्र्य आणि अधिकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. स्वातंत्र्याची कल्पना मांडताना मिलने तात्त्विक दृष्टिकोणातून याचा विचार केला नाही. अधिकाराशिवाय स्वातंत्र्य म्हणजे कार्याविना वाचाळता ठरेल. तो व्यक्तिस्वातंत्र्याचे स्पष्ट व प्रभाविपणे समर्थन करतो. पण अधिकाराचा स्पष्ट उल्ललेख करत नाही. जॉन लॉकने नैसर्गिक अधिकाराचा जो सिद्धांत (स्वातंत्र्याचा, संपत्तीचचा व जीविताचा हक्क) मांडला. त्यावर मिलचा विश्वास नव्हता. मिलने व्यक्तीचे अधिकार आणि जबाबदारी यांचा परस्पर संबंधही व्यवस्थित मांडला नाही. तो केवळ व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देतो. तिच्या अधिकारांकडे दुर्लक्ष करताना दिसतो.

**४) मिल स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे प्रभावी उपाय सुचवत नाही :**

मिल व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व व समर्थन अतिशय प्रभावीपणे करतो. केवळ स्वातंत्र्याची घोषणा करून भागत नाही. स्वातंत्र्याचा योग्य उपभोग घेण्यासाठी त्याच्या रक्षणाची हमी आवश्यक असते. परंतु मिल स्वातंत्र्याच्या संरक्षणाचे प्रभावी मार्ग सांगत नाही किंवा उपाय सुचवीत नाही. त्यामुळे त्याची स्वातंत्र्याची संकल्पना व्यवहारात आणणे कठीण आहे. यांबंधी प्रा. आर्नेस्ट बार्करने असे म्हटले आहे की, ''मिल पोकळ

स्वातंत्र्य आणि अमूर्त (काल्पनिक) व्यक्तिवाद यांचे समर्थन करणारा प्रेषित आहे.'' (Mill is the propet of empty Liberty and abstract Individual.") एखादा विचार व्यवहारात उतरविण्यासाठी त्याच्या सकारात्मक व नकारात्मक परिणामाचा विचार करावा लागतो. अन्यथा ते विचार पुस्तकातच राहतात. ते व्यवहार्य नसतात. यादृष्टीने मिलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार अपूर्ण व एकांगी वाटतात.

**५) कार्यस्वातंत्र्याची विभागणी अनावश्यक व असंभव :**

जे. एस. मिलने कार्यस्वातंत्र्याचे व्यक्तिगत व सामाजिक (स्वसंबंधी व परसंबंधी) कार्य अशी विभागणी केली आहे, ती अनावश्यक व असंभवनीय आहे. व्यक्तीच्या प्रत्येक कार्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बरावाईट परिणाम समाजावर होत असतो. उदा. दारू पिणे हे वैयक्तिक कार्य आहे. परंत दारू पिल्यामुळे व्यक्तीला नशा आल्यामुळे तिचा बुद्धी व शरीरावर ताबा राहात नाही. अशा स्थितीत ती अनैतिक, चोरी, मारामारी, हत्या यासारखी वाईट कार्ये करते व त्याचा समाजावर वाईट परिणाम होतो. त्याचा कुटुंब व मुलांवरही वाईट प्रभाव पडतो. कुटुंब दरिद्री व मुले दुर्व्यसनी बनतील. व्यक्ती समाजप्रिय असते व तिचा समाजातच विकास होऊ शकतो. त्यामुळे व्यक्तीच्या अशा अनैतिक व दुर्व्यसनी कार्यावर राज्याची बंधने आवश्यक असतात. परंतु मिल कार्य स्वातंत्र्याचे स्वसंबंधी व परसंबंधी कार्य अशी विभागणी करतो आणि स्वसंबंधी कार्यात व्यक्तीच्या संपूर्ण स्वातंत्र्याचे समर्थन करते. मात्र परसंबंधी कार्यावरील राजाच्या हस्तक्षेपास सहमती देतो. वास्तविकत: व्यक्तीच्या कार्यस्वातंत्र्याची अशी विभागणी करणे व्यावहारिक दृष्ट्या अनावश्यक व अशक्य आहे, ही दोन्ही कार्य परस्परसंबंधी असतात.

**६) राज्याचा हस्तक्षेप वाढेल :**

मिल स्वातंत्र्याचा विचार मांडताना परसंबंधी कार्यावर राज्याने बंधने टाकावित, हस्तक्षेप करावा म्हणतो. व्यक्तीच्या परसंबंधी कार्याचा समाजावर किंवा दुसऱ्या व्यक्तींवर दुष्परिणाम होणार असेल तर अशावेळी राज्याने समाजाच्या हितासाठी व्यक्तीच्या कार्यावर निर्बंध घालणे व आवश्यक शिक्षा देणे मिलला योग्य वाटते. परंतु हस्तक्षेप करण्याचे तत्त्व एकदा मान्य केले की, महत्त्वाकांक्षी राज्यकर्ते आपले अधिकार वाढवून व्यक्ती जीवनात हस्तक्षेप करतील. थोडक्यात, व्यक्ती स्वातंत्र्यात हस्तक्षेप करण्याचे तत्त्व एकदा मान्य केले की, राज्यसंस्था सतत हस्तक्षेप करत राहतील. परिणामी, राज्य हुकमी बनेल आणि व्यक्तिस्वातंत्र्य दुय्यम ठरेल.

**७) लहरी व विकृत माणसांच्या स्वातंत्र्याचे समर्थन अयोग्य :**

लहरीपणा व्यक्तीमत्त्वाचा दुर्गुण व विकृती असते. मिल सत्याचा शोध घेण्यासाठी विचार स्वातंत्र्याच्या बाबतीत सर्व व्यक्तींना पूर्ण स्वातंत्र्य असावे, असे सांगतो. मग ती व्यक्ती शहाणी असो अथवा मूर्ख वा लहरी, तिचे विचार सत्य असोत वा असत्य तिच्या विचारांवर राज्य व समाज दोघांनाही बंधने घालण्याचा अधिकार नाही. मिल असे तार्किक विवेचन करतो की, दहा लहरी व्यक्तीत एखादी अलौकिक प्रतिभासंपन्न निघून समाजाला क्रांतिकारक व मौलिक विचार देऊ शकेल. परंतु त्याचा हा तर्क योग्य वाटत नाही. कारण लहरीपणा व्यक्तीचा मनोविकार व दुर्गुण असू शकतो. सत्याच्या शोधासाठी वा तत्त्वज्ञानी असण्यासाठी लहरीपणा

गरजेचाच असतो, असे मानणे अयोग्य ठरेल. हलरी व विकृत माणसांच्या विचारांमुळे दोन व्यक्तीसमूहांत, राष्ट्रांत तणाव, संघर्ष व शत्रूत्वाची भावना निर्माण होऊ शकते. वास्तविकता अशा लहरी प्रवृत्तींच्या व्यक्तींच्या विचार स्वातंत्र्यावर राज्याची उचित बंधने आवश्यकच ठरतात. मूर्ख, विकृत व लहरी माणसांना स्वातंत्र्य दिल्याने समाजाचे हित होण्याऐवजी अहितच अधिक होईल.

**८) प्रत्येक गोष्ट तर्क व वादविवादाच्या आधारे सिद्ध करणे कठीण :**

मिलच्या विचाराप्रमाणे विचारांची सत्यता पारखण्यासाठी प्रत्येक गोष्ट तर्क व वादविवादाच्या आधारावर सिद्ध (प्रमाणित) व्हायला पाहिजे, विचारस्वातंत्र्यावर जोर देत तो प्रत्येक गोष्ट तर्काच्या कसोटीवर घासूनच स्वीकारावी असे म्हणतो. आदर्श म्हणून मिलचे हे विचार ठिक आहेत, परंतु प्रत्येक गोष्टीतील सत्य तर्क व वादविवादाच्या आधारावर शोधून काढणे, प्रत्यक्ष व्यवहारात कठीण आहे. तसेच सत्य शोधण्यासाठी प्रत्येक गोष्टींवर तर्कवाद घातल्याने समाजात संघर्षमय अराजक स्थिती निर्माण होईल आणि ते समाजास हितकारक ठरणार नाही. अशा प्रकारे व्यावहारिक दृष्टिकोनातून मिलचे विचार वास्तवतेत उतरू शकत नाहीत.

**९) कायदे व्यक्तिस्वातंत्र्याला मारक नव्हे तर साहाय्यक :**

राज्याच्या कायद्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो, हे मिलचे म्हणणे बरोबर वाटत नाही. कारण कायद्याचा उद्देशच मुळात व्यक्तीला स्वातंत्र्याचा यायेग्य उपयोग घेण्याची परिस्थिती निर्माण करणे हा असतो. कायदे व्यक्ती-स्वातंत्र्याला सहायक आहेत, विरोधी नाहीत. उदा. दारुबंदी कायदा, हुंडा प्रतिबंध कायदा व्यक्तीसाठी, समाजाच्या हितासाठी आवश्यक आहे. व्यक्तीगत स्वातंत्र्याच्या आधारावर व्यक्तीला त्यापासून दूर ठेवणे म्हणजे व्यक्तीचे अहित करणे नव्हे. उलट व्यक्तीगत आणि सामाजिक हित साध्य करणे हा कायद्याचा उद्देश असतो. जे कायदे व्यक्ती व समाजहिताच्या विरोधी असतात ते आपोआप नष्ट होतात. उपयोगी कायद्याचेच अस्तित्व राहते. उलट जेवढे कायदे जास्त असतील तेवढे व्यक्तिस्वातंत्र्य अधिक सुरक्षित राहते. स्वातंत्र्यावर कायद्याची बंधने लावली तर लोक स्वातंत्र्याचा विचारपूर्वक उपयोग करतील. पण तिच बंधने थोडी शिथील केली तर लोक पहिले इतका विचार करणार नाहीत. म्हणजे त्यांच्या विचारांची खोली कमी होईल. पण समजा अनिर्बंध स्वातंत्र्ये दिले तर लोक त्याचा विचार न करता दुरुपयोग करतील. त्यामुळे दुसऱ्यांचे स्वातंत्र्य धोक्यातत येईल. त्यासाठी अनिर्बंध व्यक्तीस्वातंत्र्यावर कायद्याचे उचित नियंत्रण हवे. त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्याचा संकोच होत नाही. थोडक्यात, कायदे व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होत नाही. थोडक्यात, कायदे व्यक्तिस्वातंत्र्याविरोधी नसून पूरक व साहाय्यक असतात.

**१०) मिलची स्वातंत्र्याची कल्पना संकुचित व अप्रजातांत्रिक :**

जे. एस. मिल. व्यक्ति स्वातंत्र्याचा प्रभावी पुरस्कर्ता आहे. तो व्यक्ती आणि समाजाच्या विकासाचे स्वातंत्र्य हे आवश्यक तत्त्व मानते. परंतु तो लहान मुलांना अपंग माणसांना, मतिमंदांना, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास व असंस्कारित, दारिद्र्यग्रस्त लोकांना आणि अविकसित देशातील लोकांना स्वातंत्र्य नाकारतो. उपयुक्ततावादी व व्यक्तिस्वातंत्र्यवादी मिळणे समाजातील व्यक्तींचे सुसंस्कृत-अशिक्षित अशी वर्गवारी करतो

आणि असंस्कृत व अज्ञानी (कष्टकरी) सामान्यांना आणि अविकसित देशातील लोकांना स्वातंत्र्यापासून वंचित ठेवतो. हे आश्चर्यकारक वाटते. तो केवळ सुशिक्षित व सुसंस्कृत लोकांना स्वातंत्र्य देता आणि असंस्कृत व अशिक्षित व्यक्तिच्या स्वातंत्र्याकडे, अधिकारांकडे दुर्लक्ष करतो. ही मिलच्या विचारांतील विसंगती आहे. या अर्थाने मिलचे विचार संकुचित, समताविरोधात अप्रजातांत्रिक आहेत.

**समारोप :**

अशाप्रकारे जे. एस. मिलच्या स्वातंत्र्याची संकल्पना दोषमुक्त नाही हे खरे आहे. त्यात काही त्रुटी,, उणीवा असल्याने त्याच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारावर वरीलप्रमाणे टीका होत असली, अपेक्ष घेतली जात असले तरी त्याच्या विचारांचे महत्त्व कमी होत नाही. मिलच्या विचाराने स्वातंत्र्य आणि व्यक्तीवादाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. लोकशाही व्यवस्थेत बहुमत निरंकुश होऊ शकते, हे त्याचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे. आज त्याचा प्रत्यय अनेक लोकशाही देशातील लोकांना येताना दिसत आहे. स्वातंत्र्याला मिलने ऐहिक आणि आध्यात्मिक अर्थप्राप्त करून दिला. स्वातंत्र्यामुळेच संतुलित समाजाची निर्मिती होऊ शकते, हे त्याचे विचार सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत. एखाद्या व्यक्तीचे मत दडपणे म्हणजे सत्य दडपण्यासारखे आहे. चर्चा, वादविवाद करण्याच्या स्वातंत्र्यातून सत्याचा शोध घेतलजाऊ शकतो. स्वातंत्र्यामुळे व्यक्ती आणि समाजाचा विकास होतो. यासाठी स्वातंत्र्याच्या अधिकारात शासन आणि समाजाचा हत्सक्षेप होऊ नये, हे त्याचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. मिलने केवळ व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार पुरुषांसाठीच केला नसून स्त्री-स्वातंत्र्याचा देखील त्याने पुरस्कार केला आहे. स्त्रीयांच्या सामाजिक वैधानिक गुलामगिरीच्या विरुद्ध ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आवाज उठविणारा मिल हा पहिला विचारवंत व संसद सदस्य होता. समाज आणि राज्याच्या समृद्धीसाठी पुरुषांप्रमाणे स्त्रीयांनादेखील स्वातंत्र्य देण्याचे मिलने समर्थन केले आहे. याशिवाय आज अनेक देशांच्या राज्यघटनेत स्वातंत्र्याचा जो समावेश करण्यात आला त्याचे श्रेय मिलला द्यावयास पाहिजे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपात जी उदारमतवादी चळवळ झाली तिच्यावर मिलच्या विचारांचा फार मोठा प्रभाव पडला होता. त्याचप्रमाणे त्याचे विचार २० व्या व आज २१ व्या शतकातील पुरोगामी चळवळीला स्फूर्तिदायक व पोषक ठरलेले आहेत, ठरत आहेत. थोडक्यात, मिलचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार राज्यशास्त्राला मिळालेली मौलिक देणगी आहे. ते विचार समाज आणि राज्यासाइी मार्गदर्शक स्वरूपाचे आहेत, हे नाकारता येणार नाही.

### १.२.९ मिलचे प्रातिनिधिक शासनपद्धती संबंधीचे विचार :

जॉन स्टुअर्ट मिल प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीचा पुरस्कर्ता होता. त्याने प्रातिनिकधक लोकशाही शासन व्यवस्थेला इतर शासनप्रणालीच्या तुलनेत श्रेष्ठ मानले. तत्कालीन इंग्लंडमध्ये प्रचलित असलेल्या प्रातिनिधिक शासनपद्धतीमध्ये अनेक उणिवा, दोष होते. ते पाहून त्यात त्याने सुधारणा सुचविल्या. 'On Representative Government' या ग्रंथात त्याने प्रातिनिधिक शासनपद्धती मधील दोष, उणीवा व उपाय यांची सविस्तर चर्चा केली आहे.

मिल प्रथम आदर्श व सर्वोत्कृष्ट शासन कशास म्हणावे त्याचे त्याचे काही निकष सांगतो. १) ज्या शासन

व्यवस्थेच्या नियंत्रणात नागरिक राहतात त्या शासन व्यवस्थेत त्यांना सहभागी होता आले पाहिजे, २) त्यांना शासनव्यवस्थेत सहभागित्व मिळविण्यासाठी योग्य साधने व सोईसुविधा उपलब्ध असाव्यात, ३) नागरिकांचा शासन व्यवस्थेत बहुमत प्राप्तीसाठी सहभाग नसाव तर अल्पमतांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याची भावना त्यात असावी. ४) ज्या शासनात नागरिकांचे सहभागित्व हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे असू शकेल. मात्र वाढती लोकसंख्या व विस्तृत भूप्रदेश लक्षात घेऊन मिलने प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीचे (नागरिकांचा अप्रत्यक्ष सहभाग) समर्थन केले. ५) मिल आदर्श व उत्कृष्ट शासन त्या शासनव्यवस्थेला मानतो ज्या व्यवस्थेत शासनावर नियंत्रण ठेवणारी सार्वभौमम सत्ता अंतिमत: जणतेच्या हाती असते. ६) ज्या शासन व्यवस्थेत व्यक्तीच्या बौद्धिक ज्ञानाला आणि सद्‌गुणांची अभिवृद्धी करण्यास पोषक वातावरण व वाव मिळेल, अशी शासन व्यवस्था आदर्श, ७) ज्या शासन व्यवस्थेत बुद्धिमान, कुशल व प्रजाहित राज्यकर्ते आणि कार्यक्षम, पारदर्शक व लोकाभिमुख शासन व प्रशासन व्यवस्था असते ती आदर्श. एकंदरीत मिल म्हणतो, शासनाचे यशापयश शासन चालवणाऱ्यांवर अवलंबून असते. यासाठी ज्या शासनात संपूर्ण सत्ता चालविण्याची संधी प्राप्त होते. तो शासनाचा प्रकार सर्वोत्तम आहे. परंतु प्रत्येक व्यक्ती राज्यकारभारात सहभाग घेऊ शकत नाही, म्हणून प्रातिनिधिक शासनाचा प्रकार सर्वोत्कृष्ट आहे, असे मिल म्हणतो. वरीलप्रमाणे मिलने आदर्श व सर्वोत्कृष्ट शासनपद्धतीचे निषक सांगितले आहे.

असे असले तरी मिलला प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीमधील उणिवांची, दोषांची पूर्णपणे जाणीव होती. मिल म्हणतो, प्रातिनिधिक लोकशाहीतील बहुमताची हुकूमशाही ही निरंकुश तंत्राच्या हुकूमशाहीपेक्षा अधिक वाईट असते. प्रातिनिधिक लोकशाहीत बहुमताच्या हाती शासनाची सूत्रे असतात. त्यामुळे बहुमताची हुकूमशाही निर्माण होणे स्वाभाविक आहे. या शासनात कायदेदेखील विशिष्ट वर्गाचे हितसंबंध नजरेसमोर ठेवून तयार करण्यात येतात. मिलने त्याच्या 'On Representative Government' ग्रंथात प्रातिनिधिक लोकशाही शासन पद्धधतीचे दोषासंबंधी चर्चा केली आहे. मिलच्या मते, जनतेच्या हितांशी ज्यांचे हितसंबंध जुळत नाहीत, अशा लोकांच्या हाती सत्तासूत्रे जाण्याचा दोष प्रातिनिधिक लोकशाहीत निर्माण होतो. त्याचप्रमाणे बहुमताला अवाजवी महत्त्व प्राप्त होते. अल्पसंख्याकांचे हितसंबंध दुर्लक्षित राहतात, ते उडले जातात. जसे मिलने प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीचे दोष दाखविले तसेच ते दूर करण्याचे उपाय सुचवून प्रातिनिधिक शासनपद्धतीचे समर्थन देखील करतो.

जे. एस. मिलने जरी प्रातिनिधिक लोकशाही शासन पद्धतीला श्रेष्ठ मानून समर्थन केले असले तरी ती शासनपद्धती केवळ सुशिक्षित व सुसंस्कृत व्यक्तीसाठीच योग्य असल्याचे तो सांगतो. अशिक्षित व अज्ञानी समाजात ती शासनपद्धती उपयुक्त ठरणार नाही, असे तो म्हणतो. पुढे तो असे सांगतो की, सर्व शासन पद्धतीची निर्मितती व्यक्तींकडूनच होत असते. त्यामुळे शासनाचे यश त्या व्यक्तीची योग्यता व कर्तृत्त्व यावर अवलंबून असते. समाजाच्या भिन्नतेमुळे वेगवेगळ्या देशांत वेगवेगळी शासनप्रणाली उपयुक्त ठरू शकते. तरीही शासनाचा उद्देश बौद्धिक विकास व गुणांची अभिवृद्धी असल्यासच जनता आपला विकास साध्य करू शकेल. त्यासाठी प्रातिनिधिक शासनपद्धती योग्य ठरते, असे मिल म्हणतो. त्याच्या मते, वाईट निरंकुश शासन हे लोककल्याणकारी

निरंकुश शासनापेक्षा अधिक चांगले असते. कारण या शासनात जनतेप्रती जबाबदारीची जाणीव असते व जनतेतील विवेकशीलता शासनाला विरोध करून नियंत्रित करू शकते. प्रतिनिधिक शासन पद्धतीत अधिकांश लोकांना मतदानात भाग घेता येतो. स्थानिक शासनसंस्थेत सहभागित्व मिळवून लोकांना बौद्धिक विकास साधने शक्य होते. मिलच्या मते, परंतु प्रातिनिधिक शासनपद्धतीत काही उणीवा, दोष निमाण होतात. मिल त्यासंबंधी लोकशाहीच्या नावे चालणारी बहुमताची हुकूमशाही ही हुकूमशाही पेक्षाही घातक असते, असे स्पष्ट करतो आणि प्रातिनिधिक शासन पद्धतीतील उणीवा, दोष दूर करून आवश्यक असणाऱ्या काही सुधारणा, उपाय सुचवितो. या उपयात - १) अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व, २) प्रमाणशीर प्रतिनिधित्व, ३) मतदारांसाठी शैक्षणिक व सांपत्तिक पात्रता, ४) स्त्रीयांना मतदानाचा अधिकार, ५) सुशिक्षितांना अनेक मते देण्याचा अधिकार, ६) विधिमंडळ प्रतिनिधित्वासाठी योग्यता (पात्रता), ७) विधिमंडळ प्रतिनिधिंना मानधधन नसावे, ८) खुली मतदानपद्धती, ९) द्विगृही कायदेमंडळ पद्धती, १०) सभागृह समिती पद्धत, ११) विधिमंडळ (संसद) कायासंबंधी विचावर, १२) प्रशासनाची कार्य संसदेने करू नयेत, १३) सक्तीच्या शिक्षणाचे समर्थन इत्यादींचा समावेश होतो.

**१) अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व :**

प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीत असलेल्या सामान्य मतदान पद्धतीतून अल्पसंख्यांकांना योग्य प्रतिनिधत्त्व मिळत नाही याची मिलला जाणीव होती. त्याच्यय मते, शासन कारभार निर्वाचित प्रतिनिधिद्वारेच व्हायला पाहिजे, यासाठी त्याने निर्वाचन पद्धतीलला महत्त्वाचे स्थान दिले. प्रातिनिधिक शासनपद्धतीमध्ये बहुमत पद्धतीमुळे अनेक दोष निर्माण झाले होते. हे इंग्लडमधील प्रतिनिधिक शासनपद्धतीमुळे मिलच्या निर्दर्शनास आले होते. या शासन पद्धतीत प्रादेशिक एक प्रतिनिधी मतदारसंघ पद्धतीचा स्वीकार केला जातो. या मतदारसंघात मतदाराला एक मत व एकच प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार असतो. ज्या उमेदवाराला त्या मतदारसंघातील इतर उमेदवारांपेक्षा अधिक मते मिळताात तो निवडून येतो. परंतु ज्या उमेदवाराला कमी मते मिळततात त्याला मतदान करणाऱ्या लोकांना म्हणजेच त्यांच्या प्रतिनिधींना कायदेमंडळात (संसद) प्रतिनिधित्व प्राप्त होत नाही, असे प्रकार अनेक मतदारसंघात वारंवार घडतात. म्हणून संसदेत प्रतिनिधित्व न मिळणाऱ्या अल्पसंख्याक लोकांचे प्रतिनिधित्व प्राप्त होत नाही. असे प्रकार अनेक मतदारसंघात वावरंवार घडतात. म्हणून संसदेत प्रतिनिधित्व न मिळणाऱ्या अल्पसंख्याक लोकांचे प्रतिनिधित्व करणारी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची नवीन पद्धती मिल सुचवितो.

**२) प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पद्धत** (Proportional Representaation) **:**

प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीच्या सामान्य मतदान पद्धतीतून, ज्यांना विधिमंडळात (संसदेत) प्रतिनितध्व प्राप्त होत नाही, अशा अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळण्यासाठी मिलने प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती सांगितली आहे. प्रातिनिधिक लोकशाहीच्या सामान्य प्रतिनिधित्वाची पद्धती सांगितली आहे. प्रातिनिधिक लोकशाहीच्याा सामान्य अधिक जागा मिळून त्यांचे बहुमत वाढते व विरोधी पक्षात मते विभागली गेल्यामुळे त्यांना संसदेत प्रतिनिधित्व मिळत नाही. त्याचप्रमाणे समाजातील अल्पसंख्याकांची मते अनेक मतदारसंघात व

उमेदवारास विभागली गेल्यामुळे त्यांना संसदेत प्रतिनिधित्व मिळत नाही. प्रतिनिधिधत्व नसल्यायमुहे बहुसंख्याकांकडून त्यांच्या हितसंबंधाकडे सदैव दुर्लक्ष केले जाते. एकप्रकारे बहुसंख्यकांची अल्पसंख्यांकांवर हुकूमशाही निर्माण होते. लोकशाहीत देखील बहुसंख्याकांची हुकूमत असते व ती हुकूमशाहीपेक्षा अधिक घातक असते, असे प्रथमच मिलने स्पष्ट केले. मिलचे यासंबंधी असे मत आहे की, खऱ्या लोकशाहीत समाजातील सर्वांना समान प्रतिनिधित्व मिळायला पाहिजे. मात्र वर्तमान प्रातिनिधिक लोकशाही शासनात समाजातील सर्वांचे प्रतिनिधित्व होताना दिसत नाही. प्रतिनिधिक लोकशाही म्हणजे बहुमत प्राप्त पक्षांनी चालविलेले शासन हीच स्थिती सर्वत्र दिसते. या पद्धतीत बहुमतवाल्यांना विशेषाधिकार प्राप्त होतात. हा दोष बहुमत प्राप्त प्रतिनिधींचा नाही तर त्यांना सत्तेवर आणणाऱ्या सामान्य मतदान पद्धतीचा आहे. त्यात अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व प्राप्त होत नाही.

लोकशाहीत सर्वांची समानता प्रस्थापित होणे आवश्यक असते. प्रत्येकाला समान प्रतिनिधित्व प्राप्त होणे आवश्यक आहे. यासाठी जसे बहुसंख्य मतदार बहुसंख्यांकांना निवडून देतात. तसेच अल्पसंख्ययाकांनी देखी अल्पसंख्याकांना निवडून देण्याची सोय असायला पाहिजे. समता लोकशाहीचा पाया आहे. त्यासाठी मिल बहुसंख्यांकाबरोबर अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती स्वीकारली पाहिजे, असे सुचवितो. मिलपूर्वी ही पद्धत लंडनच्या थॉमस हेअर याने शोधून काढली होती. लोकशाहीत सर्व लोकांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याची ही महत्त्वाची पद्धती असल्याचे त्याचे मत होते. अल्पसंख्याकांच्या दृष्टिने ही पद्धती अधिक उपयुक्त ठरते. कारण मतांच्या प्रमाणात प्रतिनिधित्व प्राप्त होत असते. या पद्धतीत प्रमाण संख्येएवढीच मते पडणे आवश्यक असल्यामुळे अधिक मते पडण्याची गरज नसते. त्यामुळे अल्पसंख्याकांचे प्रतिनिधी निवडून येतात. ज्या उमेदवारांला आवश्यक संख्येइतकी मते आणि आणि पसंती मिळते त्या उमेदवारची निवड होते.

**३) मतदारांसाठी शैक्षणिक व सांपत्तिक पात्रतेची अट :**

प्रातिनिधिक शासनपद्धतीममधील दोष दूर करण्यासाठी मिल मतदारांची पात्रता काय असावी, याचा विचार करतो. प्रातिनिधिक लोकशाही शासन व्यवस्थेत बहुसंख्यांक लोकांचे शासन असते. त्यामुळे अशिक्षित व अज्ञानी लोकप्रतिनी निवडून येण्याची शक्यता अधिक असते. प्रातिनिधिक लोकशाहीला सर्वांत मोठा धोका अशा अशिक्षित व अज्ञानी लोकांपासून असतो. सर्वांना समान मतदानाचा अधिकार दिला तर अयोग्य व्यक्ती स्वार्थासाठी सार्वजनिक हिताचा बळी देतात. त्यामुळे मिल म्हणतो, लोकशाहीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मतदारांवरच काही पात्रतेच्या अटी टाकल्या पाहिजेत. सर्वांना मतदानाचा समान अधिकार देऊ नये, असे त्याचे मत होते. मतदारांसाठी किमान शैक्षणिक पात्रता असावी. ज्यांना लिहिता-वाचता येते, प्राथमिक अंकगणित करता येते त्यांनाच मत देण्याचा अधिकार असावा. निरक्षरांना मतदानाचा अधिकार देऊ नये. अशिक्षितांना मतदानाचा अधिकार देणे प्रतिनिधिक लोकशाहीसाठी हानिकारक असते. यासाठी सार्वत्रिक आवश्यक सक्तीच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे. मतदारानाच्या अधिकारासाठी शिक्षणाची अट लावणारा मिल हा पहिलाच विचारवंत होता. शिक्षणाशिवाय प्रौढ (वयस्क) मताधिकाराचा तो विरोध करतो. त्याने लोकशाहीचे धोके लक्षात घेऊन वरील उपाय सुचविले आहेत.

शैक्षणिक पात्रतेप्रमाणेच मिल मतदारांसाठी सांपतिक पात्रतेची अटही आवश्यक मागतो. त्याच्या मते, संपत्तीधारक जबाबदारीच्या जाणिवेने वागत असतात. ते मतदानाच्या अधिकाराचा जबाबदारीने उपयोग करतात. जे लोक शासनाचा कर भरतात त्यांनाच मतदानाचा अधिकार देणे योग्य असल्याचे त्याचे मत आहे. त्याशिवाय खर्च व बचत यांचा ताळेबंद लागणार नाही. तो म्हणतो की, ज्या व्यक्ती कोणत्याही प्रकारचा कर भरीत नाहीत त्यांना मतदानाचा अधिकार देऊ नये. कर भरणारी व्यक्ती राष्ट्रीय संपत्तीचा योग्य विनियोग करू शकते. निर्धन व्यक्तीला मतदानाचा अधिकार देण्याच्या तो विरूद्ध होता. कारण निर्धन व्यक्ती बेजबाबदारपणे मतदानाचा उपयोग करतात. याची मिलला भिती वाटते. म्हणून तो मतदानाच्या अधिकारासाठी संपत्तीची अट आवश्यक मानतो.

**४) स्त्रीयांना मतदानाचा अधिकार द्यावा :**

मिल स्त्रीयांना मतदानाचा अधिकार देण्याचे समर्थन करतो. त्याचा स्त्रीयांविषयीचा दृष्टिकोन उदार होता. पत्नी श्रीमती हे रिएट टेलर यांच्या सहवासाचा तो प्रभाव असू शकेल. स्त्रियांना मताधिकारासह इतर राजकीय अधिकार मिळाले पाहिजेत. याचे त्याने संसदेत व संसदेबाहेर राजकीय अधिकार मिळाले पाहिजेत. त्याचे त्याने संसदेत व संसदेबाहेर समर्थन केले. केवळ स्त्री म्हणून तिला अधिकार नाकारने मिलला मान्य नव्हते. स्त्री-पुरुषांत बौद्धिक स्वरूपाचे भेद नाहीत. त्यांना समान दर्जा मिळाला पाहिजे. स्त्रीला संधी मिळाली तर ती पुरुषांच्या बरोबरीची योग्यता सिद्ध करू शकेल. स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारल्यामुळे अर्धी लोकसंख्या राजकीय अधिकारांपासून वंतिच ठेवणे होईल. त्यामुळे समाजाचा विकास होणार नाही. खऱ्या लोकशाहीत हा अन्याय दूर झालाा पाहिजे. म्हणून लोकशाहीच्या यशासाठी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकारासह इततर राजकीय, सामाजिक व आर्थिक अधिकार मिळाले पाहिजेत. अशी मिलची ठाम भूमिका होती. आज जगातील सर्वच लोकशाहीदेशात स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने मतदानाचा अधिकार देण्यायत आला आहे.

**५) सुशिक्षितांना एकापेक्षा अधिक मते देण्याचा अधिकार असावा :**

मिलच्या मते, लोकशाहीचा आणखी एक दोष म्हणजे सर्वजण समान मानले जातात. व्यक्तीची योग्यता, बुद्धिमत्ता आणि शिक्षण यांना येथे काळीच महत्त्व नसते. मूर्ख, विकृत, अज्ञानी व निरक्षर यांना दिलेल्या मताधिकाराची किंमत सारखी असते. अशिक्षित व सुशिक्षितांना समान मते देण्याचा अधिकार असल्यामुळे सुशिक्षितांचे प्रतिधिी निवडून येऊ शकत नाहीत. कारण अशिक्षितांचे प्रमाण सुशिक्षितांपेक्षा नेहमी जास्त असते. अशिक्षित आणि सुशिक्षितांच्या मतांचे मूल्य समान राहू शकत नाही. सुशिक्षितांच्या मतांची किंमत निश्चितच जास्त असायला हवी. यावर मिलने असा उपाय सुचविला आहे की, व्यक्ती जेवढी जास्त सुशिक्षित असेल तेवढी जास्त (अनेकाबद्दल) मते देण्याचाा त्याला अधिकार असावा. अनेक (बहुत) मतदान पद्धतीचे समर्थन करण्यामागे मिलचा उद्देश शासनावर अशिक्षित आणि अज्ञानी लोकांचे प्राबल्य असू नये, हा आहे. हा एक राजकीय प्रगतीचा मार्ग म्हणून त्याने समर्थन केले आहे. सर्वांना सारखे मानल्यास संख्येला महत्त्व प्राप्त होते. गुणाला नाही. त्याने अज्ञानी व विद्वानात फरक केला. यासाठी बुद्धिमान व्यक्तीला एकापेक्षा अधिक मते

देण्याचा अधिकार असावा, असे मिलचे मत आहे. सुशिक्षितांना पाचपर्यंत मते देण्याची त्याने शिफारस केली आहे. या पद्धतीमुळे अशिक्षितांमुळे निर्माण होणारे प्रातिनिधिक लोकशाही पद्धतीतील दोष दूर करता येतील. तसेच मिल म्हणतो श्रीमंत व्यक्तींना शासनात थोडे अधिक महत्त्व देण्यात यावे. थोडक्यात, गुणवत्ता व संपत्तीला अधिक महत्त्व दिल्यामुळे चांगले शासन निर्माण होण्यास मदत होईल, असे मिलला वाटते.

**६) लोकप्रतिनिधित्वासाठी योग्यतेच्या (पात्रतेच्या) अटी :**

जे. एस. मिल ज्याप्रमाणे मतदारांसाठी काही योग्यता, पात्रता सांगतो तशाच तो लोकप्रतिधित्वासाठी देखील सांगतो. त्याच्या मते, मतदारांप्रमाणेच प्रतिनिधी सुशिक्षित, बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न, कार्यक्षम व व्यापक दृष्टिकोन असणारा असायलाच पाहिजे. जनतेने प्रतिनिधित्व दिल्यानंतर तो जनतेला मार्गदर्शन करणारा असावा. लोकप्रतिनिधी राजकीय पक्षांच्या नियंत्रणापासून व भांडवलदार प्रवृत्तीच्या प्रभावापासून मुक्त असण्यासाठी निवडणुकांचा खर्च राज्याने करावा. या सुचनेमागचा हेतू निवडणुकीतील गैरप्रकार टाळले जातील आणि सुशिक्षित, बुद्धिमान व चारित्र्यसंपन्न प्रतिनिधी निवडून येतील हा आहे. मिलने संसदेत निवडून गेल्यावर असे बंधन पाळणे नाकारून सारासार विवेकाने कार्य केले. आज अनेक देशातत लोकप्रतिनिधी होण्यासाठी शिक्षण, चारित्र्यसंपन्नता आदि पात्रतेच्या अटी लावलेल्या दिसतात. आज भारतातील अनेक घटक राज्यांत पंचायतराज संस्थांनी लोकप्रतिनिधीत्वासाठी शिक्षणाची पात्रता (अट) लावली आहे. उदा. महाराष्ट्र, गुजरात.

**७) उघड किंवा खुल्या मतदान पद्धतीचे समर्थन :**

जे. एस. मिल. समकालीन विचारवतांपैकी जेरे मी बेथँम आणि मिलचे वडील जेम्स मिल यांनी खुली मतदान पद्धती चुकीची व फसवी असून उमेदवारांचे मूल्यमापन करण्यास अपूर्ण वाटते, असे म्हटले व तिला नाकारले आणि गुप्तमतदान पद्धतीचे समर्थन केले.

जे. एस. मिल लोकशाहीत मतदानाला नैतिक व पवित्र कर्तव्य मानतो. त्यामुळे तो गोपनियता अनावश्यक ठरते, असे म्हणतो. अशा परिस्थितीत आपण कोणाला मत देतो, हे लोकांना कळले पाहिजे. यासाठी उघड किंवा खुली मतदान पद्धती असावी. खुल्या मतदानामुळे मतदारांची जबाबदारी वाढते. ते स्वार्थापेक्षा सार्वजनिक हिताचा विचार करून आणि उमेदवारांची योग्यता बघून मतदान करतील. या पद्धतीमुळे भ्रष्टाचार होण्याची शक्यता कमी असते. आपण मत कोणाला देतो, हे सर्वांना कळते. याउलट गुप्तमतदाान पद्धतीत भ्रष्टाचार, लाचलुचपत, जाती-धर्माचा प्रभाव व धमकीची शक्यता असते. म्हणून मिलने गुप्त मतदान पद्धतीला विरोध केला व उघड किंवा खुल्या मतदान पद्धतीचे समर्थन केले. मिलने गुप्तमतदान पद्धतीला विरोध केला असला तरी आज गुप्तमतदान पद्धती सर्वोत्कृष्ट मानून जगातील बहुतांश देशांनी तिचा स्वीकार केला आहे.

**८) प्रतिनिधींना मानधन नसावे :**

जे. एस. मिलच्या मते, संसदेचे कार्य जास्तीत जास्त चांगले व्हावयाचे असेल आणि संसदेची कार्यक्षमता वाढवायची असेल तर संसद सदस्यांना पगार, भत्ते किंवा कोणत्याही प्रकारचे मानधन सरकारी तिजोरीतून देण्यात येऊ नये. त्यामुळे राजकारण हा एक धंदा (व्यवसाय) होणार नाही. निवडून येणारे प्रतिनिधी जनसेवेच्या

उद्देशानेच येतील. पैसा कमावणे हा त्यांचा धंदा राहणार नाही. मानधनाविना प्रतिनिधी सेवाभावी वृत्तीने काम करतील. मानधन दिले ततर सेवाभावी वृत्ती कमी होईल, असे मिलला वाटते. थोडक्यात, राजकारण व्यवसाय होऊ नये आणि सेवाभावाने कार्य व्हावे, यासाठी संसद सदस्यांना मानधधन असू नये, असे त्यांचे मत होते.

**९) द्विगृहीत कायदेमंडळ पद्धतीचे समर्थन :**

जे. एस. मिलच्या काळात जेरे मी बेंथॅम सारख्या विचारवंताने एकगृही कायदेमंडळ असावे आणि हाऊस ऑफ लॉर्डस हे वरिष्ठ सभागृह नसावे, अशी भूमिका घेतली होती.

जे. एस. मिल एकगृही विधिमंडळापेक्षा द्विगृही विधिमंडळ योग्य मानून त्याचे समर्थन केले. ब्रिटिश संसदेच्या हाऊस ऑफ लॉर्डस या वरिष्ठ सभागृहाची उपयुक्तता स्पष्ट केली. कायदेमंडळाची दोन सभागृहे असल्यामुळे कामाची विभागणी होते. एका सभागृहावरील कामाचा ताण कमी होतो. तसेच एका सभागृहाने मंजूर केलेल्या कायद्यातील दोष दुसरे सभागृह काढून टाकते. म्हणून द्विगृही कायदेमंडळ असावे. कायदेमंडळाच्या द्विगृहीत रचनेमुळे कोणतेही एक सभागृह बहुमताच्या बळावर बेजबाबदार होणार नाही आणि त्याच्या निरंकुशतेवर आळा बसेल. याविषयी अधिक स्पष्टीकरण करताना मिल म्हणतो की, हाऊस ऑफ कॉमन्स म्हणजे प्रतिनिधी सभागृहाकडे (कष्ठिगृह) कायदेविषयक सर्वाधिकार असावेत. हाऊस ऑफ लॉर्डस (वरिष्ठ) या द्वितीय सभागृहाकडे कायद्याचा आराखडा तयार करण्याचे अधिकार असावेत. कारण हाऊस ऑफ लॉर्डसचे सभासद आपापल्या क्षेत्रात अनुभवी, तज्ज्ञ असतात. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग चांगले कायदे निर्मितीसाठी होऊ शकतो. अशा प्रकारे विधिमंडहाची दोन सभागृहे असल्याने कोणतेही एक सभागृह बहुमताच्या आधारे बेजबाबदार व हुकुमशाही वृत्तीचे बनू शकत नाही. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य सुरक्षित राहते व समाजहिताला बाधा पोहोचत नाही.

**१०) सभागृह समिती पद्धत (कायदेविषयक समितीची निर्मिती) :**

मिलने संसदेच्या कामकाजात सुधारणा करण्यासंदर्भात अनेक उपयुक्त सूचना केल्या आहेत. मिलला सभागृहात अनेकदा अशिक्षित प्रतिनिधी निवडून येत असतात, हे माहित होते. प्रशासन व कायदा यासंबंधी पूर्ण ज्ञान नसलेल्या व्यक्ती विधिमंडळाच्या मोठ्या प्रमाणात सदस्य असू शकतात. त्या प्रतिनिधींना कायदा, त्याचे महत्त्व, कायदा मंजूर होण्याची प्रक्रिया यांची विशेष माहिती नसते. अशा परिस्थितीत संपूर्ण सभागृहात विधायक चर्चा होणार नाही. तेव्हा त्यांच्याकडे कायदानिर्मितीचे कार्य सोपविणे योग्य होणार नाही. परंतु विधिमंडळ सदस्यांत काही प्रतिनिधी अनुभवी, तज्ज्ञ व अर्हता असणारे असतात. म्हणून संपूर्ण सभागृहाने कायदानिर्मितीच्या प्रक्रियेत न पडता, कायद्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी सभागृहातील तज्ज्ञांची समिती निर्माण करून कायदानिर्मितीचे कार्य समितीकडे सोपवावे. समिती पद्धतीमुळे सभागृहाचा वेळ वाचतो. कायदे निर्दोष आणि परिपक्व बनविता येतात. मिल म्हणतो, समितीने तयार केलेला कायदा संसद सदस्यांनी मान्य करावा. अर्थात, तो कायदा नाकारण्याचा अधिकार मिल संसद सदस्यांना देतो. परंतु त्यात सुधारणा करण्याचे नाकारून संसदेचे कार्य मर्यादित करतो. सारांश, मिल विधिमंडळाची सदस्य संख्या जास्त असल्यामुळे, तसेच तांत्रिक बाबींसंबंधी विधिमंडळ प्रतिनिधी अनभिज्ञ असल्याने कायदेनिर्मितीसाठी 'समिती पद्धती' सुचवितो. आज सर्व लोकशाही

व्यवस्थांत कायदेमंडळ कायदा निर्मिती व इतर विविध कामासाठी अनुभवी व तज्ज्ञांच्या समित्या निर्माण करून कार्याची उचितता साधली जाते.

**११) विधिमंडळाच्या कार्यासंबंधी विचार (संसदेच्या कार्यासंबंधी विचार) :**

विधिमंडळाच्या कार्याच्या संदर्भात मिलने नवीन सुधारणा सुचविल्या आहेत. त्याच्या मते, कायदेमंडळाचे (संसदेचे) कार्य सरकारवर नियंत्रण ठेवणे आहे. कारण सार्वभौमसत्ता प्रतिनिधी सभेत असते. सरकार जे कार्य करते त्याला प्रसिद्धी देण्याचे काम संसदेचे आहे. सरकारच्या कार्यावर चर्चा घडवून आणणे, त्यावर टीका करणे, उणीवा, दोष दाखविणे किंवा त्याच्या कार्याचे औचित्य सिद्ध करण्याचे कार्य संसदेने करावे. जर सरकारचे वर्तन घटनाबाह्य, अयोग्य वाटले तर सरकारला पदभ्रष्ट करून नवीन सरकारची निर्मिती करण्याचे कार्य संसदेचे आहे. व्यक्ती विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी कायद्याची निर्मिती करणे, अशी विधिमंडळाची (संसदेची) कार्ये मिलने सांगितली आहेत. थोडक्यात, विधिमंडळाचे कार्य सरकार चालविणे नसून सरकारचे निरिक्षण व नियंत्रण करण्याचे असते. तसेच सत्तेचा, पदाचा दुरुपयोग करणाऱ्या शासनाला सत्तेवरून दूर करणे, शासनाच्या योग्य-अयोग्य कार्यावर प्रकाश टाकणे या स्वरूपाचे असते.

**१२) प्रशासनाची कार्ये संसदेनी करू नयेत :**

जे. एस. मिल प्रशासनाची कार्ये ससंदेने का करू नयेत, या संदर्भात स्पष्टीकरण देताना तो म्हणतो की, प्रशासनाच्या प्रत्येक विभागाला तज्ज्ञांची आवश्यकता असते, ह्या विभागासाठी लागणारे विशेष ज्ञान सहजासहजी प्राप्त होत नाही. मिलच्या मते, कायदेमंडळाने प्रशासनाची कार्ये करण्याचा प्रयत्न केल्यास ती अयोग्य होतील. प्रशासनाची कार्ये कोणी करावे यासंबंधी तो दोन उपाय सुचवितो -

**अ) प्रशासनाची जबाबदारी नोकरीशाहीकडे देणे :** मिलच्या मते, प्रशासनाचे कार्य नोकरशाहीकडे सोपवावे. यासाठी कायम सनदी नोकरवर्गाची निवड काळजीपूर्वक करण्यात यावी. प्रशासनाची गुणवत्ता व कार्यक्षमता योग्य व्यक्तीच्या निवडीवरच अवलंबून असते. प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच सरकारचे यश अवलंबून असते. हे कार्य चांगले होण्यासाठी संसदेच्या नियंत्रणाची आवश्यकता आहे. मिलने नियंत्रणाचे काही मार्ग सांगितले आहेत.

**ब) विविध खात्यावर मंत्र्यांची नियुक्ती :** प्रशासकीय कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध खात्यावर संसदेने मंत्र्यांची नियुक्ती करावी. ते त्या खात्याचे प्रमुख राहतील. सत्तेमुळे निर्माण होणारी नोकरशाहीची अरेरावी नष्ट होईल. त्यामुळे सत्तेचा गैरवापर थांबेल, असे यासंबंधी मिलचे मत आहे.

**१३) सक्तीच्या शिक्षणाचे समर्थन :**

जॉन स्टुअर्ट मिलचे संपूर्ण राजकीय तत्त्वज्ञान सुधारणात्मक आणि क्रांतिकारी स्वरूपाचे आहे. मिल प्रातिनिधिक लोकशाही शासनपद्धतीच्या यशस्वीतेसाठी सक्तीच्या शिक्षणाचे समर्थन करतो. एवढेच नाहीतर तो सर्वांना शिक्षण देणे हे राज्याचे जबाबदारीचे कार्य आहे, असे सुचवितो. निरोगी व सशक्त लोकशाहीसाठी, लोकशाही मूल्यांचे संरक्षण व संवर्धनासाठी समाज शिक्षित व जागरूक असला पाहिजे. हे आज कुणीही

नाकारात नाही. आज जगातील बहुतांश देशांमध्ये शिक्षण महत्त्वाचे मानून शंभर टक्के साक्षरतेच्या मोहिमा आखण्यात आल्या आहेत, येत आहेत. उदा. २००१ पासून भारत सरकारने 'सर्व शिक्षा अभियान' अंतर्गत ६ ते १४ वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची योजना सुरू केली आहे.

वरीलप्रमाणे जे. एस. मिलने प्रातिनिधिक शासनप्रणातील उणिवांचा सखोल अभ्यास करून त्या दूर करण्याचे उपाय सुचविले आहेत.

**मिलच्या प्रातिनिधिक शासनासंबंधी विचारांचे टीकात्मक परिक्षण :**

जे. एस. मिलच्या प्रातिनिधिक शासनासंबंधी विचारांवर पुढील आधारावर टीका केली जाते.

**१) प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धत निरर्थक :**

मिल प्रातिनिधिक लोकशाहीतील अल्पसंख्याकांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पद्धती सुचवितो. परंतु या पद्धतीमुळे अनेक अडचणी निर्माण होतील. यापद्धतीत एकल संक्रमणीय (क्रमदेय एकमतदान किंवा पसंतीक्रम) मतदान पद्धती वापरली जाते. ही मतदान पद्धती अधिक गुंतागुंतीची असल्याने ती सामान्य मतदाराला समजणे कठिण आहे. मतदान करतेवेळी पसंतीक्रम कसा लावावा, हे अनेक अशिक्षितांना समजणार नाही. परिणामी, गोंधळ उडेल. केवळ सुशिक्षित आणि जागृत मतदारांपुरताच याचा वापर होऊ शकतो. त्यात देखील अनेक मते वाया जाण्याची शक्यता असते. निवडून येण्यासाठी मताचा आवश्यक कोटा म्हणजे आवश्यक मते ठरविणारे सूत्र अनेकांना समजत नाही. प्रमाणशीर मतदानामुळे वाजवीपेक्षा जास्त उमेदवार निवडून येण्याची खात्री झाल्यामुळे अनेक पक्ष उदयास येण्याची शक्ययता असते. त्यामुळे स्पष्ट बहुमताअभावी अस्थिर शासन निर्माण होण्याचा धोका असतो. उदा. फ्रान्समध्ये १९४५ ते १९५८ दरम्यान निर्माण झालेली राजकीय अस्थिरता. १९५९ साली फ्रान्समध्ये या पद्धतीचा त्याग करून एकप्रतिनिधी मतदारसंघाची अध्यक्षीय शासनपद्धती स्वीकारली. म्हणून प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची कल्पना सार्वत्रिक निवडणुकीत निरर्थक ठरू शकते. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती सदोष असली तरी तिचा काहीप्रमाणात वापर करण्यात येतो. उदा. भारतात राष्ट्रपती-उपराष्ट्रपतीची निवड, राज्यसभा व राज्य विधान परिषद प्रतिनिधींची निवड या मतदान पद्धतीने होते.

**२) मतदारांसाठीची शैक्षणिक आणि संपत्तीच्या पात्रतेची अट अव्यवहार्य :**

जे. एस. मिल मतदारांसाठी शैक्षणिक आणि संपत्तीच्या पात्रतेची अट लादून बहुसंख्य लोकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवतो. लोकशाहीचा समर्थक असूनही मिलने लोकांना समान अधिकार नाकारणे आश्चर्यकारक वाटते. लोकांचे शासन होण्याऐवजी मर्यादित मतदानामुळे बुद्धिवंत व संपत्तीधारकांचे शासन होईल. याशिवाय शिक्षण आणि मालमत्तेची अट लावण्याचा प्रयत्न केलातर अविकसित देशातील बहुसंख्य लोकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागेल. शिक्षण व संपत्तीच्या अटी लावण्याने मतदार मतदानाचा अधिकार अधिक जबाबदारीने बजावतील हा मिलचा विश्वास निरर्थक आहे. कारण प्रत्यक्षात असे दिसून येते की, सुशिक्षित आणि श्रीमंत, भांडवलदार लोक अशिक्षित व अज्ञानी लोकांपेक्षा मतदानाच्या

बाबतीत अधिक उदासीन दिसतात. त्यामुळे मतदारांसाठी पात्रतेच्या अटी लावून मतदानाचे क्षेत्र संकुचित करणे अव्यवहार्य ठरते.

**३) बहुमताधिकार सूचना अव्यवहार्य :**

मिल मतदारात शिक्षित आणि अशिक्षित असा फरक करतो आणि शिकलेल्या मतदारांना एकापेक्षा अधिक मते देण्याचा अधिकार असावा, असे म्हणतो. पण या पद्धतीमुळे वाईट परिणाम होतील. एकतर शिक्षणाच्या आधारावर एकापेक्षा जास्त मते ठरविणे गुंतागुंतीचे व असमर्थनीय आहे. अनेक वेळेला असा अनुभव येतो की, शिक्षण हीच योग्यतेची एकमेव कसोटी नसते. त्यापेक्षा अनुभव हा अधिक क्षमता दाखवू शकतो. बहुल (अनेक) मतदान समतेच्या तत्त्वाविरोधी होईल. बहुसंख्य लोकांवर अल्पसंख्य सुशिक्षितांचे राज्य होईल. मते मिळविण्यासाठी सौदेबाजी होईल. म्हणून मिलची बहुमताधिकाराची सूचना अव्यवहार्य वाटते.

**४) खुले मतदान असमर्थनीय :**

मिल गुप्तमतदान पद्धतीचे विरोध करून खुले मतदान पद्धतीने समर्थन करतो. यामागचा त्याचा हेतू शुद्ध आहे. परंतु व्यावहारिक अडचणी अधिक आहेत. खुल्या मतदान पद्धतीमुळे कोणी कोणाला मतदान केले हे कळेल. त्यामुळे समाजात उघड-उघड दोन गट पडतील. त्यातून समाजात हिंसाचार संघर्ष, फुट पडेल इत्यादी गैरप्रकार वाढतील. उघड मतदानामुळे मतदानाची टक्केवारी कमी होईल. खुलेपणाने मतदान करून विरोध व संघर्ष पत्करावा लागेल. यामुळे व्यक्तीच्या जीविताला धोका निर्माण होतो तेव्हा उघड किंवा खुले मतदान करून धोका पत्करण्यास कोण तयार होईल. ज्यांना निवडणुकीत अपयश आले त्यांच्याबद्दल विजेत्यांचा व्यवहार प्रतिशोधात्मक स्वरूपाचा राहण्याची शक्यता असते. गुप्तमतदानातील लोकांचा अनुत्साह बघता खुल्या मतदानाची टक्केवारी किती असेल. खुल्या मतदान पद्धती ऐवजी गुप्त मतदान पद्धतीतील दोष दूर करून लोकांना मतदान पद्धती ऐवजी गुप्त मतदान पद्धतीतील दोष दूर करून लोकांना संरक्षण देण्याची खरी गरज वाटते. थोडक्यात, मिलच्या खुल्या मतदान पद्धतीचे कोणत्याही आधारावर तार्किक समर्थन करता येत नाही. गुप्तमतदान पद्धतीत काही दोष असले तरी आज बहुतांश देशांनी या पद्धतीचा स्वीकार केला आहे. कारण खुल्या मतदान पद्धतीपेक्षा ती अधिक व्यवहार्य वाटते.

**५) विधिमंडळ प्रतिनिधिंना मानधन न देण्याची सूचना अव्यवहार्य वाटते :**

मिल निवडून आलेल्या विधिमंडळ प्रतिनिधींना मानधन किंवा पगार देऊ नये असे म्हणतो. परंतु ही त्याची सूचना अव्यवहार्य आहे. संसद सदस्यांना वेतन देऊ नये म्हणजे ते सेवाभावी वृत्तीने कार्य करतील असे मत आदर्शाच्या दृष्टिने बरोबर असेल. परंतु व्यवहारात उपयोगी नाही. व्यवसाय करून संसदेचे कार्य जबाबदारीने करण्यास वेळ कोण देणार? वेतन, भत्ते, अन्य सुविधा असतानाही नैतिक बंधन म्हणून कार्य करण्यास फार कमी सदस्य रस दाखवतात. सदस्यच नव्हे तर मंत्रीदेखील अनेक संसदेत उपस्थित नसतात. गणसंख्येअभावी कामकाज थांबवावे लागते. याशिवाय मानधन नसल्याने सदस्य आपल्या पदाचा, अधिकाराचा दुरुपयोग

करतील. अनैतिक मार्गाने पैसा मिळविण्याचा प्रयत्न करतील. थोडक्यात, मिलची विधिमंडळ प्रतिनिधिंना मानधन न देण्याची सूचना अतार्किक व अव्यवहार्य असल्याने ती समर्थनीय नाही.

**६) संसदेच्या अधिकारावर मर्यादा नसाव्यात :**

मिल संसदेला खूपच मर्यादित कार्य करण्याचा अधिकार देतो. संसदेचे सार्वभौमत्त्व मान्य केल्यास तिच्या अधिकारावर फार मर्यादा नसाव्यात. तज्ज्ञ समितीने केलेल्या कायद्यात दुरुस्त्या करण्याचा अधिकार संसदेस असलाच पाहिजे. परंतु मिल त्यात सुधारणा करण्याचे नाकारून संसदेचे कार्य सिमित करतो. यामुळे विशेषनांचे अधिकार व महत्त्व वाढेल. संसदेचे अधिकार व महत्त्व कमी होईल. संसद सदस्यात निराशा व निष्क्रियता वाढीस लागेल. संसदेत लोकप्रतिनिधींच्या रूपात लोकमताच्या भावभावनांचे प्रतिबिंब न उमटत असते. तेव्हा त्याचा आदर करून संसदेला तज्ज्ञ समितीने केलेल्या कायद्यात योग्य दुरुस्त्या करण्याचा अधिकार असावयाला पाहिजे.

**७) शिक्षणावर भर अनुभवाकडे दुर्लक्ष :**

मिलने प्रातिनिधिक लोकशाहीच्या यशासाठी शिक्षणावर अत्याधिक भर देऊन अनुभवाकडे दुर्लक्ष केले. शिक्षणामुळेच लोकात राजकीय जागृती निर्माण होते हे त्याचे मत अर्धसत्य आहे. कारण अनुभवातूनही राजकीय ज्ञान प्राप्त होत असते. मिलने केवळ शिक्षणावर भर दिल्यामुळे अनुभवाला महत्त्व दिले नाही. त्यामुळे अनुभवी लोकांच्या मार्गदर्शनाच, ज्ञानाचा अनुभव राज्यकर्त्यांना घेता येणार नाही. जीवनाची यशस्विता केवळ शिक्षणावर नसून अनुभवावर असते. याकडे मिलचे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. असे असले तरी सशक्त व निरोगी लोकशाहीसाठी शिक्षण हे आवश्यकच असते, त्याचे महत्त्व नाकारता येत नाही.

**समारोप / सारांश :**

जे. एस. मिलच्या प्रातिनिधिक शासनासंबंधी विचारांवर वरीलप्रमाणे टीका होत असली तरी ही टीका काही प्रमाणात एकांगी स्वरूपाची वाटते. कारण त्याचे अनेक विचार उपयुक्त असून ते सर्वमान्य झाले आहेत. मिलने प्रातिनिधिक शासनातील उणिवांचा सूक्ष्म अभ्यास करून त्या दूर करण्याचे उपाय सुचविले आहेत. त्याच्या उपायात काही दोष आहेत, हे मान्य करून देखील आज त्याच्या अनेक विचारांना बहुतेक देशांतून स्वीकारल्याचे दिसते. जसे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा विचार मर्यादित स्वरूपात अनेक देशांनी स्वीकारला आहे. उदा. भारतात राष्ट्रपती-उपराष्ट्रपतींची निवड, राज्यसभा प्रतिनिधींची निवड इ. आज बहुतांश देशात शिक्षण महत्त्वाचे मानून शंभर टक्के साक्षरतेच्या मोहिमा आखण्यात आल्या. स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. अल्पसंख्याकांना विधिमंडळात प्रतिनिधित्व मिळावे यासाठी राखीव जागांचे धोरण स्वीकारले. बहुतांश देशांनी निर्दोष व चांगल्या कायदेनिर्मितीसाठी 'सभागृह समिती पद्धती' स्वीकारली. अनेक देशांनी एकगृही कायदेमंडळाच्या हुकूमशाहीला आळा घालण्यासाठी द्विगृही कायदेमंडळ पद्धती स्वीकारली. लोकशाहीतील बहुमताची हुकूमशाही असता कामा नये; संसदेच्या कार्यासंबंधी सुचविलेल्या उपयुक्तता सुधारणा, प्रशासनाची कार्ये संसदेने करू नयेत तर ती नोकरशाहीकडे सोपवावीत. तसे प्रशासकीय कार्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध खात्यावर संसदेने मंत्र्यांची नियुक्ती करावी. हे मिलने सुचव्विललेले उपाय बहुतेक देशात स्वीकारल्याचे दिसून येतात. पक्षशिस्तीच्या

बंधनात न अडकता सदस्यांनी आपली मतते परखडपणे आणि प्रामाणिकपणे मांडावीत. मिल स्वत: संसद सदस्य असताना पक्षशिस्तीच्या बंधनात न आडकता परखडपणे मते मांडली. त्याच्या मते, देशहितासाठी जे आवश्यक आहे, ते लोकप्रतिनिधींनी करायला पाहिजे. काय योग्य आणि काय अयोग्य आहे हे लोकांना त्याने निर्भिडपणे सांगितले पाहिजे. हा व यासारखे त्याचे प्रभावी विचार आज सर्वमान्य झाले आहेत. तसेच मिलने लोकशाहीच्या संरक्षणासाठी सुचविलेल्या मार्गाव्यतिरिक्त प्रभावी उपाय आजपर्यंत कोणालाच सांगता आलेले नाहीत. अशा पद्धतीने मिलने प्रातिनिधिक शासनासंबंधी आपले विचार मांडून राजकीय तत्त्वज्ञानात मोलाची भर घातली आहे. लोकशाहीचा समर्थक व स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता म्हणून मिलचे नाव जागतिक पटलावर चिरस्मरणीय ठरले आहे. म्हणून 'डेव्हिसन' यांनी म्हटले आहे की, मिल हा लोकशाही विरोधक नसून तो लोकशाहीचा पुरस्कर्ता आहे.

### १.२.१० जॉन स्टुअर्ट मिलचे लोकशाहीविषयीचे विचार :

जॉन स्टुअर्ट मिलने लोकशाही विचार आणि लोकशाहीतील प्रातिनिधिक शासनपद्धती यांना फार मोठे योगदान दिले आहे. मिलच्या राजकीय विचारात व्यक्तिस्वातंत्र्यवाद, उपयुक्ततावाद आणि उदारमतवाद यांचे संतुलित मिश्रण दिसून येते. या तीनही विचारसरणीतून मिलचे लोकशाही विषयीचे विचार प्रकट होतात. पण लोकशाहीचा एक स्वतंत्र विचार प्रवाह म्हणून मिलने अभ्यास केल्याचे दिसून येत नाही. १९ व्या शतकातील इंग्लंडच्या लोकशाहीपद्धतीचा मिलने सूक्ष्म अभ्यास केला. तेव्हा त्याला लोकशाहीमध्ये बहुसंख्यांकांची हुकुमशाही जाणवली. संख्या बळाच्या जोरावर बहुसंख्यांकाकडून अल्पसंख्यांकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होताना दिसली. यासारखे अनेक दोष इंग्लंडच्या लोकशाही पद्धतीत मिलला दिसून आले. त्यावर त्याने परखडपणे टीका केली. त्याचदरम्यान त्याने अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीचाही सूक्ष्म अभ्यास केला आहे. त्यावेळी त्याच्या वाचनात डी. टॉकविले (DeToequeville) या अमेरिकन लेखकाचे 'Democracy of America' हे पुस्तक आले. या पुस्तकातील एक वचन ''लोकशाही ही बहुसंख्याकांची हुकूमशाहीच असते.'' (Democracy is a Tyrrany of majority) याचा मिलवर खोल परिणाम झाला. बहुमतावर आधारित लोकशाही ही अल्पसंख्याकांचे बाबतीत हुकूमशाहीच ठरते, हे डी. टॉकविलचे मत मिलला पटले होते. अर्थातच मिलने अल्पसंख्याकांच्या स्वातंत्र्याला विशेष महत्त्व दिले. तो अशाप्रकारच्या लोकशाहीच्या शोधात होता की ज्यात बहुसंख्यांकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याची जोपासना होताना अल्पसंख्यांकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होणार नाही. मिलला लोकशाहीच्या संख्यात्मक स्वरूपापेक्षा तिचा गुणात्मक दर्जा अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणूनच त्याने लोकशाहीतील दोष दूर करण्यासाठी लोकशाही शासन पद्धतीत प्रातिनिधिक लोकशाही शासनाचा पुरस्कार केला. त्याने आपल्या 'Consideration ofn Representative Government' (1861) या ग्रंथात लोकशाही पद्धतीमधील दोष, उणिवा, दाखवून त्यांवर उपाय सुचविले.

जे. एस. मिलच्या काळात लोकशाहीचे समर्थक असे मानत की, राजकीय सत्तांचा विकास होऊन तो सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल. त्याचबरोबर प्रत्येक नागरिकाने लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आपले राजकीय हक्क बजावले पाहिजे, असे ते म्हणत. राजकीय हक्कांचा विचार करताना त्यांच्या मनात भाषण स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क, निवडणुकींना उभे राहण्याचा हक्क, राज्यकारभारात सहभागी होण्याचा हक्क आणि

शासनाच्या चुकीच्या धोरणावर टीका करण्याचा हक्क इत्यादी अधिकार असतात. मिलच्या मते, केवळ राजकीय स्वातंत्र्याचा विचार करून एक परिपूर्ण लोकशाही निर्माण करता येणे शक्य वाटत नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा लोकशाहीत अंतर्भाव होणे आवश्यक असते. म्हणून मिल म्हणतो, प्रचलित लोकशाहीला लोकशाही न म्हणता प्रातिनिधिक शासन म्हणजे अधिक योग्य ठरेल.

मिल म्हणतो, लोकशाहीमध्ये मतदारांना राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार हक्क असतो. पण राज्यकारभारात सहभागी होण्याचा मार्ग अनेक अटी आणि अडथळे यांनी भरलेला असल्यामुळे प्रत्येकाला राजकीय सहभागाची संधी मिळणे अवघड असते. तो म्हणतो, संधी मिळणे आणि संधीचा लाभ घेता येणे या दोन स्वतंत्र बाबी असून प्रत्येकाजवळ संधीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली क्षमता असतेच असे नाही. अर्थातच खरी लोकशाही ही नागरिकांसाठी निरनिराळ्या संधी उपलब्ध करून देणारी असली पाहिजे. याच ठिकाणी आपल्या लक्षात येईल की, मिलने व्यक्तिस्वातंत्र्यातून अल्पवयीन मुले, अपंग, मतिमंद आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना का वगळले आहे ते यासंदर्भात त्याला असे म्हणायचे आहे की, अशा व्यक्तींना व्यक्तिस्वातंत्र्य दिले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. कारण त्यांच्याजवळ स्वातंत्र्य उपभोगण्यासाठीची आवश्यक ती क्षमताच नसते. यावरून मिलने या समाजघटकांवर अन्याय केला असा जो त्याच्यावर टीकाकारांकडून आरोप होतो तो किती अयोग्य आहे, हे आपल्या लक्षात येईल.

लोकशाही यशस्वी होण्यासाठी व्यक्तीला केवळ हक्क देऊन भागत नाही तर त्यांना हक्कांचा योग्य उपभोग घेता यावा, म्हणून सक्षम बनविणे आवश्यक असते, असे मिल म्हणतो. त्यासाठी राज्यातील सर्व नागरिकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देऊन सुशिक्षित बनवावे, त्यांच्यातील विषमता (आर्थिक-सामाजिक) दूर कराव्यात, स्त्री-पुरुष असा लिंगभेद करू नये, नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करावी. अल्पसंख्यांकांच्या हक्कांकडे विशेष लक्ष द्यावे, जनतेच्या आर्थिक जीवनाचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न करावा, लोकप्रतिनिधींनी समाजाभिमुख असावे, नागरिकांनी सतत जागरूक असावे, त्यांनी आपल्या स्वातंत्र्याचा विचार करताना ती इतरांच्या स्वातंत्र्याच्या आड येणार नाहीत, याकडे विशेष लक्ष द्यावे, असे अनेक उपाय मिलने सुचवले आहेत. मिलला प्रातिनिधिक शासन हे लोकशाही घडवण्याचे महत्त्वाचे साधन वाटते. त्या साधनांचा उपयोग करून केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींना निवडून देऊन बहुमताच्या गटाला शासन स्थापन करण्याची संधी देणे म्हणजे लोकशाही नाही, तर लोकशिक्षणातून लोकशाहीला पूरक असा सुजाण नागरिक निर्माण करणे, तसेच लोकशाही समाज आणि राज्यपद्धती यांना पूरक अशा व्यक्ती घडवणे, हे नितांत आवश्यक असते. अन्यथा लोकशाहीचा विचार केवळ एक शासनपद्धती म्हणून केला तर ती एक तांत्रिक लोकशाही ठरेल. त्यामुळे लोशाहीकडे केवळ एक शासनपद्धती असे न पाहता एक जीवनपद्धती म्हणून पाहता आले पाहिजे. यासाठी मिलच्याा काही वचनांचा यासंदर्भात विचार करणे उपयुक्त ठरेल. उदा. 'अखंड जागरूकता ही स्वातंत्र्याची किंमत असते.', 'हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात.', 'प्रातिनिधिक शासनामध्ये नाही तर लोकशाहीमध्ये बहुसंख्यय लोक मतदान करतात; परंतु अल्पसंख्य लोकक राज्य करतात.

वरीलप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्यय आणि लोकशाहीच्या संदभात मिलच्या नावावर आणखी कित्येक वचनांची

नोंद आहे. एकंदरीत जे. एस. मिल एवढा लोकशाहीचा सखोल विचार अन्यय कोणा विचार अन्य कोणा विचारवंताने केला असेल, असे वाटत नाही.

**मिलने लोकशाहीमध्ये सुधारणा होण्यासाठी सुचविलेले उपाय :**

जॉन स्टुअर्ट मिलने लोकशाहीमध्ये सुधारणा व्हाव्यात म्हणून अनेक उपाय सुचविले आहेत.

**१) लोकांना लोकशिक्षण देणे, जागरूक करणे व प्रमाणशीर प्रतिनिधित्व देणे :**

मिलच्या मते, लोकशाहीला दोन गंभीर स्वरूपाचे धोके संभवतात. पहिला – लोकांचे अज्ञान आणि दुसरा लोकप्रतिनिधी आणि शासन म्हणून कार्यरत नेत्यांमध्ये असलेला गुणवत्ता आणि पात्रतेचा अभाव. या दोन धोक्यांमुळे लोकांच्या हितसंबंधाचे रक्षक हेच लोकहिताचे भक्षक होऊ शकतात. **उपाय –** n{hbm - लोकशिक्षण लोकांचे अज्ञान हा लोकशाहीतील पहिला धोका टाळण्यासाठी लोकांना त्यांची स्वातंत्र्ये बहाल करून असे लोकशिक्षण द्यावे की ते योग्य प्रतिनिधि निवडतील आणि त्यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवतील. **दुसरा उपाय – लोकांची जागरूकता –** लोकप्रितिनिधी आणि शासनामध्ये काम करणाऱ्या नेत्यांमध्ये असलेला गुणवत्ता आणि पात्रतेचा अभाव. हा लोकशाहीतील दुसऱ्या प्रकारचा धोका गंभीर स्वरूपाचा असून तो टाळण्यासाठी लोकप्रितिनिधी आपल्या सत्तेचा दुरुपयोग करणार नाहीत. यासाठी लोकांनी सतत जागरूक राहिले पाहिजे. **तिसरा उपाय – प्रमाणशीर प्रतिनिधित्व देणे –** मिल लोकप्रतिधीवरील नियंत्रणाचा बाबतीत आणखी एक उपाय सुचवितो की, सर्व सामाजिक वर्ग आणि सामाजिक स्तरातील लोकांना प्रमाणशीर प्रतिनिधित्व (Proportional representation) दिले तर नियंत्रण करणारे नेतेही जागरूक राहून आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करणार नाहीत. मिलच्या मते, जसे समाजातील विविध घटकांमध्ये आपापले हितसंबंध असतातच. तसे लोकप्रितिधिंच्या विविध स्तरांमध्येही ते असतात. प्रत्यक्ष व्यवहारात परस्परांच्या हितसंबंधावर परस्परांचे नियंत्रण असेल तर सत्ता आणि अधिकारांचा दुरुपयोग होण्याची शक्यता कमी असते.

**२) सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धती :**

मिलच्या मते; मर्यादित मतदानाचा हक्क हाही लोकशाहीच्या यशस्वी योग्यमधील एक अडथळाच असतो. यावर उपाय म्हणून तो सार्वत्रिक प्रौढ मतदानपद्धतीच्या हक्काची शिफारस करतो, परंतु मिळला मतदानाच्या हक्काचा एकदम विस्तार करणे मान्य नाही. त्याच्या मते, प्रथम लोकांना शिक्षण देऊन सुशिक्षित व शहाणे करावे, त्यांना आपला रोजगार मिळवण्याची संधी द्यावी आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने मर्यादित मतदान पद्धतीकडून सार्वत्रिक प्रौढ मतदान पद्धतीकडे वाटचाल करावी. मिलने लोकांना शिक्षण किती व कसे द्यावे, त्यांना रोजगार कसा उपलब्ध करून द्यावा, याविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. पण खऱ्या लोकशाहीसाठी सार्वत्रिक प्रौढ मतदार पद्धतीच योग्य असल्याचे मिळचे मत आहे.

**३) कर न भरणाऱ्यांना राजकीय अधिकार देऊ नयेत :**

मिलला मतदारांच्या संख्येपेक्षा त्यांची गुणवत्ता अधिक महत्त्वाची वाटते. विविध समाजोपयोगी कामासाठी शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध असावा लागतो. त्यासाठी नागरिकांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी आपले कर

वेळेवर आणि पुरेशा प्रमाणत भरले पाहिजेत. मिलच्या मते, जे नागरिक कर भरणार नाहीत त्यांना मतदानाचा किंवा निवडणूकीला उभे राहण्याचा अधिकार हक्क देऊ नये. शिवाय ज्या माणसाजवळ स्वत:चे भरणपोषण करण्याची क्षमता योग्यता नाही, त्यांनाही मिल राजकीय अधिकारांच्या पासून वगळतो. कल्याणकारी राज्यात सर्वकाही शासनाने करावे, अशी लोकांची अपेक्षा असते, पण मिलला ते मान्य नाही. थोडक्यात, मिल लोकांना म्हणतो, ''आधी स्वत: सक्षम बना, मगच आपल्या राजकीय हक्कांची, अधिकारांची मागणी करा.''

**४) बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता आधारावर मतदारांचा मतांचे मूल्यमापन करावे :**

मिलच्या मते, कमी दर्जाची राजकीय क्षमता व वर्गीय हितरक्षण हेही लोकशाहीच्या मार्गातील दोन प्रमुख अडथळे आहेत. त्यांचे निराकरण करण्यासाठी मिलने सुचवलेली सुधारण म्हणजे बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता यांच्या आधारावर मतदारांच्या मतांचे मूल्यमापन करावे. म्हणून मिल मतदानाच्या संख्यात्मक गुणवत्तेपेक्षा मूल्यमापनात्मक गुणवत्तेस अधिक महत्त्व देत असल्याचे दिसतो.

**५) स्त्रियांना मतदानाचा व प्रतिनिधीत्वाचा हक्क द्यावा :**

मिल हा स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता आणि स्त्री-पुरुष समानता यांचा पाठीराखा असल्याने तो स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कांची जोरदारपणे शिफारस करतो. त्याच्या मते, स्त्रिया या शारीरिक दृष्ट्या दुर्बल असल्याने तसेच पुरुषांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा विपरीत असल्याने त्यांना स्वसंरक्षणाचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. मिलच्या मते, लोकशाही समाज सुदृढ होण्याकरिता स्त्रियांना मतदानाचा तसेच प्रतिनिधित्वाचा हक्क, अधिकार देणे आवश्यक आहे.

**६) जास्तीत जास्त मतदान केंद्रे असावीत :**

जे. एस. मिलच्या मते, मतदान केंद्रे जितकी जास्त तितके मतदानही जास्त होईल. त्याचप्रमाणे मतदान केंद्रे मतदारांच्या जितकी जास्त जवळ असतील तितके मतदान अधिक उत्साहपूर्ण होईल. मिल म्हणतो, ही व्यवस्था अशासाठी आवश्यक आहे की, मतदारांना मतदान केंद्रावर जाण्यायेण्यासाठीचा खर्च देण्याचा उमेदवारांना मोह होऊ नये. जेणेकरून अपात्र, अकार्यक्ष व भ्रष्ट, लोकप्रतिनिधी निवडून येणार नाहीत. त्यासाठी प्रतिनिधी आणि उमेवारांनी करावयाच्या निवडणूक खर्चावर शासकीय नियंत्रण असले पाहिजे हा उपाय मिल सुचवितो.

**७) संसद-प्रतिनिधींना मानधन देऊ नये :**

मिलच्या मते, संसद लोकप्रतिनिधींना कोणत्याही स्वरूपाचे मानधन अथवा पगार, भत्ते दिले जाऊ नयेत. कारण याचा नैतिक परिणाम चांगला होणे शक्य नाही. प्रतिनिधींना मानधन न दिल्याने ते सेवाभावृत्तीने काम करतील. मानधन दिल्यास त्यांची सेवाभाववृत्ती कमी होते.

**८) द्विगृही विधिमंडळ असावे :**

मिल एकगृही विधिमंडळापेक्षा द्विगृही विधिमंडळाला अधिक योग्य मानून त्याचे समर्थन करतो आणि ब्रिटिश संसदेच्या हाऊस ऑफ लॉर्डस् या द्वितीय वरिष्ठ गृहाची उपयुक्तता स्पष्ट करतो. एकगृही विधिमंडळातील

बहुमताची हुकूमशाही टाळण्यासाठी मिल द्विगृही विधिमंडळाचे समर्थन करतो. दोन सभागृह असल्याने कामाची योग्य विभागणी होते. तसेच एका सभागृहाने मंजूर केलेल्या कायद्यातील उणीवा, दोष दूसरे सभागृह दुरूस्त करते, अथवा काढून टाकते. त्यामुळे चांगले कायदे तयार होतात.

अशा प्रकारे वरील विवेचनावरून हे स्पष्ट होती की, मिल उपरोक्त सर्व सूचना, उपाय सुधारणा यशस्वी लोकशाहीच्या संदर्भात करतो. मिलने केलेल्या वरील सूचनांचा आदर आधुनिक जगातील लोकशाही शासनपद्धती असलेल्या देशात केला जात असल्याचे दिसते. मात्र आपल्या भारतासारख्या देशात मिलच्या काही सूचनांचे पालन करणे राज्यकर्त्यांना अवघडत जात आहे अथवा अडचणीचे ठरत आहे, असे दिसते. जसे विधिमंडळ सदस्यांना लोकप्रतिनिधी म्हणून मिळणारे आग्रहक्क, त्यांचे अधिवेशन काळातील भत्ते आणि इतर सुविधा, त्यांचे सतत वाढत असलेले मानधन, केवळ एकच पंचवार्षिक कार्यकाळ पूर्ण केला तरी त्यांना दिले जाणारे निवृत्ती वेतन. आपल्याच मतदार संघाच्या विकासासाठी दिला जाणारा प्रचंड मोठा विकास निधी. अपात्र, अकार्यक्षम, भ्रष्ट व गुन्हेगार वृत्तीच्या लोकप्रतिनिधींची विधिमंडळातील (संसद) वाढती संख्या व राजकीय पक्षांकडून त्यांना मिळणारे अभय. या सर्वबाबींकडे पाहता लोकशाही आणि प्रतिनिधीक शासन यशस्वी होण्यासाठी मिलने सांगितलेल्या कोणत्या सूचनांचे सुधारणांचे आपण भारतीय पालन करीत आहोत, हा प्रश्न!

### १.२.११ जे. एम. मिलचे उदारमतवादाविषयीचे विचार :

जेरे मी बेंथॅमनंतर व्यक्तिवाद आणि उपयुक्ततावाद या विचारांचे विश्लेषण करून उदारमतवादी विचारांची प्रथम मांडणी करणारा विचारवंत म्हणून जॉन स्टुअर्ट मिल याला ओळखले जाते. मिल कोणत्या एका राजकीय विचारसरणीचा पुरस्कर्ता होता हे निश्चितपणे सांगता आले नाही, तरी त्याला उदारमतवादाचा प्रणेता, प्रमुख पुरस्कर्ता म्हणून ओळखले जाते. उदारमतवादाच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये सामान्यत: मानवतावाद, विवेकशीलता, बुद्धिप्रामाण्य आणि विज्ञाननिष्ठा, धर्मनिरपेक्षा यांचा समावेश होतो. मिलच्या ठिकाणी ही सर्व गुणवैशिष्ट्ये दिसून येतात. उदारमतवादात अंधश्रद्धा, गैरसमजुती, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, धर्मगुरूंना फाजील अधिकार देणाऱ्या धर्मसंस्था तसेच निरंकुश राजसत्ता यांना विरोध असतो. मिलने त्याच्या लेखनात आणि संसदेतील भाषणातून या अनिष्ट प्रवृत्तींना तीव्र विरोध केल्याचे दिसून येते. म्हणून तो उदारमतवादी विचारांचा पुरस्कर्ता ठरतो. मलने आपल्या "Liberalism' या ग्रंथात उदारमतवादाविषयीचे विचार मांडले आहेत.

मिलला एका बाजूने लोकशाहीतील बहुमतांच्या तत्त्वाला पाठिंबा देतानाच तो दुसऱ्या बाजूने अल्पसंख्याकांच्या स्वातंत्र्याचाही विचार करताना दिसतो. मिल समाजातील अल्पवयीन मुले, अपंग, मतीमंद, अशिक्षित आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या दारिद्र्यग्रस्त व्यक्तींना समान व्यक्तिस्वातंत्र्य देऊ नयेत असं मत मांडतो. परंतु त्याचबरोबर तो त्या सर्वांच्या विकासाची जबाबदारीही बहुसंख्यांक नागरिकांवर टाकतो. मिल सार्वत्रिक प्रोढ मताधिकारांचे केवळ समर्थनच करत नाही तर तो सर्वांना शिक्षण देऊन त्यांना आपली उपजीविका करण्यासाठीची साधन उपलब्ध करून द्यावीत व स्त्री-पुरुष असा भेद न करता सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा अवलंब करावा असे तो ठामपणे सांगतो.

मिल लोकशाहीच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या उद्दिष्टांचा पुरस्कार करतो. त्याने न्यायाचा व्यापक अर्थ लक्षात घेऊन सर्वांना सामाजिक, आर्थिक तसेच नैतिक न्याय कसा मिळेल, याचा सखोल विचार केल्याचे दिसते. तो आर्थिक समता आणि न्यायाच्या बाबतीत असे म्हणत नाही की, श्रीमंतांची संपत्ती जप्त करून ती गरिबांमध्ये वाटावी, असे केल्याने आर्थिक न्याय प्रस्थापित होणार नाही, असे मिलचे मत आहे. मिल या दोन वर्गांमध्ये संघर्षाऐवजी सुसंवादाच्या व शांततेच्या मार्गाने समन्वय साधून समता व न्याय प्रस्थज्ञपित करू इच्छितो.

जे एस. मिल उदारमतवादी असण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्याची, प्रत्येक कुटुंब सुधारले तर समाज सुधारेल ही असलेली धारणा होय. तो म्हणतो, कुटुंबामध्ये विवाहित स्त्री-पुरुषांनी केवळ मुलांना जन्म देऊन भागणार नाही, तर त्यांच्या आरोग्य आणि शिक्षणाचीही जबाबदारी त्यांना घेतला आली पाहिजे. समाजाला अन्न, वस्त्र, निवार, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा भागवण्याची जबाबदारी खासगी क्षेत्राने उचलावी की सार्वजनिक क्षेत्रांनी याबाबत मिल नि:संदिग्धपणे म्हणतो की, ही जबाबदारी या दोन्ही क्षेत्रांनी उचलली पाहिजे. आर्थिक विकासाची संपूर्ण जबाबदारी शासनावर टाकून समाजाला अलिप्त होता येणार नाही. तसेच समाजाच्या कल्याणाची जबाबदारी झटकून राज्य व शासनाला मोकळे होता येणार नाही, असे मिल स्पष्ट पणे बजावतो. राज्याला केवळ पोलिसी स्टेटची (कायदा व सुव्यवस्था या क्षेत्रापुरते मर्यादित कार्य) भूमिका घेता येणार नाही, असे मिल म्हणतो. शिक्षणाबाबत विचार करताना, राज्याने शिक्षणविषयक धोरण आखून त्याची अंमलबजावणी खासगी क्षेत्रातून करून घ्यावी म्हणजे नागरिकांना शिक्षणाचा खरा उपयोग होईल, अशी मिलची भूमिका आहे.

मिल हा धर्मनिरपेक्षवादी होता. तसाच तो धर्म न मानणारा निधर्मीही होता. धर्म आणि धार्मिक संस्था याबाबतीत देखील मिलचा विचार उदारमतवादाकडे जाणार आहे. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांची झालेली फारकत ही धार्मिक उदारमतवादाला पोषक ठरली, असे मिलचे मत आहे. मिल राज्याने कोणताही धर्म पुरस्कृत करू नये किंवा त्याचा प्रसार करू नये असे स्पष्टपणे बजावतो. व्यक्तीने आस्तिक असाावे की नास्तिक याचे योग्य उत्तर म्हणजे हा ज्याचा त्याचा व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न आहे, असे मिल म्हणतो. थोडक्यात, धर्मनिरपेक्षा हे मिलच्या दारमतवादाचे एक महत्त्वाचे क्षण आहे असे म्हणता येईल.

जे. एस. मिलच्या राजकीय विचारात व्यक्तिस्वातंत्र्य, स्वातंत्र्याची उपयुक्तता, लोकशाही आचार व विचारमूल्ये यांना सारखेच महत्त्व असल्याचे दिसते. मिलला उदारमतवादी का म्हणावयाचे याचे उत्तर म्हणजे तो व्यक्तीला सर्वश्रेष्ठ मानतो, व्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व जाणतो. समता आणि न्याय यांचा पुरस्कार करतो, जनतेच्या सार्वभौम प्रतिनिधी असलेल्या संसद-प्रतिनिधींचे महत्त्व ओळखतो. तसेच व्यक्ती म्हणून मानवाच्या वैश्विक पातळीवर विचार करतो, हे होय. सारांश, सर्वसाधारणपणे व्यक्तिस्वातंत्र्याच्या निमित्ताने मिल मानवी हक्कांचा विचार करताना दिसतो. या अर्थाने जे. एस. मिल हा मानवतावादी आणि म्हणून उदारमतवादी विचारवंत आहे. अंतिमत: ब्रिटिश तत्त्वज्ञान, जॉन स्टुअर्ट मिलला उदारमतवादाचा प्रणेता, प्रमुख पुरस्कर्ता म्हणून ओळखले जाते.

### १.२.१२ मिलचे समाजवादाविषयीचे विचार :

व्यक्तिस्वातंत्र्यवादी व उदारमतवादी जॉन स्टुअर्ट मिल आपल्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात समाजाकडे वळला, असे दिसते. त्याच्या उदारमतवादात आणि प्रातिनिधिक शासनाच्या विचारात समाजवादाची काही बीजे सहज दिसून येतात. मिलने आपल्या 'Political Economy' (1848) या ग्रंथात समाजवादाविषयी विचार मांडले ओत. मिलच्या अखेरच्या काळात इंग्लंडच्या राजकीय व्यवहारात व्यक्तिस्वातंत्र्याची परिणती आर्थिक व्यक्तिवादात झाली. तसेच बहुसंख्याकांची सत्ता या लोकशाही विचाराची परिणती राजकीय समूहवादात झाली. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात व्यक्तिस्वातंत्र्य व सामाजिक आणि आर्थि न्याय यांच्या समन्वयातून समाजवादी विचारसरणीचा उदय होत असल्याची चिन्हे दिसू लागली. मिलने स्वत: त्या समन्वयवादी विचाराला चालना दिल्यामुळे त्याचा उदारमतवादी विचार समाजवादी विचारांकडे झुकू लागला. मिलमध्ये हे वैचारिक परिवर्तन होण्याची कारण तात्त्विक नसून तो संसद सदस्य असताना त्याचा समाजवादी व्यक्तींशी आलेल्या संबंधात शोधावी लागतात. मिल आयुष्याच्या उत्तरार्धात तीन वर्षे (१८६५-६८) ब्रिटिश संसदेच्या हाऊस ऑफ कॉमन्स या कनिष्ठ सभागृहाचा प्रतिनिधी होता. त्यादरम्यान त्याचा अनेक निष्णात कामगार व त्यांच्या नेत्यांशी घनिष्ठ संबंध आला. त्यावेळी इंग्लंडमध्ये रॉबर्ट ओवेन, चार्लस फेरयर, सेंट सायमन इत्यादी समाजवादी विचारवंतांचा मोठा प्रभाव होता. त्यांच्याशी मिलचा संबंध आला. याशिवाय तत्कालीन कामगारांच्या प्रश्नांमुळे अर्थशास्त्रीय विचार करणारा मिल इतका प्रभावित झाला की पुढे लवकरच स्थान झालेल्या मजूर पक्षाचा तो बौद्धिक नेता बनला. आयुष्याच्या याच टप्प्यावर मिलचे विचार समाजवादाला पोषक ठरू लागले. बुद्धिवादी व विज्ञानवादी मिल समाजवादी विचारांकडे आकर्षित झाला. मात्र त्याने समाजवादी विचारांची कसून शहानिशा करत तो व्यक्तिवाद, उपयुक्ततावाद आणि उदारमतवदाशी कितपत निगडीत आहे, हे तपासून पाहिले आणि त्यानंतरच तो समाजवादी तत्त्वज्ञानाकडे वळला.

तत्कालीन इंग्लंडमध्ये उपयुक्ततावादी व भांडवलवादी तत्त्वज्ञानांच्या वाढत्या प्रभावामुळे कमीत कमी कष्टात अधिकाधिक सुख तसेच खाजगी मालमत्तेच्या साहाय्याने हवे ते भौतिक सुख मिळण्याची शक्यता बळावली होती. यामुळे कामगारांच्या हक्कांकडे मोठे दुर्लक्ष होत होते. मिलला मात्र क्षमतेच्या तत्त्वाच्या ओढीमुळे कामगारांचे हितसंबंध जोपासले जावेत, असे मनापासून वाटत होते. परंतु कोणाच्याही हितसंबंधांना धक्का न लावता कामगारांच्या हितसंबंधधाचे रक्षण कसे करावे, हा प्रश्न त्या परिस्थितीत मिलला पडला होता. त्याचा व्यक्तिगत खाजगी मालमत्तेस विरोध नव्हता. त्यामुळे तो संपूर्ण समाजवादी विचारक होणे शक्य नव्हते. त्याला ब्रिटिश समाजाची समाजवादाच्या आधारावर पुनर्रचना कशी करता येईल, याचा मार्ग शोधावयाचा होता. त्याचे समाजाची समाजवादी पुनर्रचना (Socialist Pattern of Society) या विचाराकडे सतत लक्ष असे. भांडवलशाही व्यवस्था नष्ट न करताही समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करता येणे शक्य असल्याचा विश्वास मिलला वाटत होता. राष्ट्रीय संपत्तीचे पुनर्वितरण करून मजूरांना आणि कामगारांना खासगी संपत्तीचे वाटप न करता, त्याऐवजी कामगारांना त्यांचे आर्थिक हक्क मिळवून देण्याचा मार्ग म्हणून भांडवलशाही आणि लोकशाही

यांना विशेष बाधा न आणता समाजवादाची निर्मिती कशी करता येईल, असा प्रश्न मिल पुढे होतता. त्याच्या या विचाराला उपरोधाने 'भांडवलशाही समाजवाद' असेही म्हटले जाते.

मिल समाजाची समाजवादी पुनर्रचना करण्याचा मार्ग म्हणून खासगी मालमता नष्ट न करता वारसाहक्कावर नियंत्रण घालणे, सहकारी तत्त्वाचा प्रसार करणे, वैयक्तिक मालकीच्या शेती व्यवसायाला सबसिडी देणे इत्यादी उपाय सुचवितो. एकंदरीत मिलला भांडवलशाहीचे दोष नाहीसे करून समाजवादाच्या आधारावर समाजाची पुनर्रचना करता येईल, असा विश्वास वाटत होता. मिलच्या विचारप्रक्रियेचे एक वैशिष्ट्य असे की, तो सामाजिक-आर्थिक परिस्थितीला मूलगामी वळण न देता परिवर्तनाचा विचार करतो. समाजाला बौद्धिक व नैतिक अधिष्ठानाची गरज असते, असे तो सुरवातीपासूनच सांगत असे, कारण बौद्धिक आणि नैतिक विचारात समाजात फारशी उलथापालथ न करता परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता असते, असे मत मिलने उचलून धरल्यामुळे त्याचे समाजवादी विचार हे 'फेबियन समाजवाद' किंवा लोकशाही समाजवाद यांचे समर्थन करणारे ठरेल, असे म्हणता येईल.

जे. एस. मिल व्यक्तिस्वातंत्र्यवादी आणि उपयुक्ततावादी विचारवंत असल्यामुळे त्याने व्यक्तिगत खासगी संपत्तीचे समर्थन केले आहे. मात्र तो या संपत्तीच्या अधिकाराकडे समतेच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून पाहतो. त्याच्या मते, एखाद्याने वैयक्तिक मालमत्ता स्वकष्टाने मिळवलेली असले तर ती बाळगण्याचा आणि त्यातून स्वत:ची प्रगती करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला असतो. कारण व्यक्तीच्या प्रगतीसाठी खासगी मालमत्ता आवश्यक असल्याचे मिल मानतो. त्याच्या मते, खासगी मालमत्ता नष्ट न करता वारसाहक्कावर नियंत्रण घालावे. मिलने खासगी मालमत्तेचे समर्थन केले असले तरी संपत्तीचा अधिकार हा एकमेव पवित्र अधिकार ठरत नाही, असेही तो म्हणतो. खासगी संपत्तीच्या अधिकारातून श्रीमंत अधिक श्रीमंत होणार नाहीत, सामाजिक विषमता निर्माण होणार नाही, याची काळजी व्यक्तीने आणि समाजाने घेतली पाहिजे, असे मिल सुचविते.

जे. एस. मिल शेती व कारखानदारी यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची वाटणी योग्यरित्या व्हावी यासाठी उपाययोजना सुचवितो. मिल शेतजमिनीची वैयक्तिक खासगी मालकी मान्य करतो. वैयक्तिक मालकिच्या शेती व्यवसायाला सबसिडी देणे हा उपाय तो सुचवितो. खासगी मालकीच्या शेतजमिनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाबाबत तो असे म्हणतो की, ज्यांना श्रम न करता सहजासहजी जे उत्पन्न मिळते त्यावर शासनाने अधिकचे कर बसावेत. विनाश्रम जमीन मालकांना जो खंड (उत्पन्नातील वाटा) मिळतो त्यावर शासनाने जास्तीत जास्त कर अकारून त्यापासून मिळणारे वाढीव उत्पन्न (महसूल) सामाजिक-आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या कल्याणासाठी वापरून श्रीमंत आणि गरीब यांच्यातील सामाजिक विषमतेची दरी कमी करावी. शिवाय नैसर्गिक साधनसामग्री पासून मिळणाऱ्या उत्पन्नावर कर लादून आर्थिक विषमता कमी करावी इत्यादी समाजवादाच्या आधारावर समाजाची पुनर्रचना करण्याचे मार्ग, उपाययोजना मिल सुचवितो.

मिल कारखानदारीच्या संबंधात औद्योगिक पुनर्रचनेची आवश्यकता सांगनू त्यासाठीचे दोन मार्ग (उपाय)

सुचवितो. १) कारखानदारीत कामगारांना भागिदारे देणे, २) सामूहिक मालकीचे कारखाने स्थापन करणे व त्यांच्याच प्रतिनिधीद्वारे ते सहकारी तत्त्वावर चालविणे. यापैकी दुसरा मार्ग जो सहकारी तत्त्वाचा आहे, त्याचा तो पुरस्कार करतो. मिलच्या मते, उत्पादकांचे व ग्राहकांचे संघ स्थापन करावेत आणि सहकारी तत्त्वानुसार संपूर्ण अर्थव्यवस्था व आर्थिक व्यवहार उदारमतवादी विचार या गुणांची समाजात वाढ होईल. त्याच्या मते, कारखानदारीत व्यावसायिक, व्यापारी स्पर्धा असावी, मात्र ती जीवघेणी स्पर्धा नसावी. कारखानदारांनी मजुरांना श्रमताचा योगय मोबदला द्यावा. त्यांची पिळवणूक, शोषण करू नये. उलट कामगार वर्गाला उत्पादनाचा मालकीत आणि उत्पादन प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे. त्यामुळे आर्थिक समता प्रस्थापित होऊन समाजात न्याय्य व्यवस्था निर्माण होईल, यावर मिलचा विश्वास आहे.

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, मिल आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात समाजवादाकडे झुकल्यामुळे तो वास्तवाचे भाण ठेवून विचार करू लागला. आर्थिकदृष्अ्या विचार करताना श्रम करणारे आणि या श्रमिकांच्या कष्टावर श्रम न करता विनासायास श्रीमंत होणाऱ्या भांडवलदारांना तो विरोध करू लागला. तो आर्थिक केंद्रीकरणाला विरोध करू लागला. उत्पादन व्यवस्थेत कामगारांना महत्त्वाचे स्थान असते. या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे तो स्वत: मार्क्सवादी नसताना समर्थन करू लागला. संसदेत व संसदेबाहेर कामगारांचे प्रश्न, समस्या मांडून ते सोडवण्याचा आग्रह धरू लागला. कामगारांना समाजात मान, सन्मान व प्रतिष्ठा मिळावी, यासाठी प्रयत्न करू लागला. लोकशाहीचे समर्थन करीत करीत समाजवादाचे मत्त्वज्ञान मांडू लागाल. त्यातूनच 'लोकशाही समाजवाद' हे नवे तत्त्वज्ञान आकाराला आले.

जे. एस. मिल आणि कार्ल मार्क्स हे समकालीन विचारवंत होते. मिलच्या कालखंडात (१८०६-१८७३) आपले तत्त्वज्ञान मांडतो. त्याच कालखंडात (१८१८-१८८३) कार्ल मार्क्सने आपले तत्वज्ञान मांडले. मिलने आपले समाजवादी विचार १८४८ मध्ये प्रकाशित 'Political Economy' या ग्रंथामध्ये मांडले. त्याच वर्षी मार्क्सने साम्यवादाचा जाहीरनामा (Communist Manifesto 1848) प्रसिद्ध करून सर्वांचे लक्ष वेधले होते. वैचारिक क्षेत्रात एवढी मोठी घटना घडलेली असतानाही मिलने त्याच्या लिखाणात कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची दखल घेतली नाही. मात्र त्याचवेळी तो समाजवादी विचारवंत व लेखक म्हणून चार्ल्स फेरयर (Charles fourier), सेंट सायमन रॉबर्ट ओवेन इत्यादींचा उल्लेख करतो. मात्र कार्ल मार्क्सला मिलच्या लिखानाची माहिती होती. तसा त्याने ओझरता उल्लेखही केलेला आढळतो. मिलने आपल्या लिखाणात मार्क्सचा उल्लेख केला नसला तरी त्याने मार्क्सचे तत्त्वज्ञान अप्रत्यक्षरित्या अंगिकारले असावे, असे त्याच्या समाजवादी विचारांवरून स्पष्टपणे दिसून येते.

जे. एस. मलने समाजवादाचा सहनुभूतीपूर्वक विचार केला. मात्र तो समाजवादाचा प्रमुख पुरस्कर्ता बनला नाही. त्याचे समाजवादी विचार त्याच्या मृत्यूपश्चात इंग्लंडमध्ये प्रभावी ठरले. विशेषत: इंग्लंडमध्ये जी फेबिअन सोसायटी स्थापन झाली तिच्या विचारांवर मिलच्या समाजवादी विचारांचा मोठा प्रभाव पडला होता. विसाव्या शतकात मजूरपक्षाने जी समाजवादी चळवळ चालवली तिच्या वैचारिक बैठकीचा पाया मिलने घातला होता,

असे म्हणता येईल. असे असले तरी, जे. एस. मिल समाजवादी आहे की नाही? या प्रश्नावर अनेक मतमतांतरे आहेत. या अनुषंगाने मिल समाजवादी होता का? या प्रश्नाचे उत्तर देताना आपण कोणत्या समाजवादी विचारवंतांच्या दृष्टिकोणातून मिलकडे पाहतो, यावर सर्व काही अवलंबून आहे. एऱ्हवी मिल हा समाजवादी होता आणि नव्हताही असे व्यामिश्र उत्तर द्यावे लागेल. सारांश, उपयुक्ततावाद आणि मार्क्सचा समाजवाद या परस्परविरोधी तत्त्वज्ञान उदयास आलेल्या आलेल्या काळात मिल या दोन्ही तत्त्वज्ञाची भूमिका मान्य करतो. शेवटी भांडवलशाही की समाजवाद याची निवड करण्याचे स्वातंत्र्य भावी पिढ्यांवर सोपविले पाहिजे, असे मिल म्हणतो.

### १.२.१३ मिलचे स्त्रीविषयक विचार :

जॉन स्टुअर्ट मिल स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता व स्त्री-पुरुष समानता यांचा पाठीराखा आहे. त्याने आपल्या 'On Liberty' ग्रंथात व्यक्तिस्वात्र्यांची संकल्पना स्पष्ट केली आहे. त्याचबरोबर 'The Subjection of Women' ग्रंथात त्याने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व स्पष्टपणे व निर्भिडपणे मांडले आहे. मिलच्या काळात इंग्लंडमध्ये मतदानाचा हक्क विस्तारित झाला होता. तरीही स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला नव्हता. अर्थातच मिलचे व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानता हे विचार इंग्लंडमधील सुशिक्षित मध्यमवर्गीय वर्तुळात उचलून धरले गेले. आपले व्यक्तिस्वातंत्र्याबाबतचे विचार मांडताना स्वत३ मिलने व्यक्तिस्वातंत्र्यात स्त्री-पुरुष हा लिंगभेद न करता व्यक्ती म्हणून त्यांच्याकडे समान दृष्टीने पाहिले. मिल व्यक्तिस्वातंत्र्यवादी, उदारमतवादी, उपयुक्ततावादी, सुधारणावादी, लोकशाहीवादी आणि समाजवादी असल्यामुळे त्याने स्त्रियांच्याबाबतीत न्याय्य दृष्टिकोण स्वीकारला. स्त्री विषयीची मिलची मते उदारस्वरूपाची होती. पत्नी श्रीमती हेरिएट टेलर यांच्या सहवासाचा तो परिणाम असावा. मिलवर मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रभाव हेरिएट टेलरच्या सहवासामुळेच झाला. श्रीमती टेलर मिलप्रमाणेच कुशाग्र व तेजबुद्धिची होती. त्या दोहोंत विविध विषयावर उच्च व बौद्धिक पातळीवरील चर्चा होत असे. श्रीमती टेलर विचारवंत आणि साहित्यिक होती. तिच्या प्रेरणेने मिलने लेखन केले. अर्थातच श्रीमती टेलरच्या दीर्घ सहवासामुळे (१८३०-१८५८) मिलला स्त्री-पुरुष यांच्यात केवळ जीवशास्त्रीय (Biological) भेद, फरक असून इतर सर्व बाबतीत स्त्री-पुरुष समान आहेत, याची प्रचिती आली असावी.

व्यक्तिस्वातंत्र्यवादी मिल स्त्री किंवा पुरुष यांचा केवळ व्यक्ती म्हणून विचार करतो. मानवी घटक म्हणून स्त्री व पुरुष या दोघांकडे समानतेने पाहण्याची दृष्टी सर्वांनी जोपासली पाहिजे, असा मिल आग्रह धरतो. वास्तविक मिलच्या आधी कोणत्याही विचारवंताने स्त्री-पुरुष समानतेचा व्यक्ती म्हणून विचार केला नसल्याचे दिसून येते. समाजाच्या या पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनामुळे मानवताजातीचे मोठे नुकसान झाले, याची मिलने आपल्या 'The Subjection of women (1869)' ग्रंथाततून चिकित्सा केली. या ग्रंथात स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय दर्जा व हक्काविषयी सविस्तर चिकित्स केली आणि स्त्रियांच्या राजकीय हक्कासंबंधी आणि राजकीय सहभागाविषयी जोरदार समर्थन केले. राजकारणात स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी त्यांना राजकीय हक्क देण्यात यावेत, असे मिल सुचवितो.

मिलने स्त्रियांना मताधिकारासह इतर राजकीय अधिकार (उदा. प्रतिनिधित्वाचा हक्क) मिळाले पाहिजेत याचे संसदेत आणि संसदेबाहेर जोरदार समर्थन केले. लिंगभेदावर आधारित ती केवळ स्त्री म्हणून तिला अधिकार नाकारणे मिलला मान्य नव्हते. मिल म्हणतो, स्त्रियांना गुलामगिरीत ठेवू नये. स्त्रियांना स्वातंत्र्य दिले नाही, त्यांना सतत डावलले गेले, तर समाजाचा विकास होणार नाही. कारण पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचीही संख्या समाजात आहे. म्हणून लोकशाहीच्या यशासाठी व समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रियांना पुरुशांच्या बरोबरीने सर्वप्रकारचे हक्क, अधिकार मिळाले पाहिजे. मिल स्त्रियांना मतदानाचा अधिकार द्यावा, असा आग्रह धरतो. राज्यात स्त्रियांची अर्धी संख्या असते. ततेव्हा स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाकारणे म्हणजे अर्धी लोकसंख्या राजकीय अधिकारापासून वंचित ठेवण्यासारखे होईल. खऱ्या लोकशहीत हा अन्याय दूर झाला पाहिजे आणि स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा, ही त्याची ठाम भूमिका होती. स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांना मतदानाचा अधिकार देणे अधिक योग्य ठरते.

थोडक्यात, स्त्रियांना मतदानाचा अधिकार देऊन त्यांचा राजकीय सहभाग वाढवावा, त्यांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळावी, अशी मिल भूमिका घेतो. आज सर्वत्र स्त्री मताधिकार मान्य केला आहे. तसेच स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढून स्त्रीप्रतिनिधित्वाचे प्रमाणदेखील वाढले आहे.

जे. एस. मिलला स्त्रियांच्या राजकीय अधकिाराबरोबरच त्यांच्या सामाजिक दर्जा व अधिकाराविषयी मोठी अस्था होती. मिलच्या काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा अत्यंत गौण प्रतीचा होता. शिक्षण, कायदा, उद्योग-व्यवसाय, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक जीवन इत्यादी क्षेत्रात स्त्रियांना पूर्णपणे प्रतिबंध होता. स्त्रियांचे क्षेत्र घर आणि मुलं यांच्यापुरते मर्यादित करून त्यांच्या इतर सर्व क्षमतांचा नाश करण्यात आला. त्यामुळे मानवजातीचे अपरिमित नुकसान झाले आहे. मिलने या विषयाला वाचा फोडून स्त्री-पुरुष समानतेचा मार्ग मोकळा केला. स्त्रियांना किमान शिक्षण, नोकरी, मतदानाचा हक्क देऊन पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले पाहिजे, असा मिलचा आग्रह होता. समाजातील पुरुषप्रधानता कमी करण्यासाठी स्त्री-स्वातंत्र्य आणि महिला सक्षमीकरण हाच खरा उपाय आहे, अशी मिलची ठाम भूमिका होती.

सामान्यत: जगातील सर्व समाजव्यवस्थांमध्ये काही ना काही कारणांमुळे स्त्रियांना दुय्यम दर्जा व वागणूक दिली गेल्याचे दिसते. पुरुषांपेक्षा स्त्रिया या शारीरिकदृष्ट्या दुर्बल वा कमकुवत असतात, तसेच त्यांची बौद्धिक क्षमतादेखील पुरुषांपेक्षा कमी असते, असा स्त्रियांबाबतीत पूर्वग्रहदूषित दृष्टिकोण सर्वत्र दिसून येतो. मिलला मात्र स्त्रियांवरील या आक्षेपामध्ये काहीही तथ्य नसल्याचे दिसून आले. त्याने आपल्या 'The subjection of Women' ग्रंथात हे आक्षेप खोडून काढण्याचा तर्कशुद्ध पद्धतीने प्रयत्न केला. स्त्रियांवर होणाऱ्या या आक्षेपांचे खंडन करताना मिल म्हणतो, ''शतकानुशतके पारतंत्र्यात किंवा पुरुषांच्या धाकात वागवले गेल्यामुळे स्त्रिया मानसिक आणि बौद्धिक बाबतीत पुरुषांपेक्षा कमी सक्षम वाटतात. परंतु त्यांना पुरुषांबरोबर सर्व प्रकारच्या संधी मिळाल्या तर हा वरवरचा फरक दूर होऊन शारीरिक क्षमता व बौद्धिक पातळी याबाबतीत पुरुषांच्या बरोबरीने स्त्राया सिद्ध होतील, यात शंका नाही. त्यासाठी सर्वांत प्रथम स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. त्या खालोखाल त्यांना समाजात स्वतंत्रपणे वागण्याची मोकळीक असली पाहिजे. स्त्री-स्वातंत्र्याचा

काही काळ गेला तर स्त्रियांवर लादलेला वरील आरोप दूर व्हायला वेळ लागणार नाही. सारांश, स्त्री-पुरुषांत बौद्धिक स्वरूपाचे भेद नाहीत, स्त्रिया सर्व बाबतीत सक्षम असून त्यांना समान दर्जा व संधी मिळाली. तर त्या पुरुषांच्या बरोबरीने सर्व क्षेत्रात आपली योग्यता व क्षमता सिद्ध करून दाखवतील, असा मिलला विश्वास आहे.

जन्मापासून ते मृत्यूपर्यंत कुटुबापासून ते सर्व सामाजिक स्तरांवर स्त्रियांचे स्थान दुय्यम असल्याचे त्यांच्या मनावर सतत बिंबवले जाते. विवाहासारखा वैयक्तिक आणि खासगी विषयाच्या बाबतीतही स्त्रियांना स्वतंत्र मत नसते. कुटुंब आणि समाजाची बंधने असतात. स्त्री-पुरुष शारीरिक संबंधांबाबतीत स्त्रीला ती एक उपभोग्य वस्तू आहे, यापलिकडे स्थान दिले जात नाही. स्त्रियांच्या मातृत्वाचा बऱ्याचदा अनादर केला जातो. मिल म्हणतो, याबाबतीत स्त्रियांचा दर्जा गुलामापेक्षाही दुय्यम असल्याचे दिसते. एकवेळ गुलाम स्त्री आपल्या मालकाला शारीरिक संबंधापासून दूर ठेवू शकते; परंतु विवाहित स्त्रीला तसे कण्याचा अधिकार नाही.

वरीलप्रमाणे जे. एस. मिलने स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समता यावर सविस्तर भाष्य केल्याचे दिसते. आपल्या चिंतन आणि संशोधनाच्या बळावर तो म्हणतो की, जर स्त्रियांना शिक्षण दिले, घराबाहेर जाऊन नोकरी अथवा व्यवसाय करू दिला किंवा स्त्रियांना मतदानासारखा राजकीय हक्क दिला, विवाह करण्योच स्वातंत्र्य दिले, तसेच कुटुंब व सामाजिक बंधनातून मोकळीक मिळाली तर स्त्री अल्पावधितच पुरुषांच्या बरोबरीची वाटून तिचा दर्जा पुरुषांशी समानतेचा होईल, हे निश्चित. वास्तविक असे घडले तर कोणत्याही समाजाची शारीरिक व बौद्धिक क्षमता द्विगुणित झाल्याशिवाय राहणार नाही. तो समाज अधिकाधिक विकसित होत जाईल व स्वातंत्र्य व समतेवर आधारित नवीन समाज व्यवस्था अस्तित्वात येईल, अशी मिलची धारणा आहे.

सारांश, जे. एस. मिल स्त्री किंवा पुरुष यांचा केवळ व्यक्ती म्हणून विचार करतो व स्त्री-पुरुष यांच्याकडे समतेच्या दृष्टिकोणातून पाहतो. 'स्त्री व पुरुषांमध्ये केवळ जीवशास्त्रीय (Biological) भेद आहेत अन्यथा शारीरिक व कार्यक्षमता व बौद्धिक क्षमता याबाबतीत दोघे समान असतात. म्हणून समाजाने स्त्रीयांकडे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोणातून न पाहता समानतेच्या व न्याच्या दृष्टिने पाहावे असे मिल म्हणतो. स्त्रीयांच्या विकासासाठी स्त्री-स्वातंत्र्य व स्त्री-पुरुष समानता असावी, स्त्रीयांचे विविध प्रश्न (विवाह, घटस्फोट, वारसाहक,क पोटगी इ.) सोडविण्यासाठी त्यांना मताधिकार द्यावा व शासनात प्रतिनिधित्व द्यावे, याचे मिलने संसदेत व संसदेच्या बाहेर भाषणातून, लिखाणातून जोरदार समर्थन केले. स्त्रीयांना राजकारणात सहभागी करून घेतले नाही तर त्यांच्या स्वातंत्र्याची गळचेपी होऊन विकास थांबेल, असे मिल म्हणतो. मिलचे हे विचार तत्कालीन इंग्लंडमधील सुशिक्षित मध्यमवर्गीयांनी उचलून धरले. मिलने त्याच्या काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व अधिकार व स्वातंत्र्य मिळावे, असे वातावरण तयार केले. तेथूनच ब्रिटनमध्ये स्त्रीमुक्ती आंदोलनाला बळ व धार आली. या स्त्रीमुक्ती चळवळीने राजकीय अधिकाराची मागणी केली. स्त्रियांना मतदानाचा व शासनात प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार मिळावा, ही स्त्रीमुक्ती चळवळीची प्रमुख मागणी

होती. याचा परिणाम म्हणून पुढे १९१८ साली ब्रिटिश संसदेने स्त्रियांना मताधिकार देणारा कायदा संमत केला. पुढे इंग्लंडसह इतर राष्ट्रात स्त्रियांना राजकीय हक्क मिळाले. आज सर्वत्र स्त्री मताधिकार मान्य केल्याने त्यांचा रजाकीय सहभाग वाढून शासनातील प्रतिनिधित्वाचे प्रमाणदेखील वाढले आहे. त्याचे श्रेय मिलला देणे श्रेयस्कर ठरेल. एकंदरीत स्त्रीयांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य, समता, न्याय व दर्जा मिळवून देण्यासाठी मिलने मांडलेले विचार भविष्यकाळात स्त्रीमुक्ती लढ्यांसाठी प्रेरक व उपयुक्त ठरलेले दिसतात. मिलची ही देणगी आजही विसतार येत नाही. म्हणून राजकीय इतिहासात जे. एस. मिलचा उल्लेख प्लेटोप्रमाणे स्त्रियांचा कैवारी म्हणून केला जातो.

### १.२.१४ मिलचे राजकीय विचारांचे मूल्यमापन :

ब्रिटिश विचारवंत उदारमतवादाचा प्रणेता, जॉन स्टुअर्ट मिल याचे स्थान आधुनिक राजकीय विचारवंतांच्या श्रेणीत अत्यंत उच्च प्रतीचे व श्रेष्ठ दर्जाचे मानले जाते. त्याने आपल्या विविध ग्रंथामधून उपयुक्ततावाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, प्रातिनिधिक शासन, लोकशाही, उदारमतवाद, समाजवाद व स्त्री-पुरुष समता इत्यादी विषयांबाबत सखोल अभ्यास करून महत्त्वपूर्ण व उपयुक्त असे विचार मांडले आहेत, असे असले तरी प्रत्येक विचारवंताच्या विचारात काही दोष असतात, त्याला मिलही अपवाद नाही. त्याच्या प्रत्येक राजकीय विचारांवर काही प्रमाणात टीका झाल्याचे आक्षेप घेतल्याचे दिसून येते, ते पुढीलप्रमाणे -

१) जे. एस. मिलच्या स्वातंत्र्याविषयी विचारांवर घेतला जाणारा आक्षेप म्हणजे, तो व्यक्तिस्वातंत्र्याचे समथन करतो, मात्र व्यक्तीच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करतो. तो व्यक्तीच्या विकासासाठी पूर्ण स्वातंत्र्य असावे, असे म्हणतो. त्यावर राज्याने कोणतेही बंधने घालू नयेत. परंतु नियंत्रणाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य ही त्याची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना भ्रामक वाटते. कारण स्वातंत्र्यावर नियंत्रण नसेल, ते अनिर्बंध असेल तर कोणालाच आपले स्वातंत्र्य योग्यरित्या उपभोगता येणार नाही. असे अनिर्बंध स्वातंत्र्य व्यक्ती व समाजहितासाठी हानिकारक असते. याशिवाय व्यक्तीच्या स्वातंत्र्य देताना तो तिच्या कर्तव्याचा विचार करत नाही. वास्तविक व्यक्तीने आपल्या हक्कांबरोबर कर्तव्यांचेही पालन केले पाहिजे. जेव्हा व्यक्तीकडून कर्तव्याचे पालन होत नाही, तेव्हा राज्याने तिच्यावर बधंने घालायला हवेत. परंतु मिल केवळ व्यक्तिस्वातंत्र्याचाच विचार कातो, पण व्यक्तीच्या कर्तव्यपालनाकउे दुर्लक्ष करतो. म्हणूनच अर्नेस्ट बार्कर म्हणतो, ''मिल हा पोकळ स्वातंत्र्य आणि अर्मूत व्यक्तिवाद यांचा पुरस्कार करणारा विचारवंत होता.''

२) मिलच्या विचारावरील दुसरी टीका म्हणजे, मिलने कार्यस्वातंत्र्याचे स्वसंबंधी व परसंबंधी कार्यात विभागणी केली, ती अनावश्यक व असंभवनीय आहे. स्वसंबंधी कार्यावर राज्याने नियंत्रण घालू नये, असे मिल सुचवितो. याबाबतीत अनिर्बंध स्वातंत्र्य असावे, असे तो म्हणतो. परंतु व्यक्तीच्या प्रत्येक कार्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष बरावाईट परिणाम समाजावर होत असतो. उदा. दारू पिणे, अमली पदार्थांचे सेवन करणे इ. हे वैयक्तिक कार्य आहेत. परंतु दारू पिल्याने व्यक्तीला नशा, झिंग आल्यामुळे ती व्यक्ती मारामारी, चोरी, दरोडा, खून, बलात्कार यासारखे अनैतिक कार्य करते. त्याच्या अशा कार्याचा समाजावर वाईट परिणाम होतो. कुटुंब व मुलांवर वाईट परिणाम होतो. व्यक्ती समाजप्रिय असते व समाजातच विकसित होऊ शकते. त्यामुळे

व्यक्तिच्या अनिर्बंध स्वातंत्र्यावर, तिच्या अनैतिक व वाईट कृत्यांवर राज्याची बंधने आवश्यक असतात. तेव्हा कार्यस्वातंत्र्याची स्वसंबंधी व परसंबंधी कार्य अशी वर्गवारी करणे, व्यावहारिकदृष्ट्या अनावश्यक व असंभवनीय आहे, अशी मिलच्या विचारावर टीका होते.

३) मिल व्यक्ती विकासासाठी संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. त्यात राज्य व समाजाचा हस्तक्षेप नाकारतो. हे खरे आहे की, राज्याकडून जेव्हा जेव्हा व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप केला जातो तेव्हा तेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो. व्यक्तिचा विकास खुंटतो. मात्र काही गोष्टींसाठी राज्याने व्यक्तिस्वातंत्र्यात हस्तक्षेप करणे आवश्यक आहे, असे म्हणताना मिल राज्याच्या हस्तक्षेपाची भलावण करतो. तो एका बाजूने व्यक्तीला स्वातंत्र्य देतो व दुसऱ्या बाजूने काढून घेतो. अशावेळी त्याच्या विचारातील परस्परविरोध वा विसंगती स्पष्ट दिसून येते. त्याचप्रमाणे एकीकडे मिल खासगी मालमत्तेच्या तत्त्वावर आधारलेल्या भांडवलशाहीचा पुरस्कार करताना दिसतो, तर दुसरीकडे समाजवादी विचारसरणीकडे झुकलेला मिल सामूहिक मालमत्तेच्या तत्त्वातील गूढ शोधू पाहतो. तसेच एकीकडे आर्थिक स्वातंत्र्यास प्रधान देणारा मिल दुसरीकडे सामाजिक समतेचा विचार मांडतो. एकंदरीत मिलच्या रजाकीय विचारत सुसंगतपणा आढळत नाही, अशी टिका केली जाते.

४) मिलच्या राजकीय विचारावरील आणखी एक आक्षेप म्हणजे त्याने 'स्वातंत्र्याविषयी' (On Liberty) या ग्रंथात जसे व्यक्तीस्वातंत्र्याचे समर्थन केले आहे, तसे 'प्रातिनिधिक शासन' (On Representative Government) या त्याच्या ग्रंथात तो करू शकला नाही. लोकशाही व्यवस्था राबविण्यासाठी सामान्य माणसाच्या अंगी असलेल्या कुवतीविषयी तो साशंक असल्याचे दिसते. त्या विचाराच्या बाबतीत तो लोकांचे शासन म्हणजे लोकशाही असे मानण्यापेक्षा श्रेष्ठीजणांचे शासन म्हणजेच खरी लोकशाही असे मानू लागला होता की काय असे वाटावे, इतपत त्यात विसंगती दिसून येते. मिलच्या या दुःखी विचारांवर देखील कठोर टिका झाली आहे.

५) मिलच्या लोकशाही विचारात समानतेच्या तत्त्वाचा अभाव दिसून येतो. कारण त्याच्या लोकशाही विचारात व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. परंतु अल्पवयिन मुले, अपंग, मतिमंद आणि सामाजिक-आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या घटकांना तो व्यक्तिस्वांतत्र्याची व राजकीय सहभागाची संधी नाकारतो त्याला मतदानाचा अधिकार देत नाही. अशा घटकांकडे स्वातंत्र्य उपभोगण्यासठी क्षमता नसते, असे तो कारण देतो. तो केवळ सुशिक्षित व भांडवलदारांना राजकयी अधिकार देतो. त्याचप्रमाणे मिल समाजवादाचा पुरस्कार करताना भांडवलदार, जमीनदार यांच्या व्यक्तिगत खासगी संपत्तीच्या मालकीला मान्यता देऊन व्यापारी स्पर्धेचा पुरस्कार करतो आणि अशा स्पर्धात्मक व्यवस्थेतून कामगारांचे कल्याण, हित साधण्याचा प्रयत्न करताना दिसतो. परंतु अशा परस्पर विसंगत विचारसणीतून मिलचा आर्थिक समाजवाद कसा प्रस्थापित होणार, हा मुख्य प्रश्न आहे.

६) मिल कारखानदारीत सहकारी तत्त्वांचा स्वीकार करून मजूरवर्गाला भागिदार करून द्यावे आणि

समाजवाद प्रस्थापित करावा, असे सुचवितो. परंतु हा विचार प्रत्यक्षात कसा अस्तित्वात येणार याविषयीचे समर्पक मार्गदर्शन तो करत नाही. त्यामुळे आर्थिक विषमता कमी करण्याचा मिलचा विचार अपूर्ण वाटतो.

७) मिल संसद प्रतिनिधिंना मानधन देऊ नये, अशी अव्यवहार्य सूचना करतो. आज प्रतिनिधिंना मानधन, भत्ते देखील ते जनतेसाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्यास कुचराई करतात. तेथे मानधन न घेता सेवाभावी वृत्तीने संसद प्रतिनिधिने काम करावे, ही मिलची सूचना आजच्या संदर्भात अव्यवहार्य वाटते. तो स्वत: संसद प्रतिनिधी असताना या सूचनेचे पालन केले नाही.

८) मिल खुल्या मतदान पद्धतीचे समर्थन करतो. विजयी व पराभूत उमेदवारांमध्ये प्रतिशोधाची भावना वाढीस लागेल. समाजात दोन गट पडून संघर्ष वाढेल. मतदनाची टक्केवारी कमी होईल. म्हणून मिलची खुल्या मतदान पद्धतीची सुचना स्वीकारता येत नाही. मिल सुशिक्षितांना एकापेक्षा अधिक मते देण्याचा अधिकार सुचवितो. परंतु यामुळे मतदानातील गुंतागुंत वाढेल, मते मिळवण्यासाठी सौदेबाजी होईल, सुशिक्षित अल्पसंख्यांकांचे बहुसंख्यांक अशिक्षितांवर अन्याय होईल. म्हणून शिक्षितांना अनेक मते देण्याची मिलची सूचना अव्यवहार्य वाटते.

९) मिलच्या राजकीय विचारांवर आणखी एक असा आक्षेप घेतला जातो की, त्याने स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानता यांना अवास्तव महत्त्व दिले. त्याबाबतीत असेही म्हटले जाते की, श्रीमती हेरिएट टेलर या उच्चभ्रू स्त्रीश मैत्रीचे संबंध असल्यामुळे स्त्री-पुरुष समानतेच्या अवास्तव कल्पनांच्या आहारी मिल गेला असावा.

१०) मिल आणि मार्क्स हे साधारणत: समवयस्क आणि समकालीन असून त्यांच्या विचारांचा परस्परांवर काही परिणाम झाला होता का किंवा मार्क्सच्या प्रभावामुळे मिल समाजवादाकडे झुकला होता का, हे सुस्पष्ट सांगता येत नाही.

वरीलप्रमाणे जे. एस. मिलच्या राजकीय विचारांवर टीका होत असली किंवा आक्षेप घेण्यात येत असले तरी आधुनिक राजकीय विचारात मिलच्या राजकीय विचारांनी मोलाची भर टाकली आहे. त्याचे महत्त्व व योगदान नाकारता येत नाही. मिलने उपयुक्ततावादी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी, उदारमतवादी आणि लोकशाहीवादी विचारांमध्ये मोलाचे योगदान देऊन ते विचार पुढे नेण्याचे काम केले. धार्मिक आणि श्रद्धेचे स्वातंत्र्य, सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य मुक्त अर्थव्यवस्था, घटनात्मक शासन, शासनाची लोकांशी असलेली बांधिलकी, स्त्री-पुरुष समानता, शिक्षणाला महत्त्व इत्यादी मिलचे विचार हे लोकशाही आणि समाजवादाला स्वतंत्रपणे व लोकशाही समाजवादाला संयुक्तपणे उपयुक्त ठरले आहेत. याबाबतीत दुमत नाही. स्त्री-स्वातंत्र्याचा चळवळीला प्रोत्साहन देणारा, संततिविषयीचे महत्त्व सांगणारा आणि शिक्षण प्रसाराला चालना देणारा मिल हा युगप्रवर्तक विचारवंत होता. थोडक्यात, १९ व्या शतकात उपयुक्ततावाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, उदारमतवाद, मानवतावाद यांचा पुरस्कार करणारा मिल हा विचारवंत आजच्या पुरोगामी चळवळींचा स्फूर्तिदाता व मार्गदर्शक बनला आहे.

## ३.३ सारांश :

ब्रिटिश तत्त्वज्ञान, उदारमतवादाचा प्रणेता जॉन स्टुअर्ट मिल याच्या राजकीय विचारांचे या घटकात सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. त्यामध्ये बेथँमच्या उपयुक्ततावादातील कमतरता दूर करून त्यात मिलने महत्त्वाची भर घातली. बेंथॅम सर्व सुखे समान मानतो. मिलच्या मते, सुखा-सुखामध्ये नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ व कनिष्ठ असा फरक करणे शक्य आहे. त्याचप्रमाणे सुख कशामुळे हो हे ही महत्त्वाचे आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या बाबतीत मिल म्हणतो, व्यक्तीच्या जीवनाच्या स्वसंबंधी असलेल्या क्षेत्रात त्याला पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे. यामध्ये विचार व अभिव्यक्ती, संघटना, व्यवसाय, धर्म आदी स्वातंत्र्याचा समावेश होतो. यातील विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मिलने जास्त भर दिला आहे. तो म्हणतो, ''समाजमान्य मतापेक्षा एका व्यक्तीचे मत भिन्न असले तरी त्यास ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावे. कारण भिन्न-भिन्न विचारातून सत्य काय आहे ते समजते.'' मिलने राज्याप्रमाणे समाजाकडून व्यक्तिजीवनावर येणाऱ्या बंधनाकडे लक्ष वेधले आहे. तो राज्यापेक्षा समाजाची बंधने अधिक जाचक व जुलमी असतात असे म्हणतो. त्याचप्रमाणे स्त्री-स्वातंत्र्य व लिंगभेदविरहीत स्त्री-पुरुश समानता यावर भर देत, स्त्रियांना राजकीय अधिकार मिळावेत याचे समर्थन केले. राज्य वा शासनसंस्थेच्या कार्यक्षेत्रासंबंधी मिल म्हणतो, व्यक्तिगत जीवनात शासनाच्या सततच्या हस्तक्षेपाने व्यक्तीस दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची सवय लागते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास खुंटतो. अधिसत्तावादी शासनामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा ऱ्हास होतो. अशा प्रकारे मिलने व्यक्तिस्वातंत्र्यात शासन हस्तक्षेपास काही कारणावरून विरोध केला असला तरी मिलचा व्यक्तिस्वातंत्र्यात व्यापक समाजहितासाठी हस्तक्षेपवादी शासनास पाठिंबा होता. बेरोजगार-बेकारांना संरक्षण देणे, मोठे उद्योगधंदे सुरू करणे, कारखान्यात कामगारांना भागिदारी देणे, सामूहिक मालकीचे कारखाने स्थापन करून त्यांच्याच प्रतिनिधींकडून सहकार्याच्या (सहकारी) तत्त्वावर ते चालविणे. जमिनदारांचय उत्पन्नावर व वडिलोपार्जित संपत्तीवर बंधने आणावीत असे म्हणत मिलने आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात समाजवादासही पाठिंबा दिला होता, असे दिसते. म्हणूनच जे. एस. मिलला आधुनिक उदारमतवादाचा प्रणेता मानले जाते. कारण आधुनिक उदारमतवादाने हस्तक्षेपवादी शासनास पाठिंबा दिला होता. मिलने प्रातिनिधिक शासनाचा पुरस्कार केला होता. परंतु त्यातील बहुमताच्या हुकुमशाहीचा धोका स्पष्ट करून संसदेमध्ये अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व देण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा उपाय सुचविला आहे. त्याचप्रमाणे त्याने स्थानिक शासनसंस्थांचा राजकीय शिक्षणाच्या शाळा म्हणून पुरस्कार केला होता. मिलला उदारमतवाद व श्रेष्ठ जनांची सत्ता यांच्यात कसा समन्वय साधावा, हा प्रश्न पडला होता. सुशिक्षित लोकांच्या हाती शासनाची व समाजाची सूत्रे असावीत असे मिलला वाटत होते. मिल लोकशाहीचा समर्थक होता. लोकांच्या प्रतिनिधींच्या हाती सत्ता असलेल्या लोकशाही शासनाला म्हणजेच प्रातिनिधिक लोकशाही शासनाला इतर शासनप्रकाराच्या तुलनेत श्रेष्ठ मानत त्यातील दोषांवर उपाय सुचवत तिचा पुरस्कार करतो.

एकंदरीत जे. एस. मिल १९ व्या शतकाची जवळपास ७५ वर्षे जगला. त्याने त्या शतकातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. उपयुक्ततावाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि उदारमतवाद या सर्व टप्प्यातून गेल्यामुळे मिलच्या राजकीय विचारसरणीला विशेष अर्थ प्राप्त झाल्याचे दिसून येते. आपल्या

आयुष्याच्या उत्तरार्धात तर मिल हा समाजवादाकडे झुकला होता. याचे प्रमुख कारण म्हणजे स्त्री-पुरुष समतेच्या विचारामुळे त्याला सामाजिक, राजकीय व आर्थिक समतेसाठी व्यापक परिवर्तन व्हावे असे वाटत होते.

## १.४ पारिभाषिक शब्द :

**१) राजकीय तत्त्वज्ञान :** राजकीय मूल्यव्यवस्था व तत्त्वांच टिकात्मक मूल्यमापन करणारी आणि राजकीय संकल्पनांचे स्पष्टीकरण व विश्लेषण करून त्या जास्त सधन व अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न करणारी राज्यशास्त्राची एक शाखा. राज्यशास्त्रातील नैतिक प्रश्नांची उत्तरे शोधणे व राजकीय घटकांच्या परस्परसंबंधांचे तात्त्विक परीक्षण करून त्यांच्यात तांत्रिक सुसंगतता आणण्याचा प्रयत्न करणे राजकीय तत्त्वज्ञानाचे प्रमुख उद्दिष्ट असते.

**२) राजकीय सहभाग :** राजकीय प्रक्रियेत विविध पातळ्यांवर व्यक्तींनी स्वेच्छेने भाग घेऊन केलेल्या कृती, मतदान, प्रचार, पक्षकार्य, राजकीय सभांना उपस्थिती, पदासाठी उमेदवारी इत्यादी कृतींचा राजकीय सहभागात समावेश होतो.

**३) राजकीय स्वातंत्र्य :** मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविणे, सार्वजनिक पदे स्वीकारणे, मत व्यक्त करणे, इ. हक्क देणारे स्वातंत्र्य.

**४) प्रातिनिधिक लोकशाही :** लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत लोकांनी चालवलेले शासन.

**५) प्रमाणशीर प्रतिनिधित्व :** निवडणूकीच्या निकालात लोकमताचे जास्तीत जास्त अचूक प्रतिबिंब पडावे म्हणून वापरल्या जाणाऱ्या विविध निवडणूक पद्धती. प्रादेशिक एक प्रतिनिधी मतदारसंघाच्या पद्धतीमधील दोष घालविण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धती शेधून काढण्यात आली. अल्पसंख्यांकांना योग्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी ही पद्धती स्वीकारण्यात आली. मतदारांनी दिलेल्या मतांच्या आणि त्यांनी दिलेल्या पसंतीच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात येते. सामान्यत: पुढील दोन पद्धतींचा प्रमाणशीर प्रतिनिधित्वामध्ये समावेश केला जातो. (अ) यादी पद्धती (List System) (ब) क्रमदेय एकमतदान पद्धती (Single Transferable Vote) किंवा पुनर्मतदान पद्धत वापरली जाते. अल्पसंख्याकांच्या दृष्टिने ही पद्धती अधिक उपयुक्त ठरते. कारण मतांच्या प्रमाणात प्रतिनिधित्व प्राप्त होत असते.

**६) उदारमतवाद :** व्यक्तिस्वातंत्र्यास सवोच्च मूल्य मानणारी व व्यक्तीस जास्तीत जास्त स्वातंत्र्य मिळेल अशा रीतीने समाजाचे संघटन करणे हे मूलभूत ध्येय मानणारी विचारप्रणाली.

**७) व्यक्तिस्वातंत्र्य :** व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी संविधानापासून व्यक्तीला प्राप्त झालेले हक्क व अधिकार.

**८) लोकशाही :** सर्व लोकांचे राज्य, शासन हे एखाद्या विशिष्ट गटाचे, वर्गाचे, वंशाचे किंवा घराण्याचे नसते तर सर्व नागरिकांचे असते. शासनाचे नियंत्रण सर्व नागरिकांकडे असते आणि त्यांचे कल्याण करणे हाच शासनाचा हेतू असतो.

**९) समाजवाद :** समता व स्वातंत्र्य यांचा मेळ घालू इच्छिणाऱ्या उदारमतवादी लोकशाही संस्थामार्फत समताधिष्ठित समाज आणू इच्छिणाऱ्या विचारव्ययूहास व कार्यक्रमास समाजवाद असे संबोधण्यायत येते. यामध्ये लोकशाही समाजवाद, फेबियन समाजवाद, उत्क्रांतीवादी समाजवाद, सामाजिक लोकशाही इत्यादींचा समावेश होतो. दुसरा अर्थ, समाजवादी–व्यक्तिगत हितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणारी व्यवस्था.

**१०) साम्यवाद :** उत्पादनसाधनांची खासगी मालकी, खासगी संपत्ती व वर्गभेद यांचा लोप झालेली समाजव्यवस्था. वर्गविहीन व राज्यविहीन समाजव्यवस्चे स्वप्न बाळगणारी व्यवस्था. दुसरा अर्थ – राष्ट्राची सर्व संपत्ती सामुदायिक मालकीची आणारी व्यवस्था.

**११) भांडवलशाही :** खुली वा मुक्त अर्थव्यवस्था, व्यक्तिगत खासगी मालमत्तेचा हक्क मान्य करणारी व्यवस्था.

**१२) सरंजामशाही :** सरदार, जमिनदार यांची सत्ता असलेली राज्यव्यवस्था.

**१३) श्रेष्ठजन** (Elites) **:** समाजातील विविध सामाजिक गटांमधील/संस्थांमधील, बहुसंख्यांकांवर प्रभाव पाडून निर्णय प्रक्रियेवर वर्चस्व गाजविणारा, पुढारलेल्या मठभर लोकांचा गट.

**१४) राजकीय श्रेष्ठजन :** राजकीय निर्णय प्रक्रियेवर वर्चस्व गाजविणाऱ्या काही थोड्या लोकांचा गट.

**१५) राज्यकर्ता वर्ग :** समाजातील सर्व महत्त्वाची सत्तास्नै बळकावून बसणारा वर्ग.

**१६) बहुमताची जुलूमशाही / हुकूमशाही** (Tyranny of majority) **:** जॉन स्टुअर्ट मिलच्या 'On Liberty' या ग्रंथातील शब्दप्रयोग लोकशाहीत (प्रातिनिधिक लोकशाही) बहुमत हे असहिष्णू बनून अल्पसंख्यांकांच्या वेगह्या मतांना, मूल्यांना खच्ची करण्याचा प्रयत्न करेल. समाजात वेगळेपणा चालणार नाही, ही शक्यता गृहीत धरून बहुमताची जुलूमलशाही हा व्यक्तिस्वातंत्र्याला आणि आविष्कार स्वातंत्र्याला एक धोका आहे, असा विचार ह्या शब्दप्रयोगामागे आहे.

**१७) समिती पद्धत :** कायदेमंडळाच्या सभासदांच्या विविध समित्यांकडे विविध विषय सोपवून त्यांच्यावर सविस्तर चर्चा घडवून आणण्याची पद्धत चांगल्या चांगल्या कायदेनिर्मितीसाठी समिती पद्धत वापरी जाते.

**१८) परलोक :** परलोक म्हणजे जे या भूतलावरील भौतिक जगापेक्षा वेगळे आहेत ते. स्वर्ग, ईश्वराच्या ठिकाणी श्रद्धा ठेवणारा, ईश्वर, धर्म, कर्म, परलोक (दुसरे लोक, देवलोक, स्वर्ग लोक), पापपुण्य मानणारा, श्रद्धावान विचार.

**१९) इहलोक :** इहलोक म्हणजे आपण राहतो तो पृथ्वी लोक (भूलोक); हे जग, पृथ्वी, इथे जे काही आहे, ते निसर्ग, चराचर सृष्टी, मानवनिर्मित भौतिक जग (इमारती, धरणे, रस्ते इ.) तसेच माणसाने आपली निरिक्षणशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती याद्वारे प्राप्त केले मानव व निसर्गविषयक वास्तववादी, वस्तूनिष्ठ ज्ञान हे सारे म्हणजे ऐहिक होय. दुसरा अर्थ – हे जग, या पृथ्वीवरील मानव व निसर्ग यासह सर्व भौतिक घटकांचा वास्तववादी, वैज्ञानिक (शास्त्रीय) दृष्टिने केलेला विचार.

**२०) पार्लमेंट :** संसद (विधिमंडळ/कायदेमंडळ).

**२१) विधिमंडळ (कायदेमंडळ) :** शासनाच्या तीन शाखा पैकी एक मुख्यत: कायदे करण्याचे कार्य करणारी शासकीय यंत्रणा.

**२२) प्रजांत्र (लोकतंत्र) :** लोकांचे राज्य.

**२३) अनिर्बंध (लोकतंत्र) :** लोकांचे राज्य.

**२४) अनिर्बंध (निरंकुश) :** ज्याच्यावर कोणाचेही बंधन अथवा नियंत्रण नाही, अशी व्यवस्था.

**२५) राजतंत्र :** राजेशाही.

**२६) द्विगृही कायदेमंडळ :** दोन सभागृहांचे मिळून बनलेले कायदेमंडळ. उदा. इंग्लंडची पार्लमेंट, अमेरिकेची काँग्रेस, भारताची संसद.

**२७) शासनसंस्था :** संपूर्ण समाजाचे नियमन करणारी यंत्रणा. राज्यसंस्थेचा अविभाज्य घटक.

**२८) मानवतावाद :** सर्व सृष्टीमध्ये माणूस हाच केंद्रस्थानी असून बुद्धी, सद्‌गुण, सामर्थ्य, संशोधकता आणि प्रायोजकतेचा उद्‌गाताही तोच आहे, असे मानणारा दृष्टिकोण.

**२९) गुलामगिरी :** समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ वर्ग असणारी व कनिष्ठांना जनावरांप्रमाणे वागणूक देणारी व्यवस्था.

**३०) कल्याणकारी राज्य :** समाजातील गरजू व दुर्बल घटकांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी खास प्रयत्न करणारे राज्य.

**३१) मानवी हक्क :** मनुष्याला काही निसर्गसिद्ध हक्क असतात. ते सर्वच देशांमधील नागरिकांना प्राप्त झाले पाहिजेत ह्या हेतूने 'मानवी हक्क' ही संकल्पना आधुनिक काळात प्रचलित झाली. जीवित, उपजीविका, यांच्या बरोबरच भाषण, संघटना आणि धर्मश्रद्धा यांचे स्वातंत्र्य मानवी हक्कांमध्ये समाविष्ट आहे.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे :

१) जे. एस. मिलचे राजकीय तत्त्वज्ञान कशावर आधारित आहे?

अ) धर्म   ब) नैतिकता   क) ईश्वर   ड) यापैकी एकही नाही

२) जे. एस. मिलने आपल्या संपूर्ण राजकीय तत्त्वज्ञानात कोणाच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे?

अ) व्यक्ती ब) समाज क) धर्म ड) भांडवलदार

३) उपयुक्ततावादाचा मूळ निर्माता कोण?

अ) जेरेमी बेंथॉम ब) जेम्य मिल क) जे. एस. मिल ड) कार्ल मार्क्स

४) जेरेमी बेंथॅमच्या उपयुक्ततावादातील दोष दूर करून त्याची फेरमांडणी कोणी केली?

अ) कार्ल मार्क्स ब) जॉन स्टुअर्ट मिल क) जेम्स मिल ड) जॉन लॉक

५) जे. एस. मिल राज्याला कोणाच्या इच्छेचा परिणाम मानतो?

अ) ईश्वरी ब) मानवी क) धर्मसंस्था ड) पोप (धर्मगुरू)

६) कोणाच्या मते, राज्याचे कार्यक्षेत्र वाढले की व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित होते?

अ) प्लेटो ब) ॲरिस्टॉटल क) जॉन स्टुअर्ट मिल ड) मॅकियाव्हेली

७) जे. एस. मिल राज्यसंस्थेला व्यक्तिच्या कोणत्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप करण्यास सहमती देतो?

अ) व्यक्तिगत (स्तसंबंधी) ब) सामाजिक (परसंबंधी)

क) आर्थिक ड) यापैकी नाही

८) जे. एस. मिलने आपला 'On Liberty' हा सर्वोत्तम ग्रंथ कोणास समर्पित केला?

अ) हेरिएट टेल ब) जेरेमी बेंथॅम क) जेम्स मिल ड) जॉन ऑस्टिन

९) 'ऑन लिबर्टी' ग्रंथासंबंधी 'एवढा विचार व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करणारा चांगला ग्रंथ यापूर्वी लिहिला गेला नव्हता', असा अभिप्राय कोणी व्यक त केला आहे?

१०) जे. एस. मिलच्या मते, व्यक्तिच्या सर्वांगीण विकासासाठी तिला कोणते स्वातंत्र्य असावे?

अ) विचार व कार्य (कृती) ब) सामाजिक

क) राजकीय ड) आर्थिक

११) कोणाच्या मते, जे. एस. मिल 'पोकळ स्वातंत्र्य आणि अमूर्त (काल्पनिक) व्यक्तिवाद यांचे समर्थन करणारा प्रेषित आहे?

अ) आर्नेस्ट आर्कर ब) प्रा. वेपर क) डनिंग ड) डेव्हिडसन

१२) जॉन स्टुअर्ट मिल कोणत्या शासनपद्धतीचा पुरस्कर्ता होता?

अ) प्रातिनिधिक लोकशाही ब) हुकूमशाही

क) राजेशाही ड) साम्यवादी

१३) उदारमतवादाचा प्रणेता, प्रमुख पुरस्कर्ता म्हणून कोणास ओळखले जाते?

अ) जेरेमी बेंथॅम ब) जेम्स मिल क) जॉन स्टुअर्ट ड) कार्ल मार्क्स

१४) कोणाचे समाजवादी विचार 'लोकशाही समाजवाद किंवा 'फेबियन समाजवाद' यांचे समर्थन करणारे आहेत?

अ) जे. एस. मिल ब) कार्ल मार्क्स क) फेडरिक एंजेल्स ड) लेनिन

१५) कोणत्या विचारवंताने स्त्रीमताधिकाराचे जोरदार समर्थन केले आहे?

अ) बेंथॅम ब) जेम्स मिल क) जॉन स्टुअर्ट मिल ड) लेनिन

१६) जे. एस. मिलने कोणत्या ग्रंथामध्ये स्त्री-स्वांत्र्य व स्त्री-पुरुष समानतेविषयी विचार मांडले आहेत?

अ) The subjection of women ब) On Liberty

क) Liberalism ड) Political Economy

१७) जे. एस. मिलने उपयुक्ततावादाचा सिद्धांत कोणत्या ग्रंथात मांडला?

अ) Utilitarianism ब) On Liberty क) System of Logic ड) Liberalism

१८) जे. एस. मिलने प्रातिनिधिक शासनपद्धतीसंबंधी विचार कोणत्या ग्रंथात मांडले आहेत?

अ) On Representative ब) On Liberty

क) System of Logic ड) Liberalism

१९) जे. एस. मिलने स्वातंत्र्याविषयी विचार कोणत्या ग्रंथात मांडले आहेत?

अ) On liberty ब) System of Logic

क) Essay on Religion ड) Liberalism

२०) 'असंतुष्ट मानव संतुष्ट पशूपेक्षा श्रेष्ठ आहे', हे विधान कोणी केले आहे?

अ) जे. एस. मिल ब) जेरेमी बेंथॅम क) जेम्स मिल ड) कार्ल मार्क्स

**स्वयंअध्ययन प्रश्नांचे उत्तरे :**

| | |
|---|---|
| १) ब - नैतिकता | ११) अ - ऑर्नेस्ट बार्कर |
| २) अ - व्यक्ती | १२) अ - प्रातिनिकधक लोकशाही |
| ३) अ - जेरेमी बेंथॅम | १३) क - जॉन स्टुअर्ट मिल |
| ४) ब - जॉन स्टुअर्ट मिल | १४) अ - जे. एस. मिल |
| ५) ब - मानवी | १५) क - जॉन स्टुअर्ट मिल |
| ६) क - जॉन स्टुअर्ट मिल | १६) The subjection of women |
| ७) ब - सामाजिक (परसंबंधी) | १७) Utilitarianism |

| | |
|---|---|
| ८) अ – हेरिएट टेलर | १८) On Representative Government |
| ९) ब – वेपर | १९) On Liberty |
| १०) अ – विचार व कार्य (कृती) | २०) अ – जे. एस. मिल |

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) जे. एस. मिलने बेंथॅमच्या उपयुक्ततावादात केलेल्या सुधारणा, बदल स्पष्ट करा.

२) जे. एस. मिलचे राज्यासंबंधीचे विचार स्पष्ट करा.

३) जे. एस. मिलच्या स्वातंत्र्यासंबंधी विचारांचे विश्लेषण करा.

४) जे. एस. मिलचे प्रातिनिधिक शासनासंबंधीचे विचार सांगा.

५) जे. एस. मिलचे लोकशाही विषयीचे विचार स्पष्ट करा.

६) जे. एस. मिलचे उदारमतवादा विषयीचे विचार स्पष्ट करा.

७) जे. एस. मिलचे समाजवादा विषयीचे विचार स्पष्ट करा.

८) स्त्री–स्वातंत्र्य व स्त्री–पुरुष समानता याविषयीचे मिलचे विचार स्पष्ट करा.

**टीपा लिहा.**

१) जे. एस. मिलने सांगितलेले राज्याच्या कार्याचे स्वरूप सांगा.

२) मिलने विचारस्वातंत्र्य आवश्यक मानण्याची कारणे सांगा.

३) मिलचे स्त्री मताधिकारासंबंधीचे विचार स्पष्ट करा.

४) मिलचे धर्म याविषयीचे विचार सांगा.

५) बेंथॅम आणि मिल यांच्या उपयुक्ततावादाची तुलना करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) कुळकर्णी सुधाकर : 'पाश्चात्य राजकीय विचारवंत', नागपूर (२०११).

२) जोशी सुधाकर : 'पाश्चिमात्य राजकीय विचारवंत', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. (२००८).

३) देव विजय आणि इतर : 'पाश्चात्य राजकीय विचारवंत', डायमंड प्रकाशन, पुणे (२०१२).

४) डोळे ना. य. : 'राजकीय विचारांचा इतिहास', कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे.

५) भोळे भा. ल. : 'भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

६) गर्दे दि. का : 'पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह', महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती, पुणे.

७) कुलकर्णी सुधाकर : ‘निवडक राजकीय विचारवंत’, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

८) मुठाळ राम : ‘भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार’,
अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर (१९९८).

९) शृंगारपुरे अरविंद : ‘भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, मंगेश प्रकाशन, नागपूर.

१०) बी. बी. पाटील : ‘पाश्चात्य राजकीय विचार’, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

❍❍❍

घटक २

# कार्ल मार्क्स


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

कार्ल मार्क्स जीवन परिचय

२.२.१ ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत

२.२.२ मार्क्सचे भांडवलशाहीबद्दलचे विचार

२.२.३ अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत

२.२.४ वर्गसंघर्षाचा सिद्धांत

२.२.५ कामगार क्रांती व साम्यवाद

२.२.६ मार्क्सचे राज्यसंस्थेसंबंधी विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## २.० उद्दिष्टे (Objectives) :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- कार्ल मार्क्सचा जीवन परिचय होऊन त्यांच्यावर प्रभाव पाडणारे घटक समजून घेता येतील.
- मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत स्पष्ट करता येईल.
- मार्क्सचा भांडवलशाहीबद्दलचा दृष्टीकोन समजून घेता येईल.
- मार्क्सचा अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत स्पष्ट करता येईल.
- वर्गसंघर्षाबाबतचे मार्क्सचे विचार समजून घेता येतील.

- कामगार क्रांती, कामगारांची हुकूमशाही व साम्यवाद याविषयीचे मार्क्सचे विचार स्पष्ट करता येतील.
- मार्क्सचे राज्यसंस्थेसंबंधीचे विचार जाणून घेता येतील.

## २.१ प्रास्ताविक (Introduction) :

एक थोर साम्यवादी विचारवंत म्हणून कार्ल मार्क्स अजरामर झालेला आहे. या घटकात आपण कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद, भांडवलशाहीबाबतचे विचार, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत, वर्गसंघर्षाचा सिद्धांत, कामगार क्रांती, कामगारांची हुकूमशाही व साम्यवाद, राज्यसंस्थेबाबतचे विचार समजून घेणार आहोत. त्यासाठी कार्ल मार्क्सचा जीवन परिचय, ग्रंथलेखन आणि त्यांच्या विचारांवर पडलेला प्रभाव जाणून घेणे आवश्यक आहे.

### ◆ जीवन परिचय :

जागतिक साम्यवादी क्रांतीचा पुरस्कर्ता, सक्रिय क्रांतिकारक, शास्त्रीय समाजवादी विचारांचा प्रवर्तक, प्रतिभावान समाजशास्त्रज्ञ अशा महान विचारवंताचा जन्म ५ मे १८१८ रोजी प्रशियाच्या (जर्मनी) ऱ्हाईन प्रांतातील टेवेस (ट्रायर) या गांवी एका मध्यवर्गीय ज्यू कुटूंबात झाला. मार्क्सच्या वयाच्या ६ व्या वर्षी (१८२४) त्याच्या कुटूंबाने ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला होता. त्याचे वडील व्यवसायाने वकील होते. मॅकआयव्हर या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाच्या मते, कार्लच्या बालमनावर धर्मांतराचा सांस्कृतिक आघात झाल्यामुळे सर्व धर्माविषयी त्याच्या मनात तिरस्कार उत्पन्न झाला असावा. मार्क्स लहानपणापासून अत्यंत बुद्धिमान, प्रतिभासंपन्न, वृत्तीने स्वतंत्र व आग्रही मनाचा होता. त्यांच्याकडे दुर्दम्य आत्मविश्वास होता.

मार्क्सचे शालेय जीवन शेतकरी व कामगार कुटूंबातील मुलांच्या सानिध्यात गेले होते. लहानपणापासूनच त्याच्या बुद्धीचे असामान्यत्व दिसू लागले होते. वयाच्या १७ व्या वर्षी बॉन विद्यापीठात तो कायद्याचा विद्यार्थी म्हणून दाखल झाला. इ.स. १८३५ साली कायद्याची पदवी संपादन केल्यानंतर बॉन विश्वविद्यालयात अध्यापनाचे काम करण्याचा त्याचा विचार होता परंतु त्याच्या क्रांतिकारी विचारामुळे तिथे त्याला नोकरी मिळाली नाही. पुढील शिक्षणासाठी मार्क्स बर्लिन विश्वविद्यालयात दाखल झाला. तेथे त्याने तत्त्वज्ञान, इतिहास, साहित्य यांचा अभ्यास केला. वयाच्या २३ व्या वर्षी १८४१ साली मार्क्सने 'डॉक्टर ऑफ फिलॉसाफी'(Ph.D.) ही पदवी मिळविली. अध्यापनकार्यात त्याला विशेष रुची होती. परंतु त्याच्या जहाल व क्रांतिकारक विचारांनी कोणत्याच विश्वविद्यालयात त्याला नोकरी मिळाली नाही. त्यामुळे त्यांने पत्रकारिता सुरू केली. 'व्हेनिस टाईम्स' या वृत्तपत्राचा सहाय्यक संपादक व नंतर संपादक म्हणून आपले विचार मांडण्यास सुरुवात केली. त्याच्या कठोर विचारांमुळे त्याला ती ही नोकरी सोडावी लागली. बॉन विद्यापीठात असताना मार्क्सची जेनी नावाच्या युवतीशी ओळख झाली होती. १८४३ साली तिच्याशी त्यांने विवाह केला. ती आपल्या पतीच्या जीवनात सहधर्मचारिणी म्हणून सुजाणतेने, तळमळीने व सक्रियतेने सहभागी झाली होती. क्रांतिकारक विचारांमुळे व लिखाणामुळे मार्क्सला सरकारने जर्मनी सोडून जाण्याचा आदेश दिला. १८४४ मध्ये मार्क्स जर्मनी सोडून फ्रान्सला गेला.

फ्रान्समध्ये मार्क्सने फ्रेंच समाजवादी साहित्याचा अभ्यास केला. पॅरिस येथे फ्रेंच साम्यवादाचा अभ्यास करीत असताना विविध क्रांतिकारी गुप्त संघटनांशी त्याचा संबंध आला. फ्रेंच कम्युनिस्ट विचारवंत कॅबेट, क्रांतिकारक तत्त्ववेत्ता प्रूधाँ, रशियन क्रांतिकारक बाकुनिन यांच्याशी त्याची भेट झाली. फ्रान्समध्येच त्याची आर्थिकदृष्ट्या श्रीमंत असलेल्या डॉ. फ्रेडरिक एंजल्सची भेट झाली. परस्परांच्या विचारांमुळे ते प्रभावीत झाले, त्याचे रूपांतर दोघांतील मैत्रीत झाले. याच मित्राने पुढे मार्क्सला ग्रंथनिर्मितीसाठी आर्थिक मदत केली. दोघांनी मिळून अनेक पुस्तके लिहिली, जर्मन विरोधी लिखानामुळे फ्रेंच सरकारनेही मार्क्सची फ्रान्समधून हकालपट्टी केली. त्यानंतर मार्क्स बेल्जियमला गेला व नंतर इंग्लंडला रवाना झाला. याचदरम्यान १८४८ मध्ये इंग्लंडमध्ये त्याने एंजल्सच्या मदतीने 'साम्यवादी पक्षाचा जाहिरनामा' (कम्युनिस्ट मॅनिफेस्टो) हा ग्रंथ प्रकाशित केला. लंडनमधील मुक्कामात पहिली काही वर्षेत्याला अत्यंत हलाखीत काढावी लागली. दारिद्र्य, आजारपण व दुर्दैवी घटना याचे आघात या कुटूंबावर होत राहिले. पुढील आयुष्य त्यांने इंग्लंडमध्येच व्यतीत केले. इ.स. १८४६ साली मार्क्स पहिल्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या कार्यकारिणीचे सभासद म्हणून निवडून आला. औद्योगिक उत्पादनात तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागल्यामुळे कामगारांची स्थिती बिकट बनत चालली होती. कामगारांच्या चळवळीतही मार्क्स अग्रेसर होता. भांडवलशाही व्यवस्थेचे निर्मूलन झाल्याखेरीज मानवी समाजाची उभारणी अशक्य आहे. त्यासाठी त्याने कामगारांच्यात संघटितपणा वाढविण्यासाठी आवाहन केले की, ''जगातील कामगारांनो, एक व्हा, गमावण्यासारखे तुमच्यापाशी काहीच नाही. जिंकण्यासाठी मात्र जग आहे.''

१८६७ साली मार्क्सचा 'दास कॅपिटल' (Das Capital) या विशाल ग्रंथाचा पहिला भाग प्रसिद्ध झाला त्याच ग्रंथाचा दुसरा व तिसरा भाग मार्क्सच्या मित्राने एंजल्सने प्रसिद्ध केला. कामगार चळवळीतील मार्क्सचा सक्रिय सहभाग, लेखन कार्य, घरचे अठरा विश्व दारिद्र्य यामुळे त्याची प्रकृती खालावली. पत्नी उमराव घराण्यातील असूनदेखील तिने पतीच्या नशीबात, श्रमात सर्वतोपरी मदत केली, प्रसंगी घरातील मौल्यवान चीजवस्तू, दागिने गहाण ठेवले. अशा बिकट परिस्थितीत एंजल्स या मित्राने त्यांना वारंवार आर्थिक मदत केली. १८८१ साली मार्क्सच्या पत्नीचा व १८८३ मध्ये त्याच्या लाडक्या मुलीचा मृत्यू झाला. या दोन्ही आघातामुळे तो अधिकच खंगला आणि आजारी पडला. या महान विचारवंताचे १४ मार्च १८८३ रोजी निधन झाले. कार्लमार्क्स आपल्या समाजवादी, क्रांतीकारी विचारांमुळे, लेखनामुळे संपूर्ण विश्वात अजरामर झाला. त्यावेळी डॉ. एंजल्सने म्हटले, 'युगानुयुगे मार्क्सचे नाव आणि कार्य जीवंत राहील.'

◆ **मार्क्सची ग्रंथरचना :**

कार्ल मार्क्स प्रतिभासंपन्न लेखक होता. आपले संपूर्ण आयुष्य त्याने लेखन, वाचन करण्यात घालविले. दारिद्र्याचे चटके सतत बसत असतानाही त्याने लेखनाचे कार्य शेवटपर्यंत सोडले नाही. त्याने आपल्या विविध ग्रंथाद्वारे समाजवादी विचार, भांडवलशाही समाजातील दोष, कामगारांचे आर्थिक, सामाजिक शोषण, वर्गसंघर्ष, वर्गविरहीत समाज याबाबतचे विचार मांडले. राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्यादृष्टीने त्याचे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत.

1. Holy Family (1845)

2. The Poverty of Philosophy (1847)

3. The Communist Manifesto (1848)

4. The Critique of Political Economy (1859)

5. Value, Price and Profit (1865)

6. Das Capital (1867)

7. The Civil war in France (1870-71)

8. Class Struggle in France

मार्क्सने वरील महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले आहेत. मार्क्स केवळ ग्रंथ लिहून स्वस्थ बसला नाही तर त्यातील विचार प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तो आयुष्यभर झगडला. त्याच्या या ग्रंथापैकी 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' आणि 'दास कॅपिटल' हे दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणून ओळखले जातात. या ग्रंथांची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ.

**१) कम्युनिस्ट मॅनिफेस्टो** (Communist Manifesto) **:**

कम्युनिस्ट मॅनिफेस्टो हा ग्रंथ इ.स. १८४८ मध्ये मार्क्स आणि एंजल्सने संयुक्त रितीने लिहिला. यालाच 'साम्यवादी पक्षाचा जाहिरनामा' असेही म्हटले जाते. या ग्रंथात आर्थिक संघर्ष, वर्गसंघर्ष, भांडवलशाहीची विनाशाकडे चाललेली वाटचाल याबाबतचे विचार मांडले आहेत. भांडलशाहीत कामगारांच्या शोषणामुळे त्याचे अंतकरण पिळवटून निघाले होते. त्याने जगातील सर्व कामगारांना एकत्रित येण्याचे, एकजुटीने लढण्याचे आवाहन केले. 'जगातील कामगारांनो एकत्र व्हा, तुम्हाला काहीही गमवायचे नाही, गमवायचे आहे ते दुःख आणि जिंकायचे आहे ते जग.' असे कळकळीचे आवाहन त्याने या ग्रंथात केले. साम्यवादी लोक या ग्रंथाला 'बायबल' प्रमाणे मानतात. इतिहासात राजकीय विचारांचा एक उत्कृष्ट व अग्रेसर ग्रंथ म्हणून या ग्रंथाची गणना केली जाते. जगातील प्रमुख भाषांमध्ये त्याचे भाषांतर झाले आहे. साम्यवादाची ओळख करून देणारा ग्रंथ म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते.

**२) दास कॅपिटल** (Das Capital) **:**

हा ग्रंथ मार्क्सने इ.स. १८६७ मध्ये लिहिला. मार्क्सचे तत्त्वज्ञान सांगणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणून या ग्रंथाला श्रेष्ठ स्थान आहे. या ग्रंथाचे तीन खंड असून पहिला खंड १८६७ मध्ये प्रकाशित झाला व राहीलेले दोन खंड त्याच्या मित्राने एंजल्सने १८८५ व १८९४ साली प्रकाशित केले. या ग्रंथात त्याने भांडवलशाहीचे वर्णन केले आहे. ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत, भांडवलशाहीतील दोष, राज्यविरहीत समाज याविषयीचे विचार मांडले आहेत. भांडवलशाहीत भांडवलदार स्वतःहून आपले विरोधक निर्माण करतो, अतिरिक्त संपत्तीला त्याने चोरी मानले आहे, ज्यात दारिद्र्य, बेकारी, शोषण इत्यादी दोष राहणार नाहीत अशा राज्याची प्रस्थापना करण्याचे विचार त्याने या ग्रंथात मांडले आहेत. या त्याच्या विचारातून १९१७ साली रशियात क्रांती झाली.

◆ **मार्क्सवरील प्रभाव :**

मार्क्स हा महान क्रांतिकारी, संघर्षप्रिय आणि शास्त्रीय समाजवादी विचारवंत होता. मार्क्सच्या विचारांवर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव होताच पण इतर अनेक घटकांचा आणि विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव पडला होता तो पुढीलप्रमाणे -

**१) इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीचा प्रभाव**

इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीचा फार मोठा प्रभाव त्याच्या विचारांवर पडला. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमध्ये एक नवीन अर्थव्यवस्था निर्माण झाली होती. एका बाजूने औद्योगिक विकास होत असताना दुसऱ्या बाजूला कामगारांची आणि सर्वसामान्य जनतेची आर्थिक स्थिती खालावत चालली होती ही स्थिती मार्क्सने इंग्लंडच्या वास्तव्यात जवळून पाहिली होती. त्यातूनच त्याचे भांडवलशाही विरोधी तत्त्वज्ञान निर्माण झाले.

**२) फ्रान्समधील तत्त्वज्ञानाचा प्रभाव**

फ्रान्सच्या वास्तव्यात मार्क्सने फ्रान्सच्या आदर्शवादी समाजवादाचे पुरस्कर्तेकेबे, बाकुनिन प्रूधाँ, सेंट सायमन, चार्ल्स कोरियर, लेगे यांच्या समाजवादी विचारांचा अभ्यास केला. त्याचा प्रभाव मार्क्सवर पडला.

**३) हेगेलच्या विचारांचा प्रभाव**

हेगेलच्या विचाराचा मार्क्सवर फार मोठा प्रभाव पडला होता. बॉन व बर्लिन विद्यापीठात असताना मार्क्सने हेगेलच्या 'फिलॉसाफी ऑफ राईट' या ग्रंथाचा अभ्यास केला होता. त्यातून त्याने द्वंद्ववादाची प्रेरणा घेतली. हेगेलच्या वैचारिक बौद्धिक द्वंद्ववादाला त्याने भौतिकवादी स्वरूप दिले. मार्क्सच्या मते, 'हेगेलचा द्वंद्ववाद जो डोक्यावर उभा होता, त्याला मी पायावर उभे केले' अशाप्रकारे हेगेलच्या तत्त्वज्ञानातून मार्क्सने भौतिकवादी विचारांची प्रेरणा घेतली.

**४) एंजल्सचा प्रभाव**

एंजल्स आणि मार्क्स यांची मैत्री ऐतिहासिक स्वरूपाची होती. मार्क्सच्या विचारांवर सर्वात जास्त प्रभाव एंजल्सचा पडला होता ते श्रेष्ठ मित्रत्वाचे प्रतिक होते. एंजल्सच्या प्रभावामुळेच मार्क्स साम्यवादाकडे अधिक आकर्षित झाला. एंजल्सच्या मदतीनेच त्याला 'दास कॅपिटल' ग्रंथ प्रकाशित करणे शक्य झाले.

**५) वृत्तपत्र व्यवसायाचा प्रभाव**

मार्क्सने तत्त्वज्ञानात पीएच.डी. प्राप्त केल्यानंतर नोकरीसाठी प्रयत्न केले परंतु त्याच्या जहाल विचारांमुळे सरकारने त्याला जर्मनी सोडण्याचा आदेश दिला. नंतर तो वृत्तपत्र व्यवसायात काम करू लागला. त्यावेळी त्याला श्रमिक वर्गाच्या परिस्थितीचे आकलन झाले, दारिद्र्याची जाणीव झाली. स्वतःला त्याचे चटके सहन करावे लागले. त्यामुळे संपूर्ण जगातील अर्थव्यवस्था बदलली पाहिजे या विचारांची प्रेरणा त्याला मिळाली.

याबरोबरच फ्रान्समधील वर्गसंघर्ष व राज्यक्रांती तसेच ॲडम स्मिथ, रिकार्डो, विल्यम थॉमसन, सेंट

सायमन, जे. एस. मिल, कॅबेट इत्यादी समाजवादी विचारवंतांच्या आर्थिक, सामाजिक विचारांचा प्रभाव कार्ल मार्क्सवर पडला होता.

अशाप्रकारे विविध देशातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती, स्वतःच्या जीवनातील विविध प्रसंग, विविध विचारवंतांचे विचार यातूनच त्याच्या विचारांची जडणघडण झाली होती व विशिष्ट विचारसरणी स्वीकारली होती.

## २.२ विषय-विवेचन :

### २.२.१ ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत (Theory of Historical Materialism) :

कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांताला द्वंद्ववाद किंवा विरोधविकासवाद किंवा आर्थिक नियतीवाद या नावानेदेखील संबोधले जाते. हेगेलचा विरोध विकास म्हणजेच द्वंद्ववाद याचा प्रभाव कार्ल मार्क्सवर पडला होता. मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत हेगेलच्या विरोधविकासवादी सिद्धांतावर आधारलेला आहे. ऐतिहासिक भौतिकवाद वरीलप्रमाणे विविध नावांनी ओळखला जात असला तरी मार्क्सने मात्र 'इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ (इकॉनॉमिक इंटरप्रेटेशन ऑफ हिस्ट्री) असा शब्दप्रयोग केला आहे. इतर संज्ञा एंजल्सने मांडल्या आहेत.

मार्क्सचा भौतिकवादी सिद्धांत समजून घेण्यापूर्वी भौतिकवाद म्हणजे काय? हे समजून घेणे आवश्यक आहे. भौतिकवाद निसर्गाचे अस्तित्व मान्य करतो. निसर्ग म्हणजे ग्रह, तारे, सूर्य, चंद्र, पृथ्वी, पर्वत, झाडे, समुद्र, जंगले, प्राणी तसेच विचारशक्ती आणि जाणीव असलेला मानव होय. या सर्वांवर नियंत्रण करणारी अतिमानवी शक्ती, परमेश्वर वगैरे काहीही नसते. निसर्ग स्वतंत्रपणे अस्तित्वात असतो. पृथ्वीवर मानव निर्माण होण्याअगोदरपासून निसर्ग आहे. भौतिकवादामुळे मनुष्य चूकीच्या समजुतीतून मोकळा होतो. मृत्यू, देव आणि इतर अतिमानवी शक्तीचे भय नाहीसे होते. पृथ्वीवरचे आपले जीवन श्रेष्ठ मानून ते कसे चांगले जगता येईल ते भौतिकवाद सांगतो. मृत्यूनंतरच्या सुखाची वाट पाहण्यात अर्थ नसतो. भौतिकवादाचा मनुष्याच्या बुद्धिवर व प्रतिष्ठेवर विश्वास आहे. मानवाच्या बुद्धिवर भौतिकवादाचा विश्वास असल्याने परमेश्वराची दया, आशिर्वाद मागण्याची गरज त्याला वाटत नाही. मानवाला मदत करणारी वा शासन करणारी अशी कोणतीही अतिमानवी शक्ती अस्तित्वात नसते. भौतिकवादाचा स्वीकार केलेला माणूस कपाळावर हात मारून माझे नशीबच खोटे, दैवच खोटे म्हणून निराश होणार नाही. बुद्धिवर विश्वास असल्याने तो आत्मविश्वासपूर्वक स्वतःमध्ये बदल करतो.

मार्क्सने हेगेलच्या सिद्धांतातून केवळ बौद्धिक तत्त्वे घेतली. हेगेल अध्यात्मवादी होता तर मार्क्स पूर्ण भौतिकवादी होता. हेगेलच्या सिद्धांताला त्याने क्रांतिकारी स्वरूप दिले. भौतिकवादाच्या आधारे इतिहासातील विरोध विकासवादाचा (द्वंद्ववाद) सिद्धांत मार्क्स व एंजल्स यांनी मांडला.

◆ **विरोध विकासवाद (द्वंद्ववाद)** (Dialectical Materialism) **:**

मार्क्सने हेगेलचे द्वंद्ववादी तत्त्व स्वीकारून आपल्या विचारांची मांडणी केली. परंतु हेगेलचा अध्यात्मवादी

पाया मात्र त्याने मान्य केला नाही. म्हणजेच मार्क्सचा विरोधविकासवाद (द्वंद्ववाद) हेगेलपेक्षा वेगळा आहे. मार्क्सच्या शब्दात, "My Dialectical method is not only different from the Hegelian but is its direct opposite." ''माझा विरोधविकासवाद हा हेगेलपेक्षा वेगळा आहे, नव्हे पूर्णपणे त्याच्या उलट आहे.'' सृष्टीमध्ये होणाऱ्या सर्व परिवर्तनाचे कारण विचार आहे असे हेगेल मानतो तर मार्क्सच्या मते, समाजपरिवर्तनाचा मूळ आधार आर्थिक आहे. हेगेल आदर्शवादी विचारवंत होता. त्याच्या मते, भौतिक जग हे कल्याणसृष्टीचे प्रतिबिंब असते. भौतिकसृष्टीला स्वतंत्र अस्तित्व नसते. कल्पनासृष्टीत प्रथम बदल होतात व त्यानुसार भौतिक सृष्टीत बदल घडवून आणले जातात. कल्पनासृष्टीत म्हणजेच विचारात प्रगती कशी होते, हे स्पष्ट करण्यासाठी हेगेलने विरोध विकासवादी तत्त्व मांडले. कल्पनासृष्टीचा विकास होण्यासाठी संघर्ष आवश्यक असतो. द्वंद्ववाद ही वादविवाद करण्याची एक विचारपद्धती आहे असे हेगेल मानतो. त्याच्या मते, प्रथम एक विचार किंवा कल्पना (Thesis), मांडली जाते. त्या विचाराला किंवा कल्पनेला विरोधी कल्पना (Antithesis) आपोआप निर्माण होते. या दोन परस्पर विरोधी विचारातून संघर्ष होऊन सुसंवादी विचार (Synthesis) निर्माण होऊन वैचारिक प्रगती होते. थोडक्यात वाद, प्रतिवाद आणि सुसंवाद अशारितीने कल्पनासृष्टीत विरोध विकासानुसार बदल होतात व त्याचा परिणाम भौतिक सृष्टीत बदल करण्यासाठी केला जातो असे हेगेलचे मत होते.

मार्क्सने भौतिक जगाच्या विकासाचे तीन टप्पे सांगितले. वाद (Thesis), प्रतिवाद (Antithesis) आणि संवाद (Synthesis) हे विरोधविकासवादाचे तत्त्व मार्क्सने हेगेलच्या तत्त्वज्ञानातून घेतले. हेगेलच्या विरोधविकासवादाचा स्वीकार मार्क्सने केला परंतु हेगेलचा आदर्शवाद व अध्यात्मवाद पूर्णपणे नाकारला. हेगेलच्या काल्पनिक, आदर्श विचारांना फाटा दिला. मार्क्सने मानवी इतिहासाचे वास्तववादी स्पष्टीकरण केले आहे. त्याच्या मते, भौतिक वस्तूंच्या प्राप्तीसाठी मनुष्य सतत प्रयत्न करीत असतो. वस्तुप्राप्तीसाठी मानवी जीवनात सतत संघर्ष होत असतो. भौतिक वस्तुंचे उत्पादन करीत असतानाच माानवाचे परस्परसंबंध निश्चित होत असतात. समाजातील या आर्थिक संबंधावरच समाजाची जडणघडण होत असते. उत्पादन साधने असणारा गट आणि उत्पादनाची साधने नसणारा असा दुसरा गट ह्या दोन्ही गटातील परस्परसंघर्षातून समाज एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत जात असतो.

भांडवलशाही समाजव्यवस्थेत भांडवलदार हा वाद (Thesis), मजूर वर्ग हा प्रतिवाद (Antithesis) असतो. या दोन वर्गांच्या संघर्षातून नवी साम्यवादी समाजरचना असा सुसंवाद (Synthesis) निर्माण होतो. अशाप्रकारे मार्क्सने विश्वाच्या परिवर्तनाचे वास्तववादी चित्रण केले. विश्वाच्या विकासात नेहमी संघर्ष होत असतात व त्या संघर्षातून विश्वाचा विकास होत असतो. मार्क्सने परिवर्तनाचा आधार आर्थिक असल्याचे सांगून उत्पादन साधने गतिमान व बदलणारी असतात. त्यांच्यात परिवर्तन झाले की समाजातही परिवर्तन होते असे मत मांडले. विरोधातून, संघर्षातून विकास होतो असे विरोधविकासवादाचे तत्त्व मार्क्सने सांगितले. 'हेगेलचा द्वंद्ववाद डोक्यावर उभा होता, तो मी पायावर उभा केला.' असे मार्क्स म्हणतो.

**मार्क्सच्या द्वंद्ववादाची वैशिष्ट्ये :**

मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवादाचा सिद्धांत नवीन समाजव्यवस्था प्रस्थापनेसाठी स्पष्ट केला. समाज

नेहमीच वर्गप्रधान राहीलेला आहे. दोन वर्गात संघर्ष होऊन नविन सामाजिक व्यवस्था निर्माण होत आली आहे. परंतु मार्क्सला अशी एक नवीन सामाजिक व्यवस्था निर्माण करावयाची होती की जिथे कोणतेही वर्ग राहणार नाहीत व वर्गविहीन समाजाची स्थापना होऊ शकेल हे त्याच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाचे ध्येय आहे. द्वंद्वात्मक भौतिकवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

**१) प्रत्येक वस्तू गतिशील व विकसनशील असते**

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादानुसार प्रत्येक वस्तुला गती असते. कोणतीही वस्तू स्थितीशील नसते. त्यामुळे जसजसा काळ लोटतो तसतसे त्या वस्तुत परिवर्तन होते. अशाप्रकारचे परिवर्तन सतत चालू असते. जुन्या वस्तुंचा नाश व नवीन वस्तुंची निर्मिती असा विकासाचा क्रम सतत चालू असतो.

**२) मार्क्सचा द्वंद्ववाद क्रांतिकारी स्वरूपाचा आहे**

मार्क्सने सामाजिक क्रांतीवर भर दिला होता. त्याच्या मते, राजकीय क्रांतिमुळे सत्ता एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे जाते व फरक एवढाच पडतो की, शोषणाची शक्ती एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाकडे हस्तांतरित होते, शोषीतांचा वर्ग तसाच राहतो. सामाजिक क्रांतिमुळे समाजातील संपूर्ण वर्गांचाच नाश होतो व नंतर मुक्त समाजव्यवस्था निर्माण होते.

**३) प्रत्येक वस्तुचा दुसऱ्या वस्तुशी संघर्ष**

मार्क्सच्या मते, विश्वाच्या विकासात सदैव संघर्ष सुरू असतो. विश्वातील प्रत्येक वस्तुचा दुसऱ्या वस्तुशी संघर्ष होत असतो. वस्तु–वस्तुतील विरोधामुळेच संघर्ष अटळ असतो. त्यातूनच समाजात परिवर्तन होत असते.

**४) परिवर्तन गुणात्मक व मात्रात्मक**

मार्क्सच्या द्वंद्वात्मक सिद्धांतानुसार वस्तुत होणारे परिवर्तन गुणात्मक व मात्रात्मक अशा दोन्ही स्वरूपाचे असते. जसे ज्वारीच्या दाण्याच्या अंकुराचे अनेक दाण्यात परिवर्तन मात्रात्मक आहे पण पाण्याचे बर्फात परिवर्तन होणे गुणात्मक स्वरूपाचे आहे. कोणतेही परिवर्तन द्वंद्वामुळेच होते असे मार्क्सचे मत होते.

**५) भौतिक जगाचाच विचार**

मार्क्सने विरोध विकासवादामध्ये भौतिक जगाचाच विचार केला. त्याच्या मते, भौतिक जग आणि त्यातील भौतिक पदार्थ हेच खरे सत्य आहे. विश्वाचे वास्तविक ज्ञान केवळ भौतिकवादाद्वारेच प्राप्त होऊ शकते यावर त्याचा ठाम विश्वास होता. यासाठी त्याने वाद, प्रतिवाद आणि संवाद अशा विकासाच्या तीन अवस्था सांगितल्या. त्याच्या मते, ज्वारीचा दाणा वाद, रोपटे प्रतिवाद आणि नवीन ज्वारीचे दाने हा संवाद आहे.

**◆ मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद**

मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत स्पष्ट करण्यासाठी विरोधविकासवाद (द्वंद्ववाद) सांगितला. द्वंद्वात्मक भौतिकवादाचा उपयोग त्याने सामाजिक विकासाची व्याख्या करण्यासाठी केला. आजपर्यंतच्या

समाजाचा विकास कसा झाला? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्याने इतिहासाचा अभ्यास केला. इतिहासाचे आर्थिकदृष्ट्या विश्लेषण केले. ऐतिहासिक बदलास आर्थिक घटकच कारणीभूत असतो असे त्याचे मत होते.

**◆ उत्पादन पद्धती – सामाजिक संबंधाचा निकष**

मार्क्सच्या मते, उत्पादन पद्धतीमुळे समाजात परस्पर संबंध निश्चित होत असतात. उत्पादनाची साधने ज्याच्या मालकीची त्यांचा एक वर्ग आणि ज्यांच्या हातात उत्पादनाची साधने नसतात परंतु त्यांना श्रम व कष्ट करावे लागतात असा दुसरा वर्ग असतो. उत्पादनाची साधने गतीशील आणि सतत बदलणारी असतात. उत्पादनाची पद्धती आणि वस्तूंच्या विनिमयाची पद्धती यातून समाजातील व्यक्तींचे परस्पर संबंध निश्चित होत असतात. प्रारंभीच्या काळात उत्पादनाची साधने सामुहिक मालकीची होती. सरंजामशाहीत सरंजामदार, जमीनदार, धनिक लोकांच्या हातात उत्पादन साधनांची मालकी होती. त्यांचा एक वर्ग आणि कुळांचा, गुलामांचा दुसरा वर्ग होता. भांडवलशाहीत उत्पादनाची साधने भांडवलदारांकडे गेली. त्यांचा एक वर्ग निर्माण झाला व कारखान्यात काम करणारे मजूर, कामगार यांचा दुसरा गट निर्माण झाला. अशाप्रकारे उत्पादन साधनांच्या मालकीतून इतिहासात मानवाचे परस्पर संबंध निर्माण झाले. समाजरचनेत जे वर्ग निर्माण होतात त्यांच्यात संघर्ष होतो व समाजाचा आर्थिक विकास होतो, असे मार्क्सचे मत होते.

**◆ आर्थिक घटकांचा समाजव्यवस्थेवर परिणाम**

मार्क्सच्या मते, आर्थिक संबंध मनुष्याची सामाजिक, राजकीय, अध्यात्मिक तत्त्वे निश्चित करीत असतात. व्यक्तीचे भौतिक जीवनातील स्थान, व्यक्तीच्या विचाराला दिशा देण्याचे कार्य आर्थिक घटक करीत असतो. जुन्या उत्पादन पद्धतीला विरोध करणारी नवीन उत्पादन पद्धती निर्माण होते. जुन्या व नवीन उत्पादन पद्धतीत संघर्ष होतो. त्यात नवीन उत्पादन पद्धती श्रेष्ठ ठरते. अशा संघर्षातून समाजरचनेचे परिवर्तन होते. समाजातील विविध घटकात त्यामुळे परिवर्तन होत असते. उत्पादनपद्धतीच्या अनुषंगानेच समाजातील राजकीय, कायदेशीर, तात्वीक, संबंध प्रस्थापित होत असतात. उत्पादकशक्ती व उत्पादन संबंध यांच्यामध्ये जोपर्यंत सुसंगती असते तोपर्यंतच समाजाचा विकास होत असतो. जेव्हा उत्पादनसंबंध व उत्पादनशक्ती या आर्थिक घटकात विसंगती निर्माण होते तेव्हा त्याचा परिणाम समाजव्यवस्थेवर होत असतो. साहजीकच समाजाची अवस्था इतिहासाच्या एका कालखंडातून दुसऱ्या कालखंडात जात असते.

**◆ धर्माला गौण स्थान :**

ऐतिहासिक भौतिकवादात मार्क्सने धर्माला काहीच स्थान दिले नाही. मार्क्सच्या मते, 'धर्म म्हणजे अफूची गोळी आहे.' धर्म म्हणजे एक नशा आहे; ती अफूच्या नशेप्रमाणे आहे. नशा साधारणतः दुःख विसरण्यासाठी केली जाते. तसेच दुःखाला विसरण्यासाठी धर्माचा आश्रय घेतला जातो. धर्माच्या नशेत मनुष्य सुखी जीवनाचे चित्र रेखाटतो परंतु ती त्याची शुद्ध फसवणूक असते. मनुष्याच्या या भावनेचा फायदा भांडवलदार घेत असतात. लोकांनी धर्माच्या नशेतच रहावे, सुखी होण्याची त्यांनी केवळ स्वप्ने पहावीत. यातच भांडवलदारांचे हित असल्यामुळे भांडवलदार धार्मिक स्थळे बांधून दुःखीजणांच्या आश्रयाची व्यवस्था करतात. भांडवलशाहीत धर्माला अधिक स्थान असते. मार्क्सच्या विचारात मात्र धर्माला अजिबात स्थान नाही.

मार्क्सच्या मते, समाजाचे वर्तमान स्वरूप एकाएकी निर्माण झालेले नाही. समाजात परिवर्तन होत गेले. इतिहासात समाजाला विविध अवस्थेतून जावे लागले, भविष्यातही अनेक अवस्थांतून जावे लागणार आहे. ऐतिहासिक काळात समाजाचा विकास कसा होत गेला व समाजाला वर्तमान स्वरूप कसे प्राप्त झाले हे मार्क्सने ऐतिहासिक बदलाच्या पुढील पाच अवस्थातून सांगितले आहे.

१) आदिम व्यवस्था किंवा प्राचीन साम्यवाद

२) गुलामगिरीचा काळ

३) सरंजामशाहीची अवस्था

४) भांडवलशाहीचा कालखंड

५) समाजवादी अवस्था

**१) आदिम व्यवस्था किंवा प्राचीन साम्यवाद** (Primitive Communism)

ही मानवी विकासाची प्रारंभिक अवस्था मानली जाते. या अवस्थेत लोक समुहवृत्तीतून सामाजिक जीवन जगत होते. कंदमुळे, फळे खाऊन आणि प्राण्यांची शिकार करून उदरनिर्वाह करीत होते. त्यावेळी व्यक्तीगत संपत्ती नव्हती. समाजात वर्गभेद नव्हता. त्यामुळे वर्गसंघर्षही नव्हता. उत्पादनाची साधने अत्यंत अविकसीत होती. दगडापासून बनविलेल्या हत्यारांचा वापर करून लोक आपले संरक्षण करीत असत. उत्पादनाच्या साधनावर समुहाची मालकी होती व उत्पादनाचा लाभ सर्वांना मिळत होता. सर्वच गोष्टींवर सार्वजनिक अधिकार होता. म्हणून मार्क्स याला प्राचीन साम्यवादाचे युग म्हणतो.

**२) गुलामगिरीचा काळ** (Slavery)

प्राचीन साम्यवादात काळाच्या ओघात परिवर्तन होत गेले, लोकसंख्या वाढत गेली, मनुष्याच्या गरजा वाढू लागल्या. उपजिवीकेसाठी नवीन साधनांची आवश्यकता वाटू लागली. शेती व्यवसायास सुरुवात झाली. कुटूंबसंस्था निर्माण झाली. जमिनीवर खाजगी मालकी प्रस्थापित झाली. ज्या व्यक्तीजवळ शेती व संपत्ती होती तो मालक झाला. शक्ती आणि संपत्ती थोड्या लोकांच्या हातात एकवटल्या. इतर लोक त्यांच्या आश्रयावर राहू लागले. त्यामुळे समाजात स्वामी (मालक) व दास (गुलाम) निर्माण झाले. गुलाम आपल्या स्वामीसाठी राबत होते. उदरनिर्वाहासाठी मजुरी करीत होते. अशाप्रकारे समाजात मालक-गुलाम असे दोन वर्ग निर्माण झाले व गुलामगिरीचे युग आले.

**३) सरंजामशाहीची अवस्था** (Feudalism)

सरंजामशाही अवस्थेला सामंतशाहीची अवस्था असेही म्हटले जाते. गुलामगिरीच्या युगातून समाजाने सामंतशाहीत पदार्पण केले. स्वामी-गुलाम वर्गसंघर्षातून राजसत्ता निर्माण झाली. राजाने आपल्या सहकारी काही व्यक्तींना जमिनी दिल्या. त्या व्यक्ती जमिनदार किंवा सामंत बनल्या. त्यांनाच सरंजामदार किंवा जमिनदार म्हटले जात असे. सरंजामदार वर्ग हा शेतकरी व शेतमजूर यांच्याकडून शेतात काम करवून घेत असे. या शेतात

राबणाऱ्या वर्गाला भूदास असे म्हटले जात. भूदास शेतात राबत. त्याच्या मोबदल्यात त्यांना उदरनिर्वाहापुरते अन्नधान्य मिळत होते. सामंतांनी शेतमजुरांचे खूप शोषण केले, मोबदलाही अत्यल्प दिला जात असे, त्यामुळे मजूरवर्गात असंतोष निर्माण होऊन त्यातून सरंजामदार-भूदास यांच्यात संघर्ष निर्माण झाला.

**४) भांडवलशाहीचा कालखंड** (Age of Capitalist Society) **:**

सरंजामशाहीत मजूर वर्गाचे अतोनात शोषण होत असल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला होता. राजा व सरंजामदार ह्यांच्याविरुद्ध मजुरांचा संघर्ष झाला. १६८८ मध्ये इंग्लंडमध्ये रक्तहीन राज्यक्रांती झाली आणि १७८९ मध्ये फ्रान्समध्ये क्रांती झाली. पुढील काळात शास्त्रीय व तांत्रिक शोधामुळे उत्पादनात वाढ झाली. मोठमोठे उद्योगधंदे निर्माण होऊन उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण झाले. उत्पादनाच्या साधनांवर एकाधिकार निर्माण झाला. समाजातील जुनी व्यवस्था बदलली व नव्या युगाचा आरंभ झाला. मोठ्या उद्योगधंद्यामुळे लहान उद्योगधंदे नष्ट झाले. नवनवीन यंत्रे निर्माण झाली. मोठ्या उद्योगधंद्यातील उत्पादनाची साधने ज्यांच्याजवळ होती ते भांडवलदार झाले. त्यांनी राजकीय सत्ताही आपल्या ताब्यात घेतली. श्रमिक लोक पोटासाठी भांडवलदारावर अवलंबून राहू लागले. भांडवलदार श्रमिकांना कमी वेतन देऊन अधिक काम करवून घेऊन त्यांची पिळवणूक करू लागला. त्यामुळे समाजात भांडवलदार-श्रमिक असे दोन वर्ग निर्माण झाले. श्रमिकांना शोषण असह्य झाले त्यामुळे त्यांचा संघर्ष सुरू झाला.

**५) समाजवादी अवस्था** (Socialism)

समाजवादी अवस्थेला साम्यवादी समाजरचना असेही म्हटले जाते. मार्क्सने भांडवलशाहीत होणारे मजुरांचे आर्थिक शोषण व त्यातून होणारा वर्गसंघर्ष याचे स्पष्टीकरण करून नवीन समाजव्यवस्था कशी प्रस्थापित करता येईल याचे विवेचन "A contribution to the Critique of Political Economy" या ग्रंथात केले आहे. मार्क्सच्या मते, समाजवाद म्हणजे भांडवलदार व साम्यवाद यामधील अंतरिम व्यवस्था होय. मार्क्सचा समाजवाद आणि समाजवाद यामध्ये बरेच अंतर आहे. मार्क्सचा समाजवाद म्हणजे श्रमिकांची हुकूमशाही होय. भांडवलशाहीत भांडवलदार आणि श्रमिक यांच्यातील संघर्ष अत्यंत तीव्र स्वरूपात होत जाऊन त्याचे रुपांतर क्रांतीत होऊ शकते. भांडवलदार जेवढ्या जास्त प्रमाणात कामगारांचे शोषण करतील तसे कामगारांच्यातील असंतोष वाढत जाऊन कामगारवर्गाची क्रांती होऊन, कामगार वर्गाची हुकूमशाही निर्माण होईल. काही काळ कामगारांची हुकूमशाही राहील्यानंतर उत्पादनसाधनांची व संपत्तीची मालकी समाजाची होईल. समाजात कोणताही वर्ग राहणार नाही, वर्गविहीन समाजाची निर्मिती होईल. त्यामुळे वर्गसंघर्षही होणार नाहीत व राज्यसंस्थेची गरज भासणार नाही. समाज राज्यविरहित होईल व साम्यवादी समाजव्यवस्था निर्माण होईलच असे मार्क्सने म्हटले आहे.

मार्क्सच्या मते, 'आजपर्यंतचा इतिहास म्हणजे वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. परस्परविरोधी वर्गांच्या संघर्षातून विकास होत आलेला आहे. वर्गसंघर्षाच्या परिणामातून शेवटी साम्यवादी समाजव्यवस्था स्थापन होईल. अशाप्रकारे मार्क्सने इतिहासाच्या भौतिकवादी मीमांसेतून एका नव्या समाजवादी समाजरचनेची कल्पना मांडली आहे.

**मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादावरील टीका**

मार्क्सने मांडलेल्या ऐतिहासिक भौतिकवादी विचारांवर विविध विचारवंतांनी पुढील आधारावर टीका केली आहे.

**१) मानवी जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान**

मार्क्सने धर्मावर अत्यंत कठोर टीका केली आहे. धर्माला अफूची गोळी म्हटले आहे. पण मार्क्स हे विसरतो की, मनुष्याला भौतिक वस्तूंचा जसा मोह असतो तसाच अध्यात्मिक सुखाचाही तो भुकेला असतो. मनुष्य जीवनात धर्माला महत्त्वाचे स्थान आहे. एखाद्या गोष्टीतून मानवाला प्रेरणा मिळत असेल तर त्याला विरोध करण्यात अर्थ नाही. धर्म मनुष्याच्या जीवनातील आशास्थान असते. भौतिक वस्तूंनी जर सुख प्राप्त झाले असते तर कुठेच नैराश्य दिसले नसते.

**२) राज्यविहीन समाजाचे वर्णन काल्पनिक**

मार्क्सने केलेले राज्यविहीन समाजाचे वर्णन काल्पनिक स्वरूपाचे वाटते. कारण तशा प्रकारचा समाज आतापर्यंत कोठेही निर्माण झाला नाही व भविष्यातही होण्याची शक्यता नाही. उलट राज्याची आवश्यकता दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे राज्य ही अत्यावश्यक संस्था आहे ती विरून न जाता भक्कम बनत आहे.

**३) अपूर्ण व एकांगी सिद्धांत**

मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचे केलेले विवेचन एकांगी व अपूर्ण वाटते. या सिद्धांताने आर्थिक तत्त्वालाच प्राधान्य दिले. आर्थिक घटकच परिवर्तनाला कारणीभूत आहे असे मार्क्सने म्हटले. वास्तविक आर्थिक तत्वाबरोबरच मनुष्याच्या भावना, द्वेष, राग, विचार, धार्मिक विरोध, देशप्रेम या घटकांचादेखील इतिहास घडविण्यात महत्त्वाचा वाटा आहे. या घटकांकडे मार्क्सने दुर्लक्ष केले आहे.

**४) विकासात राष्ट्रीय चळवळीचे महत्त्व**

विविध चळवळींचे मानवी समाजाचा इतिहास बदलण्यात महत्त्वाचे योगदान आहे. राष्ट्रवादी विचारांतून निर्माण झालेल्या विविध राष्ट्रीय चळवळींमुळेही इतिहासात परिवर्तन झाले आहे, अशा चळवळींचे महत्त्व नाकारता येणार नाही.

**५) थोर पुरुषांचे कार्य**

ऐतिहासिक परिवर्तन करण्यामागे अनेक थोर पुरुषांनी महत्त्वाचे योगदान दिलेले असते. त्यांच्या कार्याचे महत्त्व नाकारता येणार नाही. गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, मार्टिन ल्यूथर, टॉलस्टॉय, महात्मा गांधी यांनी मानवी व्यवहाराला नवीन दिशा देण्याचे कार्य केले आहे. इतिहास घडविण्यात अशा थोर व्यक्तींचे कार्य व व्यक्तिमत्त्व कारणीभूत ठरले आहे. मात्र याचा विचार मार्क्सने कोठेही केलेला नाही.

६) विचारात विरोधाभास

टीकाकारांच्या मते, मार्क्सच्या विचारात विरोधाभास आढळतो. इतिहास गतिशील आहे असे तो म्हणतो आणि इतिहासाची गती राज्यविहीन समाज निर्माण झाल्यानंतर थांबेल असेही तोच म्हणतो. राज्यविरहीत समाजरचना शेवटची अवस्था असेल तर इतिहासाला गतिशील कसे म्हणता येईल? अशाप्रकारे मार्क्सच्या या विचारात विसंगती वाटते.

७) समाजाची विभागणी चुकीची

इतिहासाच्या प्रत्येक अवस्थेत मार्क्सने समाजाची दोन वर्गात विभागणी केली आहे. ती चुकीची वाटते. उत्पादनाची साधने मालकीची असणारा एक श्रीमंत वर्ग आणि उत्पादनाची साधने हातात नसणारा, श्रम करणारा गरीब वर्ग अशा दोन वर्गात विभागणी करून त्यांच्यात वर्गसंघर्ष होतो असे म्हटले आहे, परंतु या दोन वर्गांशिवाय समाजात तिसरा वर्ग म्हणजे मध्यम वर्ग असतो व तोही समाजाच्या विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडतो. याकडे मार्क्सचे दुर्लक्ष झाले आहे. अशी टीकाकारांनी टीका केली आहे.

८) केवळ आर्थिक शक्ती सत्ताप्राप्तीचा मार्ग नव्हे

मार्क्सच्या मते ज्याच्याकडे आर्थिक शक्ती आहे, उत्पादनाची साधने ज्याच्या मालकीची आहेत ते राजकीय सत्ता प्राप्त करतात व राजकीय सत्तेचा उपभोग घेतात. टीकाकारांच्या मते आर्थिक शक्तीशिवाय बुद्धी, साहस व कपट या मार्गानेही राजकीय सत्ता प्राप्त करता येते. केवळ तो एकमेव मार्ग नाही.

९) उत्क्रांतीच्या मार्गानेही विकास

क्रांतीच्या मार्गाने किंवा विरोध विकासाच्या पद्धतीने समाजात बदल होतात असे मार्क्सने म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते क्रांती ऐवजी उत्क्रांतीच्या मार्गानेही समाजात बदल घडवून आणता येतात. वर्गसंघर्षाऐवजी वर्गसमन्वय घडवूनही विकास घडवून आणता येतो व तो समाजाला पोषक ठरतो.

मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादावर टीकाकारांनी जरी टीका केली असली तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. जेवढ्या जास्त प्रमाणात टीका होते तेवढा जास्त सत्यांश त्या विचारात असतो. मार्क्सने मानवी जीवनात आर्थिक कारणाला जे महत्त्व दिले त्याचा परिणाम इतिहासावर कसा झाला याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे इतिहासाचे योग्य चित्र दाखविण्याचे कार्य या सिद्धांताने केले अहे असे म्हणावे लागेल.

## २.२.२ मार्क्सचे भांडवलशाहीबद्दलचे विचार :

मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेचे सखोल व तर्कसंगत चिंतन केले होते. आर्थिक दृष्टीकोनातून मानवी समाजाचे विश्लेषण मार्क्सने केले. पैसा, यंत्रे, मालमत्ता, इमारती, मजुरी यांना मार्क्सने भांडवल ही संज्ञा वापरली. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीमुळे औद्योगिकीकरण झाले. उद्योग चालविण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री उभारण्यासाठी भांडवल आवश्यक असते त्यामुळे भांडवलदार (बुर्झ्वा–Bourgeois) निर्माण झाले. उत्पादनाच्या साधनांची मालकी त्यांच्या हाती आली. साहजीकच उत्पादनाचे वितरणही त्यांच्याच हाती आले.

भांडवलशाहीत उद्योगांमध्ये काम करणारा मजुरांचा वर्गही निर्माण होतो. मजुरांजवळ फक्त श्रमशक्ती असते. बाजारातील वस्तूंप्रमाणे मजुरांना मिळेल त्या किंमतीत आपले श्रम विकावे लागतात. भांडवलदार कमीत कमी किंमत देऊन मजुरांचे श्रम विकत घेतो व नफा मिळवितो. त्यामुळे भांडवलदार अधिकाधिक श्रीमंत होत जातात व मजूर अधिकाधिक गरीब बनत जातो.

भांडवलशाहीत उत्पादनाची साधने, कामगारांचे पगार, मजुरी, वितरण, नफा यावर भांडवलदारांचे नियंत्रण असते. भांडवलदार कमीत कमी मजुरी देऊन जास्तीत जास्त उत्पादन काढीत असतो. मजुरांना त्यांच्या श्रमाच्या प्रमाणात मजुरी देत नाही. उत्पादित वस्तू बाजारात विकून जादा नफा मिळवित असतो ही प्रक्रिया अखंडपणे चालू असते. परिणामी संपत्तीचे केंद्रीकरण होते.

औद्योगिक प्रगतीच्या काळात भांडवलदार वर्गांनी कारखाने सुरू केले. यंत्रांचा, विजेचा शोध लागल्यामुळे उत्पादन वाढले. ग्रामीण उद्योगधंदे आणि कुटिरोद्योग कमी होऊ लागले. काही बंदही पडले. त्यामुळे ग्रामीण भागातील बेकार तरुणांनी शहरांकडे धाव घेतली. कारखान्यांसमोर मजुरांच्या रांगा लागल्या. याचाच फायदा भांडवलदारांनी उचलला. कमी मजुरीत मजूर उपलब्ध होऊ लागले. भांडवलदारांनी आर्थिक शक्तीद्वारे राजकीय सत्ता मिळविली व आपल्याला अनुकूल कायदे करून घेतले. भांडवलदारांच्या नफ्याचे प्रमाण वाढले. संपत्तीचा ओघ त्यांच्याकडेच जाऊ लागला. याउलट मजुरांची अवस्था झाली. मजुरीत वाढ झाली नाही. दिवसेंदिवस बारा ते चौदा तास कारखान्यात काम करूनही मजुरीचे प्रमाण वाढले नाही. त्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात वाढ झाली, त्यांची क्रयशक्ती कमी झाली. पोटाला चिमटे देऊन तो कसेबसे जीवन जगू लागला. कुटूंबाचा खर्च भागविला जाणे शक्य झाले नाही. श्रमजीवी वर्ग अधिक गरीब होऊ लागला.

भांडवलशाहीत श्रमिकांचे दिवसेंदिवस अधिकच शोषण होत गेले. त्याचा परिणाम भांडवलदार व श्रमिक असे दोन प्रमुख वर्ग समाजात निर्माण झाले. त्यांच्यात संघर्ष होणे अपरिहार्यच होते. मालकाला कामगाराने कामावर आले पाहिजे यासाठी सक्ती करण्याची गरज नाही. कामगार 'स्वेच्छेने' नोकरी स्वीकारतात. उदरनिर्वाहासाठी त्यांच्याकडे दुसरे साधन नसल्यामुळे उपाशीपोटी मरण्यापेक्षा कारखान्यात कामाला जातात. भांडवलशाहीत माणूस विकला जात नाही तर त्याचे श्रम विकले जातात. सरंजामशाही किंवा गुलामगिरीच्यासारखे उघडे नागडे शोषण नाही पण त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने शोषण चालू असते.

**भांडवलशाहीचा विनाश**

मार्क्सच्या मते, भांडवलशाही व्यवस्थेचा विनाश अटळ असतो. कारण भांडवलशाहीतच तिच्या विनाशाची बीजे पेरलेली असतात. भांडवलदार हा नफ्याच्या मागे लागलेला असतो त्यामुळे समाजाचे आर्थिक शोषण तो सतत करीत असतो. समाजाचे शोषण अनेक वर्षेचालल्यानंतर शेवटी समाज इतका दरिद्री बनतो की, त्याचे शोषण अशक्य होते. परंतु भांडवलदार नफा मिळवितच रहातो. त्यासाठी तो जगातील इतर देशांत बाजारपेठा शोधतो व आपल्या वस्तू खपवितो. त्यासाठी राज्याच्या सत्तेचा वापर तो करतो. सुरक्षित बाजारपेठेसाठी वसाहती आणि साम्राज्य निर्माण करतो. अनेक राष्ट्रे अशा बाजारपेठा मिळाव्यात म्हणून प्रयत्न करीत असतात. त्यांच्यात परस्पर संघर्ष, युद्धे उद्‌भवतात व त्यात भांडवलशाही राष्ट्रे नष्ट होतात.

राष्ट्राच्या अंतर्गतही भांडवलदारांचा परस्परांशी संघर्ष, स्पर्धा चालू असते. मागणीपेक्षा जास्त उत्पादन, बेकारी, आर्थिक मंदी, अनिर्बंध स्पर्धा इत्यादी गोष्टी फोफावत जातात. मजूर वर्ग आपल्या अन्यायाविरुद्ध संघटित होतो. तो भांडवलदारांच्याविरुद्ध आवाज उठवितो. संघटित मजूर क्रांती करून भांडवलशाही व्यवस्था संपुष्टात आणतो. अशाप्रकारे भांडवलदार मजुरांचे जेवढ्या जास्त प्रमाणात शोषण करतात. तेवढ्या लवकर भांडवलशाहीचा विनाश ठरलेला असतो, असे मार्क्स म्हणतो. भांडवलदार स्वतःच्या नाशास कारणीभूत ठरणारा कामगार वर्ग निर्माण करतात. आपल्या मृत्यूचा खड्डा ते स्वतःच खणून ठेवतात. कामगारवर्ग आपल्या जन्मापासून भांडवलदारवर्गाविरुद्ध लढा देत असतो. प्रारंभी तो व्यक्तीशः लढतो. नंतर सर्व कामगार संघटीत होऊन लढतात. हा लढा ते विशिष्ट भांडवलदाराविरुद्ध न देता उत्पादन साधनाविरुद्धही देतात म्हणून त्यांचा विजय व भांडवलदारांचा पाडाव निश्चित असतो.

◆ **भांडवलशाहीची काही वैशिष्ट्ये :**

**१) नफा मिळविणे :** भांडवलशाहीत नफा मिळविणे हा महत्त्वाचा उद्देश असतो. समाजसेवा, राष्ट्रसेवा, मानवसेवा असा उद्देश न ठेवता जास्तीत जास्त नफा मिळविणे. त्यासाठी नवीन यंत्रे आणणे, कमी मजुरी देणे, उत्पादन वाढविणे व नफा मिळविणे हे भांडवलदाराचे ध्येय्य असते.

**२) कामगारांचे शोषण :** भांडवलदार वर्गाने अतिनफ्याची महत्त्वाकांक्षा ठेवल्यामुळे श्रमिकांना श्रमाच्या प्रमाणात मजुरी दिली जात नाही. कामाच्या वेळेचे बंधन नसते. जास्तीत जास्त वेळ काम करवून घेऊन, कामगारांचे शोषण केले जाते. उपाशी मरण्यापेक्षा मालक म्हणतील तितके तास काम करण्यास कामगार तयार होतात. कारण त्यांना श्रम साठवता येत नाहीत.

**३) दारिद्र्यात वाढ :** मजुरांची वाढती उपलब्धता आणि भांडवलदारांनी आणलेली नवीन यंत्रे यामुळे बेकारीत व दारिद्र्यात वाढ होते. मानवी श्रमाची कामे यंत्रे करतात. मजूर वर्ग कामाच्या शोधात दारोदारी फिरू लागतो. साहजिकच दारिद्र्यात वाढ होते.

**४) मक्तेदारीत वाढ :** भांडवलशाहीत समाजातील मोजक्या, मूठभर लोकांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण झालेले असते. उत्पादनाची मालकी, उत्पादन साधनांची मालकी त्यांच्याकडेच असते. कोणते उत्पादन घ्यायचे, खरेदी-विक्री, किंमत, नफा, वितरण या सर्वांवर त्यांचीच मक्तेदारी निर्माण होते.

**५) राज्यसंस्थेचा वापर स्वतःसाठी :** भांडवलदार वर्ग आपले वर्गीय संबंध सुरक्षित ठेवण्यासाठी राजकीय सत्ता हस्तगत करीत असतो. आपल्याला अनुकूल आणि श्रमिकांना प्रतिकूल असे कायदे करवून घेतो. आर्थिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व राजकीय क्षेत्रातही आपले वर्चस्व निर्माण करतो. राज्यसंस्था एक पिळवणूकीचे साधन बनते.

**६) सामाजिक प्रश्नांत वाढ :** भांडवलशाहीतून आणि औद्योगिकरणातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. वीज, वाहतुकीची साधने, तंत्रज्ञान यामुळे शहरीकरणात वाढ हाते. ग्रामीण लोकांचा शहराकडे ओघ

वाढतो. ग्रामीण लघुउद्योग बंद पडू लागतात. शहराला झोपटपट्टी, जुगार, चोरी, गुन्हेगारी अशा समस्या भेडसावू लागतात.

**७) कामगार–भांडवलदार संघर्ष :** भांडवलदार कामगारांच्या शोषणाची परिसीमा गाठतो. दुसरीकडे कामगार आपल्या गरिबीचे आणि अन्यायाचे टोक गाठल्यानंतर संघर्ष करण्यास तयार होतो. संघटना निर्माण करतो, सर्व कामगार एकत्र येतात त्यातून दोन्ही वर्गात संघर्ष होतो. संघर्षाचा शेवट कामगारांच्या विजयात आणि भांडवलदारांच्या नाशात होतो.

**◆ मार्क्सच्या भांडवलशाही सिद्धांतावरील टीका :**

मार्क्सने भांडवलशाहीतील केंद्रीकरण, तिचा विनाश इ. विचार मांडले, परंतु अनेक टीकाकारांनी त्यावर पुढीलप्रमाणे टीका केली आहे.

१) भांडवलशाहीत कामगारांचा विजय आणि भांडवलदारांचा विनाश हे मार्क्सचे विचाराचे सूत्र पूर्ण सत्य नाही अशी टीका केली जाते. भांडवलशाहीचे अस्तित्व कायम राहावे कामगार-मालक दोन्ही वर्गांच्याही हिताचे असते. त्यांच्यात द्वंद्व असले तरी दोघेही समन्वयाने ते मिटवितात असे टीकाकारांचे मत आहे.

२) समाजाच्या विकासासाठी भांडवलशाही आवश्यक असते असे टीकाकारांनी म्हटले आहे. भांडवलदार स्वतःसाठी नफा कमवितो तो अनेकवेळा सामाजिक, शैक्षणिक, सार्वजनिक कामासाठी पैसा मदत म्हणून देत असतो. त्याच्या मदतीवर अनेक सामाजिक, शैक्षणिक संस्था उभ्या राहतात. बेकारांना काम मिळते त्यामुळे सामाजिक विकासासाठी भांडवलशाही आवश्यक आहे.

३) टीकाकारांच्या मते, भांडवलशाहीमुळे राष्ट्राचे उत्पादन वाढून आर्थिक प्रगती होते. जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनामुळे जनतेच्या गरजा पूर्ण होतात. समाजाची व पर्यायाने राष्ट्राची प्रगती होते.

मार्क्सच्या भांडवलीशाहीविषयी विचारांवर वरीलप्रमाणे टीका असली तरी या व्यवस्थेतील दोष दाखविण्याचा त्याने प्रयत्न केला. ही व्यवस्था शोषण करणारी आहे तिच्यात पैसा हेच सर्वस्व मानून मानवी जीवनाचे मूल्य नष्ट होत जाते हे दाखवून देण्याचे कार्य मार्क्सने केले.

### २.२.३ **अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत** (Theory of Surplus Value) :

भांडवलदार श्रमिकांचे शोषण कशा रितीने करतात हे दाखवून देण्यासाठी कार्ल मार्क्स यांनी आपल्या 'दास कॅपिटल' (Das Capital) या ग्रंथात 'अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत' मांडला आहे. मजुरांचे शोषण भांडवलशाहीत कसे होते आणि गरीब अधिक गरीब, तर श्रीमंत अधिक श्रीमंत कसे होतात हे मार्क्सने या सिद्धांतातून शास्त्रीय दृष्टीकोणातून सिद्ध केले आहे. मार्क्सच्या मते, कोणत्याही वस्तूचे मूल्य (किंमत) हे त्या वस्तूवर किती प्रमाणात श्रम खर्च झालेत ह्यावरून ठरते. मार्क्सच्या या विचारांवर रिकार्डोच्या विचारांचा प्रभाव पडला आहे. कामगार आणि त्याचे श्रम हेच एकमेव अतिरीक्त मूल्य निर्माण करणारे साधन ठरते. एखाद्या वस्तूची निर्मिती करण्यासाठी जे श्रम लागतात त्या श्रमावर त्या वस्तूचे मूल्य ठरविले जाते असे मार्क्स म्हणतो. श्रम हे मूल्याचे कारण आणि परिणाम आहे. श्रम हे तत्त्व पायाभूत मानून मार्क्सने अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत मांडला.

भांडवलदार मजुराला त्याच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला न देता, कमी मोबदल्यात अधिक वस्तू उत्पादन करून घेतात व अधिक नफा मिळवितात. मजुरांचे आर्थिक शोषण करून नफा मिळविण्याची ही जी पद्धती अहे त्यालाच 'नफ्याचा सिद्धांत' असेही म्हटले जाते.

मार्क्सच्या मते, प्रत्येक वस्तूचे मूल्य तिच्या आवश्यकतेनुसार किंवा उपयोगितेनुसार ठरविले जाते. तसेच त्या वस्तुनिर्मितीसाठी खर्च केल्या जाणाऱ्या श्रमानुसारही वस्तूचे मूल्य ठरविले जाते. मार्क्सने यापैकी दुसऱ्या तत्त्वाचा स्वीकार केला. मार्क्सच्या मते, वस्तूचे मूल्य हे तिच्यावर खर्च झालेल्या सामाजिक श्रमावरून ठरते. बाजारात विक्रीसाठी आलेल्या वस्तूंमध्ये एक समान बाब असते ती म्हणजे ती वस्तू तयार करण्यासाठी खर्च केले जाणारे सामाजिक श्रम होय. मानवी श्रमाशिवाय कोणतीही वस्तू निर्माण होत नाही. निरनिराळ्या वस्तूंची किंमत कमी अधिक असते कारण ज्या वस्तूच्या निर्मितीसाठी जास्त श्रम व वेळ खर्च होतो त्या वस्तूची किंमत जास्त असते. मजुराजवळ उत्पादननिर्मितीसाठी लागणारे भांडवल व अन्य साधने नसतात. कामगाराकडे फक्त श्रम हा घटकच असतो. मजुराजवळ उत्पादनाची साधने नसल्यामुळे त्याला भांडवलदाराच्या कारखान्यात आपले श्रम विकावे लागतात. आपल्या श्रमाच्या मोबदल्यात जी मजूरी मिळेल त्याच्यावर कुटूंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. मजुराला आपल्या श्रमाचा साठा करून ठेवता येत नाही. त्यामुळे भांडवलदार त्यांच्या असहाय्यतेचा फायदा घेऊन त्यांची पिळवणूक करतात.

मार्क्सच्या मते, 'अतिरिक्त मूल्य' म्हणजे मजुराने निर्माण केलेल्या व त्याला मिळणाऱ्या मूल्यातील अंतर होय. एखाद्या वस्तुनिर्मितीसाठी दिली जाणारी जी मजूरी असते तिच्यापेक्षा त्या वस्तूची बाजारातील किंमत जास्त असते. म्हणजे जेवढी जास्त किंमत असते किंवा तफावत असते तिला 'अतिरिक्त मूल्य' असे मार्क्सने म्हटले आहे. अतिरिक्त मूल्य म्हणजे मजूराने निर्माण केलेल्या आणि भांडवलदाराला प्रत्यक्ष मिळणाऱ्या मूल्यातील अंतर होय. थोडक्यात अतिरिक्त मूल्य म्हणजे भांडवलदार एखाद्या वस्तूची ग्राहकाकडून घेत असलेली किंमत वजा वस्तूला निर्मितीसाठी लागलेला कच्चा माल व मजुराला दिलेली मजूरी होय. मार्क्सच्या मते, भांडवलदार कमावीत अलेला हा नफा म्हणजे श्रमिकांचे शोषण आहे. कारण वस्तूला जी किंमत येते ती मजुरांच्या श्रमामुळे, त्यामुळे मजुराला त्याच्या श्रमाचा योग्य वाटा मिळाला पाहिजे. भांडवलदार तो देत नाहीत, श्रमिकांवर अन्याय करतात. श्रम नाशिवंत असतात अशा परिस्थितीत त्यांच्या लाचारीचा फायदा भांडवलदार घेतात.

कामगाराची मजुरी आणि त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची बाजारातील किंमत यात जे अंतर असते ते अतिरिक्त मूल्य होय. जसे खुर्ची तयार करण्यासाठी मजुराला ३० रुपये मिळतात. खुर्चीसाठी लागणाऱ्या सामुग्रीची किंमत ३० रुपये आहे. अशाप्रकारे खुर्चीची किंमत ६० रुपये झाली ती खुर्ची भांडवलदार बाजारात १०० रुपयाला विकतो. म्हणजेच ४० रुपये त्याचा नफा झाला. यालाच मार्क्स अतिरिक्त मूल्य म्हणतो. नफ्यावर केवळ भांडवलदाराचा अधिकार राहू नये तर श्रमिकांनाही त्यातील वाटा मिळाला पाहिजे. अतिरिक्त मूल्य भांडवलदारांच्या खिशात जाते. श्रमावरून वस्तूचे मूल्य ठरते. नुसत्या लाकडाच्या ठोकळ्याला बाजारात

फारशी किंमत नसते त्यापासून खुर्ची बनविल्यानंतर त्याच लाकडाच्या ठोकळ्याची किंमत वाढते. खुर्चीवर कलाकुसर करण्यासाठी जेवढे जास्त श्रम लागतील तेवढी त्या खुर्चीची किंमत वाढते.

अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत आपण कामाच्या तासाच्या आधारेही समजून घेऊ शकतो. समजा एक कामगार दररोज १० तास काम करतो आणि ५० वस्तू निर्माण करतो. त्या ५० वस्तूंवर कारखानदाराची मालकी असते. तो त्या ५० वस्तू प्रत्येकी १० रु. प्रमाणे विकतो व ५०० रुपये मिळवितो. मजुराला मजूरी देण्याइतके काम तो मजूर ५ तासातच करीत असतो. १० तासांपैकी ५ तासांचे श्रम आवश्यक असतात. कारण त्या ५ तासातच तो मजूर त्याला मिळणाऱ्या मजुरीइतके मूल्य निर्माण करतो. प्रत्यक्षात त्याला १० तास श्रम करावे लागतात. याचा अर्थ तो ५ तास अतिरिक्त जादा काम मालकासाठी करतो हेही अतिरिक्त मूल्य झाले.

कामगारांच्या या अतिरिक्त श्रमातून निर्माण होणारे मूल्य मालक एकटाच खातो. यालाच अतिरिक्त मूल्य असे मार्क्सने म्हटले आहे. मालक अतिरिक्त मूल्य सतत वाढविण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी तो कामगारांकडून जास्तीत जास्त तास काम करून घेतो. मजुरी मात्र तेवढीच देतो. मजुरांचे शोषण करतो.

**अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताचे परिणाम**

मार्क्सच्या मते, अतिरिक्त मूल्य मिळविण्यासाठी भांडवलदार विविध मार्गांचा अवलंब करतात, श्रमिकांच्या लाचारीचा फायदा उठवतात. श्रमिकांना आपले श्रम विकण्याशिवाय पर्याय नसतो. कारण श्रम नाशवंत असतात. श्रमाचा साठा करून ठेवता येत नाही. रोजच्या रोज काम मिळाले तर मजुरी मिळत असते. काही वेळा भांडवलदार कारखाने बंद ठेवून उत्पादन बंद करतात. माल साठवून ठेवतात व किंमती वाढल्यावर तो विकतात व अधिक नफा मिळवितात. त्यामुळे भांडवलदारांच्या अतिरिक्त मूल्य मिळविण्याच्या धोरणाचे परिणाम समाजात दिसतात.

१) श्रमिकांना त्याने केलेल्या श्रमाच्या मोबदल्यात वेतन मिळत नाही.

२) भांडवलदार अधिकाधिक श्रीमंत बनतात तर श्रमिकांची गरिबी वाढत जाते.

३) भांडवलदार-कामगार यांच्यातील दरी वाढत जाते व दोहोत वर्गीय संघर्ष सुरू होतो.

४) संपत्तीचे केंद्रीकरण भांडवलदारांच्या हातात होते.

५) भांडवलदार आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी राजकीय सत्तेचा वापर करतात.

**अतिरिक्त मूल्य सिद्धांतावरील टीका (दोष) :**

मार्क्सच्या अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतावर विविध दृष्टीकोनातून टीका केली जाते.

**१) केवळ मानवी श्रमामुळे वस्तूचे मूल्य ठरत नाही**

मार्क्सच्या मते, कामगारांच्या श्रमामुळेच वस्तू निर्माण होतात. श्रमशक्ती उत्पादनात महत्त्वाची आहे. वास्तविक श्रमाबरोबरच भांडवल, यंत्रसामुग्री, व्यवस्थापन, कच्चा माल, बाजारपेठ या सर्वांचा सहभाग वस्तूंचे मूल्य ठरविण्यामध्ये असतो. केवळ मजुरांच्या श्रमामुळे वस्तूंचे मूल्य ठरते असे, म्हणणे संयुक्तिक नाही.

**२) मानसिक श्रमाकडे दुर्लक्ष**

अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत केवळ शारीरिक श्रमाला महत्त्व देतो. मानसिक श्रमाकडे दुर्लक्ष केले आहे. उत्पादनात मानसिक श्रमदेखील महत्त्वाचे असतात. योग्य नियोजनासाठी विशेषज्ञांची गरज असते. नियोजनात गडबड झाली तर पूर्ण उत्पादन प्रक्रिया बंद पडू शकते. याकडे या सिद्धांताने दुर्लक्ष केले आहे.

**३) भांडवलदारांची जोखीम महत्त्वाची**

या सिद्धांतात भांडवलदारांची जोखीम लक्षात घेतली नाही. भांडवलदारांनी जोखीम घ्यायची, नुकसान झाले तर सोसायचे व नफ्याचा वाटा मात्र कामगारांना द्यायचा हे विचार तर्कशुद्ध वाटत नाहीत. जर फायद्यात कामगारांना समान वाटा पाहिजे तर नुकसान भरपाईत देखील त्याला समान वाटेकरी मानले पाहिजे.

**४) इतर खर्चाचा विचार नाही**

कोणतीही वस्तू तयार करताना भांडवलदारांना मजुरीशिवाय इतर बराच खर्च करावा लागतो. त्यामध्ये यंत्राची झीज, जागेचे भाडे, गुंतवलेल्या भांडवलावरील व्याज, कर, कच्चा माल, बाजारपेठ, मालाची सुरक्षितता या गोष्टींवर होणाऱ्या खर्चाचा मार्क्सने विचार केला नाही.

**५) भांडवलशाहीच्या गुणांकडे दुर्लक्ष**

मार्क्सने भांडवलशाहीकडे द्वेषातून पाहिले आहे अशी टीका केली जाते. भांडवलशाहीत काही गुणही असतात यावर मार्क्सचा विश्वास नसावा. भांडवलशाहीत केवळ दोषच असते तर ती केव्हाच नष्ट झाली असती परंतु आजही भांडवलशाही टिकून आहे.

**६) कामगारांचे कल्याण**

भांडवलदारांवर कामगारांच्या कल्याणाची जबाबदारी असते. त्यांच्या आरोग्यासाठी, सुव्यवस्थेसाठी बराच खर्च करावा लागतो. आकस्मिक घडणाऱ्या अपघातासाठी मोबदला द्यावा लागतो या खर्चाचा समावेश अतिरिक्त मूल्य सिद्धांतात केलेला नाही.

**७) तर्कशास्त्राच्या दृष्टीने योग्य नाही**

मार्क्सने मांडलेला अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत तर्कशास्त्राच्या दृष्टीने योग्य नाही. भांडवलदारांविरुद्ध श्रमिकांना क्रांती करण्यासाठी प्रोत्साहन देणारा हा सिद्धांत आहे. त्याने केवळ कामगार वर्गाचाच विचार केला आहे. भांडवदारांच्या बाजूने विचार केला नाही. कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी कामगार व भांडवलदार यांच्यात सामंजस्य निर्माण होणे गरजेचे असते. कामगारांना भांडवलदारांच्याविरुद्ध भडकविणे योग्य नाही. त्यामुळे हा सिद्धांत तर्कशुद्ध वाटत नाही.

अशाप्रकारे कार्ल मार्क्सच्या अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतावर टीका होत असली तरी या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. या सिद्धांताने कामगारांचे, शोषण कसे केले जाते हे दाखवून दिले. कामगारांना जागृत

करून संघटित करण्याचे कार्य या सिद्धांताने केले. श्रमिकांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे याची जाणीव भांडवलदारांना करून देण्यास आणि कामगारांच्या होणाऱ्या आर्थिक शोषणास मर्यादा घालण्यास हा सिद्धांत उपयुक्त ठरला आहे.

### २.२.४ **वर्गसंघर्षाचा सिद्धांत** (Theory of Class Struggle) :

मार्क्सच्या मते, इतिहासाचा आधार द्वंद्वात्मक भौतिकवाद आहे. इतिहासाच्या भौतिकवादाचाच एक भाग म्हणजे वर्गसंघर्ष होय. त्याच्या मते प्रत्येक वस्तूत दोन परस्पर विरोधी तत्त्वे असतात. त्या दोन तत्त्वांच्या संघर्षातून पदार्थाचा विकास होत असतो. सुरुवातीपासून समाजात दोन परस्परविरोधी वर्ग राहात आले आहेत. आपल्या हितसंबंधाचे रक्षण करताना त्या दोघात संघर्ष होतो.

मार्क्सने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या ग्रंथात वर्गसंघर्षाचे विश्लेषण केले आहे. त्याच्या मते, ''आजपर्यंतचा संपूर्ण समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास होय.'' प्राचीन काळापासून समाजाच्या प्रत्येक अवस्थेत परस्परविरोधी दोन वर्ग निर्माण झाल्याचे दिसूत येते. स्वामी-गुलाम, उच्चकुलीन-सामान्य, जमीनदार-भूदास, कारखानदार-कामगार इ. एक वर्ग उत्पादनाच्या साधनांची मालकी असणारा तर दुसरा आपल्या अस्तित्वासाठी लढणारा, श्रम करणारा होय. एक वर्ग शोषक तर दुसरा शोषीत असतो. दोन्ही वर्गांचा सतत संघर्ष चालत आलेला आहे. त्या संघर्षातून समाजाची उन्नती होत असते.

प्राचीन काळात मालकी आणि गुलाम, मध्ययुगामध्ये सरंजामदार आणि कुळे, भूदास तर आधुनिक भांडवलशाहीत भांडवलदार आणि मजूर असे वर्ग निर्माण झाले आहेत. भांडवलशाहीत श्रीमंत, धनिक वर्ग आपल्या संपत्तीच्या आणि उत्पादन साधनांच्या जोरावर श्रमिक, मजूर वर्गावर अन्याय, जुलूम करीत असतो. मार्क्सने संघर्षाची पुढीलप्रमाणे कारणे सांगितली आहेत.

**१) दोन्ही वर्ग परस्पर पूरक तरीही संघर्ष**

समाजातील दोन्ही वर्ग परस्पराला पूरक असतात तरीही त्यांच्यात संघर्ष होतो. भांडवलशाहीत भांडवलदार श्रमिकाशिवाय उत्पादन करू शकत नाही व श्रमिक कारखान्यात श्रम केल्याशिवाय जगू शकत नाहीत. तरीही त्यांच्यात संघर्ष होत असतो. कारण भांडवलदार अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी श्रमिकांचे शोषण करतात, त्यांच्यावर अन्याय, जुलूम करतात. राजकीय आणि सामाजिक संस्थांचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी करतात. मजुरांच्यात ज्यावेळी अन्यायाची जागृती होते ते संघटीत होतात तेव्हा दोहोंच्यात संघर्ष होतो.

**२) समाजातील आर्थिक विषमता**

समाजात असणारी आर्थिक विषमता हे संघर्षाचे मूळ कारण असते. मानवी इतिहासाच्या प्रारंभापासून एक वर्ग साधनसंपन्न तर दुसरा साधनविहीन राहिलेला आहे. त्यामुळे वर्गसंघर्ष इतिहासाचा स्थायी भाव आहे. ज्याच्या हाती उत्पादनाची साधने नाहीत तो वर्ग आपल्या अस्तित्वासाठी साधनसंपन्न वर्गाशी लढतो.

**३) श्रमिकांची अस्तित्वाची लढाई**

श्रमिकांचे अस्तित्व त्यांच्या श्रमाच्या विक्रीवर अवलंबून असते. श्रम विकत घेण्याची ताकद फक्त भांडवलदार वर्गाजवळ असते. भांडवलदार श्रमिकांचे श्रम अल्प मोबदल्यात विकत घेतो. जेवढी मजुरी भांडवलदार देतो तेवढ्यावर श्रमिकांना समाधान मानावे लागते व आपले अस्तित्व टिकवून ठेवावे लागते. कारण श्रम साठवून ठेवता येत नाहीत. त्यामुळे जगण्यासाठी, आपल्या अस्तित्वासाठी भांडवलदारांच्या बरोबर संघर्ष करावा लागतो.

**४) शासकाचा आपल्या हितासाठी संघर्ष**

शासक वर्ग आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी शासित वर्गाबरोबर संघर्ष करीत असतो. राजकीय व सामाजिक संस्थांचा उपयोग स्वतःच्या हितासाठी करून घेतो. परिवर्तनाला तो विरोध करतो. जुनी व्यवस्थाच टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतो. याउलट शोषीत वर्ग जुनी व्यवस्था नष्ट करून नवीन व्यवस्था निर्माण करण्यासाठी धडपडत असतो. त्यामुळे दोहोत वर्गसंघर्ष होतो.

मार्क्सच्या मते, भांडवलशाहीत भांडवलदार वर्ग उत्पादन साधनांच्या मालकीमुळे मजूरवर्गाची पिळवणूक करतो. भांडवलदार मजूरवर्गाची जेवढी जास्त पिळवणूक करतो तेवढी त्याची विनाशाकडे वाटचाल करण्याची गती वाढत असते. मार्क्सच्या मते, 'भांडवलदार आपली थडगी आपणच खणीत असतात' जेवढे मजुरांचे जास्त शोषण होईल तेवढ्या अधिक प्रमाणात मजूरवर्ग संघटित होतो व भांडवलशाहीविरोधी संघर्ष करतो. भांडवलशाहीची वाटचाल विनाशाकडे होते. श्रमिक अधिक संघटित होऊन क्रांती करतात. उत्पादनाच्या साधनांवर वर्चस्व प्रस्थापित करतात. अशाप्रकारे भांडवलशाही नष्ट होते. काही काळ श्रमिकांची हुकूमशाही निर्माण होते व नंतर वर्गविहीन समाज निर्माण होतो. त्यामुळे संघर्षाचा प्रश्नच राहणार नाही असे मार्क्सचे मत होते.

**◆ वर्ग संघर्षाची वैशिष्ट्ये**

**१) मानवी इतिहास वर्गसंघर्षाचा :** प्राचीन काळापासून कोणत्या ना कोणत्या स्वरूपाची समाजरचना होती. त्या दोन्ही वर्गामध्ये संघर्ष झाल्याचे दिसून येते. भांडवलशाहीत भांडवलदार आणि कामगार यांच्या लढ्याने उग्र स्वरूप धारण केले.

**२) संघर्षाचे स्वरूप आर्थिक असते :** मानवी इतिहासातील सर्व वर्ग संघर्षाचे मूळ आर्थिक स्वरूपाचे असते. इतिहासातील सर्व घडामोडी आणि परिवर्तन याच्या पाठीमागे आर्थिक प्रेरणा असतात. उत्पादनाची साधने हाती असणारा आणि नसणारा या दोन्ही वर्गात संघर्ष झाल्याचे दिसून येते.

**३) या संघर्षाचे स्वरूप द्वंद्वात्मक :** मार्क्सने सांगितलेल्या वर्गसंघर्षाचे स्वरूप द्वंद्वात्मक आहे. दोन्ही वर्ग परस्परांना पूरक व पोषक असूनदेखील विरोध विकासवादाच्या माध्यमातून हा वर्ग संघर्ष होत असतो.

**४) राज्य हे शोषणाचे साधन :** ज्यांच्या हाती उत्पादनाची साधने असतात तो आर्थिकदृष्ट्या सबल वर्ग राजकीय सत्ता हस्तगत करतो व भांडवलशाहीचा पूरक आणि श्रमिकांना मारक असे कायदे तयार करतो त्यामुळे कामगारांचे आर्थिक, सामाजिक शोषण होते म्हणून मार्क्सने राज्याला पिळवणुकीचे साधन म्हटले.

**५) वर्गसंघर्षात श्रमिकांचा विजय :** भांडवलशाहीत या वर्गसंघर्षात भांडवलशाहीचा नाश आणि श्रमिक कामगार वर्गाचा विजय निश्चित असतो. वर्गसंघर्षानंतर कामगारांची सत्ता प्रस्थापित होते. भांडवलशाही संपुष्टात येते.

◆ **वर्गसंघर्षावरील टीका :**

कार्ल मार्क्सने वर्गसंघर्षाचा सिद्धांत मांडून अर्थशास्त्र व राज्यशास्त्रात मोलाची भर घातली. त्याच्या या सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

**१) मध्यम वर्गाचा विचार केला नाही :** मार्क्सने वर्गसंघर्षाचा सिद्धांत मांडताना समाजातील शासक आणि शासीत भांडवलदार-कामगार अशा दोन वर्गांचाच विचार केला. समाजातील सर्वात मोठा असणारा मध्यम वर्ग याचा कुठेही उल्लेख केला नाही. वास्तविक भांडवलदार व मजूर यांच्यात संतुलन निर्माण करण्याचे काम मध्यम वर्ग करतो. परंतु मार्क्सने या वर्गाकडे दुर्लक्ष केले आहे.

**२) समाजाला हानीकारक सिद्धांत :** समाजाच्या व्यवस्थेसाठी सहानुभूती व बंधुभावाची आवश्यकता असते पण समाजाला युद्धभूमी बनविण्याचे कार्य वर्गसंघर्षाच्या सिद्धांताने केले. त्यामुळे वर्गसंघर्षाचा सिद्धांत द्वेषावर आधारित असून तो समाजाला हानीकारक आहे.

**३) अव्यवहार्य सिद्धांत :** आतार्यंतचा मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे असे मार्क्सने म्हटले, परंतु त्यास कोणताही पुरावा नाही. शास्त्रीय दृष्टीकोनातून या सिद्धांताचे समर्थन करता येत नाही. उलट या सिद्धांतामुळे समाजात दुष्कृत्याला बळ मिळेल त्यामुळे हा सिद्धांत अव्यवहार्य वाटतो.

**४) संघर्षातून विकास हे चुकीचे गृहीत :** मार्क्सने वर्ग संघर्षाच्या सिद्धांतात 'संघर्षातून विकास' होतो ही कल्पना गृहीत धरली आहे ती चुकीची आहे. कारण 'सहकार्यातूनही विकास' होतो हे इतिहास अभ्यासावरून लक्षात येते.

**५) गरीब-श्रीमंत विभाजन योग्य नाही :** वर्गसंघर्षाच्या सिद्धांतामुळे समाजाचे गरीब-श्रीमंत वर्गात विभाजन केले ते चुकीचे आहे. कारण त्याचे कोणतेही निकष नाहीत. गरीब कोणाला म्हणायचे व श्रीमंत कोणाला याबाबत कोणतेही निकष नाहीत. दोन्ही वर्गात विभाजन करणे योग्य नाही. वर्गसंघर्षामुळे परस्परांतील द्वेष भावना उफाळून येते. त्यांच्यातील सामंजस्य नाहिसे होते.

**६) मजुरांच्या हिताकडे भांडवलदारांचे लक्ष नसते हे चुकीचे :** भांडवलदार मजूर वर्गाचे हित, कल्याण पाहत नाहीत स्वतःचाच स्वार्थ पाहतात व कामगारांची पिळवणूक करून जास्तीत जास्त नफा कमावतात त्यामुळे दोहोत संघर्ष होतो असे मार्क्सचे मत होते. परंतु अशाप्रकारचा संघर्ष इंग्लंड, अमेरिकामध्ये घडून आला नाही उलट तेथे मजूर वर्गाने भांडवलदारांशी मिळते जुळते घेतले अहे व भांडवलदारांनी मजुरांच्या हिताच्या अनेक गोष्टी केल्या आहेत. त्याचे वेतन, राहणीमान सुधारले आहे.

**७) मजुरांचे संघटन चुकीची कल्पना :** मार्क्सची वर्गसंघर्षाची कल्पना कामगारांच्या संघटितपणावर

अवलंबून असते. परंतु 'जगातील सर्व कामगारांनो एक व्हा' असे मार्क्सने आवाहन केले होते. परंतु सर्व कामगार एक होऊन भांडवलदारांच्या विरुद्ध संघर्ष करतीलच याची खात्री देता येत नाही. सर्वच देशातील मजूर संघर्षाचाच मार्ग स्वीकारतील असेही नाही. त्यामुळे मार्क्सची ही कल्पनाही चुकीची वाटते.

**८) वर्गविरहित समाजाची कल्पना फोल :** मार्क्सने वर्गसंघर्षाची कल्पना मांडून वर्गविहीन समाजाची कल्पना केली होती ती फोल ठरली आहे. रशियात मार्क्सच्या विचारानुसार क्रांती झाली परंतु त्याच्या विचाराप्रमाणे साम्यवादी समाजरचना निर्माण झाली नाही. समाज वर्गविरहीत न बनता राज्यकर्त्यांचा नवा वर्ग व सर्वसामान्यांचा वर्ग असे दोन वर्ग निर्माण झाले आहेत.

अशाप्रकारे कार्लमार्क्सच्या वर्गसंघर्षाच्या सिद्धांतावर टीका होत असली तरीही या सिद्धांताने कामगारांना संघटित होण्याची प्रेरणा दिली. आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. तसेच भांडवलदारांनाही कामगारांच्या हिताची जाणीव करून दिली. आर्थिक शोषणाला प्रतिबंध घालण्याचे कार्य या सिद्धांताने केले आहे. त्यामुळे या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही.

### २.२.५ कामगार क्रांती व साम्यवाद :

**कामगारांची क्रांती** (Proletarian Revolution)

भांडवलशाही समाज व्यवस्थेतील वर्गसंघर्षाचा व श्रमिकांच्या शोषणाचा अंत करण्याचा एकमेव उपाय म्हणजे क्रांती होय असे मार्क्सचे मत आहे. कामगारांनी भांडवलशाहीविरोधी क्रांती करून समाजरचना बदलावी असे मार्क्स म्हणतो.

भांडवलदार व मजूर यांच्यातील संघर्ष मंदगतीने होऊन समाज परिवर्तन होणार नाही. त्यासाठी कामगारांनी जलद गतीने संघटीत होऊन राजकीय क्रांती घडवून आणली पाहिजे असे मार्क्सचे मत होते. कामगारांनी भांडवलदारांशी असणारे संबंध अधिक तीव्र स्वरूपाचे करून भांडवलदारांची सत्ता लवकरात लवकर उलथवून टाकावी. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील शोषक वर्ग जेव्हा क्रांतिकारी भूमिका घेऊन उभा राहतो तेव्हाच प्रस्थापित समाजव्यवस्था उलथून टाकली जाते असे मार्क्स म्हणतो. मुलाचा जन्म होण्यासाठी मातेच्या प्रसूतीवेदना अधिकाधिक तीव्र बनाव्या लागतात. तसा नवीन गुणात्मक व प्रगत समाज निर्माण होण्यासाठी समाजात प्रचंड अस्थिरता, अशांतता मजबूत प्रस्थापित समाजरचनेवर प्रचंड आघात करावेत. कामगारांनी क्रांती घडवून आणताना नवसमाजाची प्रसववेदनाच समजावी आणि साम्यवादी क्रांती घडवून आणावी.

मार्क्सच्या मते, नवसमाज निर्मितीसाठी हिंसाचार, रक्तपात झाला तरी चालेल, भिऊन चालणार नाही. कारण भांडवलदार वर्ग गप्प बसणार नाहीत. भांडवलदार अधिक, स्वार्थी असतात. आपल्या संपत्तीच्या जोरावर कोणत्याही मार्गाचा अवलंब करून श्रमिकांच्याविरुद्ध लढा देऊ शकतात. भांडवलदार राजकीय सत्तेवरील पकड सहजासहजी सोडणार नाहीत म्हणून सर्व कामगारांनी संघटित होऊन प्रसंगी बलिदान देऊन क्रांती केलीच पाहिजे. असा संदेश मार्क्सने 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ग्रंथात दिला आहे.

मार्क्सच्या मते, कोणतीही नवीन समाजरचना आपोआप निर्माण होत नसते. त्यासाठी कामगार वर्गाने

संघटीत होऊन जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. कामगारांनी एकत्र येऊन क्रांतीचा मार्ग स्वीकारला तरच भांडवलशाहीचा नाश होईल. क्रांतीच्या वणव्यात सामील झाल्याने कामगारांचे काहीही नुकसान होणार नाही. उलट क्रांती नंतरचा काळ हा कामगार वर्गासाठी उज्ज्वल असेल.

मार्क्सच्या मते, सामाजिक क्रांती ही इतिहासाची प्रेरक शक्ती असते. कोणतीही क्रांती सामाजिक प्रगतीला प्रोत्साहन देते. क्रांतीनंतर समाजात परिवर्तन घडत असते. मार्क्सच्या कामगारांच्या क्रांतिकारी परिवर्तनाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे १९१७ साली सोव्हिएत रशियात घडून आलेली क्रांती होय. या क्रांतीतून सोव्हिएत रशियात साम्यवादी समाजरचनेचा उदय झाला.

◆ **कामगारांची हुकूमशाही** (Dictatorship of Proletariat)

वर्गसंघर्षातून अपरिहार्यपणे निर्माण होणारी अवस्था म्हणजे कामगारांची हुकूमशाही ही अवस्था होय. भांडवलशाही नष्ट करण्यासाठी कामगारांच्या हातात राजकीय सत्ता सुपुर्द करणे आवश्यक आहे. समाजवादाच्या दिशेने वाटचाल करणेसाठी, वर्गविरहीत, राज्यविरहित समाजरचना निर्माण करण्यासाठी कामगारांची हुकूमशाही स्थापन करावी लागेल असे मार्क्सने म्हटले आहे.

मार्क्सने आपल्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या ग्रंथात म्हटले आहे की, ''कामगार वर्ग भांडवलदारांच्या हातून भांडवल क्रमाक्रमाने हिसकावून घेण्यासाठी, सर्व उत्पादन साधने सरकारच्या म्हणजे राज्यकर्तावर्ग या नात्याने संघटित झालेल्या कामगार वर्गाच्या हाती देण्यासाठी आपल्या राजकीय वर्चस्वाचा उपयोग करील.'' क्रांतीनंतर शासकीय यंत्रणेवर कामगारांच्या नेत्यांचे वर्चस्व राहील. कामगारांच्या नेत्यांची हुकूमशाही प्रस्थापित होईल. कामगारांची हुकूमशाही कायमस्वरूपी राहणार नाही तर ती संक्रमणकाळापुरतीच राहील असे मार्क्सचे मत होते.

संक्रमणकाळात शासनसंस्थेचे स्वरूप कामगारांच्या हुकूमशाहीचे राहील आणि तिच्याकडून काही महत्त्वाची कार्येकरवून घेतली जातील ती पुढीलप्रमाणे –

१) कामगारांची सत्ता अधिक स्थिर करणे.

२) उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची करणे.

३) कामगारांच्या हुकूमशाहीचा विरोध करणाऱ्या गटांचा बिमोड करणे.

४) भांडवलशाहीचा पूर्ण नाश होईपर्यंत कामगारांची अधिसत्ता चालू ठेवणे.

मार्क्सने आपल्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' ग्रंथात कामगारांच्या अधिसत्तेने समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्येकरावीत याचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

१) मालमत्तेचे सर्व वारसा हक्क नाहीसे करणे.

२) जमिनीच्या मालमत्तेची वैयक्तिक मालकी नष्ट करून सार्वजनिक हेतू गृहीत धरून ती भाडेपट्टीने लोकांना देणे.

३) परदेशात पळून गेलेल्या तसेच बंडखोर लोकांची मालमत्ता जप्त करून घेणे.

४) कर्जे किंवा आर्थिक सहाय्य देण्यासाठी राष्ट्रीय बँकांची निर्मिती करावी व त्याची व्यवस्था राज्याकडे असावी.

५) व्यक्तीच्या उत्पन्न वाढीबरोबरच वाढत्या उत्पन्नावर आयकर लावणे.

६) वाहतुकीची, दळणवळणाची सर्व साधने राज्याच्या हाती द्यावीत.

७) कारखानदाराची तसेच उत्पादननिर्मितीच्या साधनांची वाढ करावी.

८) श्रम करण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. विशेषतः शेती व्यवसायात सर्वांनी श्रम करावे.

९) नापिक जमिनीची मशागत व सुधारणा सामूहिक पद्धतीने करावी.

१०) उत्पादनाची साधने व शेती यात समन्वय साधून विकास करावा.

११) ग्रामीण व शहरी भेद कमी करणे. सर्वांवर करांचा समान भार टाकणे.

१२) लहान मुलांचे कारखान्यातील काम बंद करावे.

१३) सार्वजनिक शाळांतून सर्व मुलांना मोफत शिक्षणाची व्यवस्था करावी.

वरीलप्रमाणे कार्येकामगारांच्या हुकूमशाहीने पार पाडावीत व ती विशिष्ट काळापर्यंतच पूर्ण करावीत असे मार्क्सने सुचविले आहे. कारण साम्यवादी समाजरचना निर्माण झाल्यानंतर कामगारांची अधिसत्ता राहणार नाही. कामगारांची हुकूमशाही ही संक्रमणकाळातील अवस्था आहे.

**साम्यवादी समाजरचना** (The Communist Society) **:**

मार्क्सने साम्यवादी समाजरचनेचे जे वर्णन केले आहे ते अशक्य वाटण्याइतके आदर्शवादी आहे. मार्क्सच्या मते, वर्गविहीन (Classless) व राज्यविहीन (Stateless) समाजव्यवस्था म्हणजेच साम्यवादी समाजरचना होय. समाजातील भांडवलशाही मोडून काढण्यासाठी कामगारांनी क्रांती करावी आणि क्रांतीच्या विजयानंतर काही काळासाठी कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करावी ती राज्याऐवजी तांत्रिक स्वरूपाची प्रशासकीय यंत्रणा राहील. मार्क्स म्हणतो वर्गभेद आणि वर्गविरोध यांनी युक्त असलेला जुना भांडवलवादी समाज नाहीसा होऊन एक सहकारी समाज अस्तित्वात येईल. समाज मुक्त आणि समताधिष्ठीत असेल. व्यक्तीजीवन सामूहिक स्वरूपाचे असेल. एक व्यक्ती समाजासाठी, समाज व्यक्तीसाठी कार्य करील. श्रमाला महत्त्व दिले जाईल. समाजात शासक आणि शोषीत असे वर्गच राहणार नाहीत. समाज वर्गविहीन बनेल. समाजात वर्गच उरले नाहीत तर कोणत्याही प्रकारचे संघर्ष किंवा कलह निर्माण होणार नाहीत. त्यानंतर कामगारांच्या अधिसत्तेची गरज राहणार नाही. राज्यसंस्थेचे महत्त्व कमी झाल्यामुळे तेही हळूहळू विरून जाईल आणि समाज राज्यविहिन बनेल. तेव्हाच खऱ्या अर्थाने साम्यवादी समाजरचना निर्माण होऊ शकेल असे मार्क्सचे मत होते.

◆ **साम्यवादी समाजरचनेची वैशिष्ट्ये**

**१) वर्गविहिन व राज्यविहिन समाज**

मार्क्सच्या मते, भांडवलशाहीतून समाजवादी क्रांती आणि समाजवादी अवस्थेतून साम्यवादी अवस्था निर्माण करण्यासाठी काही काळ राज्याची आवश्यकता असेल. या संक्रमणाच्या काळात जनतेचे सामाजिक, आर्थिक संबंध सुधारतील. त्यांच्यावर कोणतीही सक्ती करावी लागणार नाही त्यामुळे पोलीस, कोर्ट, तुरुंग यांची आवश्यकता राहणार नाही. राज्य हळूहळू लोप पावेल व समाज वर्गविहिन, राज्यविहिन बनेल.

**२) विषमतेचे निर्मूलन होईल**

समाजातील खाजगी मालमत्ता, आर्थिक शोषण, अन्याय यावरून निर्माण झालेली बेकारी, दारिद्र्य व विषमता यांचे पूर्णपणे निर्मूलन होईल. उत्पादन शक्ती आणि उत्पादनाची प्रक्रिया यात समन्वय साधला जाऊन जीवनावश्यक वस्तूंची विपुलता निर्माण होईल.

**३) प्रत्येकाला त्याच्या कुवतीप्रमाणे काम व गरजेप्रमाणे दाम**

मार्क्सच्या मते, प्रत्येकाने आपल्या पात्रतेप्रमाणे व शक्तीप्रमाणे काम केले पाहिजे. प्रत्येकाने श्रम केलेच पाहिजेत. प्रत्येकाला त्याच्या कुवतीप्रमाणे काम मिळेल व गरजेप्रमाणे दाम मिळेल. त्याच्या श्रमाचा मोबदला म्हणून समाजाकडून त्याला जीवनावश्यक वस्तूंची पूर्तता केली जाईल.

**४) उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण**

मार्क्सच्या मते, साम्यवादी समाजव्यवस्थेत उत्पादनाची खाजगी मालकी राहणार नाही. सर्व उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण किंवा समाजीकरण केले जाईल. उत्पादकांची खाजगी मालकी नष्ट होऊन त्यावर समाजाची मालकी प्रस्थापीत होईल. शेती, उद्योगधंदे, व्यवसाय इत्यादी क्षेत्रात समाजाची सामुहिक मालकी निर्माण होईल. सामूहिक पद्धतीने सर्व क्षेत्रात प्रगती केली जाईल.

**५) प्रत्येकाला स्वातंत्र्य, समता व न्याय**

साम्यवादी समाजरचनेत प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य, समता व न्याय मिळेल असे मार्क्सने म्हटले आहे. खाजगी संपत्ती, विषमता व अन्याय यांना थारा राहणार नाही. जीवनावश्यक गोष्टींची विपुलता, शास्त्रीय, वैद्यकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतीक विकास यामुळे प्रत्येकाला आपला विकास साधता येईल.

अशाप्रकारे मार्क्सने साम्यवादी समाजरचना सांगितली. साम्यवादामुळे समाजाात नवीन प्रकारचे संबंध प्रस्थापीत होतील. मानवसमाज एकमेकांशी सहकार्याने, बंधुभावाने वागेल. पूर्ण शांतता प्रस्थापित होईल. साम्यवाद सर्व जगात प्रस्थापित झाला म्हणजे युद्धाचे कारणच राहणार नाही. 'सर्व जगभर एकाच सम्राटाचे राज्य होईल, तो सम्राट म्हणजे श्रम होय' असे मार्क्सने सांगितले.

◆ **कामगार क्रांती व साम्यवादावरील टीका**

१) मार्क्सने कामगारांना क्रांती करून भांडवलशाही उलथून टाकण्यास सांगितले. परंतु क्रांतीऐवजी सहकार्यातूनही चांगला विकास होऊ शकतो. याकडे मार्क्सचे दुर्लक्ष झाले आहे.

२) मार्क्सच्या मते, उद्योगप्रधान भांडवलशाहीतील कामगारांच्या पिळवणुकीमुळे ते संघटीत होतील व क्रांती करतील परंतु प्रत्यक्षात औद्योगिकदृष्ट्या प्रगत देशात क्रांती होण्याऐवजी ती कृषीप्रधान सोव्हिएत रशियात झाली.

३) मार्क्सच्या मते, साम्यवादी समाजरचना निर्माण झाल्यानंतर तेथे वर्ग असणार नाहीत. परंतु प्रत्यक्षात सो. रशियात क्रांतीनंतर पुन्हा राज्यकर्त्यांचा व सर्वसामान्यांचा असे दोन नवीन वर्ग उदयाला आले.

४) जगातील सर्व कामगारांनी संघटीत होऊन भांडवलदारांविरुद्ध क्रांती करण्याचे आवाहन मार्क्सने केले होते. परंतु मार्क्सची ही कल्पना फोल वाटते. कारण सर्व देशातील मजूर संघर्षाचाच मार्ग स्वीकारतील असे नाही.

५) मार्क्सच्या मते, साम्यवादी समाजरचनेच्या निर्मितीनंतर राज्य विरून जाईल. राज्याची आवश्यकता राहणार नाही. परंतु प्रत्यक्षात राज्य अधिक शक्तीशाली बनले. रशियातही राज्य विरून गेले नाही.

## २.२.६ मार्क्सचे राज्यसंस्थेसंबंधी विचार :

राज्यासंबंधीचे मार्क्सचे विचार पूर्वीच्या विचारवंतांपेक्षा वेगळे आहेत. काहीनी राज्याला स्वाभाविक संस्था मानले तर काहींनी एक उपयोगी संस्था म्हणून राज्याकडे पाहिले. ॲरिस्टॉटलच्या मते, राज्याची निर्मिती मनुष्याच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी झाली असून मनुष्याच्या सुखी जीवनासाठी राज्य कायम आहे. लास्कीच्या मते, राज्य विभिन्न संख्येत सामंजस्य निर्माण करणारी संस्था आहे. मार्क्सला राज्यसंस्थेसंबंधी पूर्वीचे विचार मान्य नाहीत. राज्यासंबंधीचे मार्क्सचे विचार तीन प्रकारचे आहेत. १) राज्याची निर्मिती समाजात वर्ग निर्माण झाल्यामुळे झाली आहे. २) राज्य हे एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर आपली सत्ता ठेवण्याचे साधन आहे. ३) वर्गविहिन समाजात राज्याची गरज भासणार नाही.

मार्क्सच्या मते, राज्याचा जन्म आर्थिक शोषण करणाऱ्या भांडवलदार वर्गाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी झाला. शोषित वर्गाची दडपशाही करणारी ती एक संस्था आहे. राज्यविरहित समाज निर्माण करणे हा मार्क्सच्या विचारातील महत्त्वाचा भाग होता. मार्क्स म्हणतो की, उत्पादन साधनांची मालकी असलेल्या भांडवलदारांनी आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यसंस्थेचा साधन म्हणून वापर केला. मार्क्सने राज्याला भांडवलदारांची कार्यकारी समिती असे म्हटले आहे. राज्याच्या माध्यमातून श्रीमंतांनी उत्पादन साधनांची मालकी नसलेल्या व्यक्तींवर सत्ता गाजवली. आर्थिकदृष्ट्या सबल-आहे रे आणि दुर्बल-नाही रे असे वर्गीय स्वरूप राज्याला प्राप्त झाले. राज्यसंस्थेच्या माध्यमातून भांडवलदारांनी खास, विशेष अधिकार मिळविले. गरीब, श्रमिकांना त्यापासून वंचित ठेवले. त्यांची पिळवणूक करून श्रीमंत अधिक श्रीमंत बनले. श्रमिकांची आंदोलने दडपून

टाकण्यासाठी बळाचा वापर केला. त्यामुळे मार्क्स राज्याला 'सक्ती करण्याचे साधन किंवा जुलूम करण्याचे यंत्र आहे' असे म्हणतो. राज्य ही दडपगिरी आणि छळ करणारी संस्था बनली.

राज्याने बुझ्र्वा समाजाचे म्हणजेच भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या समाजाचे हितसंबंध सुरक्षित ठेवले. दीन-दुबळ्यांचे शोषण करण्यात राज्यसंस्थेचा मोठा वाटा होता. मार्क्सच्या मते, पिळवणुकीवर आधारलेल्या राज्याचे तीन प्रकार असतात. गुलामगिरीचे राज्य, सरंजामशाहीचे राज्य आणि भांडवलशाहीचे राज्य असे तीन प्रकार इतिहासात झालेले आहेत. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात उत्पादन पद्धतीच्या वर्गरचनेवरून राज्ये निर्माण झाली आहेत. उत्पादनाची साधने हातात असणाऱ्या अल्पसंख्य वर्गाने बहुसंख्य लोकांचे शोषण करण्याचे साधन म्हणून राज्याचा वापर केला. प्राचीन काळात मालकवर्गाने गुलामांचे शोषण करण्यासाठी, मध्ययुगात सरंजामदारांनी कुळे, भूदास यांची पिळवणूक करण्यासाठी आणि आधुनिक भांडवलशाहीत भांडवलदारांनी मजुरांचे शोषण करण्यासाठी राज्यसंस्थेचा एक साधन म्हणून वापर केला. म्हणून 'राज्य हे पिळवणूक करण्याचे, जुलूम करण्याचे साधन आहे.' असे मार्क्सचे मत आहे. भांडवलशाहीत भांडवलदार एकत्रीत येऊन, संघटित होऊन क्रांतीचा मार्ग स्वीकारला पाहिजे. क्रांतीनंतर साहजीकच कामगारांच्या एकजुटीचा विजय होईल. राज्यसंस्थेचे सत्ता कामगारांच्या हाती जाईल. कामगारांच्या नेत्यांनी काही काळ हुकुमशाही प्रस्थापीत करावी. समाजातील भांडवलदारांचे वर्चस्व संपुष्टात आणावे व समाजवादी समाजरचना निर्माण करावी. समाजात कोणतेही वर्ग राहणार नाहीत म्हणजेच समाज वर्गविहीन बनेल. समाजात वर्गच शिल्लक राहीले नाहीत तर वर्गसंघर्ष होणार नाहीत. त्यामुळे राज्याचीही आवश्यकता भासणार नाही. राज्य हळूहळू विरून जाईल. राज्यविहीन समाज निर्माण होईल अशी मार्क्सची राज्यसंस्थेबद्दलची कल्पना होती.

### ◆ मार्क्सच्या राज्यविषयक विचारांची वैशिष्ट्ये

मार्क्सने मानवी इतिहासाचे भौतिकवादी विश्लेषण केले. राज्य हळूहळू नष्ट करणे या विचारापर्यंत त्याने आर्थिक, सामाजिक व राजकीय विचार मांडले. त्याच्या राज्यविषयक विचारांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

### १) राज्य श्रमिकांचे शोषण करणारी संस्था

मार्क्सच्या मते, राज्यसंस्थेचा वापर भांडवलदारांनी स्वतःच्या कायद्यासाठी आणि श्रमिकांवर अन्याय, शोषण करण्यासाठी केल्या. भांडवलदारांनी राज्यसंस्थेवर प्रभुत्व मिळवून भांडवलशाहीला अनुकूल व श्रमिकांना प्रतिकूल असे कायदे निर्माण केले त्यामुळे राज्यसंस्था श्रमिकांचे शोषण करणारे साधन बनले.

### २) राज्य हे बुझ्र्वा समाजाचे प्रतिक

जुन्या चालिरिती आणि विषमतेची बाजू घेणाऱ्या आणि भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या समाजाला मार्क्सने बुझ्र्वा समाज म्हटले आहे. ते पारंपरिक विचारांचे असल्यामुळे नव्या विचारांचे स्वागत करण्यास तयार नसतात. त्यामुळे राज्याला त्या समाजाचे प्रतिक आहे असे मार्क्सने म्हटले.

### ३) वर्गसंघर्ष अटळ असतो

मानवाच्या इतिहासातील प्रत्येक अवस्थेत शासक-शोषीत, आहे रे-नाही रे असे वर्ग असतात. एक

धनिक तर दुसरा गरीब, श्रमिक त्यामुळे त्यांच्यात संघर्ष होत असतो. धनिक बळाचा वापर करतात तर श्रमिक अन्यायाविरुद्ध लढतात.

**४) श्रमिकांची क्रांती यशस्वी**

राज्यसंस्थेत श्रमिक कामगारांनी संघटीतपणे दिलेला लढा भांडवलशाही नष्ट करतो. भांडवलदार-श्रमिक या वर्गीय लढ्यात कामगारांचा विजय होतो व कामगारांची क्रांती यशस्वी होते.

**५) राज्यविहिन समाज**

मार्क्सने राज्यसंस्थेला शोषणाचे एक संघटित साधन मानले आहे. म्हणून शेवटी राज्य हळूहळू विरून जाईल असे म्हटले आहे. एक प्रशासकीय कार्यकारी समितीकडून प्रशासन चालेल. संपत्तीचे सार्वत्रीकरण झाल्यावर, वर्गविहिन समाज निर्माण झाल्यावर राज्यसंस्थेची आवश्यकता राहणार नाही असे मार्क्सला वाटत होते.

**◆ राज्यसंस्थेसंबंधी विचारांवरील टीका**

मार्क्सच्या राज्यसंस्थेसंबंधीच्या विचारांवर पुढीलप्रमाणे टीका केली जाते.

**१) राज्य पिळवणुकीचे साधन नाही**

मार्क्सचा राज्यासंबंधीचा दृष्टीकोन एकाकी स्वरूपाचा आहे. राज्य पिळवणुकीचे, शोषणाचे साधन आहे असे त्याचे मत होते. वास्तविक अनेक शासक आपल्या न्यायप्रियतेसाठी, सेवाभावासाठी, जनहिताचे कायदे करण्यासाठी प्रसिद्ध होते याकडे त्याचे दुर्लक्ष झाले आहे.

**२) राज्य भांडवलदारांचे रक्षक म्हणणे चुकीचे**

राज्य हे भांडवलदारांच्या हिताचे रक्षण करते हे मार्क्सचे विचार पटत नाहीत. कारण राज्यसंस्था राज्यातील सर्वांच्यासाठी निर्माण झालेली असते. ती केवळ भांडवलदारांचे हित पाहत नाही तर श्रमिक, सर्वसामान्य यांच्यासाठीही विविध प्रकारच्या उपाययोजना, कायदे करते.

**३) विचारात विरोधाभास**

मार्क्स एकीकडे राज्याचा अन्याय करणारे, जुलूम करणारे यंत्र म्हणतो आणि दुसरीकडे साम्यवादी समाजरचना निर्माण होईपर्यंत राज्याचे समर्थन करतो हा त्याच्या विचारातील विरोधाभास आहे. ज्या संस्था निरुपयोगी ठरल्या त्या काळाच्या ओघात नष्ट झाल्या.

**४) राज्य नष्ट होऊ शकत नाही**

टीकाकारांच्या मते, राज्यसंस्था व्यक्तीविकासाचे साधन आहे. राज्य नष्ट झाले तर अराजकता निर्माण होईल. व्यक्तींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राज्याची आवश्यकता असते त्यामुळे ते कायमस्वरूपी अस्तित्वात राहील ते नष्ट होणार नाही. उलट राज्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे.

## २.३ सारांश :

या घटकात आपण कार्ल मार्क्सचा जीवन परिचय, त्यांच्यावरील प्रभाव, त्यांची ग्रंथरचना, त्यांचा ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत, भांडवलशाहीबद्दलचे विचार, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत, वर्गसंघर्षाचा सिद्धांत, कामगार क्रांती व साम्यवाद, राज्यसंस्थेसंबंधी विचार यासंबंधीचा व त्यावरील टीका यांचा अभ्यास केला आहे.

मार्क्सच्या जीवन परिचयात त्याचा जन्म, त्याचे शिक्षण, त्यांची ग्रंथरचना, त्यांच्यावर प्रभाव पाडणारे विविध घटक इत्यादीचा अभ्यास केला आहे.

मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांतात हेगेलच्या विरोधविकासवादाचा त्याच्यावर पडलेला प्रभाव, भौतिकवाद म्हणजे काय, विरोधविकासवादाची कल्पना (द्वंद्ववाद), भौतिक जगाच्या विकासाचे तीन टप्पे - वाद (ढहशीळी), प्रतिवाद (अपींळींहशीळी) आणि संवाद (डूपींहशीळी) यांचा अभ्यास केला. विश्वाच्या विकासात नेहमी संघर्ष होत असतात व त्या संघर्षातून विश्वाचा विकास होत असतो. विरोधातून, संघर्षातून विकास होतो असे विरोधविकासवादाचे तत्त्व, द्वंद्ववादाची वैशिष्ट्ये यांचा अभ्यास केला. विरोधविकासवाद स्पष्ट करून मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडला. ऐतिहासिक बदलास आर्थिक घटक कसा कारणीभूत ठरतो याचे स्पष्टीकरण त्याने केले आहे. ऐतिहासिक उत्क्रांतीने जगाच्या इतिहासाचा विकास होतो. ऐतिहासिक बदलाच्या पाच अवस्था त्याने सांगितल्या. १) आदिम अवस्था किंवा प्राचीन साम्यवाद, २) गुलामगिरीचा काळ, ३) सरंजामशाहीची अवस्था, ४) भांडवलशाहीचा कालखंड, ५) समाजवादी अवस्था त्यांचा अभ्यास आपण केला. मार्क्सच्या मते, आजपर्यंतचा इतिहास वर्ग संघर्षाचा इतिहास आहे. ऐतिहासिक भौतिकवादावरील टीका समजून घेतली.

मार्क्सच्या भांडवलशाही बद्दलच्या विचारातून भांडवलशाहीत उत्पादनाची साधने भांडवलदारांच्या मालकीची असतात व त्या साधनांच्या आधारे ते श्रमिक, कामगार वर्गाची कशी पिळवणूक, शोषण करतात व भांडवलशाहीतच त्यांचा विनाश असतो याबाबतचे मार्क्सचे विचार, भांडवलशाहीची वैशिष्ट्ये, भांडवलशाही सिद्धांतावरील टीका याबाबतचा अभ्यास केला.

अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतातून भांडवलदारांकडून कामगारांची कशी फसवणूक केली जाते. भांडवलदार कामगारांच्या लाचारीचा कसा फायदा घेतात आणि त्यांचे शोषण करतात. कामगारांच्याकडून जास्तीत जास्त श्रम करवून घेतले जाते व अधिकाधिक नफा मिळवून भांडवलदार कसे श्रीमंत बनतात हे समजले. अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतामुळे कामगारांना त्यांच्यावरील शोषणाची जाणीव होते. अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताचे परिणाम, सिद्धांतावरील टीका समजून घेतल्या.

वर्गसंघर्षाच्या सिद्धांतातून उत्पादनाच्या साधनांची मालकी असणारा व दुसरा श्रम करणारा वर्ग यांच्यातील वर्गसंघर्षाचा अभ्यास, वर्गसंघर्षाची वैशिष्ट्ये, वर्गसंघर्षावरील टीका यादृष्टीने अभ्यास केला.

कामगार क्रांती व साम्यवाद या विचारात कामगारांची क्रांती, त्यातील त्यांचा विजय, कामगारांची हुकूमशाही, संक्रमणाचा काळ, उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची केली जातात, प्रत्येकाला कुवतीनुसार काम आणि गरजेनुसार दाम दिले जाईल, त्यातून साम्यवादी समाजरचनेची निर्मिती, तिची वैशिष्ट्ये, कामगार क्रांती व साम्यवाद यावरील टीका इ. विचार समजून घेतले.

मार्क्सच्या राज्यसंस्थेबाबतच्या विचारातून मार्क्सचा राज्याबाबतचा दृष्टीकोन, राज्याचे स्वरूप, राज्यविषयक विचारांची वैशिष्ट्ये, त्यावरील टीका या बाबी आपण या घटकात शिकलो.

## २.४ पारिभाषिक शब्द किंवा शब्दार्थ :

१) **भौतिकवाद :** ज्यांचे अस्तित्व जाणवते किंवा जे डोळ्यांनी प्रत्यक्ष दिसते ते सत्य मानणारा दृष्टीकोन.

२) **विरोध विकासवाद (द्वंद्ववाद) :** विरोधातून किंवा संघर्षातून विकास घडून येतो असे मानणारा दृष्टीकोन

३) **समाजवादी :** व्यक्तीगत हितापेक्षा समाजहिताला प्राधान्य देणारी व्यवस्था

४) **साम्यवादी :** राष्ट्राची सर्व संपत्ती सामुदायीक मालकीची असणारी व्यवस्था

५) **सरंजामशाही :** सरदार, जमिनदार यांची सत्ता असलेली राज्यव्यवस्था

६) **भांडवलशाही :** खुली अर्थव्यवस्था, खाजगी मालमत्तेचा हक्क मान्य करणारी व्यवस्था.

७) **गुलामगिरी :** समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ वर्ग असणारी व कनिष्ठांना जनावरांप्रमाणे वागणूक देणारी समाज व्यवस्था.

८) **आहे रे :** श्रीमंतांचा वर्ग - भांडवलदार, जमिनदार इ.

९) **नाही रे :** ज्यांच्याकडे संपत्ती नाही केवळ श्रम आहेत असा गरीब, कामगार, शेतमजूरांचा वर्ग

१०) **अफू :** एक मादक पदार्थ, ज्याच्या सेवनाने गुंगी येते.

११) **परात्मता :** परकेपणा, माणसापासून, मानवी मूल्यांपासून व समाज जीवनापासून दुरावलेला मनुष्य.

१२) **वर्गविहिन :** गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असे वर्ग नसलेला समाज.

१३) **राज्यविहिन :** राज्यच नसलेला, राज्यविरहित समाज.

१४) **अधिसत्ता :** समाजातील बहुसंख्य लोकांना मान्य असलेली राजकीय सत्ता.

१५) **बुझ्र्वा समाज :** जुन्या चालिरिती, विषमता व भांडवलशाहीचे समर्थन करणारा समाज.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे :

**प्रश्न :**

**◆ स्वयं अध्ययन प्रश्न–१**

**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१) कार्ल मार्क्स आणि एंजल्स यांनी 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हा ग्रंथ कोणत्या साली प्रसिद्ध केला?

२) मार्क्सचा जन्म कोणत्या वर्षी व कोणत्या देशात झाला?

३) इ.स. १८६७ मध्ये मार्क्सने कोणता ग्रंथ लिहिला?

४) मार्क्स यांच्या कोणत्या ग्रंथाला साम्यवादाचे बायबल असे म्हणतात?

५) कार्ल मार्क्स या समाजवादी, क्रांतिकारक विचारवंताचे निधन कोणत्या वर्षी झाले?

**◆ स्वयं अध्ययन प्रश्न–२**

१) द्वंद्वात्मक विरोध विकासवादाची कल्पना कार्ल मार्क्सने कोणाकडून घेतली?

२) 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे कोणी म्हटले आहे?

३) मार्क्सच्या मतानुसार पदार्थात होणारे परिवर्तन कोणकोणत्या प्रकारचे असते?

४) मार्क्सने ऐतिहासिक बदलाच्या किती अवस्था सांगितल्या आहेत?

५) विरोधविकासवादालाच कोणत्या नावाने संबोधले जाते?

**◆ स्वयं अध्ययन प्रश्न–३**

१) भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादन साधनांची मालकी कोणाकडे असते?

२) मार्क्सने भांडवलदारांना काय म्हटले आहे?

३) भांडवलशाहीत कोणत्या दोन वर्गात संघर्ष होतो?

४) भांडवलशाहीचा महत्त्वाचा उद्देश काय असतो?

५) भांडवलशाहीच्या विनाशाची बीजे कशात असतात?

**◆ स्वयं अध्ययन प्रश्न–४**

१) मार्क्स यांनी कोणत्या ग्रंथात अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत मांडला आहे?

२) मार्क्सच्या मतानुसार कोणत्याही वस्तूचे मूल्य कशावरून ठरते?

३) जेव्हा एखाद्या वस्तुनिर्मितीसाठी दिल्या जाणाऱ्या मजुरीपेक्षा त्या वस्तूची बाजारातील किंमत जास्त असते. तेव्हा पडणाऱ्या तफावतीला मार्क्सने काय म्हटले आहे?

४) अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत कोणी मांडला?

५) मजुरांचे आर्थिक शोषण करून नफा मिळविण्याची जी पद्धत आहे त्याला काय म्हटले जाते?

◆ **स्वयं अध्ययन प्रश्न–५**

**खालील वाक्यातील रिकाम्या जागा भरा.**

१) ''आजपर्यंतचा जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचाच इतिहास होय'' असे ................ यांनी म्हटले आहे.

२) ............. या ग्रंथात मार्क्सने वर्गसंघर्षाचा सिद्धांत मांडला आहे.

३) मजूर व ................ हे भांडवलशाही समाजव्यवस्थेतील प्रमुख दोन वर्ग होय.

४) मार्क्सने सांगितलेल्या वर्गसंघर्षाचे स्वरूप ............... होते.

५) भांडवलदार व कामगार यांच्यातील संघर्षानंतर .......... समाजाची कल्पना मार्क्सने मांडली होती.

◆ **स्वयं अध्ययन प्रश्न–६**

**खालील वाक्यातील रिकाम्या जागा भरा.**

१) मार्क्सच्या मते, वर्गविहिन आणि राज्यविहिन समाजव्यवस्था म्हणजे ........... समाजरचना होय.

२) मार्क्सच्या कामगारांच्या क्रांतिकारी परिवर्तनाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे ............ या राष्ट्रात घडून आलेली क्रांती होय.

३) साम्यवादी समाजव्यवस्थेत प्रत्येकाचा त्याच्या ............... प्रमाणे काम मिळेल आणि गरजेप्रमाणे दाम मिळेल.

४) मार्क्सच्या विचाराने प्रेरित होऊन ............. साली सोव्हिएत रशियात क्रांती झाली.

५) भांडवलशाही व साम्यवादी समाजरचना यामधील संक्रमणकाळातील ............. ही अवस्था होय.

◆ **स्वयं अध्ययन प्रश्न–७**

**खालील वाक्यातील रिकाम्या जागा भरा.**

१) मार्क्सच्या मते, ................ म्हणजे सक्ती करण्याचे, जुलूम करण्याचे साधन आहे.

२) राज्याचा जन्म आर्थिक शोषण करणाऱ्या ............... वर्गाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी झाला असे मार्क्स म्हणतो.

३) मार्क्सच्या मते, इतिहासात, गुलामगिरीचे, सरंजामशाहीचे आणि ............... अशी तीन पिळवणुकीवर आधारलेली राज्ये होऊन गेली.

४) भांडवलशाहीचे समर्थन करणाऱ्या समाजाला मार्क्सने ................ समाज असे म्हटले आहे.

५) मार्क्सच्या मते, राज्य म्हणजे भांडवलदारांची ............. समिती होय.

**उत्तरे :**

**◆ स्वयं अध्ययन उत्तर –१**

१) कार्ल मार्क्स आणि एंजल्स यांनी 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हा ग्रंथ १८४८ साली प्रसिद्ध केला.

२) मार्क्सचा जन्म १८१८ या वर्षी जर्मनी या देशात झाला.

३) इ.स. १८६७ मध्ये मार्क्सने 'दास कॅपिटल' हा ग्रंथ लिहिला.

४) मार्क्स यांच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' या ग्रंथाला साम्यवादाचे बायबल असे म्हणतात.

५) कार्ल मार्क्स या समाजवादी, क्रांतिकारक विचारवंताचे निधन इ.स. १८८३ या वर्षी झाले.

**◆ स्वयं अध्ययन उत्तर –२**

१) द्वंद्वात्मक विरोधी विकासवादाची कल्पना कार्ल मार्क्सने हेगेलकडून घेतली.

२) 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे कार्ल मार्क्सने म्हटले आहे.

३) मार्क्सच्या मतानुसार पदार्थात होणारे परिवर्तन गुणात्मक व मात्रात्मक प्रकारचे असते.

४) मार्क्सने ऐतिहासिक बदलाच्या पाच अवस्था सांगितल्या आहेत.

५) विरोधी विकासवादालाच द्वंद्ववाद या नावाने ओळखले जाते.

**◆ स्वयं अध्ययन उत्तर –३**

१) भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादन साधनांची मालकी भांडवलदारांकडे असते.

२) मार्क्सने भांडवलदारांना बुझ्र्वा म्हटले आहे.

३) भांडवलशाहीत भांडवलदार व मजूर या दोन वर्गात संघर्ष होतो.

४) भांडवलशाहीचा महत्त्वाचा उद्देश नफा मिळविणे हा असतो.

५) भांडवलशाहीच्या विनाशाची बीजे भांडवलशाहीतच असतात.

**◆ स्वयं अध्ययन उत्तर –४**

१) मार्क्स यांनी 'दास कॅपिटल' या ग्रंथात अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत मांडला आहे.

२) मार्क्सच्या मतानुसार कोणत्याही वस्तूचे मूल्य श्रमावरून ठरते.

३) जेव्हा एखाद्या वस्तुनिर्मितीसाठी दिल्या जाणाऱ्या मजुरीपेक्षा त्या वस्तूची बाजारातील किंमत जास्त असते तेव्हा पडणाऱ्या तफावतीला मार्क्सने अतिरिक्त मूल्य असे म्हटले आहे.

४) अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत कार्ल मार्क्सने मांडला.

५) मजुरांचे आर्थिक शोषण करून नफा मिळविण्याची जी पद्धती आहे त्याला नफ्याचा सिद्धांत असे म्हटले जाते.

◆ **स्वयं अध्ययन उत्तर –५**

१) कार्ल मार्क्स

२) कम्युनिस्ट मॅनिफेस्टो

३) भांडवलदार

४) द्वंद्वात्मक

५) वर्गविरहित

◆ **स्वयं अध्ययन उत्तर –६**

१) साम्यवादी

२) सोव्हिएत रशिया

३) कुवतीप्रमाणे

४) १९१७

५) कामगारांची हुकूमशाही

◆ **स्वयं अध्ययन उत्तर –७**

१) कार्ल मार्क्स

२) भांडवलदार

३) भांडवलशाहीचे

४) बुझ्र्वा

५) कार्यकारी

## २.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत स्पष्ट करा.

२) कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.

३) कार्ल मार्क्सचे भांडवलशाहीबद्दलचे विचार स्पष्ट करा.

४) मार्क्सच्या अतिरिक्त मूल्य सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण करा.

५) कामगार क्रांती व साम्यवाद याविषयीचे मार्क्सचे विचार स्पष्ट करा.

६) कार्ल मार्क्सचे राज्यसंस्थेसंबंधीचे विचार स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१) मार्क्सचा द्वंद्ववाद

२) ऐतिहासिक विकासाचे टप्पे

३) अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत

४) वर्गसंघर्षाचा सिद्धांत

५) कामगारांची क्रांती

६) साम्यवादी समाजरचना

७) वर्गविहिन व राज्यविहिन समाज

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भग्रंथ :


१) गर्दे दि. का. - पाश्चात्य राजकीय विचारप्रवाह, महाराष्ट्र राज्य ग्रंथनिर्मिती मंडळासाठी गो. य. राणे प्रकाशन, पुणे

२) भोळे भा. ल.- पाश्चिमात्त्य राजकीय विचारवंत, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

३) शृंगारपुरे अरविंद- पाश्चिमात्त्य राजकीय विचारक, मंगेश प्रकाशन, नागपूर

४) जोशी वि. सी.- पाश्चात्य राजकीय तत्त्वज्ञान, मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद

५) पाटील बी. बी.- पाश्चात्य राजकीय विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६) डोळे ना. म.- पाश्चिमात्त्य राजकीय विचारवंत, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

७) जोशी सुधाकर ग.- पाश्चिमात्त्य राजकीय विचारवंत, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद

८) मुठाळ राम- भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर

९) देवगांवकर श. गो- राजकीय विचारवंत (पाश्चिमात्त्य आणि भारतीय), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

१०) कुलकर्णी सुधाकर- निवडक राजकीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, लातूर

११) काणे प. सी.- काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ, विद्या प्रकाशन, नागपूर


○○○

घटक ३

# ॲन्तिनिओ ग्रामसी


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ जीवनपरिचय
- ३.२.२ ग्रामसीचे ऐतिहासिक भौतिकवादाच्या फेरमांडणीची आवश्यकता
- ३.२.३ ग्रामसीचा प्रश्नाचा सिद्धांत
- ३.२.४ ग्रामसीचे इटालीवरील विचार
- ३.२.५ ग्रामसीचे शिक्षणावरील विचार

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व अर्थ

३.५ स्वयंअध्ययन प्रश्न व त्याची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ पुस्तके व ग्रंथ


## ३.० उद्दिष्टे :

राज्यशास्त्राला सैद्धांतिक व तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान प्राप्त करून देण्यामध्ये विचारवंतांचा वाटा मोठा आहे. आपण प्रस्तुत अभ्यासक्रमामध्ये आतापर्यंत हेगेल या जर्मन आदर्शवादी विचारवंताचा अभ्यास केला. त्याचबरोबर आपण कार्ल मार्क्सच्या भौतिकवादाचा अभ्यास केला. हे दोन्ही विचारवंत परिवर्तनवादी होते. समाजामध्ये विचारातून परिवर्तन होते असे चित्‌वादी हेगेल म्हणतो. तर हा परिवर्तनाचा विचार समाजाच्या डोक्यात का आला, याचे उत्तर कार्ल मार्क्स देतो. त्याच्या मते भौतिक वस्तु विशेषतः उत्पन्नाची साधने बदलली की परिवर्तन सुरू होते. लेनिन हा सोविएट रशियातील पहिला साम्यवादी नेता होता. मात्र त्याने पूर्ण सैद्धांतिक मार्क्सवादी प्रयोग रशियाच्या पुनर्मांडणीसाठी केला नाही. त्या त्याच्या लेनिनवादी विचारांचा एक प्रशासक व एक विचारवंत म्हणून आपण अभ्यास केला. साम्यवादी असूनही तो प्रत्यक्ष लोकशाहीचा पुरस्कर्ता होता.

अश्रश्र ेुर्शिी ी ीिंळर्शी अशी घोषणा करून तो ग्रामसभेला व लोकांच्या स्वयंनिर्णयाला लोकशाहीचा आधार मानतो. त्याने नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेची कल्पना मांडली. आता आपण ॲन्तिनिओ ग्रामसी या विचारवंताचा अभ्यास करणार आहोत. ग्रामसी हा नवमार्क्सवादी इटालीयन विचारवंत होता. त्याने मार्क्सवादाचा चिकित्सक अभ्यास करून मार्क्सवादाच्या मर्यादा स्पष्ट केल्या. एक प्रतिभाशाली नवमार्क्सवादी म्हणून या प्रकरणात आपल्याला ग्रामसीच्या विचारांचा अभ्यास करावयाचा आहे.

## ३.१ प्रास्ताविक :

साधारणतः १९३० नंतर नवमार्क्सवादाच्या अभ्यासाला सुरुवात झाली. कार्ल मार्क्स व एंजेल्स यांच्या विचारांचा नव्या दृष्टिकोनातून प्राप्त परिस्थितीच्या संदर्भात अभ्यास म्हणजे नवमार्क्सवाद होय. ग्रामसीप्रमाणे इतर नवमार्क्सवादी प्रत्यक्षार्थवादी व अनुभववादी तत्त्वज्ञानाचे विरोधक आहेत. पण ते हेगेल, फ्राईड यांच्या अस्तित्ववाद, संरचनावाद या प्रवाहांचा साम्यवादाच्या नवमांडणीत वापर करू इच्छितात. या समूहात अनेक नवे विचारवंत व प्रवाह तयार झाल्याने नवमार्क्सवाद ही एकसंध व एकमेव अशी चळवळ मात्र नाही. त्यात ग्रामसी, लुकाच, फ्रँकफर्ट स्कुल, हर्बर्ट मार्क्युस, मिलीबँड पोलंझा इत्यादी अनेक विचारवंत व चळवळी आहेत.

१९३० चा कालखंड हा जागतिक मंदीचा व एका अर्थाने सर्व जगासाठी आत्मपरिक्षणाचा होता. अमेरिकन लोकशाही वरवरची असून ती भांडवलप्रधान आहे तर स्टॅलिनची एकाधिकारशाही साम्यवादातील उद्दिष्ठांना ओळखू शकली नसल्याचे सर्वांच्या लक्षात आले. याच काळात अमेरिका व युरोपात प्रत्यक्षार्थवादाला महत्त्व आले. टॉलकॉट पार्सन्स, ग्रॅबियल अल्मंड व डेव्हिड ईस्टनचा रचनाकार्यवाद, वर्तनवाद व व्यवस्थावाद नव्याने राज्यशास्त्रात आला. राज्यशास्त्र हे अधिक सूक्ष्म, वस्तुनिष्ठ, गणिती, शास्त्रीय व अचूक बनत असताना व्हिएतनाममध्ये युद्धात प्रचंड हिंसा सुरूच होती. क्युबासारख्या छोट्या राष्ट्रात अमेरिकेला शह देत फिडेल क्रॅस्ट्रो क्युबाची अस्मिता जपत होते. चीनमध्ये सांस्कृतिक क्रांतीच्या आधारे माओने साम्यवादाची व्यापक लोकानुवर्ती मांडणी केली होती. याच काळात लॅटिन अमेरिका, दक्षिण आफ्रिका आणि आशिया खंडात नवोदीत राष्ट्रे स्वातंत्र्याच्या तयारीत होती. अशा पार्श्वभूमीवर प्रामुख्याने ग्रामसी व लुकाच यांनी नवमार्क्सवादाची मांडणी करण्याचा प्रयत्न केला. सैद्धांतिक व व्यावहारिक बाबींचा विचार करून मार्क्सवादाची फेरमांडणी केल्यास समाजाचे प्रश्न सोडवता येतील असे ग्रामसी व लुकाच यांचे मत होते.

## ३.२ विषय-विवेचन :

### ३.२.१ ॲन्तिनिओ ग्रामसी - जीवन परिचय :

ग्रामसी हा इटालीयन विचारवंत होता. त्याचा जन्म १८९१ मध्ये इटालीतील सारडीनिया या अतिशय गरीब व मागास प्रांतात झाला. पण या प्रांताला स्वतःची अशी खास संस्कृती होती. भाषा, इतिहास व एकंदर संस्कृतीबाबत प्रस्तापित इटालीपेक्षा वेगळ्या संस्कृतीमध्ये ग्रामसीचे बालपण व सुरुवातीचे शिक्षण झाले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाल्यानंतर ग्रामसी तुरीन येथे उच्च शिक्षणासाठी गेला. पण दारिद्र्य आणि

सातत्याचे आजारपण यामुळे त्याला उच्च शिक्षण घेता आले नाही. त्या काळात तुरीन हे इटालीतील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र होते आणि त्यामुळे तेथे एक मोठी कामगारवर्गाची संघटनाही होती.

पहिल्या महायुद्धाच्या शेवटच्या टप्प्यात ग्रामसीने बाहेरून शैक्षणिक व राजकीय धडे घेत पत्रकार व थिएटर रिपोर्टर म्हणून काम केले. अर्थातच पत्रकारिता करत असताना व्यापारी संघटना व समाजवादी पक्षाचे काम त्याने जवळून पाहिले. लहानपणापासून दारिद्र्याचे चटके सहन केले असल्याने ग्रामसीचा मुसोलिनीच्या फॅसिस्टवादाला तीव्र विरोध होता. उमेदवारीच्या काळात त्याने दोन नियतकालिके सुरू केली. ओरडीन न्युओ व युनिटा (जीवळपश छ्रौंिर रपव णपळींर) या नावाच्या त्याच्या नियतकालिकातून त्याने सातत्याने कामगारांच्या शिक्षणावर भर देण्याचा प्रयत्न केला. याचाच एक भाग म्हणून ‘शास्त्रीय व्यवस्थापन यंत्रणा व शिक्षण आणि प्रशिक्षणातून शास्त्रीय व्यवस्थापन यावर आपले सखोल विचार मांडले. कामगारांच्या शोषणाला त्यांचे शैक्षणिक व कसबी मागासलेपणही जबाबदार असल्याचे ग्रामसीच्या लक्षात आले होते. इटालीमध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात त्याचा मोठा सहभाग होता. मुसोलिनीच्या फॅसिस्ट हुकूमशाहीला त्याने विरोध केला. त्यामुळे त्याला १९२३ मध्ये तुरुंगात टाकण्यात आले. या तुरुंगातच त्याचे १९३७ मध्ये निधन झाले. तुरुंगात असताना त्याने ‘तुरुंगातील टीपा’ (झीळीळेप छौंशी) हा ग्रंथ लिहिला. हाच ग्रंथ पुढे (झर्शीीळरप) ‘पर्सियन’ नावाने प्रसिद्ध झाला. ग्रामसीने तुरीन येथे सातत्याने कामगारवर्गाच्या शोषणाचे निरिक्षण केले. यातून मार्क्सवादातील काही मर्यादा त्याच्या लक्षात आल्या. यातूनच त्याने मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाची पुनर्मांडणी केली. त्याने वर्चस्वशक्तीचा (कशसशोपू) सिद्धांत मांडला तसेच समकालीन विचारवंताच्या विशेषतः बुखारिनच्या मार्क्सवादी विचारांची कठोर चिकित्सा केली. नवमार्क्सवादी विचारामध्ये भर टाकणारे ग्रामसी व लुकाच हे दोन महत्त्वाचे विचारवंत मानले जातात.

**ग्रामसीचे साहित्य :**

ग्रामसी हा २० व्या शतकातील बहुआयामी विचारवंत होता. त्याने मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाची चिकित्सा करताना शिक्षण, नागरी समाज, संस्कृती, समाजशील विचारवंत इत्यादी अनेक विषयावर विपूल लेखन केले. ते खालीलप्रमाणे

१) Prision Notes तुरुंगातील टिपणे पृष्ठे २८४८(पर्सियन)

२) Quadernidel Carcere शिक्षणावरील भाष्य

### ३.२.२ ग्रामसीचे ऐतिहासिक भौतिकवादाविषयीचे विचार :

प्रत्येक विचारवंत हा परिस्थितीचे अपत्य असतो. सभोवतालची परिस्थिती, तिचे आकलन, स्वतःचे निरीक्षण व अनुभव तथा समकालीन परिस्थितीच्या संदर्भात तो आपले विचार मांडतो याला शास्त्रीय विचारवंत कार्ल मार्क्सही अपवाद नव्हता. कार्ल मार्क्सने आपला परिवर्तनाचा सिद्धांत मांडताना पुरावा म्हणून ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी केली. मात्र या मांडणीचा अन्वयार्थ लावताना काही चूका निर्माण झाल्या. या भौतिकवादाची निट चिकित्सा झाली नाही. ग्रामसीच्या काळात बुखारिनने ऐतिहासिक भौतिकवादाची चिकित्सा

करण्याचा प्रयत्न केला मात्र ती फारच तांत्रिक, कृत्रीम व वरवरच्या स्वरूपाची होती.

आपण या विषयाचा अभ्यास करताना कार्ल मार्क्सचा अभ्यास केला. मार्क्स असे म्हणतो की, इतिहासाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये समाजात उत्पादन साधने, वस्तु म्हणजे भांडवलसदृश्य शक्ती होती त्या सबल वर्गाने या भौतिक वस्तुंच्या आधारे इतर दुर्बल वर्गाचे शोषण केले. प्राथमिक अवस्था, गुलामगिरी, सरंजामशाही व भांडवलशाहीच्या प्रत्येक टप्प्यात उत्पादन साधने बदलली. त्यामुळे सुरुवातीला सबल दुर्बल असणारे दोन वर्ग गुलामगिरीत मालक व गुलाम नावाने पुढे आले तर सरंजामशाहीत राजा व कुणबी शेतकरी वर्ग तर औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलदार व कामगार नावाने पुढे आले. या पाठीमागे हेगेलने सांगितलेल्या द्वंद्वात्मक विकासवादाचे धोरण होते असे मार्क्स म्हणतो. भांडवलशाहीत कामगार वर्गाचे अतिरिक्त मूल्य सिद्धांतामुळे अधिक शोषण होते. या काळात तो संघटीत झाल्याने अन्यायी भांडवलशाहीविरुद्ध क्रांती करून समतेवर आधारीत समाजवादी समाजरचना येते अशी मार्क्सची मांडणी होती.

द्वंद्वात्मक विकास हा तर निसर्गनियम आहे व तोच इतिहासात परावर्तीत झाला असे बुखारिनला वाटते. ग्रामसीने या नव्या मांडणीला तीव्र विरोध केला. ग्रामसी असे म्हणतो की, इतिहासाच्या परिवर्तनात मानवी अस्तित्व, कर्तृत्व व त्याच्या विचारांना महत्त्व असते. यातूनच ग्रामसीने मानवी कृतीस व संकल्पनाना महत्त्व देणारे सिद्धांत व व्यवहार यांच्या ऐक्यातून पुढे जाणारे अधिक व्यवहारवादी तत्त्वज्ञान मांडले. त्याच्या मते विरोधविकासाच्या द्वंद्वात्मक प्रक्रियेत मानसाची भूमिका महत्त्वाची व निर्णायक असते. ग्रामसीच्या मते, ज्ञान व कृती या मूलतः भिन्न गोष्टी नाहीत. त्या एकमेकाला संलग्न व परस्परपूरक प्रक्रिया असतात. कारण ज्ञानातून कृती घडते व कृतीच्या अनुभवातून ज्ञान अधिक प्रगल्भ होते. विरोध विकासाच्या द्वंद्वात्मक प्रक्रियेत प्रत्येक माणूस महत्त्वाचा कर्ता असतो. कारण तो निसर्गनियमाच्या पद्धतीने नव्हे तर स्वतःच्या ज्ञान विचार व कृतीच्या तथा मानवीय चैतन्याच्या आधारे काम करतो. म्हणूनच द्वंद्वात्मक विकासाचे नियम जसे निसर्गाचे नियम नाहीत तसेच ते इतिहासाच्या जडवादी विकासाचेही नियम नाहीत. या नव्या विवेचनातून ग्रामसी द्वंद्वात्मक भौतिकवादाची तीन वैशिष्ट्ये स्पष्ट करतो–

१. समाजातील सर्व घटकांची आंतरक्रिया

२. विरोधविकासाचा क्रमवाद प्रतिवाद व संवाद हा नकारास नकार देत पुढे जातो.

३. आर्थिक पाया (Basic Structure) व वैचारिक इमला (Super Structure) यांच्यातील परस्पर संबंध.

ग्रामसीने बुखारिनवर टीका केली. त्याच्या मते केवळ उत्पादन साधने व भौतिक वस्तू व्यक्तीची वैचारिक बांधणी करीत नाहीत तर त्यात तत्त्वज्ञान धर्म, नीती, संस्कृती, भाषा या साऱ्या सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा विचारही महत्त्वाचा असतो. माओने नंतर सांस्कृतिक क्रांतीला कायम क्रांती म्हणताना या सर्व आर्थिक गोष्टी व बाकीच्या घटकांना परिवर्तनात महत्त्व असते असे म्हटले. ग्रामसीच्या मते, आर्थिक उत्पादन साधने व भौतिक वस्तूमध्ये बदल झाला की लगेच सामाजिक संरचनेत बदल होत नाहीत. कारण सांस्कृतिक

घटकही समाजाचे महत्त्वाचे आधार असतात. ग्रामसी असे म्हणतो की, कधी कधी वैचारिक बाबीही आर्थिक गोष्टींना आकार देऊ शकतात. हे सर्व कसे घडते यासंदर्भात ग्रामसी वर्चस्व शक्तीची (प्रभुत्वाची Hegemony) संकल्पना मांडतो.

### ३.२.३ ग्रामसीचा प्रभुत्वाचा सिद्धांत (Hegemony) :

परिवर्तनाच्या संदर्भात राजकीय सत्ता अशा गटाच्या हातात जाते. ज्याच्याकडे दमन करणारी म्हणजे इतरांना दडपून टाकणारी शक्ती तर असतेच पण दुसऱ्या बाजूला त्यांच्याकडे वैचारिक शक्तीही असते आणि नेमकी ती त्या समाजातील सारभूत संस्कृतीमधून विकास पावलेली असते. या दमनकारी व वैचारिक शक्तीला म्हणजे राज्यसंस्थेला तो सेंटॉर (Centour) असे म्हणतो. सेंटॉर म्हणजे ज्याचा चेहरा माणसासारखा व उर्वरीत शरीर मात्र घोड्यासारखे असते. (हयवदनाच्या विरुद्ध स्वरूपाचा आकार अशी रुपकात्मक कल्पना). याला ग्रामसी Hegemony म्हणजे प्रभुत्व म्हणतो व ते दुहेरी असते.

कार्ल मार्क्सने जो ऐतिहासिक भौतिकवाद मांडला आणि ज्यातून परिवर्तनाची संकल्पना स्पष्ट केली, त्यातही त्याला केवळ भौतिकवादी वस्तुंच्या वाढीतून व घट होण्यातून क्रांती होते असे म्हणावयाचे नसावे असे ग्रामसीचे मत होते. भौतिक वस्तुंमधील बदलाबरोबर दुसऱ्या बाजुला विचार नावाची शक्ती या बदलाचे नेतृत्व करते कारण सेंटॉरचा म्हणजे प्रभुसत्तेचा चेहरा मानवी असून त्याच्याकडे विचार आहे हे विचार मनावर व मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवतात तर शरीर घोड्याचे म्हणजे बळ हे शरीरावर नियंत्रण ठेवते. कोणत्याही क्रांतीमध्ये विचार नेहमीच श्रेष्ठ असतात असे ग्रामसीचे मत होते. म्हणूनच कामगारांकडे केवळ संघटित शक्ती असून चालत नाही तर त्यांच्याकडे तसा पुरोगामी परिवर्तनाचा विचार असावा लागतो आणि जोपर्यंत विचार शक्ती व संघटीत शक्ती एकत्र बांधली जात नाही तोपर्यंत कामगारांची क्रांती होत नाही असे प्रतिपादन तो करतो. मार्क्सने त्याच्या शेवटच्या ऐतिहासिक टप्प्यात क्रांतीचे शास्त्र सांगितले होते. ग्रामसीच्या मते अशा क्रांतीमध्ये विचारवंताची भूमिका नेहमीच मध्यवर्ती, निर्णायक व महत्वाची असते.

ग्रामसीच्या मते, दोन प्रकारचे विचारवंत असतात.

अ) पारंपरिक विचारवंतः उदा. मध्ययुगातील मध्य युरोपातील धर्मगुरू, पोप, बिशप, डीन इ.

ब) समाजशील विचारवंतः सेंद्रिय अथवा समाजप्रतिबद्ध असे विचारवंत

पारंपरिक विचारवंत हे समाजापासून दूर राहून आपले विचार व तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न करतात. ते स्थितीवादी व अलिप्त असल्याने त्यांचा व त्यांच्या तत्वज्ञानाचा समाजाशी व्यावहारिक स्वरूपाचा फारसा संबंध नसतो. 'मला असे वाटते' या स्वयंभू व स्वायत्त भावनेतून ते आपले विचार मांडत असल्याने त्यांच्या विचारात व समाजात नेहमीच मोठे अंतर असते. त्यांना समाजाच्या सुखदुःखाची बऱ्याचदा जाण नसते.

याउलट समाजशील विचारवंत हे सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात स्वतःचे तत्वज्ञान विकसीत करत असतात. मला काय वाटते? यापेक्षा काय केल्यानंतर समाजाचे प्रश्न सुटतील यावर त्यांचा भर असतो. ते कर्तेसुधारक व विचारवंत अशा दोन्ही भूमिका पार पाडतात. एका बाजुला ते कामगार, कष्टकरी, शेतकरी,

अस्पृश्य वा दबलेल्या वर्गाचे सक्रिय कार्यकर्तेम्हणून नेतृत्व करतात तर दुसऱ्या बाजुला ते या संघटीत शोषित वर्गाच्या जाणीवा जागृत करतात. या समाजाचे मूलभूत अधिकार कोणते याचे त्यांना मार्गदर्शन करताना, त्या वर्गाच्या अस्सल बौद्धिक जाणीवा व सांस्कृतिक मूल्ये यांची अस्मिता ते तयार करतात. ग्रामसीच्या समोरच रशियामध्ये साम्यवादी क्रांती झाली. तिथे शोषित वर्गाचे नेतृत्व लेनिनने केले होते. ग्रामसीच्या मते, लेनिन हा कर्ता सुधारक व विचारवंत होता. मात्र लेनिनचे सर्वच विचार ग्रामसीला मान्य नव्हते.

विचारवंत व बहुजन कष्टकरी समाजात अंतर असेल तर नव्या परिवर्तनाची शक्यता नसते हे ग्रामसीच्या लक्षात आले होते. मध्य युगात मध्य युरोपात नेमका हाच गोंधळ झाला होता. तेथे धर्मसुधारणेची चळवळ ही जनतेची चळवळ होती तर पुनरुज्जीवनवादी मानवतावादी चळवळ ही बुद्धिवादी प्रगल्भ विचारवंतांची चळवळ होती. मात्र ही विचारवंतांची चळवळ लोकांपर्यंत पोहोचली नाही. उलट धर्मसुधारणा चळवळ बुद्धिप्रामाण्यवादी नव्हती, तरी ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. ग्रामसीच्या मते या दोहोतील अंतर कमी झाल्यास शोषितांच्या चळवळींना योग्य दिशा मिळू शकते. आणि हे काम कर्तेसुधारक विचारवंत करू शकतात कारण ते पोकळ आदर्शवादी नसतात तर ते समाजशील व वास्तववादी असतात. त्यांच्यात एक तळमळीचा निरपेक्ष कार्यकर्ता लपलेला असतो. ग्रामसीला अशी नवी मांडणी अपेक्षीत होती. मार्क्सला अपेक्षीत असणारा समाजवाद या नवमार्क्सवादाच्या सैधांतिक व व्यावहारिक मांडणीतून येईल असा त्याचा विश्वास होता. ग्रामसी हा प्रभावी नवमार्क्सवादी होता. त्याने मार्क्सवादाच्या चूकीच्या मांडणीवर टीका केली, मात्र तो कम्युनिस्ट पक्षाचा विरोधक नव्हता. स्वतः ग्रामसी, लुकाच, अल्थुझर हे स्वतःला मार्क्सवादी लेनिनवादी मानत होते. हे तिघे कम्युनिस्ट पक्षाचे आजीव सदस्य होते. त्यामुळे साम्यवादाच्या रशियन प्रयोगाला त्यांचा विरोध नव्हता. आंतरराष्ट्रीय समूहासमोरचे सामाजिक प्रश्न जसे वाढत गेले व गुंतागुतीचे बनले तसे ग्रामसीचे विचार प्रभावी ठरू लागले. विशेषतः त्याने मांडलेली कर्ता सुधारक व विचारवंताची व्यावहारिक गरज बहुजनांच्या चळवळींची आधार बनली.

मार्क्सवादाच्या काही मर्यादा त्याच्या लक्षात आल्या. त्या स्पष्ट करण्यासाठी त्याने प्रभुत्वाच्या Hegemony सिद्धांत मांडला. बुखारिनच्या विचारांची त्याने कठोर समिक्षा केली. त्याच्या मते बुखारिनने ऐतिहासिक भौतिकवादाची चिकित्सा फारच यांत्रिकी वरवरची होती. हेगेलने सांगितलेला द्वंद्वात्मक विकास हा निसर्गनियम आहे व तो इतिहासात परवर्तीत झाला असे बुखारिनला वाटते. या विचाराला ग्रामसीने विरोध केला. ग्रामसीच्या मते इतिहासाच्या प्रत्येक नव्या टप्प्यात मानवी सर्जनशीलता व मानवाचे कर्तृत्व यांना महत्व असते. भौतिकवादातील जडवादी तत्वज्ञानाच्या ठिकाणी मानवी कर्तृत्वाचे महत्व सांगत त्याने मार्क्सवादाला अधिक व्यावहारिक बनवले. ग्रामसी असे म्हणतो की, भांडवलप्रधान भौतिक उत्पादन साधनात बदल झाला की लगेच समाजात बदल होत नाही याकडे तो लक्ष वेधतो. या समग्र परिवर्तनवादी सांस्कृतिक साधनांचे महत्व सांगताना तो एका बाजूला लेनिन तर दुसऱ्या बाजुला माओला जवळचा विचारवंत वाटतो.

प्रभुत्वाचा सिद्धांत मांडताना ग्रामसी असे म्हणतो की, राजकीय सत्ता ही दमन करणारे व वैचारिक शक्ती असणाऱ्यांच्या हातात असते. या एकत्रित शक्तीतून तयार झालेल्या राज्यसंस्थेला तो सेंटॉर म्हणतो. सेंटॉर

म्हणजे ज्याचा चेहरा माणसाचा आहे शरीर मात्र घोड्यासारखे आहे. मानवी चेहरा म्हणजे मानवी बुद्धी व विचार व घोडा म्हणजे नियंत्रण करणारी शक्ती. ग्रामसीच्या मते क्रांतीमध्ये केवळ प्रभावी कामगार संघटना असून चालत नाही तर त्यांच्याकडे परिवर्तनाचा सखोल विचारही असावा लागतो. थोडक्यात ग्रामसीला असे म्हणावयाचे आहे की, विचार शक्ती व संघटीत नागरी लोकशक्तीमधूनच क्रांती यशस्वी करता येते. यासाठी संघटनेचे नेतृत्व करणारे सेंद्रिय अथवा समाज कटिबद्ध विचारवंतांचे महत्व त्याने सांगितले. असे विचारवंत समाजात राहून एक कार्यकर्ता व एक विचारवंत म्हणून कामगार संघटनेचे नेतृत्व करतात पण दुसऱ्या प्रकारचे पारंपरिक विचारवंत जसे धर्मगुरू हे मात्र समाजापासून दूर राहून आपले आदर्शवादी वा गूढवादी तत्वज्ञान मांडतात. त्यांना समाजाच्या सुखदुःखाशी काही एक घेणे देणे नसते. ग्रामसीने समाजशील विचारवंतांचे परिवर्तनातील योगदान अधोरेखित केले. यासाठी तो रशियाचे उदाहरण देतो. रशियामध्ये साम्यवादी क्रांतीमध्ये कष्टकऱ्यांचे नेतृत्व लेनिनने केले होते. एकाकी कामगार संघटनेला त्याने विचार व नेतृत्वाचा आधार दिला. अशा व्यापक व तत्वाधिष्ठित क्रांतीमधून खरा समाजवाद येईल असे ग्रामसीचे मत होते.

### ३.२.५ ग्रामसीचे इटालीवरील विचार :

ॲन्तिनिओ ग्रामसी हा इटालीयन प्रतिभाशाली विचारवंत व क्रांतिकारक होता. प्रस्थापित फॅसिझमला विरोध करत त्याने कामगारांच्या, शोषितांच्या मुक्तीचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला. यासाठी त्याने मार्क्सवादाचे व्यावहारिक परिक्षण केले. असे करताना त्याचे विचार विशाल, उदारमतवादी व कल्याणकारी स्वरुपाचे होते. यासंदर्भात तो असे म्हणतो की, इटालीच्या इतिहासात अनेक विचारवंतांनी व्यापक वैश्विक भावनेतून आपले विचार मांडले आहेत. त्यामुळेच ते मध्ययुरोपातील अनेक राष्ट्रांना सांस्कृतिकदृष्ट्या आपले वाटतात. ग्रामसीने इटालीतील हिच सांस्कृतिक चळवळ लोकाभिमुख करून बहुजनांच्या मुक्तीसाठी सत्याग्रही प्रयोग करत फॅसिझमला कडवा विरोध केला. ग्रामसीच्या साम्यवादी नव्या मांडणीमध्ये संस्कृती, बुद्धी, ज्ञान व काम या सर्व घटकांना जसा न्याय होता तसेच त्याने यासाठी शिक्षणाच्या सखोलीकरणावर व प्रसारावरही भर दिला होता. त्याच्या या प्रत्येक चळवळीला मुसोलिनीच्या फॅसिझमवादी राजवटीचा प्रखर विरोध होता.

इटालीला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मुसोलिनीने फॅसिझमचा स्वीकार केला. फॅसिझम व नाझीझम ही एकाधिकारशाही प्रवृत्ती होती. तिने एका बाजुला लोकशाहीला म्हणजे वैयक्तीक स्वातंत्र्यांला विरोध केला तर दुसऱ्या बाजुला मार्क्सवादालाही विरोध केला. मार्क्सवादातील मूलभूत भौतिकवादी परिवर्तनाचा विचार फॅसिस्टांना मान्य नव्हता. हेगेलचा चैतन्यवादी विकासवाद त्यांना परिवर्तनाची मूलभूत प्रेरणा वाटत होता. ज्याला राजकीय विचारात आपण आदर्शवादी विचार म्हणतो व ज्याचे व्यापक स्वरूप राष्ट्रवादी आक्रमक एकेरी विचारात परावर्तीत होते. मुसोलिनी या विचारांचा पुरस्कर्ता होता. म्हणूनच ग्रामसीच्या समोर एका बाजूला फॅसिझमला विरोध करण्याचे आव्हान होते तर दुसऱ्या बाजूला कामगारांच्या जागृत संघटना बांधून भांडवलदाराविरूद्ध लढण्याचे आव्हान होते. याच काळात कम्युनिस्ट पक्ष संघटना अंतर्गत तत्वज्ञानातील विसंवादामुळे जगातील बहुतेक सर्वच कम्युनिष्ट देशात एकमेकापासून दुरावू लागली. त्यांच्यात सुधारणावादी कम्युनिष्ट (डावे) व कट्टर साम्यवादी (उजवे) असे जसे गट पडले तसेच या चळवळीतील काहींना आपण

राष्ट्रवादी असावे असेही वाटू लागले. १९२२ मध्ये इटालीतील सर्व सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक समस्या मिटवण्यासाठी लोकसत्ताक उपाययोजना केल्या जातील अशी असंबद्ध घोषणा करत मुसोलिनीने नोव्हेंबर १९२६ मध्ये 'विशेष कायदेमंडळाची' स्थापना केली. या कायदेमंडळाने इटालीयन संसद व सर्व विरोधी संघटनावर बंदी आणली. याचाच एक भाग म्हणून संसद सदस्य व कम्युनिस्ट पक्षाच्या जनरल सेक्रेटरी असणाऱ्या ग्रामसीला तुरूंगात टाकण्यात आले. यावर भाष्य करताना फॅसिझमचे पुरस्कृत न्यायाधीश म्हणाले, ''आम्ही वीस वर्षापासून चालू असलेला मेंदू आज बंद करीत आहोत.'' पण ग्रामसीचा हा मेंदू तुरुंगातही चालूच राहिला आणि छोट्या छोट्या टिपणातून जनजागरण करीत राहिला.

मार्क्सवादी विचारधारेनुसार १९१७ मध्ये रशियात व १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली. यातून लेनिन, स्टॅलिन, माओ यासारखे राज्यकर्ते व साम्यवादाचे पुरस्कर्तेपुढे आले आणि त्यांनी भांडवलशाही, साम्राज्यवाद आणि झार शाही सारख्या व्यवस्थांविरूद्ध संघर्ष करत साम्यवादाची राबवणूक केली. त्यामुळे नव्याने त्यांच्या यशापयशाच्या संदर्भात जगभरात विचार मांडले जाऊ लागले. ट्रॉटस्कीसारख्या विचारवंतांच्या लोकशाहीसदृश्य विचारातून नवमार्क्सवादी विचारांची एक मोठी लाट जगामध्ये निर्माण झाली. यात ग्रामसी व लुकाच बरोबर अल्थुझर, कोर्श, गोल्डमन, मार्क्युस, जे. हेबरमास इत्यादी अनेक नवमार्क्सवादी पुढे आले. तसेच फ्रँकफर्ट स्कुल, फ्रेंच मार्क्सवाद, युरो कम्युनिझम इत्यादी चळवळीही पुढे आल्या.

या काळात इटालीमध्ये मुसोलिनीची सता होती. एकच पक्ष, एकच नेतृत्व, प्रखर राष्ट्रवाद, हेगेलीयन आदर्शवाद आणि लोकशाही तथा साम्यवादाला विरोध या तत्वांवर मुसोलिनीचा फॅसिझम इटालीची पुनर्रचना करत होता. त्याने ग्रामसीसारख्या विरोधकांना तुरुंगात टाकून कार्पोरेट राज्याची कल्पना मांडली. जे राज्य संकुचित अशा एकाधिकारशाहीवर उभे होते. मात्र व्यापक व समतोल विकासासाठी ग्रामसीला लेनिनप्रमाणे काही लोकशाही मार्ग अपेक्षीत होते. भांडवलशाहीत बहुजन समाजाची झालेली सांस्कृतिक हेळसांड त्याला अस्वस्थ करणारी होती. म्हणूनच मार्क्सचे अधिक व्यावहारिक आकलन करून भांडवलशाही, अस्थिर जगं, तिसरे जग व साम्यवादी समाजासमोरील समस्या सोडवता येतील असे त्याला वाटत होते.

हे व्यापक सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी दुर्लक्षीत नागरी समाजाला त्याने परिवर्तनाच्या प्रवाहात आणले. त्याच्या मते नागरी समाज भिन्नतेवर उभा असतो त्याच्यात वैयक्तीक हितसंबंध व समाजासाठी असणारे त्याचे हितसंबंध यात अंतर असते. त्यामुळे समाजात एक प्रकारचे नैराश्य, स्थितीशिलता व परात्मभावाची निर्मिती होते. म्हणून प्रभावी संघटनबांधणीसाठी व्यक्तीचे हितसंबंधातील अंतर दूर करणे गरजेचे असते. यासाठी संस्कृतीचे व्यापक समाजीकरण व सखोल आत्मभान देणारे शिक्षण आवश्यक आहे असे तो म्हणतो. केवळ उत्पादनाची साधने व भांडवल आहे म्हणून भांडवलदार सत्ताधिश बनत नाही तर त्याच्याकडे उद्योगातील तांत्रिकता, राजकीय अर्थनीती, नवी कायदेव्यवस्था व समूह संस्कृतीचे ज्ञान असते. तसेच व्यवस्थापकीय कौशल्यही असते. नागरी समाजातील या सर्व प्रवाहांना ग्रामसी भिन्न मानत नाही कारण तो सेंद्रिय विचारांचा पुरस्कर्ता होता. प्रत्येक गट नागरी समूहात कोठे ना कोठे एकमेकांशी जोडलेला असतो. अशा संलग्न गटात शिक्षण व संस्कृतीद्वारे क्रांतीचे विचार तयार करता येतात असे ग्रामसी म्हणतो. असे सामाजिक प्रश्न

सोडवण्यासाठी विज्ञान शास्त्र की अध्यात्मनीतीशास्त्र या द्वंदात ग्रामसी पडला नाही. त्याच्या मते नागरी समूहाला एकत्र बांधण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण महत्वाचे असते. त्याचा मानवी कर्तृत्व, बुद्धी व सर्जनशील शक्तीवर विश्वास होता. यंत्रावर काम करणाऱ्या कामगाराकडेच कौशल्य व बुद्धी असते हा पारंपरिक विचार त्याला मान्य नव्हता. त्याच्यामते श्रमाचे काम करणाऱ्या कामगाराकडेही बुद्धी व कौशल्य असते म्हणूनच शहरी कामगार व ग्रामीण कामगार यातला फरक तो नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. नागरी समूहात सांस्कृतिक अशा साहचर्यामुळे, शिक्षणामुळे स्वंयस्फूर्त एकजिनसीपणा येतो व लोकांचा राजकीय प्रक्रियांतील, चळवळीतील सहभाग सहजस्फूर्त बनतो असे ग्रामसी म्हणतो.

आदर्श राज्य तयार करण्यासाठी मुसोलिनीने यावेळी एकूण तीन पर्याय सांगितले. यात आदर्श राज्याला कार्पोरेट राज्य करण्यासाठी एकाच पक्षाचे नियंत्रणक्षम सरकार असणे गरजेचे आहे. एकजिनसी पक्षाबरोबर राज्यही एकाधिकाराने चालावे आणि यासाठी एकमुखी नेतृत्व असावे. ग्रामसी हा नवमार्क्सवादी विचारवंत असल्याने त्याने सर्व प्रकारच्या संकुचित अशा एकाधिकारशाहीला विरोध केला. सोविएट रशियातील लेनिनप्रमाणे विकसीत लोकशाहीचे मार्ग ग्रामसीला अपेक्षीत होते. भांडवलशाहीमधील एकंदर संस्कृतीची कुचंबना व थांबलेला विकास नवमार्क्सवाद्यामधील ग्रामसीसारख्या संवेदनशील विचारवंताला अस्वस्थ करणारा होता. मार्क्सला अपेक्षीत असणारा विचार नव्याने शोधून त्याच्या आकलनातून भांडवलशाही, तिसरे जग, अस्थिरता व साम्यवादी राष्ट्रासमोरील जटील प्रश्न सोडवता येतील का याचा सखोल विचार ग्रामसीने तुरुंगाच्या एकांतवासात केला.

### ३.२.६ ग्रामसीचे शिक्षणावरील विचार :

नागरी समाज, शिक्षण आणि संस्कृतीच्या परस्पर संबंधातून जागृत समाजच क्रांती करू शकतो असे ग्रामसीचे मत होते. यासंदर्भात मार्क्स असे म्हणतो की, ''वर्ग आणि वर्गावर्गातील वैमनस्याने ग्रस्त असलेल्या जुन्या नागरी समाजाच्या जागी नवी व्यवस्था अस्तित्वात येईल. ज्यामध्ये स्वतःचा स्वतंत्र विकास ही सर्वांच्या स्वतंत्र विकासाची पूर्व अट असेल.'' नागरी समाजाचे बाह्य स्वरूप एकसंध दिसत असले तरी नागरी समाज हा आतून भिन्न हितसंबंधावर उभा असतो. म्हणूनच राज्यसंस्था या समाजाला समान स्वातंत्र्य देऊ शकत नाही. ग्रामसीने नागरी समाजातील भिन्न वर्गांच्या हितसंबंधाचा अभ्यास केला होता. लोकशाहीत वा हेगेलप्रणीत आदर्शवादी राज्यात व्यक्तीचे वैयक्तिक हितसंबंध व समाजाप्रती असणारे हितसंबंध यात अंतर असते. त्यामुळे व्यक्तीमध्ये परात्मभाव तयार होतो. ग्रामसीच्या मते, नागरी समाजात या दोन हितसंबंधातील अंतर कमी करावे लागते आणि ते केवळ नव मार्क्सवाद करू शकतो.

ग्रामसीने शिक्षणाचा नागरी समाजाशी व नागरी समाजाचा राजकीय प्रभुत्वाशी संबंध जोडला होता. नागरी समाज हा खऱ्या अर्थाने बौद्धिक स्वरुपाचे काम करू शकतो जर त्याला योग्य प्रकारे तत्वज्ञान, इतिहास, साहित्य व संस्कृतीचे शिक्षण दिले तर असे ग्रामसीला वाटते. यामुळे जसे नागरी समाज व राज्य यातील अंतर कमी होऊ शकते. तसेच शिक्षण व राजकारणातील अंतरही कमी होते, असे तो म्हणतो. ग्रामसी हा सेंद्रिय (organic) विचारसरणीचा समर्थक होता. नागरी समाजातील प्रभावी सांस्कृतिक संघटनाच केवळ सत्तेपर्यंत पोहचू शकते,

असा त्याचा संदेश होता. (The central message of Gramsci is that the organisation of culture is organic to the dominant power) ग्रामसीच्या मते, असे नागरी गट हे केवळ आर्थिक व्यापारी स्वरूपाचे नसतात तर त्यांना सामाजिक व राजकीय स्वरूपाचा अवकाश असतो. बुखारिनने ऐतिहासिक भौतिकवादाच्या प्रत्येक टप्प्यात ज्या यांत्रिकपणे आर्थिक गटांचा (उत्पादन साधनवाले / भौतिक वस्तु असणारे) उल्लेख केला त्या गटांना नागरी समुदायात सांस्कृतिक प्रभावी बाजू असते. कामगार वर्गही अशा सांस्कृतिक वातावरणात स्वतःच्या राजकीय जाणिवा प्रगल्भ करत असतो. या सर्व नागरी शक्तीला तत्वज्ञान व ज्ञान असणाऱ्या कर्त्या सुधारक विचारवंताचे नेतृत्व गरजेचे असते. यासाठी ग्रामसी शिक्षण व संस्कृतीच्या समाजीकरणावर भर देतो.

भांडवलदारांच्या हातामध्ये प्रभुत्व का असते याची चिकित्सा करताना ग्रामसी म्हणतो की, केवळ या वर्गाच्या हातात उत्पादनाची साधने आहेत म्हणून नव्हे तर त्यांनी औद्योगिक तांत्रिकता, राजकीय अर्थनीती, नवी कायदा व्यवस्था व या सर्वातून तयार झालेल्या संस्कृतीला आत्मसात केले. याबरोबरच त्यांनी व्यवस्थापकीय कौशल्यही आत्मसात केले. ग्रामसी या सर्व वेगवेगळया नागरी प्रवाहांना भिन्न मानत नाही. कारण ते सर्व एकमेकाशी संलग्न असतात. एकाच वेळेला एक गोष्ट तांत्रिक वाटत असताना ती राजकीय पण असू शकते. अशा नागरी समूहांना पुढे नेण्याचे काम समाजशील व क्रियाशील विचारवंत व नेत्यांचे असते. यातून पुढे होणारी कामगार वर्गाची क्रांती ही सत्तापालटाची वरवरची व झटपट प्रक्रिया नसते तर ती प्रगल्भ, जागृत व शिकलेल्या शहाण्या कामगारांची सामूहिक कृती असते. यामागे कामगार वर्गाचा म्हणजेच नागरी समाजाचा लोकशाही आत्मविश्वास असतो. नागरी समाजात असणारे भिन्न भिन्न गट एकमेकांना जोडून कामगार वर्गाची ताकद वाढवण्याचा ग्रामसीचा प्रयत्न होता. त्याने नागरी समाजातील मानसाच्या सर्जनशील कर्तृत्वाला आकार व शक्ती दिली. शिक्षण व संस्कृती दिली आणि साम्यवादी क्रांतीतील लोकसहभाग वाढवण्याचा प्रयत्न केला.

१९२३ मध्ये गिओवनी जेन्टाई या फॅसिस्ट सरकारच्या पहिल्या सेक्रेटरीने सरकारचे नवे शैक्षणिक धोरण जाहीर केले. तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणातही त्याने तत्वज्ञानाला महत्व दिले आणि अध्यात्मवादी विचार तयार करण्यासाठी त्याने सांस्कृतिक शिक्षणाला महत्व दिले. अर्थात तशा चैतन्यवादी आदर्शवादी विचारातून नेतृत्वाचा विकास होईल असे त्याला वाटत होते. ग्रामसीने विज्ञान व शास्त्र अथवा अध्यात्म व नीतीतत्वे यांच्या आधारे सामजिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला नाही. नागरी समाजातील संघटना व संस्कृती यातील नाते त्याला अधिक महत्वाचे वाटले. याला तो 'व्यावसायिक संस्कृती' असे नाव देतो. कारखान्यातील व्यावसायिक तांत्रिकता टिकवण्यासाठी वा ती कार्यरत करण्यासाठी मानवी शक्तीच महत्वाची असते याकडे तो अभ्यासकांचे लक्ष वेधतो. ग्रामसीचा मानवी शक्तीवर, कर्तृत्वावर व त्याच्या ज्ञानावर विश्वास होता. केवळ यांत्रिक स्वरूपाचे काम करणाऱ्या कामगाराकडेच बुद्धि कौशल्य असते असे नसून कष्टाचे, श्रमाचे काम करणाऱ्या कामगाराकडेही बुद्धि कौशल्य व आत्मभान असणारी संस्कृती असते. अभिजात शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणातील फरकामुळे बुद्धिप्रामाण्यवादी व श्रमाचे काम यातही फरक झाल्याचे व अंतर पडल्याचे ग्रामसी म्हणतो. ग्रामसीच्या मते,

सर्वच श्रमाची कामे ही बुद्धिप्रधान असतात. त्याने शहरी कामगार व ग्रामीण भागात काम करणारा श्रमिक यातील अंतर बंद करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात नागरी समाज हा सांस्कृतिकदृष्टया व आपसातील मतभेद दूर करून कसा एकजिनसी करता येईल आणि त्या संघटीत समाजाला समाजशील नेतृत्वाद्वारे सत्तेपर्यंत कसे नेता येईल यावर ग्रामसीने सूक्ष्म चिंतन केले. साम्यवादी समाजरचनेच्या निर्मितीमध्ये कामगार वर्गाबरोबर, बुद्धिवादी विचारवंत व नागरी संघटनांना एकत्र बांधण्याचा त्याने प्रयत्न करून क्रांतीची व्याप्ती अधिक व्यावहारिक, बौद्धिक व सर्वसमावेशक बनवली. ग्रामसीचे हे विचार माओच्या सांस्कृतिक क्रांतीच्या जवळ जाणारे व अधिक दिशादर्शक व लोकसत्ताक होते. ही चळवळ केवळ बुद्धिवाद्यांच्या वा सांस्कृतिकदृष्ट्या एकत्र बांधलेल्या नागरी समूहाची नव्हती, तर ती बौद्धिक, नैतिक, सांस्कृतिक व स्वयंस्फूर्त होती. यातील लोकांचा सहभाग बळजबरीचा व ओढून ताणून तयार केलेला नव्हता. ग्रामसी या चळवळीतून निर्माण होणाऱ्या राजकीय प्रभुत्वाला शैक्षणिक प्रक्रिया मानतो.

ग्रामसीने नागरी समुहाच्याच नव्हे तर एकंदर राजकीय प्रक्रियांच्या व मानवाच्या मानुषिकरणाच्या संदर्भात शिक्षण, तत्वज्ञान व व्यक्तीचा सखोल विचार केला होता. शिक्षण हे व्यक्तीला राजकीय नेतृत्वाकडून सामाजिक स्तरांकडे आणि शाळेकडून कुटूंबाकडे घेऊन जाणारे असावे असे ग्रामसी म्हणतो. त्यामुळे क्रांतीतून होणारी परिवर्तनाची प्रक्रिया केवळ दृश्य राजकीय सत्ताबदलाशी निगडीत राहात नाही तर ती समाजपरिवर्तनाचा व्यापक भाग बनते असे त्याला वाटते. ग्रामसीने तत्वज्ञानाचे महत्व मान्य केले होते. त्याच्या मते तत्वज्ञान हे सापेक्ष शैक्षणिक व्यक्तिमत्व असून ते शास्त्रीय गृहितकांवर उभे असते. जे इतिहासाच्या विकासात तपासून घेतले जाते. राजकीय प्रक्रियेत शिक्षणाचे महत्व हे अनन्य साधारण असते हे सांगताना शिक्षण नक्की काय भूमिका वाढवते, हे ग्रामसीने सांगितले. शिकलेला नागरी वर्ग व कामगारवर्गही राजकीय प्रक्रियांकडे वास्तवादी नजरेने पाहू शकतो आणि हा शिकलेला वर्ग सत्ताधारी वर्गाने लोकांपासून लपवून ठेवलेल्या गोष्टी लोकांसमोर प्रभावीपणे मांडू शकतो. प्रत्येक शाळा ही कामाशी व शैक्षणिक सिद्धांत हे व्यवहाराशी प्रमाण असावेत असे त्याचे सांगणे होते.

## ३.३ सारांश :

इटालीमध्ये आधुनिक राज्यशास्त्राचा जनक मॅकियाव्हेलीचा जन्म झाला. त्याने धर्मकारण व राजकारणाला वेगळे करून राजकारणाच्या अभ्यासाची आधुनिक विचारप्रणाली निर्माण केली. त्याच नव्या सर्जनशील विचारांच्या पार्श्वभूमिवर ग्रामसीने इटालीलाच नव्हे तर आधुनिक राजकीय विचाराला नवीन आयाम बहाल केले. कार्ल मार्क्स व एंजेल्स यांनी मांडलेल्या मार्क्सवादाची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न त्याने केला. मार्क्सची परिवर्तनाची सैधांतिक मांडणी शास्त्रीय होती. पण परिस्थितीच्या संदर्भात मार्क्सची काही भाकीते व समिकरणे नव्या राजकीय प्रवाहात अपुरी वाटू लागली किंवा त्याच्या आकलनात वैविध्य येऊ लागले. यामुळे नव्या संदर्भात मार्क्सवादाचे आकलन कसे असावे यावर जगभरात चिंतन सुरू झाले. यालाच नवमार्क्सवादी विचार असे म्हटले जाते.

या नवमार्क्सवादी विचारप्रांतात ग्रामसीने मार्क्सचा मूलगामी व सखोल अभ्यास केला. त्याने हेगेलीयन मार्क्स विकसीत करताना त्यात नागरी समाजाच्या योगदानाला प्राधान्य दिले. ग्रामसीचा जन्म सारडिनिया या इटालीतील मागास पण सांस्कृतिकदृष्टया स्वतःचे वेगळेपण असणाऱ्या प्रांतात झाला. दारिद्र्याचे चटके व स्वतःचे आजारपण यामुळे त्याला शिस्तबद्ध शिक्षण घेता आले नाही पण तुरीन या औद्योगिक शहरात आल्यावर त्याला कामगारांचे दुःख समजले. कामगार तसे संघटीत आहेत पण त्यांच्याकडे बुद्धिवादी नेतृत्व नाही, हे ग्रामसीच्या लक्षात आले. या काळात त्याने पत्रकारिता केली. या माध्यमातून कामगारांना कसबी शिक्षण, तंत्रज्ञान व सांस्कृतिक शिक्षण द्यावे, असे तो सातत्याने सांगू लागला. त्याचा मुसोलिनीच्या फॅसिस्ट राजवटीला विरोध होता. कामगारांच्या न्याय्य मागण्यासाठी त्याने कम्युनिष्ट पक्षाची स्थापना इटालीत केली व पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व केले. त्याच्या या चळवळी फॅसिस्टांना आवडणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे १९२३ मध्ये त्याला तुरुंगात टाकण्यात आले. तिथे त्याने स्वतःचे नवमार्क्सवादी, परिवर्तनवादी, नागरी समुहाबाबतचे व कर्त्या सुधारक विचारवंताबरोबर शिक्षणविषयक विचार लिहिले. याला 'तुरुंगातील टिपा' व पुढे 'पर्शियन' असे नाव मिळाले.

ग्रामसी हा केवळ विसाव्या शतकातील नवमार्क्सवादी विचारवंत नव्हता तर तो नागरी समाज, शिक्षण, तंत्रज्ञान, मानवी, कर्तृत्व, परिवर्तन, इतिहास या महत्वाच्या विषयावर सखोल भाष्य करणारा विचारवंत होता. म्हणूनच परिवर्तनात कामगार संघटनेबरोबर नागरी समाज, विचारवंत व शिक्षण यांचे महत्व तो अधोरिखित करतो. शाळेचा कामाशी व शैक्षणिक सिद्धांताचा व्यवहाराशी ताळमेळ लागला पाहिजे असे त्याचे आग्रही प्रतिपादन होते. शिक्षणामुळे राजकीय प्रक्रियांकडे पहाण्याचा वास्तवादी दृष्टीकोन विकास पावतो असे त्याचे मत होते. असा सुशिक्षित समाज राजकारणाच्या जवळ जावू शकतो असे ग्रामसी म्हणतो.

थोडक्यात, ग्रामसी हा विसाव्या शतकातील थोर नवमार्क्सवादी विचारवंत होता पण त्याचवेळी तो अधिक समाजशील पुरोगामी क्रांतीचा अध्वर्यू ही होता. ऐतिहासिक भौतिकवाद व क्रांतीची त्याने नव्याने मांडणी करून साम्यवादी विचार अधिक लोकभिमुख करण्याचा वास्तविक प्रयत्न केला.

## ३.४ पारिभाषिक शब्द व अर्थ :

राज्यशास्त्रामध्ये काही पारिभाषिक संकल्पना असतात. त्यांना स्वतःची एक ओळख असते. त्यांचा अर्थ समजल्याशिवाय राजकीय विचार वा तत्वज्ञान लक्षात येत नाही. प्रस्तुत प्रकरणातील काही संकल्पना पुढीलप्रमाणे–

### १) आदर्शवादी विचार

आदर्शवादी विचार प्लेटो व हेगेलने प्रामुख्याने मांडला. यात मूल्य, विचार, नैतिकता यांना महत्व असते. विचाराला ते चित्वाद असे म्हणतात. विश्वाच्या मूळाशी चैतन्यदायी अमूर्त अशी एक व्यवस्था असते. या अमूर्त शक्तीद्वारे म्हणजे विचाराद्वारे समाजात परिवर्तन होते असे आदर्शवादी मानतात. आदर्शवादी राज्याला ईश्वराचे प्रारूप मानतात. त्यामुळे राज्याच्या भल्यामध्ये व्यक्तीचे भले असते, असे या विचारवंतांचे मत असते. हेगेलच्या या विचाराचा हिटलर, मुसोलिनीवर प्रभाव होता.

**२) वास्तवादी विचार**

यालाच भौतिकवादी/ जडवादी विचार म्हणतात. राज्यशास्त्रात कार्ल मार्क्सने या विचाराचा पुरस्कार केला. वास्तववाद पोकळ मूल्ये व नैतिकता यांना महत्व देत नाही. त्यांच्या मते समाजातील प्रत्येक परिवर्तन हे भौतिक वस्तू म्हणजे उत्पादन साधनातील वृद्धी वा घट यावर निर्धारित असते. मार्क्सने हेगेलच्या विचार नावाच्या शक्तीला महत्व दिले पण भौतिक उत्पादन साधनातील बदलांमुळे विचार बदलतात असे तो मानतो.

**३) सोविएट्स**

ही संकल्पना रशियातील असून सोविएटचा अर्थ ग्रामसभा असा होतो. लेनिनने या ग्रामसभेला व्यापक अधिकार देऊन समाजवादाअंतर्गत लोकशाही मूल्यांचे महत्व मान्य केले.

**४) नवमार्क्सवाद**

कार्ल मार्क्स व एंजेल्स या दोहोंनी १९ व्या शतकात जे विचार मांडले त्याला मार्क्सवाद म्हणतात. साधारणः १९३० नंतर या मार्क्सवादाची रशियाच्या व नंतर चीनच्या संदर्भात चिकित्सा सुरू झाली मार्क्सवादाच्या काही मर्यादा लोकांच्या लक्षात आल्याने मार्क्सवादाची पुन्हा फेरमांडणी सुरू झाली. या व्यापक चळवळीला नवमार्क्सवाद असे म्हणतात यात ग्रामसी, लुकाच, अल्थुझर, जे. हेबरमास इत्यादी शेकडो नवे विचारवंत तयार झाले.

**५) अनुभववादी**

वास्तववादी व अनुभव तथा निरिक्षणावर आधारित असणाऱ्या विचारांना अनुभववादी असे म्हणतात. हा विचार आधुनिक, शास्त्रीय, वस्तुनिष्ठ व प्रस्तुत स्वरूपाचा असतो.

**६) दमनकारी व्यवस्था**

इतरांना दाबून टाकणारी प्रभावी व्यवस्था होय.

**७) सेंद्रिय व्यवस्था**

म्हणजे राज्य वा नागरी समाज हा वेगवेगळा नसून तो एकमेकांशी आंतरसंबंधाने बांधलेला असतो.

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ) खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ग्रामसीने कोणत्या राजकीय विचारांची फेरमांडणी केली?

२) ग्रामसीने मांडलेला प्रभुत्वाचा सिद्धांत त्याने कोणत्या रूपकातून मांडला?

३) नवमार्क्सवाद म्हणजे काय?

४) ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे काय?

५) नवमार्क्सवादी काही विचारवंतांची नावे सांगा.

६) हेगेलने कोणत्या गोष्टीच्या आधारे परिवर्तन होते असे सांगितले?

७) कार्ल मार्क्सच्या ग्रंथाचे नाव सांगा.

८) लेनिन कोण होता?

९) ग्रामसीच्या पुस्तकाचे नाव सांगा.

१०) ग्रामसीने कोणाच्या विचारावर टीकात्मक भाष्य केले?

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) नवमार्क्सवादात कोणाच्या विचाराचे परिक्षण केले जाते?

अ) कार्ल मार्क्स ब) एंजेल्स

क) कार्ल मार्क्स व माओ ड) कार्ल मार्क्स व एंजेल्स

२) ग्रामसीने कोणत्या विचारधारेला विरोध केला?

अ) साम्यवादी ब) समाजवादी क) फॅसिस्ट ड) उदारमतवादी

३) सेंटॉर म्हणजे-

अ) हयवदन ब) हयवदनच्या विरूद्ध

क) सूरवदन ड) यापैकी नाही

४) ग्रामसीचा जन्म कोणत्या गावात झाला?

अ) बर्लीन ब) हेग

क) सारडिनिया ड) तूरीन

५) ग्रामसीला तुरुंगात टाकणारा हुकूमशहा कोण होता?

अ) मुसोलिनी ब) मार्कोनी

क) हिटलर ड) स्टॅलिन

६) लेनिनने कोणास जास्त अधिक अधिकार द्या असे म्हटले होते?

अ) केंद्र सरकार ब) पॉलिटब्युरो

क) सोव्हिएट्स ड) राज्यसरकार

७) ग्रामसीप्रमाणे सांस्कृतिक क्रांतीचे विचार कोणी विकसीत केले?

अ) लुकाच ब) माओ

क) जे. हेबरमास ड) अल्थुझर

८) ग्रामसीप्रमाणे खालील कोण सेंद्रिय सिद्धांताचा पुरस्कर्ता होता?

अ) हर्बर्ट स्पेन्सर ब) मॅक्स वेबर

क) जॉन ऑस्टीन ड) रॉबर्ट डाल

९) 'पर्सियन' नावाचा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) ग्रामसी ब) लुकाच

ब) एंजेल्स ड) बुखारिन

१०) ऐतिहासिक भौतिकवादाच्या परिवर्तनात ग्रामसीच्या मते कोण महत्वाचे असते?

अ) राष्ट्रशक्ती ब) समूहशक्ती

क) मानवी कर्तृत्व ड) ईश्वरी कर्तृत्व

**क) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ग्रामसी हा ...... देशातील विचारवंत होता.

२) ...... या शहरात गेल्यावर त्याला कामगारांचे दुःख समजले.

३) फॅसिस्ट विचाराच्या मूळाशी ...... हे तत्वज्ञान असते.

४) हेगेल व मार्क्स हे ..... या प्रकारचे विचारवंत होते.

५) नागरी समाजाचे नेतृत्व ..... यांनी करावे असे ग्रामसी म्हणतो.

६) ग्रामसीने विचारवंतांचे एकूण ...... प्रकार केले.

७) 'प्रिझन नोटस' हा ग्रंथ ग्रामसीने ..... येथे लिहिला.

८) नागरी समाज हा ...... हितसंबंधावर उभा असतो.

९) कार्ल मार्क्सने ...... व ...... हे ग्रंथ लिहिले.

१०) इटालीमध्ये ग्रामसीने ...... पक्षाची स्थापना केली.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**अ) खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहा– उत्तरे**

१) ग्रामसीने मार्क्सवादाची फेरमांडणी केली.

२) ग्रामसीने प्रभुत्वाचा सिद्धांत सेंटॉर (हयवदन) च्या रूपात मांडला.

३) नवमार्क्सवाद म्हणजे नवमार्क्सवादी विचार ज्यात कार्ल मार्क्स व एंजेल्स यांच्या विचारांची समिक्षा केली जाते व त्याचे व्यापक आकलन करण्याचा प्रयत्न होतो.

४) ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे इतिहासातील प्रत्येक नवीन टप्पा उत्पादन साधने असणारे व नसणारे म्हणजे सबल व दुर्बल यांच्या संघर्षातून होतो.

५) ग्रामसी, लुकाच, अल्थुझर, जे. हेबरमास, मार्क्सुस इत्यादी विचारवंत नवमार्क्सवादी होते.

६) विचार म्हणजे चैतन्याच्या आधारे समाजपरिवर्तन होते असे हेगेल म्हणतो.

७) दास कॅपिटल, कम्युनिस्ट मॅनिफेस्टो, द फिलॉसफी ऑफ पॉवर्टी, द पॉवर्टी ऑफ फिलॉसफी इत्यादी अनेक ग्रंथ मार्क्सने लिहिले.

८) लेनिन हा साम्यवादी विचार व राज्यपद्धतीचा स्वीकार करणारा रशियातील पहिला साम्यवादी नेता व विचारवंत होता.

९) ग्रामसीने 'प्रिझन नोटस' नावाचा ग्रंथ लिहिला.

१०) ग्रामसीने विशेषतः बुखारिनच्या ऐतिहासिक भौतिकवादावर टीकात्मक भाष्य केले.

**ब) योग्य पर्याय निवडा या प्रश्नाचे उत्तरे**

१) नवमार्क्सवादात कोणत्या विचारांचे परिक्षण केले जाते?

ड) कार्ल मार्क्स व एंजेल्स

२) ग्रामसीने कोणत्या विचारधारेला विरोध केला?

क) फॅसिस्ट

३) सेंटॉर म्हणजे

ब) हयवदनच्या विरुद्ध

४) ग्रामसीचा जन्म कोणत्या गावात झाला?

क) सारडिनिया

५) ग्रामसीला तुरुंगात टाकणारा हुकूमशहा कोण?

अ) मुसोलिनी

६) लेनिनने कोणास अधिक अधिकार द्यावे, असे म्हटले होते?

क) सोविएटस (ग्रामसभा)

७) ग्रामसीप्रमाणे सांस्कृतिक क्रांतीचे विचार कोणी विकसीत केले?

ब) माओ

८) ग्रामसीप्रमाणे खालील कोण सेंद्रिय सिद्धांताचा पुरस्कर्ता होता?

अ) हर्बर्ट स्पेन्सर

९) 'पर्सियन' नावाचा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) ग्रामसी

१०) ऐतिकासिक भौतिकवादाच्या परिवर्तनात ग्रामसीच्या मते कोण महत्वाचे असते?

क) मानवी कर्तृत्व

**क) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) ग्रामसी हा इटाली देशातील विचारवंत होता.

२) तूरीन या शहरात गेल्यावर त्याला कामगारांचे दुःख समजले.

३) फॅसिस्ट विचाराच्या मूळाशी आदर्शवाद हे तत्वज्ञान असते.

४) हेगेल व मार्क्स हे परिवर्तनवादी प्रकारचे विचारवंत होते.

५) नागरी समाजाचे नेतृत्व विचारवंतांनी करावे असे ग्रामसी म्हणतो.

६) ग्रामसीने विचारवंतांचे एकूण दोन (पारंपरिक व समाजप्रतिबद्ध) प्रकार केले.

७) 'प्रिझन नोटस' हा ग्रंथ ग्रामसीने तुरुंगात लिहिला.

८) नागरी समाज हा भिन्नभिन्न हितसंबंधावर उभा असतो.

९) कार्ल मार्क्सने कम्युनिस्ट मॅनिफेस्टो व दास कॅपिटल हे ग्रंथ लिहिले.

१०) इटालीमध्ये ग्रामसीने कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**दीर्घोत्तरी प्रश्न किंवा निबंधवजा प्रश्न**

१) नवमार्क्सवाद म्हणजे काय हे सांगून ग्रामसीने मार्क्सवादात कोणती महत्वाची भर टाकली? ते स्पष्ट करा.

२) ऐतिहासिक भौतिकवाद म्हणजे काय हे सांगून बुखारिनने सांगितलेल्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या कोणत्या मर्यादा ग्रामसीने सांगितल्या? ते सविस्तर द्या.

३) ग्रामसीचे नागरी समाजाबद्दलचे विचार सांगा.

४) ग्रामसीचा प्रभुत्वाचा सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

५) ग्रामसी हा साम्यवादी असून लोकशाहीकडे झुकला होता असे तुम्हाला वाटते का? चर्चा करा.

**टीपा लिहा.**

१) ऐतिहासिक भौतिकवादात मानवी कर्तृत्व

२) ग्रामसीचे शिक्षणविषयक विचार

३) ग्रामसी व सेंटॉर

४) ग्रामसी व लेनिन यातील साम्यस्थळे

५) ग्रामसी व सेंद्रिय नागरी समाज

६) ग्रामसी व सांस्कृतिक क्रांती

७) प्रिझन नोटस एक आदर्श ग्रंथ

८) कामगार क्रांती व ग्रामसीचे विचार

## ३.७ संदर्भ पुस्तके व ग्रंथ :


१) डॉ. चौसाळकर अशोक – मार्क्सवाद –उत्तर मार्क्सवाद, प्रतिमा प्रकाशन, पुणे

२) प्रा. श्रृंगारपुरे अरविंद – भारतीय तथा पाश्चिमात्य राजकीय विचार, मंगेश प्रकाशन, नागपूर

३) प्रा. भा. ल. भोळे – भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, पिंपळापुरे अॅड कं. पब्लीशर्स नागपूर

४) Francis W Coker - Recent Political Though, The world Press Pvt. Ltd.

५) दूरशिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे एम. ए. भाग १ राज्यशास्त्र आवश्यक पेपर १ 'राजकीय सिद्धांत'

६) George H- Sabine A History of Political Theory, George H Harrap and Company Ltd London

७) C. L. Wayper - Political Thought. S. T. Pauls, Honce Warwick lane London EC 4

८) पाटील वा. भि. – पाश्चिमात्य राजकीय विचार, मंगेश प्रकाशन, नागपूर

९) प्रा. काणे प. सि. – काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ, विद्या प्रकाशन, नागपूर

१०) प्रा. गर्दे दि. के. – पाश्चात्य राजकीय विचार प्रवाह, महाराष्ट्र राज्यग्रंथनिर्मिती मंडळासाठी गो. य. राणे प्रकाश्न पुणे.


**Reference Reading :**


१) Mahajan V. D. & Sethi R. R. Recent Political Thought, Premier Pub. Company. Delhi

२) William Ebenstein - Great Political Thinkers. Plato to the present Modern Political Thought The great issues II Edn. oxford & IBH Pub- Company

३) Radheysham Chourasia History of western Political Thought Vol I & II

४) Sudha J. P. History of Political Thought

७) डॉ. डोळे ना. य., राजकीय विचारांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

६) प्रा. कुलकर्णी सुधाकर, निवडक राजकीय विचारवंत, विद्या भारती प्रकाशन, लातूर

❍❍❍

घटक ४

# हाना आरेण्ट


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ जीवन परिचय
- ४.२.२ मानवी अवस्था
- ४.२.३ सर्वंकषतावाद
- ४.२.४ क्रांतीकारक विचार
- ४.२.५ नागरी प्रतिकार

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर खालील गोष्टी समजून येतील.

१. हाना आरेण्ट यांचे सर्वंकषतावादावरील विचार समजून येईल.

२. हाना आरेण्ट यांचे मानवी स्वभावाबद्दलचे विचार अभ्यासता येईल.

३. हाना आरेण्ट यांचे क्रांतीविषयक विचार अभ्यासता येईल.

४. हाना आरेण्ट यांचे नागरी प्रतिकारावरील विचार समजून घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

पाश्चात्य राजकीय विचारवंतामध्ये सॉक्रेटीसपासून आजपर्यंत अनेक विचारवंतांनी आपले विचार मांडले आहेत. एकोणीसाव्या व विसाव्या शतकात अनेक नव्या विचारवंतांनी मांडणी केली आहे. त्यामध्ये जॉन रॉल्स,

इसाया बर्लिन, हायेक नॉजीक, कार्लपॉपर इत्यादी अनेक विचारवंतांचा समावेश होतो. त्यातील हाना आरेण्ट ह्या एक महत्त्वाच्या विचारवंत आहेत. त्यांनी आपल्या जीवनामध्ये अनेक पुस्तके लिहिले आहेत. त्या सर्व पुस्तकांमध्ये सर्वंकषवाद, हिसा, स्वातंत्र्य क्रांती, नागरी प्रतिकार इत्यादी विषयाची चर्चा केली असून त्यासंदर्भात मूलभूत राजकीय चिंतन केले आहे या सर्व गोष्टीचा विचार अभ्यासकाला जाणून घेण्यास प्रवृत्त करते. त्यामुळे हाना आरेण्ट यांनी मांडलेले विचार अभ्यासणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याच्या विचाराची चर्चा या घटकामध्ये करण्यात आले आहे.

## ४.२ विषय–विवेचन :

### ४.२.१ जीवन परिचय :

जर्मनीतील हॅनोव्हर येथे १४ ऑक्टोबर १९०६ रोजी हाना आरेण्ट यांचा जन्म एक सेक्यूलर ज्यू कुटुंबात झाला. १९०९ साली बालपणीच ते कोनिग्सबर्ग या पूर्व प्रशियातील ठिकाणी वास्तव्यास गेल्या. १९१३ साली त्यांच्या वडिलांची निधन झाले. त्याच्या वडीलाचे नांव पाऊल आरेण्ट व आईचे नांव मार्था कोहन होते. हाना याचे माध्यमिक शिक्षण बर्लिन येथे झाले. १९२४ पासून मारबर्ग विद्यापीठात उच्चशिक्षण घेण्यास आल्या. मार्टिन हायडेगर यांच्या मार्गदर्शनाखाली हाना आरेण्ट तत्त्वज्ञानाचा अभ्यास करत होत्या. त्याचवेळी त्यांच्यामध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले परंतु हे संबंध लवकरच संपुष्टात आले. १९२६ साली हायडेलबर्ग विद्यापीठामध्ये कार्ल जेसपर्स यांच्या मार्गदर्शनाखाली सेंट ऑगस्टीन यांच्या विचारतील प्रेमाची संकल्पना या विषयावर अभ्यास सुरू केला. १९२६–२७ यावर्षी फ्रेटाबर्ग विद्यापीठामध्ये डायमंड हुसेर्ल यांची विद्यार्थीनी म्हणून अभ्यास केला. १९२७–२८ साली हायडेलबर्ग विद्यापीठातून पीएचडी पदवी पूर्ण केले. १९२९ साली तरुण ज्यू तत्त्वज्ञ मॅरिस गुंटेर स्टर्न आणि हाना आरेण्ट यांचा विवाह झाला. १९३० साली नाझी जर्मनीमध्ये ज्यू लोकांना अटक करीत होते. त्या भीतीने १९३३ साली जर्मनीतून पलायन केले आणि पॅरिसला गेल्या १९३६ साली हायनरीच ब्लुचर याच्याशी हाना याची भेट झाली. १९३७ साली स्टर्न याच्याशी घटस्फोट झाला व १९४० हायनरीच ब्लुचर यांच्याशी विवाह केला. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यापासून शत्रुपक्षातील लोकांना अटक करण्याचे सत्र फ्रान्समध्ये सुरू झाले होते. त्यामुळे १९४१ साली ब्लुचर आणि आरेण्ट दोघेही अमेरिकेत न्यूयॉर्कला गेले. १९४१–४५ पर्यंत न्यूयॉर्कमधील आऊफबाऊ या जर्मन वृत्तपत्रासाठी त्या लेखन करीत होत्या. याच दरम्यान त्यांनी युरोपीयन ज्युईश कल्चरल रिकन्स्ट्रक्शन आयोगाच्या संशोधन प्रकल्पास दिशा दिली. त्यानंतर त्यांनी १९४६–४८ स्कॉकन बुक्सच्या संपादक म्हणून कार्यरत होत्या. १९४८ साली तिच्या आईचे निधन झाले. १९४९ ते १९५२ पर्यंत ज्युईश कल्चरल रिकन्स्ट्रक्शनचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होत्या. १९४९ साली मेरी मॅकार्थी यांच्याशी मैत्रीचे संबंध निर्माण झाले. ज्युईश कल्चरल रिकन्स्ट्रक्शनच्या निमित्ताने युरोपचा प्रवास भेट घेतली. त्यानंतर १९५३ साली प्रिन्स्टन विद्यापीठामध्ये व्याख्याने दिले. १९५५ साली कॅलिफोर्निया विद्यापीठ बर्कली येथे विझीटींग प्राध्यापक म्हणून कार्य केले. १९५६ साली शिकागो विद्यापीठ, १९६७–७५ पर्यंत न्यू स्कूल फॉर सोशीयल रिसर्च, न्यूयॉर्क येथे प्राध्यापक म्हणून कार्य केले आहे. १९६७ साली 'सिग्मड फ्रेऊड प्राईज' हे जर्मन अकादमी फॉर लॅग्वेज ॲन्ड लिटरेचरच्या वतीने देण्यात आला. अमेरिकन अकादमीचे

'इमररुन थोरे मेडल' हे ॲवार्ड १९६९ साली देण्यात आला. ३१ ऑक्टोबर १९७० रोजी त्याचे पती हायनरीच ब्लुचर याचे निधन झाले. १९७३ ते १९७४ गीलफोर्ड व्याख्यान अबरदीन स्कॉटलँड येथे व्याख्यान दिले. १९७५ साली त्याच्या युरोपीयन सामाजिक साठी डॅनिश सरकारकडून दिला जाणारा सोनींग प्राईज देऊन हाना यांना गौरविण्यात आले. ४ डिसेंबर १९७५ रोजी हाना आरेण्टचे हृदयविकराने निधन झाले. त्याच्या ६९ वर्षाच्या आयुष्यात त्यांनी अनेक महत्त्वाची पुस्तके लिहिले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने लव्ह ॲण्ड सेंट ऑगस्टीन (१९२९), द ओरीजीन्स ऑफ टोटॅलिटरेनिझम (१९५१), द लाईफ ऑफ व ज्युईश (१९५७), बिटवीन पास्ट ॲन्ड प्युचर (१९५४-१९६८), द ह्युमन कंडीशन (१९५८), ऑन रिव्हॉल्यूशन (१९६३), मेन इन डार्क टाईम (१९६८), क्रायसिस ऑफ रिपब्लिक (१९७२), रिप्लेक्शन ऑन लिटल रॉक (१९५९), द लाईफ ऑफ द मांईड या ग्रंथाचे दोन खंड प्रकाशित झाले. या सर्व त्याचा कार्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

हाना आरेण्ट यांच्या विचारामध्ये सर्वंकषतावाद मानवी अवस्था, क्रांती आणि नागरी प्रतिकाराचा विचार महत्त्वाचा आहे. प्रथमतः मानवी अवस्था विषयी अभ्यासणार आहोत.

### ४.२.२ मानवी अवस्था :

हाना आरेण्ट याच्यावरती ॲरिस्टॉटल ऑगस्टीन, कान्ट, नित्शे, जसपर्स, हायडेगर इत्यादी विचारवंताचा प्रभाव होता. हायडेगर यांनी नाझीसोबत सहभागामुळे आरेण्ट आणि हायडेगर यांच्यात मतभिन्नता निर्माण झाली होती. तरीही त्यांच्या विचाराचा प्रभाव आरेण्ट यांच्यावर होता. त्याच्या विचाराची मांडणीमधील मानवी अवस्था एक महत्त्वाचा विचार आहे. द ह्युमन कंडिशन हे पुस्तक आरेण्ट यांनी १९५८ साली प्रसिद्ध केले. या पुस्तकामध्ये प्राचीन ग्रीक नगरराज्यातील लोकशाही आणि राजकीय तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करून आधुनिक काळातील राजकीय जीवनामधील प्रश्नाचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. कारण ग्रीक नगरराज्यातील आदर्श समाज, तेथील प्रत्यक्ष लोकशाहीचा विचार हाना आरेण्ट याच्या विचारावर प्रभाव पडला होता. त्यामुळे त्यांनी मानवी जीवनामध्ये किंवा राजकीय जीवनामध्ये खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक क्षेत्र असतात. मानवी जीवन किंवा राजकीय जीवनामध्ये कृतीला महत्त्व असतो. आरेण्टच्या मते, श्रम आणि कार्य या निसर्गाद्वारे प्रेरित झालेल्या आणि जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्रिया आहेत. मात्र कृती ही मानवी जीवनामध्ये सर्वांत महत्त्वाची आहे. त्यामुळे आरेण्ट यांनी मानवी अवस्थेसंबंधी चर्चा करताना श्रम कार्य आणि कृती या तिन्ही गोष्टींचा विचार केला आहे.

**१) श्रम** (Labour) **:**

श्रम हा मनुष्य जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. मनुष्याला आपली उपजीविका करण्यासाठी श्रम आवश्यक असते. किंबहुना त्याचे जगणेच हे श्रमावर आधारित असते. श्रम ही प्रक्रिया अव्याहत चालू राहणारी प्रक्रिया असते. मानवी श्रमाची कृती ही मानवी गरजेतून निर्माण झाली आहे आणि गुलाम हे श्रमिकाचे काम करतात श्रम ही पारतंत्र्याची खूण आहे, अशी भूमीका आरेण्ट यांनी मांडली आहे. श्रमाची विभागणी खाजगी

आणि सार्वजनिक क्षेत्र असे करून श्रमाची कल्पना ही खाजगी जीवनाशी जोडली आहे. काबाडकष्ट करणारी लोक ही श्रम यामध्ये गणले जातात.

**२) कार्य** (Work) **:**

आरेण्ट हे श्रम व कार्य यामध्ये फरक करतात. त्याच्या मते, मानवात पशुप्रमाणे गरजेतून श्रम करण्याची वृत्ती होते तर मानवाला जीवन जगण्यासाठी कार्य करणे आवश्यक आहे. मानवी अस्तित्वासाठी कार्याची निर्मिती होते. मानवी अस्तित्वात मानवी गरजा ठरविणे त्यानुसार नियोजन करणे या सर्व गोष्टींचा अंतर्भाव कार्यामध्ये होतो. तसेच हे निसर्गनियमांनी बद्ध आहे. त्यामुळे कार्य मात्र मानवी उद्दिष्टानुसार ठरते. श्रम हे गरजानिगडीत आहेत. कार्य हे समाजामध्ये जगण्यासाठी आवश्यक आहे. कार्यामुळे समाजातील हितसंबंध जपले जातात. श्रम हे केवळ श्रम करणे ते श्रम करताच नष्ट होते. परंतु कार्य हे टिकून राहते. त्यामुळे श्रम आणि कार्य हे वेगवेगळे असले तरी समाजामध्ये खाजगी अवकाश क्षेत्रात श्रम व कार्य समाविष्ट होतात.

**३) कृती :**

आरेण्ट यांच्या मते, कृती हा मनुष्याच्या बुद्धीचा अविष्कार आहे. सार्वजनिक जीवनामध्ये कृती महत्त्वाची आहे. कृतीचा उद्देश सर्व समाजाचे कल्याण करणे, समाजाचा उद्धार करणे, सर्जनशील अशी कृती करणे हा असतो. स्वहितापेक्षा समुदायाच्या हिताला प्राधान्य दिले जाते. कृतीमध्येच स्वातंत्र्य अंतर्भूत असते. स्वातंत्र्याचा अर्थ व्यक्तीच्या अंतर्मनात दडलेले, चिंतनात्मक किंवा खाजगी मूल्य नव्हे तर स्वातंत्र्य हे सक्रीय, भौतिक आणि सार्वजनिक स्वरूपात अविष्कृत होत, कृती हा त्याचा उच्चतम टप्पा आहे. कृतीमध्ये खाजगी व सार्वजनिक क्षेत्र एक येतात. कृतीद्वारे मनुष्य निसर्गाच्या म्हणजेच नैसर्गिक प्रक्रियेच्या पलीकडे जातो आणि एक मुक्त व श्रेष्ठ जीव म्हणून कृती करतो.

आरेण्ट यांच्या मते, राजकारण हा कृतीचा एक सर्वोत्तम अविष्कार आहे. कृतीची सार्वजनिकता महत्त्वाची आहे. त्यामुळे कृती घडताना याचे अस्तित्व हे इतरांना जाणवले पाहिजे, अशी भूमिका आरेण्ट यांनी मांडले आहे. प्राचीन ग्रीक नगरराज्यामध्ये कृती ही सर्जनशील होती. या सर्जनशीलतेमुळे खाजगी व सार्वजनिक जीवन एकत्र येत होते. या सर्जनशीलतेमुळे हजारो वर्ष श्रम, कार्य व कृती यामध्ये फरक करू शकले नाहीत. परंतु आधुनिक काळामध्ये त्यामध्ये फरक झाला. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) युरोपीयन लोकांनी अमेरिकेचा लावलेला शोध होय. त्याचबरोबर आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया इत्यादी खंडांचा शोध लागला. त्यामुळे जगाचे एकूण स्वरूप बदलले.

२) युरोपातील धर्मसुधारणेची चळवळ महत्त्वाची आहे. युरोपीयन खंडामध्ये मार्टीन ल्युथर यांनी सुरू केलेली धर्मसुधारणेची चळवळ, मॅक्स वेबरने मांडलेला विचार, भांडवलशाहीचा झालेला विकास, धर्मसुधारणेमुळे धर्मसंस्था व राज्यसंस्था यांच्यात झालेली फारकत इत्यादी कारणामुळे जगामध्ये अनेक बदल घडून आले.

३) विज्ञानामुळे जगामध्ये अनेक शोध लागले आहेत. शास्त्रज्ञांनी जे विज्ञान विकसित केले ते निसर्गावर मात करणारे शास्त्र आहे. नवशास्त्र हे पूर्णत: गणितशास्त्रावर आधारीत आहे. गणितशास्त्राच्या प्रभावामुळे फार

मोठ्या प्रमाणात बदल झाला एकूण विज्ञानाच्या विकासामुळे फार मोठ्या प्रमाणावर बदल झाला. विज्ञानाच्या विकासामुळे समाजात परात्मभाव निर्माण झाले आणि या परात्मभावामुळे समाजामध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले. आधुनिककाळामध्ये हिंसा वाढली आहे. अनेक युद्धे झाली. लक्षावधी, कोट्यावधी लोक युद्धात मारले गेले. व्हिएतनामचे युद्ध, नाझीशहा हिटलर, मुसोलिनी, शीतयुद्धे, दुसरे महायुद्ध इत्यादीमध्ये हिंसा होऊन अनेक लोकांचा जीव गेला. त्यामुळे सर्जनशीलता नष्ट झाली. त्यामुळे कृती हे अहिंसेचे प्रतिक बनले. अशा प्रकारे मानवी अवस्थेमध्ये बदल झाला. ग्रीक काळातील सर्जनशीलता आता राहिली नाही.

हाना आरेण्ट यांनी प्राचीन ग्रीक राजकीय तत्त्वज्ञानातील अतिस्तूत्य असणारा जो विचार होता. खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र यांच्या मिलनाचे आणि नवा कृतिशील सर्जनशील समाज निर्माण करण्याचे हे स्वप्न आधुनिक काळाच्या संदर्भात पुन्हा मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि प्रत्यक्ष लोकशाही, कॉन्सिल सिस्टीम राबविण्याचा पुरस्कार केला. त्यांच्या मते ते कौन्सिल सिस्टिम लोकशाही आहेत. त्याचबरोबर सर्वंकष हुकूमशाहीच्या स्वरूपासंबंधी चर्चा केली आहे. हाना आरेण्ट यांनी क्रांती विषयी चर्चा करताना अमेरिकन राज्यक्रांती आणि फ्रान्सची राज्यक्रांती विषयी आरेण्ट यांनी चर्चा केली. त्याचबरोबर त्यांनी नागरी प्रतिकार मानवी स्वभाव इत्यादी संदर्भात ही चर्चा केली आहे. कार्य वृत्ती यांच्या मीमांसेतून मानवी अवस्थेसंबंधी विश्लेषण केले आहे. एकूणच आधुनिक राजकीय लोकशाहीतील पेचप्रसंग समजून घेण्यासाठी आरेण्ट याचे विचार महत्त्वाचे व उपयुक्त आहेत.

### ४.२.३ सर्वंकषतावाद :

हाना अरिण्ट यांनी सर्वंकषवादाचे विचार त्याच्या 'दि ओरिजिन्स ऑफ टोटॅलिटॅरिऑनिझम' या ग्रंथामध्ये १९५१ साली मांडले आहेत. यामध्ये तीन भाग असून पहिला भाग हा ज्यु विरोधाचा इतिहास, दुसरा साम्राज्यवाद, तिसरा भाग हा सर्वंकषवादाचा आहे. ज्या देशामध्ये सर्वंकष सत्ताधारी हुकूमशहा एकाच राजकीय पक्षाच्या नियंत्रणाखाली संपूर्ण राज्यकारभारावर नियंत्रण ठेवतो तेव्हा तेथे सर्वंकश अधिकारशाही निर्माण होते. सोव्हिएट रशियातील स्टॅलिनची एकाधिकारशाही, जर्मनीतील फ्युरर हिलरची हुकूमशाही, इटलीतील मुसोलिनीची फॅसिस्ट राजवट, चीनमधील माओची एकपक्षीय सर्वंकष सत्ता यांचा अभ्यास हाना अरिण्ट यांनी केला आहे. हाना आरेण्ट जन्माने ज्यू होत्या. त्यामुळे नाझिवाद्यांनी बेकायदेशीररित्या संशोधन केले. या सदराखाली त्यांना अटक केली होती. ज्यू आहे म्हणूनच त्यांना फ्रान्स सोडावे लागले.

#### १) ज्यू विरोधवाद :

ज्यू विरोधवादात ज्यू व्यक्तीचा द्वेष करण्यात आला आहे. व्यक्तिगत दृष्टिकोनातून ज्यू व्यक्तीचा द्वेष, तिरस्कार करणे, पोलीस सैन्य याद्वारे ज्यू समाजावर आक्रमण करणे या अर्थाने ज्यू विरोधवाद प्रकट केला जातो. एकोणिसाव्या शतकापासून ज्यू वंशविरोधवाद हा शब्द परिभाषा म्हणून वापरला जाऊ लागला. यहुदी धर्माच्या ज्यू लोकांना द्वेषबुद्धीने वागणूक देणे, त्याचा तिरस्कार करणे होय, त्यांचा छळ करणे होय. असा छळ दोन महायुद्धाच्या दरम्यान ज्यू धर्माचा लोकांचा छळ वाढला. त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होऊ लागले. ज्यू धर्म किंवा यहुदी धर्म हा जगातील एक प्रमुख धर्म आहे. ज्यू धर्म ३००० वर्षापूर्वीपासून आहे. ज्यू धर्माची संख्या

जगातील १.४३ कोटी अनुयायी आहेत. ४० टक्के ज्यू लोक हे इस्रायल देशात राहतात. इस्रायलच्या लोकसंख्या ७६ टक्के लोक ज्यू असून ज्यूधर्म हा या देशातील अधिकृत धर्म मानल जातो.

जर्मनीमध्ये ज्यू विरोधाला ज्यू द्वेषवादाला सुरुवात झाली. आधुनिक काळात संपूर्ण ज्यू जमातीलाच दोषी ठरवण्यात येऊन तिचा द्वेष करावयास सुरुवात झाली. समाजामध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही समस्याचे कारण ज्यू आहेत, असे लोकांच्या डाव्या विचाराच्या ज्यू विरोधी पक्ष निर्माण झाले. समाजातील बहुसंख्य लोकांच्या मनात ज्यू लोकांच्याबद्दल एकप्रकारचे क्लिमिष निर्माण करण्यामध्ये या पक्षाना काही प्रमाणात यश मिळाले. या विरोधी करण्यामध्ये या पक्षांना काही प्रमाणात यश मिळाले. या विरोधी प्रचारामुळे ज्यू लोकांच्यामध्ये सुद्धा स्वत:ची अस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू झाला आणि त्यातूनच ज्यू वर्चस्ववादाची किंवा झायोनिझमची निर्मिती झाली. हना आरेण्ट यांच्या मते, या विचाराचा प्रभाव शासन यंत्रणा, न्यायव्यवस्था आणि सैन्यदल यांच्यावरही पडला होता. आरेण्ट असे मत व्यक्त करतात की, ज्यू द्वेषवाद ही कोणत्याही प्रकारची धार्मिक विचारसरणी नाही. ही एक प्रकारची ऐहिक विचारसरणी आहे आणि हिचा उद्देश धर्माचा वापर करून राजकीय सत्ता प्राप्त करणे हा आहे. ज्यूच्या विरोधामध्ये जर्मनीमध्ये नाझी पक्षाने जर्मनीच्या पहिल्या युद्धातील पराभवासाठी ज्यू लोकांना दोषी ठरवले आणि पराभूत जर्मन लोकांना या आधारे संघटित केले. १९३२ साली हिटलर सत्तेवर आल्यानंतर ज्यू लोकांची कत्तल करण्यात आली.

ज्यू विरोध हा शब्द ज्यू लोकांचा द्वेष किंवा तिरस्कार या अर्थी वापरला जातो. ज्यू लोकांच्या चळवळीला ज्यूवाद म्हणतात. ज्यू लोक आपल्या अधिकाराचे पुरस्कार करतात. ज्यू संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी ईस्रायल देशातील ज्यू लोक आणि पॅलेस्टाईन यामध्ये अनेकदा संघर्ष होताना दिसतो. ज्यू विरोधातील चर्चा हाना हारेण्ट यांनी केली आहे.

**३) साम्राज्यवाद :**

साम्राज्यवाद हा शब्द इंपेरियम या लॅटिन शब्दापासून निर्माण झालेला आहे. साम्राज्यवाद म्हणजे विकसित शक्तीशाली राष्ट्राने अविकसित कमकुवत राष्ट्रावर वर्चस्व प्रस्थापित करणे होय. बलाढ्य शक्तिशाली राष्ट्र दुसऱ्या कमकुवत राष्ट्राच्या भूप्रदेशावर हुकमत चालवून तो भूभाग आपल्या नियंत्रणाखाली ठेवते. विविध राजकीय विचारवंतांनी साम्राज्यवादी विचारसरणीचा पुरस्कार केलेला आहे. हाना आरेण्ट यांनी प्रस्तुत प्रकरणात विविध देशाच्या साम्राज्यशाहीचा अभ्यास करून एकाधिकारशाहीचे स्वरूप स्पष्ट केले आहे. युरोपातील राष्ट्रांनी आशिया खंडातील भारत, चीन, जपान, म्यानमार, इंडोनेशिया, मलाया, फिलीपाईन्स इत्यादी देशावर साम्राज्यवाद प्रस्थापित केला आहे. आफ्रिका खंडामध्ये सुद्धा बेल्जियम, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली, हॉलंड, पोर्तुगाल इत्यादी युरोपियन राष्ट्रांनी युगांडा, नायझेरिया, सुरान, झांबिया इत्यादी आफ्रिकन राष्ट्रावरती साम्राज्य प्रस्थापित केले. साम्राज्यवाद प्रस्थापित होण्यासाठी तीन कारणे महत्त्वाची आहेत.

१) जगातील विकसित देशांना असे वाटते की, गरीब देशांच्या विकासासाठी त्यांच्या मागासलेपणामध्ये सुधारणा आणण्यासाठी श्रीमंत राष्ट्रावर जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे. बळाचा वापर करून साम्राज्य

प्रस्थापित टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात. काही ठिकाणी सशस्त्रक्रांती होऊन सत्ता उलथवण्याचा प्रयत्न झाला.

२) आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी वांशिक श्रेष्ठत्वाचे एक कारण असते. सध्या जर्मनी सर्व युरोप इटली, इंग्लंडमध्ये आफ्रिका व आशिया खंडातील राजकारण पाहिले तर असे लक्षात येईल की, १०% गोरे हे ९०% काळ्या लोकांवर राज्य करतात. हे वर्णभेद सर्वंकषतावादी साम्राज्य निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. तसेच वंशवादामुळे जर्मनीमध्ये ज्यू लोकांच्या कत्तली झाल्या. या सर्व गोष्टी साम्राज्य प्रस्थापित करण्याचे कारण आहेत.

३) वैज्ञानिक शोध, औद्योगिक क्रांती, आशिया आणि आफ्रिका खंडातील खनिज व नैसर्गिक संपत्तीची विपुलता इत्यादी कारणामुळे युरोपियन राष्ट्रांनी वसाहतीद्वारे साम्राज्यविस्तार केला. यंत्रसंशोधनामुळे वस्तू उत्पादनाची गती वाढली. मालाच्या विक्रीच्या बाजारपेठ म्हणून तसेच कच्चा माल मिळविण्याच्या दृष्टिने साम्राज्यविस्तार करणे महत्त्वाचे ठरले.

हाना ॲरेण्ट यांच्या मते, साम्राज्यशाही आणि हुकूमशाही व्यवस्था यांचे जवळचे संबंध आहेत. नव्या साम्राज्यशाहीचा उदय १८ व्या शतकात झाला. जुनी साम्राज्यशाही परराज्यावर आक्रमण करून त्यावर आपले राजकीय वर्चस्व लादत होती तर नवी साम्राज्यशाही आर्थिक शोषणासाठी मोठ्या वसाहती ताब्यात घेत आहेत. भांडवलशाही आणि राष्ट्रराज्य यांचा उदय एकाचवेळी झाला. भांडवलशाही ही ज्यावेळी साम्राज्यवादात परावर्तीत होते त्यावेळी आर्थिक लाभासाठी सतत प्रादेशिक विस्तार करत राहते. ती नवनव्या वसाहती काबीज करते. हाना आरेण्ट यांनी साम्राज्यवादाच्या वेगवेगळ्या बाजू विषद केल्या आहेत. त्यामध्ये वंश आणि एखाद्या समाजाची वांशिक श्रेष्ठता इतिहासाची नव्याने केलेली इतिहासवादी मांडणी आणि नोकरशाहीचा उदय यांची पण चर्चा केली आहे. त्यांच्या मते, युरोपमध्ये इंग्लंड व पोर्तुगालसारख्या देशांचा साम्राज्यवाद आणि युरेशियन लोकांचा साम्राज्यवाद यांचा उदय झाला. युरोपमधील साम्राज्यवाद हा जर्मनी, रशिया आणि इटलीमध्ये सुरू झाला आणि त्यांनी झपाट्याने नवेनवे भूभाग ताब्यात घ्यायला सुरुवात केली. अरेण्ट यांच्या मते, इटलीमध्ये मुसोलिनीचा फॅसिस्ट पक्ष, जर्मनीमध्ये हिटलरचा नॅशनल सोशॅलिस्ट पक्ष आणि सोव्हिएत रशियाचा बोल्टेव्हिक पक्ष हे या पद्धतीचे पक्ष होते. ते स्वत:ला राष्ट्राचे एकमेव प्रतिनिधी मानत असत आणि त्याचे पुढारी जनतेच्या इच्छाचे प्रतिनिधीत्व करणारे पुढारी मानले जात. त्यांनी आपल्या देशातील सर्व विरोधकांना नेस्तनाबूत केले आणि आपली हुकुमशाही राज्यव्यवस्था निर्माण केली. अरेण्ट यांच्या मते, १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर जगातील अनेक वसाहती स्वतंत्र झाल्या. नव्याने स्वतंत्र झालेली राष्ट्रे शीतयुद्धात सापडली. चीन व उत्तर कोरियात रशियन पद्धतीच्या हुकूमशाहच्या निर्माण झाल्या तर इतरत्र लष्करी हुकूमशाह्या निर्माण झाल्या.

**४) सर्वंकषतावाद किंवा एकाधिकारशाही :**

हाना आरेण्ट यांनी ज्यू विरोध व साम्राज्यवादाचा अभ्यास केल्यानंतर सर्वंकषतावादाच्या उदयाची त्याच्या विकासाची मांडणी केली आहे. सर्वंकषता म्हणजे अशी राजकीय व्यवस्था की जेथे एकच राजकीय पक्ष आणि

एकच सत्ताधारी व्यक्ती असते. तेथे अन्य विरोधी पक्षाचा अभाव असतो. सत्ताधारी व्यक्ती ही हुकूमशाही पद्धतीने वागतो. अनियंत्रित राजेशाही हा एकाधिकारशाहीचाच प्रकार आहे. सर्वंकषतावादाची उदाहरणे म्हणजे सोव्हिएट रशियातील स्टॅलीनची सत्ता, जर्मनीचा हिटलर, चीनचा मासो, इटलीचा मुसोलिनी इत्यादींचा समावेश करावा लागतो. हाना आरेण्ट यांच्या मते, एकाधिकारशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याचा पूर्ण अभाव असतो. हुकूमशाहीत व्यक्तीला कोणतेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य नसते. आरेंट यांनी जर्मनीतील हिटलरचा सर्वंकषतावादी सत्ता व रशियातील स्टॅलिनची सर्वंकषतावादी सत्ता यांची चर्चा केली आहे.

**जर्मनीतील नाझिवाद :**

एकाधिकारशाहीत देशातील सर्व संस्थेपेक्षा राज्यसंस्था सर्वश्रेष्ठ आणि शक्तिशाली असते. तेथे व्यक्तीला गौणस्थान असते. अशा राजटीमध्ये व्यक्ती हे राज्यासाठी काम करावे लागते. राज्याशी एकनिष्ठ राहून व्यक्तीने आपल्या सर्व निष्ठा राज्याला अर्पण करावे लागते. सर्वंकषतेला कोणीही विरोध करीत नाहीत. सत्ताही एकाच्या हातात असते. जर्मनीमध्ये हिटलरकडे सत्ता होती. नाझी पक्षाशिवाय देशात कोणताही अन्य पक्ष किंवा संघटना नव्हत्या. नाझी पक्षाने आपली सत्ता टिकविण्यासाठी त्याचा विस्तार करण्यासाठी तेथील शिक्षणव्यवस्था, वृत्तपत्रे, नभोवाणी इत्यादी प्रचारतंत्राचा वापर तर केलेला होता आणि त्याला स्वातंत्र्य न देता सत्ता प्रस्थापित करीत होते. नाझी पक्षाच्या विस्तारामध्ये जगातील जर्मन हेच शुद्ध सर्वश्रेष्ठ वंश आहे. संपूर्ण जगावर सत्ता गाजविण्याचा अधिकार जर्मन वंशाला आहे. जर्मनीतील ज्यू लोक हे स्वार्थी, जनतेचे आर्थिक शोषण करणारे राष्ट्रद्रोही आहेत म्हणून त्यांना जर्मनीतून हद्दपार केले पाहिजे, असे हिटलरचे मत होते. १९३३ साली जर्मन संसदेत नाझी पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाल्यामुळे हिटलर सत्तेवर आला. हिटलरची सत्ता ही सर्वंकषतवादी होती. हिटलरने सत्तेवर आल्यानंतर जर्मनीत आर्थिक, शैक्षणिक सुधारणा केल्या, शेती व उद्योगधंदे याविषयीही सुधारणा केली. त्याचबरोबर युद्ध साहित्य, शस्त्रास्त्रे व सैन्य यांच्यात वाढ केली. दरम्यानच्या काळात हिटलरने ज्यू जमातीतील लोक स्वार्थी आर्थिक शोषण करणारे आहेत, म्हणून त्याचा छळ केला. त्यांच्या कत्तली केल्या. हिटलरच्या या वृत्तीमुळे ज्यू लोक अनेक देशामध्ये स्थलांतरीत झाले. दुसऱ्या महायुद्धात सुद्धा हिटलर सहभागी झाला. एकूणच जर्मनीतील नाझी तत्त्वज्ञान हे सर्वंकषवादी तत्त्वज्ञान होते.

**रशियातील स्टॅलिनची हुकूमशाही :**

१९१७ साली रशियामध्ये साम्यवादी क्रांती झाली आणि लेनिन सत्तेवर आला. लेनिन व मार्क्सच्या विचाराची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न केला. लेनिननंतर स्टॅलिनने सत्तेची सूत्रे हाती घेतली. लेनिन आणि स्टॅलिन यांच्या ध्येयधोरणात साम्य दिसत असले तरी त्यांचा मार्ग भिन्न होता. लेनिनने रशियातील सत्ता कामगारांच्या हाात असावी यासाठी प्रयत्न केले. परंतु स्टॅलिनने हुकूमशाहीचा दहशतीचा मार्ग स्वीकारून रशियाची प्रगती केली. स्टॅलिनच्या सत्तेमध्ये जनता, नोकरवर्ग इत्यादी लोक दाबून गेली होती. त्यामुळे स्टॅलिनच्या सत्तेबद्दल लोकांमध्ये असंतोष राग होता. परंतु स्टॅलिनच्या हुकूमशाहीपुढे निभाव लागला नाही. रशियाच्या नव्या राज्यघटनेनुसार व्यक्तीला मूलभत अधिकार प्राप्त झाले आहे. परंतु प्रत्यक्षात ते वापरता आलेले नाही. स्टॅलिनची सत्ता ही पूर्णपणे हुकूमशाहीची असल्यामुळे सोव्हिएत जनतेची गळचेपी झाली होती.

१९८० पर्यंत स्टॅलिनवादाचे वर्चस्व होते. १९८५ साली गोर्बाचेव्ह सत्तेवर आल्यानंतर पुढे १९९१ साली सोव्हिएत रशियाचे विघटन झाले.

हाना आरेण्ट यांनी जर्मनीचा नाझिवाद आणि रशियातील स्टॅलिनवादाचा अधिक सूक्ष्मरीतीने अभ्यास केला. वर्णभेद वर्गभेदचा परिणाम काय होतो, याचा परामर्श घेतलेला आहे. सोव्हिएत रशियातील स्टॅलिनच्या सत्तेच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी होऊन भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, खाज.गी मालमत्तेचा हक्क संपतुष्टात कशा रीतीने झाले याचे चित्रण आरेण्ट यांनी केले आहे. स्टॅलिनला साम्यवादी विचारप्रणालीतील तत्त्वाचा विसर पडल्यामुळे रशियात वर्गविहीत समाज निर्माण होऊ शकला नाही. उलट स्टॅलिनच्या हुकुमशाहीमुळे लोकांचा त्यांच्यावरील विश्वास कमी झाला. हाना आरेण्ट यांनी सर्वंकषतावादाची चर्चा करताना जर्मनी रशिया बरोबरच इटली, स्पेन, चीन, जपान या देशातील सर्वंकषतावादी/ एकाधिकारशाहीच्या सत्ताचा आढावा घेतलेला आहे. हाना आरेण्ट यांनी मांडलेला विचार उपयुक्त व मार्गदर्शक आहेत. हाना आरेण्अ याच्या सर्वंकषतवादाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत–

१) आरेण्टचे सर्वंकषतावदाच्या संघटनात्मक संरचनेचे वर्णन करण्यासाठी कांद्याचे रूपक वापरले. या संघटनेमध्ये कांद्याचे पापुद्रे जसे आहेत तसे अनेक स्तर असतात आणि तिच्या केंद्रस्थानी नेतृत्त्व असते. सर्वांत बाहेरच्या स्तरामध्ये कमी समर्थक असतात तर केंद्राकडे जाताना समर्थन प्रक्रिया प्रत्येक स्तरामध्ये अधिक तीक्ष्ण झालेली दिसते.

२) सर्वंकषतावदामध्ये विचारप्रणालीची अंमलबजावणी करताना दहशतीचा वापर होतो. नाझिवाद आणि साम्यवाद या दोन्ही राजवटीमध्ये आपल्या राष्ट्रवादासाठी आणि क्रांतीकारी साम्यवादी विचारप्रणालीच्या प्रसारासाठी दहशतीचा वापर केला. लोकांना वास्तव परिस्थितीचा अनुभव येऊ नये, यासाठी भ्रमाचा पडदा राखण्यात दहशत कळीची भूमिका बजावते. फार मोठ्या प्रमाणात हिंसा निर्मिती करून लिबरल डेमोक्रसी नष्ट केली. रशियातील स्टॅलिनने खोट्या केसेस दाखल करून दहशतीचा वापर करून देशातील आपल्या विरोधकांना नष्ट केले.

३) आरेण्टच्या मते, असत्य कथन हे सर्वात मोठे राजकीय दुष्ट कार्य असून सर्वंकषतवादाचे तत्त्वज्ञान हेच एक महाभयंकर असत्य आहे. संपूर्ण व्यवस्था ही असत्यावर चालते. प्रसार माध्यमाचा वापर करून खोटी गोष्ट खरी करण्याचा प्रयत्न केला जातो. जर्मनीतील व रशियातील राजवटीमध्ये मोठ्या प्रमाणात खोटा प्रचार करण्याचा तसेच लोकांमध्ये प्रतिआभास करण्यात आला होता. आपल्या प्रदेशामध्ये गुणवत्ता आहे असे खोटे सांगण्याचा प्रयत्न केला जातो.

४) सर्वंकषतावादामध्ये जे नेतृत्व आहे, ते नेते हे आपल्या हिताच्या दृष्टीने चांगले आहेत, ते आपल्या जीवनात तारणहार आहेत. त्याच्याशिवाय हा देश चालू शकत नाही. त्याचे नेतृत्त्व हे योग्य आहे. त्याच्यामुळेच हा देश व्यवस्थित प्रगती करू शकेल, असे वातावरण निर्माण केले जाते.

५) सर्वंकषतावादाचा उदय हा सार्वजनिक क्षेत्राचा ऱ्हास झाल्यामुळे होतो. त्यास अनुकूल परिस्थिती निर्माण होते. त्याचबरोबर लोकांची नाळ ही वास्तवाशी जोडलेली नसते किंवा वास्तव स्विकारण्याची तयारी नसते. मात्र सर्वंकषवादाने कल्पित जगाचे रंगविलेले चित्र अधिक आकर्षक वाटते. सर्वंकषवादी नेतृत्त्व दाखविलेल्या खोट्या स्वप्नावर विश्वास ठेवून लोक जगत असतात.

अशा प्रकारे आरेण्ट यांनी सांगितलेल्या सर्वंकषवादाची वैशिष्ट्ये आहेत. असे असले तरी हाना आरेण्ट याच्या सर्वंकषवादावर टिका केली जाते. कारण यांच्या मते फक्त मानशास्त्रीय दृष्टिकोनाचा विचार केला असून सामाजिक-आर्थिक पैलूकडे दुर्लक्ष केले आहे. त्याचबरोबर आरेण्ट यांनी नाझिवाद व साम्यवाद याची तुलना केली आहे. परंतु वास्तवामध्ये त्यातील भेदाकडे दुर्लक्ष केले आहे.

### ४.२.४ आरेण्ट याचे क्रांतिविषयक विचार :

हाना आरेण्ट यांनी १९६१ साली ऑन रिव्हॉल्यूशन हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये अमेरिका आणि फ्रान्स या देशातील क्रांतीचा तुलनात्मक अभ्यास करून निष्कर्ष काढले आहेत. या राज्यक्रांतीच्या संदर्भात मार्क्सवादी व उदारमतवादी विचाराच्या अनुषंगाने आरेण्ट यांनी लेखन केले आहे. उदारमतवाद्याच्या मते, दोन्ही क्रांत्यामधून मर्यादीत शासनव्यवस्था स्थापन होऊन व्यक्ती स्वातंत्र्याला चालना मिळाली व मार्क्सवादाच्या मते, फ्रेंच क्रांती ही केवळ सामाजिक प्रश्नातून घडली आहे. याबाबत आरेण्ट यांच्या मते, या दोन्ही क्रांत्यामधून परस्पर समान हिताच्या मुद्द्यातून स्वातंत्र्यासाठीचा सार्वजनिक अवकाश निर्माण करता येऊ शकतो. नागरी स्वातंत्र्याचा आणि सहभागाचा अवकाश प्राप्त करता येऊ शकतो. यासाठी त्या दोन्ही क्रांत्या उदाहरणे आहेत. फ्रान्समध्ये जेवढ्या प्रमाणात क्रांतीची भावना प्रकट झाली होती, तेवढ्या प्रमाणात अमेरिकेतील जनतेत क्रांतीची भावना प्रकट झाली नव्हती. कारण तेथील जनता सक्रिया राजकारणात भाग घेत नाही, असे आरेण्टचे मत आहे. राजकीय क्रांती ही मोठ्या प्रमाणामध्ये हिंसा करून सामाजिक, राजकीय बदल घडवून आणण्यासाठीची कृती असते. फ्रेंच राज्यक्रांती यशस्वी झाली. फ्रेंच क्रांतीने सर्जनशील शक्ती उदयास लागल्या. मुख्य सकारात्मक बदल घडवून आणणारी क्रांती होय. फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये उलथापालथ झाली. सरंजामशाहीचा नाश झाला. धर्मसत्तेचा प्रभाव संपुष्टात आला. परंतु सकारात्मक बदल फ्रेंच राज्यक्रांतीने झाला नाही. कारण फ्रान्समध्ये सतत हिंसा, संघर्ष होता.

अमेरिका राज्यक्रांतीने बदल घडवून आणले. एक नव संघराज्य निर्माण झाले. नवरिपब्लिक निर्माण झाले. तेथे सकारात्मक बदल झाला. तरीही हाना आरेण्ट यांना असे वाटते की, या दोन्ही क्रांत्याद्वारे सामूहिक विमर्श निर्णयप्रक्रिया आणि समन्वयाचे कार्य स्थापना करण्याचा अपयशी ठरल्या आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीतील राजकीय स्वातंत्र्याचा अर्थ केवळ वस्तू व संसाधनाच्या वितरणापुरता मर्यादित केला गेला. अमेरिकन क्रांतीच्या माध्यमातून सहमतीच्या आधारावर राजकीय समाज निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. तरीही ये यश मर्यादित आणि आंशिक स्वरूपाचे असल्याचे आरेण्ट म्हणतात. एकूणच आरेण्ट यांच्या मते, व्यक्तीच्या राजकीय क्षमताचा विकास करण्यासाठी जे वातावरण निर्माण करायला हवे होते. तसे झाले नाही त्यात या क्रांत्या

अयशस्वी ठरल्या आहेत. हाना हारेण्ट यांनी असे नमूद केले की, कोणतीही व्यक्ती जोपर्यंत सार्वजनिक स्वातंत्र्याचा अनुभव घेत नाही तोपर्यंत ती स्वतंत्र आहे, असे म्हणता येत नाही आणि सार्वजनिक सत्तेत सहभाग व वाटा असेपर्यंत कोणीही सुखी वा स्वातंत्र्य आहे, असे म्हणता येत नाही. अशाप्रकारे फ्रान्स व अमेरिकन राज्यक्रांती संदर्भात आरेण्ट यांनी आपली भूमिका मांडली आहे.

### ४.२.५ नागरी प्रतिकार :

आरेण्ट यांनी ज्या देशात राहिल्या ज्या देशामध्ये वाढल्या याचा त्यांना अनुभव होताच त्याचबरोबर त्यांनी जगातील साम्राज्यवादी देशाचा अभ्यास केला. हिटलरचा नाझिवाद आणि रशियातील साम्यवाद राजवटीची चर्चा केली. फ्रेंच राज्यक्रांती आणि अमेरिकन राज्यक्रांती आणि त्याच्या प्रगतीचा अभ्यास केल्या होत्या. या सर्व गोष्टीतून त्यांना नागरिकासंबंधी आपले विचार मांडले आहेत. त्याच्या मते, राजकारण ही नागरिकांचा सक्रीय सहभाग, चर्चा आणि सहमती याद्वारे राजकीय समुदायाच्या सार्वजनिक व्यवहारांचे संचालक करण्याची एक उदात्त कृती होय. या राजकीय समुदायामध्ये सर्वसाधारणपणे मानले जाते. तसे शासन आणि नागरिक हे समान पातळीवर असतील आणि शासन पुढाकार होईल, कल्पना आणि धोरणे निर्माण करेल आणि त्यास लोकांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करेल. राज्यकारभार चालविताना शासनाचा पुढाकार आणि लोकांचा पाठिंबा या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. शासन किंवा सत्ता म्हणजे व्यक्तीची मालकी नसते तर जनतेच्या सहकार्याने कार्य करणारे आवश्यक आहे, येथे आदेश पालनाचा संबंध येत नाही. ती सहकार्य आणि सहमतीच्या आधारावर सामूहिक कार्य असते. आरेण्ट यांनी व्यक्तीला किंवा जनतेच्या शासनाचे जे कायदे ध्येय-धोरणे असतात ते जर जनहिताचे नसतील तर त्याविरुद्ध आज्ञाभंग करण्याचा प्रतिकार करण्याचा अधिकार जतेला आहे अशी भूमिका मांडतात. त्याच्यामध्ये नागरी प्रतिकाराचे अधिकार हे खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) कोणत्याही लोकशाही व्यवस्थेमध्ये सविनय आज्ञाभंग करण्याचा नागरिकांना अधिकार आहे. कुठलीही व्यवस्था ज्यावेळी चुकीचे कायदे करते त्यावेळी लोकांना चळवळ करण्याचा, सविनय कायदेभंग करून कायदे बदलण्याचा लोकांना अधिकार आहे.

२) सरकारला कायदे करण्याचा अधिकार आहे ज्यावेळी सरकार चुकीचे कारते त्यावेळी सरकारची अधिमान्यता धोक्यात येते. चुकीच्या निर्णय घेणाऱ्या कायदे करणाऱ्या सरकारची अधिमान्यता नष्ट होते आणि संविनय आज्ञाभंगाचा अधिकार लोकांना प्राप्त होतो.

३) लोकांना बळकट करण्यासाठी एकत्रित आणण्यासाठी सविनय आज्ञाभंग केला पाहिजे.

४) जे जुनाट व चुकीचे कायदे आहेत ते बदलण्यासाठी चळवळ केली पाहिजे. लोकशाही व्यवस्थेमध्ये सविनय आज्ञाभंग करण्याचा अधिकार महत्त्वाचा आहे.

अशाप्रकारे लोकांना सविनय आज्ञाभंगाच्या अधिकारांचे आरेण्ट यांनी समर्थन केले आहे.

**स्थलांतरीताचा प्रश्न :**

हाना आरेण्ट यांनी स्थलांतराचा प्रश्न मांडलेला आहे. कारण त्या स्वत: हे स्थलांतरीत होत्या जर्मनी, फ्रान्स, अमेरिका इत्यादी ठिकाणी स्थलांतर करून जीवन जगले आहे. त्यामुळे त्यांनी स्थलांतरीचा प्रश्नासंबंधी चर्चा केले आहे. त्याच्या मते,

१) नव्या परकीय देशामध्ये स्थलांतरीत झाल्यानंतर त्या परकीय देशातील मूळ लोकांच्यामध्ये द्वेषभावना निर्माण होते. मूलनिवासी व बाहेरून झालेल्यामध्ये संघर्ष होतो.

२) जे त्या देशातील लोक आहेत ते असे म्हणतात की, तुम्ही आमची संस्कृती पूर्णत: स्वीकारले पाहिजे तुम्ही स्वत:च भाषा, धर्म, वंश, परंपरा, वेश सोडले पाहिजे. तुम्ही आमच्यामध्ये पूर्ण समरस झाले पाहिजे. तुम्ही एकजिनसी समाज निर्माण होण्यासाठी तुमची भाषा, धर्म, वंश इत्यादी गोष्टी सोडले पाहिजेत. परंतु स्थलांतरीत लोक असे म्हणतात की, आम्ही आमची भाषा, संस्कृती, वंश धर्म सोडणार नाही, हा संघर्ष १९६६ साली केला. जगभरात हा प्रश्न निर्माण झाला आहे. एकजिनसी समाज निर्माण होण्यासाठी एकतर बाहेरच्यांना नागरिकत्व देऊ नका किंवा त्यांनी आपले सर्व गोष्टी सोडून आमच्यामध्ये समरस झाले पाहिजे, अशा भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण झाल्या आहेत. पण आरेण्ट यांच्या मते उदारमतवादी व सहिष्णु समाजात यावर तोडगा निघतो. व अमेरिकी क्रांतीला जास्त यशस्वी मानले.

अशा प्रकारे स्थलांतराच्या प्रश्नासंबंधी हाना आरेण्ट यांनी चर्चा केली आहे.

## ४.३ सारांश :

हाना आरेण्ट यांनी मानवी अवस्था, क्रांती, साम्राज्यवाद, ज्यू विरोधवाद सर्वंकषता वाद, स्थलांतरीतांचा प्रश्न, नागरी प्रतिकार इत्यादी विषयाची चर्चा केली आहे. ती आज समाजामधील प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी महत्त्वाची आहे. तसेच समाजामध्ये ग्रीक काळातील जे एकत्रित समाजव्यवस्था होती, जी आदर्श समाजव्यवस्था होती ती व्यवस्था प्रस्थापित झाली पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे. त्यामुळे त्यांनी अभ्यासलेल्या सर्व विषयाची आज समाजामध्ये उपयुक्त आहेत. एकूणच आधुनिक जगातील लोकशाही व्यवस्था टिकविण्यासाठी आणि परिस्थिती समजून घेण्यासाठी आरेण्ट यांचे विचार महत्त्वाचे आहेत.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

**अवकाश –** क्षेत्र

**खाजगीक्षेत्र –** व्यक्तिगत काम करण्यासाठीचे क्षेत्र

**सार्वजनिक क्षेत्र –** समाजाच्या हितासाठीचे क्षेत्र

## ४.५ स्वाध्यायासाठीचे प्रश्न :

१) हाना हारेण्ट यांनी मानवी अवस्थेसंबंधी किती मुद्द्याच्या आधारे चर्चा केली आहे?

उत्तर : तीन

२) हाना आरेण्ट यांनी 'द ह्युमन कंडिशन' हे पुस्तक कोणत्या साली लिहिले?

उत्तर : १९५८

३) हाना आरेण्ट यांनी क्रांती विषयक विचार कोणत्या पुस्तकात मांडले आहे?

उत्तर : ऑन रिव्हॉल्युशन

४) हाना आरेन्ट यांच्या 'सर्वंकषतावादाचा उदय' या पुस्तकाचे विभाजन किती भागात केले आहे?

उत्तर : तीन

५) हिटलर हा कोणत्या पक्षाचा नेता होता?

उत्तर : नाझी पक्ष

६) नाझी पक्षाचे विचार कोणते?

उत्तर : राष्ट्रीय समाजावाद, वंशवाद

७) स्टॅलिन हा कोणत्या पक्षाचा प्रमुख होता?

उत्तर : सोव्हिएत कम्युनिस्ट पक्ष

८) स्टॅलिनने सर्वंकष सत्ता कशाच्या आधारे स्थापन केली?

उत्तर : गुप्तहेर संघटना व हिंसा

९) हाना आरेण्ट यांच्या सर्वंकषतावादाचा उदय हा ग्रंथ कोणत्या साली प्रकाशित झाला?

उत्तर : १९५१

१०) हाना आरेण्ट यांनी ऑगस्टीनचा अभ्यास करताना कोणत्या विषयाची चर्चा केली आहे?

उत्तर : प्रेमाचा

**टिपा लिहा.**

१) आरेण्ट याचे क्रांतीचे विचार

२) आरेण्ट याचे नागरी प्रतिकारासंबंधी विचार

**दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) आरेण्ट यांनी मांडलेला सर्वंकषतावादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आरेण्ट यांना ग्रीकांचा एकात्मसमाज का आदर्श वाटतो?

## ४.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१) Buckler Steve, Hannach Arendt and Political Theory, Edinburg University Press Ediuburg 2011.

२) Peter Baehr, The Portable Hannah Arendt, Penguin Books, 2000.

३) Arendt, Hannah, on Revolution, Penguin Books, 1965.

४) आवटे श्रीरंजन, 'विसाव्या शतकातील राजकीय विचार', राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

५) चौसाळकर अशोक, 'हाना आरेण्ट आणि हुकुमशाही राज्यव्यवस्थेचा उदय'.

❍❍❍